# “संशोधन : स्वरूप आणि व्याप्ती”

संपादक - डॉ. भास्कर शेळके



शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

# "संशोधनः स्वरूप आणि व्याप्ती"

संपादक
**डॉ.भास्कर शेळके**
सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

**शब्दश्री प्रकाशन, जुन्नर**

**Sanshodhan: Swaroop Ani Vyaptee**
**"संशोधनः स्वरूप आणि व्याप्ती"**
**संपादक** : प्रा.डॉ.भास्कर शेळके

© डॉ.अविनाश भास्कर शेळके
मो.नं.९८९०६८६५२१

**प्रकाशकः**
सौ.तारादेवी भास्कर शेळके
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता.जुन्नर,
जि.पुणे. ४१० ५०२
मो.नं.९८२२४४८१८१

**प्रकाशन क्रमांक** : ४

**प्रथमावृत्ती** : २६.८.२०१३

**मुखपृष्ठः**
**प्रा.विनोद पारे,** बारामती

**अक्षर जुळणीः**
**श्री.गणेश उर्फ देवव्रत दाजीराम बागल**
बालाजी एंटरप्रायजेस, मंचर (पुणे)

**मुद्रकः**
न्यू भारत प्रिंटर्स, पुणे

मूल्यः रु.४६०/-

ISBN No.: 978 - 81 - 924997 - 7 - 2

# ◆ अर्पण पत्रिका ◆

माजी प्राचार्य एस.एन.तोत्रे
प्राचार्य, डॉ. कांतीलाल पुराणे
आणि
सिनिअर, ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक आणि
शिक्षकेतर कर्मचारी वृंद
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर

यांना सविनय...

**डॉ.भास्कर शेळके**

# ◆ मनोगत ◆

'संशोधनः स्वरूप आणि व्याप्ती' या विषयावर श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि.पुणे येथे दोन दिवसांचे दि. २६ व २७ ऑगस्ट २०१३ रोजी राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या विषयावर अनेक नामवंत अभ्यासक, प्राध्यापक, संशोधकांनी शोधनिबंध वेळेत पाठविले. त्या शोधनिबंधाचा संदर्भग्रंथ करावा असे ठरविण्यात आले. म्हणूनच संशोधनः स्वरूप आणि पद्धती हा ग्रंथ सिद्ध केला. निबंधलेखकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्यांच्या लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

ग्रंथ प्रकाशन कामी संस्थेचे अध्यक्ष मा.ॲड.संजय शिवाजीराव काळे यांनी प्रोत्साहन दिले, तसेच त्यांचे सर्व सहकारी विश्वस्त व अध्यक्ष प्रतिनिधी, मा.प्राचार्य, मा.उपप्राचार्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि हितचिंतक मित्रांनी सहकार्य, मार्गदर्शन केले, प्रोत्साहन दिले. विनायक पारे, बारामती यांनी मुखपृष्ठ तयार करून दिले. तसेच मुद्रक न्यू भारत प्रिंटर्स, पुणे व टंकलेखक श्री.गणेश उर्फ देवव्रत दाजीराम बागल (बालाजी एंटरप्रायजेस, मंचर) यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

**संपादक**

**डॉ.भास्कर शेळके**

सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख

श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

# ◆ संशोधन बौद्धिक प्रकिया ◆

आजच्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या युगात संशोधन या ज्ञानशाखेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. जगणच्या सर्वच क्षेत्रामध्ये आज संशोधन होत आहे. वास्तविक संशोधनही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. एखाद्या विषयाचे कुतूहल निर्माण होणे त्या विषयाच्या संदर्भात वेगवेगळे प्रश्न निर्माण होणे किंवा सतत त्या विषयाची चौकशी करीत राहणे, परीक्षण करत राहणे हे बौद्धिक प्रक्रियेचे महत्त्वाचे लक्षण आहे. लहान मुलांमध्येदेखील उपजत कुतूहल प्रवृत्ती असते. ते निसर्गातील प्रत्येक गोष्टीकडे, वस्तूकडे कुतूहलाने पहात असत, त्या गोष्टीविषयी, त्या वस्तुविषयी त्याला सतत एक ना अनेक प्रश्न पडत असतात. त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा ते अट्टाहास करत असते आणि कालांतराने त्याला त्या गोष्टीत यश आले की त्याला एक वेगळ्या प्रकाराचे समाधान प्राप्त होते, थोडक्यात त्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधताना ते जे प्रयत्न करते हे प्रयत्न म्हणजेच संशोधन होय.

आपल्याकडे संशोधन ही संज्ञा इंग्रजीतील Research या संज्ञेवरून आलेली आहे. Research म्हणजे पुन्हा पुन्हा शोध घेणे होय. पाश्चात्त्य संस्कृतीतून संशोधन ही संज्ञा जरी आयात केली असली तरी देखील संशोधन या संज्ञेचा उगम मानवजातीच्या मनातच झालेला असतो. त्याच्या चौकस बुद्धीतून नवे नवे शोध लागतात आणि नंतर त्या शोधाचे नामकरण होते. वास्तविक पाश्चात्त्यांच्या अगोदर भारतात असे अनेक शोध लागलेले आहेत त्याची पाळेमुळे भारतीय पुराण ग्रंथामध्ये विखुरलेली आहेत. परंतु जाणीवपूर्वक त्या ग्रंथांचे त्या अनुषंगाने परिशीलन झाले नाही. याचे कारण भारतामध्ये असलेले निरक्षरतेचे प्रमाण आणि चातुर्वर्ण्यव्यवस्था खऱ्या अर्थाने संशोधनामध्ये चातुर्वर्ण्यव्यवस्थेतील शेवटच्या तीन वर्गांनी भरीव कार्य केलेले आहे. ते निर्मितीशील आहेत. उदाहरण सांगायचे झाले तर रामायण आणि महाभारत लिहिणाऱ्या लेखकांचे सांगता येईल. परंतु ते लेखक सवर्ण नसल्या कारणाने त्यांच्या बद्दल अनास्था दिसते, किंवा धनुर्धारी विद्येत प्रावीण्य मिळविलेला एकलव्य देखील एक उत्कृष्ट संशोधकच होता. पण त्याच्या वेगळेपणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झालेले दिसते. अशा प्रकारच्या परंपरेमळे भारतामध्ये संशोधनात गती निर्माण झाली नाही. पाश्चात्त्य देशात ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात माणसाच्या बुद्धिमतेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले म्हणून तर अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स हे देश सर्वच प्रकारच्या संशोधनात आघाडीवर राहिले आणि आहेत देखील.

वास्तविक संशोधन ही प्रक्रिया नेमकी काय आहे हे समजावून घ्यायचे असेल तर प्रत्येक अभ्यासकाने महानुभाव पंथातील आद्य गद्य ग्रंथ 'लीळाचरित्र' या ग्रंथाचे अवलोकन करणे हितावह ठरेल. 'श्रीम्हाइंभट' या महानुभाव पंथीय संशोधकाने संशोधन म्हणजे नेमके काय हे आपल्याला बाराव्या तेराव्या शतकात निदर्शनास आणून दिले. श्रीचक्रधर स्वामींनी

सांगितलेल्या लीळा 'खेइंमभट' या शेतकऱ्याच्या पाठीमागे फिरून त्याच्याकडून एक एक लीळा वदवून घेत एक चांगला मोठा संशोधनपर ग्रंथ निर्माण केला. हा मोठा ग्रंथ निर्माण होण्याचे कारण श्रीम्हाइंभटामध्ये असलेली संशोधक वृत्ती होय. परंतु अलीकडे महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय स्तरावर ही संशोधक वृत्ती दिसत नाही. या नाकर्तेपणामुळेच आपण संशोधनाची बीजे पाश्चात्त्य साहित्य संशोधनात शोधत आहोत. या गोष्टीचा खेद वाटतो.

इंग्रज भारतात ज्या वेळेस आले त्यावेळेसची त्यांच्यातील संशोधनदृष्टी आपल्या नजरेस भरते. त्यांनी सर्वात अगोदर येथल्या भाषा शिकण्यास सुरुवात केली इथली मराठी भाषेची व्याकरण व्यवस्था समजून घेतली एवढेच नव्हे तर मोल्सवर्थ आणि मेजर कॅन्डी या दोघांनी मिळून पहिला इंग्लीश-मराठी शब्दकोश निर्माण करण्याचे महननीय कार्य केले. हे त्यांच्या संशोधक वृत्तीचेच द्योतक आहे. अशा संशोधन कार्यात भारतीय माणूस नेहमीच दुय्यम राहिला आहे, याचाच परिणाम आज संशोधनक्षेत्रात जगातील पहिल्या दोनशे विद्यापीठात एकाही भारतीय विद्यापीठाचे नाव येऊ नये यावर देखील संशोधन करण्याची नामुष्की आज भारतीयांवर आलेली आहे. पाश्चात्त्य विचारवंत आणि भाषावैज्ञानिक नोम चॉमस्की भारतीय व्याकरणकार पाणिनी यांच्या अष्टाध्यायी या ग्रंथावर पीएच.डी.चे संशोधन करतो. परंतु आपले भारतीय इंग्रजी साहित्याचे अभ्यासक शेक्सपिअरच्या प्रेमात बुडून जातात आणि मग संशोधन या विषयाला उतरती कळा लागते. खऱ्या अर्थाने जगातील अनेक शोधांचे जनकत्व भारतीयांकडे यायला हवे होते पण तसे घडले नाही. याचे कारण आपल्याकडील  जात-वर्ण व्यवस्था होय. असो.

सृष्टीमध्ये अनेक रहस्ये आहेत. मानवाने आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर ही सृष्टीतील रहस्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचा हा प्रयत्न संशोधनाचा प्रारंभ आहे.  मानवाने सर्वात अगोदर सृष्टीबाबत संशोधन केले. संशोधन करण्यास सुरुवात झाली. त्याने सृष्टीतील रहस्य उलगडली, भौतिक विकासाबरोबर भौतिक विद्या व भौतिक शास्त्रेही विकसित झाली.  मानवाच्या बौद्धिक प्रक्रियेच्या मुळाशी त्याची जिज्ञासावृत्ती आहे. त्याच्या मनात जाणून घेण्याची तीव्र इच्छा शक्ती असते. या इच्छाशक्तीतूनच संशोधन निर्मिती होते.

संशोधन ही संकल्पना अतिशय व्यापक आणि प्रदीर्घपणे चालणारी आहे. टप्प्याटप्प्याने तिच्यात परिवर्तन होत जाते. संशोधनामध्ये एकच एक अर्थ आणि स्पष्टार्थाला खूप महत्त्व असते.  संशोधन प्रक्रियेत ज्ञाताकडून अज्ञानाकडे असा प्रवास केला जातो. जे अज्ञात आहे त्याचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. एखादे नवे तत्त्व शोधून नवा सिद्धांत मांडून सत्यशोधन केले जाते.  संशोधनामध्ये मानवाच्या बौद्धिक प्रक्रियेला म्हणून तर खूप मोठे स्थान आहे  संशोधनामध्ये सत्याला विशेष महत्त्व असते. सत्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला जातो, थोडक्यात संशोधनात नवीन नवीन शोधांचे पुन्हा पुन्हा संशोधन केले जाते म्हणून तर म्हटले जाते की संशोधन ही प्रदीर्घ चालणारी बौद्धिक प्रक्रिया आहे.

संशोधनाचे अनेकविध प्रकार पडतात. उदा. शास्त्रीय संशोधन, समाजशास्त्रीय संशोधन आणि साहित्याचे संशोधन शास्त्रीय संशोधनाचे नियम त्रिकालबाधित सत्य असतात. तेथे कल्पनेला वाव नसतो. शास्त्रीय संशोधनात पायरी-पायरीने निष्कर्षापर्यंत जाता येते. शास्त्रीय संशोधनात प्रत्येक व्यक्तीला एकचएक अनुभव येणे क्रमप्राप्त ठरते. तेथे अनुभवाचे विभाजन करून चालत नाही. शास्त्रीय संशोधनात वस्तुनिष्ठतेला अनन्यसाधारण महत्त्व असते. एका ठरावीक पद्धतीने पद्धतशीरपणे येथे चिकित्सा केली जाते. येथे संशोधकाचा कोणताही हेतू नसतो किंवा असे संशोधन जाणीवपूर्वक केले जात नाही. हे संशोधन केवळ जिज्ञासेपोटी निर्माण झालेले असते आणि हेच संशोधन पायाभूत ठरते अशा संशोधनाद्वारेच मग नवे-नवे शोध लागतात

समाजशास्त्रीय संशोधनात समाज-संस्कृती-रूढी परंपरा यांचा मानवीय दृष्टिकोनातून अन्वायार्थ लावण्याचा प्रयत्न केला जातो. तर साहित्य संशोधनातील प्रक्रियेत मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केला जातो. मानवी जीवनात साहित्य आणि कलाविष्काराला महत्त्वपूर्ण स्थान असते मानवी मन, भावना, विकार आणि विचारातून साहित्य निर्मिती होत असते. साहित्य म्हणजे संवेदनशील मनाचा एक आविष्कार असतो. मानवाला जीवन जगत असताना आलेल्या अनुभवाचे येथे परिशीलन केले जाते. चिकित्सा केली जाते. शास्त्रात वस्तुनिष्ठतेला महत्त्व असते. तसे साहित्यात व्यक्तिनिष्ठतेला महत्त्व असते म्हणूनच म्हणतात की व्यक्ती तितक्या प्रकृती. थोडक्यात: अमूक एक कलाकृती एका वाचकाने वाचली तर तो अनुभव दुसऱ्या वाचकाला तसाच येईल असे होत नाही. परंतु तरी देखील सत्याच्या पातळीवर जाऊन त्या अनुभवाची प्रतवारी तपासून त्यातले सत्यशोधन केले जाते आणि निष्कर्ष नोंदविले जातात. ललित साहित्याचे लेखन जरी कल्पनाधिष्ठित असले तरी ललित साहित्यात देखील सत्याचा आविष्कार घडत असतो. कारण नुसत्या कल्पनेने कोणतेच साहित्य निर्माण होणार नाही अथवा चिरकाल टिकणार नाही. म्हणजेच सत्याचा भास हा ललित साहित्यात असतो म्हणजे असतोच. त्याद्वारेच संशोधक समीक्षक कलाकृतीतील अलक्षित स्थळे शोधतो आणि त्याची पुनर्मांडणी करतो आणि सामान्य वाचकांना ज्या गोष्टी अज्ञात असतात त्याचा तो पुनर्उच्चार करतो उदा. 'गोतावळा' या कादंबरीचे घेता येईल. या कादंबरीत डॉ. यादवांनी नारबाच्या तोंडी एक वाक्य घातले आहे ते संशोधनाच्या अंगाने तपासता येईल. 'मोट बंद, नाडा बंद, तू बी बंद आणि मी बी बंद' या सामान्य वाचकाला हे वाक्य चटकन समजत नाही पण समीक्षक आणि संशोधक या वाक्याचा योग्य पद्धतीने अन्वायार्थ लावतो मोट बंद म्हणजे मोट बनविणारे चांभार लोक यांचा यांत्रिकीकरणामुळे व्यवसाय बुडाला, नाडा बंद म्हणजे मांग लोक केकताड कमवतात व त्याचे आंबाडी/सूत काढतात त्यांचा व्यवसाय बुडाला. तू बी बंद म्हणले प्राणिजगत (बैल) बेकामी झाले आणि मी बी बंद याचा अर्थ यांत्रिकीकरणामुळे नारबा हा शेतमजूर देखील बेकार झाला. साहित्य संशोधन पद्धतीत या वाक्याचा योग्य तो अन्वयार्थ लावता येतो याचाच अर्थ साहित्य म्हणजे सत्याचा भास असतो. २१ व्या शतकात यांत्रिकीकरणामुळे कृषी संस्कृती

कशी उद्ध्वस्त झाली हे विधान आज सत्यात उतरले आहे. यालाच अर्थ साहित्य संशोधनदेखील सत्याच्या कसोटीवर उतरणारे ठरू शकते हे निर्विवाद सत्य आहे.

थोडक्यात संशोधनामुळे नवीन ज्ञानाची माहिती मिळते. चिकित्सेला वाव मिळतो. नवीन ज्ञान तपासून घेता येते.

प्रस्तुत संशोधनपर ग्रंथात, 'संशोधनाचे स्वरूप आणि व्याप्ती' स्पष्ट केलेली आहे. या संशोधनपर ग्रंथामध्ये २१ व्या शतकात कोणकोणत्या प्रकाराचे संशोधन होत आहे याची चिकित्सक मांडणी केली आहे. ही संशोधनपर मांडणी करत असताना अनेक संशोधकांनी ग्रामीण, दलित, आदिवासी आणि लोकसाहित्य यांचा संशोधनात्मक विचार मांडलेला आहे. ग्रामीण आणि दलित साहित्य हेच खरे मराठी साहित्य आहे असाच सूर या संशोधनपर लेखात आहे.

नवीन संशोधक अभ्यासकांना हा संशोधनपर ग्रंथ निश्चित उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल यात शंकाच नाही या ग्रंथातील लेख सर्वच लेखकांनी अतिशय दर्जेदार आणि अभ्यासूवृत्तीनेच लिहिले आहेत. अभ्यासक-संशोधकाच्या ज्ञानात भर पडेल असाच हा ग्रंथ आहे.

जिज्ञासू रसिक वाचक, अभ्यासक-संशोधक या ग्रंथाचे निश्चितच स्वागत करतील अशी मला आशा वाटते.

**डॉ. शशिकांत साळवे**
बी.डी. काळे कॉलेज,
घोडेगांव (पुणे)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | साहित्य संशोधनाचे स्वरूप<br>– डॉ. धनंजय वाघमारे | १ |
| २. | समकालीन साहित्य संशोधनः नव्या दिशा<br>– डॉ. रवींद्र ठाकूर | ६ |
| ३. | साहित्य संशोधन व समीक्षा परस्पर संबंध<br>– डॉ. प्रविण ससाणे | १० |
| ४. | प्रभाव अभ्यास संशोधन पद्धती<br>– प्रा.कल्पना नारायण गावडे | १३ |
| ५. | समाजभाषा वैज्ञानिक संशोधन पद्धती<br>– प्रा.आप्पा दत्तू माने | १९ |
| ६. | शैलीवैज्ञानिक संशोधन पद्धती<br>– डॉ. विकास प्रभाकर वीर | २६ |
| ७. | 'दलित साहित्याचे समाजभाषावैज्ञानिक संशोधन'<br>– डॉ.सारीपुत्र तुपेरे | ३२ |
| ८. | वाङ्मयीन शैलीशास्त्र संशोधनाची अभ्यास क्षेत्रे<br>– डॉ. मधुकर गणेश मोकाशी | ३९ |
| ९. | लोकसाहित्याचे संशोधन: काही विचार<br>– प्रा. अजय देशपांडे | ४४ |
| १०. | लोकसाहित्य संशोधन<br>– प्रा.युवराज भांमरे | ४९ |
| ११. | पंडिती काव्याचे संशोधन (विशेष संदर्भ मोरोपंत)<br>– प्रा.अशोक देशमाने | ५३ |
| १२. | संत–साहित्य संशोधन<br>– डॉ.केतकी मोडक | ६० |
| १३. | दलित लोकसाहित्य संशोधन दलित स्त्रियांची ओवी गीतेः आणि निरीश्वर वाद<br>– प्रा. के.एम. लोखंडे | ६४ |
| १४. | कादंबरी: स्वरूप व संशोधन<br>– डॉ. पांडुरंग भोसले | ७० |
| १५. | विज्ञान कादंबरीचे संशोधन<br>– डॉ. पौर्णिमा बोडके | ७४ |
| १६. | ग्रामीण साहित्याचे संशोधन<br>– डॉ.शशिकांत साळवे | ८० |
| १७. | आदिवासी साहित्याचे विद्यापीठीय संशोधन<br>– डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | ८४ |
| १८. | 'लोकसाहित्याचे संशोधन'<br>– डॉ. दिलीप कसबे | ८७ |
| १९. | संशोधनात संदर्भाचे महत्त्व<br>– प्रा.सुवर्णा खोडदे | ९१ |
| २०. | स्त्री साहित्याचे संशोधन : काही दिशा<br>– डॉ. उज्ज्वला भोर | ९७ |
| २१. | साहित्य संशोधनाच्या विविध पद्धती<br>– डॉ. अनिल गर्जे | १०३ |
| २२. | तौलनिक साहित्य संशोधन पद्धतीः संकल्पना व स्वरूप<br>– डॉ.भारत शिंदे, प्रा.संजय बालाघाटे | १०६ |
| २३. | लोकसाहित्याच्या संशोधन पद्धती<br>– प्रा. तुकाराम चव्हाण, | ११२ |
| २४. | एका लेखकाचा अभ्यासः स्वरूप व दिशा<br>– प्रा. रमाकांत कराड | ११८ |

| | | |
|---|---|---|
| २५. | लेखकाचा अभ्यास<br>– प्रा. श्रीमती लता पवार | १२२ |
| २६. | तौलनिक संशोधन पद्धती<br>– डॉ. सिताराम निघुट | १३३ |
| २७. | 'संशोधन प्रक्रिया'<br>– प्रा.सुरेखा बांगर | १३९ |
| २८. | 'मराठी हस्तलिखितांचे संशोधन'<br>– डॉ.बाळासाहेब दिघे | १४४ |
| २९. | वैचारिक साहित्याचे संशोधन – स्वरूप व दिशा<br>– डॉ.द.के.गंधारे, | १५० |
| ३०. | शास्त्रीय सामाजिक संशोधन : स्वरूप व महत्त्व<br>– प्रा.सुभाष अडावतकर | १५८ |
| ३१. | लोकसाहित्य आणि संशोधनाच्या दिशा<br>– डॉ.भरत देशमुख | १६६ |
| ३२. | संशोधन : आधुनिकीकरण आणि परिवर्तनानी नांदी<br>– डॉ. वेदश्री विजय थिगळे | १७२ |
| ३३. | आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन<br>– प्रा. सुहास निर्मळे | १७७ |
| ३४. | संशोधन तंत्रे व साधने<br>– डॉ.आशालता महाजन | १८३ |
| ३५. | जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यातील तौलनिक साहित्याचे महत्त्व<br>– प्रा. विनोद कांबळे | १९३ |
| ३६. | मराठी ग्रामीण, दलित कांदबरीः एक तौलनिक अभ्यास<br>– डॉ.विजय केसकर | १९८ |
| ३७. | दलित – ग्रामीण कांदबरीतील बदलत्या प्रवृत्ती<br>– प्रा.राजरत्न किशाराव दवणे | २०१ |
| ३८. | ग्रामीण–दलित कादबंरी: सामर्थ्य आणि मर्यादा<br>– डॉ. सुभाष पाटील | २११ |
| ३९. | इ.स. २००० नंतरची दलित ग्रामीण कादंबरी<br>– प्राचार्य डॉ.भालचंद्र शिंदे | २१६ |
| ४०. | समस्याप्रधान ग्रामीण दलित कादंबरी<br>– डॉ.भास्कर शेळके | २२२ |
| ४१. | ग्रामीण, दलित साहित्य चळवळ व मराठी साहित्य<br>– प्रा. सुनील निगडे | २३५ |
| ४२. | ग्रामीण दलित तमाशा प्रधान कादंबरी<br>– डॉ.दिलीप कसबे | २४३ |
| ४३. | 'राजकीय चित्रण करणारी ग्रामीण दलित कादंबरी'<br>– डॉ. विकास प्रभाकर वीर | २४८ |
| ४४. | मराठी दलित ग्रामीण कादंबरी<br>– प्रा.रविराज दादू शिंदे | २५९ |
| ४५. | दलित ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन<br>– डॉ. संभाजी आण्णू शिंदे | २६४ |
| ४६. | '१९९० नंतरचे समाजवास्तव आणि मराठी दलित–ग्रामीण कादंबरीः काही निरीक्षणे'<br>– प्रा.अजय देशपांडे | २७४ |
| ४७. | दलित–ग्रामीण कादंबरीतील नवी वाट : 'धूळपेरणी'–'पडझड'<br>– डॉ.भारत विठ्ठलराव शिंदे, प्रा.संजय बालाघाटे | २७९ |
| ४८. | ''मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना'' ('राघववेळ' व 'झोंबी')<br>– प्रा. गावडे. व्ही. वाय. | २८६ |
| ४९. | तहान आणि कोंडी या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास<br>– प्रा.मधुचंद्र भुसारे | २९५ |

| | | |
|---|---|---|
| ५०. | 'मराठीतील नवकादंबरी व दलित कादंबरी'<br>– प्रा.जगदीश दिनकर शेवते | ३०१ |
| ५१. | आंबेडकरवादी कादंबरीतील ग्रामीण जीवनसंघर्षाचा शोध<br>– डॉ. आनंद इंजेगावकर | ३०४ |
| ५२. | दलित चरित्रात्मक कादंबरी लेखन : स्वरूप व प्रेरणा<br>– प्रा. विजय प्र. वाघमारे | ३०९ |
| ५३. | बाबुराव बागूल याच्या 'दशं' मधील नागप्रतिमा<br>– प्रा.अशोक राणा, | ३१५ |
| ५४. | 'ग्रामीण साहित्यातील स्त्री जीवन'<br>– प्रा. अनुराधा वसंत गुजर | ३२३ |
| ५५. | 'दलित आत्मकथानातील स्त्रीजीवन'<br>– प्रा.उमेश मारुती शिरसट | ३२५ |
| ५६. | स्त्री लेखिकांच्या कादंबरी लेखनाचा अभाव<br>– डॉ.गुंफा पाटीलबा कोकाटे | ३३० |
| ५७. | 'ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्री चित्रण'<br>– डॉ.सुनिता देशमुख | ३३४ |
| ५८. | 'स्त्री' गीतातील पंढरपूरचा विठ्ठल<br>– डॉ.लता महाजन | ३३७ |
| ५९. | स्त्री भ्रूण हत्या : चिंता आणि चिंतन<br>– डॉ.गुंफा पाटीलबा कोकाटे | ३४२ |
| ६०. | तुकोबांच्या कवितेतील शब्दालंकार<br>– प्रा.मंगल ए. डोंगरे | ३५० |
| ६१. | साहित्य आणि इतिहास : परस्पर संबंध<br>– डॉ.महेश खरात | ३५७ |
| ६२. | मिरासदारांच्या कथांची रचनासुत्रे<br>– डॉ. लता केशव देशमुख | ३६२ |
| ६३. | चरित्र या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास<br>– प्रा.सुनिता विनोद पारे | ३७० |
| ६४. | ग्रामीण साहित्यामधील लोककल्पनाबंध<br>– डॉ.राजशेखर शिंदे | ३७७ |
| ६५. | 'आंतरविद्याशाखीय अभ्यासाचे स्वरूप व साहित्य आणि समाज यांचा संबंध'<br>– प्रा.प्रज्ञा लामपुरे | ३८१ |
| ६६. | 'स्त्री नाटककारांचे योगदान– एक अभ्यास'<br>– डॉ.शीला गाढे | ३८८ |
| ६७. | 'ललित गद्य–सदरलेखन–एक अभ्यास'<br>– प्रा.निर्मला कुलकर्णी | ३९४ |
| ६८. | मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ : प्रेरणा आणि परिणती<br>– डॉ. कीर्ती मुळीक | ४०१ |

# साहित्य संशोधनाचे स्वरूप

**प्रा. डॉ. धनंजय वाघमारे**

## संशोधन म्हणजे काय:-

संशोधन म्हणजे थोडक्यात शोधून काढणे होय. शोध लावण्याचा जेव्हा प्रकार घडतो. तेव्हा माणसापुढे उद्दिष्ट असते ते पुढे ठेवून तो त्याचा शोध घेत असतो.

संशोधन ही प्रक्रिया प्रत्येक क्षेत्रात वेगवेगळी असते. विज्ञानातील संशोधन, समाजिकशास्त्रातील संशोधन, साहित्यातील संशोधन हे तिन्ही प्रकार वेगवेगळे आहेत. संशोधन म्हणजे - सौ. + शुद्ध = शुद्ध करून घेणे. संशोधनात २ गोष्टी महत्त्वाच्या १. नवीन काही शोधयचं २. जे आहे ते वापरायचं. विज्ञानामध्ये संशोधनानी शोध बदलू शकतात. अथवा नवीन शोध लागू शकतात. उदा. प्लुटो हा ग्रह आता राहिला नाही. ज्या ग्रहाला पूर्वी महत्त्वाचा मानला जात होता.

## विज्ञानातील शोध :-

तांब्यावर हायड्रोक्लोरिक ॲसिड टाकल्यास तांब स्वच्छ होतं, असा शोध विज्ञानात लावला गेला. हे शोध प्रयोगशाळेत लावले जातात. दिशाभूल होण्याची शक्यता संशोधनात जास्त असते. अज्ञातावर प्रकाश टाकणे म्हणजे संशोधन होय. वैज्ञानिक संशोधनासाठी जशी प्रयोग शाळा लागते. उद्दिष्ट लागते, अशा गोष्टींमधून आपण अज्ञाताकडून ज्ञाताकडे जातो म्हणजे संशोधन होय.

अज्ञाताकडून ज्ञाताकडे जाणे हा संशोधनाचा एक भाग आहे. यातून दोन गोष्टी होतात. १. ज्ञानप्रप्ती २. माणसाच्या उपयोगाचा विचार संशोधनात केला जातो म्हणजे त्या संशोधनाचा उपयोग माणसाला झाला पाहिजे उदा. वीजेचा शोध लागला. वीज ही माणसाची उपयुक्तता आहे. प्रमाण, प्रत्यय, क्षमता ही पडताळणी पाहूनच संशोधन केले जाते. संशोधनात निष्कर्षाला ही सर्वत्रिकता असावी लागते. संशोधन हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असते जिथे म्हणून निर्मिती आहे तिथे आत्मनिष्ठेला महत्त्व आहे. संशोधनात वेगळेपणा नसतो, तिथे एकसारखेपणा लागतो, तर साहित्यात वेगळेपणा असतो. विज्ञानाचे दोन

प्रकार असतात– १. शुद्धशास्त्र– यांचे संशोधन प्रयोगशाळेतच होते असे नाही, कारण त्यांचे संशोधन अमूर्त असते. उदा. गणिताच्या संशोधनासाठी प्रयोगशाळा लागते असे नाही.

**संशोधन हे तीन पातळीवर चालते**

**१. व्यावसायिक संशोधन पातळी**

औषधाच्या कंपन्या असतात. त्यांच्या स्वत:च्या अशा प्रयोगशाळा असतात. त्यातून ते संशोधन करत असतात पूर्णत: त्या उत्पादनाला त्यांचे नाव मिळते. यातून त्यांचे कंपनीचे नाव होते. हे झाले व्यवसायासाठी केलेले व्यावसायिक संशोधन होय.

**२. संस्थानात्मक संशोधन पातळी :–**

शासकीय पातळीवर होणारे संशोधन म्हणजे संस्थानात्मक संशोधन होय. यात सरकारमान्य अशा गोष्टींचे संशोधन केले जाते. उदा. रसशास्त्र

**३. व्यक्तिगत संशोधन पातळी :–**

व्यक्तीने केलेले संशोधन म्हणजे व्यक्तिगत संशोधन होय. उदा. एम.फिल., पीएच.डी. यात व्यक्तीने केलेले संशोधन होय.

विज्ञानात चालणाऱ्या संशोधनाचे केंद्रबिदू पदार्थ अथवा वस्तू असतो. सामाजिक शास्त्रातील संशोधनातील केंद्रबिंदू हा मानवी वर्तन व्यवहार असतो आणि ही अगम्य गोष्ट आहे म्हणजेच त्याचा उलगडा करता येत नाही.

सामाजिकशास्त्र हे समाजात चालणाऱ्या व्यक्तींना बघत असतात, त्यावर निष्कर्ष काढत असतात. माणसाच्या निरनिराळया वर्तनाचं अवलोकन करणं, निरीक्षण करण्याचं काम सामाजिकशास्त्र करत असते. मानवीवर्तन व्यवहार हा सामाजिकशास्त्राचा विषय असतो.

संशोधनात वस्तुनिष्ठतेला जास्त महत्त्व आहे. विज्ञानात जेवढी तटस्थता पाळणं शक्य असतं तेवढी तटस्थता सामाजिकशास्त्रात पाळणं शक्य नसतं. संशोधक हा देखिल मानव असल्यामुळे त्याच संशोधन हे काही प्रमाणात आत्मनिष्ठ असते.

सर्व मानवी चलनवलनाला अपवाद हा असतो. मानवी चलनवलन व्यवहारात अडथळे असतात. सामाजिकशास्त्राचे स्वरूप हे स्थूल असते. मानवी वर्तन व्यवहार हा सतत एकसारखा नसल्यामुळे ते बदलत जाते. त्यामुळे संशोधन

हे काळानुरूप बदलत जाते.

**साहित्याचे संशोधन :–**

संशोधकाने स्वत: काम करून त्याची माहिती घ्यावी ज्यात त्याला संशोधन करायचे असते. प्रत्येक नवे संशोधन हे जुन्या संशोधनाला पोटात घेत असते, असे सतत होत राहते. संशोधनाची प्रक्रिया अखंड चालूच राहते. साहित्यहेच आत्मनिष्ठ स्वरूपाची प्रक्रिया आहे, आणि प्रत्येक व्यक्तीनुसार साहित्य हे बदलत असते. उदा. लेखकाने लिहिलेले शिवाजीचे चरित्र, विचार यात फरक आहे. साहित्यातील निर्मिती भिन्न असते कारण प्रत्येकाची अभिरुची भिन्न भिन्न असते. प्रतिभाधर्मीनुसार निर्मिती भिन्न आणि साहित्यानुसार अभिरुची भिन्न असते. संशोधनाचा विषय बनलेली जी वस्तू असते तिला अचूक पकडावी लागते. संशोधक हा एक वाचक आहे. त्यामुळे त्याला विषय निवडीचे स्वातंत्र्य आहे.

वाङ्मयकृतीचे संशोधन करणे, साहित्याचे संशोधन करणे, अर्वाचीन वाङ्मयाचे संशोधन करणे हे सर्व संशोधनाच्या क्षेत्रात बसू शकते. संशोधकामध्ये निर्भयता हा गुण अतिशय महत्त्वाचा आहे. संशोधकाने वस्तुनिष्ठ असणे अतिशय महत्त्वाचे आहे, स्वत:शी प्रामाणिक राहणे गरजेचे असते. हाती आलेल्या आधारांचा पुराव्यांच्या आधारे सर्व गोष्टी मांडणे, संशोधकला गरजेचे असते. उदा.पोथ्यांचे संशोधन करताना त्या पाथीची स्थल, काल, परिस्थिती, ती एखादी कथा आहे, आख्यान काव्य आहे. कथा आहे, तर याचा कर्ता कोण, अशा गोष्टींचा शोध घ्यावा लागतो.

साहित्याचा विषय काय? साहित्यात माणसाच्या जीवनात येणारे अनुभव व्यक्त झालेले असतात. साहित्य हे जीवनाचे दर्शन घडविणारी गोष्ट आहे. जीवनाच्या सर्व दिशा ह्या साहित्यातून घडत असतात, कादंबरी म्हणजे काय? त्यात नेमके काय येते? ती कोणत्या विषयावर आधारित आहे अशा अंगाने संशोधन केले जाते. वाङ्मयीन संशोधन व वाङ्मयाचे संशोधन त्या साहित्यकृतीशी त्याचे असलेले संशोधन हे दोन भाग पडतात आणि ह्या दोन गोष्टी भिन्न आहेत. एकाच साहित्याकृतीची अनेक संशोधने होऊ शकतात. उदा.श्यामची आई यावरील प्रत्येकाचे संशोधन वेगळे होईल कारण प्रत्येकाची आवड, दृष्टिकोन वेगळा असतो सामाजिक शास्त्राची संशोधने देखील भिन्न होऊ शकतात. साहित्यात संशोधने अनेक होतात पण डेटा तोच असतोच म्हणजेच उदा.कोसला ही कादंबरी

एकच पण त्यावर होणारे संशोधन वेगवेगळे कारण प्रत्येकाचा दृष्टिकोन निराळा असतो. आकलन ही प्रत्येकाच भिन्न असतं. साहित्याच संशोधन हे व्यापक आहे तसेच त्याचा कालखंड देखील व्यापक आहे. याचा क्षेत्र विस्तार अपरंपार आहे.

**संशोधन आणि वाङ्मयाचा इतिहास यांचा परस्पर संबंध :-**

संशोधनामध्ये जास्त असे महत्त्व अस्सल दस्तऐवजात आहे. त्यानंतर मुद्रितांना आणि नंतर भाष्याला महत्त्व आहे. इतिहास हा मूळ दस्ताऐवजातून सिद्ध होतो. ज्यावेळी दस्ताऐवज नसतो तेव्हा समकालीन लेखकांनी किंवा त्यांना आलेल्या पत्रांवरून, त्या लेखनावरून इतिहास सिद्ध होत असतो. या सगळयांची नोंद कुठेना कुठे तरी झाल्यामुळे इतिहास हा सिद्ध होत असतो, असा इतिहास शोधावा लागतो.

संशोधकाला इतिहास जाणून घेण्यासाठी अनेक प्रश्न विचारावे लागतात. संशोधकाला मिळालेले ज्ञान हे तर्काच्या जोरावर, कागदांवरचा इतिहास, काळाचा अभ्यास, त्या त्या काळात कोणती साहित्यकृती निर्माण झाली. अशा सर्व गोष्टी संशोधकाला शोधून घ्याव्या लागतात. तपासाव्या लागतात. सावधपणा हा संशोधकात महत्त्वाचा असतो. इतिहासाचा जो ठेवा आपल्यकडे येतो तो जसाचा तसा न स्वीकारता ते संशोधकाने बारकाईने तपासावे संशोधन झाल्याशिवाय इतिहास सिद्ध होत नाही, आणि इतिहास नसेल तर संशोधनाला प्रेरणा मिळत नाही, दिशा मिळत नाही. इतिहासाचा आणि संशोधनाचा परस्पर संबंध आहे.

संशोधन हे इतिहास घडविण्याला आणि वाङ्मय निर्मितीला, इतिहास सिद्ध करण्याच्या कामाला उपयुक्त ठरते. जे काही संशोधन करू त्याच्या आधारे वाङ्मयाचा इतिहास सिद्ध होत असतो.

**संशोधन आणि समीक्षा :- समीक्षा आणि वाङ्मयीन इतिहास**

समीक्षा म्हणजेच मूल्यांकन करणे होय मूल्यमापन करणे होय. आयुष्यात आपल्याला मूल्यमापनाची वेळ सारखी येत असते. संशोधन साहित्याचे असेल तर त्या साहित्याची दृष्टी नसताना समीक्षा करता येते का? (नाममुद्रा याचा अर्थ ज्याने निर्माण केले त्याचे नाव खाली येते.) एकाकडून अधिक पर्याय जेव्हा उपलब्ध असतो, असा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा मूल्यमापन केले जाते. उदा. 'संभाजीचे पत्र'

यासाठी त्या पत्राचा कार, त्या पत्राचा लेखक कोण हा निर्णय आपल्याला घ्यावा लागतो म्हणजे समीक्षा घ्यावी लागते. समीक्षा ही अतिशय आवश्यक आहे. समीक्षा दृष्टी ही विशिष्ट दस्तऐवजाचा नेमकेपणा ठरवत असते. एखाद्या लेखकाची स्थाननिश्चिती करणे, एखाद्या कवितेचे सौंदर्य सांगणे हे सगळं वाङ्मयाच्या इतिहासात सांगितल्या जातात. म्हणजे वाङ्मय इतिहास हा अपरिहार्य आहे. हे समळं म्हणजेच समीक्षेच्या सहाय्याने सांगता येते.

वाङ्मयातील काळानुक्रम सांगण्यासाठी, त्याच्या निश्चितीसाठी समीक्षेची गरज असते. उदा. वाङ्मयातील पंडित कवी वामनपंडित, रघुनाथपंडित, मुक्तेश्वर, मोरोपंत, श्रीधर हे पाच पंडित कवी यांच्या हा वाङ्मयातील काळानुक्रम होय. एखाद्या वाङ्मयाकृतीची दुसऱ्या वाङ्मयकृतीशी सर्वसामान्यपणे तुलना होत नाही. परंतु ज्यावेळी गुणवत्ता, गुणवत्तेचे निकष सांगायचे असतील त्यावेळी त्यांची तुलना केली जाते. विजातीय साहित्यकृतीशी तुलना होत नाही. उदा. एखादया कादंबरीची दुसऱ्या कादंबरीशी तुलना होते.

स्थाननिश्चिती केल्याशिवाय इतिहास सिद्ध होत नाही. इतिहासात काळाला महत्त्व आहे ते अपरिहार्य आहे. वाङ्मयाच्या ज्या गरजा आहेत त्या भागविण्याच्या दृष्टीने समीक्षा ही संशोधनासाठी आणि वाङ्मयासाठी महत्त्वाची आहे. संशोधन केल्यावाचून वाङ्मयाचा इतिहास सिद्ध होत नाही. आणि समीक्षेवाचून वाङ्मयाचा इतिहास सिद्ध होत नाही. संशोधनासाठी समीक्षेची जोड लागते. आणि समीक्षेसाठी संशोधन अपरिहार्य आहे.

★★★

# समकालीन साहित्य संशोधनः नव्या दिशा

**डॉ. रवींद्र ठाकूर**

सध्याच्या काळात साहित्यसंशोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहे असे दिसून येते. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांतून पीएच.डी. आणि एम.फिल. साठी नाव नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिली तरी हे प्रमाण किती भरमसाठ वाढले आहे ते लक्षात येईल. एकीकडे वाङ्मयीन नियतकालिकांना उत्तम दर्जाचे समीक्षालेख किंवा संशोधनपर लेख उपलब्ध होत नाहीत आणि दुसरीकडे मात्र एम.फिल, पीएच.डी. साठी नावनोंदणी करण्यासाठी एकच झुंबड उडालेली दिसते. झुंबड करणारी ही मंडळी खरोखर अभ्यासाच्या आणि संशोधनाच्या आंतरिक ऊर्मीतून संशोधनकार्याकडे वळालेली आहे की त्यामागे केवळ काही व्यावहारिक किंवा व्यावसायिक उद्देश आहेत हा पुन्हा वेगळाच मुद्दा आहे. सहित्याभ्यास करायचा असेल किंवा एखाद्या विषयावर संशोधनकार्य करायचे असेल तर पदवीसाठी नावनोंदणी केलीच पाहिजे असे कुठे आहे? ज्यांनी कुठल्याही पदवीची किंवा पदाची अपेक्षा न ठेवता संशोधन केले अशा कितीतरी विद्वान संशोधकांची नामावली येथे सांगता येईल. अर्वाचीन काळातील वि. का. राजवाडे यांच्यापासून आधुनिक काळातील वि. भि. कोलते, अ. का. प्रियोळकर, देवीसिंह चौहान, यू. म. पठाण, रा. चिं. ढेरे अशा कित्येक मान्यवरांची नावे या संदर्भात नोंदवता येतील. या खेरीज रा. श्री. जोग, ग. त्र्यं. देशपांडे, स. रा. गाडगीळ, नरह्य कुरुंदकर अशा अनेक साहित्यविमर्शकांची नावे घेता येतील. समकालीन संदर्भांत विचार केला तर सध्या साहित्याभ्यास आणि साहित्यसंशोधन हाच एक ध्यास आणि श्‍वास मानणाऱ्या हाडाच्या संशोधकांची वानवा निर्माण झाली असून साहित्यसंशोधनाला व्यावहारिक आणि व्यावसायिक हेतूंची जळमटे चिकटू लागली आहेत.

एम.फिल, पीएच.डी साठी नावनोंदणी करणारे विद्यार्थी खरोखर संशोधनाच्या आंतरिक ऊर्मीतून संशोधनाकडे वळालेले असतात का? त्यात काही अपवाद असतीलही. तसे ते प्रत्येक काळात असतात. परंतु सर्वसाधारण चित्र असे आहे की कोणाला नोकरीसाठी, कोणाला प्राचार्य होण्यासाठी तर कोणाला पगारवाढीसाठी एम.फिल. किंवा पीएच.डी. हवी असते. म्हणून ते

संशोधनाकडे वळालेले असतात. त्यामुळेच अशा एका अवघड दुखणं झालेल्या विषयावर लिहिण्याची संधी दिल्याबद्दल या चर्चासत्राच्या संयोजकांचे अभिनंदनच केले पाहिजे. ही काळाची गरज आहे. हौशी आणि व्यवहारी लोक सोडून दिले तरी गांभीर्यपूर्वक साहित्यसंशोधनाकडे वळालेले लोक आजही दिसून येतील. आम्ही जेव्हां पीएच.डी. मिळवली तेव्हा त्या डिग्रीचा पुढे फायदा होणार आहे हे आमच्या ध्यानीही नव्हते. उलट कशाला उगाच राबायचं असं म्हणणारे प्राध्यापक आमच्या अवतीभोवती होते. त्यांना दाद न देता आम्ही अथक परिश्रम आणि आर्थिक झळ सोसून पीएच.डी. मिळवली. त्यांचेही बरोबरच होते. पदवी असो किंवा नसो सर्वांना सारखाच पगार मिळणार होता. जेव्हापासून पदव्यांचा संबंध नोकरीशी जोडला गेला तेव्हापासून निष्ठावंत संशोधकांचा काळ मागे पडला आणि व्यवहारिक हेतूंनी संशोधन करणाऱ्यांचा काळ सुरू झाला.

आज एम.ए. झालेले अनेक विद्यार्थी सरळ येतात आणि सांगतात की सर पीएच.डी. साठी विषय सुचवा. काही वेळा ते आपल्या मार्गदर्शकांनाही घेऊन येतात. अशा वेळी काय सांगावे तेच सुचत नाही. वस्तुतः संशोधनाचे विषय विद्यार्थ्यांच्या व्यापक वाचनातून आणि चिंतनातून तसेच मार्गदर्शकांशी वेळोवेळी होणाऱ्या प्रदीर्घ अशा औपचारिक किंवा अनौपचारिक चर्चांमधून निश्चित झाले पाहिजेत. परंतु काळच असा आला आहे की लोकांना सगळे इन्स्टंट आणि फास्ट हवे आहे. कारण त्यात त्यांचे व्याहारिक हेतू गुंतलेले आहेत. ते पूर्ण झाले की त्यांना साहित्य संशोधनाशी काहीही देणेघेणे नसते. पदवी मिळाली की त्यांचे संशोधन पूर्णपणे बंद होते. वस्तुतः पदवी ही साहित्यसंशोधनाची पात्रता अट आहे असे मानले पाहिजे. ज्यांचे साहित्यसंशोधन पदवी प्राप्त झाल्यावर थांबते तो खरा संशोधकच नव्हे. खरा संशोधक आपल्या प्रदीर्घ वाचन-चिंतनातून आपला संशोधन विषय स्वतःच शोधून काढतो. विषय निश्चित करून त्यावर संशोधन सुरू करण्यापूर्वी संशोधनाची सर्व तंत्रे त्याने आत्मसात केलेली असतात. भाषा कमावलेली असते. शोधप्रबंध सादर करण्याची विद्यापीठीय प्रक्रिया जाणून घेतलेली असते. तेव्हाच तो संशोधक म्हणून पात्र ठरतो. अशा संशोधनासाठी आज कितीतरी अभ्यासक्षेत्रे नांगरल्याविण पडीक पडलेल्या भूमीसारखी उपलब्ध आहेत. परंतु ठरावीक विषयांच्या चाकोरीत अडकलेले जुन्या पिढीतले मार्गदर्शक नवोदित पिढीला दलित साहित्याचा अभ्यास, ग्रामीण साहित्याचा अभ्यास किंवा एखाद्या लेखकाचा अभ्यास अशा त्याच त्या चक्रात ढकलताना दिसतात. अनेकदा तर

इतके सामान्य दर्जाचे विषय घेतले जातात किंवा दिले जाताना दिसून येतात की त्यांना पीएच.डी चे विषय तरी कसे म्हणावे हाच प्रश्न पडतो. त्यातही पुन्हा पुनरावृत्ती, अव्याप्ती, अतिव्याप्ती असे प्रकार सर्रास दिसून येतात. अलीकडे स्त्रीवादी जाणिवांचा, आदीवासी जीवनवास्तव चित्रित करण्याऱ्या साहित्याचा विचार होऊ लागला आहे. परंतु साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास, भाषाविज्ञान, तौलनिक साहित्य, अनुवादित साहित्य, अनुवादमीमांसा, वाङ्मयीन आणि वैचारिक नियतकालिकांनी केलेले सांस्कृतिक आणि वाङ्मयीन कार्य अशी कितीतरी अभ्यासक्षेत्रे संशोधकांची वाट पहात आहेत. त्यासाठी लागणारा इंग्रजी ग्रंथांचा व्यासंग मात्र वाढवावा लागेल. नव्या दिशांचा शोध घेण्यासाठी तौलनिक दृष्टिकोणाचा अधिकाधिक अवलंब करावा लागेल. सर्व साहित्य हे एकच असतं, फक्त ते संस्कृतीसापेक्ष अशा निरनिराळ्या भाषांमधून लिहिले जाते हे लक्षात घेतले तर साहित्यात केले जाणारे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी इत्यादी अनेक प्रकार करणे, त्याचे स्वतंत्र निकष आहेत किंवा असले पाहिजेत असा आग्रह धरणे अशास्त्रीय ठरते. त्या त्या साहित्यप्रवाहांच्या प्रेरणांचा विचार नजरेआड न करता दलित, ग्रामीण, प्रादेशिक, स्त्रीवादी इत्यादी संज्ञा या वर्णनात्मक संज्ञा आहेत हे लक्षात घेऊन संशोधकाने समावेशक भूमिका घेणे आवश्यक आहे. तेथे अनाठायी अभिनिवेशी भूमिका घेणे चुकीचे ठरते. साहित्यकलेची समाजसापेक्षता लक्षात घेऊनही शेवटी ती एक कला आहे हे केव्हाही विसरता येत नाही.

साहित्य संशोधक हा तटस्थ सत्यान्वेषी मूल्यमापक असतो तसा सहृदय टीकाकारही असतो. आपण साहित्याचा कप्पेबंद पद्धतीने विचार कल लागलो, तर अनिष्ट पायंडे पडतील यात शंका नाही. जीवन, समाजवास्तव कप्पेबंद नसते तसे साहित्यही कधीच कप्पेबंद नसते. म्हणूनच साहित्य संशोधकाने व्यापक भूमिका घेऊन आणि त्या त्या साहित्याच्या स्वतंत्र निर्मितीप्रेरणांचा विचार करून समतोल आणि तटस्थ मूल्यमान करणे आवश्यक ठरते. समकालीन काळांतील साहित्यसंशोधकांनी, त्यांच्या मार्गदर्शकांची आणि विद्यापीठातील विद्वानांनी एवढे लक्षात घेतले तरी साहित्यसंशोधनाच्या अनेक दिशा त्यांना स्पष्ट दिसू लागतील असा विश्वास वाटतो.

महानगरातील अभावग्रस्त लोकांचं जगणं आणि त्यांच्या समस्यांचा वेध घेणारं साहित्य, कामगारांचे प्रश्न मांडणारे वाङ्मय, विज्ञान आणि मानवी जीवनाचा अनुबंध शोधणारं विज्ञान साहित्य असे अनेक नवनवे वाङ्मयाविष्कार

आता उदयास येत आहेत. त्यांना नवे साहित्यप्रवाह म्हणण्यापेक्षा नव्या जीवनजाणिवा म्हणणे योग्य ठरेल. समाजजीवन कप्पेबंद नसते. तसा साहित्यव्यवहारही कप्पेबंद असू शकत नाही. उदाह्यणार्थ, आपण ग्रामीण साहित्य म्हणतो. परंतु आज ग्रामीण जीवन किती ग्रामीण उरले आहे असा प्रश्न पडावा इतका त्यावर शह्रीकरणाचा प्रभाव पडू लागला आहे. दलित समाजाच्या जीवनशैलीतही बरीच सुधारणा झाली आहे. म्हणूनच दलित-ग्रामीण या संज्ञा वापरताना त्या वर्णनात्मक संज्ञा आहेत याचे भान ठेवले पाहिजे. एकदा एका विद्यार्थ्यांने पीएच.डी. साठी रूपरेषा सादर केली. विषय होता, 'मुस्लीम मराठी कविताः एक अभ्यास.' मी म्हणालो, कविता मुस्लीम कशी असेल? फार तर कवी मुस्लीम असेल. शिवाय कवी मुस्लीमधर्मीय आहे म्हणून त्याने मुस्लीमधर्मीयांविषयीच लिहावे असे कुठे आहे? तसा आग्रह धरला तर तोही जुलूमच होईल. परंतु आपल्याकडे तारतम्य पाळले जात नाही हेच खरे. बेधडकपणे सरधोपट विषय दिले जातात असे दिसून येते. अनेकदा संशोधनाची शिस्त पाळली जात नाही. पूर्वाभ्यास, संशोधन पद्धती, संदर्भ देण्याची पद्धती याविषयी कमालीची अनभिज्ञता आढळते. म्हणूनच संशोधन कसे करावे याचेही प्रशिक्षण देण्याची गरज आहे. एम.फिल, पीएच.डी. या अभ्यासक्रमात हे विषय आहेत. परंतु केवळ विद्यार्थ्यांना शिकवून उपयोग नाही. नव्याने मार्गदर्शक झालेल्या प्राध्यापकांनाही प्रशिक्षणाची गरज आहे. संशोधनविषय निश्चित करताना पारंपरिक मळवाट टाळून नवी आव्हाने स्वीकारण्याची नितांत गरज आहे. उदाह्यणार्थ, तौलनिक साहित्य ही आंतरसांस्कृतिक अभ्यासशाखा आता कुठे मराठी साहित्यसंशोधनात रूजू लागली आहे. अनुवादित साहित्य ही तिची सामग्री आहे. परंतु अनुवादांकडे आपण नेहमी उपेक्षेने पाहिले आहे. आपल्या भाषेतील साहित्य दुय्यम दर्जाचे असले तरी त्याला महत्त्व दिले जाते, परंतु एखादी साहित्यकृती दर्जेदार असूनही केवळ अनुवादित असल्यामुळे उपेक्षित राहते असा अनुभव येतो. वस्तुतः उत्तम अनुवाद आपल्या भाषेला आणि वाङ्मयाला समृद्धच करीत असतात. गरज आहे ती आपला संकुचित दृष्टिकोण बदलण्याची! अनुवाद हे इतर देशांतील वाङमयविश्वात डोकावून पाहण्याच्या खिडक्या आहेत. त्यामुळे आपण कुठे आहोत हे समजायला मदतच होते. परंतु दारं-खिडक्या बंद करून आपणच निर्माण केलेल्या अंधारात दडून बसणाऱ्या मराठी विद्वानांना कोण सांगणार हाच प्रश्न आहे.

★★★

# साहित्य संशोधन व समीक्षा परस्पर संबंध

डॉ. प्रविण ससाणे

## संशोधन आणि समीक्षा –

'संशोधन' काय किंवा 'समीक्षा' काय या दोन्ही ज्ञानशिस्ती म्हणजे साहित्यरूपी मूल्ययुक्त व्यवहाराचे सत्त्वशोधनच ठरते. 'साहित्य' हाच दस्तऐवज त्यांच्या चिंतनाचा विषय असतो आणि त्याची अनुशासने आपापल्या पद्धतीनुसार निश्चित होत जातात. नवनिर्माणक्षमता सर्जनात्मकता आणि अमूर्ताचा शोध घेण्याचा केलेला प्रयत्न दोन्ही अभ्यासात समांतर असतो. 'संशोधन' हा मानवी प्रज्ञाव्यवहाराचा आणि बुद्धीचा आविष्कार ठरतो. बौद्धिक उत्सुकता, कुतूहल, जिज्ञासा यामधून संशोधकाला प्रश्न पडतात आणि त्यांच्या सोडवणुकीचा मार्ग म्हणजे संशोधन ठरते.

समीक्षा व्यवहारात बौद्धिक उत्सुकतेतून प्रश्न पडत नसून किंवा प्रश्नातून निष्कर्षापर्यंत प्रवास अपेक्षित नसून कलाकृतीतील विविध घटितांचे पोत व कुळसाम्य आणि कूलवैधर्म्य आत्मनिष्ठा पद्धतीने न्याहाळण्याचा तो प्रयत्न ठरतो. समीक्षाकांची समीक्षा दृष्टी ज्या मूलनिकषांनी समीक्षा करीत आहे त्यावर त्या त्या समीक्षेचा प्रवर्ग निश्चित होईल. ज्ञानसाधनेचा तो एक प्रवर्ग ठरेल! आणि तो पूर्णतः आत्मनिष्ठ पद्धतीनेच साक्षात होईल. संशोधनात असे घडेलच असे नाही, तर प्रश्नावली, मुलाखती, केस स्टडी, सर्वेक्षण, कोष्टके, परिशिष्टे यांच्या उपयोजनातून संशोधनाला पूर्णता येईल. एका बौद्धिक शिस्तीतून घडलेला ज्ञान व्यावहार असे संशोधनाचे स्वरूप असते आणि त्यात संशोधकाची सौंदर्यदृष्टी आणि समीक्षादृष्टीही उपकारक ठरत असते. ज्ञानगर्भ आणि मूलगर्भ असा सिद्धांत प्रस्थापित करणे हे संशोधनाचे उद्दिष्टये ठरते. तर समीक्षा फक्त आपला अभिप्राय नोंदवते. समीक्षा कलाकृतींच्या वाचनातून स्फुरते आणि शब्दांकनात विसावते. संशोधनात अनेक ज्ञानशाखांच्या मदतीने शोध परिपूर्ण होत जातो. म्हणून समीक्षेपेक्षा संशोधनाची श्रेणी प्रत ही थोड्या वरच्या पातळीवरची ठरते.

## संशोधन व समीक्षा परस्पर संबंध

'साहित्यरूपे' हा दोन्ही अभ्यासशिस्तीचा मूलाधार असतो. त्यामुळे

त्यांचा परस्परसबंध अन्योन्योश्रयी ठरतो. दोन्हीमध्ये भाव, विश्लेषण व निर्णयन हे घटक समान असतात. संशोधनात जे तत्त्वप्रतिपादन ठरते तेच कदाचित समीक्षेत पृथक्करण ठरते. दोन्ही अभ्यासाशिस्तींत नवार्थदर्शनाला भरपूर अवसर प्राप्त झाला असतो. निष्कर्ष आणि निर्णयन यांचे महत्त्व दोन्ही ठिकाणी तितकेच महत्त्वाचे ठरते. तत्त्वदृष्टीच्या आधारावर संशोधन आणि समीक्षा अवलंबून असते. समीक्षा म्हणजे काव्य–कादंबरी–कथा यासारखेच रसपूर्ण साहित्याही नाही आणि तत्त्वज्ञान–मानसशास्त्र–तर्कशास्त्र यासारखे ज्ञारसाहित्यही नाही. आत्मविष्कार हा समीक्षेचा अपरिहार्य धर्म असतो. पण संशोधनात त्याला फारसे महत्त्व नसते. शास्त्रज्ञाची तटस्थता आणि तिचा मागोवा घेणाऱ्या शास्त्रीय प्रणाली व प्रक्रिया यांचे संशोधनात अपरिहार्य महत्त्व असते. तर समीक्षेत त्याचे स्थान अनुषांगिक ठरते. संशोधनाचे उद्दिष्टये ज्ञानबुद्धीचे असते. तर समीक्षेचे उद्दिष्टये आस्वाद, अनुभूती हे असते. साहित्यरूपांच्या अपरिचित भागांवर नवा प्रकाश टाकण्याचे श्रेय संशोधनाकडे जाते, उदा. द.ग. गोडसे यांची कलामीमांसा, रा.चिं. ढेरे यांचे संशोधन.

**संशोधनाच्या प्रेरणा आणि मानवी ज्ञानसाधनेची परंपरा :–**

प्रेरणा : जिज्ञासा ही शोधाची आणि संशोधनाची जननी होय. संशोधनशास्त्र हे पूर्णपणे वैज्ञानिक स्वरूपाचे आहे. संशोधनाची वृत्ती आदीमकाळापासून आहे. आपल्या आवतीभोवतीच्या गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला निरीक्षण करून निष्कर्ष काढले जातात.

१. सुखी जीवनाकरीता धडपड.

२. ज्ञानप्राप्ती

३. अंधारात झेप उजेडाचा शोध

४. भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील वेध.

५. का? कसे? केव्हा? कोणी? पुढे काय?

६. प्रचलित ते खरे का? असेच का? असे असू शकेल का?

८. सौंदर्य/आनंदाचा शोध/ दु:ख भीती यांवर मात करण्यासाठी धडपड इत्यादी.
ज्ञानसाधनेची परंपरा – शास्त्रे आणि कला या दोन्ही क्षेत्रात ज्ञानसाधनेची परंपरा दिसते.

१. ज्ञान म्हणजे माहिती आणि जाणीव, कौशल्ये, सवय.

२. गुरु परंपरा, शिक्षण परंपरा ३.प्रागऐतिहासिक, ऐतिहासिक, प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक

४. शास्त्रे .- भौतिकशास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे मानव्यशास्त्रे-तत्त्वज्ञान

५. कला-चौसष्ट कला-अभिजात कला-: साहित्य संगीत, नृत्य, नाटय, चित्र, शिल्प इत्यादी.

**निष्कर्ष :-**

संशोधन आणि साहित्यसमीक्षा या दोन्ही अभिक्रिया भिन्न, स्वतंत्र असल्या तरी परस्परपूरकच ठरतात. कारण अभ्यास विषय 'साहित्य' हाच असतो. समीक्षेत कलाकृतींच्या रचनेचा, आशयाचा अभिव्यक्तीचा, रसास्वाद, मूल्यमापन, निरीक्षण, परीक्षण, आस्वादन घडत असते. संशोधनात ज्ञानप्राप्तीची, ज्ञानवाढीची अपेक्षा केली असते. संशोधनाचे क्षेत्र फार व्यापक असते. त्यामानाने समीक्षेचे क्षेत्र मर्यादित ठरते. सौदर्यदृष्टी ही समीक्षेत प्रभावी ठरते. तर ती नवनिर्माणक्षम संशोधनात प्रभावी होते. समीक्षेत आत्मविष्कार प्रभावी ठरतो. तर संशोधनात गृहीत कल्पनेचे निष्कर्षरूप प्रधान ठरते. समीक्षा म्हणजे साहित्य संशोधन नसले तरी समीक्षाक्षम प्रतिभा आणि सौदर्यदृष्टी असलेल्या संशोधकाने केलेले संशोधन आधिक मूलगामी, मर्मग्राही घेणे शक्य असते समीक्षेचे शास्त्र निर्माण करण्यासाठी संशोधनाची गरज असते. तर संशोधनातही सौदर्यदृष्टी जागृत ठेवून शोध घेता येतो. संशोधनाची क्षेत्रे आणि परिसीमा या अतिशय, व्यापक असतात. साहित्येतर तपशीलांच्या उपाययोजनातून संशोधनाला गती येते. एक सांस्कृतिक आणि भाषिक दस्तऐवज म्हणून संशोधनात साहित्याचा विचार प्रभावी ठरतो. तर समीक्षाव्यवहार हा विशेषत्त्वाने ललित साहित्याशी एकरूप होताना दिसतो.

★★★

# प्रभाव अभ्यास संशोधन पद्धती

**कल्पना नारायण गावडे**

तौलनिक साहित्याच्या अभ्यासात प्रभाव ही एक घटक संकल्पना म्हणून येते. प्रभाव साहित्याभासाची निकड पाश्चात्त्य देशात प्रथम महायुद्धोत्तर काळात निर्माण झाली. १८४० च्या आसपास मॅथ्यू आर्नोल्ड (ब्रिटिश) मादमा स्टोल (फ्रेंच) गटे (जर्मन), यांनी ही संकल्पना प्रथम मांडली. या संकल्पनेचा निश्चित अर्थ काय याची चर्चा करताना काही विद्वानांनी प्रभाव साहित्य हा वाङ्मयमेतिहासाचा अभ्यास अधिक चौकसपणे करायचे ते एक साधन आहे असे मत मांडले. दोन अथवा अधिक राष्ट्रीय साहित्याचा तुलनात्मक दृष्टीने केलेल्या साहित्याभ्यास म्हणजे प्रभाव अभ्यास होय. उदाहरण –बंगालीतील शरच्चंद्र चटर्जी यांच्या साहित्याचा तौलनिक अभ्यास कसा करता येईल? डॉ. वीणा आलासे यांनी तीन पद्धती सांगितल्या आहेत.

१) बंगालीतील समीक्षकांचे शरद साहित्याबद्दलचे मत व मराठी समीक्षकाचे मत या दोहांमधील साम्यस्थळे तपासणे व त्यामागील कारणांचा शोध घेणे.

२. निरनिराळ्या भारतीय भाषांमध्ये शरच्चंद्रच्या कोणकोणत्या कथा कादंबऱ्या अनुवादित झाल्या आहेत. त्याची यादी करून त्या अनुवादाची तुलना करणे, अनुवादक हा पहिला वाचक असतोच त्याचे इंटरप्रिटेशन महत्त्वाचे असते.

३. तिसरी पद्धत म्हणजे वाचकांचा प्रतिसाद. आजवरचा साहित्याभ्यास हा समीक्षाकाभिमुख राहिला आहे. आता तौलनिक साहित्याभ्यासात वाचकाभिमुख असा अभ्यास महत्त्वाचा ठरत आहे. साहित्याच्या अभ्यासासाठी तौलनिक अभ्यासाची गरज का आहे असा प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर देताना शरद साहित्याचेच जर उदाहरण घेतले तर लक्षात येते की, सर्व सामान्य वाचकांनी शरदचंद्रांचे साहित्य जसे डोक्यावर घेतले तसे बंगाली समीक्षकांनी त्यांना महत्त्व दिल्याचे दिसत नाही. याची कारणे त्यांच्या साहित्यातूनच शोधावी लागतात.

वाचकाभिमुख अभ्यास याचाच अर्थ एखाद्या लेखकाचा किंवा विचारवंताचा साहित्यावर झालेल्या प्रभावाचा अभ्यास. प्रभावांचा अभ्यास महत्त्वाचा किंबहुना प्रभावांचा अभ्यास म्हणजेच तौलहिनक अभ्यास.

एखाद्या साहित्यकृतीचा लेखकाचा, प्रवृत्तीचा प्रभाव पडणे हे त्या

साहित्यकृतीच्या, लेखकाच्या शक्तीचे द्योतक असते. पण वाङ्मयीन प्रभाव कध कधी निमित्तमात्र आणि प्रासंगिक असतात. मात्र नंतरच्या सर्जनक्रियेला दिशा व आकार देण्यात त्याचेमाठे योगदान असते. म्हणून प्रभाव निश्चित करताना तो साहित्यकृतीपेक्षा त्या लेखकाच्या मनात निश्चित केला पाहिजे. प्रभाव हे साहित्यकृतीच्या सर्जनाचा भाग असतात. ते लेखकावर त्याच्या, समग्र अस्तित्वावर पडतात. प्रभावांचा थेट प्रवेश कलावंताच्या सौंदर्यशास्त्रीय अनुभवात होतो. या अर्थाने प्रभावाभ्यास हा साहित्यकृतीच्या उत्पत्तीचीच चिकित्सा असते. एखाद्या लेखकाची किती साधन सामग्री अस्पर्श राहिली हे निदर्शनास येणे हीच प्रभावाभ्यासाची खरी गुणवत्ता होय. प्रत्येक लेखकाची किती साधन सामग्री अस्पर्श राहिली हे निदर्शनास येणे हीच प्रभाव्यासची खरी गुणवत्ता होय. प्रत्येक लेखकाची प्रभाव स्वीकाराची प्रक्रिया वेगवेगळी असते. लेखक कोणत्या अनुभवांनी घडला व तो तसा का घडला हे प्रभाव स्पष्ट करतात. अवाङ्मयीन प्रभावाकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. मात्र कधी कधी शक्तिशाली नसलेल्या कृती, लेखकाचा, प्रवृत्तीचा प्रभाव पडतो. उदा. ना.सी. फडके, किंवा हा प्रभाव कधी कधी वाङ्मयबाह्य व्यक्तित्त्वाचा किंवा विचारसरणीचा असू शकाते. उदा. म. गाधी, मार्क्सवाद.

पुष्कळदा एकाच विचारसरणीचा किंवा साहित्यिकाचा प्रभाव स्पष्टपणे नोंदविता येत नाही. उदाहरणार्थ मराठीत पुष्कळ कवी कादंबरीकारांवर मार्क्स आणि गांधी यांचे संमिश्र प्रभाव आहेत. खांडेकर, माडखोलकर व कुसुमाग्रज यांच्या साहित्यात दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नात मूल्यात्मक पातळीवर कोणाचाच स्वीकार झालेला दिसत नाही.

भारतीय साहित्याचा अभ्यासक मुळातच तौलनिक साहित्याचा अभ्यासक असतो. कारण भारतात अनेक भाषा आहेत. तसेच भौगोलिक व सांस्कृतिक विविधताही आहे. भारतीय वसाहतवादाचे अंतरंग तपासल्याशिवाय आपल्या देशी वाङ्मयावरील पाश्चात्त्य प्रभावाचा उलगडा होणे शक्य नाही. गणेश देवी – ब्रिटिश वसाहती, इंग्रजी भाषा यांचा भारतीय संस्कृती आणि साहित्यावर प्रभाव दोन प्रकारचा : १. देशीवाद, २. अनुकरण, देशीवाद भूतकाळात रमत असलातरी वर्तमानकालीन गरजांचीही दखल घेतो. एखाद्या गोष्टीचा प्रतिकार करण्याच्या दोन पद्धती असतात. स्वतः सामावून घेणे किंवा ती नष्ट करण्यासाठी प्रतिकार करणे, देशीवादात इंग्रजी अतिक्रमण आत्मसात करण्याची क्षमता असल्यानेच

मराठी साहित्याने आपले अस्तित्व टिकविले आहे. अनुकरणाच्या कृतीतच प्रतिकाराचीही यंत्रणा निर्माण होते. या प्रवृत्तीमुळे देशी संस्कृतीचा प्रभाव नष्ट करणाऱ्या विदेशी प्रभावाचाही कायापालट होत असतो.

साधारणतः बाराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत संस्कृत ही समीक्षाव्यवहाराची भाषा होती. पण ललित साहित्याची भाषा म्हणून तिचा लोप झालेला होता. भारतीय साहित्य हे बहुभाषिक, बहुधार्मिक, आणि बहजुसांस्कृतिक भारतीय नावाची तशी कोणतीच भाषा नाही व त्या भाषेतील साहित्येही नाही. संसकृतीही नाही. ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

प्रा.भालचंद्र नेमाडे – भाषिक संस्काराची प्रक्रिया ही संस्कृतिसंपर्काचा एक भाग असते. त्यामुळे ती भाषेच्या मनौवैज्ञानिक आणि समजाशास्त्रीय प्रक्रियाशी जोडलेली असते. या प्रक्रियामध्ये दोन संस्कृतीना सरळसरळ मुकाबला करावा लागतो. म्हणजेच इतर विकसनशील भाषांच्या बरोबरीस येऊ पाहण्याची ही प्रक्रिया असते. दोन भाषांच्या परस्पर संपर्काचा जेव्हा विचार करातो तेव्हा शैलीलक्ष्यी व्यवस्था, सौंदर्यशास्त्रीय व्यवस्था, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात. नेमाडे यांनी वाडमयीन प्रभावांच्या अभ्यासासाठी भाषाशास्त्रीय नमुना आराखडा सांगितला आहे. १. ऐतिहासिक भाषाशास्त्र संकर झालेल्या भाषिक रूपांची संकरपूर्व रूपांशी तुलना करणे. उदा.आंग्लपूर्व मराठी गद्याचे नमुने व एकोणिसाव्या शतकातील गद्याचे नमुने २.सामाजिक भाषाशास्त्र– द्विभाषिकता जित लोकांची द्विभाषिक वागणूक द्विसांस्कृतिकता इंग्रजीच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यातून संस्कृत शब्दांचा अधिक वापर.

**इंग्रजीचा मराठीवरील प्रभाव :–**

विविध गद्यशैलींचा विकास, गद्यामुळे समाजात विवेकशीलता वाढते. अचूक आविष्कार करण्याची सवय लागते. मराठी गद्यशैली ही इंग्रजीच्या प्रभावाची सर्वात महत्त्वाची बाजू कादंबरी, कथा, ट्रॅजेडी, भावकविता, वाङ्‌मयीन, समीक्षा, विनोद, विडंबन, उपहास, वृत्तपत्रीय निबंध या प्रकारांचा प्रारंभ इंग्रजीच्या अनुकरणाने झाला. त्यामुळे काही नुकसानही झाले. फ्रेंच आणि इंग्रजी नाटकातील बऱ्याच हानीकारक गोष्टी मराठीने आत्मसात केल्या. पण आपल्या परंपरेतील समृद्ध अशी संस्कृत महाकाव्ये, पाली, पैशाची अर्धमागधी या भाषामधील साहित्य, तत्त्वशील शिल्पकला, चित्रकला याकडे दुर्लक्ष झाले. क्षुद्र इंग्रजी लेखकही

महत्त्वाचे ठरले.

परक्या भाषेतून परकीय सौंदर्यमूल्य रुजली. त्यामुळे स्वतःच्या परंपरेचे भान गेले. काळ्यासावळ्या रंगाचा तिरस्कार वाटू लागला. गोरा रंग तेवढा सुंदर असे मानणारे लेखकं निर्माण झाले. उदा.अजिंठ्यातल्या, लावणी तमाशातल्या महाभारतातील नायिका काळ्यासावळ्या असल्या तरी सुंदरच आहेत. हे इंग्रजी सौंदर्यमूल्यांच्या दडपणामुळे लोकांना पटेनासे झाले.

मुक्त विवाहबाह्य प्रेम हाच कथा कादंबऱ्याचा विषय ठरला. स्वतःच्या नोकऱ्या नाहीत. नवऱ्याचे घर सोडणाऱ्या स्त्रिया श्रीमंत समाजातील होत्या हे विसरले गेले. साहित्य हे जणू अवास्तव, रंजनवादी सोप्या गोष्टीसाठीच असते की काय असे वाटायला लागले. तरी सुद्धा मराठी साहित्यावर झालेले प्रभाव कोणते आणि कसे झाले याचा आपल्याला अभ्यास करावयाचा आहे.

काही उदाहरणेः गडकरी-शेक्सपिअर, गडकऱ्यांची भाषा-भाषा, संवाद, प्रेम संवेदना उर्दू. कोल्हटकर, खाडिलकर- संगीत नाटक-संस्कृत, मराठी रोमँटिक कविता -आशय व अभिव्यक्ति- इंग्रजी रोमँटिक कविता, गझल, ऐतिहासिक, मराठी नाटकातील पात्रांची भाषा-उर्दू अतिशयोक्त विनोदी प्रसंग-फारशी मर्ढेकर, करंदीकर-इलियट हॉपकिन्स, मराठी कादंबरी टागोर, शरदच्चंद्र, तांबे मीरा व कबीर. बोरकर-टागोर, मीरा व सुरदास, मर्ढेकरांनी अभंग छंद का वापरला? नवकवींनी अभंगरचना का केली? अशा प्रश्नांची उत्तरे प्रभावाच्या अभ्यासातून मिळतात.

**प्रभावांचा अभ्यास करताना :-**

आपण जेव्हा मराठी साहित्यावर फ्रॉईड, मार्क्स, शेक्सपियर, इब्सेन, ज्यॉ पाल सार्त्र, टी.एस. इलियट, कोलरिज, वर्डसवर्थ, शेले, रॉबर्ट ब्राऊनिंग हे रोमँटिक कवी, सिमॉन द बोव्हा या पाश्चात्त्य साहित्यिकांचा प्रभाव आहे असे म्हणतो किंवा आपल्याकडील महात्मा फुले, आगरकर, टिळक, महात्मा गांधी, डॉ.आंबेडकर, टागोर, शरदच्चंद्र व प्रेमचंद यांचा प्रभाव आहे असे म्हणतो. तेव्हा तो प्रभाव कोणत्या स्वरूपात असावा याचा विचार करावा लागतो. हा प्रभाव त्या त्या साहित्यिकाच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनानुभवांचा आणि शैलीचा असतो किंवा त्या विचारवंताच्या विचारसरणीचा प्रभाव असतो.

लेखकाची किंवा विचारवंताची विचारसरणी ही सुद्धा एक तात्त्विक

स्वरूपाची अव्यक्त गोष्ट आहे. लेखकाची मानवी जीवनाकडे, निसर्गाकडे आणि घटनांकडे पाहण्याची दृष्टी ही त्याच्या साहित्यात कोणती आशयसूत्रे आहेत. कोणते चरित्रनायक आहेत. कोणती मिथके आहेत आणि त्याच्या साहित्यातून कोणते वाङ्मयीन रूपबंध प्रकटतात हे प्रथम निश्चित करावे लागतात व त्या द्वारा प्रभावांचा अभ्यास करावा लागतो.

मार्क्स-वास्तववाद, इतिहासाची भौतिकवादी मीमांसा, धर्मचिकित्सा, वर्गसंघर्ष आणि क्रांती. शेक्सपियर शोकांतिका व सुखांतिका, हेम्लेट, मॅक्बेथ, ऑथेल्लो, क्लिओपॅट्रा.. इब्सेन तीन अंकी नाटकाचा आकृतीबंध नोरा, रिबेका. प्रभाव टाकणाऱ्या ललित साहित्याकाच्या साहित्यातील आशयसूत्रे, चरित्रनायक, मिथके व रूपबंध हे निश्चित करता येतात. पण वाङ्मयबाह्य विचारवंत, शास्त्रज्ञ यांच्या विचारांचा प्रभाव शोधताना त्याच्या विचारातून हाती येणारी तत्त्वे आपल्याला शोधावी लागतात. हे काम सरळ नाही. तो लेखक, त्याच देश, त्याची भाषा, त्याची संस्कृती, त्याच्यावर झालेले प्रभाव आणि ज्या विशिष्ट कालखंडात तो आपले विचार मांडत आहे त्या काळाची विशिष्टता आपल्याला लक्षात घ्यावी लागते. अशा वेळी प्रभावांचा अभ्यास करणारा किंवा तुलनाकार हा ज्ञानकोशकार असावा लागतो. तो इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, भाषाशास्त्रज्ञ आणि शक्य झाल्यास तो सर्जनशील लेखकही असावा लागतो.

उदाहरणः फ्रॉईडः-ग्रीक पुराणातील प्रतिमा-इडिपस कॉम्प्लेक्स, इलेक्ट्रॉ कॉम्प्लेक्स- कोणत्याही मोठ्या लेखकाचा, विचारवंताचा किंवा त्याच्या विचारांचा प्रभाव आपल्या भाषेत शोधताना तो सरळ शोधता येत नाही. कारण तो संस्कार असतो. अमूर्त असतो. कारण साहित्य ही भाषिक कृती आहे. भाषा ही सामाजिक संस्था आहे. ती सतत प्रवाहित असते. वळणे घेत असते. उदा.आपण साने गुरुजीच्या कादंबऱ्यांवर गांधीचा प्रभाव आहे. असे म्हणतो पण आता गांधीपेक्षा मार्क्सचा कसा प्रभाव आहे हे सिद्ध होत आहे. वाम जोशी, वरेकर, माडखोलकर, यांच्या कादंबरीवरील मार्क्सचा प्रभाव फारच वरवरचा आहे. असे अभ्यासक म्हणत आहेत.

मराठीवर आपण रविंद्रनाथ टागोरांचा प्रभाव शोधतो. पण त्यांच्यावर गांधीचा प्रभाव होता. आणि त्यांनी राष्ट्रवादी प्रेरणा लोकमान्य टिळकाकडून स्वीकारली होती. मग आपल्याला मराठी कवितेवर गीतांतजलीचा प्रभाव शोधण्याआधी गीतांजलीवर गीतारहस्याचा प्रभाव कसा असेल, याचाही शोध

घेण्याची संधी मिळू शकते.

मर्ढेकरांवर टि.एस. इलियटचा प्रभाव आहे. असे सांगितले जाते. पण इलियटच्या वेस्टलँड या काव्यावर काही संदर्भात भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव आढळतो. प्रभाव साहित्य अभ्यासाला अनुकूल असणारी साधन सामग्री जेवढ्या विपुल प्रमाणात भारतात आहे तेवढ्या प्रमाणात ती इतरत्र आढळणे अपवादात्मक म्हणावे लागेल. पश्चिम युरोपातील बहुसंख्य देशांची एक भाषिक किंवा फार तर द्विभाषिक संस्कृती लक्षात घेता हे विशेषत्त्वाने ध्यानात येते. पंधरा मान्यताप्राप्त भाषा, त्यांच्या विविध बोली, प्रत्येक भाषिक प्रदेशाची बदलत्या राजकीय, सामाजिक परिस्थितीतून विविध वाङ्मयप्रकारांसहित विकसित झालेली वाङ्मयीन संस्कृती या निरनिराळ्या वाङ्मयीन संस्कृतीवर पडलेली हिंदू, जैन, सुफी इत्यादी तत्त्वज्ञकाची छाप, पुन्हा या सर्व प्रा्देशिक भाषिक संस्कृतीचे आपापल्या लोकवाङ्मयाच्या मुळांशी बिलगून असणारे गाढ संबंध तसेच इतर प्रादेशिक व परकीय वाङ्मय परंपराशी असणारे त्यांचे नातेसंबंध या सर्वामुळे प्रभाव साहित्याभ्यासाच्या साधनसामग्रीचा एक विस्तृत पट आपल्या इतिहासात सतत उलगडत आलेला दिसून येतो. मिथ, आदीबंध, लोकबंध, या पातळ्यांवर या वाडमयीन संस्कृती रामायण, महाभारत, सारख्या आर्ष महाकाव्याशी मूलतः ऐक्य दाखविणाऱ्या पद्धतीने सारख्याच जोडल्या गेल्या असल्या तरी या सर्व बंधाची जी निरनिराळी आविष्कारणे आहेत त्यात पुन्हा वैचित्र्यपूर्ण विविधता आहेच. जॉर्ज हार्ट सारख्या विद्वानाने गाथासप्तशीच्या तामीळ वाङ्मयाशी असणाऱ्या संबंधाबद्दल लिहिलेले आहे. मध्ययुगीन कालखंडात भक्ति– संप्रदायाची लाट जवळपास सर्व प्रादेशिक वाङ्मयीन संस्कृतींना अंतर्बाह्य ढवळून टाकणारी ठरली. ग्रीक, फारशी, अरबी, इ.परकीय भाषा समूहांशी भारतीय संस्कृतीचा संपर्क अगोदर होताच. नंतर इस्लामी राजसत्तेच्या काळात फारशीचा प्रभाव महत्त्वाचा ठरला.

कोणत्याही प्रभाव अभ्यासकाला मोह व्हावा असा हा साधन सामग्रीचा विस्तृत पट, ऐक्य व विविधता यांचे निरनिराळया प्रमाणात दर्शन घडवतो. मात्र एवढी सगळी विपुल साधनसामग्री उपलब्ध असून सुद्धा भारतीय साहित्य व्यवस्थेत प्रभाव साहित्याभ्यासाच्या दृष्टिकोनाला फारसे महत्त्व कधी मिळाले नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

★★★

# समाजभाषा वैज्ञानिक संशोधन पद्धती

**प्रा.आप्पा दत्तू माने**

**प्रस्तावना:–**

संशोधन ही अभिक्रिया मानवाच्या कल्पनेपेक्षा बुद्धीतत्त्वाला प्राधान्य देणारी अभिक्रिया आहे. कारण या अभिक्रियेने संपूर्ण मानवी जीवन व्यापलेले आहे. संशोधन हा एक बौद्धिक व्यवहार ठरतो. संशोधन म्हणजे अत्यंत विश्वसनीय साधनांपासून नवीन ज्ञान किंवा माहिती मिळविणे होय. संशोधनातून अतिशय अचूक, बिनचूक व तज्ञतेवर आधारलेली सक्षम पाहणी अपेक्षित असते. मिळविलेली माहिती शक्य तितक्या कसोट्या लावून पारखून घेतलेली असते. तसेच गुणांचा विचार करून मिळविलेल्या माहितीची, ज्ञानाची पुनर्संघटना केलेली असते. त्यावर संशोधनाचे मौलिकत्त्व अवलंबून असते.

समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र इतर जवळ जवळ सर्व विद्याशाखांचा साहित्य या अभिक्रियांशी संबंध आहे. साहित्याच्या अभ्यासासाठी विविध शोध पद्धतीचा अभ्यास स्वीकारावा लागतो. कोणती शोध पद्धती अवलंबायची ते अभ्यासकाच्या बौद्धिक परिस्थितीवर अवलंबून राहील. विशुद्ध शास्त्रीय व अभिजात शोध पद्धती तर काही उपयोजनपर शोधपद्धती आहेत. संशोधन पद्धती संशोधनासारख्याच लवचीक आहेत. ऐतिहासिक, विगमनात्मक, निगमनात्मक, मानसशास्त्रीय, वैज्ञानिक सर्वेक्षणात्म, प्रयोगाधिष्टीत, वर्णनात्मक, पृथक्करणात्मक, शास्त्रीय, संख्याशास्त्रीय शैलीवैज्ञानिक, भाषावैज्ञानिक, समाजभाषावैज्ञानिक, इत्यादी संशोधन पद्धतींचा अवलंब केला जातो. प्रस्तुत ठिकाणी समाजभाषावैज्ञानिक, इत्यादी संशोधन पद्धतींचा अवलंब केला जातो. प्रस्तुत ठिकाणी समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतींचे स्वरूप उलघडले जाणार आहे. तत्पूर्वी समाजभाषाविज्ञान म्हणजे काय हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**समाजभाषाविज्ञान स्वरूप:–**

१९६० नंतर समाजभाषाविज्ञान या अध्ययन शाखेचा उदय झाला. समाजभाषा विज्ञान हे भाषेचा समाजकेंद्री उपयोजित अभ्यासक्षेत्र आहे. समाजविज्ञान आणि मानववंशविज्ञान यांच्या आधारे भाषेचा अभ्यास करणारे हे शास्त्र आहे.

यात भाषाव्यवहार आणि सामाजिक व्यवहार यातील अंतरसंबंधाचा अभ्यास केला जातो. समाजभाषा विज्ञानाला इंग्रजीत 'सोशिओलिंग्वीस्टिक्स' (डेलळेश्रळपर्सीळीींळली) असे म्हणतात. या संकल्पनेविषयी रमेश वरखेडे लिहितात, ''भाषा व्यवहार आणि सामाजिक संरचना यात परस्परसंबंधाचे नाते आहे. लौकिक जीवनात भाषेचा उपयोग व्याकरणिक नियमांनी होत नसून सामाजिक संकेतांनी होत असतो. त्यामुळे भाषेचा अभ्यास हा एका अर्थाने समाजाचा अभ्यास होय.'' आर.ए. हडसन यांच्या मते, ''समाजभाषा विज्ञान म्हणजे भाषा आणि समाज यातील अंतःसंबंधाचा अभ्यास होय.'' एकूणच उपरोक्त विवेचनातून आपणाला असे जाणवते की, समाजभाषाविज्ञान समाजातील उपयोजित भाषेचा अभ्यास करते. म्हणजेच समाजाचा अभ्यास करते, त्यादृष्टीने समाजभाषाविज्ञानाचे महत्त्व नाकारता येत नाही.

समाजभाषाविज्ञान भाषेचा समाजकेंद्री अभ्यास करते, त्यामुळे समाजाचा अभ्यास करणाऱ्या विविध अध्ययन शास्त्राशी या शाखेचा संबंध येतो. समाजशास्त्रामध्ये समाजशास्त्रे, मानसशास्त्रे, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, शिक्षणशास्त्र इतिहास आणि भूगोल यांचा समावेश होतो. समाजभाषाविज्ञानाच्या अभ्यासास या सर्वांचा आधार घ्यावा लागतो. म्हणजेच समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप अंतरविद्याशाखीय आहे.

**समाजभाषाविज्ञानः संशोधन पद्धतीः–**

कोणत्याही अभ्यास शाखेची स्वतंत्र संशोधन पद्धती असते. समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप सामाजिक असून भाषा आणि समाज यातील परस्पर संबंधाचा अभ्यास यात केला जातो. मानव समाजव्यवहारात भाषा वापर करताना व्याकरणिक नियमांपेक्षा सामाजिक संकेतांनी भाषा व्यवहार करतो. त्यामुळे भाषेचा अभ्यास म्हणजे समाजाचाच अभ्यास होय. म्हणजेच भाषेचा सामाजिक अभ्यास ही समाजभाषावैज्ञानकि संशोधनातील प्राथमिक पायरी म्हणून लक्षात घ्यावी लागते.

भाषा व्यवहार हा समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीचा मूलाधार आहे. हा भाषाव्यवहार व्यक्तिंव्यक्तीमधील संबंध, व्यक्ती–समाज यामधील संबंध, व्यक्ती स्वभाव त्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि संदेशाचे स्वरूप इत्यादी घटकांनी निर्धारित होतो. जे.ए. फिशमन याने भाषाव्यवहार आणि मानवी

वर्तनाची सामाजिक घडण यातील परस्परक्रियांचा अभ्यास हे सूत्र स्वीकारून समाजभाषावैज्ञानिक संशोधनाचे तीन पैलू मांडले. ते पुढीलप्रमाणे, 'अ) वर्णनात्मकः एखाद्या भाषिक समाजात भाषेच्या सामाजिक वापराची घडण कशी आहे, याचे वर्णन होते. कोण, कोणाशी, कोणत्या वेळी कोणत्या कारणांसाठी कोणती भाषा बोलतो, यांचा थोडक्यात भाषिक वापराची सामाजिक प्रमाणके कोणती याचा विचार होतो. आ) गतीशीलः एकाच भाषिक समाजात वेगवेगळ्या संदर्भात वा परिस्थितीमध्ये वेगवेगळे भाषाभेद का उपयोगात आणले जातात, याचा अभ्यास इ) उपयोजितः भाषाध्यापन व भाषाध्ययन, भाषांतर लिपिव्यवस्था, भाषानियोजन इत्यादी संबंधीच्या प्रश्नांचा विचार या अंगाने होतो.' या विवेचनातून भाषाव्यवहार आणि भाषाभेद हे दोन घटक समाजभाषाविज्ञान संशोधनात महत्त्वाचे असल्याचे दिसून येते.

भाषाव्यवहार संकेतव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. भाषिकसंकेत हे विशिष्ट मानव समुहाने तयार केलेले असतात. यावरूनच 'भाषा ही संकेतबद्ध व्यवस्था आहे.' अशी व्याख्या केली जाते. मात्र भाषेतील या संकेतप्रणालीचे समाधानकारक उत्तर देता येत नाही. म्हणून भाषाविज्ञानात तिला 'यादृच्छिक' असे म्हटले जाते. समाजभाषाविज्ञानात संकेतव्यवस्था सामाजिक संदर्भानुसार मानले जाते. ज्या सामाजिक परंपरेनुसार भाषा निर्माण होते. त्या परंपरेतून चालत आलेले संकेत भाषेने स्वीकारलेले असतात. म्हणून भाषा व्यवहाराचे स्वरूप सामाजिक संदर्भात शोधावे ही मुख्य भूमिका आहे.

भाषकाच्या व्यक्तिगत विशिष्टतेचा भाषा व्यवहारावर परिणाम होत असतो. सामान्यतः मुखेंद्रिय, कर्णेइंद्रिय, लिंग, वय, जात, शिक्षण, व्यवसाय, प्रदेश व सांस्कृतिक संदर्भ यांच्या माध्यमातून भाषकाची व्यक्तिगत विशिष्टता सिद्ध होते. बोलणे आणि ऐकणे या दोन भाषा व्यवहारातील घटकांमध्ये मुखेंद्रिये व कर्णेद्रिये यांचा वापर होतो. त्यामध्ये काही दोष आढळल्यास भाषाव्यवहारात अडथळा निर्माण होतो. या विषयीचा विचार भाषा व्यवहारात लक्षात घ्यावा लागतो. व्यवसाय हा घटक ग्रामव्यवस्थेमध्ये सर्वात महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे भाषाव्यवहारात व्यवसायसापेक्षता ही महत्त्वाची मानली जाते. वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांच्या विशिष्ट परिभाषा तयार झालेल्या असतात. भाषा व्यवहारात त्यांचे प्रतिबिंब पडलेले असते. सांस्कृतिकतेचाही संदर्भ भाषाव्यवहारात लक्षात घ्यावा लागतो. अनेकविध सांस्कृतिक परंपरा प्रदेशानुसार, समाजानुसार

बदलतात. त्या-त्या समाजव्यवहारात सांस्कृतिक बदल होतात. तसे भाषा व्यवहाराचे स्वरूपही बदलते. हे सामाजिक परिवर्तन भाषा परिवर्तनाच्या माध्यमातून विचारात घ्यावे लागते. कोणत्याही भाषिकाला तो रहात असलेला प्रदेश, तेथील हवामान, नैसर्गिक वातावरण यापासून वेगळे पडता येत नाही. जैविकदृष्ट्या भाषा आणि भाषाव्यवहारावर याचा परिणाम होतो. म्हणजेच भौगोलिकतेचा परिणाम भाषेवर होतो. स्त्रियांच्या-पुरुषांच्या भाषिक व्यवहारात व्याकरणिक स्थरावर बदल होतो. तसेच पुरुषप्रधान संस्कृतीचा आणि अलीकडे स्त्रीवादी चळवळीचा परिणाम भाषाव्यवहारावर झालेला दिसून येतो. या सर्व बाबी भाषाव्यवहारात विचारात घ्यावा लागतात.

भाषाव्यवहारातील उपरोल्लिखित घटकांबरोबरच इतर भाषांशी येणारा संबंध, त्यांचा प्रभाव यातून निर्माण होणारे भाषामिश्रण, भाषाबदल, भाषाद्वित्त्व, बहुभाषिकता इत्यादी घटकांचाही विचार केला जातो. भाषाव्यवहारात भाषिक परिवर्तन हा घटकही महत्त्वाचा आहे. भाषेत होणारे परिवर्तन सामाजिक संदर्भान्वये होत असते. त्यामुळेच भाषा आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधाचा अभ्यास करणारे समाजभाषाविज्ञान भाषिक परिवर्तनाचा सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ शोधते. भाषिक परिवर्तनातील सामाजिकता आणि त्याची समाजसापेक्ष कारणे स्पष्ट करताना डॉ.जयश्री पाटणकर यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्या लिहितात, ''१) अभिव्यक्तीमधील नाविण्य २) सभ्यतेतील स्थित्यंतर अ) राजकीय सामाजिक स्थित्यतंर ब) वैज्ञानिक स्थित्यंतर क) औद्योगिक, आर्थिक स्थित्यंतर ड) शैक्षणिक वातावरणातून घडणारे स्थित्यंतर.... ४) ध्वनी, शब्द, व्याकरणिक वाक्य अर्थपातळ्यांवरील भाषिक परिवर्तनाचे स्वरूप.'' यावरून समाजाच्या भाषा परिवर्तनाची कारणमीमांसा शोधता येऊ शकते.अशा भाषिक परिवर्तनाच्या माध्यमातून समाजभाषाविज्ञाना समाजातील सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचा शोध घेते.

भाषा भेद अथवा भाषा बदलाचे परिवर्तनीय घटक भाषेत असतात. ज्यांचा वापर भाषिक समाज करतो. त्या घटकांचा संबंध सामाजिक असून या घटकाचे विश्लेषण समाजभाषावैज्ञानिक संशोधनात महत्त्वाचे मानले जाते. यासंदर्भात रमेश धोंगडे लिहितात, 'परिवर्तनीय घटक शोधणे, त्यांच्या वापराच्या भाषेचे नमूने ध्वनिमुद्रीत करणे, भाषितांमागच्या सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करणे, त्यातून मिळणारे प्रवाह आणि भाषिकांचा संबंध तपासणे, यातूनच मग कोणता

परिवर्तीत पर्याय कोण, कोठे, केव्हा वापरतो याचे अनुमान करणे या पद्धतीने समाजभाषावैज्ञानिकाला काम करावे लागते' यावरून भाषाभेद ही समाजभाषावैज्ञानिक संशोधनाची महत्त्वाची पायरी ठरते.

भाषाभेद या संज्ञेची व्याख्या आर.ए.हडसन यांनी केली आहे. त्यांच्या मते 'भाषाभेद म्हणजे समान सामाजिक व्यवहारातील विशिष्ट भाषिक पर्यायांचा संच होय.' एकूणच समाजाच्या भाषा व्यवहाराचे स्वरूप व्यामिश्र असते. त्यामध्ये भाषिक पर्यायांचे संच अथवा उपव्यवस्था कार्यरत असतात. त्यांचा विचार भाषाभेद संकल्पनेत अभिप्रेत आहे. भाषाभेदांचे जाळे व्यामिश्र आहे. संपूर्ण समाजात एकच भाषा वापरली जाते असे नाही व समाजातील व्यक्ती ही एकच भाषा वापरत नाही. प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या संदर्भात प्रकारची भाषा वापरते. समाजामध्ये भाषा वापराचे अनेक संच तयार झालेले असतात. या भाषा वापराच्या संचावरती समाजव्यवस्थेचे संस्कृतीचे अधिराज्य असते. याचाच अभ्यास भाषाभेद संज्ञेच्या माध्यमातून समाजभाषाविज्ञानात केला जातो. हा अभ्यास करताना प्रादेशिक भेद, लिंगभेद, सांस्कृतिक-सामाजिक भेद इत्यादी घटक विचारात घ्यावे लागतात.

एखाद्या भाषिक समाजाच्या भाषाव्यवहारावर आणि भाषाव्यवस्थेवर त्या समाजाच्या संस्कृतीचा परिणाम होतो. त्यामुळे कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना त्याभाषेची संस्कृती लक्षात घ्यावी लागते. समाजातील श्रद्धा, समजुती, मूल्ये, औचित्यासंबंधीच्या कल्पना, परंपरा, नीतीमूल्ये, या सर्वांचा परिणाम त्या समाजाच्या भाषा व्यवहारावर होतो. यातून सांस्कृतिक भाषाभेद निर्माण होतात. व्यक्तिपरत्त्वे भाषेत भेद पडतात. समाजातील एक प्रमुख घटक या नात्याने व्यक्तीला समाजातील सर्व घटकांशी व्यवहार करावा लागतो. कुटुंब, व्यवसाय, नोकरी या ठिकाणी तो वावरताना प्रसंगपरत्त्वे, ठिकाणान्वये भाषेची रूपे वापरतो. उदा. एखादा तरुण कुटुंबात आदरयुक्त रूपे वापरेल तर मित्रमैत्रिणीमध्ये तो तशी रूपे वापरणार नाही. अशा प्रकारे व्यक्ती-व्यक्तीमध्ये भाषा वापरात भेद पडतात. याचा अभ्यास व्यक्तिविशिष्ट भाषाभेद या प्रकारात केला जातो.

समाजातील प्रत्येक व्यक्तीचे सामाजिक व्यवस्थेतील स्थान समाजव्यवस्थेतील जातिव्यवस्था, उच्चनीयता, आर्थिक स्तर इत्यादी घटकांनी निश्चित झालेले असते. व्यक्तीच्या भाषा वापरावरही या घटकांचा परिणाम होतो. यातून भाषाभेद निर्माण होतात. या सर्व भाषा भेदांचा अभ्यास सामाजिक स्तरानुसार भाषाभेद या प्रकारात केला जातो. व्यवसायनिष्ठ भाषाभेद या प्रकारात

भाषिक समाजातील भाषावापरातील व्यवसायनिष्ठ शब्दसंचाचा विचार केला जातो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने उपजीविकेचे साधन म्हणून व्यवसाय निवडलेला असतो. गावगाड्यात अलुतेदार-बलुतेदार मंडळी पूर्वीपासून चालत आलेला पारंपरिक जात व्यवसाय करतात. उदा.गावचे कपडे धुण्याचे काम परिट करतो. शेतकऱ्याला शेती व्यवसाय करण्यासाठी औजारे बनवून देण्याचे काम सुतार करतो. यातूनच त्या त्या समाजाच्या भाषा वापरात व्यवसायनिष्ठ शब्दसंच तयार होतो. एकूणच भाषाभेद ही केंद्रवर्ती संकल्पना मानून समाजभाषाविज्ञानात भाषाव्यवहाराचा अभ्यास केला जातो व त्यामागील समाजसापेक्षता तपासली जाते.

भाषा ही व्यक्तिसापेक्ष असली तरी तिच्या व्यवस्थेवर समाजाची अधिसत्ता असते. किंबहूना तिचा व्यवहारही सामाजिक संदर्भान्वये चालतो. प्रत्येक भाषेचा शब्दसंग्रह असतो. तिचा वापर करणाऱ्या भाषकास, समाजास त्याचे ज्ञान असते. म्हणजेच त्या त्या शब्दांना मिळालेले सामाजिक, सांस्कृतिक संकेत ज्ञात असतात. एकूणच भाषेच्या व्यवस्था व व्यवहार या दोन स्तरावर समाजव्यवस्थेचा परिणाम होतो. या समाजभाषावैज्ञानिक सूत्रानुसार भाषेतील शब्दसंग्रहाचा विचार करण्याची भूमिका स्वीकारलेली आहे. भाषा समाजाचा आरसा असतो. त्याचप्रकारे भाषेतील शब्दावरून त्या समाजाची स्थिती, मूल्ये, आदर्श, श्रद्धा, संस्कृती इतिहास दृग्गोचर होतो. एकूणच समाजाचा लेखाजोखा समाज वापरत असलेल्या शब्दावरून येतो. म्हणून शब्द हे समाज आणि संस्कृतीदर्शक असतात. असे म्हणावे लागते. ही समाजभाषाकोश या संकल्पनेतील तत्त्वे होत. समाजभाषाकोश म्हणजे समाज जी भाषा वापरतो त्या भाषेचा सामाजिक संकेत प्राप्त शब्दांचा संच होय, या संकल्पनेलाच 'डेलळेश्ररपर्सीरसश ङ्शुळलेप' असे म्हणतात.

**समारोप:**

अशा प्रकारे समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीतील बारकावे आपण लक्षात घेतले. हे संशोधन पायऱ्या पायऱ्यांनी केले जाणारे असल्यामुळे निरीक्षण, व्यवस्थापन आणि विश्लेषण ही वैज्ञानिक संशोधन पद्धती इथे केंद्रवर्ती धरली आहे. समाजभाषाविज्ञानाची स्वतंत्र संशोधन पद्धती आहे. यात लिखित अथवा मौखिक भाषाव्यवहाराचे नमुने गोळा करून व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध, व्यक्ती-

समाज आणि त्याची संस्कृती या पार्श्वभूमीवर भाषिक वापराची सामाजिक प्रमाणके शोधली जातात. साधारणतः ध्वनिमुद्रण आणि प्रश्नावली या संशोधन साधनांचा वापर यात होतो. तसेच क्षेत्रकर्म यात महत्त्वाचे मानले जाते. एकूणच समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीमध्ये समाजातील भाषाव्यवहार यातून आविष्कृत होणारा समाज संस्कृती, समाजाची आर्थिक, शैक्षणिक, ऐतिहासिक परिस्थिती यांचे स्वरूप तपासले जाते.

एकूणच समाजभाषाविज्ञानातील भाषाव्यवहार, भाषाभेद व समाजभाषाकोश या संशोधन सूत्राचा उपयोग करून साहित्याचा अभ्यास करता येतो. विशेषतः कथात्मक साहित्यातील निवेदन व संवाद यांचे नमुने विचारात घेऊन त्या त्या समाजाचा अभ्यास करता येतो. तसेच भाषिक उपयोजनातून अभिव्यक्त समाजाची स्थिती-गती लक्षात येते. अलीकडे अशाप्रकारचे संशोधन केले जाऊ लागले आहे. दलित साहित्य, लोकगीते, ग्रामीण साहित्य यांचा अभ्यास होऊ लागला आहे. यातूनच समाजभाषाविज्ञानाच्या कक्षा व्यापक बनत आहेत, याची प्रचिती येत आहे.

★★★

# शैलीवैज्ञानिक संशोधन पद्धती

**प्रा. डॉ. विकास प्रभाकर वीर**

**१. प्रस्तावना:–**

संशोधन ही एक प्रवृत्ती असून ती कोणत्याही एका क्षेत्रापुरती मर्यादित आहे, असे नाही. तिने जीवनाची सर्वच क्षेत्र व्यापली आहेत. एकूणच मानवी जीवनात असे एकही क्षेत्र नाही ज्यात संशोधनाचा उपयोग केला जात नाही. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये साहित्याचा अभ्यास करण्याच्या ज्या वेगवेगळ्या संशोधनपद्धती आहेत, त्यापैकी शैलीवैज्ञानिक संशोधन पद्धतीचे तात्त्विक विवेचन मांडणार आहे.

**२. संशोधन:–**

संशोधनाला इंग्रजीत रिसर्च म्हटले जाते. हा इंग्रजी प्रतिशब्द योग्यच आहे. रिसर्च म्हणजे पुन्हा शोध घेणे. संशोधनाचा अर्थ अभ्यासकांनी अनेक व्याख्यांतून सांगितला आहे.

१. 'संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्त्वे परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास.' (वेबस्टर कोश)

२. 'संशोधन म्हणजे दक्षतापूर्वक केलेली एखाद्या समस्येची चौकशी किंवा समस्येमागील कारणांचा घेतलेला शोध. कोणत्याही क्षेत्राशी निगडित असलेली समस्या सूक्ष्म पातळीवर जाऊन अभ्यासली जाते, तेव्हा त्याला संशोधन असे म्हणतात.' (ऑक्सफर्ड डिक्शनरी)

या व्याख्यांवरून संशोधन म्हणजे शोध घेणे, नवे उपलब्ध करून देणे, काळजीपूर्वक चिकित्सक तपासणी किंवा परीक्षण करणे असा अर्थ दिसून येतो. यावरून संशोधन म्हणजे नेमके काय? याबद्दल असे म्हणता येईल की, ज्ञान आहे ते ज्ञात करून देणे, अनार्जित आहे ते अर्जित करून देणे, अनुपलब्ध आहे ते उपलब्ध करून देणे अथवा एखादे नवे तत्त्व शोधून काढणे, एखादा नवा सिद्धांत मांडणे, एखादे रहस्य उलगडणे होय.

### ३. संशोधन पद्धती:-

संशोधनासाठी कोणती पद्धत निवडावी हे संशोधनविषयाच्या स्वरूपावरून ठरत असते. आवड व साधनसामग्री लक्षात घेऊन, गृहीतकृत्याची निश्चिती झाल्यावर संशोधनासाठी योग्य पद्धती कोणती याचा विचार संशोधकाला करावा लागतो. डॉ. जयश्री पाटणकर यांनी 'संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती' या ग्रंथामध्ये वाङ्मयीन संशोधनाच्या दहा पद्धती सांगितल्या आहेत. विमर्शक विचारपद्धती, ऐतिहासिक/कालक्रमिक पद्धती, तौलनिक पद्धती, भाषावैज्ञानिक संशोधन पद्धती, शैलीवैज्ञानिक पद्धती, ध्वनिपद्धती, सर्वेक्षण पद्धती, ग्रंथानुगामी अध्ययन पद्धती, ग्रंथापगामी अध्ययन पद्धती, समाजशास्त्रीय अभ्यासपद्धती या संशोधन पद्धतीपैकी शैलीवैज्ञानिक संशोधन पद्धतीचा विचार प्रस्तुत निबंधात मांडणार आहे.

### ४. शैली संकल्पनेचा पूर्वइतिहास:-

साहित्यशास्त्रात 'शैली' संकल्पनेचा मागोवा घेताना संस्कृत साहित्यविचारात तो गुणदोष विचार, मार्गविचार या पद्धतीने घेऊन आज तो वामनाच्या रीतीचा पर्याय म्हणून नोंदवला जातो तर हाच शैलीविचार इंग्रजी साहित्यशास्त्राच्या पार्श्वभूमीवर 'स्टाईलचे मराठी रूप' या पद्धतीने नोंदवला जातो. म्हणजेच दोन्ही साहित्यविचारात 'शैली' ही संकल्पना कशी समजून घेतली जाते हे इथे समजते. शैली हा शब्द 'शील' या शब्दापासून तयार झाला असून 'शीले स्वभावे भवावृत्ती शैली' अशीही शैलीची व्याख्या केलेली दिसते. शैली म्हणजे शीलाची, स्वभावाची वृत्ती असे म्हणता येईल. शैली शब्दाचा 'शीलाशी', स्वभावाशी आणि पर्यायाने व्यक्तिमत्त्वाशी असलेला संबंधही स्पष्ट होतो. शैलीच्या व्याख्येचा हा उल्लेख ११ व्या शतकातील आहे. त्यापूर्वी शैली चा उल्लेख इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात आढळतो. त्याची नोंद पुढीलप्रमाणे आहे. ''शील के बाद 'शैली' शब्द का प्रयोग पतंजली के महाकाव्य (दुसरी सदी इस्वीपूर्व) में लक्षित किया जा सकता है'' म्हणजेच शैली हा शब्द इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून प्रचलित असल्याचे दिसते. शैली या शब्दाची इ.स.पूर्व दुसऱ्या शतकातील नोंद ''ऐषाहि आचार्यस्य शैली लक्ष्यते'' या पद्धतीने होताना आढळते. म्हणजेच 'शील' या शब्दापासून तयार झालेला 'शैली शब्द ज्या अर्थाने आज प्रचलित आहे त्याच अर्थाने इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून प्रचलित आहे.

## ५. शैली वैज्ञानिक संशोधन पद्धती:-

शैलीविज्ञान म्हणजे भाषाविज्ञानावर आधारित साहित्याभ्यास होय. शैलीविज्ञानात साहित्यसमीक्षा आणि भाषाविज्ञान या दोन्ही ज्ञानशाखांचा आणि भाषा व साहित्य यांचा समन्यव साधला जातो. म्हणजेच शैलीविज्ञान भाषाविज्ञानातील काही बाबींच्या आधारे उभा राहिले असले तरी ते स्वतंत्र असे विज्ञान आहे. शैलीविज्ञानामध्ये काही भाषावैज्ञानिक तत्त्वांचा वापर होतो हे सत्य असले तरी त्यावरून शैलीविज्ञान म्हणजे भाषाविज्ञानाची उपशाखा म्हणून विचार करणे संयुक्तिक नाही. शैलीविज्ञान हे केवळ भाषेच्या अभ्यासाशी संबंधित नाही, ते एखाद्या विषयाची, घटक-घटितांची निवड, त्याची मांडणी यापासून ते सांस्कृतिक तत्त्वापर्यंत शैलीचा संबंध असल्याचे दिसते. 'आशय आणि अभिव्यक्ती, विचार आणि शैली, भावना आणि आविष्कार- थोडक्यात साहित्यत्त्व आणि भाषा यांच्यातला पारंपरिक भेद आधुनिक शैलीविज्ञानाला मान्य नाही.

शैलीवैज्ञानिक समीक्षा पुराव्याच्या अधिक्यावर भर देत असल्याने तटस्थपणे आणि काटेकोर विश्लेषण करण्यास रास्त ठरते. साहजिकच साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व बाजूला सारून निखळपणे साहित्य घटनेचाच विचार करणे फक्त शैलीवैज्ञानिक समीक्षेतच शक्य असते. इतकेच नव्हे तर संबंधित कलाकृतीची नेमकी सौंदर्यस्थळे काय आहेत. हे या समीक्षापद्धतीमुळे लक्षात येते. शैलीविज्ञान म्हणजे केवळ शब्दांचा आणि वाक्यांचा विचार नव्हे. संकल्पनांची मांडणी, विचारांच्या व्यूहांची रचना, पारंपरिकतेला शरण जाणारी किंवा तीपासून फटकून राहण्याची वृत्ती आणि त्यामुळे घडणारे भाषिक आविष्कार, विशिष्ट लेखकाच्या साहित्यातील भाषिक-क्लृप्त्यांची पुनरुक्ती आणि त्यातून साहित्यावर येणाऱ्या मर्यादा हेही शैलीवैज्ञानिक समीक्षेचाच भाग आहे. भाषाशास्त्रीयदृष्ट्या साहित्यातील भाषेची पदरचना तपासणे, साहित्यातील शैलीची वस्तुनिष्ठ तत्त्वे शोधणे, शैलीचे सौंदर्यशास्त्रीय, समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय संदर्भ शोधणे. शैलीच्या विविध परिभाषांवरून साहित्यिक भाषेचे विश्लेषण करणे आणि भाषाशास्त्रीय सिद्धांताच्या आधारे शैलीचे स्वरूप ठरविणे, ही आजच्या शैलीविज्ञानाची प्रमुख अंगे आहेत. साहित्यात वापरलेल्या भाषेत काही विशिष्ट खुब्या, वैशिष्ट्ये असतात, त्यांचा शोध घेण्यासाठी संहितेची भाषा पिंजून काढण्याकडे आधुनिक शैलीविज्ञानाचा कल दिसतो.

जगातील कोणत्याही दोन व्यक्ती जशा सारख्या नसतात तशाचप्रकारे

कोणत्याही दोन व्यक्तींच्या भाषेमध्येही समानता नसते. याचाच अर्थ व्यक्तिपरत्त्वे भाषा-शैली वेगवेगळी असते. या धाग्याला धरूनच 'संस्कृतीचे विधायक तत्त्व म्हणजे शैली' या विचारापर्यंत आज शैलीविज्ञान पोहोचले आहे. शैलीविज्ञानाचे मानववंशशास्त्रीय, मानसशास्त्रीय, टीकाशास्त्र, साहित्यमीमांसा या अंगानेही अधिक विचार करण्याचर गरज निर्माण झालेली आहे. परंतु आज मात्र शैलीने भाषाविज्ञानाच्या साहाय्याने साहित्याचे साहित्यपण कशात आहे, हे मात्र शोधून काढले आहे. भाषाविज्ञानातील सखोल व विविध पद्धतींमधून उदयास आलेल्या शैलीविज्ञानामुळेच आज भाषेच्या अनेक क्षमता विकसित झाल्या आहेत. आशय आणि अभिव्यक्तीमध्ये असणारी अभेदकत्त्वाची जाणीव आज शैलीमुळे होऊ लागली आहे. ''भाषा ही प्राधान्याने मानवाने काही इंद्रियाकरवी दुय्यम कार्य करवून घेऊन जन्माला घातलेली एक विनिमय व्यवस्था आहे. दैनंदिन जीवनातील व्यवहार पार पाडण्याबरोबरच मानवाचे व्यक्तिमत्त्व त्याच्या भाषेत (सर्वच शरीरमानस क्रियेत) मिसळते आणि ते स्वाभाविकही असते. यातून तिला नाना प्रकारचे रंग-तरंग प्राप्त होतात. या रंगतरंगांचा अभ्यास हा शैली-विज्ञानाच्या क्षेत्रात येतो.'' शैलीविज्ञानामध्ये आज निर्मात्यापेक्षा निर्मितीलाच समोर ठेवून अभ्यास केला जात आहे. म्हणनूच यासंदर्भात रमेश धोंगडे म्हणतात, ''साहित्याचा विचार करताना साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व आवर्जून बाजूला सारून निखळपणे साहित्यघटनेचाच विचार करणे फक्त शैलीवैज्ञानिक समीक्षेतच संभवते.''

शैलीविज्ञानाची अभ्यासपद्धती अत्यंत वस्तुनिष्ठ स्वरूपाची असते. शैलीविज्ञानाने भाषाविज्ञानाचे नियम आत्मसात केलेले असतात. या नियमांप्रमाणे प्रत्येक साहित्यकृतीची ध्वनिपातळी, शब्दपातळी, व्याकरणपातळी, वाक्यरचनापातळी आणि अर्थपातळी यांवर विश्लेषण करून पुरावे देऊन मते व्यक्त केली जातात. ही एक प्रकारची नियमनिष्ठ टीकाच होय. त्यामुळे या अभ्यासपद्धतीत यांत्रिकपणा येण्याची शक्यताही असते. यासंदर्भात डॉ.महेंद्र कदम यांचे मत विचारात घेणे महत्त्वाचे ठरते. ते म्हणतात, ''शैलीविज्ञान हे कलाकृतीची संपूर्ण, सर्वांगीण समीक्षा करू शकत नाही. कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे व शास्त्रीयतेकडे झुकणारे काही मूल्यमापनाचे मानदंड मात्र निश्चितपणे पुरवू शकते. त्यामुळे एखाद्या कलाकृतीची समीक्षा करताना त्या समीक्षकाला भाषाविज्ञानातील तत्त्वे माहीत असणे जितके गरजेचे आहे, तितकेच त्याला त्या त्या वाङ्मय प्रकारांची परंपरा, वाङ्मयीन निकष आणि सौंदर्यात्मक दृष्टीची गरज

असते. तरच शैलीवैज्ञानिक समीक्षा नवे काही मांडू शकते. नाहीतर केवळ नाम–सर्वनाम–क्रियापदांची जंत्री देऊन जी संख्याशास्त्रीय शैलीसमीक्षा केली जाते त्यातून फारसे काही हाती लागत नाही.'' म्हणजेच शैलीविज्ञान कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे मूल्यमापनाचे मानदंड पुरवू शकते. परंतु मूल्यमापनाची जबाबदारी घेत नाही. वस्तुनिष्ठ विश्लेषणाद्वारे कलाकृतीच्या मूल्यमापनाला मदत करणे एवढीच भूमिका शैलीविज्ञान घेते. मूल्यमापनाचे सर्व अधिकार साहित्यसमीक्षेचेच आहेत असे शैलीविज्ञानही मानते. म्हणजेच शैलीविज्ञान हे साहित्यसमीक्षेला पर्याय नसून पूरक आहे.

भालचंद्र नेमाडे म्हणतात त्याचप्रमाणे, ''शैलीविचार म्हणजे काही अचानक अलीकडे सुरू झालेले काहीतरी नवीन शास्त्र आहे, असे अजिबात नाही. कोणीही समीक्षक साहित्यकृतीचा आस्वाद घेताना कमीअधिक प्रमाणात तिच्या भाषिक रूपांना प्रथमत:च प्रतिसाद देत असतो. भाषेच्या संपूर्ण आकलनाशिवाय साहित्यकृतीचा आस्वाद सुरूच होत नाही. साहित्यभाषेच्या ह्या प्रतिसादाला भाषाशास्त्रीय शिस्त मात्र शैलीविचाराने मिळते, असे म्हणता येईल.''

### ६. निष्कर्ष:–

१) 'शैली' ही संकल्पना 'शील' या शब्दापासून उत्क्रांत झाली असून इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून 'शैली' या शब्दाचा उल्लेख आढळतो.

२) संस्कृत काव्यशास्त्रात वामनाने मांडलेला रीतिविचार हा आशयाचा आणि अभिव्यक्तीचा विचार करणारा असल्याने शैलीचा मागोवा घेताना रीतीचा विचार करावा लागतो.

३) शैली ही कलाकृतीला कलात्मकता प्राप्त करून देणारा महत्त्वाचा घटक आहे हा विचार वामनाच्या रीती संकल्पनेतून स्पष्ट होतो. रीती हा घटक केवळ उपकारक घटक नसून काव्याचा आत्मा आहे. या प्रकाराने शैलीचे स्वरूप स्पष्ट होते.

४) पाश्चात्त्य शैलीविज्ञानातील चिंतनाचे कवच, पर्यायाची निवड, लेखकाचे व्यक्तिमत्त्व, नियमोल्लंघन, कालिकवैशिष्ट्ये, भाषा रचनेतील वैशिष्ट्ये या सहाही दृष्टिकोनांचा एकत्रित विचार केला तर ''शैली ही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाने संस्कारित झालेल्या, अभिव्यक्तीच्या विविध पर्यायांपैकी विशिष्ट पर्यायांची निवड करून विशिष्ट काळातील भाषेच्या रचनास्तरावरील नियमोल्लंघनाद्वारे व भाषेच्या वैशिष्ट्यांद्वारे कलाकृतीला प्राप्त होणारे भाषिक कवच होय''(११) असे म्हणता

येईल.

५) शैली ही आशयाचे, चिंतनाचे, विचारांचे कवच किंवा आवरण म्हणून विचार करण्याचा प्रघात असला तरी शैली ही केवळ साहित्याचा बाह्य घटक नव्हे.

६) शैली साधन आणि साध्य दोन्ही रूपात असू शकते.

७) 'आशयाच्या अभिव्यक्तीचे साधन म्हणजे शैली', 'रसाला उपकारक घटक म्हणजे शैली', 'शैली म्हणजे काव्यच' या भूमिकांमधून आधुनिक कालखंडातील मराठी साहित्यातील शैलीविचार व्यक्त होताना दिसतो.

८) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यातील शैलीविचार हा अधिक वस्तुनिष्ठ होताना आढळतो. यात फक्त भाषा व भाषारचनेचाच विचार नसून अनुभव, अनुभवविश्व, अनुभवविश्वाने घडविलेल्या प्रतिमा यांचाही विचार होताना दिसतो.

९) भाषा, अनुभवविश्वाचे पुनर्व्यवस्थापन, प्रतिमा इ. शैलीचे महत्त्वाचे घटक म्हणून विचारात घ्यावे लागतात तर लेखकाचे व्यक्तिमत्त्व, सामूहिक वैशिष्ट्ये व विशिष्ट काळाचा प्रभाव हे शैलीवर परिणाम करणारे इतर घटक होत.

★★★

# 'दलित साहित्याचे समाजभाषावैज्ञानिक संशोधन '

डॉ.सारीपुत्र तुपेरे

दलित साहित्य हा वाङ्मयीन प्रवाह उदयास येऊन जवळजवळ अर्धशतकाचा काळ लोटलेला आहे. गेल्या पन्नास वर्षामध्ये दलित साहित्यविचार नानाविध कक्षांनी परिपृष्ठ तर झालाच त्याबरोबरच भारतीय भाषांमधील साहित्यविचारात किंबहुना जागतिक साहित्य परिप्रेक्ष्यामध्ये चर्चिला गेला. दलित साहित्यामध्ये ललित लेखनाबरोबरच वैचारिक आणि समीक्षा या क्षेत्रांमध्ये मूलभूत संशोधन झालेले आहे, हे सूर्यसत्य नाकारता येणार नाही. दलित साहित्याच्या संशोधनात अलीकडे विविध नव्या दिशांची निर्मिती झालेली असून नव्या संशोधन पद्धती उदयास आलेल्या आहेत. त्यामध्ये भाषावैज्ञानिक संशोधन पद्धती ही एक महत्त्वाची संशोधन पद्धती आहे. वास्तविक दलित साहित्य समीक्षा व्यवहारात भाषाविचार दुर्लक्षित राहिला आहे. काही प्रमाणात केवळ वाङ्मयीन आकलनात अभिव्यक्तीच्या विशेष नोंदविण्यापलीकडे स्वतंत्रपणे दलित साहित्याच्या भाषेचे संशोधन झालेले दिसत नाही.

मराठी सहित्याला भाषिकदृष्ट्या व्यापक आणि विस्तारित करण्याचे ऐतिहासिक कार्य दलित साहित्याने केलेले आहे. महाराष्ट्रातील विविध प्रदेशातील बोलींची अस्सल अभिव्यक्ती त्यात झाल्याचे दिसते. त्याबरोबरच भारतीय समाजातील विविध जाती, जमाती, आदीवासी या समाजांची बोलीरूपे दलित सहित्यात आलेली आहेत. त्यामुळे दलित साहित्य लोकभाषा संग्रहालय बनलेले आहे. एकूणच दलित साहित्याच्या भाषेला समाज, संस्कृतीचे परिमाण प्राप्त झालेले दिसते. भाषावैज्ञानिक अभ्यासात अलीकडे भाषा, समाज आणि संस्कृती या त्रिसूत्रान्वये भाषाभ्यास करणारी समाजभाषाविज्ञान ही नवीन भाषाभ्यास शाखा उदयास आली आहे. दलित साहित्याच्या भाषाविचारात तिची प्रस्तुतता विशेषत्त्वाने लक्षात घ्यावी लागते. म्हणून दलित साहित्याचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास कोणत्या संदर्भान्वये करता येईल याचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचे निश्चित केलेले आहे.

भाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीमध्ये संरचनात्मक, उपयोजनात्मक यांच्याबरोबरच समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती ही अलीकडे उदयास आलेली

महत्त्वाची पद्धती आहे. भाषाव्यवहार आणि सामाजिक संरचना यात परस्परावलंबित्त्वाचे नाते आहे. मानव समाजव्यवहारात भाषावापर करताना व्याकरणिक नियमांपेक्षा सामाजिक संकेतांनी भाषाव्यवहार करतो. त्यामुळे भाषेचा अभ्यास म्हणजे समाजाचा अभ्यास होय. एकूणच भाषेचा सामाजिक संदर्भान्वये अभ्यास ही समाजभाषाविज्ञानाची भूमिका आहे. जेनिफर बायर (गशपळषशी इूशी) यांनी चशींहेवेश्रेसू `ष ऊींश उेश्रश्रशलींळेप रपव ऊींर अपरश्रूळी ळप डेलळेश्रळपर्सीळीींळल ठशीशरीलह. या लेखात समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती किती मूलभूत चिंतन नोंदविलेले दिसते. त्यांच्या मते, समाजभाषाविज्ञान हे भाषिक समाजाच्या व्यवहाराचे प्रत्यक्ष परिशीलन सामाजिक संदर्भात करणारे अभ्यासक्षेत्र आहे. यात भाषाभेदांची सामाजिक, सांस्कृतिक घटकान्वये चिकित्सा केली जाते. यामध्ये दोन मुख्य हेतू असतात. एक वेगवेगळे भाषिक समूह कसा भाषाव्यवहार करतात आणि दोन एकाच भाषिक समाजात होणारे वैविध्यपूर्ण भाषिक उपयोजन या दोन्ही प्रकारांना बायरने अनुक्रमे खपींशीरलींळेपरश्र आणि उे-ीशश्रींळेपरश्र असे म्हटलेले आहे. उपरोक्त समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती विषयीचे विवेचन लक्षात घेता समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीचे स्वरूप आपल्या लक्षात येते. ही संशोधन पद्धती दलित साहित्याच्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरते. कारण दलित साहित्याची भाषा ही अनुसूचित जाती, भटक्या विमुक्त जमाती, आदीवासी या समाजांची जात बोली, सामाजिक बोली आहे. या संदर्भात ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत डॉ.गंगाधर पानतावणे यांचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे. ते लिहितात, जसा समाज तशी भाषा, भाषा त्या त्या समाजाची सांस्कृतिक ओळख देते. लेखक, त्याचा समाज आणि त्याची भाषा याचा अभिन्न असा संबंध आहे. जे हे संबंध नाकारतात त्यांची भाषा कृत्रिम आणि जरतारी असते. नक्षीदार भाषा समाजाचे अनुभव सांगण्यास कृतक ठरते. म्हणून दलित लेखकांच्या संदर्भात त्याची भाषा ही त्याच्या समाजाची आणि समाजदर्शनाची भाषा असते, कारण या भाषेशी त्यांच्या व अनुभवाची नाळ बांधलेली असते. दलित अनुभव दाहक असतो म्हणून दलित साहित्याची भाषा आक्रमक, कधी बेदरकार तर कधी धारदार असते. दलित लेखकाला त्याच्या भूतकाळाने कठोर बनविलेले आहे आणि वर्तमानाने आक्रमक आणि म्हणूनच दलित साहित्यानी भाषा त्यांच्या अस्तित्वाची, अस्मितेची आणि आयुष्याची भाषा आहे. भाषा आणि समाज यातील अनुबंध आणि दलित सहित्याच्या

भाषाविचारात त्याची अपरिहार्य डॉ. गंगाधर पानतावणे यांनी अत्यंत मूलभूतपणे मांडलेली आहे. त्यांची उपरोक्त भूमिकाही दलित साहित्याच्या समाजभाषावैज्ञानिक संशोधनाचा पाया आहे. या पायाभूत सूत्रांन्वये दलित साहित्याच्या समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीचे स्वरूप विशद करता येईल.

समाजभाषाविज्ञानात भाषेचा अभ्यास करताना ती भाषा वापरणारा व्यक्ती, त्याचा समाज, त्याची संस्कृती, त्याचा प्रदेश याविषयीचा सामाजिक सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात घेणे आवश्यक असते. भाषा आणि समाज यातील परस्परानुबंध पायाभूत मानून समाजभाषाविज्ञानात भाषिक समाज ही संकल्पना मांडलेली आहे. दलित साहित्यात विविध भाषिक समाज येतात. त्यांची वर्गवारी जातसंदर्भान्वये केली जाते. दलित साहित्यात अनुसूचित जाती, भटक्या-विमुक्त जमाती आणि आदीवासी या समाजांचे जीवनदर्शन आलेले आहे. त्यांची भाषा ही वेगवेगळी आणि विविधांगी असून त्यात 'बोली' मोठ्याप्रमाणात आलेल्या आहेत. या बोलींचे स्वरूप जातकेंद्री आहे. भारतीय समाजव्यवस्थेत 'जात' हा महत्त्वाचा सामाजिक प्रमाणक मानला जातो. त्यामुळे इथे त्या त्या समाजांची भाषिक वैशिष्ट्ये मांडताना हा जातसंदर्भ लक्षात घेणे अगत्याचे ठरते. भारतातील प्रत्येक जातीची एक संस्कृती आहे. राहण्याची पद्धती, रीतीरिवाज, परंपरा, रूढी, संकेत वेगवेगळे आहेत. या सांस्कृतिक चौकटीतच या भाषिक समाजांचा जीवनव्यवहार चालू असतो. या सर्व दलित समाजाच्या संस्कृतीवर हिंदुधर्मसंस्कृतीचा प्रभाव असला तरी १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो दलित समाजाबरोबर बौद्ध धम्माचा स्वीकार केला. ही 'धम्मक्रांती' होती. यामुळे दलितांच्या सांस्कृतिक जीवनात मोठे परिवर्तन झाले. या ऐतिहासिक संस्कृती स्थित्यंतराचा विचार दलित साहित्यातील भाषिक समाजांच्या समाजभाषावैज्ञानिक संशोधनात करावा लागेल.

'भाषाव्यवहार' हा घटक समाजभाषाविज्ञानाचा मूलाधार आहे. किंबहुना तो केंद्रवर्ती अभ्यास विषय आहे. सामान्यत: भाषाव्यवहारावर व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाचा परिणाम होत असतो. अशाचप्रकारे व्यक्ती, समूहाची सांस्कृतिक ओळख, अस्मिता यांचा भाषाव्यवहारावर परिणाम होतो. त्यात काही श्रद्धा, समजुती, मूल्ये, औचित्यासंबंधीच्या कल्पना, रीतीरिवाज आकारास येतात. कोणत्याही भाषिक समाजाच्या भाषाव्यवहाराचे स्वरूप उलगडून पाहताना व्यक्तिसापेक्षता, प्रादेशिकता, जात, व्यवसाय, वर्गव्यवस्था, सामाजिक-सांस्कृतिक

संदर्भ, लिंगभेद इ. घटक लक्षात घ्यावे लागतात. या समाजभाषावैज्ञानिक तत्त्वान्वये भाषाव्यवहाराचा अभ्यास केला जातो.

दलित साहित्याचे समाजभाषावैज्ञानिक संशोधन करताना उपरोक्त तत्त्व महत्त्वाचे ठरते. दलित भाषिक समाजांचा भाषाव्यवहार व्यापक, व्यामिश्र आणि गुंतागुंतीचा आहे. त्यामुळे प्रत्येक भाषिक समाजाच्या स्वतंत्र भाषाव्यवहाराचा अभ्यास करणे जटिल बनते. म्हणून दलित भाषिक समाजांच्या भाषाव्यवहारातील समान सूत्रान्वये भाषाव्यवहाराचे स्वरूप विशद करता येते. उदा. अभिवादन व्यवहार, दलित-दलित भाषाव्यवहार, दलित-दलितेत्तर भाषाव्यवहार, सांकेतिक बोलींचा वापर, व्यवसायकेंद्री भाषाव्यवहार, द्वैभाषिकता, भाषाद्वित्त्व, भाषामिश्रण इ. मुद्यांच्या आधारे मांडणी करता येते. दलित साहित्यात दलित समाजाच्या भाषाव्यवहाराचे अस्सल नमुने आलेले आहेत. त्यामुळे दलितांच्या भाषाव्यवहाराचे स्वरूप मांडण्यासाठी प्रत्यक्ष नमुने तर उपयुक्त ठरतातच मात्र त्याबरोबर साहित्यकृतीतील संवाद भाषेचा मोठा उपयोग त्यासाठी होऊ शकतो. त्यामुळे दलित साहित्यातील भाषाव्यवहाराचे स्वरूप तपासणे हे समाजभाषावैज्ञानिक संशोधनाचे महत्त्वाचे कार्य आहे हे लक्षात घेणे अगत्याचे आहे.

समाजभाषावैज्ञानिक अभ्यासात 'भाषाभेद' ही एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. कोणताही समाज एकसंघ भाषा कधीच वापरत नाही. त्यामध्ये लिंग, वय, वर्ग, जात, प्रदेश, संस्कृती, सामाजिक पार्श्वभूमी, व्यवसाय अशा विविध पातळ्यांवरील भाषावापर वेगवेगळा असतो. तसेच अन्य भाषिकांच्या संपर्कातूनही भाषा उपयोजनात फरक पडतो. या सर्व भेदांना समाजभाषाविज्ञानात भाषाभेद असे म्हटले जाते. यांची वर्गवारी एकूण नऊ प्रकारात करता येते. त्यामध्ये १) व्यक्तिविशिष्ट भाषाभेद २) लिंगभेद ३) प्रादेशिक भाषाभेद ४) सांस्कृतिक भाषाभेद ५) सामाजिक वर्गीकरणाधिष्ठित भाषाभेद ६) व्यवसायनिष्ठ भाषाभेद ७) गुप्त अथवा सांकेतिक भाषाभेद ८) भाषांतर्गत भाषाभेद ९) आंतरभाषिक भाषाभेद यांचा समावेश होतो. या सर्व भाषिक भेदांचा विचार समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीत करावा लागतो. यासाठी विविध गद्यात्मक उदाहरणे निवडून त्यातील याविविध प्रकारच्या भाषिक भेदांची मांडणी करणे गरजेचे ठरते. दलित भाषिक समाजात भाषाभेद मोठ्याप्रमाणात सापडतात, कारण या सर्व समाजांमध्ये कमालीची विषमता आहे. विविधता आहे. त्यामुळे दलित साहित्याच्या समाजभाषावैज्ञानिक संशोधनात भाषाभेद हा घटक अत्यंत महत्त्वाचा आणि व्यापक स्वरूप आहे.

त्याचा विचार स्वतंत्रपणे करावा लागातो.

कोणत्याही भाषाऱ्यासात शेवटी त्यातील शब्दसंग्रहाचा विचार करणे अंतिमत: महत्त्वाचे असते. समाजभाषाविज्ञानात 'समाजभाषा कोश' अशी संकल्पना त्यासाठी वापरली जाते. सामान्यत: प्रत्येक भाषेपाशी शब्दसंग्रह असतो आणि त्या भाषेचा वापर करणाऱ्या भाषकाला त्याचे ज्ञान असते. भाषा ही व्यक्तिसापेक्ष असली तरी तिच्या अंत:स्तरावर समाजाची अधिसत्ता चालत असे. किंबहुना तिचा व्यवहार अथवा विनिमय सामाजिक परिकक्षेत चालतो. म्हणून एखाद्या भाषेचा जसा समाज असतो तशीच प्रत्येक समाजाची एक भाषा आणि त्या भाषेचा शब्दसंग्रह अथवा कोश असतो.

दलित भाषिक समाजाची भाषा ही विविधांगी आहे. त्यात विविध जातीय, प्रादेशिक बोली आलेल्या आहेत. त्यामुळे दलित भाषिक समाजाच्या समाजभाषा कोशात लोकभाषेतील शब्द मोठ्या प्रमाणात येतात. त्यामध्ये वऱ्हाडी, नागपुरी, वैदर्भी, मराठवाड्यातील बोली, माणदेशी बोली, कोकणी इ. भाषाचा मोठ्या प्रमाणात त्यात समावेश होतो. या प्रादेशिक बोलीतील शब्द त्या त्या प्रदेशातील जैविकतेनुसार वैविध्यपूर्ण रूप धारण करतात. उदा. वऱ्हाडी/नागपुरी बोलीतील मले (मला), तुले (तुला); मव्ह (माझ), कलकल (गोंधळ), चखोट (चांगलं) इ. तर कोकणी भाषेतील आमी (आम्ही), तिका (तिला), इलस (आलास), घोव (नवरा), आवस (आई) इ. प्रादेशिक शब्दसंच यात येतात. दलित समाजातील प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय हिंदुधर्मव्यवस्थेनुसार पिढ्यानपिढ्या ठरलेला होता. त्यामुळे दलित समाज जातविशिष्ट व्यवसायाने बंदिस्त झालेला आहे. या जातविशिष्ट व्यवसायातील मोठा शब्दसाठा दलित साहित्यात येतो. उदा. गावकी, बलुत, सांगावा, दौंडी, पड, कावडनी, आरूस, हाडकी हाडवळा, बाज, सुंब, फड, चऱ्हाट, रापी, सढ, आरी, सुतकी, पहार, बंडा, (पाट) रोल (उखळ), कोडती (हातोडी) इ. याचा समावेश त्यात होतो. याचाही स्वतंत्रपणे विचार करावा लागतो. सांकेतिक अथवा गुप्त बोलीतील शब्द सुद्धा दलित साहित्याच्या भाषेत येतात. शिव्या, म्हणी, वाक्प्रचार यांचा मोठा वापर या भाषेत पाहावयास मिळतो. मात्र या सर्वांना लोकभाषेचे सौंदर्य प्राप्त झालेले आहे. त्याच्यामागे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ मोठ्या प्रमाणात आहेत. यासर्व समाजभाषा कोशाची मांडणी समाजभाषावैज्ञानिक संशोधनात करावी लागते. आजच्या दलित साहित्य संशोधनात नव्या पद्धतीनी दलित साहित्यविचार केला

जात आहे. ही दलित साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट ठरते. नवनवीन समीक्षा पद्धतीचा वापर केल्याने दलित सहित्याची मौलिकता स्पष्ट होते. प्रस्तुत शोधनिबंधात दलित साहित्याचे समाजभाषावैज्ञानिक संशोधन कोणकोणत्या तत्त्वान्वये करता येते. आणि समाजभाषावैज्ञानिक संशोधनाची दलित साहित्याच्या अभ्यासातील प्रस्तुतता मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. अंतिमत: उपरोक्त समग्र मांडणीतील निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविता येतील.

१. दलित साहित्याचा संशोधन भाषाविचार हा दुर्लक्षित राहिलेला आहे. मात्र मराठी साहित्याला दलित साहित्याने भाषिकदृष्ट्या व्यापक बनविलेले आहे. त्यामुळे दलित साहित्यांच्या भाषेची समीक्षा भाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीतून होणे गरजेचे ठरते.

२. दलित साहित्याची भाषा ही दलित समाजांची सांस्कृतिक ओळख आहे. त्यांच्या भाषेचा समाजाशी व संस्कृतीशी घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळे दलित साहित्याची भाषावैज्ञानिक चिकित्सा करताना केवळ ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ या व्याकरणिक घटकान्वये विचार करून चालणार नाही. तर त्यासाठी आधुनिक भाषाविज्ञानातील समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती उपयुक्त ठरते.

३. समाजभाषाविज्ञान ही आधुनिक भाषाविज्ञानात उदयास आलेली नवीन अभ्यास पद्धती आहे. भाषा आणि समाज यातील आंतरसंबंधाचा विचार करून भाषेचा सामाजिक संदर्भान्वये शोध समाजभाषावैज्ञानिक संशोधनात घेतला जातो. त्यामध्ये भाषिक समाज, भाषिक समाजाचा भाषाव्यवहार, भाषिक समाजाच्या भाषाव्यवहारातील भाषाभेद आणि समाजभाषा कोश इ. तत्त्वान्वये शोध घेतला जातो.

४. दलित साहित्याचे समाजभाषावैज्ञानिक संशोधन करताना त्यांचे भाषिक समाज निर्धारित करावे लागतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शूद्रपूर्वी कोण होते? आणि अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले या दोन ग्रंथात दलित या संकल्पनेला ब्रोकन मेन असे म्हटलेले आहे. या ब्रोकन मेनमध्ये अनुसूचित जाती, भटक्या-विमुक्त जमाती आणि आदीवासी यांचा समावेश त्यांनी केला. या सूत्रान्वये दलित भाषिक समाजांची वर्गवारी तशीच करावी लागते.

५. दलित भाषिक समाजांचा भाषाव्यवहार अत्यंत गुंतागुंतीचा, व्यापक व व्यामिश्र आहे. त्यामुळे प्रत्येक समाजाचा स्वतंत्र भाषाव्यवहार विचार घेण्यापेक्षा

त्यातील काही समानसूत्रान्वये भाषाव्यवहाराचे स्वरूप विशद करता येते. या समानसूत्रांमध्ये अभिवादन व्यवहार दलित-दलितेत्तर, दलित-दलित, स्त्री-पुरुषांचा भाषाव्यवहार इ. सूत्राचा समावेश करता येतो.

६. भाषा ही एकसंघ कधी नसते. तिच्यात विविध प्रकारचे भेद पडतात. त्यांना समाजभाषाविज्ञानात 'भाषाभेद' असे म्हणतात. दलित भाषिक समाजाच्या भाषाव्यवहारात असे अनेक भाषाभेद दिसतात. त्यामध्ये मुख्यत: लिंगभेद, प्रादेशिक भेद, सामाजिक भेद, व्यवसायनिष्ठ भाषाभेद, आणि सांस्कृतिक भाषाभेदांचा समावेश होतो. याचा संदर्भान्वये शोध घेता येतो.

७. समाजभाषाविज्ञानात 'समाजभाषा कोश' ही शब्दसंग्रहाचा विचार करणारा घटक आहे. दलित भाषिक समाजांच्या भाषेतील शब्दसंग्रह मोठा आहे. त्या महाराष्ट्रातील विविध प्रदेशातील शब्दसाठा उपलब्ध आहे. त्याबरोबरच सांकेतिक बोलीतील शब्द, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार यांचाही समावेश होतो. यांचा शोध समाजभाषावैज्ञानिक संशोधनात घ्यावा लागतो.

८. दलित साहित्याची भाषा ही भाषावैज्ञानिकांना आव्हान ठरणारी आहे. मात्र तिचा स्वतंत्रपणे विचार व्हायला हवा.

९. दलित साहित्यातील भाषा ही लोकभाषा आहे. या लोकभाषेत मुख्यत: सामाजिक व प्रादेशिक स्तरावरील बोलीरूपे मोठ्याप्रमाणात आली आहेत. याचा स्वतंत्रपणे विचार करायला हवा.

१०. दलित साहित्य हे लोकभाषा संग्रहालय आहे. महाराष्ट्रातील विविध बोलींचे संचित यात आलेले आहे. लोकभाषांच्या संवर्धनाचे ऐतिहासिक कार्य दलित साहित्याने केलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा व साहित्याला भाषिकदृष्ट्या व्यापक बनविणाऱ्या दलित साहित्याचे समाजभाषावैज्ञानिक संशोधन होणे अत्यंत गरजेचे वाटते.

★★★

# वाङ्मयीन शैलीशास्त्र संशोधनाची अभ्यास क्षेत्रे

**प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी**

भाषा, साहित्यशास्त्र आणि वाङ्मयप्रकारांतील संशोधनाच्या व्याप्ती आणि विस्तार वाढीतून स्वतंत्रपणे शैली शास्त्राचा उहापोह होत आहे. आधुनिक साहित्य संशोधनात तंत्र व शैलीला महत्त्व दिले जाते. अशा प्रकारच्या संशोधनातील शैली केवळ भाषेशीच संबंधित नसून तिचा स्वतंत्र विचार करताना साहित्यातील अनुभवाचे संकलन (ग्रामीण–दलित–अदिवासी–स्त्री जीवनातील अनुभव) विषयाचे आकलन (कथा विषय, लेखन विषय, अध्यात्मिक जीवनचिंतन, विज्ञान विषयक), कलाकृतीची रचना (कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र) आकृतीबंध, (वाङ्मय प्रकार– रचनेवरून व विषयावरून) आविष्काराची रीत, (प्रथम पुरुषी निवेदन, पात्रमुखी, निवेदनात्मक, पत्रात्मक वैचारिक, ललित गद्य, पद्यमय, भावकाव्य इ.) आणि आस्वाद प्रक्रिया (रसग्रहणात्मक, सौंदर्यवादी, भावसौंदर्य टिपून घेणे, लेखक कवींच्या भावानुभूतीचा आस्वाद घेणे, विचार–कल्पना समजावून घेणे इ.) यांच्या निगडित आहे.

कवी लेखक, संत–पंत–शाहिरी, काव्याच्या संदर्भात व विविध वाङ्मय प्रकारातील (प्राचीन–आधुनिक–अर्वाचीन) साहित्य निर्मितीमधील त्यातील भाषा व रचनाबंधाचे–आकृतीबंधाचे विश्लेषण करून भाषा शास्त्रीय सिद्धांताच्या आधारे शैलीचे संशोधन स्वरूप ठरविले जाते. शैलीचा विचार केला जातो, भाषा व शैली यानुसार भारतीय तथा पाश्चिमात्य पद्धत असाही वेगवेगळा विचार करता येतो.

मुख्यत: मराठीतील शैली विज्ञान संशोधन पद्धती विषयी थोडक्यात लिहिताना 'रामदासांच्या कवितेतील आकृतिबंध', 'एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य शैलीचा विकास', 'संत तुकारामांच्या अभंगांच्या शैली वैज्ञानिक अभ्यास', 'मराठी कादंबरीची संरचना', 'आधुनिक मराठी कवितेतील पद्यबंधांचा चिकित्सक अभ्यास, आधुनिक मराठी कवितेच्या शैलीतील स्थित्यंतरे', 'केशवसुतांचा कवितेच्या शैली वैज्ञानिक अभ्यास, 'ज्ञानेश्वरीची संपादने', 'द.ना. आपटे यांचे कादंबरी तंत्र', 'समर्थ दासबोध संपादणी, 'ललित साहित्यातील आकृतिबंधाची जडणघडण', असे संशोधन मागच्या कळात झाले आहे.

१९७५ नंतरचे बदलले वाङ्मयीन प्रवाह', जागतिकीकरण, नवजागतिकीकरणातील मराठी साहित्याचे बदलते स्वरूप, नवजागतिकीकरणातील मराठी साहित्याचे बदलते स्वरूप, नवकादंबरी, नवकाव्य, नवकथा, लोकगीते, तसेच संत साहित्य, ग्रामीण-दलित, आदीवासी-स्त्रीवादी साहित्यातील बरेच विषय शैलीदृष्ट्या (भाषा शास्त्रातील संशोधनासह) शोधता येतात.

आजच्या कादंबरी लेखनातील बदलत्या शैलीचा लेखन रचनेचा, आकृतीबंधाचा घाट शोधताना प्रामुख्याने 'गौतमची गोट' (अनिल दामले), 'भर चौकातील अरूण्यरूदन' (रंगनाथ पठारे) खेकसत म्हणे – 'आय लव्ह यू ' (श्याम मनोह्र) 'चाळेगत' (प्रविण दशरथ बांधेकर) 'क्रमश:' (महेश केळूस्कर) 'सात एकं बेचाळीस' (किरण नगरकर) अशा प्रभावी प्रयोगशील उत्तर आधुनिक नवकादंबरी लेखनाचा या संदर्भात विचार केला पाहिजे. कथा-कविता, कादंबरी-नाटक या प्रकारात कथा-भावचिंतन, कल्पना विलास प्रसंग, व्यक्तिचित्रे, या पलीकडे कितीतरी संशोधन क्षेत्र शिल्लक आहेत, त्यावर संशोधन झाले आहे. पण अजूनही फार मोठा परीघ आजच्या काळातील मराठी नवसाहित्यात खुणावताना आशय, अभिव्यक्ती, शैली अशा सर्वच अंगांमध्ये नवे प्रयोग करण्यास संशोधनात वाव आहे.

साहित्य प्रकाराचे जुने तंत्र झुगारून देत विनोद, उपहास, बोलीभाषा, विडंबन या सर्वांचा वापर करून लिहिण्यात आलेले नवसाहित्य एक नवीन शैली आणि परिमाण प्राप्त करून देतात. मराठी साहित्य क्षेत्रात खळबळ उडवून देणाऱ्या काही साहित्यकृती शोधताना किंचित तिरकस, तरीही तटस्थ अशी निवेदन शैली, रचनेत नावीन्यता, प्रथम पुरुषी निवेदन तंत्रांतील, सीमारेषा जाणीवपूर्वक धुसर करणारे निवेदन तंत्र, समकालीन कादंबरीत लक्षणीय ठरले आहे. (उदा. के ईश्वरराव, हे पुरूषोत्तमराव, 'शीत युद्ध सदानंद', खूप लोक आहेत. 'उत्सुकतेने मी झोपलो' (श्याम मनोह्र) 'गौतमांची गोट' (अनिल दामले) 'अच्युत आठवले' आणि आठवण, (मकरंद साठे), 'ऑपरेशन यमू' (मकरंद साठे), यासह नवजागतिकीकरणाचे व कॉर्पोरेट क्षेत्राचे प्रतिबिंब व्यक्त झालेला आजच्या समकालीन मराठीतील कादंबऱ्याही, कादंबरी लेखनाचे जुने सगळे संकेत मोडून टाकणाऱ्या आहेत, 'नामुकीचे स्वगत' (प्रा.रंगनाथ पठारे) हे सर्व या संदर्भात नव संशोधनार्थ स्वीकारार्ह ठरतात.

अशा अनेक आशय केंद्रित कांदबऱ्यांचा प्रकार हाताळणे कठीणच

काम असते. परंतु एक शैली म्हणून हा प्रकार कमालीचा आकर्षक आणि सैल असल्याने जाणकारांना अभ्यासाचा मोह पडणे साहजिकच आहे. विशेषत: महेश केळूस्कर यांच्या पहिल्या 'यू कॅन ऑल्सोविन या' कादंबरीतही व्यवस्थेविरूद्धचा प्रखर निषेध आक्रमक भाषेत आणि घाटाच्या प्रयोगातून व्यक्त झाला आहे. यातील प्रतिपादन 'फॉर्म' च्या प्रयोग शीलतेत धुसर होत गेले. म्हणून अशा प्रकारच्या साहित्यकृतीत पात्रांच्या वैचारिकतेपेक्षा लेखकाच्या प्रतिभा उन्नत मनाचाच विचार होऊ शकतो त्यावरचे चिंतन किंवा खोलवरे अन्वयार्थ शोधणे शैली वैज्ञानिकदृष्ट्या आव्हानात्मक ठरते.

प्रभावी आणि प्रयोगशील असणारे अशा प्रकारचे कादंबरी लेखन दाट आशयाने आणि चिंतनशीलतेने व्यापून राहिले आहे. त्याकडेही लक्ष गेले पाहिजे. उदा. 'काळोखाचे पाणी' (ए.वि.जोशी) यांचे सह रविंद्र शोभणे, गौरी देशपांडे. जी.ए. कुलकर्णी चिं.त्र्य. खानोलकर, भालचंद्र नेमाडे, सदानंद देशमुख, मेघना पेठे, यांच्या साहित्यकृती मराठीत अनुभव संपन्न, अनुभव संयुक्तदृष्ट्या भाषाशैली सद्याच्या मराठी साहित्यातील पर्यावरणाला व वाङ्मय व्यवहाराला विचार प्रवृत्त करतात, त्यात डोकावणे इष्ट असून, अलीकडच्या मराठी कादंबरीत निवेदनाचे जे प्रयोग केले जात आहेत. समाजाच्या तीव्र अशा दाबातून नव कादंबरी लेखन घडते आहे. त्या संदर्भात शैलीने वैज्ञानिक अभ्यासाचे नवे दालन खुणावले आहेत. त्यासाठी उदा. बोलकी आहेत लेखकाकडे उच्चकोटीची लेखन शैली नसली तरी काही काही पुस्तके थेट ह्दयाला भिडतात. ती केवळ पुस्तकातील भेदक सच्चाई आणि तपशीलाच्या बळावर संपादित लोकगीतांवरील पुस्तके तसेच आणखी काही 'मी भलन पावले आहे' (मेहलनिसा दलवाई आत्मचरित्र) 'एक होता कार्व्हर' चरित्र वीणा गव्हाणकर, बहिणाबाई चौधरी यांचे काव्यलेखन, संत रामदासाचा दासबोध इ. ही एक काही ग्रंथ संपदा याच श्रेणीत मोडतात.

ह्या पुस्तकांच्या माध्यमातून कवी लेखकांचे काही पैलू व वाङ्मयीन लेखनशैलीचे आशय अभिव्यक्तीसह समर्थपणे वाचकांसमोर येतात नव जाणिवेच्या जागातिकी करणाचा काळातील कविता नवकांदबरी लेखन, (पारंपरिक साचेबंद कांदबरी लेखन नव्हे). मनोविश्लेषणात्मक जाणीव नेणिवेच्या कांदबऱ्या हिंसा कामुकता दर्शविणारे नव नाट्यलेखनुभूती या सर्वामधून विविध अर्थ ध्वनित होतात त्यास प्रागतिक असा आशयही असतो मुखवट्याचे खरे खुरे जग महानगरीय संवेदना आजच्या तंत्रज्ञानाधिष्ठित कॉर्पोरेट जगाची संवेदना वाङ्मयाचा स्थायीभाव

झाला आहे. विचारसाहित्य म्हणून त्यास विशेष महत्त्व आहे. गद्यविधान स्वरूपी वाटणारे निवदेन, शब्द वाक्य-बंधातून साहित्याला प्राप्त झालेले व्यंग्यार्थ, त्यायोगे विस्तारणारा, लेखन संवेदनांचा परीघ नव्या नव्या भाषिक प्रतिमा भाषाबंध भाषिक मांडणी निर्माण करतात. एकूणच साहित्य कलाकृतीचा आविष्कार वेगवेगळ्या प्रकारे कसा होतो त्यातील अभिण्यक्ती विचारात घेऊन त्याची शैली ठरविण्यात येते लेखक कवीची कलानुभूती कालाकृतीला प्राप्त झालेले सौदर्यगुण लेखक कवीचे जीवनानुभूतीशी एकरूप झालेले तादात्म्याय यामध्ये संपूर्णतः शैलीचा संगम आढळतो. यानुसार वाङ्मय प्रकारनुसार शैली कालखंडानुसार शैली अभंग पळे ओव्यया मध्ययुगीन लावणी, पोवाडे, पेशवाई कालखड, अव्वल इंग्रजी मराठी गद्य-पद्य, यमुना पर्यटन, माझा प्रवास, निबंधमाला विशिष्ट लेखकांची लेखन शैली एकनाथ भारुडे मुक्तेश्वरांचे पंडितीकाव्य तसेच मोरोपंती आर्याभारत श्लोक केकावली पु.ल देशपांडे यांचे हास्यप्रधान लेख, दलित कवी लेखकांचे विद्रोही बंडखोरी दर्शविणारे विविधांगी लेखन या सर्वामधून संबंधित कवी लेखकांची अनुभूती आणि अभिव्यक्ती या दोघांचा एकाच वेळी पण वेगवेगळा विचार करावा लागतो. त्यानुसार त्यांच्या लेखनाचे अनुभवाचे आविष्कार अभिव्यक्तीचे विषयाचे वेगळेपण या विषयी संशोधन करतात तौलनिक साहित्याभ्यातही शैलीनुसार करता येतो.

फडके खांडेकर यांच्या कथा कांदबरीचा वाङ्मयीन रूपानुसार करता येते ग्रामीण प्रादेशिक कथाकांदबरीतील स्थळ प्रदेशानुसारही भाषिक स्वरूपाचा शोध घेऊन शैलीचे वाङ्मयीन साजिक मूल्यमापन करता येते. व्यक्तिगत शैलीचेही विशेष मांडताना दलित आत्मकथनामधून वेगळ्या जीवन विश्वातील संघर्ष जे जगले भोगले अनुभवले पाहिले ते तसेच लिहीत गेले. त्यातून लेखकाच्या जडणघडणीतून शैलीविशेषांचा सामाजिक आशय विद्रोही प्रवत्तीसही विचार करता आला पाहिजे. ग्रामीण दलित, स्त्रीवादी, आदीवासी साहित्याची जाणीवनिष्ठ शैली वाङ्मयीन शैलीचा आधार होणे अपरिहार्य आहे. प्रदेश, भाषा आणि साहित्य यांचे साहचर्य, अतूट आणि सार्वकालिक आहे. समाज व भाषा यांचे संबंध परस्पर पुरक असतात. त्यांचे प्रतिबिंब प्रादेशिक कांदबरीत पडलेले दिसते.

वेगवेगळ्या जाती-उपजाती यानुसार भाषेचे लप बदलते. म्हणून ग्रामीण साहित्याची भाषाला प्रदेश परिसर व पात्राच्या बाली प्रमाण सिद्ध होते. त्यातून लोकभाषेचे सौंदर्यही प्रकट होते. अशा साहित्यकृती नव्या चैतन्याने, लप समृद्धीने,

नव्या जीवनानुभवाने नावालपास येताना, 'किरवंत', 'झुलवा', 'घाशीराम कोतवाल' सारख्या नाट्यकृती प्रस्थापित नाट्यलेखनातील घाट शैली किंवा भाषा यापासून दूर राहून सादर होताना दिसतात. त्यांची नोंद घेणे आवश्यक अर्थ स्पष्ट करण्या करण्याकरीता प्रतिमांचा वापर झाला आहे. शिवाय एका वेगळ्या प्रतिकात्मक अनोळखी जगाची ओळख होते. (बेगम बर्वे, थँक्यू मिस्ट्य ग्लाड, नाटक) विज्ञान, कथा कादंबरीच्या लेखन संकल्पना बाबतीतही असेच म्हणता येते. साधारणपणे या छोट्या लेखात वाङ्मय शैली शास्त्र संशोधनाची अभ्यास क्षेत्रे अतिशय थोडक्यात, मोजकं व संक्षिप्त स्वरूपात, केवळ नोंदी म्हणूनच सादर करण्यात आला आहेत.

★★★

# लोकसाहित्याचे संशोधन: काही विचार

प्रा. अजय देशपांडे

लोकसाहित्य म्हणजे लोकांचे साहित्य, प्रत्यक्ष जगण्यातून उगवलेले साहित्य. समूहाच्या प्रतिभेतून प्रस्फुटीत झालेले साहित्य. त्यामुळे लोकसाहित्याचे संशोधन आणि समीक्षा पारंपरिक संशोधनाच्या व समीक्षेच्या पद्धतीने करता येणे शक्य नाही. प्रस्तुत निबंधात लोकसाहित्याच्या संशोधनाच्या संदर्भात व समीक्षेसंदर्भात काही सूत्रे आणि काही विचार नव्याने मांडावयाचे आहेत.

लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाच्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाचा प्रातिभ आविष्कार होय. हा प्रातिभ आविष्कार समूहाचा असतो. "...... लोकवाङ्मय हे कुणा पंडिताचे नाही, तत्त्वचिंतकाचे नाही, विद्वानाचे नाही. ते सामान्य माणसाचे आहे. जो साधाभोळा आहे पण अतिशय जिवंत आणि चळवळ्या आहे. ज्याच्याजवळ एक उपजत शहाणपण आहे, ज्याचा माणुसकीवर, माणसाने मानलेल्या मूल्यांवर विश्वास आहे आणि नैसर्गिक जगण्यासाठी लागणारा सगळा गोड चिवटपणा ज्याच्या अंगी आहे, असा माणूस लोकवाङ्मयाचा निर्माता आहे." (अरुणा ढेरे 'आठंवणीतले आंगण' पद्मगंधा प्रकाशन, पुणे १९९९, पृष्ठ ११५) लोकसाहित्याचा प्रातिभ आविष्कार जगण्यातून स्फुरलेला असतो. लोकजीवनाच्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाचे काळानुरूप त्यावर संस्कार व परिणाम होत असतात. तेव्हा लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे वेगवेगळ्या लोकसाहित्य प्रकारांचे संकलन, वर्गीकरण, आस्वादन एवढाच मर्यादित विषय नाही तर मानव्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, धर्मशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, संस्कृती, दैवतशास्त्र, प्रदेश, पर्यावरण, भाषा यांच्या साह्याने लोक जीवनाचे नानाविध पैलू आणि लोकाविष्काराचे नवे अन्वयार्थ शोधणे होय. लोकसाहित्याचे संशोधन म्हणजे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाच्या संदर्भात मानवाच्या जगण्याचा आणि त्याच्या कलाविष्कारांचा अभ्यास होय. या मौखिक आविष्करणांचा अन्वयार्थ लोकसमूहाच्या प्रत्यक्ष जगण्याच्या शोधातून लावावा लागतो. तेथे शैलीशास्त्राचे, साहित्यशास्त्राचे, तौलनिक दर्शनाचे सिद्धांत लावण्याअगोदर मानवाच्या प्रत्यक्ष जगण्याच्या संदर्भांतील लोकजीवनाचे रूपस्वरूप व अंतरंग शोधावे लागतात. लोकसाहित्य लोकसमूहाच्या प्रत्यक्ष जगण्याच्या तळामुळातून

अंकुरित झालेले असते. हे भान लोकसाहित्याचे संकलन, संशोधन आणि समीक्षा करीत असताना सतत बाळगावे लागते. ''इतिहास आणि संस्कृती असलेल्या लोकसमूहाची साहित्य ही एक अभिव्यती आहे आणि साहित्यकृतीतून याच लोकसमूहाच्या विविध अवस्थांचे, अवस्थांतरांचे चित्रण होत असते. त्यामुळे साहित्यकृतींचे आकलन करून करून घेताना वाचकांना, समीक्षकांना, त्या भाषकांच्या इतिहासाचे व संस्कृतीचे भान असणे आवश्यक ठरते. किंबहुना साहित्य कृतींच्या समग्र आणि यथार्थ आकलनाच्या दृष्टिने साहित्याची सांस्कृतिक समीक्षा हा व्यूह इतर कोणत्याही विचार व्यूहांहून अधिक उपयुक्त ठरतो'' (वसंत आबाजी डहाके 'मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, २००५ पृष्ठ ७). हा विचार लोकसाहित्याचे संशोधन आणि समीक्षेच्या संदर्भांत उपयुक्त ठरणारा आहे. लोकसाहित्य ही लोकप्रतिभेची सामूहिक निर्मिती असते. लोकसाहित्यात विशिष्ट लोकसमूहाच्या जीवनाचे आणि संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले असते. सहाजिकच संस्कृतीचा अभ्यास केल्याशिवाय लोकसाहित्याचे संशोधन करता येणार नाही. लोकसाहित्याची निर्मिती उत्स्फूर्तपणे होत असते, या मौखिक साहित्याची साचेबंद अशी संहिता नसतेच. म्हणून विशिष्ट लोकसमूहाच्या लोकसाहित्याचे संकलन, संशोधन करीत असताना व त्याची समीक्षा करीत असताना त्या लोकसाहित्य प्रकाराच्या निर्मितीमागे उभ्या असणाऱ्या लोकमाणसाचा, त्यांच्या विचारपद्धतींचा अभ्यास करावा लागतो.

लोकसाहित्याचे संशोधन करीत असताना 'लोक' या शब्दाच्या व्यापकतेची, व्यामिश्रतेची, परंपरेची, सांस्कृतिक पार्श्वभूमीची गंभीर जाण असणे आवश्यक ठरते. 'संतसाहित्य ही संज्ञा जशी 'संतसंस्कृती' चे द्योतक घडविण्यासाठी योजिलेली आहे, त्याच प्रमाणे 'लोकसाहित्य' ही संज्ञाही लोकसंस्कृतीचे द्योतक घडविण्यासाठीच वापरलेली आहे. आज आपण 'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील 'फोकलोअर' (त्रश्नेर्ज्ञीश) या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय म्हणून वापरतो. वास्तविक 'फोकलोअर' याचा अर्थ लोकविद्या, लोकविषयक आणि लोकप्रचलित बाबींच्या अभ्यासाचे शास्त्र असा होईल. साहित्य हा शब्द मराठीत 'ललित वाङ्मय' या अर्थाने प्रतिष्ठित झालेला असल्याने 'लोकसाहित्य' हा शब्दही 'लोकनिर्मितीत ललित वाङ्मय' असा अर्थ सुचविणार हे उघड आहे'... 'वास्तविक 'फोकलोअर' चा 'लोकविद्या' हा पर्याय अधिक अन्वर्थक आहे'... 'लोक' हा शब्द इंग्रजी 'फोक'(त्रेश्नज्ञ) चा पर्याय आहे..... पण मराठीतील 'लोक' हा

शब्द इंग्रजी 'फोक' पेक्षा अधिक व्यापक आहे. त्याच्यामागे वेदकालापासूनचं या परंपरेने लाभलेली व्यापक आशयाची बैठक आहे.' लोकसाहित्यातील 'लोक' ही संकल्पना संस्कृती, परंपरा, मानवशास्त्र, समाजशास्त्र, मानस शास्त्र आणि इतिहास यांच्याशी अनुबंध राखणारी आहे. 'समान सौंदर्यभावना, भाषा, नीति कल्पना, तत्त्वज्ञान या तत्त्वांनी एकत्र असलेला 'समूह' म्हणजे लोकसाहित्यातील 'लोक' होय. विशिष्ट परंपरा, रूढी, आचरणाच्या विशिष्ट अशा समान पद्धती, समान भाषा, समूहनिष्ठा, विशिष्ट संस्कृती आणि जीवन प्रणाली, असणारा समूह म्हणजे लोक. 'लोकशाही' शब्दातील 'लोक'पदाला जवळचा असा आशय व्यक्त करणारा प्रस्तुत लोक हा शब्द आहे. तेव्हा लोकसाहित्याचे संशोधन करताना आणि लोकसाहित्याची समीक्षा करताना संस्कृतीशी नाळसंबंध असणाऱ्या 'लोक' या संकल्पनेच्या आशयघनतेचे आणि व्यामिश्रतेचे भान ठेवावे लागते. इतिहास, भूगोल, पुरातत्त्वशास्त्र, मानवववंशशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, दैवतकथाशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, संगीत, संस्कृती, स्वरशास्त्र, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र या शास्त्रांचा, विद्याशाखांचा प्रसंगपरत्वे उपयोग केल्याशिवाय संकलन केलेल्या लोकसाहित्याचे आस्वादन, वर्गीकरण, संशोधन होऊ शकत नाही, तसेच समीक्षाही होऊ शकत नाही.

लोकसाहित्याला मौखिक परंपरा आहे. लोकाविष्कारांतील प्रत्येक 'शब्दाला' अंगभूत सामर्थ्य लाभलेले असते. लोकसाहित्यातील 'शब्दा'त नाद, उच्चार, हस्तपल्लवी, नेत्रपल्लवी, चेहऱ्यावरील भाव, शरीराच्या हालचाली यांच्या माध्यमातून प्रभावीपणे लोकभावना अभिव्यक्त झालेली असते. लोकसाहित्यातील शब्दात स्वरशास्त्र, नाट्याभिनय, नृत्य, अर्थलाघव, संगीतविचार आणि भावना या साऱ्यांचे साहचर्य असते, तेव्हा लोकसाहित्याचे संशोधन करताना आणि लोकसाहित्याची समीक्षा करताना त्यातील शब्दसामर्थ्यांची सजग जाण ठेवावी लागते. ''लोकसाहित्यातील शब्दसंकेत, मुद्रासंकेत, अभिनयसंकेत, आविष्कारसंकेत हे परंपरेने स्वीकारलेले असतात. या संकेतामागे कोणते तत्त्वज्ञान, सौंदर्यतत्त्व, नीतितत्त्व, अनुस्यूत असते. याचा अन्वयार्थ समीक्षकांने लावायचा असतो. हे मत लोकसाहित्याच्या संशोधनाच्या संदर्भातही उपयुक्त आहे. लोकसाहित्यातील शब्द मुद्राविभ्रम, नृत्य, संगीत, वाद्यवादन आणि देहबोली यांच्या एकत्रित आविष्कारातून प्रस्फुटित झालेला असतो, त्यामुळे 'शब्द' या संकल्पनेचे लोकसाहित्यातील स्वरूप अधिक व्यापक आणि आशयघन असते.

लोकसाहित्यातील 'शब्दकृती' या लिहिलेल्या नसतात, त्या मौखिक परंपरेने मनामनात जतन केलेल्या असतात, सहाजिकच ह्या शब्दकृती लवचीक असतात. व्यक्ती, काळ, प्रसंग परिस्थितीनुसार त्यात थोडेफार बदल घडत असतात तसेच ते सांस्कृतिक अभिसरणाचे आणि अभिरुचीच्या जिवंतपणाचे द्योतक असतात. लोकसाहित्यातील 'शब्दकृती' चे संशोधन करताना आणि समीक्षा करताना तिच्या लवचिकतेचे स्वरूप, सांस्कृतिक अभिसरणाची आणि अभिरुचीतील स्थितिगतीची प्रक्रिया गंभीरपणे समजून घ्यावी लागते. लोकप्रज्ञेचे उस्फुर्त आविष्कार लोक साहित्यातून प्रस्फुटित झालेले असतात, लोकसाहित्य प्रकाराच्या निर्मितीचे ताणेबाणे लोकांच्या प्रत्यक्ष जगण्याशी जुळलेले असतात. सांस्कृतिक अभिसरणाच्या प्रक्रियेमुळे भाषा, जीवन, विचार, जाणिवा, भावना, अभिरुची, सौंदर्यभावना या साऱ्यांमध्येच बदल होतात. या सांस्कृतिक, सामाजिक अभिसरणाचे भान लोकसाहित्याचे संशोधन करताना आणि समीक्षा करताना देखील ठेवावे लागते.

लोकसाहित्यातील प्रत्येक शब्दकृतीच्या निर्मितीमागे विशिष्ट असे प्रयोजन असते. या मौखिक साहित्याच्या निर्मितीची प्रयोजने जगण्यातून निर्माण झालेली असतात. लोकसाहित्याच्या विविध प्रकारांच्या निर्मितीची विशिष्ट प्रक्रिया असते. लोकसाहित्य निर्मितीची प्रक्रिया, निर्मिती प्रेरणा, लोकसाहित्याचे प्रयोजन यांचा निर्मितीकत्सक अभ्यास लोकसाहित्याचे संशोधन करताना अत्यावश्यक ठरतो.

लोकसाहित्याची निश्चित अशी अक्षरसंहिता नसते, पण लोकसाहित्य अ-क्षर असते, समूहमनाची निर्मिती पिढ्यान्‌पिढ्या समूहानेच मन, मेंदू आणि जिव्हा-ओठांवर जतन केलेली असते. लोकसाहित्याच्या या मौखिक शब्दसंहितेवर कुण्या एकाची मालकी नसते. लोकसाहित्याचे शब्दधन सर्वकाळातल्या सर्व पिढ्यांचे असते. स्वाभाविकच लोकसमूहाच्या या लोकसंहितेमध्ये प्रसंग, काळ, परिस्थिती, प्रदेश, भाषा, अभिरुची यासापेक्ष बदल होत असतो. महत्त्वाचे असे की जीवन आणि संस्कृती या दोहोंमधील परिवर्तनशील जिवंततेचे नाळसंबंध लोकसाहित्याशी असतात. जीवनाची परिवर्तनशील संस्कृती हीच लोकसाहित्याच्या अंतरंगातून प्रवाहित होत असते. परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्याच्या अ-क्षर संहितेतील परिवर्तनाची प्रक्रिया समजून घेतल्याशिवाय लोकसाहित्याचे संशोधन करता येत नाही.

लोकसाहित्यातील मूळ मौखिक संहितेचा गाभा लक्षात घेऊन काळानुसार, प्रदेशनिहाय, भाषानुरूप अनेक मौखिक अक्षरसंहितांची तौलनिक चिकित्सा

करता येणे शक्य आहे. लोकसाहित्याच्या संशोधन कार्यात अशी तुलना महत्त्वाची ठरते. लोकसाहित्यातील शब्द, भाषा, आशय, सौंदर्य या साऱ्या बाबींचे विशिष्ट काळाशी सुसंगत असे नाते असते. वर्तमान काळानुरूप परिवर्तन घडून येणाऱ्या जगण्याशी अनुबंध जुळलेले असल्याने लोकसाहित्यातील मौखिक शब्दसंहितांमध्ये भाषेच्या, संस्कृतीच्या आणि मानवाच्या इतिहासाचे प्रतिबिंब साकळलेले असते. या प्रतिबिंबाची साक्षेपी चिकित्सा लोकसाहित्याच्या संशोधनात आणि समीक्षेत अंतर्भूत असते. निरंतर प्रवाही असणाऱ्या मानवी जीवनाशी जैविक नाते असणारे लोकसाहित्य सृष्टी, अंतराळ, आकाश, भूमी, पाऊस, निसर्ग, पंचमहातत्त्वे या साऱ्यांशी असते. माणसांचे निसर्गीकरण आणि निसर्गतत्त्वांचे व्यक्तिकरण लोकसाहित्यामध्ये नित्य घडत असते. लोकसाहित्य भूमी, माणूस, माती, सृजन, जगणे, भावभावना, स्त्रीतत्त्व, सौंदर्य, पुरुषत्व, शौर्य, माणुसकी, सुख, दुःख, भय, चिंता, शोषण, कौतूक, श्रम, कामप्रेरणा, शृंगार, मैथून, आनंद, विजय, पराभव, सण, उत्सव, विधी, मृत्यू, ईश्वरसंकल्पना आदिंसह समग्र मानवी जीवनाशी एवढेच नव्हे चेतनअचेतन सृष्टी, खगोल विश्वासह संपूर्ण पृथ्वीशी जैविक अनुबंध राखणारे असते. लोकसाहित्याचे असे व्यापक आणि व्यामिश्र रूप स्वरूप संशोधन व्यवहाराने तेवढेच व्यापक आणि व्यामिश्र होऊन उत्कट जिज्ञासेने कवेत घेण्याची गरज आहे. लोकसाहित्यात लोकभाषेला म्हणजे बोलीला अनन्यसाधारण महत्त्व असते. लोकजीवनाचे सारे रूपस्वरूप बोलीमध्ये अवतरले असते. लोकजीवनातील ल लोकधारणा, लोकसमज, स्थानविशिष्ट संदर्भ लोकसाहित्याचे संशोधन करताना समजून घेणे आवश्यक असते. तसेच लोकभाषेतील म्हणजे बोलीतील प्रतिमा, प्रतिके, अलंकरण देखील समजून घ्यावे लागतात. लोकजीवनातील मिथकांची निर्मिती, त्यांचे रूपस्वरूप आदिंचे सूक्ष्म विश्लेषण केल्याशिवाय लोकसाहित्याच्या संशोधनाला आणि समीक्षेलाही पूर्णत्व येऊ शकत नाही.

★★★

# 'लोकसाहित्य संशोधन'

प्रा.युवराज देवबा भामरे

प्रस्तुत लेखात लोकसाहित्य संशोधनाचा पारंपरिक पद्धतीने आणि त्याचबरोबर काही नवे दृष्टिकोन अंगीकारून लोकसाहित्याचा अभ्यास कसा करता येईल. तसेच लोकसाहित्याचे संशोधन आणि संकलित सामग्रीचे विश्लेषण कशा प्रकारे करता येईल या गोष्टीचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १) अभ्यासकाची पूर्वतयारीः-

लोकसाहित्य या विषयात संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने काही एक पूर्वतयारी करणे गरजेचे आहे. उदा.प्रकाशित झालेले लोकसाहित्याचे संग्रह लोकसाहित्यासंबंधी प्रकाशित झालेले ग्रंथ, लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या कक्षा विविध सामाजिक शास्त्रांशी भिडलेल्या असल्याने इतिहास, पुराण, धर्मग्रंथ, मानवशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र यांची प्राथमिक स्वरूपात माहीती करून घेणे आवश्यक आहे.

## २) अभ्यासविषयीची निश्चितीः-

लोकसाहित्याचा अभ्यासविषय मोठा असल्याने संशोधकाने आधी आपला विषय आणि तत्संबंधीचा आपला दृष्टिकोन निश्चित करायला हवा, तसेच कोणकोणत्या विषयावर कोणात्या दृष्टीने आधीच्या अभ्यासकांनी संशोन केलेले आहे. याची माहीती अभ्यासकाने करून घ्यावी.

## क्षेत्रीय अभ्यास म्हणजे काय?

इंग्रजीमध्ये ज्याला ऋळशश्रव थीज्ञ असे म्हटले जाते तो म्हणजे क्षेत्रीय अभ्यास होय. क्षेत्रीय अभ्यासामध्ये निवडलेल्या विषयाशी निगडित असणाऱ्या अभ्यास सामग्रीचे संकलन करण्यासाठी खेड्यापाड्यात वाड्यावस्तीवर जावे लागते. ग्रामीण भागातील लोकांना भेटावा लागते. शहरापासून दूर राहणाऱ्या आदिवासींना, लोककलावंतांना भेटून त्यांच्याकडे असणारी लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, कोंडी, लोकनाट्याच्या संहिता प्राप्त करणे आवश्यक असते.

त्यांच्या मुलाखती घ्यावा लागतात. ध्वनिमुद्रित करून लिहून सामग्रीचे संकलन करावे लागते, अशा तऱ्हेने केला जाणारा अभ्यास म्हणजे क्षेत्रीय अभ्यास होय.

**क्षेत्रीय अभ्यासाची पूर्वतयारी:-**

लोकसाहित्याचे या अभ्यासपद्धतीमध्ये भटकंती करावी लागते. तसेच काही प्रमाणात त्यासाठी काही पूर्वतयारी देखील करणे आवश्यक असते. क्षेत्रीय अभ्यासाला निघण्यापूर्वी नोंदवही, छोट्या डायऱ्या, पुठ्ठीका, पेन, पेन्सिल या गोष्टी बरोबर घ्याव्या लागतील. या सामग्रीबरोबरच कॅमेरा देखील सोबत घ्यावा. लोककलावंताचे छायाचित्र काढण्यासाठी तसेच त्यांच्या कलेचे प्रयोग सुरू असताना छायाचित्रे घेतली की तो एक महत्त्वाचा पुरावा म्हणून आपल्याजवळ राहतो. कॅमेरातील छायाचित्रे पाहिल्यानंतर आपणास अनेक गोष्टी आठवू शकतात.

**३) अभ्यासकाची पूर्वतयारी:-**

मार्गदर्शकांशी चर्चा करून एकदा विषय निश्चित झाला की, त्या विषयाच्या अभ्यासकाची रूपरेषा तयार करणे आवश्यक असते. मार्गदर्शकाच्या सल्ल्याने रूपरेषा तयार करता येईल. त्यामध्ये संशोधक विषयाची व्याप्ती, मर्यादा सांगाव्यात त्या विषयावरून आतापर्यंत झालेल्या अभ्यासापेक्षा आपल्या विषयाचे स्वरूप कसे वेगळे आहे. आपण संशोधनाची कोणाती उद्दिष्टे निश्चित केली आहेत. अभ्यासात कोणत्या अभ्यास पद्धतीचा अवलंब करणार आहात इत्यादी गोष्टी स्पष्ट सांगाव्यात.

**पूर्वपरिचित प्रदेश अभ्यासासाठी निवडावा:-**

अभ्यासकाने शक्यतो पूर्वपरिचित प्रदेश अभ्यासासाठी निवडावा. ज्या प्रदेशाची आपणास नीट माहीती आहे. थोडाफार संपर्क आहे. त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांशी सहज संपर्क करणे पूर्वपरिचयामुळे सुलभ होते. अपरिचित माणसाबद्दल जी दुराव्याची भावना लोकांच्या मनात असते तो दुरावा येथे असणार नाही. ओळखीच्या लोकांमुळे अपेक्षित सहकार्य मिळत राहील आणि संकलनाच्या कामात अडचण येणार नाही.

**संकलन पत्र:-** वरील प्रकारची प्रारंभिक तयार झाल्यानंतर अभ्यासकाने एक संकलन विवरणपत्र तयार करावे, ज्याच्या आधाराने आपणास आवश्यक

असणारी सामग्री संकलित करणे सोयीचे होऊ शकेल. शक्यतो आपला अभ्यासविषय कोणता आहे. यावर त्या संकलनपत्राचे स्वरूप कसे असेल हे ठरविता येईल.

**मुलाखतः-**

मुलाखत हा सामग्री संकलनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. मुलाखत घेताना आपण मुलाखत देणाऱ्या व्यक्तीस कोणते प्रश्न विचारणार आहोत त्याची संक्षिप्त रूपरेषा आधी तयार करावी. मुलाखत घेताना संशोधकाने कमी बोलावे. मुलाखत देणाऱ्याला अधिक बोलते करावे. मुलाखत घेणाऱ्याने स्वतः आधी तयार करावी. तो विषय ती व्यक्ती या गोष्टीबाबत काही माहीती करून घ्यावी म्हणजे मुलाखत अधिक चांगली होते.

**संशोधन सहाय्यकाची निवडः-**

लोकसाहित्याचे संकलनासाठी तेथील प्रदेश अपरिचित असेल तर अभ्यासकाने एखाद्या संशोधन सहाय्यकाची नियुक्ती करावी. हा सहाय्यक कसा असावा याचाही विचार संशोधकाने करणे गरजेचे असते. ज्या प्रदेशात संकलनासाठी जायचे तेथील सहाय्यक घेतला तर अधिक मदत होऊ शकते. कामाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे. यावर संशोधन सहाय्यकाची निवड अवलंबून असते. सहाय्यकाची संख्या किती असावी हे देखील कामाच्या स्वरूपावरून ठरवावे. संशोधन सहाय्यकास स्थानिक संस्कृती, भाषा यांचा चांगला परिचय असावयाचा हवा. त्या परिसराचे प्रतिनिधीत्त्व करणारा आणि परिसराविषयी आत्मीयता असलेला सहाय्यक निवडणे अधिक योग्य होईल.

**संकलित सामग्रीचे वर्गीकरण व विश्लेषणः-**

संकलित सामग्रीचे अभ्यासाच्या उद्दिष्टानुसार वर्गीकरण करणे आणि उपलब्ध सामग्रीचे विश्लेषण करणे आवश्यक असते. वर्गीकरणाचे एकच एक निश्चित स्वरूप सांगणे कठीण आहे. कारण विषयानुसारच हे वर्गीकरण करावे लागते. प्रत्येक अभ्यासक आपल्या अभ्यासाच्या दृष्टिकोनानुसार वर्गीकरण करू शकतो. विश्लेषणात लोकसाहित्यविषयक सामग्रीचे स्वरूप विशद करणे, त्या सामग्रीची पार्श्वभूमी तपासणे, त्याच्या उगमाचा आणि विकासाचा तसेच प्रेरणा

आणि प्रवृत्तीचा विचार करणे अपेक्षित असते.

आधुनिक काळात लोकसाहित्याचे विश्लेषण करण्याच्या विविध पद्धती रूढ झालेल्या दिसून येतात. यामध्ये वर्णनात्मक, ऐतिहासिक, तुलनात्मक आणि संरचनात्मक ह्या प्रमुख पद्धती दिसून येतात. लोकसाहित्याचा अभ्यास करताना आणि विश्लेषण करताना उपरोक्त पद्धतीचा अवलंब करणे श्रेयस्कर ठरते अर्थात कोणत्या विश्लेषण पद्धतीचा अवलंब करावयाचा हे अभ्यासाच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते. उदा. वर्णनात्मक पद्धतीमध्ये लोकसाहित्याचे संकलन करणे, संकलनासाठी लागणाऱ्या विविध प्रश्नावल्या तयार करणे, प्रत्यक्ष अभ्यास परिसरामध्ये जाऊन व्यक्तीच्या मुलाखती घेणे, लोकसाहित्यविषयक संग्रहालयात भेट देणे, विविध प्रयोगरूप लोककलांचे प्रयोग पाहणे, प्रयोगाच्या तपशीलाची नोंद घेणे. प्रयोगाच्या अनुषंगाने संगीत, नृत्य, अभिनय, वेशभूषा उपयोगात आणलेली वाद्ये इत्यादी गोष्टीची माहीती संकलित करणे आणि त्या त्यात माहीतीचा उपयोग करून लोकसाहित्याविषयक सामुग्रीचे विश्लेषण करणे इत्यादी गोष्टींचा समावेश वर्णनात्मक अभ्यास पद्धतीमध्ये होतो.

अशा तऱ्हेने लोकसाहित्याचे संकलन करणे, क्षेत्रीय पातळीवरती जाऊन साऱ्या गोष्टी समजावून घेणे आणि संकलित सामग्रीचे विश्लेषण करणे इत्यादी सर्व गोष्टींचा समावेश लोकसाहित्याच्या अभ्यासात आणि संशोधनात समाविष्ट होतो.

★★★

# पंडिती काव्याचे संशोधन (विशेष संदर्भ मोरोपंत)

प्रा.अशोक देशमाने

**प्रस्तावना:-**

प्राचीन मराठी कवितेत संत काव्य, पंडिती काव्य आणि शाहिरी काव्य (संत, पंत, तंत) असे तीन प्रमुख प्रवाह दिसून येतात. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास आणि तुकाराम इत्यादी संतांनी ओवी आणि अभंगांद्वारे केलेल्या रचनेस संत काव्य असे म्हणता येईल. मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथ पंडित, सामराज, श्रीधर, नागेश, विठ्ठल, मोरोपंत आदी पंडितांच्या संस्कृत लिहिलेल्या, आख्यानपर रचनेस पंडिती काव्य म्हणून संबोधण्यास हरकत नाही. संत साहित्या आणि पंडिती काव्य या दोन प्रवाहांच्या मुळाशी संतांची निवृत्ती आणि पंडितांची संस्कृत गणवृत्तात लिहिलेल्या, आख्यानपर रचनेस पंडिती काव्य म्हणून संबोधण्यास हरकत नाही. संत साहित्य आणि पंडिती काव्य या दोन प्रवाहांच्या मुळाशी संतांची निवृत्ती आणि पंडितींची विद्वज्जन्य रसिकता हा मुलभूत फरक आहे. भक्ती, ज्ञान, वैराग्य यांच्या प्रतिपादनासाठी संतांनी भाष्य रूपाने गीता-भागवतादी ग्रंथ आधाराला घेतले तर पंडितांनी रामायण, महाभारत, भागवत, पुराणे, रघुवंश, कुमारसंभव, हनुमान्नाटक, शांकुतल यासारख्या सर्व प्रकारच्या लौकिक विषयांनी आणि रसांना स्थान देणाऱ्या महाकाव्यातून आणि नाटकांतून आपल्या आख्यानांचे विषय उचलले.

'मराठी भक्तीरस आणि संस्कृतातील कला विलास यांचा संगम म्हणजे पंडिती काव्य' पंडिती काव्य हे अभिजात संस्कृत काव्याचे पुनरूज्जीवन आहे असे अभ्यासकांना वाटते. संत काव्याप्रमाणे निवृत्तीपर आणि भक्ती, शांतरसाचा आविष्कार करणारे पंडित काव्य नाही, तर नवरसांचा जाणीवपूर्वक आविष्कार घडविण्याची त्यांची प्रेरणा आहे. 'मूळ आख्यानावर व प्रसंगावर म्हणजेच आर्ष सामग्रीवर कलापूर्ण संस्कार केल्यानंतर निर्माण झालेले विदग्ध काव्य म्हणजेच पंडिती काव्य होय.' १५ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंतच्या मराठी कवितेचे दालन विविध काव्य प्रकारांनी समृद्ध करण्याचे कार्य पंडितांनी केले, हे मान्य केले पाहिजे. मराठीला संस्कृताचा डौल, प्रौढी आणि संस्कृत तज्ञांची मान्यता मिळवून देणे हा पंडितांचा उद्देश होता. त्यामुळे महाकाव्य, खंडकाव्य,

लघुकाव्य, कथाकाव्य, स्तोत्र, चंपूकाव्य, असे विविध काव्य प्रकार मध्ययुगीन मराठी आले. संस्कृतातील अलंकारांचे वैभव, वृत्त रचना मराठीस प्राप्त करून देण्याचे श्रेय सर्वस्वी पंडितांचेच म्हटले पाहिजे. मध्ययुगीन कालखंडात मराठी काव्यनिर्मितीच्या रूपाने मराठी भाषेची सेवा करणाऱ्या पंडिती कवितेच्या संशोधनाकडे वर्तमानकालीन संशोधन फारसे आकर्षित होत नाहीत. मात्र आधुनिक साहित्य हे मध्ययुगीन साहित्याच्या पायावर उभे असल्याने मध्ययुगीन कवितेचे संशोधन होणे अत्यंत आवश्यक आहे. पंडित कवींपैकी अनेकांची कविता अजूनही दुर्लक्षित राहिली आहे. या क्षेत्रात अभ्यास, संशोधन करू इच्छिणाऱ्यांसाठी हा (सोदाहरण) लेखन प्रपंच.

**मोरोपंतांचे चरित्रः (इ.स.१७२९ ते १७९४)**

मोरोपंतांचा जन्म इ.स. १७२९ (शके १६५१) मध्ये पन्हाळगडावरील आहे. मोरोपंतांच्या पूर्वजांचे मूळ गाव सौंदळ पण त्यांच्या जन्मापूर्वीच त्यांचे वडील सौंदळ सोडून पन्हाळगडावर येऊन राहिले होते. वयाच्या २४ वर्षापर्यंत पन्हाळ्यास केशव शास्त्री व गणेशशास्त्री पाध्ये पंत बारामतीस बाबाजी नाईक यांच्याकडे पुराणिक म्हणून आश्रयास आले. पुराण सांगितल्यावर उरलेल्या वेळात कविता करणे हा पंताचा आवडता छंद होता. इ.स.१७५२ पासून १७९६ पर्यंत म्हणजे जवळ जवळ ४१ वर्षे पंतांनी अव्याहतपणे काव्य लेखन करून उदंड कविता लिहिल्या. शके १७१६ चैत्र शुद्ध १५ मंगळवारी सूर्योदयी श्रीरामभक्त हनुमंतांच्या जन्मोत्सवाच्या वेळी ते रामरूपी लीन झाले. स्वतः मोरोपंत हे मोठे रामभक्त होते.

**मोरोपंतांचे अध्ययनः-**

पंतांनी ज्ञानेश्वरांपासून राम जोशींपर्यंत सर्व मराठी संतांची व कवींची कविता काळजीपूर्वक वाचली होती. पूर्वीच्या मराठी कवींच्या कितीतरी कल्पना व रचनापद्धती पंतांनी उचलल्या आणि आपले काव्य सजवले. शांत, धर्मनिष्ठ, कुटुंबवत्सल, व्यवहार चतुर असे गृहस्थ, व्यासंगी अभ्यासक कवी असे पंतांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत.

**मोरोपंतांचे एकूण काव्य वाङ्मयः-**

अ) प्रदीर्घ काव्यः १) आर्याभारत २) मंत्रभागवत ३) मंत्ररामायण ४) कृष्णविजय ५) हरिवंश ६) ब्रम्होत्तर खंड

आ) भागवती प्रकरणेः भागवत पुराणातून घेतलेल्या कथांच्या आधारे लिहिलेली

काव्ये उदा.

१) नारादाभ्युदय २) प्रल्हादचरित्र

इ) भागवताखेरीज इतर पुराणांतील आधाराने लिहिलेली प्रकरणे उदा. १) भस्मासुराख्यान २) मदालसाचरित्र

उ) रामायण कथांवर आधारलेली काव्यः उदा.१) सीतागीत २) अहिल्योद्धार

ए) मंत्ररामायणाखेरीज इतर १०७ लहान रामायणे यांची निर्मिती

ओ) भारतातील १) सावित्रीकथेवरून सावित्रीगीत २)दुर्वासभिक्षा

क) संतवर्णनपर व पांडुरंग यांच्याविषयी स्फुट काव्ये उदा.ज्ञानदेव-नामदेव इ.

ख) देवतांच्या स्तुतीपर कविता अथवा स्तोत्रे उदा.यांत गणेश, देवी, दत्त, मारुती इ. देवतांची स्तुती

**पंतांच्या काव्य निर्मितीचा हेतू व प्रेरणाः-**

'वैयक्तिक समाधानासाठी भगवत चरित्र गायन' हा पंतांच्या काव्य लेखनाचा हेतू होता. म्हणूनच

हरि ज्यांचा कैवारी त्या पांडु सुतांसि वंदितो भावे
वाट चरित्र त्यांचे काही आपण तरावया गावें।

असे आपले काव्य लेखनाचे प्रयोजन पंतांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या काव्य लेखनावर पुराणिकाच्या भूमिकेचा बराच प्रभाव होता. 'ईश्वराची कीर्तन-स्मरणरूपी भक्ती करावी' ही प्रेरणा पंतांच्या काव्य रचनेमागे आहे. वाटे चरित्र त्यांचे काही आपण तरावया गावे ही त्यांची काव्य दृष्टी आहे. आपल्या काव्य लेखनाने रसिक कवी आणि भक्त प्रसन्न होतील असा पंतांचा दृढ विश्वास आहे. अशा रितीने काव्यरचनेकडे त्यांनी भक्तीचे साधन म्हणून पाहिले.

**मोरोपंतांचे पहिले काव्यलेखन (पहिली आर्या):**

पंढरपुरास रेवडीकर हरिदासांच्या कीर्तन समयी गर्दी झालेली असतांना जागा मिळेना म्हणून रचलेली

नित्य तुम्ही प्रभू पाशी पेढे बरफी नवा खवा खावा।
तरी म्यां एके दिवशी रेवढीचा स्वाद कां न चाखावा।।

ही आर्या मोरोपंतांची पहिली आर्या म्हणून प्रसिद्ध आहे. इ.स. १७५०-५१ च्या सुमारास १३ अध्यायांत विभागलेले ५०८ श्लोकांचे 'कुशलवोपाख्यान' हे पंतांचे पहिले काव्य समजले जाते. के त्यांनी जैमिनीय अश्वमेध कथेच्या आधारे लिहिले आहे. सीता त्याग सीताशोक यासारख्या करूणरम्य प्रसंगांनी हे

काव्य नटलेले आहे. बारामतीत एक फार जुने शंकराचे (विश्वेश्वराचे) देवालय आहे. ते पंतांचे कुळ परंपरागत दैवत होय. याच दैवताच्या स्तवनार्थ पंतांनी आपला 'ब्रह्मोत्तर खंड' हा ग्रंथ रचला. हा पंतांचा पहिला ग्रंथ होय.

**मोरोपंत एक राष्ट्रीय पुराणिकः**

मोरोपंत हे संसारी स्त्री-पुरुषांसाठी देवांच्या कथा कानी पडाव्या असे इच्छिणाऱ्या लोकांसाठी ग्रंथरचना करीत होते. ह्या कथा लोकांना ऐकवाव्या हा त्यांचा हेतू होता. त्यांचा नेहमीचा व्यवसाय पुराण सांगण्याचा असल्याने व्यासपीठावर बसल्यावर समोरच्या लहानथोर मंडळीमध्ये सर्वांना काय आवडेल, काय समजेल हे ध्यायात घेवून त्यांनी सर्व पुराण सांगितले. सनातन धर्माची तत्त्वे व्यवहारिक दृष्टांत घालून त्यांनी आपली सर्व रचना केलेली दिसते. व्याख्यानाला मोहकपणा तर यावाच परंतु त्याला कुणी नाव ठेवू नये अशा बेताने ते पुराण सांगत. आपल्या संपूर्ण जीवनकाळात त्यांचा उत्तमोत्तम प्राचीन ग्रंथांचा व्यासंग व अभ्यास कायम सुरु होता काही ग्रंथ त्यांनी स्वतः लिहिले होते. यामुळे त्यांच्या विद्वत्तेचे तेज विलक्षण होते. छंद साहित्यशास्त्रात ते अगदी निपुण होते. मोरोपंत म्हणजे विशाल बुद्धीचे, दांडग्या व्यवसायाचे, सकल शास्त्र पारंगत असे चतुर व चौरस राष्ट्रीय पुराणिक होते.

**मोरोपंतांचे संक्षेप चातुर्यः-**

व्यापक आणि विशाल अशा महाभारताला आर्याच्या फक्त १७ हजार चरणांत आकारबद्ध करण्यात मोरोपंतांचे संक्षेप विशेषत्त्वाने दिसते. त्यांचे हे कौशल्य, कवित्त्व शक्ती आणि संयम या गुणांमुळे ते मुक्तेश्वर आणि श्रीधर यांच्या महाभारतापेक्षा पंतांचे आर्याभारत अधिक उठून दिसते. कथा कथनात योग्य व आवश्यक असा संक्षेप करून मुळातील ऐस-पैस विषयांतरे व अस्ताव्यस्त वर्णने काढून टाकून मूळ कथेवर लक्ष केंद्रीत करून कथा प्रमाणबद्ध अशा आकारात मांडून दाखविण्यात त्यांच्या संयमांचा फार उपयोग झाला आहे.

व्यासकृत महाभारत लक्ष ग्रंथ प्रसिद्ध हा भारी।
आर्यावृत्ते रचितो, स्वल्पांतचि आणितो कथा सारी।।

या आर्यावरून त्यांचे संक्षेप चातुर्य व निवेदन पद्धती याची माहिती मिळते.

**शांतीचा संदेश देणारे मोरोपंतः**

मोरोपंतांनी आपल्या रचनेत शांतीचा संदेश दिला आहे. अनेक युद्ध

कथेतूनही ते शांतीचा संदेश देतात. तपश्चर्या करणारे मांडव्य मुनी हे शांतीचे प्रतीक कसे होते. याची मोरोपंतांनी विस्ताराने माहिती दिली आहे. तसेच महायुद्ध होऊ नये म्हणून श्रीकृष्ण किती आटोकाट प्रयत्न करतो हे त्यांचे वर्णन म्हणजे कृष्ण हा मोरोपंतांना शांतीदूत म्हणून कसा भावला आहे हे स्पष्ट होते.

साम, दाम, दंड, भेद या पारंपरिक नीतीत त्यांना साम (शांती), महत्त्वाचा वाटतो. युद्ध झाले तर किती अनर्थ होईल या कल्पनेने संजय मूर्च्छित पडतो. संजयला असलेली शांतीची ओढ मोरोपंतांनी नेमकेपणाने दर्शविली आहे. कृपाचार्यही दुर्योधनाला साम करण्याचा उपदेश करतात. 'धर्मासी सख्य कर' असे ते सांगतात. मोरोपंतांनी या सामाचा महिमा गाईला आहे. म्हणजेच त्यांना युद्ध आणि अराजकतेपेक्षा शांती जवळची वाटते.

**मोरोपंतांची उपरोधिक दृष्टीः-**

मोरोपंतांच्या उपरोधिक दृष्टीचा प्रत्यय त्यांच्या कथाकवितेत येतो. १७ व्या शतकातील संस्कृतीचे अधःपतन पाहून तुकाराम, रामदास हे अस्वस्थ झाले होते. त्याचप्रमाणे मोरोपंतही संस्कृतीचा वेगाने होणारा ऱ्हास असहाय्यपणे पहात होते. ती असहाय्यता त्यांच्या कवितेत उपरोधाच्या रूपाने अवतरली. महाभारताच्या रूपाने त्यांनी आपल्या उपरोधाला वाट मोकळी करून दिली. उदा.भीष्मपर्वात कौरव धर्मराजाचा उपरोध करतात. साम करावा म्हणून आलेल्या पांडवांना ते नपुंसक म्हणतात. कर्णाची सर्व वचने ऐकून शल्य 'पुराचा लोंढा येत नाही तो पँत वेताच्या झाडाचा शेंडा ताठ असतो' असा टोमणा मारतो. शांतीपर्वात धर्मराज संन्यास घेण्याची भाषा करतो त्यावर भीम त्याची निंदा करतो 'भुकेल्या माणसाने वाढलेले पान टाकावे किंवा कामुकाने कामिनीचा त्याग करावा तसे हे आहे.' असे उपरोधाने तो म्हणतो. या उपरोधाच्या रूपाने मोरोपंतांच्या कविकल्पना पाहण्यासारख्या आहे.

**तत्त्वबोध व नीतिबोधामुळे शृंगार पाशातून सुटलेली कविताः-**

तत्त्व बोधाच्या व नीतीबोधाच्या प्राबल्यामुळे मोरोपंतांची कविता शृंगारापासून दूर राहिली. यात पराशर-मत्स्यगंधा, कच-देवयानी, दुष्यंत-शकुंतला, शंतनू-सत्यवती, अंबा-शल्व अशा बऱ्याच पारंपरिक प्रेमकथा आहेत. पण मोरोपंतांनी त्यातील प्रणय व शृंगार कोठेही चवीने रंगवला नाही. तसेच कामभावनांचे चित्रणही कटाक्षाने टाळले आहे. नायिकांचे शारीरिक सौंदर्याचे वर्णनही विस्ताराने

केले नाही. मोरोपंतांची कविता प्रस्थापित पंत कवितेपेक्षा वेगळे वळण घेत होती हे आपल्याला जाणवते.

**भाषा व व्याकरण शुद्धतेचा आदर्श घालून देणारे मोरोपंतः**

पंतांनी मराठी कवितेला शुद्ध भाषेचे लेणे बहाल केले. पंतांची भाषा त्यांच्यापूर्वी व नंतर होऊन गेलेल्या कवींच्या तुलनेने इतकी निरपेक्ष शुद्ध कशी, हा विस्मय जनक विचार आहे. त्यांचे संस्कृतवर खूप प्रभूत्त्व होते. शुद्ध भाषा म्हणजे काय हे त्यांनीच दाखवून दिले. मराठी कविता संस्कृत कवितेचा खराखुरा शृंगार करू शकते हे त्यांनीच दाखवून दिले. मराठी काव्यांमध्ये अभिजात काव्याचे जे युग निर्माण झाले त्याचा कळस यथार्थपणे मोरोपंत हेच होत.

**आर्यापती मोरोपंतः–**

मोरोपंतांनी आर्यावृत्तात विपुल असे लेखन केलेले असल्याने त्यांना आर्यापती असे म्हणतात. आर्या हा मराठी पद्यरचना प्रकार आहे. आर्या ही प्राकृत गाथेवरून विकास पावली आहे. पुढे त्या गाथेचा गीताप्रकार आर्या या नावाने महाराष्ट्रात फार लोकप्रिय झाला या गाथेचे सुसंस्कृतरूप म्हणजे मूळ आर्या होय.

गाथेतील अंत्य चरणातील दिडकेपणा, तीन मात्रांची कूस भरून काढून घालविल्यावर त्याची गीती बनली तीच मराठीतील मोरोपंतांची आर्या होय. पंतकाली व पंतोत्तर १००-१५० वर्षे सर्व मराठी किर्तनकार आर्येचा मोठ्या प्रमाणात उपयोग करीत. ज्या वृत्ताला प्रायः आपण 'आर्यवृत्त' म्हणतो ते खरे गीतीवृत्त आहे. आर्यावृत्तात प्रत्येक चरणात दोन यमके असतात व दोन्ही चरण शेवटी सयमक नसतात. पंत भक्त परशुराम तात्यांनी या वृत्ताचे लक्षण दिले आहे. ते असे,

पहिल्या चरणी बारा मात्रा दुसऱ्यांत सात आणि तेरा।
उभय दळी हे रीतीजीस तिला म्हणती सुज्ञ आर्यागीती।।

पंतांचे आर्याकाव्य विराट सागरासारखे आहे म्हणून त्यांना आर्यापती असे म्हणतात. महाभारत, रामायण, भागवत हे त्यांच्या काव्याचे प्रमुख आधार असून यावर त्यांनी विपुल आर्यालेखन केले.

**मोरोपंतांच्या काव्याचे गुणदोषः**

पंतांचे काव्य अनेक काव्यगुणांचे आगर आहे. संयम हा पंतांच्या काव्याचा फार मोठा गुण समजला जातो. पंतांचे भाषाप्रभुत्त्व असामान्य असले

तरी त्यांची कविता त्यांनी म्हटल्याप्रमाणे 'संस्कृतप्राकृतमिश्रित' अशी कथाच ठरते. सामान्य मराठी वाचकाला मोरोपंतांची आर्या काही प्रमाणात क्लिष्ट व दुर्बोध वाटते तरीही वामन, सामराज, नागेश वगैरे पंडित कवींच्या तुलनेने मोरोपंतांनी रचना अशुद्धतेच्या दोषांपासून सर्वस्वी अलिप्त आहे. त्यांचे संस्कृतवरील प्रभूत्त्व खूप दांडगे आहे. शुद्ध भाषा म्हणजे काय हे त्यांनीच दाखवून दिले. यमकानुप्रासांची पुनरुक्ती, श्रुतिकदुता, अप्रयोजक उपमादृष्टांत आणि रसहानिकारक शब्द यांची योजना व त्यामुळे होणारी औचित्यहानी इ. दोष टीकाकारांनी दाखविले आहेत. हे सर्व दोष संस्कृतचा उपयोग करण्याचाच अतिरिक्त हव्यास आणि यमकांचा मोह यांच्यामुळे उत्पन्न झाल्याचे दिसून येते. 'यमकासक्ती हा पंतांच्या कवितेस ग्रासून टाकणारा असा एक सर्वव्यापी दोष आहे.'

यमक जुळवणी यासाठी मोरोपंतांनी केलेला खटाटोप यापेक्षा त्यांनी जर रससाधनार्थ पाव हिश्याने जरी प्रयत्न केला असता तर त्यांचे काव्य आज सामान्य वाचकास प्रिय झाले असते. थोडेफार दोष सोडले तरी त्यांची कविता उच्च दर्जाची अशीच ठरते असे पंत भक्तांचे म्हणणे आहे. पंतांचे शिष्यतुल्य स्नेही रामजोशी, मैराळबोवा चातुर्मासे, विठोबा ताहराबादकर इ. नी पंतांच्या समक्षच त्यांच्या आर्या कीर्तनात म्हणण्याचा प्रघात पाडला. राम बडवे यांनी पंतांनी लिहिलेल्या आर्याबद्ध पत्रातच सुश्लोक वामनाचा या आर्येत ओवी ज्ञानेशांची किंवा आर्या मयुरपंतांची असे मत व्यक्त केले आहे. आपल्या आर्य रचनेने पंतांनी मराठी भाषेच्या सामर्थ्यात व ऐश्वर्यात बहूमोल भर टाकली. त्यांच्या आर्येमुळेच इंग्रजी आमदानीतही पुराणांतील कथांचा प्रसार लोकांमध्ये होत राहीला. शब्द, विचार, कल्पना, या बाबतीत समृद्ध अशा आर्या मोरोपंतांनी निर्माण केल्या. शुद्ध आणि संपन्न भाषासरणीमुळे मोरोपंतांनीच मराठी सन्मान्य भाषांच्या पक्तींत मानाचे स्थान मिळवून दिले यात शंका नाही.

★★★

# संत-साहित्य संशोधन

डॉ.केतकी मोडक

पीएच.डी.च्या निमित्ताने होणाऱ्या संशोधनाचे साधारणतः स्वरूप हे विषयाची निवड, आधीच्या संशोधकांनी केलेल्या कामाचा धांडोळा, त्यातील महत्त्वाच्या विचारांचे संकलन, त्याची स्वतःच्या शब्दात मांडणी आणि काढलेला काही एक निष्कर्ष असे असते. कोणत्यातरी व्यावसायिक गरजेची पूर्ती करण्याच्या निमित्ताने होणाऱ्या संशोधन कार्याकडून फारशी अपेक्षा बाळगता येत नाही. संशोधनाची चौकट सांभाळून राखण्यात सारा शक्ती-व्यय होताना दिसतो. अशा प्रकारच्या संशोधनात बऱ्याचदा संशोधनाची शिस्त आढळते पण संशोधानाचा आत्मा हरविल्यासारखा होतो.

संशोधनाची शिस्त बाळगत एकीकडे संशोधनचा आत्माही सांभाळायचा ही खरेतर तारेवरची कसरतच असते. नेमून दिलेल्या कालावधित, शासन, विद्यापीठ किंवा इतर प्रायोजकर संस्थेच्या प्रशासकीय नियम आणि अटी यांचे पालन करत, त्यांना आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करत संशोधन करणे हे खरेच मोठे जिकीरीचे काम आहे. खरा संशोधक अशा तऱ्हेचा जाचक नियमांचे पालन करण्यात स्वतःची शक्ती खर्च करू इच्छिल का? असा वेळेचा अपव्यय करणे त्याला परवडण्यासारखे असत नाही.

ज्याच्या डोक्यात, मनात अंतर्बाह्य संशोध्य विषयच आहे. दिवस-रात्र जो त्याच विचारात गढलेला आहे. संशोध्य विषयाच्या ध्यासाने ज्याचे जीवनच त्या विषयाशी एकरूप झाले आहे. असा सच्चा संशोधक अशा बेतलेल्या संशोधन कार्यावर कदापीही समाधानी होऊ शकणार नाही हे उघड आहे. तेव्हा आता येथे ही गोष्ट स्पष्ट व्हावी की आपण ज्या संशोधनाविषयी आता बोलणार आहोत ते पीएच.डीसाठीच्या संशोधनाविषयी असणार नाही.

संशोधक जेव्हा स्वतः एखाद्या प्रश्नाने विचारात पडतो. त्या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या विचाराने त्याचे विचारविश्व व्यापून जाते असा संशोधक कोणत्याही बाह्य प्रेरणेशिवाय संशोधन करावयास प्रवृत्त होतो. तो अंतःप्रेरणेमुळे स्वतःहून संशोधन करावयास लागतो.

येथे प्रामुख्याने साहित्य-संशोधन विचारार्थ घेतले आहे. हे नमूद केले

पाहिजे. साहित्य-संशोधन हे सर्वसाधारणपणे विद्वत संशोधन (अलरवशाळल ठशीशरीलह) या प्रकारात मोडते. त्याची भिस्त प्रामुख्याने ग्रंथालयावर असते. कारण अशा प्रकारच्या संशोधनामध्ये संशोधकाला छापील मजकूरावर मोठ्या प्रमाणात विसंबून रहावे लागते.

जसे कोणत्याही संशोधनात तथ्य-संकलनाचे काम महत्त्वाचे असते, तसेच साहित्य-संशोधनातही तथ्य संकलनास विशेष महत्त्व आहे. जेव्हा संशोधन साहित्याचा काळ मध्ययुगीन किंवा प्राचीन असतो. तेव्हा तर अशा तथ्य-संकलनाचे काम विशेषच बिकट होते. अशा साहित्याच्या अर्वाचीनकालीन प्रकाशित आवृत्त्याही निघालेल्या असतात. पण केवळ तेवढ्या प्रकाशित साहित्यावर विसंबून राहणे पुरेसे ठरू शकत नाही. कारण प्रकाशनासाठी त्यावर संस्करण करण्याच्या प्रयत्नात, त्या मुळातील साहित्यामध्ये संपादक-प्रकाशकांच्या दृष्टिकोनाचा कळत-नकळत प्रभाव पडून कधी-कधी तर सत्यापलाप होण्याचाही धोका असतो. अशावेळी खऱ्या संशोधकाने मुळापर्यंत जाऊन शोध घेणे केव्हाही चांगले. अगदी मूळ हस्तलिखित प्रतीपर्यंत पोहोचणे कधी कधी सर्वथा अशक्य असते अशा वेळी संशोधकाने निदान त्याच्या प्रकाशित सर्व आवृत्त्या, सर्व पाठ-भेद तपासणे गरजेचे ठरते. कधी-कधी एखाद्याही शब्दाचा पाठ-भेद संशोधनाची दिशाच बदलावयालाही कारणीभूत ठरू शकतो. उदा.मुक्ताबाईकृत ताटीचे अभंग यातील 'शब्द-शस्त्रे' ह्या पाठ-भेदाऐवजी 'शब्द-शास्त्रे' हा पाठ-भेद स्वीकारला तर ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळा पैलूच खुला होतो. ताटीच्या अभंगाचे महत्त्व एका वेगळ्या उंचीवर जाऊन पोहचते.

संत-साहित्य हे साहित्यातील एक महत्त्वाचे दालन. आज साहित्याचा केवळ साहित्यिक अंगाने विचार केला जात नाही, तर त्या साहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भही लक्षात घेणे गरजेचे मानले जाते आणि ते योग्यही आहे. कारण व्यक्तीचे विचार कितीही स्वतंत्र असले तरी ती व्यक्ती ज्या स्थळ-काळ परिस्थितीत जन्मते, जगते, वाढते त्या साऱ्याचा तिच्या व्यक्तिमत्त्वावर, विचार-सरणीवर परिणाम होत असतो. व्यक्तीच्या विचारांचा आढावा घेताना त्या व्यक्तिचा काळ- ती परिस्थिती समजावून घेणे आवश्यक असते. ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून या साऱ्याचा विचार करावा लागतो. तरच ते संशोधन तथ्याच्या, वास्तवाच्या जवळ जाऊ शकते. संत-साहित्याबाबतही ते खरे आहे. पण संत-साहित्याचा विचार करताना आणखी एका आयामाचा, एका प्रतलाचा विचार करावा लागतो,

जो विचार इतर साहित्यांत आवश्यक नसतो. संत हे सामान्य माणसाप्रमाणे केवळ शरीर, प्राण, मन या तीनच पातळ्यांमध्ये जीवन जगत नसतात. आत्मिक जीवन हा त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचा भाग असतो. त्या पातळीवरून स्फुरणारे अभंग, साहित्य हे अर्थातच वेगळ्या प्रतालावरचे असते. केवळ शरीर पातळीवर जगणाऱ्या प्राण्यांना ज्याप्रमाणे मानवाच्या मनोव्यापारांची कल्पना करता येणे अशक्य आहे. तसेच केवळ सामान्य मानवी पातळीवर जीवन जगणाऱ्या अभ्यासकांना अध्यात्माचा काहीएक स्पर्श असल्याखेरीज संतांच्या साहित्याचे मर्म खऱ्या अर्थाने कळणे दुरापास्त आहे. केवळ बौद्धिक पातळीवरून चिकित्सा करणे येथे पुरेसे ठरत नाही हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

संत-साहित्यामध्ये मांडलेला विचार जसा काल-संबद्ध असतो तसाच तो कालातीतही असतो. त्यामध्ये स्थळ-काळ-परिस्थितीची चौकट भेदून जाणारे असे काही असते, जे शाश्वत असते. एकाच वेळी ते जेवढे सनातन असते. तेवढेच ते अद्यतन असते. उदाहरणादाखल संत मुक्ताबाईच्या अभंगातील 'विश्वपट ब्रह्मदोरा' हे शब्द पहा. यातील विचार जेवढा सनातन तेवढाच अद्यतन आहे. त्याची मीमांसा केवळ स्थळ-काळ सबंध राहून करणे योग्य ठरत नाही. तत्कालीनतेच्या घरट्यात क्षणभरच विसावून अलौकिकाच्या अमर्याद आकाशात विहरणारे हे संत-साहित्य तत्कालीन समाजाच्या रूढ चौकटीत बंदिस्त करता येत नाही. अन्यथा अवकाशाच्या खोलीचे माप सहा इंची पट्टीने घ्यावे तसा प्रकार होऊन बसेल. यासाठी संशोधकाची दृष्टी कशी असावयास हवी? योगी श्रीअरविंद एके ठिकाणी म्हणतात, ङ्खीं (खपवळरप रींं) ळी रप ळर्पीीळींळींश रपवीाळिीळीीरश्र रीं रपव ीीीं लश ाशशप ुळींह ाहश ळर्पीीळींळींश रपवीाळिीळीीरश्र शूश.ङ्घ संत-साहित्याचा संशोधक अशी दृष्टी असणारा हवा. तरच त्याला संतांच्या अभिप्रायाच्या जवळ जाता येईल.

या संदर्भातील पुढील अवतरण महत्त्वपूर्ण आहे. 'इतर क्षेत्रात जसे संशोधन झाले आहे. तसे संत-वाङ्मयातही झाले आहे व होत आहे. पण सामान्यपणे संशोधकांची दृष्टी शब्दप्रामाण्यावर असते, त्याप्रमाणे या अभंगांचे संशोधन करण्यातही बहुधा संशोधक शब्दप्रामाण्यावरच जास्त भर देतात. पण अभंग हे उत्स्फुर्त आलेले असतात. त्यामुळे नुसत्या शब्दांच्या अर्थावरून केलेले तर्क पुष्कळ वेळा विसंगत ठरतात. ज्या भावातून अभंग निर्माण झाले त्या भावात जर आपण गेलो. तरच त्या त्या शब्दांचा अर्थ आपल्याला लागेल. खरोखरच ती

एक अनुभूती आहे. नुसते शब्दांचे अर्थ लावून त्यावरून तर्क काढून आपण कोठेही पोहोचू शकणार नाही. त्या भावात राहून अर्थ लावला आणि त्यावरून तर्क केले तर ते सुसंगत ठरतील. शाब्दिक कीस काढून काही उपयोग होणार नाही.'

ज्या सर्व साहित्याधारित पुराव्यांच्या आधारे डॉ.रा.चिं.ढेरे संत मुक्ताबाई या दोन होत्या. असे सिद्ध करतात त्याच पुराव्याच्या वेगळ्या अन्वयार्थाने डॉ.केतकी मोडक यांनी संत मुक्ताबाई ह्या एकच असल्याचे सिद्ध केले आहे. ह्याचे कारण पंथीय विशिष्टतेत दडलेले आहे. पूर्वजन्म, ज्ञानजन्म, अनुग्रह या संज्ञा विशिष्ट संप्रदायात विशिष्ट पारिभाषिक अर्थ घेऊन आलेल्या असतात. तो विशिष्ट संप्रदाय-निविष्ट अर्थ त्या संप्रदायातच रूढ असतो. तो संप्रदायाबाहेरील व्यक्तीस माहित असण्याची शक्यता नसते. तेव्हा तो अर्थ माहीत नसताना त्यावरून काही निष्कर्ष काढणे हे अप्रस्तुत ठरू शकते. म्हणून एखाद्या विशिष्ट संताच्या साहित्याचा अभ्यास करताना त्याच्या संप्रदायाचा अभयास करणेही तेवढेच आवश्यक असते. त्या त्या संप्रदायातील पारिभाषिक संज्ञा नेमकेपणाने माहिती असल्याखेरीज त्या साहित्याचे मर्म हाती लागणे असंभाव्य असते. म्हणूनच संतसाहित्यात संप्रदायाच्या अभयासाला वेगळे असे स्थान प्राप्त होते.

संत साहित्याचे संशोधन करीत असताना आणखी एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. मूळ संशोधन विषय, मूळ ज्ञान-विषय हा एकात्म असतो. त्याचा आपण सोयीसाठी म्हणून तुकड्या-तुकड्यांनी विचार करत असतो. परंतु त्यामुळे त्या ज्ञान-विषयाचे सार्थ आकलन न होण्याची शक्यता असते. हत्ती आणि सात आंधळे यासारखी परिस्थिती होऊ नये असे वाटत असेल तर मूळ ज्ञान-विषयास विविध ज्ञानशाखांच्या मदतीने भिडायला हवे. मध्ययुगीन संत-साहित्याचा अभ्यास करताना तत्त्वज्ञान, अध्यात्म, साहित्य, संस्कृती, भूगोल, भाषाशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र या साऱ्या ज्ञान-शाखांनी त्याचा वेध घेणे आवश्यक आहे.

★★★

## दलित लोकसाहित्य संशोधन

# दलित स्त्रियांची ओवी गीते: आणि निरीश्वर वाद

प्रा.के.एम. लोखंडे

आजचे दलित साहित्य हे दलित लोकसाहित्याच्या खांद्यावर उभे आहे. दलित साहित्याची पूर्वधारा असलेल्या या दलित लोकसाहित्याकडे मात्र अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. परंतु जनार्दन वाघमारे, दुर्गा भागवत, ना.रा.शेंडे, अनुसया लिमये, डॉ.गो.रा. प्रधान, आशा थोरात यांनी या संदर्भात अत्यल्प का होईना पण प्रयत्न केले आहे. पण दलित लोकसाहित्यावर स्वतंत्र ग्रंथ निर्मिती झालेली दिसत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकसाहित्याच्या संदर्भात म्हणाले होते की "लोकसाहित्य ही आमच्या संस्कृतीची संपत्ती आहे व तिचे जतन व संवर्धन आम्हाला केले पाहिजे. जी अत्यंत प्राचीन काळापासून हृदयपूर्वक सांभाळून ठेवलेली आमची मूल्यवान ठेव आहे. त्यात आमचा पूर्वेतिहास सामावलेला आहे." एखादे तत्त्वज्ञान किंवा विचार प्रणाली जेव्हा जीवनविषयक दृष्टिकोन म्हणून स्वीकारली जाते. तेव्हा स्वाभाविकपणे ती मनामध्ये मुरत जाऊन आचरणातूनही प्रकट होते. जेव्हा आंबेडकरी डोळ्यांनी ही स्त्री जीवनाचं, समाजाचं निरीक्षण, चिकित्सा करायला लागते तेव्हा तिला येणारे अनुभव काव्यात्म रूप घेऊन प्रकट होत राहतात.

### दलित लोकगीतांचे प्रयोजन:-

दलित लोकगीतांचे सृजन हे केवळ स्वानंदासाठी नाही. केवळ रंजन हा त्यांचा हेतू नाही. रंजनाबरोबरच पारंपरिक रूढीचे अंभन करणे आणि अज्ञान व अंधश्रद्धा यांच्या अधांरात चाचपडणाऱ्यांच्या डोळ्यात ज्ञानाचे झणझणीत अंजन घालणे हे दलित लोकगीताचे प्रयोजन आहे. म्हणूनच दलित लोकगीतांतून समूहवेदना प्रकट होताना दिसते. दलित स्त्रीच्या मनातला अन्यायाविरुद्धचा अंगार शब्दा शब्दातून धगधगताना दिसतो.

जी दलित स्त्री पंढरपूरच्या विठ्ठलाला आपलं दैवत मानत होती. तीच आता विठ्ठलाचे 'देवपण' स्पष्टपणे नाकारते. कारण तिच्या मनात असलेले

देवकल्पनेचे दडपण, भीती नाहीशी होऊन ती मनाने मुक्त झालेली आहे. 'देव' केंद्री असलेल्या दलितांना डॉ.बाबासाहेबांनी 'माणूस' केंद्री बनवलं आणि त्यामुळे भक्ती या मूल्यापेक्षा 'माणुसकी' हे मूल्य या स्त्रीला अधिक महत्त्वाचं वाटायला लागलं. विठ्ठलाची भक्ती करण्यात अनेक पिढ्या गारद झाल्या; पण सन्मानाचे जगणे दलितांच्या वाट्याला आले नाही. किंवा हा तथाकथित परमेश्वर आपल्या भक्तांचे सामाजिक दुःख दूर करू शकला नाही. या सत्याची जाणीव या स्त्रीला झाली आहे.

दलितांचे पूर्वज अस्तित्त्वात नसलेल्या देवाच्या मागे लागले आणि स्वत्त्व हरवून बसले. आंबेडकरी विचारांच्या तेजाने त्यांच्या मनातील अंधश्रद्धा दूर झाली आणि ते माणुसकीचा शोध घ्यायला निघाले आहेत. सामाजिक आणि धार्मिक वास्तवाचे भान या स्त्रीला झाले आहे. त्या वास्तवाचेच काव्यात्म प्रतिबिंब आंबेडकरवादी स्त्रीच्या ओव्यातून पडले आहे. अस्पृश्यतेच्या जळजळत्या अनुभवाचं दर्शन घडवताना ही स्त्री सामाजिक सत्याचे दर्शन घडविते. ती म्हणते,

इठलाच्या राऊळात तुम्हा जावयाची मना
बुद्धाच्या विवाहात अंग जाणा हे दर्शना

विसंगती टिपणे हे ही या ओवी गीताचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदानः-**

शतकांच्या काळोखाचे, गुलामीचे ओझे घेऊन दलित जीवन जगत होता. परंतु डॉ.आंबेडकर नावाच्या प्रज्ञासूर्याचा जन्म आणि गावकुसाबाहेर स्वातंत्र्याची किरणे पसरली. दलितांना स्वत्त्वाची जाणीव झाली. हजारो वर्षे झोपलेली लोकशक्ती बाबासाहेबांनी जागी केली. दलित स्त्री आपल्या लोकगीतात म्हणते.

भारत माझे आई, जगी इज चमकली
भीम बाबाजीनं, महाशक्ती जागी केली.

भारतात 'दलित' ही एक 'महाशक्ती' आहे हे केवढे मोठे भान तिने येथे प्रकट केले आहे.

**आंबेडकरी संस्कृतीची संपदा आणि अनुसरणः-**

आंबेडकरवादी स्त्रियांची ही ओवीगीते म्हणजे आंबेडकरी संस्कृती ही

बहुमोल संपदा होय. त्या आंबेडकरी जीवनधारणाचं अनुसरण करतात. आंबेडकरी स्त्रियांची ओवीगीते ही आंबेडकरी विचारांची वाहक आहेत. आंबेडकरी विचारांची ती धगधगती मशाल आहे. ही स्त्री आपल्या लाडक्या भावाला म्हणते.

पहिल्या देवाच्या भक्तांनो तुम्ही तुमच्यामंदी वादा<br>
भीम-बुद्धाचे वंदन आपण करू मोठ्या दादा!

अशा तऱ्हेने आंबेडकर वादाचे प्रतिबिंब या ओव्यात उमटते. बुद्ध, कबीर, फुले आणि आंबेडकर यांची गोळाबेरीज म्हणजे आंबेडकर वाद. बुद्धाचा अहिंसा विचारही आंबेडकरवादात आहे.

**दलित लोक गीतातील नकार-विद्रोहः-**

नकार हे दलित साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट आहे. पण हा नकार दलित साहित्याच्याही आधी दलित स्त्रीने आपल्या ओवी गीतांतून प्रकट केला आहे. ती म्हणते,

कशाले घेया जाऊ रामा तुव्ह नाव<br>
भिम दलितायचा देव, बुद्ध दलितयाचा देव

राम हे दैवत ती नाकारते. कारण बाबासाहेब आंबेडकरांचा प्रबोधनाचा जीवन निष्ठा म्हणून तिने स्वीकार केला आहे.

दलित स्त्री विद्रोही आहे. तिचा विद्रोह विध्वंसक नाही तर विधायक आहे. दलित कवींच्याही आधी तिने ही विद्रोहाची भावना प्रकट केली आहे. ती म्हणते-

देवाहून देव होऊन गेले मोठे मोठे<br>
नीत गरिबाचे तोटे, अशा देवा मारा गोटे

देव कल्पना ही आपल्या प्रगतिशील फार मोठी धोंड आहे. ही जाणीव डॉ.आंबेडकरांनी या स्त्रीला करून दिली. हे ईश्वरशाही विरुद्ध संघर्ष करण्याचे आवाहनच तिने समूहभावनेला केले आहे.

**आंबेडकरवादाचे मूल्य-स्वातंत्र्य-समता-मानवताः-**

स्वातंत्र्य हे आंबेडकरवादाचे महत्त्वाचे मूल्य आहे. डॉ.आंबेडकरांनी मनाच्या स्वातंत्र्याला फार महत्त्व दिले आहे. आनंदाच्या प्रसंगी आता गुलाल लावला जात नाही. कारण गुलाल त्यांना त्यांच्या गुलामीचं प्रतीक वाटतं.

गुलालाच्या ऐवजी निळ वापरली जाते. ही निळ आणि निळा रंग या स्त्रियांना अत्यंत महत्त्वाचा वाटतो. आंबेडकरवादी स्त्रिया निळ्या रंगाचं प्रतीक वापरताना दिसतात, ती म्हणते–

पहाटं उठून सड्याला गं सडा भीडं
बाबा तुमच पाऊल पडं, निळा झेंडा फडफडंट!

निळा रंग हे आकाशाचे प्रतीक, स्वातंत्र्याचे प्रतीक, मुक्तपणाचे प्रतीक, स्वातंत्र्याचे प्रतीक असलेली ही निळी संवेदनशीलता तिला आनंद कशी देते ते पाहण्यासारखे आहे ती म्हणते,

पहाटं उठून उघडी कवाडाचा कोंडा
नदरी पडला भीमासंग निळा झेंडा!

निळा झेंडा हे तिच्या जगण्याच्या स्वातंत्र्याचे, तिच्या समतेचे प्रतीक तिला वाटते. समता हे आंबेडकरवादाचे मूल्य आहे. समता या मूल्याचं आणि आंबेडकरांच्या समताधिष्ठित कार्याचं वर्णन करताना ही स्त्री म्हणते.

भीमदेव म्हणे जनता मही दूर दूर
सखे करीन बराबर मंग बसीन गादीवर

जनता मही दूर दूर मधून बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक वेदना प्रकट झाली आहे आणि ती वेदना दूर करण्यासाठी त्यागाची आणि प्रत्यक्ष कृतीची भावनाही प्रकट झाली आहे. म्हणजे समाजासाठी स्वार्थीपणाचा त्याग महत्त्वाचा. त्याग हे आंबेडकर वादाचे मूल्य येथे प्रकट झाले आहे.

'देव' हा दलित लोक गीतांचा केंद्रबिंदू नाही. तर 'माणूस' आणि त्या माणसांची 'वेदना' मुखर करणे तिला वेशीवर टांगणे त्यासाठी अन्यायावर तुटून पडणे हे या लोक गीतांचे प्रयोजन आहे. मानवी मूल्यांचे संगोपण करणे हे या गीतांचे ध्येय आहे. म्हणून दलित स्त्री म्हणते–

कळूनी पडलं इठला तुव्ह सतं
तुह्या दरबारी नाही माणसा किंमत

इथल्या संस्कृतीने 'जात' हे मूल्य मानले आणि जातीच्या मापदंडाने माणसाला मापले परिणामी व्यक्ती मूल्यांवर जाती मूल्याने कुरघोडी केली आणि त्यामध्ये माणुसकी चिरडली गेली. माणसासाठी मानवताधर्म असण्यापेक्षा धर्मासाठी माणूस राबवला गेला. आंबेडकरवादी स्त्रियांच्या ओव्यात निरीश्वरवाद येतो. त्या परमेश्वराला नाकारतात पण काही ठिकाणी डॉ.आंबेडकरांच्याच संदर्भात किंवा

बुद्धाच्या देव शब्द वापरतात ईश धातूपासून ईश्वर शब्द तयार होतो. ईश म्हणजे नियमनन करणे. सत्ता आणि स्वामित्त्व चालवणे, मालक असणे किंवा समर्थ असणे, याचा अर्थ दलित स्त्रियांच्या मानसिकतेवर देवकल्पतेची सत्ता होती. नियमन होते.

१९५६ नंतरच्या धर्मांतर/ धम्मदीक्षेमुळे ते तिने नाकारले आणि विज्ञानवादी क्रांतीकारी अशा आंबेडकरी विचारांचे नियमन तिने स्विकारले. पूर्वी तिला देव सर्वात मोठा किंवा श्रेष्ठ वाटत होता. भगवान गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर या स्त्रियांचे इतके प्रेम आहे की, त्यांना ते देवापेक्षा श्रेष्ठ वाटतात. देवासारखे श्रेष्ठ म्हणून देवाची उपमा त्या वापरतात. दलित स्त्रिया दैन्याने, दुःखाने, दारिद्र्याने अस्पृश्यतेच्या चटक्याने गांजलेल्या. अशावेळी या सर्व दुःखातून मुक्ती देणारा महामानव त्यांना पूर्णतेचा आदर्श वाटतो. आपल्या दुःखाला दूर करण्यासाठी तो तथाकथित दयाळू, कृपासागर देव धावून नाही आला. पण बाबासाहेबांनी ते दुखणे दूर केले म्हणून डॉ.आंबेडकरांच्या संदर्भात कृपासागर या शब्दार्थाच्या मानसिकतेतून देव शब्द येतो. त्यामुळे सार्त्रचा निरीश्वरवादी विचार या आंबेडकरवादी स्त्रियांच्या ओव्यांना पूर्णपणे लागू पडतो. या संदर्भात ना.रा.शेड्यांनी गोळा केलेल्या ओव्यांमध्ये एक संदर्भ येतो.

जाळा तुमचे ग्रंथ। आमुचा वेगळाच पंथ।
आमुचा निराळा भगवंत।।
कोण दीनांचा साथी। आम्ही आमुचेच साथी।
आमुची आम्हावर भक्ती।।
चला पुढे विरांनो। शूर दलित बयांनो।
तारक व्हा मर्दांनो।।

देव, धर्म, धर्मग्रंथ या सर्वांना ह्या स्त्रिया नाकारतात आणि आंबेडकरवादाचे क्रांतिकारी तत्त्वज्ञान स्वीकारतात.

**लोकगीतातील जीवन दर्शनः-**

दलितांच्या दैनाचे आणि दारिद्र्याचे दर्शन काही ओव्यांतून घडते. उदा.भूकेने व्याकूळ झालेली स्त्री म्हणते. लागली तहान भूक, आवळते कसा मिठी, माउलीचे गाव दुरी. आपल्या दारिद्र्याचं प्रदर्शन करण्याचा निलाजरेपणा तिच्याजवळ नाही. दलितांच्या सामाजिक, मानसिक संघर्षाचे दर्शन दलित लोक

गीतांतून घडते. दलित लोकगीतात सामाजिक भान आहे. सामूहिक चेतना आहे.

दलित स्त्री ही सामान्य वाटत असली तरी समाज जीवनाची ती डोळसपणे टेहळणी करताना दिसते. विसंगती टिपणे हेही दलित ओवीगीताचे एक वैशिष्ट्य आपणांस पहावयास मिळते. दलित स्त्रीला जाणवणारे, अनुभवाला येणारे जे सामाजिक सत्य आहे. त्याचीच अभिव्यक्ती ती तिच्या ओव्यातून करत आली आहे. ते सत्य स्वाभाविकपणेच जळजळीत आहे. दाहक आहे आणि त्यामुळे या ओव्यांच्या आशयामध्ये धगधगता अंगार आपल्याला पहायला मिळतो. या अंगार लेण्यात बुद्धाच्या स्मिताचे सौंदर्य जसे आहे. तद्वतच डॉ.बाबासाहेब आंबेडकरी क्रांतीचे ज्वालाग्राही रंगही आहेत.

या लोक साहित्याला वाङ्‌मयीन मूल्य तर आहेतच, पण सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यही आहे.

★★★

# कादंबरी: स्वरूप व संशोधन

**प्रा. डॉ. पांडुरंग भोसले**

**प्रास्ताविक:**

साहित्य, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, वाणिज्य, मेडिकल, अभियांत्रिकी, कृषी अशा विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधन होत असते. ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे. साहजिकच संशोधनाची ही प्रक्रिया आणि पद्धती शाखानिहाय भिन्न आढळते. त्या अनुषंगाने विचार करता साहित्य वाङ्मयांच्या प्रकारनिहायही संशोधनाची प्रक्रिया आणि पद्धती यातही मूलत: बदल होत जातात.

एक वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीचा विचार करता कादंबरी ही प्रामुख्याने माणूस, त्याचे नातेसंबंध, त्याच्या भावना, विचार, विकार, कल्पना, जीवनाविषयक दृष्टिकोन, त्याची तत्त्वप्रणाली या आणि अशा विविध घटकांवर आधारलेली असते. प्रामुख्याने लेखक हाही त्याचाच एक भाग असतो. साहजिकच कितीही ताटस्थ्याने लेखक लिहीत असला तरी त्यातून त्याचा म्हणून एक जीवनविषयक दृष्टिकोन प्रतित होत असतो. त्याचा शोध घेणे इष्ट ठरते.

कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे संशोधन करावयाचे असेल तर 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराचे सखोल आणि सर्वांगीण ज्ञान संशोधकाला असणे अभिप्रेत आहे. कादंबरीचा घाट, रचनातंत्र यांविषयीची किमान जाण असणे आवश्यक आहे. कोणतीही साहित्यकृती ही त्या विशिष्ट काळाचे अपत्य असते याचे भान असणे आवश्यक आहे.

कादंबरी वाङ्मयप्रकाराचा विचार करीत असता कालप्रवाहाबरोबर त्या वाङ्मयप्रकारात होत आलेले बदल, तिचे विविध प्रकार यांचेही भान असणे गरजेचे आहे. सामाजिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, राजकीय कादंबरी, पौराणिक कादंबरी हे स्थूल मानाने प्रकार पाडता येतील. पण त्यातही पुढे ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी, आदीवासी कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, महानगरीय कादंबरी असे जे प्रकार कालप्रवाहात निर्माण झाले आहेत याचेही किमान ज्ञान संशोधकाला असणे अभिप्रेत आहे.

आपणास एखादा लेखक आवडतो, कादंबरी आवडते म्हणून संशोधन न करता एखाद्या महत्त्वाच्या लेखकाच्या साहित्यकृतीवर वा महत्त्वपूर्ण कादंबरीवर

अद्याप संशोधन झालेले नाही. त्या साहित्यकृतीच्या वेगळेपणावर, वैशिष्ट्यांवर वा पैलूंवर प्रकाश टाकला गेलेला नाही, म्हणून ते पैलू प्रकाशात आणण्याच्या उद्देशाने संशोधनाकडे, साहित्यकृतीकडे वळणे अधिक उचित ठरते. त्या कादंबरीवर फारशी चर्चा झालेली नाही, समीक्षा झालेली नाही अशी कादंबरी निवडण्यास हरकत नाही. पण खरोखरच नि:संशय वैशिष्ट्यापूर्ण कादंबरी दुर्लक्षित राहिलेली आहे याची पुरेपूर जाणीव होऊन तज्ञ अभ्यासक, संशोधक, साहित्याची जाण असणाऱ्या रसिकांशी चर्चा करून ती साहित्यकृती व साहित्यप्रकार संशोधनासाठी निवडणे योग्य ठरेल. आपणास त्या साहित्यकृतीच्या–कादंबरीच्या संदर्भात नवीन काही सांगता येऊ शकेल याची पक्की खातरी असणे येथे अभिप्रेत आहे.

कादंबरी या वाङ्मयप्रकाराविषयी भूमिका मांडताना डॉ. मधु कुळकर्णी म्हणतात, "केवळ कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, ग्रामीण, दलित वगैरे उपप्रकार आहेत. यातही मग त्या त्या कलाकृतीचा एक आकार असतो, रूप असते, आकृतिबंध असतो. कलाकृतीचे सौंदर्य तिच्या या रूपात, घाटात, आकृतिबंधात सामावलेले असते."

खरेतर त्याचाच शोध संशोधकाला घ्यावयाचा असतो. अशा वेळी संशोधकाला वर नमूद केलेल्या कोणत्याही उपप्रकारातील कादंबरीचा शोध घ्यावयाचा असेल तर त्याने त्या उपप्रकारातील कादंबरीची पूर्वपीठिका जाणून घेणे, तिची वाटचाल समजून घेणे आवश्यक आहे. त्यातील तंत्रात्मकता जाणून घेणेही आवश्यक आहे. मधू कुळकर्णी कादंबरी या प्रकाराच्या तंत्राबाबत म्हणतात, "कादंबरींला आरंभ, मध्य, शेवट किंवा अगदी तंत्रात बोलायचे म्हणजे गुंतागुंत, निरगाठ, उकल असे रचनेचे बंधन होते. बंडखोर कलावंतांनी ही बंधने झुगारुन देण्याचा प्रयत्न केला."

ना. सी. फडके, बा. सी. मर्ढेकर यांनी तंत्रप्रधानतेला प्राधान्य दिलेले दिसून येते. मात्र पुढे भालचंद्र नेमाडे (कोसला), नामदेव ढसाळ (हाडकी हाडवळा) यासारख्या साहित्यिकांनी ही बंधने नाकारली. त्यातूनच प्रति कादंबरी हा नवा कादंबरीप्रकार पुढे आला. नेमाडे, ढसाळ यांनी कादंबरीचे हे पारंपरिक संकेत नाकारले. म्हणजेच कादंबरीच्या संशोधकाला आपली कादंबरी कोणत्या प्रकारात मोडते (सामाजिक, राजकीय, पौराणिक, ऐतिहासिक वा ग्रामीण, दलित, आदीवासी, महानगरीय इ.) तिची बलस्थाने, सौंदर्यस्थळे कोणती, परंपरा काय याची जाण असणे आवश्यक आहे.

परंपरेने आशयानुरूप विचार करीत असताना कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती, मनोविश्लेषण, शैली असे कादंबरीचे घटक लक्षात घेऊन मांडणी झालेली आढळून येते. कालौघात संशोधनात बरेच बदल होताहेत. वरील घटकांबरोबरच आज कथानक असे ढोबळमानाने शीर्षक देऊन कादंबरीचा थोडक्यात गोषवारा देण्याऐवजी 'आशयविश्व' लक्षात घेऊन कादंबरीच्या प्रकारानुसार आणि आशयविश्वानुसार सर्वसाधारणपणे आत्मपर आविष्काराचे आशयसूत्र, विषमताधिष्ठित शोषणाचे जातीय आशयसूत्र (त्या अंतर्गत शोषण, अन्याय-अत्याचार, विद्रोह इ.), आर्थिक शोषणाचे वर्गीय आशयसूत्र (त्या अंतर्गत भूक, दारिद्र्य, व्यवसाय इ.), परंपरेचे धार्मिक आशयसूत्र, विषमताधिष्ठित शोषणाचे वर्गीय आशयसूत्र, वासनेचे आशयसूत्र, पौराणिक आशयसूत्रे, ऐतिहासिक आशयसूत्रे आणि कादंबरीतील विषयानुरूप धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, तात्त्विकता, उच्च-नीच वा इतर भेदभाव, प्रादेशिकतेचे आशयसूत्र अशी विविध आशयसूत्रे लक्षात घेऊन कथानकाची चिकित्सकपणे मांडणी करणे इष्ट ठरेल.

व्यक्तिचित्रण या घटकात स्त्रियांची व्यक्तिचित्रणे, पुरुषांची व्यक्तिचित्रणे, मुलांची व्यक्तिचित्रणे असे विभाग करून त्या त्या पात्रांचे कुटुंबातील, समाजातील वा त्या त्या क्षेत्रातील स्थान अधोरेखित करता येईल. वातावरणनिर्मिती या घटकात संबंधित लेखक खरोखरच यशस्वी झाला आहे का ते पाहता येईल. मनोविश्लेषणाच्या माध्यमातून व्यक्तिचित्रणांचे स्वरूप अधिक जाणून घेता येईल. निवेदन आणि भाषा समजून घेताना निवेदनाचे स्वरूप, निवेदन आणि काळ, भाषा, भाष्य, वर्णन, संवाद, स्वगत, शब्दकळा, शैली, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, काव्यमयता, श्लील-अश्लीलता, कादंबरीचा प्रारंभ, कादंबरीचा शेवट अशा विविध अंगांनी शोध घेता येईल.

कादंबरीतील परिसर, पात्रे आणि भाषा यांचा परस्परसंबंध तपासता येईल. कादंबरीमध्ये वापरल्या गेलेल्या भाषेतून वातावरणनिर्मितीचा शोध घेता येईल. वापरलेली बोली, रूढी-संकेत, भाषिक विशेष यांचा शोध घेता येईल. ज्या माणसांच्या भोवती हे कथानक फिरते त्या माणसांना कादंबरीकार कितपत न्याय देऊ शकला आहे, कितपत यशस्वी झाला आहे वा अपयशी ठरला आहे याचा शोध घेता येईल आणि अखेरी वाङ्मयप्रकारातल्या परंपरेत त्या कादंबरीचे योगदान स्पष्ट करून स्थानांकन सिद्ध करता येईल.

कोणताही आपपर भाव न ठेवता साहित्यकृतीशी तादात्म्य पावून तरीही योग्य त्या ताटस्थ्याने साहित्यकृतीचा शोध घेतल्यास त्या संशोधनास योग्य तो न्याय दिल्यासारखे होईल.

कादंबरीच नव्हे, तर एकूणच संशोधकीय दृष्टी परिपक्व ठरावयाची असेल तर संशोधकाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत डॉ. सु. रा. चुनेकर म्हणतात, ''शोध घेत राहणे, त्याचा सातत्याने पाठपुरावा करणे, त्यामध्ये सत्यशोधकाची वृत्ती बाळगणे, 'सत्यासत्यासी ग्वाही' देण्याइतकी तटस्थता असणे, संकुचित स्वार्थापासून अलिप्तता राखणे हे संशोधकाचे प्रारंभिक आवश्यक गुण आहेत. सत्यजिज्ञासा व सत्यप्रतिपादन ही संशोधकाची पहिली प्रतिज्ञा हवी. त्यासाठी निर्भयता हवी. ही निर्भयता नि:स्वार्थतेतून येते. म्हणून ही नि:स्वार्थता हवी. प्रामाणिकपणा, निष्ठा हा संशोधकाचा महत्त्वाचा गुणधर्म. स्वत:शी प्रामाणिकपणा हवा. दुसऱ्यांना फसवणे शक्य आहे, तसे ते सोपेही आहे. पण स्वत:ला फसवणे अवघड आहे आणि ते अधिक बाधक आहे. 'प्रमाणमन्त:करणप्रवृत्तय:' या न्यायाने संशोधकाची निष्ठा असायला हवी ती स्वत:शी.'' या संशोधकासाठी अत्यंत महत्त्वाच्या बाबी आहेत. समारोप: निसर्गातील एखादा वृक्ष आपण डोळ्यासमोर आणला तर वृक्षाचे खोड, मुळ्या, मोठ्या फांद्या, छोट्या फांद्या, पाने, फुले, फळे हे सर्व घटक एकात्म होऊन आपणांस पूर्णत्त्वाचा साक्षात्कार घडवितात. तसेच माणूस, त्याचे कुटुंब, समाज, माणसाचे विचार, विकार विविध घडामोडी यांचे एकात्म दर्शन साहित्यिकाने घडविलेले असते. सर्व घटक वेगळे असूनही एकात्मतेने गुंफलेले असतात. त्यांचा शोध घेऊन संशोधकाने त्यांचे वेगळेपण सिद्ध करावयाचे असते. डॉ. सु.रा. चुनेकर यांनी संशोधकांसाठी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक पालन केले तर कादंबरीचे वा इतर कोणत्याही साहित्यप्रकाराचे योग्य मूल्यमापन होण्यास, लेखकास–साहित्यकृतीस योग्य तो न्याय मिळण्यास, संशोधन योग्य दिशेने होण्यास व संशोधनात भर पडण्यास निश्चितच मदत होईल.

★★★

# विज्ञान कादंबरीचे संशोधन

डॉ. पौर्णिमा बोडके

प्रास्तविक –

आज मराठी कादंबरीमध्ये अनेक प्रवाह दिसतात, कारण आधुनिक समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भौतिक क्षेत्रातील सुधारण व बदलांमुळे परिवर्तनीय झालेला आहे. त्यात 'विज्ञान' हे सुधारणांचे किंवा बदलांचे मूळ आहे. मानवाने जीवन सुखी व समृद्ध करण्याच्या आशेने भौगोलिक, खगोलशास्त्रीय, आण्विक आणि जीवशास्त्रीय क्षेत्रांत संशोधन केले. शोध लावले.

यंत्र तंत्राच्या साहाय्याने जीवनाच्या सर्व दालनात प्रगती साधलेली आहे. भौतिक प्रगतीतून वैचारिक व मानसिक बदल प्रकट झाले. समाज जीवनात वेगळया नीतीधोरणांचा व जीवनमूल्यांचा समावेश होत गेला. १८ व्या शतकापासून सुरू झालेली बदलाची प्रक्रिया वस्तुनिष्ठेवर आधारलेली आहे. त्यात विज्ञानाची प्रगती व मानवाच्या जीवन प्रगणातील होणाऱ्या सुधारणा यांची सांगड घालण्याचा प्रयत्नातून पुरोगामी विचारांनी व्यापलेला समाज आपल्या संस्कृतीच्या आकृतिबंधात बसविण्याची धडपड साहित्यिकांची सुरू आहे. त्यात मराठी कादंबरीकार मागे नाहीत. म्हणून आधुनिक मराठी कादंबरीत 'मराठी विज्ञान कादंबरी' हा साहित्य प्रकार समाविष्ठ झाला एकूणच विज्ञान साहित्याची संकल्पना सर्वश्रृत झाली.

मराठी विज्ञान कादंबरीचे स्वरूप –

स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीचा आढावा घेतल्यास असे आढळते की, प्रेरणा भिन्नता आणि अनुभव क्षेत्रांची विविधता यामुळे कादंबरीचा सर्व दिशांनी विस्तार झालेला दिसतो. मराठी कादंबरीच्या प्रवाहात 'विज्ञान कादंबरी' ही जीवनानुभवाची वेगळी दिशा प्रकट करते. कादंबरी हा समाजवास्तवनिष्ठ असा साहित्य प्रकार आहे. मराठी विज्ञान कादंबरी ही देखील अपवाद असू शकत नाही. प्रत्येक वाचक कादंबरीमधून नेहमीच वास्तव जीवनदर्शनाची अपेक्षा बाळगतो.

कादंबरीकार विशिष्ट अनुभवाच्या माध्यमातून सार्वकालिक जीवनमूल्यांचा आविष्कार करतो. तो अनुभव कादंबरीच्या प्रकार स्वरूपाला साजेसा असायाल हवा. त्यातूनच कादंबरीतील जीवनानुभवाला सौंदर्यमूल्य प्राप्त होते. त्या सौंदर्यमूल्यातून जीवनसत्याची अनुभूती येते. तेव्हाच वाचकाला साहित्यकृतीही

वास्तववादी असल्याचे मान्य होते.

याआधारे विधार कादंबरीचा सामाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करताना वैज्ञानिक वास्तवाला किंवा सत्याला धक्का न लावता त्या कल्पनेचा विस्तार केलेला असतो. हा विज्ञान कल्पनेचा विस्तार अत्यंत तर्कशुद्धरीत्या आजच्या नियमाधिष्ठित किंवा योग्य त्या स्पष्टीकरणाद्वारे नवे नियम मांडून भविष्यकालीन वैज्ञानिक प्रगतीचा अंदाज घेतला जातो. वैज्ञानिक कादंबरीकाराच्या अनुभवाचा किंवा वैज्ञानिक दृष्टीकोनाचा हा आविष्कार वाचकांच्या दृष्टनेही विज्ञान स्वरूप वाटायला लागतो. त्या आशयानुरूप कल्पनाविस्तार विज्ञानाच्या रास्त परिभाषेच्या माध्यमातून सौंदर्य विस्तार ठरतो. केवळ अलंकार किंवा रूपकांच्या गुंफणीतून कलारूप साकार होत नसून विज्ञान कादंबरी साऱ्या आशयप्रविष्ठ कलाकृतीतील वैज्ञानिक अनुभूती देणारे शब्द व सामाजिक व्यवहार जाणकार वाचकाला मानसिक समाधान देणारा वाटतो. वैज्ञानिक प्रगती लक्षात घेता, आपणांस हे कळून चुकले आहे की विज्ञानाच्या कक्षा जस जशा रुंदावत जात आहेत, तस तशी विज्ञान साहित्याची व्याप्ती वाढत आहे. विज्ञानाचा अनुभव हा आजमितीला जीवनानुभव बनला आहे. साहजिकच मराठी विज्ञान कादंबरीमध्ये विज्ञान कल्पनांची व संस्कृतीची धारा वाहू लागली आहे. त्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या काव्यप्रकाराचे अध्ययन होणे क्रमप्राप्त आहे.

विज्ञान कादंबरीच्या स्वरूपाचे विश्लेषण करताना असे दिसते की, या साहित्य प्रकाराला साहित्यातील सौंदर्यघटकांबरोबरच वैज्ञानिक शोध– संशोधनाच्या माहितीचा प्रसार करण्याची साधने समाविष्ठ केलेली असतात. त्यामुळे विषयनिष्ठ कृती सामाजिक व्यवहाराची भाषा सार्वत्रिक समजुती अथवा जाणिवा अशा अनेकविध संकल्पनांचा समावेश विज्ञान कादंबरीत केलेला असतो. वैज्ञानिक वातावरणाची निर्मिती करतांना पात्रांच्या व्यक्तिरेखा चित्रणातही वैज्ञानिकदृष्टी अद्‌भुतता किंवा चमत्कारांचा वापर करून लोक विज्ञानाधिष्ठित कल्पनाविश्व किंवा भविष्यकालीन संभवनीय वास्तव निर्माण करतो.

या सर्व जडणघडणीत कादंबरीच्या जगातील सामाजिक व्यवहार उभारला जातो. त्यात विज्ञनाची भाषा व परिभाषा, जीवनमूल्यात वैज्ञानिक आधार किंवा सिद्धाताचा पाया आणि अवघ्या ब्रम्हांडाचा वेध घेणारी दृष्टी उपयोगात आणली जाते. परंतु ही सामाजिकता वास्तव जीवनात व्यवहारशून्य वाटू नये, म्हणून या विज्ञान कल्पनेच्या आविष्कारात सामाजिक शास्त्रांतील वास्तव उमटविण्याचा

प्रयत्न केला जातो.

विज्ञान कादंबरीतील वास्तव हे वस्तुनिष्ठ असल्याचे मान्य करावेच लागेल. कारण दोन्ही नैसर्गिक आणि मानवनिर्मित वास्तवांच्या संयोगात माणसाचे माणूसपण जाणण्याचा त्या बलच्या ज्ञानसंवर्धनाचा मार्ग शोधण्याचा हेतू टाळता येणे शक्य नसते. त्यासाठी लागणारे ज्ञान प्रत्येकाला आत्मसात करण्यासाठी स्पष्टीकरणात्मक, विषयजन्य सुलभ भाषिक अभिव्यक्ती आवश्यक असते. तेथेच सामाजिकशास्त्रीय व वैज्ञानिक वास्तवांमधील वस्तुनिष्ठता आढळते. यावरच मराठी विज्ञान कादंबरीची प्रयोजन सिद्धता अवलंबून आहे. या संदर्भात गो.म. कुलकर्णी लिहितात, वास्तवतेचा निकर्ष व्यावहारिक वास्तवतेच्या अनुषंगाने सिद्ध होत नसून प्रतीती गोचरतेच्या अंगाने नियत होतो, कलाकृतीत चैतन्यस्पर्श–प्रत्ययकरिता–वास्तवानुभूती अशी साखळी असते.

**कथानकाविषयीचे आगळेपणः**

मराठी विज्ञान कादंबरीचे मुख्य प्रयोजन हे विज्ञानाची माहिती देऊन विज्ञाननिष्ठा वाढीस लावणे होय. यासाठी आजच्या आधुनिक जीवनानुभवाच्या आधारे प्रचलित विज्ञाननिष्ठ विचारांच्या उपयोजनेतून अपेक्षित किंवा संभवनीय परिवर्तनाचा, जीवनसृष्टीचा वेध घेण्याचा प्रयत्न विज्ञान कादंबरीत असते. प्रत्येक लेखकाला केव्हा मनोरंजन करण्यापेक्षा जीवनाविषयक वैज्ञानिक किंवा बदलाचे तत्त्वज्ञान जनमानसांत रुजविणे हे अधिक महत्त्वाचे आहे. म्हणून विज्ञान कादंबरीतील कथानकाच्या मांडणीत फारसे चातुर्य पणाला लावलेले दिसत नाही. प्रत्यक्ष कृतीत विज्ञान साकारातांना पायांच्या मनोभूमिका व वर्तन ही जास्त प्रभावी साधणे आहेत. उदा. अरुण हेबळेकरांच्या 'आदीत्य' मधील कथानक संकट आणि सुटका हा साहसपटाचा साचा वापरून निर्माण झालेले आहे. तथापि सामाजिक, राजकीय संदर्भ आणि मानवी भावना उद्रेक यातून साकारलेले भरत बसरुरचे व्यक्तिमत्त्व बहुआमयाची, बुद्धिमान आणि आदर्शवादी जीवन विषयक तत्त्वज्ञान बाळगणारा नायक यशस्वीपणे उभारलेला आहे.

पात्र विचार विज्ञान कादंबरीतील वातावरण हे वैज्ञानिक असल्याने ह्यातील व्यक्तिचित्रणेही विज्ञान युगातीलच असायला हवीत. याचे कारण कादंबरी हे लेखकाने निर्मिलेले कल्पित रूप असते. कादंबरी हा लेखकाच्या मनाने काही घटना व पात्रांच्या साहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा घेतलेला एक शोध

असतो. विज्ञान कादंबरीतील चित्रित होणारे जीवन प्रत्यक्ष वा वर्तमानकाळातील वैज्ञानिक प्रगती किंवा वास्तव नसून भविष्यकालीन अथवा कल्पित वैज्ञानिक कल्पनारंजन असते. या वैज्ञानिक सिद्धांत किंवा कल्पनेच्या आधारे लोक वाचकाला कल्पित वैज्ञानिक सत्याचा अनुभव देण्याचा प्रयत्न करतो.

व्यक्तिरेखांची संकल्पना ही कादंबरीतील जीवन परिस्थितीत जाणून घ्यावयाची असते. त्याच परिस्थितीत साकारलेल्या समाज जीवनाचा हा पात्रे घटक असतात. विज्ञान कादंबरीतील समाज वैज्ञानिक दृष्टिकोन धारण करणारा असून त्यातील व्यक्ती त्या समाजाशी अनुबंध जोडलेल्या असतात.

**कादंबरीतील घटना:**

प्रसंग आणि व्यक्ती यांचे परस्परांशी अतुट संबंध प्रस्थापित करून कथासूत्र गतिमान बनविता येते. मराठी विज्ञान कादंबरीतील व्यक्तिरेखांची चित्रणे रंगवितांना सर्वच सामाजिक शास्त्रांचा विचार करावा लागतो.. जसे रसायनशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, किंवा मानववंशशास्त्र या विद्याशाखेतील तत्त्वांच्या आधारे व्यक्तिचित्रणे अभ्यासता येतील. त्यात पारंपारिक पद्धतीने नायक नायिकांची निर्मिती करून सहाय्यक व्यक्तिरेखांमधून समाज चित्रण रेखाटले जाते. विज्ञानाचा प्रभाव मात्र विसरुन चालत नाही.

दोन्ही स्त्री आणि पुरुष पात्रांची निर्मिती करून त्यावर संभवनीय विज्ञानात प्रभाव अजमाविण्याचा प्रयत्न केला जातो.

**स्थल-काल विचार:**

मराठी विज्ञान कादंबरीकारांनी विज्ञान साहित्य निर्मितीत व्यक्तिरेखांच्या विलक्षण चित्रणासाठी हुबेहुब पार्श्वभूमीचा आधार घेतलेला दिसतो. स्थलवर्णनामुळे पात्रांच्या चित्रणातील नैसर्गिकता अबाधित राहते. या विज्ञान कादंबरीत परिचित, अपरिचित किंवा अविश्वसनीय अशा सर्व पार्श्वभूमीचे चित्रण निवेदनातून केलेले असतेच. नाहीतर विज्ञान कादंबरी परिकथा किंवा कल्पितच्या मधून वेगळी मानली जाणार नाही. या कादंबरी प्रकारात देखील दृकप्रत्यय देण्यासाठी स्थलवर्णनाला विशेष महत्त्व आहे.

याचे उत्तम उदा. म्हणजे जयंत नारळीकरांच्या 'वामन परत न आला!' या कादंबरीमध्ये वामनाच्या निर्मितीबलचे वर्णन पेटारा, बृहस्पती व वामन या

प्रकरणांमध्ये निवेदित केलेले आहे. त्यात भूतकाळातील गतीत वास्तवाची पार्श्वभूमी तयार करतांना कल्पित वास्तव हे नैसर्गिक भासविण्याच्या प्रक्रियेस स्थल काल वर्णनाला महत्त्व आहे.

**निवेदन पद्धतीविषयी:**

कादंबरीमधील निवेदक मग ते एक पात्र असो, किंवा तृतीय पुरुषी, सर्वज्ञ असो, तिच्यातील अनुभव विश्वाचा उलगडा कथन करणारा असतो. विज्ञान कादंबरीतील सजीवसृष्टी ही नैसर्गिक सजीवसृष्टीच्या ऋतुमानानुसार नियमांने संयमित किंवा मर्यादिलेली नसते. तर वास्तवातील मर्यादा ओलांडून निसर्ग नियमांवर मात करून मानवी जीवनाच्या शारीरिक, सामाजिक वा भौतिक गरजांपेक्षा वैज्ञानिक संशोधनातील आस्था जतन करण्यासाठी यांत्रिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीतील आवश्यक बाबी किंवा समस्यांवर लक्ष केंद्रित केलेले असते. त्यातील पात्रांची वर्णने स्थलकाल परिणामांमुळे माणसांसारखी भासू लागतात. घटना- प्रसंगातून त्याचे अनुभव वास्तव जगाशी, मिळते जुळते भासल्याचा आभास निर्माण होतो. हा आभास निर्माण करण्यासाठी जे कथन केले जाते, ते एखादी व्यक्ती वा पात्र आपल्या आवाजातून म्हणजेच स्वत:ची ओळख निर्माण करून कथन करतो. ती ओळख वाचकाला असल्यामुळे कादंबरीतील प्रत्येक घटना प्रसंग वास्तव असल्याचे वाटते आणि कथनकाराचे म्हणणे खरे वाटते.

विज्ञान कादंबरीमध्ये देखील अनेक आशयसूत्रे असतात. या आशयाला पेलण्यासाठी संभाषण, वर्णन किंवा भाष्य या साऱ्या निवेदन पद्धतींचा अवलंब करून प्रस्तुतीकरण केले जाते. या सर्व पद्धतींचा गरजेनुसार वापर करून कादंबरीकार 'समग्र प्रस्तुती' एकसुरी होणार नाही याची काळजी घेतो. विस्तारित मजबुराने कादंबरीतील कथानकाच्या वातावरणाला कथात्मता प्राप्त करून देतो. म्हणून विज्ञान कादंबरीतही कल्पनाधिष्टित निवेदनाला कथेतील सत्यता निर्माण होतो.

**भाषिक वेगळेपण:**

मराठी विज्ञान कादंबरीची भाषा अभ्यासतांना आपल्याला व्यापक दृष्टिकोन बाळगावा लागेल. केवळ प्रतिशब्द वापरल्याने मराठीतून विज्ञान विषयक जाणिवा निर्माण होऊ शकतात असे नाही. किंवा इंग्रजी परिभाषिक संज्ञा वापरामुळे मराठी

कादंबरीतील भाषिक, साहित्यिक वा सांस्कृतिक मूल्ये कमी होणेस असा धोका वाटत नाही. यात आस्वाद, आकलन, उपयोजना या प्रक्रियेला जास्त महत्त्व आहे.

त्यासाठी सुलभ, सर्वमान्य अधिक साधन स्वीकारण्यावर भर देण्यास विज्ञान साहित्याबद्दलची अभिरुची वाढेल.

मराठी विज्ञान कादंबरीच्या भाषेबद्दल विचार करता, आपण तिच्या सामाजिकतेतील व्यवहार सापेक्ष पातळीवर जाऊन परिणामांची निश्चिती करायला हवी. विज्ञान कादंबरीकाराला कथानकामध्ये व्यवहाराची भाषा वापरता येईल अशी परिस्थिती निर्माण करावी लागेल. वैज्ञानिक जगात म्हणजेच लॅबोरेटरी, अवकाश यान, भूगर्भात किंवा एखाद्या असाधारण कक्षेत वावरताना त्या व्यक्तिरेखांना सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून सभोवतालच्या समाज घटकांशी संबंध प्रस्थापित करावे लागतात. तेव्हा विज्ञानाची भाषा व परिभाषा आणि समाज व्यवहाराची भाषा यांचे मिश्रण कादंबरीत असते.

**समारोप –**

विज्ञान युगात वावरताना विज्ञान प्रवण सांस्कृतिक सामाजिक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. विज्ञानाची वाटचाल योग्य दिशेने होत आहे किंवा नाही हा संस्कृती विवेकही काळाजी गरज आहे.

त्यासाठी मराठी विज्ञान कादंबरीतील सामाजिक, सांस्कृतिक विचार महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे.

या विज्ञान कादंबरीचे संशोधन करतांना मराठी जीवनातील सामाजिक व्यवहार आणि साहित्यकृतीतील सामाजिकता याचा सहसंबंध विचारात घेणे आवश्यक आहे.

★★★

# ग्रामीण साहित्याचे संशोधन

डॉ.शशिकांत साळवे

१९६० नंतर मराठी साहित्यविश्वामध्ये अनेकविध प्रवाह येऊन विलीन झाले. त्या प्रवाहांपैकी ग्रामीण साहित्य ही एक महत्त्वाचा आणि मानवता मूल्य प्रमाणभूत मानणारा असा प्रवाह आहे. ग्रामीण साहित्यप्रवाह हा शेतीशी निगडित असा प्रवाह आहे. म्हणून या प्रवाहाला ख्यातनाम लेखक, समीक्षक आणि संशोधक राजन गवस यांनी कृषिसाहित्य असे संबोधले आहे. जे जे साहित्य शेतीजीवनाशी निगडित आहे ते सर्वच ग्रामीण साहित्य असे संबोधण्यास काही हरकत नसावे.

भारत हा खेड्यांचा देश आहे असे म्हटले जाते. वास्तविक तेही बरोबरच आहे. कारण भारत देशातील ८०% जनता खेड्यात राहते आणि ती शेतीशी निगडित आहे. त्यांचा आणि इतरांचादेखील उदरनिर्वाह शेतीमुळेच होतो. मानवाचे जीवन सुखकर करण्यासाठी अनेक उद्योग व्यवसाय निर्माण झाले. भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाली. या सर्व व्यवस्थेत शेतकरी मात्र भरडला गेला. जो अन्नदाता आहे त्याचीच या व्यवस्थेत उपेक्षा झाली. तो नागवला गेला. सर्वांवर औषधे निर्माण झाली. परंतु अन्न, हवा, पाणी यावर आजही शास्त्रज्ञांना उत्तरे सापडले नाहीत. या क्षेत्रात मात्र संशोधन झाले नाही आणि ते या पृथ्वीतलावर माणूस आहे. तोपर्यंत होईल असे वाटत देखील नाही. इतका शेतकरी हा घटक महत्त्वाचा आहे.

या शेतकऱ्यांचे जीवनचित्रण रेखाटणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य. ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने भारतीय मराठी साहित्य आहे. या साहित्यात शेतकरी, शेतमजूर, प्राणिजगत, निसर्ग, मानव आणि त्यांच्या भोवतीचा परिसर, रूढी, परंपरा, रीतीरिवाज या सर्वांचेच चित्रण झाले आहे. या साहित्याचा नायक उपेक्षित शेतमजूर, शेतकरी आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, प्रस्थापित साहित्यात फक्त अभिजनांचे जीवनचित्रण होत होते. परंतु ग्रामीण साहित्यात सामन्य माणसाचे जीवनचित्रण व्हायला लागले. खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याने सामान्यातला सामान्य माणूस विश्वाच्या केंद्रस्थानी आणला. त्या सामान्य

माणसाच्या भाव-भावना बोलक्या केल्या. त्याच्या मुक्या हुंकाराला वाट करून दिली असे हे ग्रामीण साहित्य विश्वसाहित्य ठरावे इतके श्रेष्ठ आणि उच्च दर्जाचे आहे. असे असताना देखील या साहित्याची साहित्य, समीक्षा आणि संशोधन या तीनही पातळीवर उपेक्षाच झाली असेच खेदाने म्हणावे लागेल. कारण लेखन ही अभिजनांची मक्तेदारी होती आणि ती बहुजनांकडे आल्यामुळे त्यांच्या साहित्याकडे स्वाभाविक दुर्लक्ष झाले. साहित्य क्षेत्रात एखाद्या लेखकाची कशी उपेक्षा होते हे आपणाला महात्मा फुले लिखित तृतीयरत्न या नाटकावरून स्पष्ट होईल. या नाटकाने खऱ्या अर्थाने लेखनाचे सर्व मापदंड झुगारून लावले. हे नाटक रंजनात रमले नाही तर खऱ्या अर्थाने लोकशिक्षण आणि लोकप्रबोधनाचा वसा घेऊन महात्मा फुलेंनी हे नाटक लिहिले होते. जेव्हा हे नाटक दक्षिणा प्राईज कमिटीकडे प्रकाशनार्थ मानधन मिळविण्यासाठी पाठविले असता या नाटकास तत्कालीन कर्मठ लोकांनी नाकारले. एवढेच नव्हेतर प्रस्थापितांमुळे आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासात या नाटकाची साधी नोंद देखील झाली नाही. हा करंटेपणा प्रस्थापित व्यवस्थेने का केला याची बीजे आपणाला या व्यवस्थेतच सापडतात ही व्यवस्था बदलणे आज खरी काळाची गरज आहे. तेव्हाच साहित्यसमीक्षा-संशोधन खऱ्या अर्थाने सकस होईल आणि मानवीमूल्य सर्वच क्षेत्रात झपाट्याने रुजण्यास मदत होईल यात शंका नाही.

ग्रामीण साहित्याचे संशोधन आणि समीक्षा करताना आजही ग्रामीण साहित्याकडे पूर्वग्रहदूषित मनाने पाहिले जाते. प्रस्थापित साहित्याचे संशोधन आणि समीक्षा ज्या नजरेतून केली जाते. त्याच फुटपट्ट्या या साहित्याला लावल्या जातात. वास्तविक साहित्य म्हणजे नेमके काय हे आपणाला ग्रामीण साहित्याचा अभ्यास केल्याशिवाय कळणार नाही. कारण ग्रामीण साहित्य हे काही हवेलीमध्ये डनलॉपच्या गादीवर बसून लिहिलेले साहित्य नाही. या साहित्याचा निर्माता सामान्य कुटुंबातला खेड्यातला माणूस आहे. त्याला कोणतीही शैक्षणिक, आर्थिक, राजकीय पार्श्वभूमी नाही. अनेक ग्रामीण लेखक त्यांच्या घरण्यातील पहिलेच शिकलेले आहेत. उदा.आनंद यादवांचे घेता येईल. त्यांची झोंबी ही कलाकृती वाचल्यावरच आपल्याला यांचे प्रत्यंतर येते. मग अशा कलाकृतीचे संशोधन-समीक्षण करताना कोणत्या कसोट्या वापरणार, कोणती मूल्य शिरोधार्य मानणार या सर्वच बाबी महत्त्वाच्या आहेत.

थोडक्यात ग्रामीण साहित्याचे संशोधन करताना परिशीलन करताना

संशोधकाला सामान्य माणसाची सुख-दुःख नेमकी काय असतात याचे आकलन झाल्याशिवाय ग्रामीण साहित्याचे प्रभावीपणे समीक्षण अथवा मूल्यमापन होणे केवळ अशक्यप्राय आहे. सूत्रबद्ध पद्धतीने प्रस्थापित साहित्याचे निकष लावून या साहित्याचे मूल्यमापन संशोधन करण्याचे ठरविले तर पदरी निराशा आल्याशिवाय राहणार नाही. हे संशोधक अभ्यासकांनी लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.

ग्रामीण साहित्याचे संशोधन करताना ग्रामीण साहित्यिकांचे आदर्श नेमके कोण आहेत. हे समजावून घ्यावे लागेल. कारण अनेक साहित्यिक कळत नकळतपणे त्यांचेच विचार वेगवेगळ्या पद्धतीने फुलवत नेतात. अथवा काही एक धागा अथवा अंश नकळतपणे त्या कलाकृतीत येत असतो. म्हणून ग्रामीण साहित्याची प्रेरणास्थाने नेमकी कोणती आहेत. हे समजल्यावरच ग्रामीण साहित्याचे संशोधन समीक्षण योग्य अंगाने होईल. अनेक संशोधक आणि समीक्षकांना वाटते की महात्मा गांधीनी 'खेड्याकडे चला' ही घोषणा दिली. म्हणजे महात्मा गांधी ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्थान आहे. वि.स. खांडेकरांनी 'अमृतवेल' या कादंबरीतील नायिकेला कठीण परिस्थितीत खेड्यात जाण्याचा सल्ला दिला असेलही पण परत ती नायिका देवदत्ताच्या प्रेमात अडकते हा भाग पुन्हा वेगळा. हे ग्रामीण साहित्याला न रुचणारे न पटणारे असेच आहे. कारण ग्रामीणांचे प्रश्न वेगळे आहेत. या अशा फंदात त्यांना पडण्यास वेळच नाही. मग महात्मा गांधींची प्रेरणा ग्रामीण साहित्यास कशी बरे मानता येईल. मग असे का घडते. कारण आपल्या धडावर आपलेच शिर नाही म्हणून. कारण आपला बोलविता धनी वेगळाच असतो. परंतु असो. आता ग्रामीण तरुण शिकला-सवरला आहे. त्याला आपले प्रेरणास्थान कोण आहे. हे समजण्यास लागले आहे. म्हणून तर स्वातंत्र्यानंतरच्या पिढींनी आपली प्रेरणास्थाने आदर्शस्थाने कोण आहेत याचा शोध घेतला आहे. एवढेच नव्हेतर त्या अनुषंगाने संशोधन देखील व्हायला लागले आहे.

ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्थान आहे फुले-शाहू-आंबेडकर ही त्रयी. या त्रयींनीच ग्रामीण साहित्याला ग्रामीण माणसाला न्याय दिला आहे. सामान्य माणसाच्या भाव-भावना सुखकर केल्या आहेत. महात्मा फुलेंच्या साहित्यावर एक नजर टाकली असता आपणाला हे चटकन लक्षात येईल. त्यांनी लिहिलेले गुलामगिरी, शेतकऱ्यांचा असूड, सार्वजनिक सत्यधर्म, ब्राह्मणांचे कसब, इशारा १ आणि २ अखंड वाचल्याशिवाय आणि अभ्यासल्याशिवाय ग्रामीण साहित्याचे संशोधन करणे अशक्यप्राय आहे. शेतकऱ्यांच्या वेदना नेमक्या काय आहेत. हे

पहिल्यांदा फुलेंनी इंग्रजांच्या लक्षात आणून दिले. त्यामळे ग्रामीण साहित्य संशोधनात महात्मा फुल्यांच्या साहित्याचा मागोवा घेतल्याशिवाय अभ्यास केल्याशिवाय ग्रामीण साहित्याचे परिशीलन योग्य पद्धतीने होणार नाही. हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. वास्तव आहे.

ग्रामीण साहित्यिकांनी लेखनाचे सर्वच प्रकार हाताळले आहेत. सर्वच प्रकारांमध्ये दर्जेदार-सकस अशी लेखननिर्मिती केली आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक हे प्रमुख प्रकार हातळले आहेतच. शिवाय समीक्षालेखनही विपुल प्रमाणात झाले आहे. तेव्हा ग्रामीण साहित्याचे संशोधान करताना हे सर्वच प्रकारचे लेखन त्या पातळीवर जाऊन समजून घ्यावे लागेल आणि नंतरच या साहित्याचे संशोधन चांगल्या अंगाने होण्यास मदत होईल.

राजन गवस, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव, श्रीराम गुंदेकर, रा.रं.बोराडे, भास्कर शेळके, गणेश देशमुख, द.ता.भोसले, प्रतिमा इंगोले, या प्रभूतींनी ग्रामीण साहित्याचे समीक्षण आणि संशोधन केले आहेच शिवाय आजही अनेक जण विद्यापीठ-महाविद्यालयीन पातळीवर ग्रामीण साहित्याचे संशोधन करताना दिसत आहेत ही जमेचीच बाजू आहे.

सारांश, ग्रामीस साहित्याचे संशोधन करत असताना सामान्य माणूस, त्यांच्या भोवतालचा प्रदेश, त्याच्या भावभावना यांना वाट करून देणे महत्त्वाचे वाटते. एवढेच नव्हेतर महात्मा फुले, शाहू, आंबेडकर यांच्याशिवाय ग्रामीण साहित्य संशोधन परिपूर्ण होणारच नाही. ग्रामीण साहित्य संशोधनातूनच खऱ्या अर्थाने सामान्य-माणसाचे उन्नयन होणार आहे. समाज परिवर्तन होणार आहे. समग्र मराठी साहित्य संशोधनाला नवी दिशा मिळणार आहे.

★★★

# आदिवासी साहित्याचे विद्यापीठीय संशोधन

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर

**प्रास्ताविक :-**

महाराष्ट्रातील पुणे विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ इ. विद्यापीठात कला व ललित कला विद्याशाखेत अनेकांनी आदिवासी साहित्यावर संशोधन केलेले आहे. आदिवासी साहित्यावरील हे संशोधन विद्यापीठ मान्य, समाजमान्य, अभ्यासक समीक्षकांनी त्याला मान्यता दिली आहे. प्रोत्साहन व स्वागतशीलतेची भूमिका या संदर्भात दिसते. विद्यापीठीय क्षेत्रातील आदिवासी साहित्य संशोधनाचे स्वरूप सामान्यत: भाषिक अभ्यास, लोकसाहित्य, आर्थिक व सामाजिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक, भाषा, सामाजिक परिवर्तन, आदिवासी कला, आदिवासीविषयक विविध नियतकालिके (साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, षणमासिक, वार्षिक अंक, विशेषांक, स्मरणिका इ.) समग्र आदिवासी जीवन, समाज, साहित्य, संस्कृती विविध वाङ्मय प्रकारच्या अनुषंगाने विशेषत: आदिवासी कथा, कविता, कादंबरी, चरित्र, स्वकथन, नाटक, वैचारिक निबंध, ललितगद्य, संशोधन विषयक इ.ची जाणीवपूर्वक निवड अभ्यासकांनी केलेली आहे.

या अभ्यास संशोधनामध्ये विशेषत: डॅा. अनिल सहस्रबुद्धे, डॉ. विनायक तुमराम, भाऊराव मांडवकर, जनार्दन रानडे, अलका हिवाळे, पंडित शिंदे, अरुणा घोगरे, सुधाकर चव्हाण इ.नी इ.स २००० पूर्वीच्या काळात आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, भाषिक, ललित, लोकसाहित्य विषयक, आदिवासी कला इ. विषयांची निवड करून आपल्या अभ्यास, संशोधन, चिंतनाच्या द्वारे आदिवासी साहित्याला विद्यापीठीय संशोधन क्षेत्रात नावलौकिक मिळवून दिला. या सर्व अभ्यासातून आदिवासी कोण? आदिवासी जमाती, आदिवासींचे अस्तित्त्व, आदिवासींच्या परंपरा, आदिवासींची अस्मिता, आदिवासींच्या विविध समस्या इ.ना मराठी साहित्य संशोधनाच्या पटलावर अधोरेखित केले. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात या सर्वच अभ्यासक, संशोधकांनी संशोधनाची शिस्त बाळगून आदिवासींचे वस्तुनिष्ठपणे, तटस्थपणे विश्लेषण केले आहे. या अभ्यासामुळे

महाविद्यालय व विद्यापीठ पातळीवरील अध्यापन, अध्ययन व संशोधन क्षेत्रात आदिवासी साहित्याचा बोलबाला झाला. यामुळेच २१ व्या शतकाच्या पहिल्या १२ वर्षात आदिवासी साहित्याकडे नवोदित अभ्यासक, संशोधक, प्रबंधलेखकांचे लक्ष्य आकर्षित झाले यातूनच आदिवासी साहित्याचा अभ्यास, संशोधन करणारा एक वर्ग उदयाला आला. केवळ नोकरीतील बढती, आर्थिक फायदे, मान-सन्मान म्हणून या वर्गाने अभ्यास केला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात जन्म घेतलेल्या या नवोदित अभ्यासक, संशोधक, प्रबंध लेखकावर उच्च शिक्षण घेत असताना वरील अभ्यासक, संशोधकांच्या अभ्यास-संशोधन कार्याचा प्रभाव होता. याशिवाय दलित चळवळ आणि दलित साहित्य, ग्रामीण चळवळ आणि ग्रामीण साहित्य, कामगार चळवळ आणि कामगार साहित्य, जनसाहित्याची चळवळ, विज्ञान साहित्य, स्त्रीवादी साहित्य, भटक्या-विमुक्तांची चळवळ एकूणच उपेक्षित वंचितांची चळवळ इ. सर्वांमधुन महाराष्ट्रात एक वाङ्मयीन, सांस्कृतिक, वैचारिक मंथन झाले. परिणामी या नवोदित अभ्यासक, संशोधकांवर सामाजिक परिशीलनाचे , परिवर्तनाचे संस्कार झाले. यामुळेच केवळ सहानुभूती म्हणून नव्हे तर आस्थेवाईकपणे, जाणीवपूर्वक हा नवोदित वर्ग आदिवासी साहित्य संशोधनाकडे आकर्षित झाला.

इ.स. २००० नंतरच्या काळात आदिवासी साहित्याचे विद्यापीठीय अभ्यास-संशोधन करणाऱ्यांमध्ये डॉ. माहेश्वरी गावित, डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. राजेंद्र ठाकरे, डॉ. विनोद कुमरे, डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, डॉ. अजय खडसे, डॉ. सुनिल पखाले, डॉ. संजय लोहकरे, डॉ. उल्का शेवकर, डॉ. सुधाकर बोथिकर आदींनी विविध विद्यापीठात शोधप्रबंधाचे काम पूर्ण केलेले आहेत. यातील अनेकांचे शोधप्रबंध महाराष्ट्रातील नामवंत प्रकाशन संस्थेकडून प्रकाशितही झालेले आहे. या शिवाय महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये एम.फिल व पीएच.डी. चे संशोधन आज कार्यरत आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रा. डाखोरे, प्रा. विठ्ठल केदारी, प्रा. शितल पवार, प्रा. रेखा सैद, प्रा. विक्रम जाधव, प्रा. विजय काळे, प्रा. सरिता सजगणे, प्रा. सविता गतके, प्रा. मंगेश आतकोरे, प्रा. सुनिल अवसरे, प्रा. ज्योती झालटे, प्रा. पखाराम डाखोरे इ.

विद्यापीठीय शोधप्रबंध लेखनाबद्दल या साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक प्रा.डॉ विनायक तुमराम म्हणतात की, पाश्चात्त्य आणि एतद्देशीय लोकांनी कोणत्याही उद्देशाने का असेना, हे त्यांचे कार्य येणाऱ्या आदिवासी पिढ्यांसाठी मुलभूत

आणि दिशादर्शक आहे, हे मान्य केलेच पाहिजे. (पृ.३६०) आदिवासी साहित्याचा अभ्यास-संशोधन-शोधप्रबंध लेखनामुळे आदिवासी साहित्य म्हणजे काय? या साहित्याचे प्रयोजन, भूमिका, समाजाभिमुखता, जीवनवादी दृष्टिकोन, स्वरूप सिद्धांत कोणते हे परिचित झाले. या साहित्याची दिशा काय? व्याप्ती, जाणीव, प्रेरणा, प्रवृत्ती कोणत्या हे अधोरेखित झाले या साहित्याच्या भवितव्याबद्दल वाङ्मयीन वैचारिक मंथन झाले. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये या साहित्यावर झालेले संशोधन परिपूर्ण झालेले आहे. असे म्हणता येणार नाही. अजूनही नव्या अभ्यासक-संशोधकांना संशोधन करण्याची भरपूर संधी आहे. विशेषत: या साहित्याचे सिद्धांत, सौंदर्यशास्त्र, समीक्षाशास्त्र, भाषाशास्त्र, आदिम कलातत्त्व, आदिवासी धर्म, सांस्कृतिक भावविश्व, जागतिकीकरणातील आदिवासी इ. अनेक विषयांची चर्चा-वैचारिक मंथन बाकी आहे. याशिवाय आदिवासींचे वैचारिक वाङ्मय, ललितगद्यलेखन, संकलन, प्रवासवर्णन, बोलीभाषा व आदिवासी बोली अध्ययन-अध्यापनातील अडथळे इ. अनेक विषय अजून शिल्लक आहे.

**निरीक्षणे –**

१) आदिवासी आणि बिगर आदिवासी अभ्यासक-संशोधकांकडून झालेले संशोधन मूलभूत विषयांची चर्चा करणारे आहे. २) समाजमनस्क, सहृदयतेने संशोधनाचे काम झालेले आहे. ३) यात वस्तुनिष्ठता, तटस्थपणा आहे, भावनिकतेचा स्पर्श नाही. ४) विश्लेषण, संशोधनाची भूमिका यातून सिद्ध होते. ५) अभ्यास-संशोधनाची एक काटेकोर शिस्त, संशोधन पद्धतीचा अवलंब झालेला आहे. ६) या प्रकाराच्या संशोधनातून नव्या पिढीला आश्वासक बळ व प्रेरणा मिळते.

**संदर्भ –**

१) तुमराम, विनायक, आदिवासी साहित्य-दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र आ. १५ नोव्हेंबर २०१२ पृ. २९२.

२) गावित माहेश्वरी, महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य- एक शोध, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे प्र.आ. २००८ पृ. ७७

३) जाधव, रा. ग. व इतर (संपा), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग लिहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. प्र.आ.मे. २००९ पृ. ३६०

४) वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी साहित्य-एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १५ ऑगस्ट २००९.

# 'लोकसाहित्याचे संशोधन'

प्रा. डॉ. दिलीप कसबे

संशोधन म्हणजे नव्याने शोध घेणे, ज्ञान वाढवणे, ज्ञानात भर घालणे होय. मानव, समाज, संस्कृती या संबंधी नवीन मांडणी करणे. अनेक भारतीय आणि पाश्चात्त्य संशोधकांनी संशोधनाच्या संज्ञा स्पष्ट करून आपले विचार मांडले आहेत. संशोधन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. माणूस जिज्ञासे पोटी अनेक गोष्टींचा शोध घेत असतो. निसर्गात घडणाऱ्या अनेक गोष्टींचा शोध घेऊन त्यांची संगती लावण्याचा माणसाने प्रयत्न केला आणि करत आहे. मानव हा एकमेव प्राणी संशोधन करणारा प्राणी आहे. आपले जीवन सुखी व्हावे, यासाठी निर्सगातील घटनांचा शोध घेतला. याच संशोधन वृत्तीतून संशोधनाची अनेक क्षेत्रे निर्माण झाली. जे माहीत नाही, ते माहीत करून घेणे, मिळालेल्या माहितीच्या आधारे नवीन गोष्टींचा पुन्हा शोध घेणे. त्या ज्ञानाची संगती लावणे, त्याचे विश्लेषण करणे, संश्लेषण करणे आणि एखादे नवे तत्त्व शोधून काढणे. असे संशोधनाचे स्वरूप असते.

मानवी जीवनात साहित्य आणि कला यांना महत्त्वाचे स्थान आहे. माणसाने सुरूवातीला कला आणि साहित्याची निर्मिती केली. आपल्या मनातील भाव-भावना त्याने कृती आणि उक्तीच्या माध्यमातून व्यक्त केल्या. यातून लोकसाहित्याची निर्मिती झाली. लोकसमूह निर्माण झाले. प्रत्येक समूहाने आपले काही नियम केले. यातून धर्म व संस्कृतीची निर्मिती झाली. देव, धर्म, रूढी परंपरा, जीवनाविषयीच्या कल्पना आणि संकल्पना निर्माण झाल्या. आजची संस्कृती कशी विकसित झाली याचा शोध लोकसाहित्यातून घेता येतो. संस्कृतीची बीजे, लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार, लोककला आणि लोकनृत्यामध्ये सापडतात. मोहोंजोदडो या संस्कृतीचा शोध लोकसाहित्याच्या आधारेच लागला. मोहोंजोदडो संबंधी सिंध प्रातांत एक कथा प्रचलित होती. राखलदास बॅनर्जी नावाच्या संशोधकाने प्रचलित असलेल्या कथेच्या आधारे संशोधन केले आणि जमिनीच्या पोटात गाडलेले पाच हजार वर्षापूर्वीचे एक शहर सापडले. अशा काही आख्यायिका व दंतकथांचा शोध घेतला तर संस्कृतीची नवनवीन रूपे सापडू शकतील. मानव समूह कसे विकसित होत गेले. तसेच समाजातील काही

अवशेष नामशेष झाले. याचा शोध लोक साहित्याच्या आधारे घेता येऊ शकतो. म्हणून पाश्चात्त्य देशात मानववंश शास्त्रज्ञांनी लोकसाहित्याचा अभ्यास आणि संशोधन केले. प्राचीन इतिहासाचा शोध लोकसाहित्याच्या आधारे घेता येऊ शकतो. मानववंशशास्त्र, इतिहास, पुरातत्वशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, संस्कृती इ. अभ्यास विषयांना साधन सामग्री पुरविण्याचे काम लोकसाहित्य करते. म्हणून इतर ज्ञानशाखांच्या संशोधनासाठी लोकसाहित्याचा उपयोग होऊ शकतो.

''भारतीय विवाह संस्थेचा इतिहास'' हे पुस्तक राजवाडे यांनी प्रचलित लोक परंपरेच्या आधारे लिहिले आहे. भारतीय समाजव्यवस्था कशी निर्माण झाली, वेगवेगळे समाजगट कसे अस्तित्वात आले, महाराष्ट्रात असलेल्या जाती जमातींची निर्मिती कशी झाली. याचा शोध लोकसाहित्याच्या आधारे घेता येऊ शकतो. जातींचा परस्परांशी असलेला संबंध एकमेकांच्या बद्दल असलेल्या भाव-भावना, द्वेष-मत्सर, राग-लोभ, हेवे-दावे, समज-गै-समज, गुण-दोष, व्यवहार करण्याची पद्धती, स्वभाव, एकमेकांबद्दलचे दुषित मत हे लोकसाहित्याच्या अभ्यासाने शोधता येते. न्हावी चतुर, ब्राम्हण लोभी, मारवाडी कंजूष, महार इमानदार, इ.गुण वर्णन करणारे गीत प्रभाकर मांडे यांच्या पुस्तकात आहे.

जातीचा सांगतो भाग, नका धरू राग, जात कुणब्याची हुशार, आठरा दानच
ठेवणार, त्याच्याहून नाही कोणी थोर, रे कुणब्याच्या दादा।।धृ।।
म्हाराची जात फुग्गीर, काचाला गोंड लावून चार, बायकोला चिंध्याचा
भारनाही तुझा मोळीवर संसार, रे महाराच्या दादा ।।धृ।।
म्हाराची जात इम्मानी, करून बेमानी, चांभारानी धर्मच बुडविला, रंग
देती कच्च्या कातडयाला, आरी काय टोचे कातडयाला, पानी काय भाउच्या
कुंडाला, चांभारीन आवरेना भांडायला, रे चांभाराच्या दादा ।।धृ।।
मुसलमानाची जात लागट, करूनी एक्कट, जाउन इदग्यावर लढणार,
सायबाला मदत होणार, भटुडयाहागत पळणार, रे भटाच्या दादा।।धृ।।
न्हाव्याची जात सतरा खोडी, हातामंदी छडी, हमेशा टक्कुरच बडी, इकडे
प्रताना केली गर्दी, गुरवीन तिथ बेल घाली, रे गुरवाच्या दादा ।।धृ।।
वान्याची जात बेशरम, फोडे भरम, लहेंगा काय नेसे बेंबी खाली,
बेंबी काय झाली उखळावानी, लहेंगाकाय देवळी बांधली गनपतीला,
रे गनपतीच्या दादा।।धृ।।

वरील गीतातून जाती जातीतील समज स्पष्ट होतात. तसे त्यांचा व्यवसाय, समाजातील स्थानही स्पष्ट होते. स्त्रियांचे समाजातील स्थान, लहानपणापासून होणारे संस्कार, पुढील उदाहरणातून सांगता येईल एका मुलीचे लग्न होऊन ती सासरी निघते तेव्हा तिची आई तिला तीन गोष्टी सांगते. आरसा स्वच्छ पुस, विस्तवाला जप, घेता येईल तेवढे घे पण देवू मात्र नकोस. तेव्हा तिच्या नवऱ्याला संशय येतो या वाक्याचा अर्थ त्याला कळत नाही. तो त्याच्या बायकोला विचारतो. तुझा आईने काय सांगितले हे मला स्पष्ट करून सांग. ती सांगते, आरसा स्वच्छ पूस म्हणजे, घर आरशा सारखे स्वच्छ ठेव. नवरा विस्तवाच्या निखाऱ्या सारखा असतो, त्याला जप, जेवढे दुःख सहन करता येईल तेवढे सहन कर पण कुणाला दुःख देऊ नको. तसेच त्यांचा दुय्यम दर्जा पुढील म्हणीतून लक्षात येईल.''बाईची जात कांदयाची पात मारली लाथ पडली सांदाडात'' लोक साहित्याची परंपरा स्त्रियांनीच जतन करून ठेवली आहे. तिचा सुसंस्कारीपणा, भावनाशील वृत्ती, श्रमनिष्ठा इ बरोबरच स्त्रीच्या अस्तित्वाचा प्रश्न या दृष्टीनेही लोकसाहित्याचे संशोधन करता येऊ शकले. भौगोलिक परिस्थितीमुळे काही प्रथा पडतात. उदा. पारनेर तालुक्यातील अक्कलवाडी या गावात लग्नाच्या दिवशी कांदा खात नाहीत. अशी प्रथा प्रचलित आहे. याचा शोध घेतला असता एका बुजूर्ग माणसाने सांगितले, हे गाव अडवळणी आहे.

इथे कोणत्याही सुविधा नाहीत. सर्व डोक्यावर वाहून आणावे लागते. लग्नाच्या दिवशी जर कांदा खायला दयायचा असेल तर एक दोन पोतीही पुरणार नाहीत, म्हणून लग्नाच्या दिवशी कांदा न खाण्याची प्रथा पडली आहे. ही माहीती तीस वर्षा पूर्वीची आहे. म्हणून लग्नाच्या दिवशी कांदा खात नाहीत. अशा प्रकारच्या अनेक प्रथांचा शोध लोकसाहित्याच्या अभ्यातून घेता येतो. महाराष्ट्रातील देवदेवतांची निर्मिती, त्यांचे मूळ लोकसाहित्यात सापडते. मानवी मनातील अनेक भाव-भावना देवतांच्या कथा व गीतांमधून व्यक्त झालेल्या दिसतात. देवदेवतांचा शृंगार म्हणजे, तत्कालीन समाज मनातील भावनाच व्यक्त झालेल्या आहेत. हे आपल्या सहज लक्षात येते. खंडोबा हे महाराष्ट्रातील बहुजन परंपरेतील लोक प्रिय दैवत परंतु एक घरात खंडोबाची तळी भरली जाते. जर खंडोबाची तळी भरली नाही तर आपली तळी भरलीच समजा अशा प्रकारची भावना लोकांच्या मनात आहे. या खंडोबाच्या दोन बायका आहेत. एक वाण्याची आणि दुसरी धनगराची या उदाहरणातून द्विभार्या पद्धती बरोबरच आंतरजातीय विवाह ही संकल्पनाही

लक्षात येते. ठरावीक समाजाचे प्रबल्य संपूर्ण समाजावर राहावे, समाजात विषम व्यवस्था टिकून राहावी या हेतूनेही काही रूढी, परंपरा, प्रथा, समजूती यांची निर्मिती झाली. याचाही शोध लोकसाहित्याच्या अंगाने घेता येऊ शकेल. कारण हिटलरने आपली सत्ता मजबूत आणि भक्कम व्हावी यासाठी लोकगीतांची निर्मिती करून घेतली होती. हिटलरने सत्ता टिकविण्यासाठी लोकसाहित्याचा उपयोग केला. भारतातही पुरुषी सांस्कृतिक वर्चस्व टिकून राहावे अशा प्रकारे लोकसाहित्याचा वापर केला आहे का? महाराष्ट्रात निर्माण झालेले विविध संप्रदाय आणि लोकसाहित्य याचा संबंध तपासता येईल. इंग्रजी सत्तेच्या प्रभावाने लोकसाहित्य व लोककलेत काय बदल होत गेले. लोकसाहित्याचा केवळ साहित्याच्या अंगाने संशोधन न होता संगीत आणि नृत्य यांचा लोकसाहित्याशी घनिष्ट संबंध आहे. पण साहित्याच्या अंगाने लोकसाहित्याचे संशोधन होत आहे. जागतिकीकरण, आधुनिकीकरण, उदारमतवाद आणि लोकसाहित्य.

सामाजिक स्तरभेद आणि लोकसाहित्य. इतर भारतीय भाषा व मराठी लोकसाहित्य. कलगी तुरा, जागरण, गोंधळ यांच्यात झालेला बदल. अप्रकाशित लोकसाहित्याचे संशोधन. लोकसाहित्याचा अभ्यास आंतरविदया शाखीय होणे गरजेचे आहे. केवळ एखादया विषयाचा घटक म्हणून लोकसाहित्याचे संशोधन न होता स्वतंत्र अभ्यास क्षेत्र म्हणून व्हावे. हीच अपेक्षा

★★★

# संशोधनात संदर्भाचे महत्त्व

प्रा.सुवर्णा खोडदे

उच्च शिक्षणामध्ये अलीकडच्या काळात संशोधनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे 'संशोधन पद्धती' हा शब्द प्रयोग परवलीचा बनला आहे. वास्तविक उच्च शिक्षणामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने संशोधनाला विशेष महत्त्व दिल्याने उच्चशिक्षणाशी निगडीत असलेला शिक्षक वर्ग वेगवेगळ्या प्रकारच्या संशोधनामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतलेला दिसतो. असे असले तरी संशोधनातील काही महत्त्वाच्या गोष्टी संशोधकाकडून अनाहुतपणे राहून जातांना दिसतात. हे आपणांस विविध संशोधन पत्रिका व शोधनिबंधाचे संपादित ग्रंथ पाहिल्यानंतर नजरेस पडते. त्यामुळे एखादा शोधनिबंध जरी कष्टपूर्वक तयार केला असला आणि लेखकाने संशोधनाच्या काही टप्प्यांकडे दुर्लक्ष केले तर तो निबंध, शोधनिबंध वाटत नाही. त्यामुळे शोध निबंधाचे महत्त्व कमी होते. म्हणून संशोधनातील विविध टप्प्यांचा विचार संशोधाकाने नीट करावयास हवा.

प्रबंधाचे संशोधन असो वा निबंधाचे संशोधन असो, या दोन्ही मध्ये विषय निवड, गृहीतके, अभ्युपगम, संशोधन आराखडा, संदर्भ शोध, साधन सूची, टिपणे, संदर्भ साधने, तळटिपा इत्यादी गोष्टींना अत्यंत महत्त्व असते. किंबहुना त्याशिवाय संशोधन पूर्णच होऊ शकत नाही. यापैकी संदर्भ या घटकाचा येथे विचार करणार आहोत.

संशोधनामध्ये संदर्भ व वापरलेल्या संदर्भाची माहिती देण्याची शास्त्रशुद्ध पद्धत आहे. बऱ्याच वेळेला संशोधक संदर्भाची माहिती चुकीच्या पद्धतीने देताना दिसतो. संदर्भाचा उपयोग, संदर्भाची माहिती ती देताना वापरण्यात येणारी अवतरणे या गोष्टी व्यवस्थित लक्षात ठेवल्या पाहिजेत. काही संदर्भ तळटिपांच्या माध्यमातून देता येतात. या सर्वांचा शास्त्रशुद्ध वापर करावा.

अवतरणांचा उपयोग

प्रबंधात किंवा निबंधात अवतरणे वापरली तर त्याचा उपयोग आवश्यक तेथेच करावा. एकदा घेतलेले अवतरण पुन्हा पुन्हा वापरू नयेत. अवतरणे घेताना पुढील गोष्टी त्यातून साध्य झाल्या पाहिजेत.

१. अवतरणातील मुद्दा महत्त्वाचा असलेला पाहिजे.

२. त्यातील विधान शंकास्पद असता कामा नये.

३. अवतरणातील मत रूढ मताहून वेगळे आणि लक्षणीय असले पाहिजे.

४. संशोधकाला जे मत मांडावयाचे आहे. ते त्या अवतरणात नेमके मांडलेले असावे.

५. अवतरणे मूळ ग्रंथातील असावीत.

**तळटिपा उपयोग**

तळटिपांच्या माध्यमातून संदर्भ देता येतात. तळटिपांमुळे शोधनिबंध किंवा प्रबंध हा साधार व सप्रमाण वाटतो. शोध निबंधातील किंवा प्रबंधातील घेतलेल्या आधाराला साधनाला निर्देशित करण्यासाठी तळटिपा दिल्या जातात. तळटिपा पृष्ठाच्या तळाला, निबंधाच्या शेवटी किंवा प्रबंधातील प्रकरणाच्या शेवटी देण्याची पद्धत आहे. तळटिपा दिल्याने वाचकाला अधिकची माहिती मिळते.

**तळटिपा देण्यामागील प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे असतात.**

१. दुसऱ्याचे मत मांडण्याची तळटिपेचा उपयोग करतात.

२. तळटिपेचा वापर केल्याने संशोधकाला स्वतःशी प्रामाणिक राहता येते.

३. प्रबंधातील विधानांची अधिकृतता आणि साधनांची विश्वसनीयता स्पष्ट करता येते.

४. तळटिपातील माहिती भावी अभ्यासकाला उपयुक्त ठरते.

५. अभ्यासकाच्या किंवा वाचकाच्या विचारांना चालना मिळावी.

६. साधनांचा शोध किती घेतला आहे. याची माहिती देता येते.

७. प्रबंधाच्या विवेचनातील अडथळा दूर करता येतो.

८. तांत्रिक माहितीमुळे विवेचनाचा ओघ खंडित होत नाही.

९. प्रबंधातील मथितार्थ व्यक्त करणाऱ्या एखाद्या शब्दाचा अर्थ, व्याख्या तळटिपांच्या माध्यमातून देता येते.

म्हणून तळटिपांचे प्रयोजन केलेले असते.

एखाद्या ठिकाणी तळटीप द्यावयाची झाल्यास अवतरण चिन्हाच्या नंतर थोडेस वर टीप क्रमांक द्यावा. असे टीप क्रमांक एकत्र करून त्यांचे संदर्भ एकत्रित दिले तरी चालते. हा टीप क्रमांक सुपरस्क्रिप्ट करावा. म्हणजे शिरोरेषेच्या पातळीत लिहावेत. तळटिपेसाठी एखाद्या ग्रंथाचा प्रथमच उपयोग होतो. तेव्हा तळटिपेतील

संदर्भ विषयक माहिती ग्रंथकाराचे नाव, ग्रंथाचे ना, प्रकाशन विषयक माहिती (प्रकाशनाचे नाव, स्थळ, प्रकाशन वर्ष) खंड, आवृत्ती, पृष्ठांक या गोष्टी द्याव्या लागतात. एखादी टीप पुन्हा पुन्हा वापरली तर पहिल्या टीपेतील संक्षिप्त रूप घ्यावे.

**तळटिपांत ग्रंथ विषयक संपूर्ण संदर्भात खालील गोष्टी क्रमाने लिहाव्यात.**

१. ग्रंथकाराचे नावः– आधी अद्य अक्षरे, नंतर अडनाव त्यानंतर स्वल्पविराम

२. ग्रंथाचे नावः– अधोरेखित व तिरपे (इटालिक्स्) केलेले असावे. ग्रंथ नावानंतर स्वल्पविराम

३. संपादक व भाषांतरकारांचे नावः ही नावे ग्रंथकाराच्या नावाप्रमाणेच फक्त सुरुवातीला 'संपा. किंवा भाषां.' असे लिहावे.

४. आवृत्तीचा उल्लेखः– एखाद्या ग्रंथाच्या एकापेक्षा अधिक आवृत्त्या निघाल्या असल्यास आवृत्तीचा क्रमांक टाकावा किंवा सुधारलेली आवृत्ती असल्यास 'सु. आ.' असा उल्लेख करावा व त्यानंतर स्वल्पविराम द्यावा.

५. प्रकाशनाचे नावः– ज्या प्रकाशनाने ग्रंथ प्रकाशित केला आहे. त्या प्रकाशन संस्थेचे नाव नंतर स्वल्पविराम द्यावे.

६. प्रसिद्धी स्थळः– येथे प्रसिद्ध झालेल्या ठिकाणाचे नाव द्यावे व स्वल्पविराम द्यावा.

७. प्रसिद्धी वर्षः– एखादा ग्रंथ ज्या वर्षी प्रकाशित झाला आहे. ते वर्ष लिहावे. तर वृत्तपत्राचा संदर्भ घेतल्यास त्या वृत्तपत्राचा प्रसिद्धी दिनांक द्यावा व पुढे स्वल्पविराम द्यावा.

८. खंडः एखादा ग्रंथ एकापेक्षा अधिक खंडात असेल तर त्याचा खंड क्रमांक लिहावा व पुढे स्वल्पविराम द्यावा.

९. पृष्ठ क्रमांकः येथे एक किंवा अनेक पृष्ठांचा संदर्भ द्यायचा असला तरी 'पृ.' असे संक्षिप्त लिहावे. त्यापुढे पृष्ठाचा क्रमांक लिहावा आणि पूर्णविराम द्यावा.

प्रबंधामध्ये लेखक किंवा ग्रंथाचा नामोउल्लेख पूर्णपणे आला असल्यास तळटीपेत त्याची पुनर्आवृत्ती करू नये. ग्रंथाच्या आतल्या पानावरची माहिती टिपेत नोंदविली पाहिजे कधी कधी मुद्रण स्थळ व प्रकाशन स्थळ एकच नसते हे ही लक्षात ठेवले पाहिजे.

**तळटिपांचे काही नमुनेः-**

१. शेळके भास्कर (डॉ.)संपा, मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना, प्रथमावृत्ती, शब्दश्री प्रकाशन, जुन्नर, २०१३, पृ...

**नियतकालिकातील संदर्भ देताना**

१. भागवत विद्युत, स्त्रीप्रश्नाबाबतचे मौलिक चिंतन, परिवर्तनाचा वाटसरू, वर्ष १३, अं.६ (१६ ते ३१ जुलै २०१३), पृ.३०-३१

**वृत्तपत्रातील लेखाचा संदर्भ असल्यास**

१. जोगळेकर र.वि., 'लोकमान्य टिळकः सह्याद्रीचा बेलागकडा', लोकमत, दि.१ ऑगस्ट २०१३, पृ.क्र. ६

**लेखसंग्रहातील लेख संदर्भ असल्यास**

ज्याने लेखसंग्रह लिहिले त्याचे नाव सर्व प्रथम, ज्या विषयावर लेख लिहिले ते दुहेरी अवतरणात, ज्या नियतकालिकेत लेख प्रसिद्ध झाले त्याचे नाव, नंतर संपा लिहून संपादकाचे नाव, प्रकाशनाचे नाव, प्रकाशनाचे ठिकाण, वर्ष, पृ...

**कोशार्तगत लेखांचा संदर्भ असल्यास**

लेखकाचे नाव, लेखाचा विषय, ज्या कोशात प्रकाशित झाला त्या कोशाचे नाव, ज्यांनी संपादित केला त्याचे नाव, खंड क्रमांक, वर्ष, पृ... असे लिहावे.

**दोन ग्रंथकाराच्या ग्रंथाचा संदर्भ असल्यास**

दोन्ही ग्रंथकाराच्या नावाच्या मध्ये व लिहावा. दुसऱ्या लेखकाच्या नावानंतर स्वल्पविराम द्यावा. नंतर ग्रंथाचे नाव लिहावे नंतर स्वल्पविराम द्यावा. नंतर प्रकाशनाचे नाव, ठिकाण, प्रकाशन वर्ष, पृ.

दोन पेक्षा जास्त लेखकांची नावे असल्यास एखाद्या ग्रंथाचे लेखक तीन किंवा तीनपेक्षा जास्त असल्यास पहिल्या लेखकाचे पूर्ण नाव लिहून पुढे एकेरी अवतरणात इ. (इतर) असे लिहावे व टीपाप्रमाणे इतर माहिती द्यावी.

### ग्रंथालयीन हस्तलिखितांचा संदर्भ असल्यास

ग्रंथालयीन हस्तलिखितांचा संदर्भ असल्यास हस्तलिखिताचे नाव दुहेरी अवतरणात लिहावे नंतर गोल कंसात (ह.लि.) त्यानंतर ते हस्तलिखित ज्यांच्या संग्रही होते. त्या मंडळाचे/संस्थेचे नाव, नंतर बाडक्रमांक लिहावा, पृष्ठ क्रमांक लिहावा.

### सरकारी दप्तरातील संदर्भ असल्यास

सरकारी दप्तर ज्या नावाने ठेवले आहे ते नाव, त्यातील खंड क्रमांक, वर्ष, पृ.क्र. असे लिहावे.

### खाजगी पत्रांचा संदर्भ असल्यास

पत्र लेखकाचे नाव, ज्यांना लिहिले त्यांचे नाव आणि पत्र दिनांक असा संदर्भ लिहावा.

### इंग्रजी ग्रंथाचा संदर्भ असल्यास

इंग्रजी ग्रंथाचा संदर्भ असल्यास त्या ग्रंथाचा उच्चार कोषात पाहून लिहावा किंवा त्या ग्रंथाचे मूळ नाव इंग्रजीत जसे दिले आहे तसे लिहावे.

### एकापेक्षा जास्त प्रकाशन स्थळे असल्यास

एकापेक्षा अधिक प्रकाशन स्थळे असल्यास प्रमुख कार्यालयाचे गाव किंवा प्रथम उल्लेख असलेल्या प्रकाशन स्थळाचा उल्लेख करावा. प्रकाशन वर्ष मिळत नसेल तर 'का. ना.' (काळ नाही) अशी माहिती द्यावी. एखाद्या ग्रंथाची प्रसिद्धी एकाहून अधिक वर्षात झाली असल्यास अशा वेळी पहिल्या व शेवटच्या खंडाचे प्रसिद्धी वर्ष लिहावेत.

### अमुद्रित साधनांचा संदर्भ असल्यास

अमुद्रित साधनांचा संदर्भ असल्यास ग्रंथाचे नाव अधोरेखित न करता ते दुहेरी अवतरणात लिहावे. त्यानंतर ते साधन जेथे मिळाले त्या ठिकाणाचे नाव लिहावे. अमुद्रित साधनांमध्ये हस्तलिखितासाठी दुहेरी अवतरणात ह.लि. टंकलिखितासाठी टं.लि., छायालिखितासाठी दुहेरी अवतरणात छा.लि., संगणक

लिखीतासाठी सं.लि. असा उल्लेख करावा.

### तळटिपातील विरामाविषायी सर्वसाधारण नियम

प्रारंभीच्या टीपानंतर आणि शेवटच्या पृष्ट क्रमांकानंतर पूर्णविराम येतो. तर मध्ये येणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या माहितीनंतर स्वल्पविराम द्यावा. प्रकाशकाचे नाव गोल कंसात लिहावे. संपूर्ण प्रबंधासाठी विराम चिन्हांची एकच पद्धत स्विकारावी.

### एकाच साधनांचा संदर्भ लागोपाठ आल्यास किंवा पुन्हा आल्यास

एखाद्या साधनाचा संदर्भ लागोपाठ आल्यास 'तत्रैव' किंवा 'कित्ता' असे लिहावे. आणि पृ.क्र. द्यावा तर काही वेळेस एखादा आलेला संदर्भ पुन्हा आल्यास उ.नि. (उपरी निदिष्ट) असे लिहून पृ.क्र. द्यावा. काही वेळेला वरील परिच्छेदात असे लिहावयाचे असल्यास उ.नि.प. असे लिहावे.

### संक्षेपाचा वापर

संदर्भातील पुनरावृत्ती टाळण्यासाठी संक्षेपाचा वापर करावा. हा संक्षेप बनविताना ग्रंथनामातील पहिला शब्द व ग्रंथकाराचे उपनाम हे पुनर्निर्देशाचे संक्षेप अधिक योग्य असतात. एकच ग्रंथकाराच्या एकापेक्षा अधिक ग्रंथांचा संदर्भ आला तर ग्रंथनामावरून संक्षेप बनवावा. यामुळे तळटिपात आणि ग्रंथात संक्षेप देणे सोयीचे होते. तसेच संक्षेपाची सूची प्रबंधाच्या सुरुवातीला किंवा शेवटी द्यावी. त्यामुळे प्रबंध वाचताना परीक्षकाला सोयीचे होते.

★★★

# 'स्त्री साहित्याचे संशोधन : काही दिशा'

प्रा. डॉ. सौ. उज्वला भोर

मराठी स्त्री साहित्याला जात्यावरील ओव्या स्त्रीगीते तसेच थेरीगाथांपासून ते वर्तमानकालीन विविध प्रकारांतील साहित्यापर्यंतची प्राचीन व दीर्घ परंपरा आहे. या परंपरेतील साहित्य जसे विविध रूपे आत्रण वळणे घेत गेले आहे, तसेच याचा विविध अंगांनी शोध घेत सखोल वेध घेण्याचाही प्रयत्न झालेला आहे. अर्थात वाङ्मयीन संशोधनाची प्रक्रिया ही त्याच्या चिरंजीवीत्माप्रमाणेच कधी न संपणारी प्रक्रिया असते. हे लक्षात घेतले तर स्त्री साहित्याचे संशोधन अजून बऱ्याच अंगाने करण्यानी गरज लक्षात येते.

स्त्री साहित्याचे आजवर झालेले संशोधन पाहता ते काही ठरावीक अंगाने व ठरावीक स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. म्हणूनच स्त्री साहित्याबाबत संशोधनानी काही नवी क्षेत्रे व दिशा धुंडाळाव्याशा वाटतात.

## मराठी स्त्री साहित्याचे संशोधन : परंपरा व स्वरूप

स्त्री साहित्याला प्राचीन व दीर्घ परंपरा असून उत्तरोत्तर या मराठी स्त्री साहित्यिकांनी साहित्याचे विविध प्रकार हाताळले आहेत. या विविध प्रकारी पण या संशोधनाला फार दीर्घ परंपरा असल्याचे म्हणता येत नाही. कारण अगदी प्रारंभीचे विद्यापीठाय संशोधन व प्रबंधविषय पाहिले तरी असे दिसून येते की जवळपास १९५० पर्यंत स्त्रीसाहित्य हा या संशोधनाचा विषय झालेला नाही. १९५१ ला डॉ. सरोजिनी बाबर यांनी मुंबई विद्यापीठातून 'स्त्रियांनी मराठीतील साहित्यसेवा' असा विषय घेऊन स्त्रीसाहित्याच्या संशोधनाला हात घातलेला दिसतो. त्यानंतर जवळपास तीन दशके म्हणजे १९८० पर्यंत अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतपत स्त्री साहित्यावर संशोधन प्रबंध झालेले आहेत. या अनुषंगाने उदा. दाखल पुढील काही प्रबंध सांगता येतात. १) 'बहिणाबाई चौधरी' एक चिकित्सक अभ्यास' (विजया खानझोडे – कर्नाटक १९८०) २) १७ व्या शतकापर्यंतच्या मराठी कवयित्रींचे प्राचीन मराठी साहित्य क्षेत्रातील वाङ्मयीन कार्य' (सुहासिनी इर्लेकर – डॉ. बा. आ. मराठवाडा विद्यापीठ – १९८६) ३) 'कुसुमावती देशपांडे यांच्या वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास' (अनंत देशमुख ,

मुंबई – १९७८) ४) 'मराठी कादंबरीत लेखिकांनी घातलेली भर'(प्रमिला भिरूड– डॉ. बा. आं. म. वि.–१९८०) ५) 'स्त्रियांनी लिहिलेले मराठी कथावाङ्मय– १८८५ ते १९७५– ( अंजली सोमण –शिवाजी १९७९) १९८० नंतर मात्र स्त्री साहित्याच्या संशोधनाला चालना मिळून संशोधनक्षेत्र विस्तारले त्यामुळे यापुढील काळात विविध अंगाने स्त्रीसाहित्याचे संशोधन झालेले पहायला मिळते. मराठी प्रबंध सूचीच्या आधारे वर्गवारी करून या संशोधनाचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे दाखविता येते.

१) अनुवादित साहित्यः एकूण १२ प्रबंधापैकी अनुवादित स्त्री साहित्यावर 'तस्लिमा नसरिन यांच्या बंगाली अनुवादित साहित्याचा चिकित्सक अभ्यास' ( रोकडे वैशाली, पुणे विद्यापीठ) हा एकमेव प्रबंध असून तोही अलीकडील म्हणजे २००६ साली झालेला आहे.

२) कथा–लघुकथा (एकूण प्रबंध ६०) :– या प्रकारच्या स्त्रीसाहित्यावर संशोधन झालेले ७ प्रबंध असून त्यात डॉ. विजया राजाध्यक्ष, वसुधा पाटील, श्रीमती वसुंधरा पटवर्धन, आशा बगे, आशा कर्दळे, सानिया अशा काही कथा लेखिकांच्या साहित्याच्या अभ्यासाबरोबरच स्त्रियांच्या समग्र कथालेखनाचा वेध घेऊ पाहणारे 'स्त्रियांनी लिहिलेले मराठी कथा वाङ्मय' अंजली सोमण) असे अपवादात्मक प्रबंध आहेत. तसेच वेगळ्या अंगाने शोध घेऊ पाहणारे '१९६० नंतरच्या स्त्रियांच्या कथालेखनातील सामाजिकता' (शिवाजी सोनालकर २००३, शिवाजी विद्यापीठ) असेही काही प्रबंध आहेत.

३) कादंबरी वाङ्मय : काशिबाई कानिटकर, ज्योत्सना देवधर अशा लेखिकांपासून ते अलीकडील मेघना पेठे, गौरी देशपांडे, प्रतिमा इंगोले, आशा बगे इ. पर्यंतच्या बहुतेक स्त्रीकादंबरीकारांच्या लेखनावर संशोधन प्रबंध झालेले आहेत. हे संशोधन नायिकांनी प्रतिमा, स्त्रीवादी भूमिकेतून आकलन, समाजप्रवृत्तीचे दर्शन, अशा विविध अंगांनी झालेले आहे. 'मराठी कादंबरीचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास' (पाटील गजानन २००१, शिवाजी विद्यापीठ) असा एखादा लक्षणीय प्रबंधही यात पहावयास मिळतो.

४) प्राचीन– अर्वाचीन काव्य : प्राचीन स्त्रीकाव्याचा विचार करता संत जनाबाई, संत बहिणाबाई, चोखामेळ्याच्या परिवारातील संतकवयित्री इ. संशोधकांच्या संशोधनाचा विषय झालेल्या आहेत. मात्र संत मुक्ताबाई, महदंबा या आद्य व महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या कवयित्री स्वतंत्रपणे संशोधनाचे लक्ष्य झालेल्या

नाहीत. तसेच संत कान्होपात्रा, संत वेणाबाई आउद्या देमती पैठणकर देमाईसा इ. इतर महानुभावीय कवयित्री अशा या काळातील कित्येक स्त्री साहित्यिक संशोधनापासून दूर्लक्षित राहिलेल्या आहेत. ज्या स्त्रीसाहित्यिकाबाबत संशोधन झालेले आहे. तेही काही मर्यादित/ ठरावीक अंगाने असे दिसून येते.

अर्वाचीन काळातील स्त्रीकाव्य संशोधनाबाबतही असे दिसून येते की, इंदिरा संत, शांता शेळके, बहिणाबाई चौधरी, संजीवनी मराठे अशा काही प्रसिद्ध व ठरावीक कवयित्रीबाबतच स्वतंत्रपणे संशोधन झालेले आहे. इतर संशोधनाचे स्वरूप प्रामुख्याने व्यक्ती व वाङ्मय, कालखंडातील कवितेचा अभ्यास, काव्यातील स्त्रीजीवन, दलित कवयित्रीच्या काव्याचा अभ्यास, स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास, मरनीवाङ्यातील आधुनिक कवयित्रींचा अभ्यास असे ठरावीक स्वरूपाचे आहे.

५) चरित्र-आत्मचरित्र - मराठी स्त्रीचरित्र व आत्मचरित्रांबाबतच्या संशोधनाचे प्रमाण अधिक असून यात स्वातंत्र्यपूर्व काळातील चरित्र-आत्मचरित्रांपासून ते अगदी अलीकडील कालात (१९९०) लिहिल्या गेलेल्या चरित्र-आत्मचरित्रांचे संशोधन केले गेलेल आहे. तसेच यात दलित स्त्री लेखिका, चित्रपट क्षेत्रातील कलावंत स्त्रिया, राजकारणातील स्त्रिया, साहित्यिकांच्या सहधर्मचारिणी, आंबेडकरवादी स्त्री आत्मचरित्रकार अशा अनेकांचा विचार केले गेला आहे. शिवाय स्त्रीवादी दृष्टिकोन, पुरुषांचे चित्रण, सामाजिक संदर्भ अशा अनेक अंगांनी हा अभ्यास झालेला आहे. असे असले तरी चरित्र-आत्मचरित्र वाङ्मय प्रकारानी सत्यनिष्ठता लक्षात घेता या प्रकारातील स्त्री साहित्याच्या संशोधनाला विविध आयाम प्राप्त होतात, हेही लक्षात घ्यावे लागते.

६) नाट्यवाङ्मय - एकूण मराठी नाट्यवाङ्मयाचा विचार करतो स्त्री नाटककारांनी संख्या तशी कमीच आहे. असे असले तरी संशोधकीयदृष्टया ह्या दालनाकडे संशोधकांनी फारसे लक्ष दिलले दिसत नाही. कारण विद्यापीठीय संशोधन प्रबंधाचा विचार करता मराठी नाट्यवाङ्मयावर १२५ प्रबंध लिहिले गेले आहेत. मात्र त्यात स्त्री नाट्यवाङ्मयाचा वेध घेणाऱ्या प्रबंधांनी संख्या अगदीच नगण्य म्हणजे उदा. दाखल सांगायचे झाल्यास 'मराठीतील स्वातंत्र्योत्तरकालीन स्त्री नाटककारांच्या नाट्यवाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास - १९४७ -९० (पेशेकर सुधा, नागपूर विद्यापीठ) अशा एखाद्या दुसऱ्या प्रबंधापर्यंत सीमित असलेली दिसते.

७) नियतकालिके, पत्र वाङ्मय, विनोदी वाङ्मय, विज्ञान साहित्य, प्रवासवर्णन या वाङ्मयाबाबतही फारशी वेगळी परिस्थिती दिसून येत नाही. नियतकालिक

क्षेत्रातील 'स्त्री संपादित नियतकालिके : एक चिकित्सक अभ्यास – १८५० ते १९५० (अभ्यंकर निला, पुणे विद्यापीठ २००६) हा एकमेव प्रबंध दिसून येतो. तर स्त्री पत्रवाङ्मयाबाबत 'स्त्रियांनी शतपत्रे' (इ.स. १८५० ते १९५०) या स्वाती कर्वे संपादित संशोधन ग्रंथाशिवाय अन्य संशोधन आढळत नाही. विनोदी साहित्य, विज्ञान साहित्य, प्रवासवर्णन इ. वाङ्मयप्रकार तर अस्पर्शितच राहिलेले दिसतात.

**स्त्री साहित्य संशोधन : काही नव्या दिशा**

स्त्री साहित्याबाबत झालेल्या संशोधनाचे वरील स्वरूप पाहता या साहित्याचे आणखी कितीतरी दालने संशोधना अभावी पडून असलेली दिसतात. दळणवळणाच्या संदेशवहनाच्या अत्याधुनिक साधनांनी अनुपलब्धता असण्याच्या काळात पत्रवाङ्मय हाच एकमेव आधार होता. व हा आधार स्त्रियांनी घेल्याचा पुरावा थेट पुराणकाळातील रुक्मिणीने सुदेव ब्राह्मणामार्फत श्रीकृष्णाला पाठविलेल्या पत्राच्या रूपाने पहायला मिळतो. ही बाब स्त्रीपत्रवाङ्मयाबाबत निश्चितच कुतूहल जागविणारी व त्या अनुषंगाने पत्रवाङ्याचा शोध घेण्यास प्रवृत्त करणारी म्हणता येते. ब्रिटिश राजवटीच्या आधुनिक काळात शिक्षण व नोकरी धंद्याच्या निमित्ताने अनेक तरुण परदेशी जात. त्यात आनंदीबाई जोशी, पंडिता रमाबाई यासारख्या स्त्रियांनी अपवादाने का होईना उदा. आढळतात. त्या नंतरही शिक्षणाच्या निमित्ताने एकत्र ओल्या अनेक स्त्रीपुरुषांमध्ये पत्रात्मक संवाद झालेला आहे. (उदा. कुसुमावती – अनिल, सुनिता देशपांडे जी.ए. कुलकर्णी) अशा स्त्री-पुरुषांमधील पत्र व्यवहाराचे संशोधन मराठी पत्रवाङ्मय दालनात भर घालणारे होऊ शकते.

नाट्यवाङ्मयाला व्यावसायिकतेनीही एक बाजू असली तरी या वाङ्मयाबाबत स्त्रियांच्या योगदानाचे प्रमाण हा जसा संशोधनाचा भाग होऊ शकतो तसाच स्त्रियांचे नाट्यवाङ्मय हा अनेक अंगांनी संशोधनानी गरज असल्याचे दाखविते.प्रवासवर्णन व विनोदी वाङ्मय या साहित्य प्रांतातही अनुक्रमे चारूशीला गुप्ते, विजया जोशी,शांता धांदरफळे,इंदुमती शेवडे, मृणालिनी देसाई, मेधा काळे, व शकुंतला परांजपे, शकुंतला बोरगावकर, इंद्रायणी सावकार, शकुंतला फडणीस इ. स्त्रीलेखिकांनी आपली मुद्रा उमटविलेली आहे. परंतु संशोधकांच्या नजरेतून स्त्रीसाहित्याचे हे प्रांत दुर्लक्षितच राहिल्यानी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे याबाबतचे संशोधन स्त्री साहित्यिकांनी कामगिरी लक्षात आणून देण्याच्या दृष्टीने जसे आवश्यक आहे तसेच सामाजिक,सांस्कृतिक,भाषिक दृष्ट्याही महत्त्वाचे आहे.

विज्ञान साहित्य या एका महत्त्वाच्या साहित्य प्रकाराबाबतही हेच म्हणता येईल. रेखा बैजल यांचा अपवाद वगळता एकूणच विज्ञान साहित्य संशोधनापासून वंचित असल्याचे दिसते. प्राचीन साहित्याबाबत बोलायचे तर ओवीगीते, स्त्री गीते यांचा सामाजिक, सांस्कृतिक, स्त्रीजीवनाच्या अंगाने जसा वेध घेतला गेला आहे, तसाच मानस शास्त्रीय दृष्टीनेही अभ्यास होण्यानी आवश्यकता आहे. यादृष्टीने होणारे संशोधन स्त्रीजीवनावर जसे प्रकाश टाकू शकते तसेच स्त्री साहित्याच्या निर्मितीला चालना देणारे व स्त्री साहित्याच्या समीक्षेला दिशा देणारेही होऊ शकते. 'आहे मनोहर तरी' या सुनिता देशपांडे लिखित आत्मचरित्रानी अ. वा. कुलकर्णींनी केलेली मानसशास्त्रीय समीक्षा विचारात घेता आत्मचरित्र वाङ्मयाबाबतही असे संशोधन होणे महत्त्वाचे वाटते.

संत कवयित्री मुक्ताबाई,बहिणाबाई,महदंबा इ.नी केलेले वाङ्मय लेखनातील प्रयोग संशोधकांच्या संशोधनांचा विषय होणे गरजचे आहे. तसेच तत्कालीन इतर सांप्रदायिक कवयित्रीबाबतही संशोधन होण्याची गरज आहे. बौद्धकालीन, उब्बीरी, सोना भिक्षुणी, आम्रपाली, किसा गौतमी इ.नी. कथन केलेल्या थेरी गाथांचा इतिहास भारतीय स्त्रीजीवनावर प्रकाश टाकणारा भारतीय स्त्रीवादानी स्वतंत्र व समर्थ मांडणी करण्यास बळ देणारा आहे. त्यामुळे या इतिहासाचे संशोधन होणे गरजेचे आहे. याचबरोबर गांधीवादाचा स्त्रीसाहित्य व चळवळीवरील प्रभाव हाही एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

दलित, ग्रामीण, स्त्रीवादी या साठोत्तरी वाङ्मय प्रवाहांबाबत तसे विपुल संशोधन झालेले आहे.असे असले तरी तौलनिक साहित्याभ्यासाला भरपूर वाव आहे.यासंदर्भात रा.ग.जाधवांचे पुढील मत विचारात घेता अशा संशोधनानी उपयुक्तता व आवश्यकता लक्षात होऊ शकते. "...... या संदर्भात अधिक सूक्ष्म मीमांसा करावयानी, तर मराठी दलित साहित्य व इतर भारतीय भाषांतील दलित साहित्य यांचा तौलनिक अभ्यास उपयुक्त ठरेल.डॉ.आंबेडकर हे मराठी दलित लेखकांना जेवढे व जिथवर निकटवर्ती आहेत,तेवढे व तिथवर मराठीतर इतर भारतीय भाषकांना जवळचे नाहीत.हा अंतराय भारतीय दलित साहित्याच्या तौलनिक अभ्यासातून सखोलपणे समजावून घेतला,तर दलित साहित्यप्रवाहाचे एकूणच साहित्यक्षेत्राला संभवणारे संकल्पनात्मक व तात्त्विक योगदान नीटपणे उलगडता येईल.

१९५० साली मालती बेडेकरांनी 'बळी' ही तथाकथित गुन्हेगार

जमातीवरील कादंबरी प्रसिद्ध झाली १९५२ मध्ये बहिणाबाईंचे काव्य प्रकाशात आले. दोन्ही साहित्यकृती विसाव्या शतकाच्या उत्तरार्धारंभीच प्रसिद्ध झाल्या. पुढे दलित साहित्य व ग्रामीण साहित्य हे प्रवाह व चळवळी नावारूपास आल्या 'बळी'चा अभ्यास नंतरच्या दलित साहित्याच्या प्रणालीच्या आधारे व्हावा आणि या दलितप्रवाहाचा अभ्यासही 'बळी'च्या प्रकाशात व्हावा असे वाटते. अभिनिवेश दूर ठेवले, तर अशा दुहेरी अभ्यासाने दोहोंच्याही समृद्ध आकलनास साहाय्य होईल असे वाटते. हीच गोष्ट बहिणाबार्त्तच्या काव्याच्या बाबतीतही खरी आहे.'' ('ललित' - समीक्षा विशेषांक, एप्रिल २०१३) याशिवाय संत मीराबाई आणि संत जनाबाई, मराठी स्त्रीसाहित्यिक हिंदी / इतर भाषिक स्त्रीसाहित्यिक, ग्रामीण स्त्रीलेखिका व शहरी महानगरीय साहित्य हेही तौलनिक साहित्याभ्यासाचा भाग होऊ शकतात. दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवरून दाखविल्या जाणाऱ्या मालिका व त्यांचा वाढता स्त्रीप्रेक्षक वर्ग, लक्षात घेता 'स्त्री वाचकांनी वाचकाभिरुची', 'स्त्री साहित्याबाबत मराठी वाचकांनी वाचकाभिरूची ' 'बदलती वाचकाभिरुची व स्त्रियांचे साहित्य' अशा विषयांन्वयेही संशोधन होणे आवश्यक वाटते.

आंतरविद्याशाखीय अध्ययनाचा भाग म्हणून सामाजिक, पर्यावरणीय अशा अनेकागांनी अलीकडे संशोधन होऊ लागले आहे. परंतु या ज्ञान शाखाही अजून बाल्यावस्थेत आहेत. या ज्ञानाशाखा समजून उमजून त्या अंगाने स्त्री साहित्याचे शास्त्रशुद्ध संशोधन होणे ही काळानी गरज आहे. भाषेचा अनेकांगाने विकास साधण्यात स्त्रियांचा वाटा मोठा आहे.

आज तर विविध जात- वर्गातील आणि प्रदेश परिस्थितीतील स्त्रिया लेखन करू लागलेल्या आहेत. स्वाभाविकच या साहित्याद्वारे भाषेच्या विविध परीही व्यक्त होत आहेत म्हणींवरील विठ्ठल वाघांचा 'पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास' (अमरावती विद्यापीठ १९८९) हा एकमेव प्रबंध लक्षात घेता या क्षेत्रातही केवढे संशोधन होऱ्यानी गरज आहे, हे सहज लक्षात येते.एकंदर पाहता, विद्यापीठांनी ध्येयधोरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणारे प्रोत्साहन आणि काळाची गरज लक्षात घेता संशोधकांना विविधांगी संशोधनासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. गरज आहे ती संशोधक अभ्यासकांनी अशी क्षेत्रे धुंडाळून परिश्रमपूर्वक व निष्ठेने संशोधन करण्याची.

★★★

# 'साहित्य संशोधनाच्या विविध पद्धती'

डॉ.अनिल गर्जे

संशोधन हे मूलतः एक शास्त्र आहे. संशोधनातून नवीन संकल्पना, नवे तत्त्व, नवे तंत्र, नवी गोष्ट समोर येते. मानवी संशोधक प्रवृत्तीमुळेच मानवी जीवनातील सर्वच क्षेत्र अमूलाग्र बदल झाले आहेत. नव्या शोधामुळे मानवी जीवनात क्रांती घडली, जीवन गतिमान बनले आहे. 'जिज्ञासा' या मानवी सहज प्रवृत्तीतून शोधप्रवृत्ती निर्माण झाली असावी. जे अज्ञात आहे ते ज्ञात भरून घेण्याची धडपड हा मूलतः मानवी स्वभाव आहे. संशोधन प्रवृत्तीने आज सर्वच क्षेत्रात संचार केला आहे. संशोधन हा मानवी जीवनाचा कणा बनला आहे. मानवी जीवनातील सर्वच क्षेत्र व्यापून टाकून मानवी जीवन संशोधनामुळे अधिक सुकर बनले आहे. संशोधनाला इंग्रजीत 'Research' असे म्हटले जाते. Re आणि Search म्हणजे शोध घेणे होय. Research याचा अर्थ पुन्हा पुन्हा शोध घेणे होय. संशोधनात अतिशय पद्धतशीर, बिनचूक व तज्ञतेवर आधारलेली सूक्ष्म पाहणी अपेक्षित असते. संशोधन हा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून बुद्धिनिष्ठ आणि व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न आहे. त्यामध्ये तर्कशुद्धता व वस्तुनिष्ठता ह्या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. संशोधन ही सर्व व्यापक व सर्वगामी अशी एक ज्ञानक्षेत्रीय संकल्पना आहे. संशोधन आणि ज्ञान यांचे एक अतूट नाते आहे. संशोधनाची एक मूलभूत पद्धती आहे. वाङ्मय सामाजिक शास्त्रे आणि विज्ञान क्षेत्रामध्ये संशोधन करताना संशोधक आपल्या सोयीनुसार संशोधन पद्धती वापरून नवे ज्ञान समाजासमोर मांडतो.

**१. तौलनिक साहित्य संशोधन पद्धती:**

साहित्य विश्वाला नवे परिमाण देणारी एक संशोधन पद्धती म्हणून तौलनिक साहित्य अभ्यासाची शाखा पाश्चात्त्य जगात १९ व्या शतकात सुरू झाली. साहित्य संशोधनाची एक स्वतंत्र शाखा म्हणून या संशोधन पद्धतीस मान्यता मिळाली आहे. या संशोधन पद्धतीत दोन साहित्य कृतींची तुलना हा मूलभूत आधार आहे. कलाकृती आणि तिच्या बाहेरच्या वास्तवाशी असलेल्या संबंधाचा शोध तौलनिक अभ्यास पद्धतीमुळे घेता येतो.

साहित्याचा वाङ्मयीन दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी तौलनिक

संशोधन पद्धती अतिशय फायदेशीर आहे. दोन कलाकृतील काव्यतत्त्व, आशय, अभिव्यक्ती, आविष्कार पद्धती, रूपबंध, रूपके, कल्पनाबंध, उपम, अलंकार या वाङ्मयीन मूल्यांच्या आधारेही तौलनिक साहित्याभ्यास केला जातो. भाषेतील नव्याने आलेले विविध प्रवाह, भिन्न भिन्न प्रवृत्ती यांचा शोध या संशोधन पद्धतीद्वारे घेता येतो. या संशोधन पद्धतीद्वारे दोन साहित्यात तुलना करताना समान तत्त्वाबरोबरच विरोधी तत्त्वांचा ही शोध घेतला जातो. तसेच भाषेतील साहित्य, सौंदर्य, साहित्य वैभवांचा शोध घेता येतो. थोडक्यात दोन भाषा, दोन लेखक, दोन साहित्य प्रकार, दोन कालखंड, दोन प्रवाह ही साधनसामग्री समजून परस्परावरील प्रभावांचा अभ्यास तौलनिक संशोधन पद्धतीत केला जातो.

**२. लोकसाहित्याची क्षेत्रीय व ऐतिहासिक संशोधन पद्धती:**

लोकसाहित्याच्या संशोधनासाठी क्षेत्रीय व ऐतिहासिक पद्धती उपयुक्त ठरते. लोकगीते, लोककथा, लोककथागीते इत्यादी चा अभ्यास करण्यासाठी क्षेत्रीय संशोधन पद्धती अधिक उपयुक्त आहे. या अभ्यासात प्रत्येक क्षेत्र भेट देऊन माहितीचे संकलन करावे लागते. संकलनातून वर्गीकरण करणे व निष्कर्षांपर्यंत जावे लागते. क्षेत्रीय सर्वेक्षणासाठी भौगोलिक प्रदेश, जात, जमात, व्यवसाय इत्यादी घटकांबरोबरच या लोकांचे लोकजीवन, सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करावा लागतो.

जीवनातील लहान मोठ्या घटनांमध्ये दडलेल्या घटनांचा शोध घेणे ऐतिहासिक संशोधन पद्धतीत घेतला जातो. लोकसाहित्यातून लोकेतिहासाचा मागोवा घेत काही निष्कर्षापर्यंत येणे हे ऐतिहासिक पद्धतीचे ध्येय असते. मौखिक परंपरेतील एखादी कथा, गीत त्यातील नाट्य, नृत्य मुळात कोठे निर्माण झाले असेल? व का? जीवन शैली, मनोवृत्ती इ. चा वेध घेता येतो. लोकसाहित्याचा प्रसार आणि प्रचार कसा झाला? इ. बाबींचा मागोवा आपल्याला ऐतिहासिक संशोधन पद्धतीद्वारे घेता येतो. परंपरेचे, लोकसंचित, लोकेतिहास शोधण्यासाठी, त्यांचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक संशोधनात्मक पद्धती उपयुक्त आहे.

**३. भाषाशास्त्रीय संशोधन:**

भाषाशास्त्रीय संशोधनात सूक्ष्म भाषाविज्ञान आणि स्थूल भाषाविज्ञानं या दोन पद्धतीने करता येते. भाषाविज्ञानातील संशोधन समजून घेण्यासाठी आपल्याला भाषाअभ्यास पद्धतीचा आढावा घ्यावा लागतो.

**१. ऐतिहासिक भाषाअभ्यास पद्धती**: हजारो वर्षापासून माणसाने भाषेचा वापर केला आहे. भाषा परिवर्तनशील आहे. भाषेत होणाऱ्या परिवर्तनाचा अभ्यास ऐतिहासिक भाषा संशोधन पद्धतीत केला जातो. भाषेत होणारे बदल, शब्दांच्या वाक्यरचनेत, उच्चारणात होणारे बदल याचे संशोधन या पद्धतीद्वारे केले जाते. तसेच विविध कालखंडातील भाषेचा अभ्यास या पद्धतीत केला जातो. उदा.शिवकाल, पेशवेकाळ, यादवकाळ, बहामनीकाळ, ब्रिटिशकाळ, शिलालेख, ताम्रपट, लिखित पुराव्यांच्या आधारे हे संशोधन केले जाते.

**२. वर्णनात्मक भाषाभ्यास संशोधन पद्धती**: 'सोस्यूर' यांना वर्णनात्मक पद्धतीने जनक मानतात. या संशोधन पद्धतीत एका विशिष्ट कालखंडातील अभ्यास केला जातो. या संशोधन पद्धतीत भाषेच्या स्थिर स्वरूपाचा अभ्यास केला जातो. अचूक, परिपूर्ण अशा स्वरूपाचे संशोधन हे या पद्धतीचे वैशिष्ट्ये आहे. प्रत्यक्षात बोलल्या जाणाऱ्या भाषेचा अभ्यास या पद्धतीत केला जातो.

**३. समाजभाषाविज्ञान**: समाजभाषाविज्ञान ही एक आंतरविद्याशाखीय अभ्यास पद्धती आहे. या संशोधन पद्धतीत भाषेचा कसा वापर होतो. ती भाषा वापरणारी व्यक्ती, तिचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संदर्भ इ. अभ्यास केला जातो. भाषेत येणारे नवे शब्द, स्त्री, पुरुष, प्रौढ, लहान मुले इ. बोली वेगळ्या असतात. त्यांचा अभ्यास या संशोधन पद्धतीद्वारे अचूकपणे करता येतो.

**४. मानसशास्त्रीय संशोधन पद्धती**: मानसशास्त्र मानवी मन आणि वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. साहित्य आणि मानसशास्त्राचा निकटचा संबंध आहे. सिग्मंड फ्राईड या मानसोपचार तज्ञाने सूचित केल्याप्रमाणे साहित्याचा अभ्यास मानसशास्त्रीय पद्धतीने करता येतो. लेखक कलाकृतीतील पात्र, वाचक यांच्या वर्तनामचा अभ्यास या संशोधन पद्धती केला जातो. या पद्धतीद्वारे कादंबऱ्यातील कथानक, संज्ञा प्रवाहाचे स्वरूप, संज्ञा प्रवाही शैली, पात्रांची मनोभूमिका, जाणीव नेणीव, स्वप्नावस्था, मनोभावना तसेच प्रायोगिकता, कादंबरीतील सामाजिक प्रश्न, परिस्थिती, कथा, कविता व तारकातील संज्ञा प्रवाहाचे स्वरूप; संज्ञा प्रवाह आणि अतिवास्तवाद, संज्ञा प्रवाह आणि कलात्मकता, अश्लिलता, दूर्बोधता व मनोविकृती चित्रण इ. बाबींचे संशोधन या पद्धतीद्वारे करता येते.

★★★

# 'तौलनिक साहित्य संशोधन पद्धती: संकल्पना व स्वरूप'

डॉ.भारत शिंदे,
प्रा.संजय बालाघाटे

**प्रस्तावना:**

इंग्रजी भाषा पद्धतीप्रमाणे मराठी भाषेत संशोधन करण्यास सुरूवात झाली याला ठशीशरीलह असे संबोधले जाऊ लागले. ढोबळ मानाने संशोधन म्हणजे शोध घेणे होय. जुन्या साहित्यामधून नवीन परिमाण शोधून जगासमोर आणले जाते. मानवी ज्ञानाच्या सहाय्याने व्यक्तिगत स्वरूपात समूहाच्या साह्याने समाजातील असलेले प्रश्न शोधून त्याच्यावर उत्तर शोधण्याच्या प्रवृत्तीला संशोधक/संशोधन असे म्हणता येईल.

ग्रॉप फोर च्या मते संशोधन महणजे कोणत्या तरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी क्रमबद्ध व शास्त्रशुद्ध चिंतन केलेले प्रयोग होय. संशोधन हे शास्त्रशुद्ध प्रयत्नातूनच करणे आवश्यक आहे. आधुनिक कालखंडातील संशोधनात शास्त्रीय पद्धतीचा वापर केला जाऊ लागला. त्यामुळे अशा संशोधनामधून समाजातील तथ्ये आणि तत्त्वज्ञान शोधली जाऊ लागली. संशोधनाचा जगाला फायदा व्हायला सुरूवात झाली आहे. संशोधनासाठी अनेक पद्धती आहेत. यासाठी काही पायऱ्यांचा वापर केला जात आहे. शास्त्रांच्या सर्व शाखांसाठी शास्त्रीय पद्धत एकच आहे. तर्कशद्ध विचार करणाऱ्या व्यक्तीकडून वापरली जाणारी अशी ती पद्धत आहे. पियर्सननी आपल्या व्याख्येमधून स्पष्ट सांगितले आहे की, तथ्यांना वापरण्याच्या पद्धतीमधून संशोधन पद्धती विकसित झाल्या आहेत.

**तौलनिक अभ्यास पद्धती:**

मराठी साहित्याला संशोधनाची मोठी परंपरा लाभली आहे. ही परंपरा संत, पंत, तंत यांच्या परंपरेवर आधारली आहे. मराठीत प्राचीन काळापासून तुलनात्मक पद्धतीचा वापर केला जातो. पूर्वीच्या कालखंडात आश्रमातून खंडण–मंडण प्रणालीच्या साह्याने वेद, उपनिषद, धर्मग्रंथ, नीतिशास्त्र, काव्यशास्त्र या विषयांवर चर्चाचे आयोजन करून त्यातील वेगवळेपण शोधण्याचा प्रयत्न केला

जात असे. यावरुन असे लक्षात येते की, प्राचीन काळापासून तुलनात्मक पद्धती वरदान ठरली आहे. आधुनिक कालखंडात भाषा संशोधनाविषयी बदल होऊ लागला. त्याविषयी जयंत नारळीकर असे म्हणतात की, नवीन ज्ञाननिर्मिती मानवी जिज्ञासा व व्यापक लोकहिताशी अशा संशोधनाचा फार संबंध नसतो. थोडक्यात मुलभूत आणि शुद्ध संशोधनापेक्षा उपयोजित संशोधनावर सध्या अधिक भर असल्याची ही खंत आहे. वरील विधानावरून लक्षात येते की, मराठी भाषेत सैद्धांतिक स्वरूपाचे संशोधन अधिक झाले पण त्यात उपयोजित संशोधनाचा अभाव दिसतो. म्हणूनच संशोधन पद्धतीत तुलनात्मक पद्धतीचा उपयोग केला जाऊ लागला.

**तौलनिक साहित्याचा उगम:-**

आधुनिक कालखंडात तौलनिक अभ्यास पद्धतीचा वापर करण्यास पाश्चिमात्य देशात विशेषतः ग्रीक देशात झाल्याने या राष्ट्राला उगमस्थळ मानले तरी भारतामध्ये या पद्धतीची सुरूवात २० व्या शतकात झाली. पण या पद्धतीचा ज्या पद्धतीने विकास व्हायला पाहिजे त्या प्रमाणात झाला नाही. मराठी भाषा किंवा इतर साहित्य हे बहुविध, बहुआयामी असल्याने तौलनिक पद्धतीचा वापर करण्यास भरपूर वाव आहे.

**व्याख्या, स्वरूप:-**

१) हेन्री एच.एचरेमॅक- तौलनिक साहित्याभ्यास हा एका विशिष्ट राष्ट्राच्या मर्यादे पलीकडचा वाङ्मयाभ्यास असून ज्ञानशाखा आणि वाङ्मय यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास आहे. थोडक्यात मानवी अभिव्यक्तिच्या अन्य अंगाशी वाङ्मयाची केलेली तुलना म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय.

२) वसंत बापट- साधर्म्य आणि वैधर्म्य, उद्‌गम आणि प्रभाव या चार अंगांनी घेतलेला तुलनात्मक शोध म्हणजेच तौलनिक साहित्याभ्यास

३) डॉ.आनंद पाटील-तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समकालीन संस्कृतीपेक्षा स्वत्त्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून सांस्कृतिक आणि शास्त्रे विज्ञाने, साहित्य आणि नवी जुनी ज्ञान क्षेत्रे तसेच मानवी अभिव्यक्तीच्या पद्धतीच्या परस्पर व्यामिश्र संबंधाची अनेक विद्याशास्त्रीय दृष्टिकोन वापरून विविध पातळ्यांवर केलेली तुलनात्मक चिकित्सा होय.

वरील विचारातून तुलनात्मक पद्धतीचे स्वरूप स्पष्ट होते. परस्पर भिन्न वाङ्मयाचा परस्परांशी असणाऱ्या आंतर-बाह्य संबंधाचा अभ्यास करून राष्ट्रां-राष्ट्रात भिन्न राष्ट्रांच्या वाङ्मयाचा अभ्यासात कला, तत्त्वज्ञान, इतिहास याबरोबरच ज्ञानशाखा या पद्धतीतून या व्याख्यांचा उद्‌गम झाला आहे. म्हणूनच लेखन शैलीची तुलना करणे हे स्वाभाविकपणे संशोधनात अस्तित्वात आहे.

**स्वरूपः**

भाषेचे आकलन होण्यासाठी त्या कलाकृतीच्या मुळाशी असलेले प्रभाव शोधण्यासाठी तौलनिक संशोधन पद्धतीने शक्य झाले आहे. मराठी भाषेच्या स्वरूपात बदल होऊन संशोधनाच्या कक्षा रुंदावल्या गेलेले आपणाला दिसते. तौलनिक संशोधन पद्धती शास्त्रीय पायऱ्या देऊन तिला शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाल्याने या मूळ संशोधनाचे व्याप वाढल्या गेला. यामधून समीक्षेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल होण्यास सुरूवात झाल्याने साहित्य आणि सांस्कृतिक वारसाला गतिमानता देण्यात ती उपयोगी ठरली आहे.

तौलनिक साहित्यामधील संशोधनात साहित्याची तौलनिकता करणे हे साध्य नव्हे तर साधन आहे. या पद्धतीतून एखाद्या कलाकृतीच्या वाङ्मयीन मूळाशी किंवा लेखकांवर पडलेला प्रभाव साहित्याकृतीच्या सर्जनप्रक्रियेविषयी समृद्धी किंवा तुलना मांडणे हा हेतू आहे. म्हणूनच भाषांतर हे तौलनिक साहित्यामधील अपरिहार्य साधन आहे. यावरून लक्षात येते की, या संशोधन पद्धतीचा व्याप फार मोठा आहे.

**तौलनिक संशोधन पद्धतीचा उद्देशः-**

१) प्रभावः तौलनिक संशोधन पद्धती मधून दोन किंवा अधिक कला कृतींवर पडलेला प्रभाव यांची तुलना करून प्रभाव कळत-नकळत मांडणे आवश्यक आहे.

२) प्रेरणास्थानः दोन साहित्यिकांमध्ये किंवा साहित्यकृतींमध्ये पडलेला प्रभाव या प्रभावाची प्रेरणास्थान शोधणे व दोन कलाकृती परस्परांच्या संपर्कात कधी न येता ही त्यांची प्रेरणास्थान दोन साहित्याची तुलना करणे आवश्यक आहे.

३) समान तत्त्वप्रणालीः दोन साहित्याची मांडलेली तत्त्वप्रणाली संबंधी साहित्यिकांची तुलना आवश्यक आहे.

४) आधार सामग्रीः एखाद्या भिन्न दोन साहित्यकृतीला आधारित असलेल्या समान आधार सामग्री शोधणे व व्यक्ती घटनातील तुलना करणे आवश्यक आहे.
५) सर्जन परिस्थितीः साहित्याच्या क्षेत्रात त्या लेखकाची किंवा कलाकृती निर्मितीला सर्जनता कारणीभूत होणारी घटना, समान परिस्थिती यांची तुलना करणे.

**तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशाः**

भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यातील संबंध ज्या तौलनिक साहित्याभ्यासात प्रकाशित होताना काही दिशा पुढीलप्रमाणे सांगता येत नाहीत. संशोधनाला संस्कृतीच्या, राष्ट्राच्या भाषेच्या मर्यादित अभ्यासण्यापेक्षा वैश्विकतेच्या माध्यमातून पुढील दिशा सिद्ध होतील.

**१) विश्व साहित्याभ्यासः**

विश्वाच्या अनेक राष्ट्रांत साहित्य निर्माण होते त्या देशाची भाषा जीवनसंस्कृती समजते. म्हणून साहित्य एका राष्ट्राचे, भाषा यांची बंधने दूर सारली पाहिजे त्या प्रत्येक विश्वातील साहित्यातून मानवी जीवनाच्या प्रेरणा एकसारखे असतात. यासाठी तौलनिक पद्धतीने त्यांच्यामधील एकरूपता शोधणे सुलभ झाले आहे. तौलनिक साहित्याने राष्ट्रा राष्ट्रांतील मानवी संबंध समोर आणण्याचा प्रयत्न या संशोधनातून करता येतो. म्हणूनच तौलनिक साहित्यामधून मानवी संबंध, सांस्कृतिक विकास, साहित्याभ्यास महत्त्वाचा ठरला आहे.

**२) राष्ट्रीय साहित्यः**

भारतात बहुभाषिक राज्ये वसलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यातील साहित्यात विविधता आली आहे. तरी त्यांचे जीवन एकसारख्या सामाजिक घटकांनी बनले आहे. भारतीय संवेदनशीलतेचा एकसमरूपतेचा धागा भिन्न भाषिक प्रांतीय राष्ट्रीय साहित्याला साधून जातो. अशा अनेक साहित्य परंपरेने भारतीय भाषा बनलेले भारतीय साहित्यात ही तुलनात्मक संशोधनाने नवी दिशा मिळते.

**३) प्रभावाचा अभ्यासः**

एखाद्या लेखकाची साहित्यकृतीची कोणत्या परिणामातून विशिष्ट प्रवृत्तीमधून प्रभावी झाली आहे. एका भाषेतील साहित्याचा दुसऱ्या भाषेवर

पडलेला प्रभाव इ. तुलनात्मक संशोधन प्रभाववादी साहित्यांतर्गत येऊ शकेल. साहित्याचे समग्र आकलन होण्याच्या दृष्टिकोनातून तुलना आवश्यक आहे. आपापल्या वाङ्मयीन गरजांप्रमाणे सांस्कृतिक परिस्थितीप्रमाणे प्रभावाचा स्वीकार होत असतो.

**४) लोकवाङ्मयाचे तौलनिक अध्ययनः**

महाराष्ट्र राज्य लोकसंस्कृतीने भरभरून भरली आहे. त्याप्रमाणेच प्रत्येक राष्ट्रांमधून नव्हेतर प्रांता-प्रांतांतून लोकसाहित्यामधून समृद्ध झाली आहे. भिन्न प्रांतीय, भिन्न भाषेतील तौलनिक संशोधन पद्धतीतून मानवीय संवेदनाची समता व व्यापकता यांचे निरीक्षण अत्यंत उपयुक्त आहे.

**५) भिन्न साहित्यकृतींची तुलना:-**

एकाच आधारावर एकाच सामग्रीवर आधारलेल्या दोन भिन्न साहित्यकृतींची तुलना तौलनिक साहित्याच्या अभ्यास क्षेत्रात येऊ शकते. दोन साहित्यिकांत किंवा साहित्य कलाकृतीत रसग्रहण, आकलन, विश्लेषण व मूल्यमापन करून तुलना करणे आवश्यक आहे.

**६) भाषांतर अभ्यास:**

भाषांतराची भूमिका तौलनिक साहित्याभ्यासकाला पार पाडावी लागते. दोन साहित्य परंपरा आणि भाषा यांच्यामध्ये दुवा साधण्याचे काम भाषांतरकाराला करावे लागते. विशिष्ट साहित्यकृतींकडे आकर्षित झाल्यामुळे त्या साहित्यकृतीमधील भाषांतरामधून स्वभाविक गुणापर्यंत पोहण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. जेव्हा एखाद्या कलाकृतीचे रूपांतर दुसऱ्या भाषेमध्ये केले जाते. तेव्हा त्या कलाकृतीला पडलेला प्रभाव प्रतिसाद अनुकरण यांची तपासणी तौलनिक साहित्याभ्यासातून होते.

**७) चळवळीचा अभ्यास:**

जीवन जगताना समकालीन परिस्थितीत चवळवळीचे जीवन जगावे लागते. पुढे संघटना निर्माण होऊन चळवळ सक्रिय होतात. पुढेही चळवळ देशाच्या सीमा ओलांडून राष्ट्राराष्ट्रांमध्ये पसरत जाताना दिसतात.

चळवळ जशी पुढे जात असते त्यामध्ये परिवर्तन घडताना दिसते. याचा परिणाम लेखकाच्यां कलाकृतीवर पडला जातो. त्यामधून जीवनशैली वाङ्मयतेकडे एका लेखकापेक्षा अधिकार पडला जातो. यांचाही अभ्यास तौलनिक साहित्यात करावा लागतो. अशा अनेक विविध विषयात तौलनिक साहित्याने अभ्यासाच्या नव्या वाटा निर्मिल्या आहेत.

**सारांश,** मराठी भाषेत तौलनिक साहित्य अभ्यासाची सुरूवात करणारे अनेक साहित्यकार आहेत. त्यामध्ये वसंत बापट, भालचंद्र नेमाडे, चंद्रशेखर जहागिरदार, आनंद पाटील, रा.ग.जाधव, डॉ.वसंत जोशी, चंद्रकांत बांदीवडेकर यांनी तौलनिक साहित्यामध्ये योगदान दिले असून त्यांच्या संशोधनातून काही वैशिष्ट्यांवर आपणास प्रकाश टाकता येईल.

**तौलनिक साहित्याभ्यास पद्धतीची वैशिष्ट्ये:**

१) साहित्य कलाकृतीची तुलना करताना वाङ्मय निर्मिती मागील प्रेरणा आणि जीवनानुभवाची ओळख करून घेता येते.

२) तौलनिक संशोधन पद्धतीचे उच्च-निच्च ठरवताना साम्याचा शोध घेतला जातो.

३) या संशोधन पद्धतीतून दोन वाङ्मय संबंधाचा स्थानिक आणि वैश्विक साहित्याचा अभ्यास करता येतो.

४) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय यामधील दुवे व साम्यस्थळे यांचा शोध घेऊन तौलनिक साहित्याभ्यास करते.

५) एकापेक्षा अधिक भाषांतील साहित्यकृतीची साधर्म्य, वैधर्म्याचा शोध घेणे.

६) ही पद्धत मानवी अंतःसंबंधाचे पारंपरिक स्वरूप उलगडून दाखविते.

७) भिन्न भाषिक समाजातील वाङ्मयीन संबंधाचा अभ्यास करणे.

८) साहित्याभ्यासात तौलनिक संशोधन पद्धती एक वाङ्मयेतिहासाची एक शाखा आहे.

९) वाङ्मयाचा अभ्यास, अभिव्यक्ती पद्धतीबरोबरच कला, शास्त्र, धर्म, तत्त्वज्ञानात अभिव्यक्ती पद्धतीचा समावेश केला जातो.

१०) भाषांतर अभ्यास भाषांतराचे अधिक कार्य केले आहे.

★★★

# 'लोकसाहित्याच्या संशोधन पद्धती'

**प्रा. तुकाराम चव्हाण,**

लोकसाहित्याच्या अभ्यासाची व्यापकता अधिक आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे हेतूही निरनिराळे असतात. त्यानुसार लोकसाहित्याचा अभ्यास हा समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेण्यासाठी, सामाजिक संस्थांची जडणघडण आणि उत्क्रांती अभ्यासण्यासाठी, लोकमानसाची श्रद्धा, नीतिमूल्ये, अनुभव घेण्याची पद्धती जाणून घेण्यासाठी, समूहाचे मानस आकलन, रूढी, ग्रामनाम, स्थलमहात्म्य यांचे स्पश्टीकरण करण्यासाठी तर कधी कधी केवळ कलात्मक स्वरूपाचे आकृतिबंध व त्यांच्या रचना तपासणे, आविष्कारातील साम्यस्थळांचा शोध घेणे अशा विविध उद्दिष्टांनुसार लोकसाहित्याचा अभ्यास केला जातो. त्या-त्या अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार विविध प्रकारच्या अभ्यासपद्धतींचे उपयोजन लोकसहित्याच्या अभ्यासात करावे लागते. या विविध अभ्यासपद्धतींचे आकलन करून घेतले तर लोकसाहित्याचे समग्र आकलन करून घेता येते. या संशोधनपद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

## १. ऐतिहासिक संशोधन पद्धती :

लोककथांचे उगम आणि इतिहास यांचा शोध घेणाऱ्या अभ्यास पद्धतीस 'ऐतिहासिक अभ्यास पद्धती' म्हणतात. एखाद्या कथेची निर्मिती कोठे झाली? तिचा प्रसार कोणत्या काळात कसा झाला? याचा शोध घेऊन लोककथांच्या भ्रमणाचा इतिहास सांगण्याचा प्रयत्न या अभ्यास पद्धतीत असतो. म्हणजे एखाद्या कथेचा दुसऱ्या प्रदेशात किंवा भाषेत कसा विस्तार झाला? याचा नकाशा काढला जातो. त्याचबरोबर लोककथेच्या स्थानवैशिष्ट्यांचाही अभ्यास केला जातो. त्यामुळे या अभ्यास पद्धतीस 'ऐतिहासिक-भौगोलिक पद्धती' असेही म्हटले जाते.

मानवी संस्कृतीचा पारंपरिक वारसा समजावून घेणे, भूतकालीन घटना-घडामोडींचा लोकमानसाने कसा स्वीकार केला? हे जाणून घेणे, लोकांच्या श्रद्धास्थानांचा इतिहास जाणून घेणे, समाजातील वीर पुरुषाची प्रतिमा जतन करण्याची रीत जाणून घेणे आणि लोककथांचा प्रदेश व भाषांच्या सीमा ओलांडून

जे भ्रमण होते त्याचा नकाशा काढणे इत्यादी हेतूंनी प्रेरित झालेल्या अभ्यासाची पद्धती 'ऐतिहासिक अभ्यास पद्धती' म्हणून ओळखली जाते.

या अभ्यास पद्धतीचे ध्येय्य :

१. लोककथांचे उगमस्त्रोत षोधणे.

२. लोककथांच्या उगमांची ऐतिहासिक मीमांसा करणे.

३. लोकसाहित्याच्या लोकेतिहासाचा मागोवा घेऊन काही निष्कर्षाप्रत येणे.

थोडक्यात लोकसाहित्याकडे लोकेतिहासाचे साधन म्हणून पाहणे हे 'ऐतिहासिक अभ्यास पद्धतीचे' सार आहे.

**२. तौलनिक अभ्यासपद्धती :**

तौलनिक भाषाशास्त्र, तौलनिक दैवत कथाशास्त्र यांच्या आधारे कथांचे मुलाधार शोधणे हे तौलनिक अभ्यासपद्धतीचे उद्दिष्ट असते. वैदिक वाङ्मयातील ग्रहतारे व सृष्टीविषयक आदीकथा यांचा तौलनिक अभ्यास केल्यास आदीमानवाचे सृष्टीविषयक आकलन स्पष्ट होण्यास मदत होते. ध्रुव प्रदेशातील सहा महिन्याची रात्रीची कथा व खानदेशातील काही लोककथांत सहा महिन्याच्या रात्रीचे उल्लेख यावरून लोककथांच्या परिभ्रमणाचे निष्कर्ष काढता येतात. लोकेतिहासाचा मागोवा घेण्यासाठी उपलब्ध साधनांची तौलनिक चिकित्सा करावी लागते.

**३. समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती :**

माणूस हा सामाजिक प्राणी असून तो नातेसंबंधाचे आणि सामाजिक संबंधाचे सहजीवन जगत असतो. त्याचबरोबर कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था, जातिसंस्था, शासनसंस्था, न्यायसंस्था अशा विविध प्रकारच्या संस्थांची चौकट स्वीकारून माणूस संस्थात्मक जीवनही जगत असतो. व्यक्ती आणि समाजाच्या ह्या संस्थात्मक जीवनाचा अभ्यास करणाऱ्या विद्याशाखेला 'समाजशास्त्र' असे म्हणतात.

समाजशास्त्राच्या अभ्यासात सामाजिक संस्थांमधील आंतरक्रिया, व्यक्ती-व्यक्तींमधील परस्परसंबंध, रूढी, परंपरा, परिवर्तने तसेच आदीवासी, ग्रामीण, शहरी लोकजीवनातील सामाजिक रचना, प्रक्रियांचा आणि परिवर्तनांचा अभ्यास केला जातो. तसेच लोकसाहित्याच्या अभ्यासातही लोकजीवनाचाच अभ्यास केला जातो. त्या-त्या समाजातील लोकनीतिनुसार वर्तनव्यवहार होत

असतो. सण-उत्सव, विधी-कर्मकांडाचे आनंद, दुःख, पेहराव-पोषाख, ईश्वरी प्रार्थना आणि उपासना करण्याचे नियम व संकेत यांच्या अभ्यासातून लोकसंस्कृतीचे स्वरूप स्पष्ट होते. अशाप्रकारच्या अभ्यासाच्या पद्धतींना 'समाजशास्त्रीय अभ्यासपद्धती' म्हणतात.

लोकसाहित्याच्या सामाजिक अभ्यासपद्धतीमध्येही अनेक संप्रदाय व विशिष्ट हेतुनुसार वेगवेगळ्या अभ्यासपद्धती आहे. त्या पुढीलप्रमाणे-

**अ. कार्यान्वयी अभ्यासपद्धती :**

लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रयोग इत्यादी सर्व लोकाविष्काराचे विशिष्ट कार्य असते किंवा हेतू असतात, असे मानणाऱ्या अभ्यासकांनी या पद्धतीचा विकास केला आहे. उदा.लोकसाहित्यातून समाजाच्या श्रद्धा, नीतिमूल्यांचे जतन केले जाते. परंपरा पुढे चालू ठेवल्या जातात. त्यामुळे सामाजिक संस्थांना स्थैर्य प्राप्त होते. या अर्थाने लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रयोग यांचे हे सांस्कृतिक कार्य आहे असे मानून ह्या सांस्कृतिक फलश्रुतीचा शोध घेतला जातो. असे या अभ्यासपद्धतीचे सर्वसाधारण स्वरूप आहे. समाजशास्त्र अभ्यासपद्धतीतील ही एक प्रभावी अभ्यासपद्धती आहे.

**ब. आंतर-सांस्कृतिक अभ्यासपद्धती :**

प्रत्येक संस्कृती आपल्या खास वैशिष्ट्यांसह प्रकट होते. अन्य सांस्कृतिक गटापेक्षा आपले वेगळेपण राखण्याचा ती प्रयत्न करते. म्हणजे प्रत्येक संस्कृती ही दुसऱ्या संस्कृतीपेक्षा वेगळी असते हे लक्षात घेऊन लोकसाहित्यातील सांस्कृतिक गुणविशेषांचा अभ्यास केला जातो. या अभ्यास पद्धतीला 'आंतर-सांस्कृतिक' अभ्यास पद्धती म्हटले जाते.

थोडक्यात 'संस्कृती' म्हणजे जगण्याची पद्धत. दैनंदिन व्यवहार करतांना पाळावयाचे संकेत किंवा पथ्ये याबद्दलच्या नियमावलीचा संच म्हणजे संस्कृती होय. तो-तो समाजगट यानुसार कळत-नकळत जीवनव्यवहार करत असतो. उदा. विधवांनी कुंकू न लावण्याचे संकेत समाजात रूढ आहे. म्हणजेच समाजाची ओळख ज्या घटकाद्वारे होते (स्थान-जाती-लिंगविशिष्ट) अशा संस्कृती विशेषांचा अभ्यास करणाऱ्या अभ्यास पद्धतीला 'आंतर-सांस्कृतिक' अभ्यास पद्धती असे

म्हटले जाते. या अभ्यासाद्वारे त्या-त्या संस्कृतीतील सौंदर्यमूल्ये, भौतिक जीवनसंदर्भ, लोककलांचा तपशील यांचा अभ्यास केला जातो. यातूनच समाजरचनांचा आणि समाजातील परिवर्तनाचाही अभ्यास करता येतो.

**४. मानववंशशास्त्रीय अभ्यास पद्धती :**

ही समाजशास्त्रीय अभ्यास पद्धतीतील एक अभ्यास पद्धती आहे. ही अभ्यास पद्धती मानव वंशाच्या उत्पत्ती, प्रसार आणि संस्कृती विशेष यांचा अभ्यास करते. फ्रांझ बोआस या अमेरिकन अभ्यासकाने या अभ्यास पद्धतीचा पाया घातला. ह्या अभ्यास पद्धतीमध्ये व्यक्तिनाम, वंशावळ, गोत्र यांच्या अभ्यासाबरोबरच व्यापार, धर्म, युद्ध, जादू-टोणा या व्यवस्थांची रचना तपासली जाते. क्षेत्रीय सर्वेक्षण अथवा पाहणी यातून हा अभ्यास सिद्ध होतो. मॅलिनॉस्की या अभ्यासकाने या अभ्यासपद्धतीचा विस्तार केला.

मानवी समूहांनी आपल्या मूलभूत भौतिक गरजांची परिपूर्ती करतांना आचारधर्माची निर्मिती केली. सभ्यता आणि नीतितत्त्वांचे संकेत निर्माण केले. त्यातून संस्कृतीची निर्मिती केली. ह्या सांस्कृतिक जडणघडणीचा मागोवा लोकविद्येच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न मानववंशशास्त्रीय अभ्यास पद्धतीद्वारे केला जातो.

**५. मानसशास्त्रीय अभ्यास पद्धती :**

मानवी मनाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला 'मानसशास्त्र' म्हणतात. मानसशास्त्रात व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास केला जातो. म्हणजेच माणसाचे वर्तन आणि त्याचा अनुभव हा मानसशास्त्राचा अभ्यासविषय आहे. माणूस अशा प्रकारे का वागतो? त्यामागे कोणत्या प्रेरणा असतात? याचा शोध मानसशास्त्रीय अभ्यासात अभिप्रेत असतो. त्याचबरोबर मानवाच्या भाव-भावना, त्यांचे आकलन, वर्णन आणि विश्लेशण करण्याचे काम मानसशास्त्रीय अभ्यासात अपेक्षित असते. तसेच माणसाचे व्यक्तिमत्त्व, त्याचे गुणविषेश, सवयी, अभिरुची मूल्यकल्पना, अनुवांशिक व परिस्थितीने व्यक्तित्त्व व वर्तनावर होणारा परिणाम अशा विविध अंगांनी मानवी स्वभाव व वर्तन यांचे अभ्यास करणारी ही अभ्यास शाखा आहे.

बालमानसशास्त्र, जैवमानसशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र, प्रायोगिक मानसशास्त्र अशा मानसशास्त्राच्या

अभ्यास शाखा आहे. यांपैकी सामाजिक मानसशास्त्रात नैसर्गिक व भौतिक परिसराचा त्यावरील परिणाम, परस्परांतील प्रेम-द्वेष, आवड-निवड, सलोखा-दुष्टावा, सहकार्य-बहिष्कार, स्पर्धा-संघर्ष यांच्या अभ्यासाबरोबरच सामाजिक मूल्य, समजुती, लोकविश्वास, रूढी, विधिनिषेध, लोकसमजुतींचा अभ्यास केला जातो.

या सामाजिक मानसशास्त्राची एक विस्तारित शाखा म्हणून 'लोकमानसशास्त्र' ही संकल्पना अलीकडच्या काळात रूढ होऊ पाहते आहे. समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये समान जाणिवा असतात. उदा. नदी ही स्त्रीरूप आहे त्यामुळे नदीकडे स्त्रीत्त्वभावाने पाहण्याची जाणीव सर्व मानव समूहात सारखीच आहे. अषा समान जाणिवांच्या अभ्यासातून लोकमानस जाणून घेणे हे लोकमानसशास्त्राचे काम असते. मानवी स्वभावसंबंधी, वर्तनाविषयी रूढी, विधीविषयीच्या लोककथा/दैवतकथा यांच्या विश्लेषणातून मानवी वर्तनव्यवहाराविषयी सर्वसामान्य अनुमान काढणे, सिद्धांत रचणे, स्पष्टीकरण देणे हे लोकमानसशास्त्र अभ्यास पद्धतीचे स्वरूप असते.

थोडक्यात लोकसाहित्याचा मानसशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केल्यास मानवी वर्तनातील समान जाणिवांचे अनेक आकृतिबंध शोधून काढता येतात. उदा. सटवीच्या भविष्याची कथा आणि 'राजा इडिपस' ही ग्रीक कथा.

### ६. रचनानुसारी अभ्यास पद्धती :

रशियातील ब्लॉदिमीर प्रॉप या संशोधकाने ही अभ्यासपद्धती रूढ केली आहे. या अभ्यास पद्धतीद्वारे त्यांनी लोककथांच्या रचनेतील सारखेपणा लक्षात घेऊन लोककथेच्या रचनेच्या आकृतिबंधाचे वर्गीकरण करण्याची पद्धती विकसित केली. निरनिराळ्या भाषेत, प्रांतात लोककथांमधील पात्रे, स्थळे, पोषाख, आहार-विहाराच्या पद्धती भिन्न-भिन्न असतील पण पात्रांच्या वर्तनातील कृतीमध्ये सारखेपणा आढळतो. हे या रचनानुसार अभ्यास पद्धतीचे पायाभूत तत्त्व आहे. उदा.देव-सुष्ट तर दानव-दृष्ट अशी विभागणी असते त्यामुळे पात्रांच्या कृती ठरावीक आणि सांकेतिक स्वरूपाच्या असतात. या रचनानुसारी अभ्यास पद्धतीत लोककथेतील लहानातले लहान घटक शोधावयाचे असतात. कल्पनाबंध आणि कृती हे दोन लहानात लहान घटक असतात. या घटकाच्या रचनेतून कथा निर्माण होते. कल्पनाबंध तीन प्रकारचे असतात.

अ. पात्र : देव, राक्षस, वनस्पती-प्राणी, भूते इ.

ब. वस्तू : जादूचा दिवा, जादूची कांडी, जादूची अंगठी, वेषांतर-रूपांतर.

क. घटना-प्रसंगनिर्मिती : ससा आणि कासव शर्यत.

कल्पनाबंध आणि पात्रांच्या कृतींचे मूलघटक लक्षात घेऊन कथारचनांचे आकृतिबंध शोधले जातात. काही रचनाविशेषानुसार आकृतिबंध पुढीलप्रमाणे

१. उणिवांचे निराकरण

२. चातुर्याने संकटावर मात

३. सवतीमत्सर

४. जावयाची फजिती

५. सर्वव्यापी ईश्वर आणि माणसाचे भविष्य

६. प्राणिमात्रांचे मनुषिकरण

७. भूमिकास्वरूप पात्रे

८. नात्याचे आकृतिबंध

९. समाजघटकांचे सांकेतिक आकृतिबंध

लोकसाहित्य संशोधनाच्या या विविध संशोधन पद्धती आहेत. अशा विविध अभ्यास पद्धतींचे उपयोजन लोकसाहित्याचे संशोधन करत असतांना करणे अपेक्षित असते. कारण ह्या प्रत्येक अभ्यास पद्धतीमागे लोकसाहित्याच्या अभ्यासाचे निश्चित असे प्रयोजन असते. त्यानुसार लोकसाहित्याचा अभ्यास केल्यास तो परिपूर्ण होतो.

★★★

# साहित्य संशोधन

# एका लेखकाचा अभ्यास स्वरूप व दिशा

**प्रा. कराड सर**

पीएच.डी. पदवीसाठी एका लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास करणे हे साहित्य संशोधनाचे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. पीएच.डी.साठी या विषयावर अधिक प्रमाणात संशोधन करण्याची प्रवृत्ती नवीन संशोधकांमध्ये दिसून येते. एखाद्या लेखकाच्या जीवनासंबंधी आणि एकूण साहित्यासंबंधी मिळविलेली माहिती, समीक्षात्मक लेखन यांचे संकलन असे या साहित्य संशोधनाला प्राप्त होत आहे. याविषयावर केल्या जाणाऱ्या साहित्यसंशोधनातील पद्धती व प्रक्रियेविषयी नवीन संशोधकांमध्ये पुरेशी समज व शिस्त दुर्मीळ होत चाललेली आहे. एका लेखकाच्या साहित्याचा समग्रपणे केला जाणारा अभ्यास कसा करावा, यासंबंधी सैद्धांतिक पातळीवरील लेखन मराठीत फार कमी प्रमाणात आहे. या विषयावरील साहित्यसंशोधनाचा चिकित्सकपणा व शिस्त येण्यासाठी विचारमंथन होण्याची व नवीन संशोधकांनी मार्गदर्शक होईल असे लेखन होण्याची नितांत आवश्यकता आहे. एका लेखकाचा अभ्यास करताना विचारात घ्यावयाचे मुद्दे–घटक, त्यामागील उद्देश तसेच आकलन–मूल्यमापनासंबंधीच्या काही बाबी इत्यादींचा विचार या लेखांमधून करावयाचा आहे.

एक साहित्यिकाच्या समग्र साहित्याचे संशोधन करताना त्या साहित्यिकाला अभ्यास–संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवावे लागते. यादृष्टीने साहित्यिकाचे जीवन व त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप, साहित्यिकाच्या निर्मितीला काळ एकूण सामाजिक–सांस्कृतिक पर्यावरण, वाङ्मयीन पर्यावरण, साहित्यिकाने कोणकोणत्या साहित्यप्रकारांमध्ये निर्मिती केलेली आहे. साहित्यिकाच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या आशयविश्वाचे स्वरूप कसे आहे. या गोष्टींच्या आधारे हे संशोधन करावे लागते. लेखकाची जीवनविषयक दृष्टी ह्याच्या समग्र साहित्यातून व्यक्त होते? तिचेही स्वरूप–विशेष पाहावयाचे असतात. त्याचप्रमाणे साहित्यावर इतर साहित्यिक–समीक्षकांच्या लेखनाचा काही संस्कार आहे का? या प्रश्नानाही इथे शोध घ्यावा लागतो. आणि शेवटी साहित्यिकाच्या एकूण साहित्यनिर्मितीचा ताळेबंद मांडताना साहित्याच्या एकूण परंपरा व इतिहासात त्या लेखकाने स्थान

निश्चित करणे हा या साहित्यसंशोधनाचा अखेरचा टप्पा असतो. अशा अनेकविध बाबींनी समग्र लेखकाच्या अभ्यास-संशोधनाचा परिपूर्णता व शिस्तबद्धता येत असते. साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व, जीवन व त्याची एकूण साहित्यनिर्मिती यामधील संबंधाचा शोध घेणे हा एक महत्त्वाचा भाग या संशोधन प्रक्रियेत असतो. साहित्यिकाच्या जीवनासंबंधी माहिती मिळवून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण समजावून घ्यावी लागते. त्यातूनच पुढे साहित्यिकाच्या साहित्यातील अनेक गोष्टींचा उलगडा व आकलन होण्यास मदत होऊ शकते. साहित्यिकाच्या लौकिक जीवनासंबंधी माहिती मिळवून संशोधन करताना चरित्रात्मक समीक्षापद्धतीला असणाऱ्या मर्यादाही लक्षात ठेवल्या पाहिजेत. साहित्यिकाचे जीवन व त्याचे साहित्य यांचे स्वरूप सर्वच साहित्यिकांच्या संदर्भासारखे नसते. हे भान बाळगून असे म्हणता येईल की एका साहित्यिकाच्या समग्र साहित्याचे संशोधन करताना त्याच्या जीवन व व्यक्तिमत्त्वाची माहिती उपयुक्त ठरू शकते. त्या साहित्याचे आकलन व मूल्यमापनही अधिक योग्य प्रकारे होऊ शकते. साहित्यिकाच्या जीवन व व्यक्तिमत्त्वानंतर साहित्यिक या कालखंडात, या प्रदेशात-सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीत साहित्य निर्माण करतो त्यांचाही विचार करावा लागतो. या बाबींचा साहित्यिकाच्या साहित्यनिर्मितीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रभाव पडत असतो. एखादा विशिष्ट कालखंडाचा देश-काल परिस्थितीचा साहित्यिनिर्मितीवर परिणाम होत असतो. साहित्यिकाच्या साहित्यनिर्मितीतून या बाबी व्यक्त होत असतात. आपल्या मराठी साहित्यातील अव्वा इंग्रजी राजवटीतील सामाजिक सुधारणांचा कालखंड व सुधारकांचे कार्य व त्या कालखंडातील साहित्यनिर्मिती हा परस्पर संबंधाचा भाग महत्त्वाचा आहे. महात्मा फुले, आगरकर, हरिभाऊ आपटे इत्यादींचे साहित्य समजावून घेताना हा देश-काळ परिस्थितीचा घटक आपल्याला विचारात घ्यावा लागतो.

देश-काळ परिस्थितीनंतर वाङ्मयीन वातावरण हा घटक महत्त्वाचा ठरतो. साहित्यिकाची जडण-घडण व त्याच्या साहित्यनिर्मिती काळातील वाङ्मयीन वातावरण योग्य रीतीने समजावून घेणे, त्या साहित्याचे आकलन-मूल्यमापन निर्दोष होण्यासाठी आवश्यक ठरते. वेगवेगळ्या कालखंडातील वाङ्मयीन प्रेरणा-प्रवृत्ती-प्रवाह-प्रकार यांचा प्रभाव साहित्यिकावर पडलेला असतो. साहित्याच्या अभ्यासातून हा प्रभाव आपल्याला दाखवून देता येतो. विशेषत: एखाद्या वाङ्मयीन संस्कृतीतील नव्या साहित्यिकांवर त्या वाङ्मयीन वातावरणाचा प्रभाव पडतो

किंवा ते स्वतःच वाङ्मयीन वातावरणाला कसे सामोरे जातात हा एक संशोधनाचा मुद्दा आहे. साहित्यिकृतींचा विषय-आशय, आविष्काराच्या वाटा, साहित्य प्रकारांची निवड व हाताळणी, भाषिक कृती या सर्वच बाबींच्या संदर्भात साहित्यिकाच्या सभोवतालचे वातावरण प्रभावी ठरत असते. एखाद्या साहित्यिकाला घडविण्यात विशिष्ट कालखंडातील वाङ्मयीन वातावरण महत्त्वाची भूमिका बजावत असते हे लक्षात घेऊन हा अभ्यास करावा लागतो. प्राचीन काळातील लेखकांपासून उत्तर आधुनिकतेच्या काळातील आजच्या लेखकांसंदर्भातही हा घटक महत्त्वाचा आहे. यासंदर्भात डॉ. बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, एका लेखकाच्या वाङ्मयीन अभ्यासात आकानाला मोठ्या प्रमाणात सहायक ठरणारा घटक म्हणून वाङ्मयीन वातावरणाचा विचार करणे आवश्यक ठरते; अगदी प्रचलित वाङ्मयीन वातावरणाया विरूद्ध लेखन करणाऱ्या लेखकाच्या बाबतीतही.

साहित्यिकाच्या साहित्याच्या अभ्यासाकडे प्रत्यक्ष वळल्यानंतर त्या साहित्यिकाने या-या साहित्यप्रकारांमध्ये लेखन केले आहे त्याचा अधिक विचार करावा लागतो. या साहित्यिकाने त्याच्या एक किंवा अनेक साहित्य प्रकारात लेखन केलेले असले तरी एखाद्या साहित्य प्रकारात त्याची कामगिरी अधिक सरस ठरते, ती का? हेही शोधावयाचे असते. काही साहित्यिक निष्ठेने एकाच साहित्यप्रकारात निर्मिती करून त्यात आपली यशस्वी मुद्रा उमटवितात तर काही साहित्यिक वेगवेगळ्या साहित्यप्रकारात समर्थपणे वावरतात. तेव्हा साहित्यिकाने त्या-त्या साहित्य प्रकारांमध्ये निर्मिती करून त्या साहित्य प्रकारांना काही वेगळेपण प्राप्त करून दिले आहे का? यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांचा शोधही साहित्यिकाच्या समग्र साहित्याभ्यासात घ्यावयाचा असतो.

साहित्यिकाच्या समग्र साहित्यनिर्मितीतून प्रगट होणाऱ्या आशयाचे स्वरूप पाहणे हा या संशोधनातील महत्त्वाचा भाग आहे. एखाद्या कवीपेक्षा कादंबरीकार आपल्या साहित्यनिर्मितीतून व्यापक, सखोल व विविधांगी समाजदर्शन घडवित असतो. या साहित्यिकाच्या साहित्यातील अनुभवविश्व स्वरूप विस्तृत-व्यापक आहे की चिंचोळे- या साहित्यिकाने घडविलेल्या समाज जीवन दर्शनात साचेबद्धता आहे की नाविन्यपूर्ण आहे- असे प्रश्न लक्षात घेऊन साहित्यिकाच्या आशयाचे स्वरूप विशेष पाहिले पाहिजे. साहित्यातील आशयाची व्यापकता तर महत्त्वाची आहेच त्याचबरोबर आशयातील सूक्ष्मता, अनेकार्थ सूचकता व जीवनदर्शनाचे गहन सामर्थ्य या गोष्टी त्या साहित्यिकाची महानता ठरविताना महत्त्वाच्या असतात.

साहित्यिकाच्या जीवनदृष्टीचा त्याच्या समग्र साहित्याच्या अभ्यासातून शोध घेणे, त्याचे स्वरूप पाहणे हा एक या अभ्यासातील महत्त्वाचा गाभा आहे. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यालाच लेखकाचा मूल्यात्म दृष्टिकोन म्हणतात. साहित्यिकाचा जीवनविषयक अनुभव तो साहित्यातून व्यक्त करत असला तरी या अनुभवावर साहित्यिकाच्या मूल्यात्म दृष्टिकोनाने संस्कार होतात. साहित्यिक आपल्या दृष्टिकोनाने जीवनानुभवाचा अर्थ लावत असतो. साहित्यिकाचा हा दृष्टिकोन काही मूल्यांवर आधारलेला असतो. व काही मूल्यांनी घडविलेला असतो. म्हणूनच साहित्यिकाच्या मूल्यात्म दृष्टिकोनाचे आकलन करून घेतले पाहिजे. एखादा साहित्यिक सामाजिक बांधिलकी मानून लेखन करतो तर एखादा साहित्यिक विशिष्ट दृष्टीनेच व्यक्तिरेखाटन करतो, एखादा साहित्यिक विशिष्ट भावनेला महत्त्व देतो तर दुसरा एखादा साहित्यिक ऐतिहासिक वातावरणातच का रममाण होतो. अशा प्रश्नांचा शोध घेण्यासाठी साहित्यिकाची जीवनदृष्टी किंवा त्याच्या मूल्यात्म दृष्टिकोन समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

एका साहित्यिकाच्या समग्र अभ्यासात वाङ्मयीन प्रवाह-परंपरेत कुठे बसतात किंवा कसे वेगळे ठरतात यासंदर्भातील शोध घेणे गरजेचे असते. काही साहित्यिक स्वत:ची परंपरा निर्माण करतात, स्वत:चे युग निर्माण करून युगप्रवर्तक साहित्यिक ठरतात, ते कसे यासंदर्भातील शोधही या अभ्यासातून घेतला जातो. वाङ्मयाच्या इतिहासामध्ये या अभ्यासाचा विषय असलेला साहित्यिकाचे स्थान निश्चित करणे हा या अभ्यासाचा अखेरचा टप्पा म्हणता येईल. वरील विवेचनात आलेल्या सर्व बाबी लक्षात घेऊन जर एका लेखकाच्या समग्र साहित्याच्या अभ्यासाला भरीव व निर्दोष स्वरूप प्राप्त होऊ शकेल, असे वाटते, एका साहित्यिकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास करणे, त्यावर संशोधन करून प्रबंध लेखन करणे हे अभ्यासकासमोर आव्हान असते. हे आव्हान पेलण्यासाठी अभ्यासकाने वरील विवेचनातील बाबींचा योग्य प्रकारे अवलंब केल्यास साहित्य संशोधनाचा साचेबद्ध व सदोष स्वरूप प्राप्त होणार नाही.

★★★

# लेखकाचा अभ्यास

**प्रा. श्रीमती लता पवार**

लेखकाचा अभ्यास (Author Study) हे वाङ्मयाच्या संशोधनाचे व समीक्षेचे एक महत्त्वाचे अभ्यासक्षेत्र आहे. कोणा एकाचे संपूर्ण लेखन डोळ्यासमोर ठेवून लेखक म्हणून त्याच्या सामग्राने वेध घेणे म्हणजे लेखकाचा अभ्यास एखाद्या वृक्षाच्या पेशीमधून मिळणाऱ्या जीवन रसावर पाने, फुले, फळे हे विविध आकार, रंगरूप धारण करत असतात. त्याचप्रमाणे लेखकाची प्रतिभा, त्याचे विचार, संस्कार, त्याला लाभलेली परिस्थिती यांच्या विविधांगी प्रभावातून लेखन कृती साकार होत असतात. म्हणून विशिष्ट लेखकाचा अभ्यास करतांना त्याच्या संपूर्ण साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास करून त्याच्या साहित्य कृतीचे वाङ्मय प्रकारानुसार वर्गीकरण करून त्यांची वाङ्मयीन गुणवत्ता लक्षात घ्यावी लागते. लेखकाचे संपूर्ण लेखन डोळ्यासमोर ठेवून लेखकाची जीवन, त्याचे व्यक्तिमत्व, त्याची जीवनदृष्टी, त्याचे लौकीक व्यक्तिमत्व व वाङ्मयीन व्यक्तिमत्व आणि त्याचे वाङ्मय, यांचे स्वरूप आणि परस्पर संबंध ध्यानी येतात. त्यामुळे वाङ्मयाच्या आकलनाची दृष्टी मिळते. कालानुसार साहित्यकृतीची मांडणी केली तर लेखकाच्या प्रतिभेचे तेज, खोली यांच्या विकासातील चढ–उतार टिपता येतात. त्याचे व्यक्तिमत्व आणि त्याच्या भोवतीचे पर्यावरण त्याच्या संबंधात या स्थित्यंतराची कारणीमीमांसा करता येते.

या सर्वांतून लेखकाची वाङ्मयीन गुणवत्ता जोखता येते, पूर्वपरंपरेकडून त्याने घेतलेले ऋण, त्याने स्वतः घडविलेली नवनिर्मिती आणि उत्तरपरंपरेवर तिचा उमठलेला ठसा यांचा शोध घेता येतो. आणि एकुण वाङ्मयाच्या परंपरेत लेखकाचे यथोचित स्थानांकन करता येते. अशावेळी संशोधनापूर्वी आराखडा तयार करावा लागतो. उदाहरण म्हणून आपण

'उत्तम कांबळे यांच्या साहित्याचा सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास'
या विषयाचा नमुना आराखडा सोबत दिला आहे, तो अभ्यासावा.

'उत्तम कांबळे यांच्या साहित्याचा सामाजिक दृष्टीतून अभ्यास'
(कथा, कादंबरी, आत्मकथन, कविता, ललित लेखनाच्या संदर्भात)

**प्रस्तावना :-**

१९६० नंतर मराठी साहत्यात अनेक वाङ्‌मयीन प्रवाह उदयाला आले. त्या मध्ये, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, विज्ञानवादी, आदीवासी इ. अनेक वाङ्‌मयप्रवाह मोठया जोमाने मराठी साहित्यात आले. या प्रवाहांपैकी दलित साहित्याचा प्रवाह मोठया ताकदीने अस्तित्वात आलेला आहे. या प्रवाहामध्ये अनेक लेखकांनी कथा, कादंबरी, आत्मकथन, कविता इ. वाङ्‌मय प्रवाहात लेखन केलेले आहे. प्रारंभीच्या काळाचा विचार केला तर या प्रवाहाला एक परंपरा दिसून येते की परंपरा आपणास आण्णाभाऊ साठे, ना. रा. शेंडे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, हिं. गो. बनसोडे, सुधाकर गायकवाड, भीमसेन देठे, अशोक व्हटकर आणि उत्तम कांबळे या लेखकांनी समृद्ध केली, असे म्हणावे लागते. उत्तम कांबळे या लेखकाचा अभ्यास करतांना आपणांस श्री. कांबळे लेखक म्हणून कसे पुढे आले? त्याचबरोबर त्यांच्या साहित्यातून कोणती वैशिष्टये ठळकपणे दिसतात. त्यांच्या साहित्यात सामाजिक जाणीवा कशा व कोणत्या प्रकारे प्रतित होतात हे पहावे लागते. तसेच समकालीन साहित्य आणि उत्तम कांबळे यांच्या साहित्याच्या प्रेरणा यांचाही अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यांच्या लेखनपद्धतीचा विचार करतांना शेवटी उत्तम कांबळे यांचे मराठी साहित्यातील एकूणच योगदान कसे मोलाचे आहे? हे समजून घ्यावे लागते.

साहित्यिक म्हणून उत्तम कांबळे यांची खरी ओळख १९८० नंतर होऊ लागली. कथा कादंबरीकार व प्रामुख्याने परिवर्तनवादी विचारधारा स्वीकारणारा लेखक म्हणून ते सर्व परिचित आहेत. आता पर्यंत उत्तम कांबळे यांचे २१ पुस्तके प्रकाशित झाली आहे. यापैकी दोन कादंबऱ्या, ४ कथासंग्रह, ४ ललित लेख संग्रह, २ कविता संग्रह आहेत. सर्व लेखन वैचारिक आणि परिवर्तनवादी भूमिकेतून साकारलेले आहे. ते सामाजिक न्याय-अन्यायाचा शोध घेणारे समाज चिंतक आहेत. जागृत दृष्टी ठेवून वर्तमानकालीन घटनांचा समाचार त्यांनी आपल्या लेखनातून घेतलेला आहे. त्यांचे लेखन हे सामान्य, उपेक्षित, वंचित, भटके विमुक्त यांचे प्रश्न, बदलत्या सामाजिक स्थितीतील माणूस यांचे चित्रण करणारे आहे. साहित्य लेखनातील त्यांची भूमिकाच जागल्याची आहे.

थोडक्यात कांबळे यांच्या एकूण लेखनाकडे पाहिले तर मार्क्सवादातून उदयाला आलेली सामाजिक बांधिलकी व पुरोगामी साहित्याचे निकष त्यांच्या लेखनाला लागू पडतात. त्यांच्या साहित्याची आता पर्यंत थोडया फार प्रमाणात

समीक्षा आली आहे. पण ही समीक्षा त्यांच्या साहित्याला पुरेसा न्याय देणारी वाटत नाही. म्हणून त्यांच्या साहित्याचा अभ्यास संशोधनाच्या पातळीवर करण्याचा मानस आहे. त्यासाठी उत्तम कांबळेंच्या साहित्याचा सामाजिक दृष्टीतून अभ्यास अशी विषयी निवड केली आहे.

**विषय निवडीसंबंधी भूमिका**

महाविद्यालयीन जीवनात दलित साहित्य अभ्यासात आले. आणि या साहित्यातील जीवंत अनुभूतींनी मला अस्वस्थ केले. मिळतील ती दलित आत्मचरीत्रे मी झपाटल्यासारखी वाचून काढली. नंतर उत्तम कांबळेंचे साहित्य वाचनात आले आणि मला त्यात वेगळेपणा जाणवला. त्याबाबत मी जाणकारांशी चर्चा केली. त्यांच्या साहित्यातील परिवर्तनाची दिशा मला खूप मोलाची वाटली. आणि ह्या लेखकाच्या साहित्याचा संशोधनासाठी अभ्यास करण्याचे मनाशी ठरविले. त्यातून ह्या विषयाची निवड केली.

उत्तम कांबळेंच्या साहित्याचे सामाजिक दृष्टीतून संशोधन अद्याप झालेले नाही. म्हणून उत्तम कांबळे यांच्या साहित्याचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास हा विषय घेऊन संशोधन करण्याचा प्रयत्न आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) उत्तम कांबळेंच्या साहित्याचा सामाजिक दृष्टीतून अभ्यास करणे.
२) उत्तम कांबळेंच्या लेखनाची वैशिष्टये शोधणे.
३) उत्तम कांबळेंच्या साहित्यामुळे घडून आलेल्या परिवर्तनाचा शोध घेणे.
४) कार्यकर्ता, पत्रकार व लेखक म्हणून मराठी साहित्याला कसे योगदान लाभले आहे हे पाहणे.
५) उत्तम कांबळेंच्या कथा, कादंबरी, आत्मकथन, कविता, ललित साहित्याचा विचार करून कोणते नवा संदर्भ मिळतात ते तपासणे.
६) एक साहित्यिक म्हणून मराठी साहित्यातील त्यांचे वेगळेपण कोणते यांबंबंधीची निरीक्षणे अभ्यासात नोंदवणे.
७) त्यांच्या विस्तारलेल्या साहित्य कक्षांचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती व तंत्र**

उत्तम कांबळेंच्या साहित्याचा सामाजिक दृष्टीतून अभ्यास करणार आहे. साहित्याच्या विषयानुसार वर्गीकरण करून इतर अभ्यासपद्धतींचा अवलंब करणार आहे. कांबळे यांच्या साहित्यावरची समीक्षा, परीक्षणे व अन्य अभ्यासकांची टिपणे यांचाही आधार घेतला जाईल.

*** अनुक्रमणिका ***

१) उत्तम कांबळे यांची वाङ्मयीन जडण-घडण.
२) उत्तम कांबळे यांचे कथालेखन.
३) उत्तम कांबळे यांचे कांदबरी लेखन.
४) उत्तम कांबळे यांची आत्मकथने.
५) उत्तम कांबळे यांचे कविता लेखन.
६) उत्तम कांबळे यांचे ललित कविता लेखन.
७) समकालीन चळवळी व उत्तम कांबळेंचे साहित्य.
८) उपसंहार.

## * प्रकरण पहिले *

## उत्तम कांबळे यांची वाङ्मयीन जडण-घडण

सात पिढया कुणी शाळेची पायरी न चढलेल्या मजुराच्या घरात शूद्राती शूद्र जातीत जन्म. घरात दारिद्रयाचा मिट्ट काळोख या दारिद्रयाला न जुमानणारी करारी स्वाभिमानी सतत कष्टाला जुंपलेली आई. सैन्यात शिपाई असलेले रागीट स्वभावाचे वडील या खडतर वाटचालीत आई, आजी, आजोबा यांच्याकडून शिक्षणासाठी प्रोत्साहन बालपणापासून पुस्तकांची ओढ, जातिव्यवस्थेच्या बंदिस्त कोशात पुस्तकांनीच भरण पोषण केले.

जीवनात लाभलेल्या वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पार्श्वभूमीतून विचारांना बळकटी मिळाली. विचारांची नेमकी दिशा निवडण्याचे उपजत सामर्थ्य असलेले संवेदनशील मन, सततच्या वाचनातून लेखनाची प्रेरणा मिळाली. लेखनाला फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा आहे. कथा, कादंबरी, आत्मकथन, कविता संशोधनपर इ. वाङ्मय प्रकारात लेखन केले.

उत्तम कांबळेंच्या वाङ्मयीन जडण-घडणीचा आढावा या प्रकरणात

घ्यायचा असून त्याचबरोबर आपल्या जातीव्यवस्थेची रचना दाखवत दलित म्हणून व्यक्तीचे कोणकोणत्या पातळीवर कस–कसे शोषण होते हेही अभ्यासायचे आहे. विषम परिस्थितीत उत्तम कांबळेंनी एकटयाने स्वतःची वाट तुडवत उत्तुंग यश मिळविले. त्यांच्या यशाच्या पाठीमागे दडलेल्या नेमक्या सूत्रांचा उलगडा करायचा आहे. प्रस्तुत विषयाची मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

१.१ उत्तम कांबळे यांचा जीवनपट

१.२ उत्तम कांबळे यांची वाङ्मयीन वाटचाल

१.३ साहित्याच्या लेखनामागील प्रेरणा

१.४ उत्तम कांबळेंच्या कथा, कांदबरी, आत्मकथन, कविता, ललित साहित्य लेखन व त्याचे स्वरूप

निष्कर्ष

संदर्भ टिपा.

## * प्रकरण दुसरे *

## उत्तम कांबळे यांचे कथा लेखन

सामाजिक वास्तव, आदर्शवादी मूल्ये आणि प्रत्यक्ष जीवन यांतील आंतरविरोध, जातीबद्ध सामाजिक अंतस्तर, गतिमान जीवन वाढते, अस्तित्वभान या सर्वांचा परिणाम माणसाच्या जीवनावर होत असतो. याचे चित्रण आजच्या कथेतून येते. मानसशास्त्र आणि समाज शास्त्रानुसार व्यक्तीच्या आंतरमनातील समस्यांची मुळे समाज भूमीत असतात. या अर्थाने कथेचा अभ्यास हा माणसाचा, समाजाचा अभ्यास असतो. कथालेखन करतांना लेखकाच्या डोळ्यापुढे एक दृष्टीकोन असतो, हे या ठिकाणी अभिप्रेत आहे. उत्तम कांबळेंच्या कथांचे अध्ययन या दृष्टीकोनातून होणे गरजेचे आहे असे वाटते.

वाचन करता करता आपणही लेखन करावे असे कांबळेंना वाटू लागले. त्यातून कथालेखन सुरु झाले. समाजातील विरूविध स्तरात वावरत असतांना ज्या व्यक्ती त्यांचा कथाविषय झाल्या. त्यात वृद्ध, तरुण, स्त्री–पुरुष, लहान बालके, भटके, उघडयावर जगणारे, प्रतिष्ठित, महारोगी, ट्रकड्रायव्हर आणि प्राणीही आहेत. त्यांच्या पात्रामधून माणसांच्या समस्यांचे विविध स्वभावांचे दर्शन घडते. वास्तवाचे सहज चित्रण, साधी बोली भाषा, कथेच्या अंतसूत्राशी नाते सांगणारे शीर्षक ही त्यांच्या कथांची काही वैशिष्टये.

माणूस आणि समाज यांचा अतूट संबंध आहे व त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडतो हा अनुबंध या ठिकाणी शोधला जाईल.

कांबळेंच्या कथा शोधक दृष्टी देतात, विचार प्रवृत्त करतात यातूनच माणसाच्या मनात परिवर्तनाचे बीज पडते या अर्थाने कांबळेंच्या कथा महत्त्वाच्या वाटतात.

खालील घटकानुसार त्यांचा अभ्यास करता येईल.

२.१ उत्तम कांबळे यांचे कथालेखन : प्रेरणा व स्वरूप.

२.२ उत्तम कांबळे यांच्या कथांची वैशिष्ट्ये;

२.३ उत्तम कांबळे यांच्या कथांचे वर्गीकरण.

२.४ कथांची शीर्षके.

२.५ व्यक्तिचित्रण.

२.६ वातावरण.

२.७ भाषा शैली.

२.८ वाङ्मयीन मूल्यमापन.

निष्कर्ष.

संदर्भ टीपा

## प्रकरण तिसरे

## * उत्तम कांबळे यांचे कादंबरी लेखन *

कथा लेखनानंतर उत्तम कांबळे यांनी कादंबरी लेखनही केले. श्राद्ध आणि अस्वस्थ नायक या त्यांच्या दोन कादंबऱ्या आहेत. दलित चळवळीच्या अंतविरोधाचे चित्रण हा श्राद्ध या कादंबरीचा विषय आहे. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव दलितांवर पडत होता. अनेक ठिकाणी दलित चळवळी सुरु झाल्या होत्या. संवेदनशील, जागृत मनाला हया चळवळीतील अंतविरोध दिसत होता. त्याचेच नेमके चित्रण त्यांनी श्राद्ध या कादंबरीतून केले. त्यात स्वत:कडे परीक्षकाच्या भूमिकेतून पाडण्याचा दृष्टिकोनही आहे. या कादंबरीतील संवादाला गाडगे महाराजांच्या प्रबोधन शैलीचा बाज आहे. परिवर्तनाची दिशाही आहे.

समाजात बदल झाली की, माणसाच्या जीवनात बदल होतो. समाजाच्या बदलाचे वेगवेगळे घटक आढळून येतात. हे घटक माणसाच्या जीवनावर परिणाम करतात. या घटकांचा वाढता प्रभाव आदर्शवाद मुठीत धरुन जगू पाहणाऱ्या

सामान्य माणसाला जास्त प्रभावित करतात. हाच विषय कांबळे यांनी अस्वस्थ नायक मधून मांडला आहे. कांबळेंनी लिखाणाचा फॉर्म बदलला असला तरी दोन्ही कादंबऱ्यामधून समाजाचे बदलते वास्तव चित्रणच आहे. या अनुबंधानुसार त्यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यातील बदलता समाज आणि त्याचा माणसाच्या जीवनावर होणारा परिणाम सामाजिक दृष्टीतून शोधला जाईल.

नेमके प्रसंगचित्रण, ठळक व्यक्तिरेखा, बोली भाषेशी जवळीक साधणारी साधी सोपी भाषा ही त्यांच्या लिखाणाची कक्षाही वैशिष्टये आहेत. त्यादृष्टीने खालील घटकांनुसार कादंबरीचा विचार केला जाईल.

३.१ उत्तम कांबळे यांच्या कादंबरी लेखनाचे प्रेरणा व स्वरूप.

३.२ उत्तम कांबळे यांचे कादंबरीलेखन.

३.३ उत्तम कांबळे यांच्या कादंबरीचे वर्गीकरण.

३.४ कथानक विचार.

३.५ कादंबरीतील सामाजिकता.

३.६ जीवन चित्रण.

३.७ निवेदन पद्धती प्रसंग रेखाटन, व्यक्तिरेखा, भाषाशैली.

३.८ शीर्षकाची समर्पकता.

३.९ वाङ्मयीन मूल्यमापन.

निष्कर्ष

संदर्भ टिपा.

## प्रकरण चौथे

## * उत्तम कांबळे यांची आत्मकथने *

एका विशिष्ट टप्प्यापर्यंत यशस्वी वाटचाल केल्यानंतर उत्तम कांबळे यांनी वाट तुडवतांना हे आत्मकथन लिहिले. नंतर आई समजून घेतांना व नंतर एका स्वागताध्यक्षाची डायरी अशी एकुण तीन आत्मकथने लिहिली आहेत. कांबळे यांनी त्यांच्या जन्मापासून (१९५६) ते सकाळचे संपादक पदापर्यंतच्या खडतर वाटचालीचा आलेख यात मांडला आहे. ही वाट तुडवत असताना वाटयाला आलेले अज्ञान, दारिद्रय, गावकुसाबाहेरचे जगणे या वाटेवरची वेगवेगळ्या प्रकारची माणसं, घोर संघर्षातही आत्मबळ देणारी पुस्तके या सगळ्यांचे नेमके

चित्रण वाट तुडवतांना मध्ये आहे.

आई समजून घेतांना मध्ये त्यांनी आईचा शोध घेता घेता ते आत्मशोधही घेतला आहे. या पुस्तकातून सतत भाकरीसाठी लढवणाऱ्या करारी स्वाभिमानी आईचे चित्रण आहे. ही आई प्रेरणा देणारी, मुलाला पुढे पुढे लोटणारी व मानसिक आधार देणारी एक प्रबळ शक्ती आहे. हया आईला चेहरा नाही म्हणून बऱ्याच वाचकांना ती आपलीच आई वाटते. आज कुटुंब व्यवस्था विस्कळीत होत असतांना अशा आईचा अभ्यास होणे महत्त्वाचे वाटते.

एका स्वागताध्यक्षाची डायरी या आत्मकथनात सांगलीच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद बहाल झाल्यापासून संमेलन संपेपर्यंतच्या घडामोडींची, साहित्यविषयक क्रिया प्रतिक्रियांची नोंद आहे. यातून मराठी माणसाच्या विविधांगाचे दर्शन घडते. वरील तीनही आत्मकथनं दलित साहित्याला एका वेगळ्या वळणावर आणून ठेवतात. असलेली व्यवस्था बदलण्याची दृष्टी या आत्मकथनांमधुन दिसते. या दृष्टीने हया आत्मकथनांचा अभ्यास करावयाचा आहे. कांबळेंच्या आत्मकथनात प्रांजळपणा, साधेपणा, मोकळेपणा आहे. दिलखुलास निवेदन आहे. जीवाला चटका लावणारी भाषाशैली, ओघवते प्रवाही निवेदन, लेखनातला व माडंणीतला सोपेपणा ही या लेखनाची काही वैशिष्टये आहेत ती खालील घटकांनुसार.

४.१ उत्तम कांबळे यांच्या आत्मकथनाच्या प्रेरणा व स्वरूप.

४.२ आत्मकथनाचा आशय

४.३ आत्मकथनाची अभिव्यक्ती

४.४ आत्मकथनातून व्यक्त होणारा समाज, सामाजिक प्रश्न

४.५ आत्मकथनातून व्यक्त होणारी व्यक्तिमत्वे - वैशिष्टये

निष्कर्ष

संदर्भ टीपा.

## प्रकरण पाचवे

## * उत्तम कांबळे यांचे कविता लेखन *

उत्तम कांबळे यांनी साहित्य लेखनाचा प्रारंभ कविता लेखनाने केला. मात्र कविता प्रकाशित व्हायला तीस वर्ष लागले. जागतिकीकरणात माझी कविता आणि नाशिक तू एक सुंदर कविता हे दोन कविता संग्रह प्रकाशित. पहिल्या कविता संग्रहात तीस कविता आहेत. या कवितांच्या निवडीत विविधता आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये धर्म जातींनी संसर्गग्रस्त झालेले राजकारण, मोडीत निघालेले लोकशाही, समाजवाद, न्याय, समता, बंधुत्व, सामंजस्यत्व हे बघून कांबळेची कविता वास्तवाचा शोध घेत आहे. ग्लोबल व्हिलेजमधील सारे संदर्भ ती स्कॅन करते आहे. आणि मानवी समाजाच्या पुनर्मांडणीचा आराखडाही मांडते आहे. जागतिकीकरणातील बदलते सामाजिक मूल्य, मानवीमूल्य येथे तपासायचे आहेत. ग्लोबल व्हिलेज मधील माणूस आणि त्याचे माणूसपण समाजशास्त्रीय दृष्टीतून अभ्यासायचे आहे. कवितेतील नाविण्यपूर्ण प्रतिमा, बदलते संदर्भ, संगणक आणि माणसाच्या अस्तित्वाची लढाई यांच्यातील संघर्षाचा शोध, वैश्विक जाणिवा, लेखकाची काव्यशैली इ. गोष्टींचाही अभ्यास करणे अपेक्षित आहे. नाशिक तू एक सुंदर कविता या संग्रहात नाशिकचा ऐतिहासिक, पौराणिक, राजकीय–सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक वारसा पाच पाच ओळीत शब्दबद्ध केला आहे. या इंद्रधनुषी काव्याचे वेगळेपण अभ्यासणे अपेक्षित आहे. त्यासाठी खालील मुद्दयांचा परामर्श घेता येईल.

५.१ उत्तम कांबळेंच्या कवितांच्या लेखनाचे प्रेरणा व स्वरूप–
५.२ कवितांचा आशय
५.३ कवितेची अभिव्यक्ती
५.४ कवितेचे योगदान
निष्कर्ष
संदर्भ टीपा.

## प्रकरण सहावे

## * उत्तम कांबळे यांचे ललित लेखन *

उत्तम कांबळेंचा पिंडच ललित लेखकाचा आहे. थोडंसं वेगळं डोंगरासाठी काही फुले, निवडणुकीत भैरू, कुंभमेळ्यात भैरू असे त्यांचे चार ललित लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

डोंगरसाठी काही फुले यामध्ये आपल्या कार्यातून समाजाला मोठेपण मिळवून देणाऱ्या व्यक्तीवरील मृत्युलेखांचे संकलन आहे. त्यानिमित्ताने मराठी साहित्यातील मृत्युलेख लिखाणाची परंपरा पाहता येईल. निवडणूकीत भैरू, कुंभमेळ्यात भैरू या ललित लेखांतील भैरू हा सामान्य माणसाचा प्रतिनिधी आहे. हा भैरू रोज कुंभमेळ्यात फिरतो आणि त्याला जाणवलेल्या उणिवांवर

नेमक्या चर्चा करतो. त्यातून सगळया धार्मिक व्यवस्थेवर प्रकाश टाकतो. निवडणुकीतील भैरु ही अशाच प्रकारे भारतीय लोकशाहीचे खरे रूप सर्वांगाणे शब्दरूप करतो.

भैरूचा कॅलिडोस्कोप जबरदस्त आहे. त्याला झूम लेन्स आहेत. अनेक अँगल आहेत, खोली आहे, उंचीही आहे. भैरुच्या माध्यमातून कांबळेंनी भारतीय समाजाचं बहुआयामी चित्रण अगदी सोप्या भाषेत केले आहे. त्यासाठी कधी निवेदन शैली, कधी चर्चा, भाबडे प्रश्न, तितकीच भाबडी उत्तरं ज्यातून आपसूक सत्य डोकावतं, कधी भाष्य, संवाद, गप्पा, माहिती पुरवणं, घरगुती चर्चा अशी संवादाची सगळीच माध्यमं कांबळे मोठया ताकदीने वापरतात.

हया विशिष्ट काळात माणसांची बदलती मानसिकता त्यामुळे निर्माण झालेले सामाजिक वातावरण त्याबरोबर लेखाकाने अधोरेखित केलेले भूत भविष्य सामाजिक दृष्टीतून अभ्यासता येईल. त्यासाठी खालील घटकांनुसार परामर्श घेता येईल.

* उत्तम कांबळेंच्या ललित लेखनाच्या प्रेरणा व स्वरूप.

६.१ त्यांच्या ललित साहित्यातून व्यक्त होणारा समाज.

६.२ व्यक्तिरेखा.

६.३ समकालिनता.

६.४ समाज आणि सामाजिक प्रश्न.

६.५ ललित लेखनाचे योगदान व वैशिष्ट्ये

निष्कर्ष

संदर्भ टीपा.

## प्रकरण सातवे

## * समकालीन चळवळी व उत्तम कांबळेंचे साहित्य *

शाहु, फुले, आंबेडकर यांचे तत्वज्ञान व उत्तम कांबळेंचे साहित्य या साहित्याची मौलिकता लेखक लिहितो, तेव्हापासून आतापर्यंत लेखकावर काही परिणाम झाला आहे का ? त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लिखाणातून उमटले आहेत का ? त्यासाठी खालीलप्रमाणे चळवळींचा विचार केला जाईल.

७.१ समकालीन सामाजिक चळवळी.

७.२ राजकीय चळवळी

७.३ आर्थिक चळवळी
७.४ सांस्कृतिक चळवळी
७.५ रूढी परंपराचा वर्तमानावर होणारा परिणाम
निष्कर्ष
संदर्भ टीपा.

## प्रकरण आठवे
## * उपसंहार *

या संशोधनातून येणारे निष्कर्ष नोंदवले जातील.

परिशिष्टे :

* लेखकाची मुलाखत
* लेखकाचे हस्ताक्षर
* लेखकाला मिळालेले - एकूण पुरस्कार
* आधारभूत ग्रंथ
* संदर्भग्रंथ

★★★

# तौलनिक संशोधन पद्धती

प्रा.डॉ. सिताराम निघुट

तौलनिक संशोधन पद्धतीस साहित्याच्या संशोधनाची एक स्वतंत्र विद्याशाखा म्हणून अगदी अलिकडे मान्यता मिळाली आहे. त्यात दोन साहित्यकृतींची तुलना हा मूलभूत आधार आहे. याबाबत डॉ. सबनीस म्हणतात, ''मानवी समाजात समान दुवे शोधून तुलना करण्याची प्रवृत्ती आणि परंपरा तशी जुनी आहे.''

कलाकृती आणि तिच्या बाहेरच्या वास्तवाशी असलेल्या संबंधाचा शोध तौलनिक अभ्यास पद्धतीमुळे घेता येतो. तसेच ललित कलांचा आपसातील संबंधही तपासता येतो. विविध भाषांमधील समानसूत्र असणाऱ्या कलाकृतींचा तौलनिक शोध घेता येतो. एकाच भाषेतील वाङ्मयाची व्यक्तिविशिष्टता आकलन करण्यासाठी तौलनिक संशोधन पद्धती उपयुक्त आहे. अर्थात दोन कलाकृती या तुल्यबळ असल्या तरच त्यांची तुलना अर्थपूर्ण होईल. विशिष्ट कलाकृतीवरील प्रभावाची चिकित्सा तुलनेत अपरिहार्य ठरते. त्याशिवाय प्रभावयुक्त अशा स्वतंत्र कलाकृतींच्या जन्माची कारण मीमांसाही या संशोधन पद्धतीने शक्य असते.

जीवनात व साहित्य व्यवहारातही तुलना ही स्वभाविकपणेच अंमलात येणारे वास्तव आहे. पण साहित्यविश्वाला नवे परिमाण देणारी एक संशोधन पद्धती म्हणून तौलनिक साहित्य अभ्यासाची शाा पाश्चात्य जगात १९ व्या शतकात सुरू झाली मॅथ्यू अर्नोल्ड या विद्वानाने 'तौलनिक' या शब्दाच वापर प्रथम करून तौलनिक अभ्यास पद्धतीचा प्रारंभ केला अशी नोंद आढळते. त्यानंतर साहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात तौलनिक पद्धतीचा अभ्यास शास्त्रीय अंगाने करण्याची लाट आली. त्यामुळे या अभ्यास पद्धतीची व्याप्तीही वाढली. एक स्वतंत्र अभ्यास पद्धती म्हणून तौलनिक साहित्याचा प्रथम कोठे आणि केव्हा वापर झाला ते सांगता येत नाही. जर्मन महाकवी ग्यो एथे (इ.स.१८२७), फ्रेंच विदुषी मादाम दस्ताईल, प्रसिद्ध इंग्रज टिकाकार मॅथ्यू अर्नोल्ड (इ.स.१८४८) अशा निरनिराळ्या देशातील थोर, उदार साहित्य चिंतकांच्या उद्गारात तौलनिक साहित्याच्या संकल्पनेचा उगम शोधता येतो.

१९ वे शतक महाराष्ट्राच्या जीवनातील संस्कृती संघर्षाचे शतक आहे.

पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतीच्या महामंथनातून आधुनिक भारताच्या प्रसव वेदनांचा हा काळ आहे. त्याचा परिणाम म्हणून येथल्या विचाराला लेखनाला तौलनिक परिमाण प्राप्त झालेले दिसते. गुजराथ देशाच्या इतिहासाला (पुणे १८८५) 'रायतुलना' (पृ.३२१-३५२) हे परिशिष्ट जोडून लोकहितवादींनी इंग्रजी आणि देशी राजवटींची मर्मवेधी तुलना केली. ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' (इ.स.१८८२) हे वादळी पुस्तक शीर्षकापासून तुलनेला महत्त्व देते आणि स्त्रीवादी जाणिवांनी पुरुषी शोषणाविरुद्ध आवाज उठविते. 'तृतीयरत्न' (इ.स. १८५५) साऱ्या नाटकापासून वैचारिक लेखनापर्यंत म.फुले, सुप्त- प्रकट रूपात तौलनिक संस्कृतीमीमांसा करीत आहेत असे जाणवते. संस्कृत आणि इंग्रजी यांच्या तुलनेने म.मो.कुंटे, वि.कृ चिपळूणकर, गो.ग.आगरकर, हरिभाऊ आपटे, अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी काव्य नाटकांचा विचार तो याच काळाच्या आसपास केला. बंगालमध्ये बंकिमचंद्र चटर्जी यांनी थोडया पुढच्या काळात 'कुमार संभव' आणि 'पॅरडाईज लॉस्ट' या महाकाव्यांचे तौलनिक विश्लेषण केले. कळत नकळत आलेल्या या तौलनिक जाणिवांना इ.स.१९०७ मध्ये महाकवी रवींद्रनाथ टागोरांनी ठसठसशीत उद्गार दिला. त्यांनी 'विश्वसाहित्य' आणि 'तौलनिक साहित्य' या संज्ञा पर्यायी संज्ञा म्हणून वापरल्या आणि तौलनिक साहित्याला एक भूमिका आणि दिशा दिली.

मोजणे, जोणे, तोलणे, बरोबरीचे मानने, साम्य आणि भेद यांची पडताळणी करणे अशा वेगवेगळया अर्थानी 'तुलना' हा शब्द वापरला जातो. तुलना म्हणताच एकापेक्षा अधिक घटकांची उपस्थिती गृहीत असते. तुलनेची एकके वेगवेगळी असली तरी ती तुल्यबळ असावी लागतात. तसेच त्यांच्यात लक्षणीय संबंध असावा लागतो. तुलनेमध्ये साम्य आणि भेद यांचे एक द्वंद्व असते. त्यात भिन्नतेतील साम्य आणि साम्यातील भिन्नता यांचा शोध घेतला जातो. तुलनेला केवळ साम्यभेदांची नोंद घेऊन थांबता येत नाही. एककांच्या अंगोपांगावर कोणता परिणाम होतो ते शोधावे लागते. त्यांचे स्वरूप आणि कार्य यांच्यावर कोणता व कसा परिणाम होतो, याचाही विचार करावा लागतो.

विविध घटकांमधील साम्यभेदाची इंद्रियांना जेव्हा जाणीव होते तेव्हा तुलना संवेदनेच्या पातळीवर असते. अशा जाणिवांना शब्दरूप देण्याच्या प्रक्रियेत तौलनिक विधानांचा जन्म होतो. तौलनिक जाणिवा, विचार यांना जेव्हा संघटित आणि सूत्रबद्ध स्वरूपात व्यक्त केले जाते तेव्हा तुलनेला शास्त्रीय स्वरूप प्राप्त

होते. तुलना ही बोध करून देणारी एक शोध पद्धती आहे. ती आपल्याला पद्धतशीरपणे सत्याकडे घेऊन जाते आणि निश्चित निर्णयापर्यंत पोहोचविते. त्यामुळे तुलना ही तत्त्वज्ञानाचा आधार मानली गेली. सैद्धांतिक संशोधनाचे साधन मानली गेली. थोडक्यात, तुलना हे एक ज्ञानसाधन आहे आणि कोणत्याही ज्ञानसाधनाप्रमाणे त्याची प्रकृती तटस्थ असते. त्याचा वापर अनुकूल आणि प्रतिकूल करता येतो. तुलनेचाही तसा वापर केला गेलेला दिसतो.

तुलना या संज्ञेचे अधिक स्पष्टीकरण करावयाचे झाल्यास साधर्म्य, वैधर्म्य, उद्‌गम आणि प्रभाव या चार अंगांनी घेतलेला शोध होय. तुलना दोन किंवा अधिक साहित्यात केली जाते. तुलनेचे क्षेत्र जेवढे मर्यादित असेल तेवढी ती समर्पक आणि सुसंबद्ध ठरण्याची शक्यता असते. दोन किंवा अधिक साहित्यांपुरतीच तुलना मयादित नाही, इतरही मानवी ज्ञानशाखा आणि साहित्य यांतील सापेक्ष संबंधही 'तैलनिक साहित्याभ्यासात येतात' असे काही विद्वान मानतात. हेन्री रेमॉक यांच्या मते, 'तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्याशी केलेली तुलना तसेच साहित्याची इतर किंवा मानवी आविष्कार क्षेत्रांशी केलेली तुलना' हे त्यांचे मत योग्य आहे कारण ही क्षेत्रे म्हणजे साहित्येतर कला, तत्त्वज्ञान, इतिहास, भौतिकशास्त्र, सामाजिक शास्त्र, धर्म इ. होत.

कलाविश्वातील प्रत्येक साहित्यकृती ही 'अनन्यसाधारण' मानवी अशी एक भूमिका आहे. तसे मानल्यास तुलना अशक्य होते. परंतु विश्वातील वाङ्‌मयात काहीतरी समान दुवे आढळतात. या साम्याच्या आधारे तुलनात्मक चिकित्सा शक्यही होते आणि आवश्यकही ठरते. शिवाय एका सीमेपलीकडे कोणतीही कलाकृती ही 'अनन्यसाधारण' राहत नाही.

कलाकृतीच्या अंतर्गत सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या अनेक संशोधन पद्धती आज अस्तित्वात आल्या आहेत. पण साहित्याचा विशाल, व्यापक असा विश्वस्तरीय पट विचारात घेऊन कलाकृतीचा शोध घेणे, तिचे मूल्य निर्धारण करणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे. हे आवश्यक काम पारंपारिक संशोधन पद्धतीच्या तुलनेत तौलनिक संशोधन पद्धतीद्वारेच अधिक चांगले होईल. म्हणून निदान आज तरी कलाकृतीच्या रसग्रहण, विश्लेषण व मूल्यनिर्णयापर्यंतच्या सर्व पातळयांना न्यास देण्याच्या दृष्टीने सर्वात चांगला पर्याय म्हणून तौलनिक संशोधन पद्धती महत्त्वाची वाटते.

गेल्या काही दशकापासून विद्यापीठीय स्तरावर तौलनिक वाङ्मयाशी संबंधित असे वेगवेगळे अभ्यासक्रम आणि नवे उपक्रम सुरू झाल्याचे दिसत आहे. तेव्हा अस्तित्वात असलेल्या कला विद्याशाखांची पुनर्रचना करण्याचा अंशत: प्रयत्न हळूहळू आपल्याकडे होतो आहे. तर तौलनिक अभ्यास करण्यासाठी भारतीय प्रदेशासारखा वैविध्यपूर्ण देश विरळाच! किंबहुना आपल्या देशालाच सर्व विद्याशाखांच्यामध्ये तौलनिक अभ्यासाची गरजही अधिक आहे. वाङ्मयीन विश्वातही तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व, सांस्कृतिक एकता टिकविण्यासाठी व विकसित करण्यासाठी अनन्यसाधारणच आहे.

एकूण सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात वाङ्मयीन व्यवहाराची चिकित्सा करताना समीक्षेला व्यापक भूमीवरून प्रवास करावा लागतो. त्यातही विभिन्न देशाच्या प्रदेशाच्या सांस्कृतिक परंपरेतील कलाकृतींच्या तौलनिक अभ्यासाने ही समीक्षा अधिक व्यापक भान पचवून उभी राहताना दिसते. आधुनिक युगातील आधुनिक माणसांचे आपसातील सर्व स्तरीय गुंतागुंतीचे अनुबंध तपासण्याच्या कामी तौलनिक संशोधन पद्धती सर्वाधिक उपयुक्त ठरणार आहे. विश्वात्मक संदर्भात विशिष्ट कलाकृतीचे कला परंपरेचे मूल्य सिद्ध करताना तौलनिक पद्धतीच श्रेयस्कर ठरते. अस्तित्वात असलेले वाङ्मयीन अभ्यासाचे स्वरूप बदलून घेताना त्यांची व तौलनिक साहित्य अभ्यासाची सांगड कशी घालता येईल, हा एक जटिल प्रश्न असून त्याबाबत संबंधित विद्वानांच्या विधायक व बहु आयामी चिंतनाची गरज आहे. त्याशिवाय तौलनिक साहित्य संशोधनाची नवी शाखा अर्थपूर्ण ठरणार नाही.

बदलत्या जगात वाङ्मयाच्या अध्ययनाचा विचारही नव्या संदर्भात व नव्या भूमिकेतून केला जाणे आवश्यक आहे. विशेषत: वाङ्मयाचे अध्यापन आपल्या सामाजिक गरजांशी सांगड घालूनच करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वाङ्मयाची व एकूणच कलात्मक जाणीव प्रगल्भ होऊन सांस्कृतिक संचिताचे शुद्धीकरण होण्याच्या दृष्टीने कलामूल्यांची सुसंगत मांडणीही आवश्यक आहे. या संपूर्ण प्रक्रियेत तौलनिक साहित्याभ्यास केंद्रस्थानी राहून एकूण अभ्यासविश्व समृद्ध करू शकेल. तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने, अभ्यासकाचा जाणीव विश्वाात क्रांती घडून येते. विविध भाषांच्या व वाङ्मयीन कलाकृतीच्या अभ्यासामुळे एक भाषिक संस्कारातून रुजलेल्या संकुचित धारणा नष्ट होऊन व्यापक भान येते. आपला प्रदेश, आपली संस्कृती, आपली भाषा यांच्या अस्मिता बलशाही व

ताठर बनलेल्या असतात.तौलनिक साहित्याच्या अभ्यासातून ती ताठर व एकांगी भूमिका गळून पडते आणि एक प्रकारची सांस्कृतिक प्रगल्भता इतर भाषिक वाङ्मयाच्या अभ्यासातून संशोधकात संक्रमित होते.

आपले जे जे आहे ते सर्वच श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ती अज्ञानातूनच आकार घेत असते. पण आपल्या सांस्कृतिक परंपरेपेक्षाही इतर सांस्कृतिक मूल्यव्यवस्था अधिक श्रेष्ठ असू शकते. याचे भान तौलनिक संशोधन पद्धतीद्वाराच येऊ शकते. किंबहुना आपल्या सांस्कृतिक पर्यावरणातही काही दोष व कुरूपता असल्याची वास्तवता तौलनिक अभ्यासामुळे जागृत झालेल्या विवेकातूनच लक्षात येते.

भिन्न भिन्न भाषांतील वाङ्मयीन कलाकृतींच्या तौलनिक संशोधनातून आपल्या व इतरांच्या संस्कृतीमधील किंवा भाषिक व्यवहारामधील गुण व दोषांची सम्यक जाणीव संशोधकाला होत असते. हा सांस्कृतिक विवेक सार्वजनिक जाणिवेत प्रतिबिंबीत होऊन ते देशादेशांतील मानवीय संबंध अधिक मूल्यात्मक होण्यास मदत मिळते. तेव्हा विश्वमानवाच्या सुरक्षिततेसह विकसित संस्कृतीकरणासाठी व्यापक अर्थाने तौलिक साहित्याचे संशोधन महत्त्वाचे ठरते. आज तौलनिक साहित्य संशोधनाला विश्वात्मक मान्यता मिळत असून साहित्य संशोधनाच्या क्षेत्रात या संशोधन पद्धतीमुळे एक नवी क्रांती घडून येत आहे आणि विविध देशातील, प्रांतातील आणि भाषेतील साहित्याचे अनुबंध अधिक उजळ होत असून भाषिक आकलनही वाढत आहे.

साहित्याचा वाङ्मयीन दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी तौलनिक संशोधन पद्धती अतिशय फायदेशीर आहे.दोन कलाकृतीतील काव्यतत्त्व, आशय, अभिव्यक्ती, आविष्कार पद्धती, रूपबंध, रूपके, कल्पनाबंध, उपमा, अलंकार या वाङ्मयीन मूल्यांच्या आधारेही तौलनिक साहित्याभ्यास केला जातो.भाषेतील नव्याने आलेले विविध प्रवाह, भिन्नभिन्न प्रवृत्ती यांचा शोध या साहित्याभ्यासाद्वारे घेता येतो.या संशोधन पद्धतीद्वारे दोन साहित्यात तुलना करताना समान तत्त्वांबरोबरच विरोधी तत्त्वांचाही शोध घेतला जातो.

या अभ्यास पद्धतीमुळे साहित्याविषयी असणारे समज-गैरसमज, पूर्वग्रह दूर होतात. त्या त्या भाषेतील साहित्य, सौदर्य, साहित्य वैभवाचा शोध घेता येतो. सु.रा. चुनेकर यांच्यामते, ''तुलनात्मक साहित्य संशोधन हे राष्ट्रीय संस्कृती, एकात्मता, सौहार्द व सहकार्य यास अत्यंत पोषक आहे. आपल्या शेजारच्या प्रांतातील लोकांविषयी आपले भ्रम दूर होऊन मने स्वच्छ होतील विविध प्रांतातील

तसेच अन्य प्रदेशांतील साहित्य समृद्धीचे ज्ञान होऊन आपले स्वभाषेतील साहित्याचे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय साहित्याच्या प्रकाशात परीक्षण करता येईल,'' सु.रा. चुनेकरांचे मत अतिशय योग्य वाटते. कारण तौलनिक साहित्य संशोधनातून आपल्या साहित्याविषयी सजगता निर्माण होते. साहित्यातील उणिवा लक्षात येऊन आपण ती दूर करण्याचा प्रयत्न करू शकतो. तसेच गुणात्मक साहित्य निर्मिती करू शकतो. हे या संशोधन पद्धतीचे यश आहे.

थोडक्यात दोन भाषा, दोन लोक, दोन साहित्य प्रकार, दोन कालखंड, दोन प्रवाह ही साधन सामग्री समजून परस्परावरील प्रभावांचा अभ्यास तौलनिक संशोधन पद्धतीत केला जातो.

★★★

# 'संशोधन प्रक्रिया'

प्रा.सुरेखा बांगर

## प्रास्ताविक:–

आजचे युग हे संशोधनाचे युग आहे. साहित्य, विज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, उद्योग–व्यवसाय, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, मानसशास्त्र आदी ज्ञानाची विभिन्न क्षेत्रे संशोधनाचा विषय बनलेली आहेत. संशोधन हे केवळ ज्ञानप्राप्तीच्या हेतूने त्याचप्रमाणे व्यावहारिक हेतूने ही केले जाते. ज्ञानप्राप्तीसाठी केलेले संशोधन मानवाच्या बौद्धिक प्रेरणांचा सातत्याने शोध घेत असते.

शोधन आणि संशोधन हे ड्शरीलह आणि ठशीशरीलह या शब्दाचे पर्यायी शब्द आहेत. अज्ञाताचा शोध (ड्शरीलह) आणि ज्ञानाचे पुनर्मूल्यांकन (ठशीशरीलह) हे अर्थ त्यामध्ये अपेक्षित/आवश्यक आहे.

## संशोधन प्रक्रिया:–

संशोधन ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया असते. संशोधन हे सातत्याने शोध घेत असते. संशोधन हे शास्त्रीय स्वरूपाचे असते हे लक्षात घेऊन एम.ए.पर्यंतच्या अभ्यासामध्ये केवळ विद्यार्थ्याला संशोधन ही प्रक्रिया माहीतच नसते. त्याला एखादा संशोधनासाठी विषय सापडला तर त्याने अवश्य निवडला पाहिजे. विषय निवडण्याची क्षेत्र मर्यादा नसते. तसेच साधनांची उपलब्धता लक्षात घेऊन विषयाची निवड केली पाहिजे. संशोधन करणाऱ्या एखाद्या विद्यार्थ्याला जर विचारले की, तू संशोधन कशावर करणार? तर तो लगेचच प्रतिउत्तरीत होतो की, तो लगेचच सांगतो, दलित साहित्यावर, परंतु त्याला दलित साहित्यावर काय संशोधन करायचे आणि कसे करायचे याची काहीशी कल्पना नसते. परंतु त्याने अशा प्रकारचा विषय निवडला पाहिजे की, तो आतापर्यंत कोणीच निवडलेला नसला पाहिजे.

विषय निवडण्याआधी ज्या विषयावर संशोधन केले असेल असा विषय निवडू नये. डॉ.वसंत कुलकर्णी यांनी विविध विद्यापीठांतील प्रबंधांची सूची पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहे. ती अभ्यास करणाऱ्याने अवश्य पाहिली पाहिजे. ज्या विषयावर खूप लिहिले गेले आहे. असा विषय न निवडता ज्या विषयावर कोणीच काही लिहिले नाही. अशा प्रकारचा विषय निवडला पाहिजे. ज्या विषयावर

खूप लिहिले गेलेले असा विषय न निवडता त्या विषयावर कोणी फारसे लिहिले नाही. असा विषय निवडला पाहिजे. संशोधनात नावीन्य आणि मौलिकता नसेल तर त्या संशोधनाला काडीचीही क़िंमत नसते. जो विषय निवडला आहे. त्याचे शब्दांकन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जो विषय निवडलाआहे. त्या विषयातून काय काय मांडावयाचे आहे हे त्याच्या निष्कर्षावरून सुचवायचे असते. जो विषय निवडला आहे.

त्या विषयासाठी साधनसामग्रीचे संचयन अभ्यासकला करावे लागते. तसेच त्याला त्यासाठी ग्रंथालयाची मदत घ्यावी लागते. ग्रंथालयात अनेक प्रकारच्या संदर्भसूची असतात. त्यांचा उपयोग अभ्यासकाला करावा लागतो. त्यासाठी अभ्यासकाला योग्य प्रकारे टिपणे काढावी लागतात. तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या नोंदी ठेवाव्या लागतात.

**संशोधनाची साधनेः-**

साहित्य संशोधन करताना संशोधनाची साधने अतिशय महत्त्वाची असतात. प्राचीन मराठी साहित्याचे संशोधन करताना या साधनांना खूप महत्त्व असते. संशोधनासाठी उपलब्ध होणारी साधने विविध प्रकारची असतात. त्यामध्ये आपणाला कोरीव लेख, हस्तलिखिते, दैनंदिनी, पत्रे, अभिलेखागारे, ग्रंथालये, कोशवाङ्मय, सूचिवाङ्मय, सांख्यिकी, प्रश्नावली, मुलाखती, गणकयंत्र इ. विविध प्रकारची साधने संशोधानासाठी उपयुक्त ठरतात. यामधील काही साधनांचा उपयोग प्राची साहित्याच्या संशोधनासाठी व क्षेत्रीय संशोधनासाठी होतो. त्यांचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१) कोरीव लेखः-**

शिलालेख आणि ताम्रपट यांना कोरीव लेख म्हणतात. ही साधने अस्सली समजली जातात. ही साधने टिकाऊ असतात. प्राचीन काळात लिहिलेला जो मजकूर असतो. त्याला पुराभिलेख असे म्हणतात. कोरीव लेखांचा जो अभ्यास असतो. त्याला पुराभिलेखविद्या असे म्हणतात. प्राचीन काळात भारतीय लोक शिळा, धातू, लाकूड, स्तंभ, धातूंचे पत्रे, भांडी, विटा, शिंपले, हस्तदंती, मुद्रा इ. वस्तूंवर लेख लिहीत असतात. हे लेख कोरलेले असतात.

२) हस्तलिखिते:-

हस्तलिखिते हे प्राचीन साहित्याच्या संशोधनातील आणखीन एक महत्त्वाचे साधन आहे. एखाद्या ग्रंथाची संहिता तयार करताना भिन्न भिन्न काळात वेगवेगळ्या व्यक्तींनी हस्तलिखिते तयार केलेली असतात. त्या हस्तलिखितांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे असते. मुद्रणकलेच्या आधी ग्रंथप्रसार हस्तलिखित ग्रंथांच्याच आधारे येत असते. वेदवाङ्मयापासून ते मराठी साहित्यापर्यंत झालेली वाङ्मयनिर्मिती हस्तलिखित स्वरूपात ग्रंथांनीच जतन करून ठेवलेली आहे.

३) दैनंदिनी:-

दैनंदिनी हे एक महत्त्वाचे साधन आहे. साधनांच्यामध्ये समकालीन साधने महत्त्वाची मानतात. ही साधने वास्त असतात. दैनंदिनी लिहिणारी व्यक्ती मात्र तोलामोलाची असावी लागते. दैनंदिनी लिहिण्याचा हेतू मात्र शुद्ध असायला हवा. दैनंदिनी घटनांना महत्त्व देत असते.

४) पत्रे:-

पत्रे वेगवेगळ्या व्यक्तींनी, वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या संदर्भात लिहिलेली असतात. संशोधनात पत्र हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. व्यक्तीने इतरांना लिहिलेली पत्रे जशी महत्त्वाची असतात. तशीच व्यक्तिगत पत्रात देखील व्यक्तीच्या मनःस्थितीचे व तिच्या जीवनविषयक विचारसरणीचा अभ्यास करणे अतिशय महत्त्वाचे असते. ऐतिहासिक कागदपत्रे इतिहासलेखनाचे अतिशय महत्त्वाचे असे साधन असते. तसेच अशा पत्रांचे संशोधन अतिशय किचकट असते.

५) अभिलेखागारे:-

व्यक्ती, संस्था, कंपनी, राज्य इत्यादींना त्यांची केलेले व्यवहार नीट लिहून ठेवणे असे वाटणे साहजिकच आहे. त्या व्यवहारासंबंधीची माहीती लिहून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. अशी माहीती लिहून ठेवलेली असते किंवा लिखाण असते. अशा लिखाणाला पुराभिलेख किंवा अभिलेख असे म्हणतात. ही लेखागारे खूप मोठी असतात किंवा लहानही असतात. केंद्रसरकार ही राज्ये चालविते त्यात त्या राज्यांची लेखागारे असतात.

## ६) ग्रंथालये:-

साहित्याच्या संशोधनात ग्रंथालयांना तीर्थक्षेत्रे किंवा पवित्रस्थान असे म्हणतात. ग्रंथालयाशिवाय साहित्याचे संशोधन केवळ अशक्य आहे. विषय निवडण्यासाठी ग्रंथालयाचा उपयोग केला जातो मराठी वर्णमाला जर माहीत नसेल तर ग्रंथालयाचे साह्य घेता येणार नाही. ज्ञानसाधने मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. ग्रंथपाल ज्ञानसाधन उपलब्ध करून देत असतो. ज्ञान संशोधनात ग्रंथपाल हा अभ्यासकाचा महत्त्वाचा मित्र आहे किंवा साह्यकर्ता आहे. पुस्तके, नियतकालिके, प्रबंध, चर्चासत्रांचे, वृत्तांत, विद्वत संस्थांचे अहवाल, हस्तलिखित, कागदपत्रे इ. संशोधनात्मक साहित्य संशोधनपर ग्रंथालयात उपलब्ध होत असते.

## ७) कोशवाङ्मय व सुचिवाङ्मय:-

कोशवाङ्मयात तीन टप्पे किंवा घटक असतात.

अ) प्रथम विविध माहीती मिळविणे ती टिपून ठेवणे

इ) माहीतीचे विषयानुसार वर्गीकरण करणे.

उ) आकारमानानुसार मांडणी करणे

कोशवाङ्मय हे ज्ञानसंपादनाचे सर्वात महत्त्वाचे साधन असते.

कोशवाङ्मयाचे चार वर्ग पडतात ते पुढीलप्रमाणे:-

अ) शब्दकोश:- शब्दकोशात शब्दांचा संग्रह असतो आणि त्याचा अर्थही असतो.

ब) विश्वकोश:- ज्ञानाचा संग्रह करणाऱ्या कोशांचा हा दुसरा वर्ग आहे. त्यांना ज्ञानकोश किंवा विश्वकोष असे म्हणतात.

क) कोशसदृशवाङ्मय:- या कोशवाङ्मयाची रचना प्रत्यक्षात कोशपद्धतीने झालेली नाही.

ड) सूचिवाङ्मय:- सुची हे एक महत्त्वाचे शास्त्र आहे. संशोधकाला वेगवेगळ्या सूचींचा परिचय करून देणे आवश्यक आहे. ज्ञानसंचयाच्या दिशा दाखविण्याचे कार्य सूचिवाङ्मय करीत असते.

## ८) सांख्यिकी:-

सांख्यिकी हे संशोधन क्षेत्रातील एक नावीन्यपूर्ण असे साधन आहे. संख्याशास्त्रीय कसोटी ही शास्त्रीय पद्धतीची असल्यामुळे तिच्या निर्णयाबाबत

दुमत असू शकते.

**९) प्रश्नावली:–**

क्षेत्रीय अभ्यास करताना प्रश्नावलीचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे असते. परंतु काही वेळा लेखकांच्या मुलाखती प्रत्येक वेळी घ्याव्या लागतात. म्हणूनच प्रश्नावली ही संशोधनातील एक महत्त्वाचे साधन आहे असे वाटते.

**१०) मुलाखती:–**

साहित्याचे संशोधन असो किंवा आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन असो, संशोधकाला पुष्कळदा मुलाखतीचे साधन आणावे लागते. तसे पाहता प्रश्नावली आणि मुलाखती ही दोन्ही साधने एकाच वेळेला संशोधकाला आणावी लागतात.

**११) गणकयंत्रादी तांत्रिक साधने:–**

आधुनिक काळात संशोधन क्षेत्रात तांत्रिक साधनांची भर मोठ्या प्रमाणात पडत आहे. कॉम्प्युटर म्हणजे गणकयंत्र हे तंत्रविद्येच्या क्षेत्रातील असामान्य प्रगतीचे प्रतीक आहे.

**सारांश,** संशोधानात निष्कर्ष महत्त्वाचे असते. संशोधानात चिंतनाचा भाग महत्त्वाचा असतो. सतर्क चिंतन, सर्जकचिंतन आणि सहेतूक चिंतन असे चिंतनाचे प्रमुख तीन प्रकार पडतात.

१) सतर्क चिंतनात सत्त्याच्या शोधाचा प्रयत्न असतो त्यासाठी विषयाचे स्वरूप नक्की करावे लागते. या चिंतनात कार्यकारण संबंधाना अधिक महत्त्व असते. त्यामुळे संशोधनात अशा प्रकारचे चिंत महत्त्वाचे असते.

२) सर्जक चिंतन हे विविध संबंधी घटक अवयवांच्या पृथक्करणावर अवलंबून असते.

३) सहेतूक चिंतन हा चिंतनाचा महत्त्वाचा भाग/प्रकार मानला जातो. कित्येक वेळा विशिष्ट हेतूमनात धरून चिंतन केले जाते. हीच तर खरी संशोधनाची फलश्रृती असते.

★★★

# 'मराठी हस्तलिखितांचे संशोधन'

**प्रा.डॉ.बाळासाहेब दिघे**

**प्रस्तावना –**

इ.स.१००० च्या आसपासचा काळ हा मराठी भाषेच्या निर्मितीचा काळ मानला जातो. निरनिराळे हस्तलेखीय ग्रंथ व कोरीव लेख यांच्या आधारे मराठीच्या निर्मिती काळाची निश्चिती करता येते. श्रवण बेळगोळ येथील कोरीव लेख हा मराठी भाषेतील पहिला कोरीव लेख मानला जातो. श्रवण बेळगोळ येथील शिलालेख शके ९०५ असल्याचे मत कृ.पा.कुलकर्णी यांनी मांडले तर श्रवण बेळगोळ येथील शिलालेख हा शके १०३९ चा असल्याचे मत हुल्टझ यांनी मांडले. अक्षी येथील शिलालेख शके १०३९ असल्याचे मत मिराशी यांनी मांडले. परंतु त्याही पूर्वी दिवे आगर येथील ताम्रपट इ.स.१०६० हा मराठी भाषेतील पहिला कोरीव लेख आहे. याव्यतिरिक्त इ.स.११४६ भांदकाचा शिलालेख, इ.स.११५७ पळसदेव येथील शिलालेख तर इ.स.११८९ मधील पंढरपूरचा शिलालेख हे मराठी भाषेच्या निर्मितीचे पुरावे आहेत.

मराठी भाषेची निर्मिती इ.स.६ व्या शतकात शंकराचार्यांनी केलेल्या वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनातून झाली होती हे मत चि.विं.जोशी यांनी मांडले आहे तर मराठी व पाली या भाषांचा संबंध जोडण्याचे प्रयत्न रा.भि.जोशी यांनी केले. वि.का.राजवाडे यांनी मंगळवेढ्याच्या ताम्रपटाच्या आधारे मराठीचा निर्मितीचा काळ इ.स.पाचव्या शतकापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला होता. मराठी भाषा निर्मितीचा संबंध वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाशी जोडून मराठी निर्मितीचा काळ इ.स.८०० पर्यंत चि.वि.वैद्य नेतात. वरील प्रमाणे मराठी भाषा निर्मिती काळाच्या संदर्भात सांगता येते.

हस्तलेखन ही एक कला आहे. ते अनंत परिश्रमाने साध्य होत असते. काही ठिकाणी हस्तलिखितांचे वाचन करताना लेखनाबरोबर चित्राकृती आढळतात. ताम्रपट व शिलालेख यांचा उपयोग कोरीव लेख निर्मितीसाठी केला जात असला तरीही त्यांना ग्रंथ म्हणता येणार नाही.

मराठी हस्तलेखनाद्वारे तत्कालीन संस्कृती, रितीरिवाज, भूप्रदेश, वातावरण, बोलीभाषा, हस्तलेखनाचे उद्देश, हस्तलेखनामागील प्रेरणा याचा

संशोधकाला बोध होतो. हस्तलिखितांचे वाचन करण्यापूर्वी हस्तलिखित ग्रंथ लावण्याची प्रक्रिया संशोधकाला करता आली पाहिजे. ग्रंथ सोईचा कोणता? व ग्रंथ उलटा कसा झाला आहे? ग्रंथाची पाने उलट-सुलट, खाली-वर झाल्यास ग्रंथ लावला जात नाही. त्यामुळे वाचकाला ग्रंथाचे वाचन करण्यापूर्वी काटेकोरपणे ग्रंथ क्रमाने लावता आला पाहिजे.

हस्तलिखित ग्रंथाच्या अभ्यासाची ग्रंथ लावणे ही पहिली पायरी आहे. हस्तलिखित ग्रंथ व्यवस्थित राहण्यासाठी तो भगव्या कापडामध्ये गुंडाळून व्यवस्थित ठेवण्याची प्रथा आहे. अलीकडे दुर्मिळ स्वरूपाची हस्तलिखिते पुढील पिढीसाठी जपून ठेवण्यासाठी हस्तलिखितांची पाने संगणकाच्या मदतीने स्कॅन करून त्यातील माहिती जतन करून ठेवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

मराठी हस्तलिखित साहित्य निर्मितीची प्रेरणा –

मुद्रणपूर्व काळामध्ये हस्तलिखित पोथ्यांचा उपयोग ज्ञानार्जनासाठी केला जात होतो. त्याकाळात पोथ्या तयार करणे हा अनेक ठिकाणी स्वतंत्र व्यवसाय बनला होता. हस्तलिखित पोथ्या किंवा हस्तलिखित ग्रंथ लेखन करणारे सर्वच जण केवळ ब्राम्हण होते असे नाही तर ते निरनिराळया समाजातील व प्रांतातील होते. तरीही पोथ्यांचे लेखन कार्य करण्याचे काम कित्येक ठिकाणी नियमितपणे केले जात होते. लेखन कार्य हेच आनंद मानून लेखन करण्याची प्रथा त्याकाळामध्ये रूढ झाली होती. ठरावीक स्वरूपाची बिदागी देऊन त्यांच्याकडून राजे-रजवाडे, संस्थानिक, धर्मप्रसारक, सरदार हे लेखन कार्य करून घेत होते.

मराठी हस्तलिखितांचे संशोधन पुढील मुद्यांच्या आधारे करण्यात येते.

१. संशोधन पद्धती-ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर मराठी हस्तलिखितांच्या अभ्यासासाठी करावा लागतो. कारण ऐतिहासिक संशोधन हे भूतकालाभिमुख असते. या संशोधन पद्धतीमधून भूतकाळातील घटना अथवा साहित्यकृतींचा नेमका अर्थ लावता येतो. त्या साहित्यकृती लेखनामागील कारणे शोधता येतात, उपलब्ध नवीन माहितीच्या आधारे भूतकालीन घटनांचा संबंध नव्याने उजेडात आणता येतात. ऐतिहासिक संशोधनाअंती निघणाऱ्या निष्कर्षांच्या आधारे वर्तमान स्थिती व समस्या यांचे यथार्थ आकलन व स्पष्टीकरण करता येते.

२. हस्तलेखनाच्या प्रेरणा- प्राचीन हस्तलिखित ग्रंथामध्ये धार्मिक, सांप्रदायिक, पंथीय, कोरीव लेख, ताम्रपट, शिलालेख, पासोडी लेख, ताडपत्र, पत्रे, बखरी, प्राचीन गद्य व पद्य ग्रंथ, कथात्मक साहित्य, चरित्र साहित्य, स्फूट

रचना इत्यादींचा समावेश होतो. प्राचीन हस्त लेखन निर्मितीच्या निरनिराळया प्रेरणा होत्या. परोपकार, पुण्यसंपादन, धर्म प्रसार, स्वतःच्या आनंदासाठी, संकटनिवारणार्थ, स्वमत प्रसारासाठी, गुरूच्या किंवा धन्याच्या आज्ञेनुसार किंवा त्यांच्यावरील प्रेमापोटी, स्मृतिकथन, केवळ पठनार्थ, संस्कृत भाषेतील ज्ञान इतरांना मिळावे या व अशा अनेक प्रेरणेने मराठी हस्तलिखिते निर्माण झालेले दिसून येतात.

मराठी हस्तलिखितांद्वारे प्राचीन काळापासून ते वर्तमानकाळापर्यंत प्राचीन साहित्याची जोपासना करण्याचे काम केले आहे. मराठी हस्तलिखिते तयार करताना अनेक संकटे निर्माण होत होती. हस्तलिखित कर्त्याला अनंत कष्ट घेऊन हस्तलिखिते तयार करावी लागत होती. वैदिक, संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश भाषांतील ज्ञानाची साठवणूक करण्याचे काम हस्तलिखितांनी केले आहे. हस्तलिखितांद्वारे ग्रंथ लेखनाची एक प्रदीर्घ परंपरा साहित्यामध्ये उदयाला आली आहे. हस्तलिखितांमुळे वेद, त्यांची भाषा व उच्चार यांचे जतन झाले आहे. हस्तलिखित तयार करताना अनेक दोष निर्माण होण्याची शक्यता असते. तसेच हस्तलिखितांच्या नकला तयार करतानाही अनेक प्रकारचे दोष उत्पन्न होऊ शकतात.

३. संहिता- 'पाठ' म्हणजे मूळ संहिता, वाक्य, शब्द अथवा त्यांची रूपे होय. पाठ हा शब्द त्या-त्या परंपरेतील पठणात आलेली संहिता किंवा पठणानुसार लिहून काढलेली संहिता अशा दोन्ही अर्थांनी वापरला जातो. पारंपरिक आणि लेखकाची मूळ संहिता म्हणजेच 'पाठ' होय. उदा. महानुभावांच्या चरित्रग्रंथांचे हीरांबा पाठ, रामेश्वराबास पाठ यासारखी अनेक उदाहरणे आहेत.

संहितेचे कोणतेही बंधन किंवा ठरावीक स्वरूप असत नाही. संहिता ही संपूर्ण ग्रंथाची, ग्रंथामधील ठरावीक भागाची, वाक्याची किंवा शब्दाची असू शकते. संहिताचे संपादन करण्यासाठी एकाच ग्रंथाच्या अनेक प्रतींचा संग्रह करावा लागतो. उदा.परशुरामबास यांनी महानुभावांच्या चरित्र ग्रंथींच्या भिन्न-भिन्न पाठांचे संकलन करून चरित्र ग्रंथाची संहिता सिद्ध केली.

४. पाठ चिकित्सा -पाठ चिकित्सा आणि पाठ निर्णय या संहिता संपादनाची दोन महत्त्वाची अंगे आहेत. पाठचिकित्सा म्हणजे उपलब्ध साधनांची चिकित्सा करून एखाद्या ग्रंथाची मूळ संहिता निश्चित करण्याचे शास्त्र होय. एखाद्या ग्रंथाच्या काळाच्या ओघात निरनिराळ्या स्वरूपाच्या अनेक हस्तलिखित

ग्रंथ प्रती उपलब्ध होतात. त्यामध्ये अनेक पाठ निर्माण झाले तर मूळ पाठाचा शोध घेणे हे संशोधकाचे काम असते. प्राचीन काळी मूळ हस्तलिखितांवरून नकलाकार अनेक नकला तयार करत होते. त्यांनी केलेल्या नकला राजे–महाराजे, विद्वान लोक स्वतःजवळ ठेवून ग्रंथसंग्रह करत होते. अनेक ग्रंथांचे कागद काही दिवसांनी जीर्ण झाल्यानंतर त्या ग्रंथांच्या नकला तयार करवून घेतल्या जात होत्या. हस्तलिखितांच्या प्रतीवरून त्या ग्रंथांच्या नकला करत असताना नकळतपणे त्यामध्ये दोष निर्माण होत होते. त्यामुळे पाठ चिकित्सा करावी लागते. उदा.ज्ञानेश्वरीमध्ये अनेक अपाठ शिरले होते. कालांतराने संत एकनाथ महाराजांनी त्यातील अपाठ शोधून काढले आहे.

५. प्रक्षेप–नकलाकारांनी नकल केलेली हस्तलिखिते ही काही वेळेस कमी–अधिक प्रमाणात दोषपूर्ण असू शकतात. हस्तलिखितांचे वाचक स्वतःला असलेली माहिती, समानार्थ श्लोक, अभंग, ओव्या समासामध्ये लिहून ठेवतात. कित्येक वेळेस नकलकार हे नकल करताना वाचकाने केलेला शेरा किंवा लिहिलेला मजकूर हा काव्यातीलच आहे असे समजून नकल करतात त्यावेळेस तो प्रक्षेप होतो. नकलाकाराने स्वतःच्या मनातील विचाराची भर मूळ ग्रंथात घातल्यास प्रक्षेप होतो. ग्रंथवाचनामध्ये प्रक्षेप अडथळा आणण्याचे कार्य करतो.

६. तळटिपा–संहितेचे सर्वांगीण आकलन होण्यासाठी तळटीपा उपयुक्त ठरतात. संपदित संहितेसाठी उपयोगात आणलेली साधन सामग्री कोणत्या स्वरूपाची आहे याचा बोध तळटीपावरून होतो. तळटीपावरून लेखकाला त्या वाक्याबद्दल अथवा त्या संदर्भीय शब्दाबद्दल काय माहिती द्यायची आहे वाचकांना बोध होतो. तळटीपा या संशोधकांना उपयुक्त ठरतात. परंतु सर्वसाधारण वाचकांना अडगळीच्या, किचकट स्वरूपाच्या वाटतात. तळटीपा त्यांच्यादृष्टीने महत्त्वाच्या नसल्याने सर्वसाधारण वाचक त्याकडे दुर्लक्ष करत असतो.

७. कालनिर्णय– हस्तलिखितांचा कालखंड कोणता होता? हे ठरविण्याचे कार्य संशोधकाला करावे लागते. हस्तलिखितांच्या निर्मितीचा काळ संशोधकाला समजल्यास तत्कालीन घटना, प्रसंग, व्यक्ती, राज्यकारभार, स्थळे यावर प्रकाश पडून त्यांचा ने का काळ समजण्यास मदत होऊ शकते.

८. प्राचीन लिपी–हस्तलिखितामध्ये निरनिराळ्या लिपीमध्ये लेखन केलेले असते. या लिपीवरून संबंधित हस्तलिखित कोणी केले आहे, या हस्तलिखिताचा कालखंड ओळखता येऊ शकते. हस्तलिखिताच्या निर्मितीचा प्रमुख व दुय्यम

उद्देश, लेखनाच्या प्रेरणा समजू शकतात.

९. प्राचीन कोरीव लेख– कोरीव लेखाच्या मदतीने भाषा संशोधनास मदत झाली आहे. मराठी भाषेचा उगम व उत्क्रांती शोधण्यासाठी प्राचीन कोरीव लेखांची मदत झाली आहे. कोरीव हस्तलेखनासाठी शिलालेख व ताम्रपटाचा उपयोग प्राचीन काळात मोठ्या प्रमाणावर केला जात होता. ताम्रपट हे पूर्वी दान दिले जात होते. ताम्रपटावर काळ, देवतेचे नाव, दात्याचे नाव किंवा त्याची वंशावळ, संबंधित व्यक्तींने केलेल्या दानाचा तपशील कोरीव केला जात होता.

१०. ऐतिहासिक कागदपत्रे– प्राचीन काळामध्ये हस्तलेखनासाठी कागदाचा वापर केला जात होता. ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे हस्तलिखिताचा काळ, तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचे संशोधकाला आकलन होऊ शकते. ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे तत्कालीन प्रदेशाची पार्श्वभूमी, त्याठिकाणी घडलेल्या घटनांचा संदर्भ मिळू शकतो. तत्कालीन समाजाच्या बोलीभाषेची संशोधकाला ओळख होते. ऐतिहासिक कागदपत्रे ही विश्वसनीय मानली जातात. मराठी ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये मराठी, मोडी, फार्सी, इंग्रजी, डच, पोर्तुगीज, फ्रेंच, संस्कृत, हिंदी, कानडी यासारख्या भाषेतील लेखन सापडते. ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये सनदपत्रे, जमाखर्च, बखरी, पत्रव्यवहार, पोवाडे, याद्या, टिपणे, वंशवेल, शकावल्या सापडतात.

**हस्तलिखितांचे संशोधन करताना येणाऱ्या अडचणी –**

१. खरेखोटेपणा–हस्तलखितांचे लेखन प्राचीन काळी झालेले असल्याने त्याच्या खरेखोटेपणाविषयी संशोधकाला कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेता येत नाही. केवळ लिखित आहे म्हणून हस्तलिखिते ही संशोधकाला विश्वासार्ह मानावी लागतात.

२. हस्तलेखनाची झालेली झीज–प्राचीन काळी हस्तलिखितांची निर्मिती झाली असल्याने कित्येक हस्तलिखिते जीर्ण झालेली आहेत. ऊन, वारा व पाऊस यामुळे अनेक हस्तलखितांची झीज झाली आहे. विशेषतः शिलालेख, भूर्जपत्र व ताम्रपट यांची झीज झाली असल्याने ते आकलन होण्याच्या स्वरूपाची राहिलेली नाहीत. जीर्ण झालेल्या हस्तलिखितामुळे संशोधनामध्ये व्यत्यय निर्माण होतो.

३. समाजातील अप्रथा–प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडामध्ये

समाजामध्ये अनेक अप्रथा निर्माण झाल्या आहेत. मूर्तीला शेंदूर चोळणे, मूर्तीवर तेल टाकणे, शिलालेखांवर दगड किंवा तत्सम टणक वस्तूने विनाकारण काहीही मजकूर कोरणे, हस्तलिखितांची पाने दुमडणे, पोथी किंवा ग्रंथांना गंध, गुलाल किंवा बुक्का लावणे यामुळे हस्तलिखिते जीर्ण होतात.

५. स्थानिकांचचे सहकार्य-हस्तलिखितांचे संशोधन करत असताना संशोधकाला सर्वच ठिकाणी स्थानिक लोकांचे सहकार्य मिळतेच असे नाही. कित्येक ठिकाणी मराठी हस्तलिखितांविषयी समाजामध्ये अनास्था दिसून येते. या अनास्थेमुळे स्थानिक लोक संशोधकांना सहकार्य करण्यास टाळाटाळ करतात.

६. भाषिक तज्ज्ञ उपलब्ध न होणे– नवयुवकांच्या दृष्टीने प्राचीन मराठी हस्तलिखिते कंटाळवाणे वाटत असल्याने अभ्यासास टाळाटाळ करतात. मोडी लेखन व वाचन आजच्या काळात दुर्मीळ झाले आहे. मोडी वाचनासाठी व लेखनासाठी तज्ज्ञ व्यक्ती उपलब्ध होत नाही. त्यामुळे मोडी अभ्यासाच्या संशोधनास आज बंधने येत आहेत.

पर्यायाने विषय अवघड म्हणून अनेक संशोधक या विषयाचा अभ्यास करण्यास तयार होत नाही. केवळ लेखन वाचनाचा मर्यादा म्हणूनच संशोधक याकडे दुर्लक्ष करतात.

**समारोप**– मराठी हस्तलिखिते ही आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा महान ठेवा आहे. हा ठेवा जतन करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवा. हस्तलिखितांविषयी अधिकाधिक संशोधन व्हावे यासाठी चालना देणे गरजेचे आहे.

★★★

# वैचारिक साहित्याचे संशोधनः स्वरूप व दिषा

प्रा.डॉ.द.के.गंधारे,

## १. प्रास्ताविक :-

विचारधनाची सुसंगत मांडणी वैचारिक साहित्य करत असते. वैचारिक साहित्यात विचाराला प्राधान्य असते. तसेच ते पूर्णपणे तांत्रिक साच्यात बसत नसल्यामुळे ते विज्ञानापेक्षा वेगळे स्वरूप धारण करते. वैचारिक साहित्य पद्यापेक्षा गद्यात अभिव्यक्त होत असल्यामुळे काव्यमय भाषेचा डौल त्यात तितकासा दिसत नाही. पारतंत्र्याच्या कालखंडात देशबांधवांना साद घालण्याचे काम वैचारिक साहित्याने केले. म्हणजे प्रबोधनाचे काम वैचारिक साहित्यातून होत असते. भाऊ महाजन, बाळ शास्त्री जांभेकर, लोकहितवादी यांच्या साहित्यातून समाजाबद्दलची कळकळ दिसून येते. तर महात्मा फुले यांच्या साहित्यातून क्रांतिकारकता, समाज बदलाची प्रखर जाणीव प्रगट होते.

आपण स्वीकारलेल्या मूल्यांच्या अनुरोधाने इतरांचे मनपरिवर्तन करायचे व त्यांना त्या स्वरूपाचे कार्य करायला लावायचे ही वैचारिक साहित्याची प्रेरणा आहे. स्वातंत्रपूर्व काळात वैचारिक साहित्याची निर्मिती अधिक झालेली आहे. प्रबोधन व सामाजिक सुधारणांना प्राधान्य देण्याचे काम वैचारिक साहित्याने केले. प्रबोधनाची प्रक्रिया ही वैचारिक पुनरुज्जीवनांची प्रक्रिया आहे. वैचारिकतेतून सामाजिक, राजकीय, धार्मिक इ. मध्ये बदल घडवून या व्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर असतो. लोकहितवादी, कृष्णराव भालेकर, न्या. रानडे, गो.ग.आगरकर, राजर्शी शाहू महाराज, महर्षी शिंदे, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर या सर्व समाज उद्धारकांनी लेखन करून समाजजागृतीचे कार्य केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व नीती ही मूल्ये लेखकांनी जोपासली. यांचा संशोधनाच्या अंगाने नव्याने कसा विचार करता येईल हे बघणे उचित ठरेल.

## २. वैचारिक साहित्याचे संशोधन

संशोधन ही संकल्पना व्यापक आहे. एखादे तत्त्व अथवा वस्तुस्थिती शोधून काढताना तसेच एखाद्या गोष्टीची निश्चिती करण्याकरिता केलेले परिश्रम

पूर्वक अन्वेषण, काळजीपूर्वक, चिकित्सापूर्ण चौकशी अथवा तपासणी म्हणजे संशोधन होय. एखादे नवे तत्त्व शोधून काढणे, एखादे रहस्य उलगडणे या अनुषंगाने संशोधन केले जाते. एखाद्या सिद्धांताचे समर्थन करणे किंवा खंडण करणे, या प्रकारे संशोधन करता येते. संशोधन हे समस्या मूलक असते. संशोधनाचा आरंभ प्रश्नांपासून होतो. वस्तुनिष्ठ व ज्ञानशोधक दृष्टीने एखाद्या विषयाची मांडणी संशोधनात केली जाते.

''भाषाभ्यास, वाङ्मयविद्या आणि साहित्य या क्षेत्रातील संशोधनाची सध्याची दूरवस्था दूर व्हायची असेल तर संशोधन आणि शिक्षण यांचे अविभाज्य नाते आणि भारतातील दूरवस्थेचा ऐतिहासिक परिदर्श संशोधकांच्या आणि संशोधन मार्गदर्शकाच्या पुढे सुरुवातीपासून असायला पाहिजे.''

आपल्या समोरचा प्रश्न चिकित्सक बुद्धीने एखादी कार्यपद्धती वापरून सोडविणे हे संशोधनाचे स्वरूप असते. विज्ञान, सामाजिक शास्त्रे व कला अशा अनेक क्षेत्रात संशोधन करता येते. विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे यांच्या स्वतःच्या अशा स्वतंत्र अभ्यासपद्धती आहेत. साहित्याच्या संशोधनात सर्जनशीलता, उत्स्फूर्तता त्याचे स्वरूप, वाचकांवरील परिणाम या घटकांचा आढावा घ्यावा लागतो. म्हणजेच साहित्य हे जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करत असते. आपणाला विश्लेषण, संश्लेषण व अर्थान्वेषण याद्वारे साहित्यकृतीचे आकलन करून घेता येते.

आरंभ (प्रस्थान), प्रस्ताव (उपगम), पारख (परीक्षण) आणि मांडणी (निबंधक) या चार अवस्थांमधून शोधक्रिया घडत असते. नेमका प्रश्न उपस्थित करणे, त्याची संदर्भचौकट ठरविणे आणि त्या त्या क्षेत्राप्रमाणे उचित साधणे वापरून प्रश्नांची सामग्री जुळविणे यातून संशोधनाला सुरुवात होते. ''जिज्ञासा आणि पूर्वज्ञान यांना कल्पनाशक्तीची जोड दिली म्हणजे संशोधकाला संभाव्य उत्तर सुचते.''

आपल्या समोरचा प्रश्न चिकित्सक बुद्धीने आणि एखादी कार्यपद्धती वापरून सोडविणे हेच संशोधनाचे स्वरूप असते.

''संशोधन जेव्हा तत्त्वशोधनाच्या पातळीवर जाते तेव्हा त्याचे स्वरूप मूल्यविधानांचे असते. अशावेळी संशोधनाला समीक्षेचे रूप प्राप्त होते.''

माणूस हा मूळातच विचार करणारा प्राणी आहे. जे अज्ञात आहे ते जाणून घेण्याची त्याला ओढ असते. जीवन जगत असतांना त्याला काही समस्या

जाणवतात. त्या सोडविण्याच्या गरजेतून शोधाचा जन्म होत असतो. तसे संशोधन ही एक अखंड चालणारी शोधाची प्रक्रिया आहे. संशोधन करत असतांना संशोधकास ज्ञाननिष्ठा,ज्ञानलालसा,जिज्ञासा कुतूहल व प्रामाणिकपणा इ. गुण आवश्यक असतात.

संशोधन या शब्दाचा मूळ अर्थ पाहिला तर तो आजच्या रूढार्थाहून वेगळा आहे. संशोधनाचा मूळ अर्थ सं+शुद्ध = सर्वांगाने संपूर्णपणे शुद्ध करणे, दोष काढून टाकणे, दुरुस्ती करून सर्व काही शुद्ध निर्मळ करणे, असा मूळ अर्थ षोधता येतो. तथ्याचा षोध, त्याचे पुनर्विवेचन, शुद्धीकरण यानुसार साहित्य संशोधन करता येते. या अनुषंगाने वैचारिक साहित्याची नव्या अंगाने कशी मांडणी करता येईल ते बघणे उचित ठरेल.

वैचारिक साहित्यातून समाजचिंतन, जाणीव जागृती, विचार जागृती प्रकर्षाने जाणवते. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेतून प्रखर देशभक्ती जाणवते. त्यांची मांडण्याची शैली डौलदार, सौंदर्यपूर्ण, आक्रमक, कुशल व आकर्षक होती. तरुणवर्गाची मानसिकता घडविण्यात त्यांच्या निबंधमालेने प्रयत्न केले. आजच्या परिस्थितीत त्यांची निबंधमाला सुशिक्षित तरुण वर्गाला दिशादर्शक ठरेल काय? तसेच त्यांच्या साहित्याचा राष्ट्रीय जागृतीसाठी कसा उपयोग करता येईल या दृष्टीने संशोधन होणे गरजेचे आहे.

''वैचारिक क्षेत्रातील संशोधन हा स्वतंत्र प्रकार आहे. इतिहास, तत्त्वज्ञान, शिक्षण या क्षेत्रातील संशोधनाचे स्वरूपही भिन्न व स्वविशिष्ट आहे. त्यासाठी विविध नियम, संकेत, मार्ग यांचा अवलंब करावा लागतो. शोधलेखनाचे वैशिष्ट म्हणजे माहिती, संदर्भ, ज्ञान या गोष्टींचा अभ्यास करणे होय. ''संशोधनपर लेखनात सत्यशोधन हेच अंतिम उद्दिष्ट असते. त्यासाठी सुस्पष्टपणा, नेमकेपणा, बिनचूकपणा लेखनात साक्षेपीपणा आणावा लागतो.''

**३. मराठी वैचारिक साहित्याची वाटचाल :-**

मराठी वैचारिक साहित्यातून स्वातंत्र समता, न्याय, बंधुता व नीती या मूल्यांची जोपासणा करण्यात आली. पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्याच्या भावनेने प्रेरित होऊन समाज सुधार-विचारवंतांनी मराठीत विपुल लेखन केले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध चळवळी उभारल्या गेल्या तसेच साहित्याचीही निर्मिती झाली. सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याला पूरक असे साहित्य लेखन झाले. लोकमान्य टिळक,

राजर्षी शाहू महाराज, आचार्य शं.द. जावडेकर, नरहर कुरूंदकर, गं.बा. सरदार यांनी पारतंत्र्याविरुद्ध वैचारिक लेखन केले. म.गांधींनी भारताला स्वातंत्र्याची प्राप्ती करून दिली. सत्याग्रहाचा संदेश देऊन राष्ट्रात नवे चैतन्य निर्माण केले. त्यांच्या विचाराचा परिणाम स्वातंत्र्यावर होत गेला.

माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी समान दर्जा, प्रतिष्ठा व संधीची गरज असते. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या मुक्तीचा लढा पुकारला. महात्मा फुले यांनी अस्पृश्य व स्त्रियांसाठी एतद्देशीय शाळा सुरू केल्या. शिक्षणाची दरवाजे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणाच्या प्रसारामुळे समतेचा विचार पुढे आला.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान होते. बालविवाह, सतीची प्रथा, हुंडापद्धत, पुनर्विवाहाला बंदी, केशवपन या अनिष्ट रूढी जोपासल्या जात होत्या. स्त्रियांच्या न्यायहक्कासाठी त्यांना समानतेने वागणूक मिळण्यासाठी ताराबाई शिंदे, गो.ग.आगरकर यांनी प्रयत्न केले. ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांचा 'स्त्री-पुरुष तुलना ग्रंथ म्हणजे स्त्रियांच्या मुक्तीचा श्वास आहे. ताराबाई शिंदे यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन स्त्रियांच्या समतेसाठी नीलम गोऱ्हे, विद्या बाळ, ज्योती म्हापसेकर, रझिया पटेल अशा अनेक स्त्रिया कार्य करत आहे. आजही स्त्रियांचे वेगळेच प्रश्न निर्माण होत आहे. त्यांना न्याय हक्क दिले तरी त्यांच्यावर रोज अन्याय होत आहे याची नव्याने मांडणी करता येऊ शकते.

याच बरोबर स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, मुकुंद पाटील, हमीद दलवाई, शरद जोशी यांनी आपल्या कार्यातून व वैचारिक लेखणीतून बंधुत्त्वाचा संदेश दिला. अनिष्ट प्रवृत्तीच्या भोवऱ्यात गुरफटलेल्या समाजाला त्यांनी उद्धाराचा मार्ग दाखवला.

महाराष्ट्रातील एक द्रष्टे समाजसुधारक म्हणून महात्मा फुले ओळखले जातात. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाला त्यांनी वेगळी दिशा दिली. महात्मा फुले यांची लेखणी रंजकतेपेक्षा वैचारिकता हा मूळधर्म मानते. शिक्षणाचा सामाजिकीकरणाची मागणी करणारा पहिला हिंदुस्थानी द्रष्टा तत्त्वज्ञ व विचारवंत म्हणजे महात्मा फुले होत. शिक्षणाच्या अभावाने होत गेलेले नुकसान ते मांडतात.

''विद्येविना मती गेली मती विना नीति गेली,
नीतीविना गति गेली ! गतीविना वित्त गेले,

वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका
अविद्येने केले''

तत्कालिन महाराष्ट्राची ही जशी सामाजिक चिकित्सा आहे, त्याचप्रमाणे शिक्षणाचे प्रयोजन सांगणारा हा एका समाज शिक्षकाचा सार्थ उद्गार आहे. महात्मा फुले यांनी आपल्या साहित्यातून समाजसुधारणेचे विचार मांडले. त्यांच्या वैचारिक साहित्यावर विपुल संशोधन होईल. आज एकविसाव्या शतकात पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. महात्मा फुले यांनी एकोणाविसाव्या शतकातच शेततळ्याची संकल्पना मांडली होती. ते 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात लिहितात, ''सरकारने सोयीसोयीने काळ्यागोऱ्या लष्करासह पोलीस खात्यातील फालतु शिपायांकडून जागोजाग तालीवजा बंधारे अशा रितीने बांधावे की, वळवाचें पाणी एकंदर शेतांतून मुरून नंतर नदीनाल्यास मिळावें, असे केल्याने शेते फार सुपीक होऊन एकंदर सर्व लष्करी शिपायांस हवाशीर जाग्यांत उद्योग करण्याची संवय लागल्याबरोबर त्यांस रोगराईची बाधा न होता बळकट होतील.'' महात्मा फुले यांच्या वैचारिक लेखनाविषयी स.ग. मालशे म्हणतात,''शूद्रातिशूद्रांच्या हीनदीन स्थितीला शतकानुशतकांची ब्राह्मणांची गुलामगिरीच कारणीभूत आहे, हा महात्मा फुले यांचा कृती सिद्धांत होता. संशोधनात्मक सामग्री अपुरी असताही या सिद्धांतामागे त्यांनी मरी मिचेल, प्रो. विल्सन, वुइल्यम जोन्स प्रभृती मिशनरी मंडळींच्या लेखनातून एक इतिहासाची पार्श्वभूमी उभी केली.''

शेतकऱ्यांच्या अवनतस्थितीची केलेली मूलग्राही चर्चा आणि ती सुधारण्यासाठी सुचविलेली उपाययोजना हा 'शेतकऱ्याच्या असूड' चा नाविण्यपूर्ण भाग म्हणता येईल. शेतकऱ्यांच्या वास्तवस्थितीचे चित्र महात्मा फुले यांनी या ग्रंथात रेखाटलेले आहे. त्यांनी आपल्या एकूणच ग्रंथ लेखनात वैचारिक विचार मांडलेले आहेत.

असे शेती सुधारणा विषयीचे अनेक उपाय महात्मा फुले यांनी सुचविले आहेत. या स्वरूपाचे विचार समाजासमोर संशोधनाच्या माध्यमातून आणता येतील. यामुळे संशोधनाला एक नवी दिशा मिळेल.

अनेक अभ्यासकांनी धर्म, साहित्य, संस्कृती व समाज या विषयी चिंतन केले. लोकहितवादी, विठ्ठल रामजी शिंदे, न्या.म.गो.रानडे, मे.पुं.रेगे यांनी आपल्या वैचारिक साहित्यातून नितीविषयक विचार मांडले. यावर सुद्धा नव्याने संशोधन होऊ शकते.

## ४. संशोधनाच्या नव्या दिशा :–

अव्वल इंग्रज राजवटीपासून वाङ्मयाच्या प्रवृत्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी व समीक्षकांनी केला. चिपळूणकर पूर्वकालीन वाङ्मयाच्या प्रवृत्ती सांगण्याचे कार्य द.वा.पोतदार (मराठी–गद्याच्या इंग्रजी अवतार) (१९२२) व गं.बा. सरदार (अर्वाचीन मराठी गद्याची पूर्व पीठिका) (१९३७) यांनी केले.

पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्यासाठी व समाज जागृतीसाठी समाजसुधारक लेखन करत होते. शिक्षणाच्या प्रसारामुळे लोकांमध्ये नवी जाण निर्माण झाली होती. अनेक जहाल–मवाळ संघटना संघटित होऊन लढा देत होत्या. मराठी लेखक लेखणीतून प्रखर व परखड जाणिवा व्यक्त करत होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर, गो.ग.आगरकर, लोकहितवादी, वि.दा.सावरकर, बाबा पद्मनजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, महात्मा फुले यांनी वैचारिक साहित्य लिहून सामाजिक जागृती केली, परंतु ते तुटपुंजे वाटते. अजूनही या संशोधनाच्या नव्या वाटा भरपूर आहेत. सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक या घटकांच्या अनुषंगाने वैचारिक साहित्याची मांडणी करतो येणे शक्य आहे.

शिक्षण सर्वांना खुले झाल्यामुळे ''बहुजिनसी भारतीय समाजाच्या वेगवेगळया थरातून अनेक लेखक पुढे आले. त्यांनी पूर्वीच्या साहित्यपरंपरेचे अनुसरण केले. तशीच तिला नवतेची जोड दिली. त्यातून भारतीय साहित्यात एक नवपरिवर्तन घडले.'' यातूनच वैचारिक साहित्याचाही विचार होऊ लागला. वैचारिक साहित्याविषयी केशव तुपे लिहितात, ''वैचारिक साहित्यातील प्रज्ञा–प्रतिभा ही सहज नसते तर ती उत्पात्य असते. त्यासाठी खूप सायास घ्यावे लागतात. त्याशिवाय त्या लेखकाची एक भूमिका असते. ती भूमिका अव्याहत नसते तर उघड असते. त्यामुळे त्या भूमिकेची वाचक मंडळी त्याला सुरुवातीला मिळणे दुरापास्त असते.'' तरीही वैचारिक साहित्याचे अभ्यासक चिंतनशील लेखन करून समाजाला जागृत करत आहेत. आजच्या काळाचा विचार करता आ.ह. साळुंके, शरद पाटील, हरी नरके, विश्वनाथ खैरे, सदानंद मोरे, शेषराव मोरे, स.रा. गाडगीळ य.दि. फडके, रावसाहेब कसबे, गोपाळ गुरू यासारख्यांचे लेखन समाजपरिवर्तनाला गती देणारे ठरले आहे.

इंग्रज राजवट भारतात स्थिरावल्यानंतर खऱ्या अर्थाने वैचारिक क्रांतीला प्रारंभ झाला. आधनिक युगाच्या वैचारिकते विषयी डॉ. सुधाकर शेलार लिहितात, ''मुद्रणकलेमुळे उदयास आलेली नियतकालिके, त्या नियतकालिकांमधून या

वैचारिक क्रांतीला साजेसे लेखन प्रसृत होत गेले. विचार प्रतिपादन व त्या प्रतिपादनाबरोबर समाजपरिवर्तनाची अपेक्षा असणारे हे वैचारिक लेखन, साहित्य या व्यापक संकल्पनेत समाविष्ट केले तर साहित्याने या मन्वंतरामध्ये फार मोठा वाटा उचलला आहे, असे म्हणता येईल.''

आजच्या सामाजिक परिस्थितीत नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. वाढती लोकसंख्या, बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, अतिरेकी कारवाया यामुळे समाजाची मानसिकता बदलत आहे. विज्ञान क्षेत्रात प्रचंड बदल होत आहेत. समाजजागृती व परिवर्तनाची गरज निर्माण झाली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई, पुणे, नागपूर, मराठवाडा, शिवाजी व एस.एन.डी.टी. यासारख्या सर्वच विद्यापीठातून संशोधन कार्याला गती मिळाली. पीएच.डी. पदवीच्या निमित्ताने वेगवेगळया दिशेने संशोधन होऊ लागले. मराठी वाङ्मयाच्या वेगवेगळया अंगाने शोध घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यात वैचारिक साहित्याच्या संशोधनाची उपेक्षाच झाली. विसाव्या शतकात ग्रंथ संशोधनाला शास्त्रशुद्ध स्वरूप प्राप्त झाले. वैचारिक साहित्याचे संशोधन व्यापक होऊ शकले नाही. याविषयी निर्मलकुमार फडकुले म्हणतात ''मराठीत वैचारिक स्वरूपाचे निबंधलेखन फारसे केले जात नाही. हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच लेखकांनी हा वाङ्मय प्रकार समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.''

म्हणजे वैचारिक साहित्याचे लेखन हे नव्या अंगाने होत नाही. चिंतनशीलता आणि जीवनदृष्टी, व्यासंग व नवनवीन प्रश्नांची आव्हाने पेलण्याची उत्सुकता हे गुण कमी होतांना दिसतात. या साहित्याला वाचकही कमी आहेत. संशोधकही कमी आहेत याचे नव्या दिशेने संशोधन होण्याची गरज आहे.

लोकहितवादी, चिपळूणकर यांच्यापासून ते श्री.म.माटे यांच्यापर्यंतच्या विचारवंतांनी वैचारिक गद्याला प्रकाशाची दिशा दाखविली. टिळक, आगरकर, म.फुले, वि.रा.शिंदे यांनी सामाजिक व राजकीय प्रश्न हाताळले पण आज वैचारिक लेखनाचा अभाव आहे. चिंतन, शैली, जिव्हाळा, द्रष्टेपणा निबंधलेखकांत कमी झालेला दिसतो. असे का झाले यांची कारणमीमांसा शोधून काढणे गरजेचे आहे.

वैचारिक लेखनात ज्ञाननिष्ठा व समाजनिष्ठा कमी झाली आहे. वैचारिक साहित्याचा वाचक कमी झाला आहे. वैचारिक लेखन स्वातंत्र्योत्तर काळात नियतकालिकातून अभावाने झाले. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वैचारिक साहित्याला

वेगळी दिशा दिली. धर्म, समाज, तत्त्वज्ञान, साहित्य असे अनेक विषय त्यांनी हाताळले आहेत. मे.पु.रेगे, आ.ह.साळुंके, सदानंद मोरे यांच्या वैचारिक साहित्याचा संशोधनामुळे अंगाने अभ्यास झाल्यास समाज जागृतीला नवी दिशा मिळू शकेल. एकूणच स्वातंत्र्योत्तर काळात वैचारिक साहित्याकडे वाचकांचे दुर्लक्ष असले तरी संशोधकांनी याकडे दृष्टी वळून वैचारिक संशोधनाला प्राधान्यक्रम द्यावा असे वाटते.

★★★

# शास्त्रीय सामाजिक संशोधन : स्वरूप व महत्त्व

सुभाष अडावतकर

शास्त्रीय पद्धत ही कोणत्याही विशिष्ट शास्त्र वा शास्त्रांची ठेव नाही हा मुद्दा स्पष्ट करताना पियर्सन म्हणतात, ''शास्त्रांच्या सर्व शाखांसाठी शास्त्रीय पद्धत एकच आहे. तर्कशुद्ध विचार करणाऱ्या व्यक्तींकडून वापरली जाणारी अशी ती पद्धत आहे. अध्ययनविषयांच्या साम्यात नव्हे तर अध्ययनपद्धतीच्या समरूपतेतच सर्व शास्त्रांचे साम्य प्रतिबिंबित होते. कोणत्याही प्रकारच्या अवलोकित तथ्यांचे (ऋश्रलीं) वर्गीकरण करणारी, तथ्यांमधील परस्परसंबंधाची पाहणी करणारी व तथ्यक्रमाचे वर्णन करणारी कोणतीही व्यक्ती शास्त्रीय पद्धतीचाच उपयोग करीत असते व खऱ्या अर्थाने 'वैज्ञानिक' या संज्ञेस पात्र असते.'

शास्त्र ही विश्वातील क्रिया-प्रक्रियांची वा घटनांची सुसंगती लावण्याचा व त्यांचे यथार्थ ज्ञान करून देण्याचा प्रयत्न करणारी एक बौद्धिक वा वैचारिक योजना असून शक्य तितक्या सुलभपणे, अचूकपणे व संपूर्णपणे अनुभवकक्षेत येणाऱ्या तथ्यांचे, ते सप्रमाण सिद्ध करता येतील अशा पद्धतीने त्यांचे वर्णन व संकल्पनीकरण करणे हाच शास्त्राचा आशय होय.

शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून घटना व तथ्यांबाबत मिळविण्यात येणारे शास्त्रशुद्ध व सुसंबद्ध ज्ञान ग्राह्य मानावे की नाही, हे शास्त्रीय पद्धतीचे अधिष्ठान असलेल्या श्रद्धास्थानांवरील आपल्या विश्वासावर अवलंबून आहे. ज्याप्रमाणे परमेश्वराचे अस्तित्व गृहीत धरल्यानंतरच बरीच तथ्ये सुसंबद्ध ठरू लागतात तसेच शास्त्रीय पद्धतीस मूलाधार असणारी श्रद्धास्थाने विश्वासार्ह मानली तसच या पद्धतीद्वारा तथ्यांचे होणारे ज्ञान प्रमाणित ठरेल. शास्त्रीय पद्धत ज्या श्रद्धास्थानांवर आधारली आहे.

शास्त्राची पद्धत जर सर्वांसाठीच खुली वा अवलोक्य अशी ठेवता आली नाही तर एका शास्त्रज्ञाने योजनेल्या पद्धतीचे व काढलेल्या निष्कर्षांचे प्रामाण्य अन्य शास्त्रज्ञांना व टीकाकारांना पारखून पाहता येणार नाही म्हणूनच एका शास्त्रज्ञाने अध्ययनात वापरलेल्या पद्धतीचा पुन:प्रयोग (ीशश्रिळलरींळेप) करून त्या शास्त्रज्ञाने काढलेले निष्कर्ष प्रमाणित ठरतात की नाही ते अन्य शास्त्र ज्ञांना पाहता आले पाहिजे. पुनः पुनः प्रयोग करून तेच निष्कर्ष दुसऱ्या शास्त्रांनीही

काढले तर त्यामुळे निष्कर्षांचे प्रामाण्य वादातीत होत जाते. या ठिकाणी अर्थातच हे गृहीत धरले आहे की, अध्ययन पद्धतीचा उपयोग करताना व निष्कर्षांची मांडणी करताना एकाने केलेल्या चुकांची पुनरावृत्ती दुसऱ्याकडून होणार नाही.

**संशोधनाचा अर्थ :** वेब्स्टरच्या (Webster) शब्दकोशात संशोधन या शब्दाचा जो अर्थ देण्यात आला आहे त्यावरून सामान्य माणसासाठी संशोधनाचा ढोबळ अर्थ काय होतो ते स्पष्ट होते. या शब्दकोशाप्रमाणे संशोधन म्हणजे'' तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण; किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम. संशोधनाच्या शब्दकोशातील या अर्थावरून तथ्यांचा शोध घेण्याशी या शब्दाचा संबंध आहे एवढे समजते. परंतु असा शोध का घेतला जातो व कसा घेतला जातो याचे काहीच आकलन आपणास होत नाही. हा शोध का व कसा, हे स्पष्ट होण्यासाठी संशोधनाची खालील व्याख्या उपयुक्त ठरण्यासारखी आहे.

नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित, स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांताचे पुंन:परीक्षण करण्याच्या हेतूने चिकित्सक व सखोल चौकशी वा प्रयोग (experimentation) म्हणजेच संशोधन असे म्हणता येईल.

**संशोधकाचे आवश्यक गुण :**

संशोधकाची वृत्ती कशी असावी किंवा संशोधकाची वैशिष्ट्ये कोणती असावीत, असा प्रश्न बरेचदा विचारला जातो. या प्रश्नाचे सरळ उत्तर द्यावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, शास्त्रीय पद्धतीचे म्हणून जे आधारस्तंभ आहेत त्यांच्यावर संशोधकाचा दृढ विश्वास असावयास हवां व हा विश्वास संशोधकाच्या वर्तनातून अभिव्यक्त वा साकार व्हावयास हवा.

(१) संशोधकाचे आपल्या विषयाशी व उद्दिष्टांशी पूर्ण तादात्म्य वा एकजीवत्व असले पाहिजे. सत्यान्वेषण हे उद्दिष्ट मानणारा संशोधक हा स्वत:च सत्याशी एकरूप असावा. पण सत्याशी असे तादात्मीकरण साधणे हे अत्यंत अवघड आहे. संशोधकाने नेहमी सत्याकडे जाण्याची तयारी ठेवावयास हवी. याचा अर्थच हा की विषयनिरीक्षणात अचूकता व विषयनिरूपणात मर्मज्ञता यांचे मिश्रण सोधकाच्या वृत्तीत व्हावयास हवे.

(२) सत्यान्वेषणासाठी प्रयत्नशील असणाऱ्या संशोधकाने सतत जागरूक असावयास पाहिजे. निसर्ग आपली रहस्ये अनेकदा सफाईदारपणे उलगडून दाखवीत

असतो व अशावेळी निसर्गाच्या सूचनांवर बोट ठेवण्याइतकी व त्याचे हळूवार बोलणे समजण्याइतकी जागरूकता संशोधकात असावयास हवी. पण निसर्गाच्या सूचनांबाबत अवधान ठेवण्याची वृत्ती हळू हळू वा संथपणेच विकसित होत असते हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

(३) शास्त्रीय संशोधन हा प्रामुख्याने एक बौद्धिक प्रयास असला तरी त्यासाठी नीतिधैर्याची अत्यंत आवश्यकता असते. संशोधकासाठी आवश्यक ओ, सतत प्रयत्नांमध्ये धीर न सोडण्याचे व्रत. भिंतीवर जाळे बांधताना धडपडणारा कोळी जसे प्रयत्न व धीर सोडत नाही त्याचप्रमाणे सत्यान्वेषणाच्या प्रयत्नात काहीवेळा अपयश आल तरी धीर न सोडता प्रयत्न करीत राहण्याची वृत्ती संशोधकाने अंगी बाणावयास पाहिजे.

### सामाजिक संशोधनाची व्यावहारिक उपयुक्तता :

कोणत्याही गोष्टींसंबंधी 'पण याचा फायदा काय?' असा प्रश्न उपस्थित करणे हे उपयुक्ततावादी वा व्यवहारी वृत्तीचे धोतक आहे. एखाद्या कार्यामुळे मिळणारे समाधान हाच त्या कार्याचा सर्वोच्च मोबदला नाही काय? जे माहीत नाही ते माहीत करून घेण्याचा प्रयत्न व्यावहारिकदृष्ट्या फायद्याचाच ठरावयास हवा अशी समजूत असणाऱ्यांना बेंझामिन फ्रँकलिनने दिलेले उत्तर मोठे समर्पक आहे. फ्रँकलिनला त्याने लावलेल्या विजेच्या शोधाबद्दल कुणीसे विचारले की त्याच्या या शोधाचा फायदा काय? फ्रँकलिनने याचे उत्तर एका खोचक प्रश्नाच्या स्वरूपात दिले की "नवजात मुलाचा फायदा काय?" याचाच अर्थ असा की नवीन ज्ञान हे नवजात मुलाप्रमाणे आपल्याला अवर्णनीय असा आनंद देते. माहीत नसलेले माहित करून घेण्यातच एक वेगळा आनंद व आगळे समाधान शास्त्रज्ञास लाभते.

### संशोधन प्रक्रिया

### सामाजिक संशोधनातील मुख्य पदे

संशोधन अहवालामधून किंवा संशोधनाच्या पद्धतीशास्त्रावरील क्रमिक पुस्तकांमधून संशोधनातील पदांचा क्रम दर्शविणारा जो आराखडा देण्यात येतो त्यावरून संशोधनात संशोधकनकर्त्याकडून काय अपेक्षित असते याची अति सरलीकृत कल्पना येते. संशोधनास वाहिलेल्या संशोधनपर मासिकांमधून व संशोधन

प्रबंधातून साधारणत: संशोधनप्रक्रिया खालील पदांमध्ये विभागली जात असल्याचे आढळते.

(१) संशोधनामागील उद्देशाबाबतचे विधान, उद्देश दर्शविणारे हे विधान 'समस्या' स्वरूपात मांडण्यात येते. ह्याच समस्येचे उत्तर शोधण्याकरिता संशोधनाची आखणी केली जाते.

(२) अध्ययन वा संशोधन आराखड्याच (ीशीशरीलह वशीळसप) चे वर्णन.

(३) तथ्यसंकलनाची व नमुना–चाचणीची तंत्रे व ह्या तंत्रांना आधारभूत असणाऱ्या पद्धतीचे विवरण.

(४) संकलित तथ्यांचे विश्लेषण व निष्कर्षाची मांडणी.

(५) निष्कर्षांवरील भाष्य वा निर्वचन (interpretation) आणि उपसंहार (conclusion).

प्रकाशित संशोधनाच्या अवलोकनावरून असा समज निर्माण होतो की संशोधनप्रक्रियेत अंतर्भूत असणाऱ्या पदांचा एक विशिष्ट क्रम असून ह्या क्रमानेच संशोधनकार्य अग्रेसर होत असते. संशोधनकर्त्यापुढे येणारी अडचण किंवा समस्या ज्यांना तथ्य मानले जाते अशा घटनांच्या सत्यासत्यतेबाबतच्या प्रश्नात स्वरूपित होऊ शकेल. म्हणजेच, उदा. शहरात जातिभेदाचे प्रमाण कमी आहे असे जे मानले जाते ती गोष्ट वस्तुत: खरी आहे काय? हे ह्या अडचणी वा समस्येचे स्वरूप होय. एखाद्या संकल्पनेबाबतही समस्या उपस्थित होऊ शकेल. बरेचदा एखादी संकल्पना ज्ञान व स्पष्टीकरणादृष्ट्या उपयुक्त ठरते पण कालांतराने ह्या कल्पनेची स्पष्टीकरणदृष्ट्या असणारी उपयुक्तता संपुष्टात येते व ती संकल्पना घडविताना ज्या तथ्य समुच्चयास ती लागू पडावी अशी अपेक्षा केलेली असते.

**संशोधनाचा आराखडा**

संशोधनकर्त्याद्वारा घेण्यात येणाऱ्या व विशिष्ट क्रमाने मांडल्या जाणाऱ्या निर्णयांमधूनच संशोधनआराखडा साकार होत जातो. हे निर्णय खालील बाबींसंबंधी असतात.

(१) अध्ययन कशासंबंधी आहे व त्यासाठी कोणत्याप्रकारची माहिती आवश्यक आहे?

(२) अध्ययन हाती का घेण्यात आले?

(३) आवश्यक ती माहिती कोठे मिळणार?

(४) अध्ययन कोठे व कोणत्या क्षेत्रात केले जाणार?

(५) अध्ययनासाठी लागणारा कालावधी काय असेल? आणि अध्ययन केव्हा व किती वेळ करण्यात येणार?

(६) अध्ययनाकरिता किती माहिती वा किती व्यष्टींचा (लरीशी) अंतर्भाव आवश्यक आहे?

(७) नमुना निवडीचे आधार काय राहणार?

(८) माहितीच्या संकलनासाठी कोणती तंत्रे वा साधने उपयोगात आणली जाणार?

(९) संकलित माहितीचे विश्लेषण कशा प्रकारे केले जाणार?

(१०) किती चांगल्याप्रकारे वरील प्रश्नांचा निर्णय लावता येईल? व संशोधनउद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी ठरवून घेतलेल्या पद्धतीत वेळ, शक्ती व पैसा यांचा अपव्यय न होता हाती घेतलेले निर्णय कसे समन्वयित करता येतील?

वरील सर्व विचार संशोधनकर्त्याने आराखडा बनविताना करावयास हवेत. व्यवहार्य संशोधन आराखड्यांच्या चार भिन्न भिन्न पैलू वा अवस्था दर्शविता येतील.

(१) नमुनाचाचणी संबंधी आराखडा (डराश्रिळपस वशीळसप) : नियोजित अध्ययनासाठी अध्ययनविषय म्हणून निवडण्यात आलेल्या व्यक्तींची, वस्तूंची वा पदार्थांची निवड कोणत्या पद्धतीने करण्यात येणार हे दर्शविणारे निर्णय.

(२) निरीक्षण आराखडा (जलीशीीरींळेपरश्र वशीळसप) : यात व्यक्तींच्या, वस्तूंच्या वा पदार्थांच्या निरीक्षणाच्या अटी कोणत्या किंवा कोणत्या स्थितीत निरीक्षण केले जाणार त्याचे स्पष्टीकरण करण्यात यावे (तथ्य संकलन विषयक निर्णय)

(३) संख्याशास्त्रीय आराखडा (डींरींळीींळलरश्र वशीळसप) : एकंदर व्यक्ती, वस्तू वा पदार्थांपैकी किती व्यक्ती, वस्तू वा पदार्थांचे निरीक्षण करण्यात येईल व निरीक्षणाद्वारे प्राप्त तथ्यांचे विश्लेषण कसे करण्यात येईल, या विषयीचे स्पष्टीकरण संख्याशास्त्रीय आराखड्यात येते.

(४) कार्यान्वीकरणासबंधी आराखडा (जशीीरींळेपरश्र वशीळसप) : वरील संख्याशास्त्रीय नमुनाचाचणीविषयक व निरीक्षणविषयक आराखड्यांमध्ये ज्या कार्ययोजना नमूद करण्यात आल्या त्या कार्ययोजना कोणत्या विशिश्ट तंत्रांच्या आधारे प्रत्यक्षात कार्यान्वित करण्यात येणार आहेत हे दर्शविणारा आराखडा. संशोधन आराखडा संशोधनाच्या पद्दिष्टांप्रमाणे बदलत असतो.

### कागदोपत्री असणाऱ्या तथ्यांचे स्त्रोत

सामाजिक शास्त्रामधून संकलित केल्या जाणाऱ्या तथ्यांची दोन प्रमुख उगमस्थाने आहेत (१) कागदपत्रे, पुस्तके व अहवाल इत्यादींचा उपयोग तथ्ये प्राप्त करून घेण्यासाठी करता येऊ शकतो. किंवा (२) प्रत्यक्ष व्यक्तींनी, त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरून वा त्यांच्या क्रियांच्या वा हावभावांच्या निरीक्षणावरून तथ्येप्रापत होऊ शकतात. तेव्हा कागदपत्र व लोक हे तथ्यांचे दोन प्रमुख स्त्रोत मानता येतील.

### निरीक्षण तंत्र

निरीक्षण ही शास्त्रीय संशोधनदृष्ट्या उपयुक्त अशी माहिती संकलित करण्याची एक महत्त्वाची पद्धत आहे हे आपण मागे पाहिलेच आहे. पण याचा अर्थ फक्त शास्त्रज्ञच निरीक्षण करीत असतो असा होत नाही. सर्वसामान्य लोकही त्यांच्या दैनंदिन जीवनात सतत निरीक्षण करीत असतात. वस्तुतः निरीक्षण आपणा सर्वास उपलब्ध असलेली सभोवतालच्या विश्वाबद्दल माहिती प्राप्त करण्याची अत्यंत मूलभूत स्वरूपाची पद्धती आहे. याचाच अर्थ असा की सर्वसामान्य लोकांकडून केल्या जाणाऱ्या व शास्त्रज्ञांकडून केल्या जाणाऱ्या, अशा ह्या दोन निरीक्षण-प्रकारांमध्ये काही फरक असतो.

### निरीक्षणाचे मुख्य प्रकार :

(१) नियंत्रित निरीक्षण (controlled observation) वा नियंत्रण विहीन निरीक्षण (uncontrolled observation)

(२) संरचित निरीक्षण (structured observation) वा असंरचित निरीक्षण (unstructured observation)

(३) सहभागी निरीक्षण (participant observation) वा असहभागी निरीक्षण (non-participant observation)

(४) प्रकट निरीक्षण (undisguised observation) वा अप्रकट किंवा गुप्त निरीक्षण (disguised observation)

विशिष्ट संशोधनात निरीक्षणाचे कोणते प्रकार उपयुक्त ठरतील हे बऱ्याच प्रमाणात त्या अध्ययनाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असते.

## मुलाखत

या प्रकारात आपणास मुलाखतीचा एक तथ्यसंकलन तंत्र या अर्थी विचार करावयाचा आहे. तथ्यसंकलनासाठी मुलाखतीचे तंत्र कसे वापरण्यात येते, मुलाखतीचे विविध प्रकार कोणते व तथ्यसंकलनाच्या दृष्टीने या प्रकारांचे गुण, दोष वा मर्यादा कोणत्या यांच्या विवेचनाकडे वळण्यापूवी आपणास वस्तुस्थिती वा तथ्यांबाबतचा पुरावा सादर करण्याच्या दोन पद्धतींचा थोडक्यात विचार करून घेणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीस जर आपण 'तुला हे कसे माहीत झाले?' असा प्रश्न विचारला तर सामान्यत: 'मला अमक्या अमक्याने सांगितले किंवा वर्तमानपत्रातच तसे छापून आले आहे' अशा स्वरूपाचे उत्तर आपणास त्या व्यक्तीकडून मिळते. या दोन्ही ठिकाणी माहितीस किंवा तथ्यास प्रमाणित करणारा म्हणून जो पुरावा ती व्यक्ती आपल्यापुढे प्रस्तुत करते तो दोन वेगळ्या प्रकारचा आहे. एका ठिकाणी आपण 'बोललेला शब्द' तथ्यांचे प्रमाण म्हूणन गृहीत धरतो तर दुसऱ्या ठिकाणी ''लिखित शब्द' हेच तथ्यांचे प्रमाण मानतो. या दोन्ही प्रकारांना नावेच द्यावयाची झाली तर आपण त्यांचा उल्लेख क्रमश: 'शब्द प्रमाण' पद्धती व 'वेदवाक्य प्रमाण' पद्धती म्हणून करू शकतो.

## प्रश्नावली

प्रश्नावली ही नावाप्रमाणेच प्रश्नांची एक पूर्वनियोजित क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते. ही सामान्यत: उत्तरदात्यांना पोष्टाने पाठविली जाते किंवा काही परिस्थितीत व्यक्तिश: त्यांना दिली जाते. परंतु महत्त्वाची गोष्ट ही की त्या यादीतील प्रश्नांची उत्तरे उत्तरदात्यांनी संशोधनकर्त्याकडून किंवा त्याने नेमलेल्या मुलाखतकारांकडून कोणत्याही प्रकारचे साहाय्य न घेता लिखित स्वरूपात द्यावयाची असतात.

प्रश्नावली तंत्रात उत्तरदात्याच्या वर्तनाबद्दलच्या माहितीकरिता पूर्णत: त्याच्याच विधानांवर जास्तीत जास्त विसंबून रहावे लागते.

## प्रश्नावलीचे प्रमुख प्रकार

प्रश्नावलीचे तसे पाहिले तर अनेक प्रकार पाडले जाऊ शकतात. परंतु आपण येथे फक्त दोनच महत्त्वाच्या प्रकारांचा विचार करू (१) संरचित प्रश्नावली व (२) असंरचित प्रश्नावली.

(१) परिचयात्मक माहितीसंबंधीचे प्रश्न (२) उत्तरदात्याच्या सामाजिक

पार्श्वभूमीसंबंधीचे प्रश्न (३) संशोधन समस्येशी संबंधित असणारा प्रश्न.

प्रश्नावलीची बांधणी, प्रश्नवलीचा कच्चा आराखडा, प्रश्नाचे पुन:परीक्षण व पुनरावलोकन, प्रश्नांची पूर्वचाचणी व संस्करण, प्रश्नाची निवड.

समाजमिती

समाजमितीय अध्ययनामधून सामान्यतः प्रश्नावलीचा किंवा मुलाखत – अनुसूचीचा उपयोग करण्यात येतो. निरीक्षणाद्वारा किंवा अभिलेखांच्या (शिलेवी) परीक्षणाद्वारेही समाजमितीय विश्लेषणाकरिता आवश्यकत ती तथ्ये प्राप्त करून घेतली जाऊ शकतात.

समाजमिती ही निव्वळ तथ्यसंकलनाची पद्धत नाही तर प्रामुख्याने ती विशिष्ट अध्ययनविषयावर लक्ष केंद्रित करण्याची व अशा एकलक्षीकरणाशी सुसंगत अशी एक विश्लेषणपद्धत आहे, ही गोष्ट लक्षात घेतली पाहीजे.

संशोधन अहवाल

संशोधनाचा अहवाल लिहून हातावेगळा केल्याखेरीज संशोधनकर्त्याच्या कार्याची इतिश्री होत नाही. जोपर्यंत ते दुसऱ्यापर्यंत पोचत नाही तोपर्यंत बुद्धिची चमक दाखविणारे संशोधन–निष्कर्ष ही एकप्रकारे निष्प्रभच ठरतात.

संशोधनाच्या वेगवेगळ्या अवस्थांमधून ज्या प्रकारच्या कौशल्याची आवश्यकता असते त्यापेक्षा सर्वस्वी वेगळे असे कौशल्य संशोधनाचा अहवाल लिहिताना लागते. तथ्यविश्लेषणाच्या कार्यतनू मुक्त होऊन संशोधन–अहवाल लिहिण्याच्या कार्यास प्रारंभ करेपर्यंत संशोधनात लावलेल्या शोधाची नवलाई बरीचशी कमी झालेली असते. किंबहुना सांप्रत ज्ञानकक्षेत संशोधनातील निष्कर्ष अंतर्भूत होण्यासाठी त्यांचे योग्य निवेदन वा संदेशवहन होणे आवश्यक आहे व म्हणूनच संशोधनातील वेगवेगळ्या अवस्थांप्रमाणेच अहवाल –लेखन, हे देखील संशोधनकर्त्याी एक महत्त्वाची जबाबदारीच मानावी लागेल.

★★★

# लोकसाहित्य आणि संशोधनाच्या दिशा

प्रा.डॉ.भरत देशमुख

लोकसाहित्य संशोधनाच्या अनुषंगाने विचार करीत असताना, किंबहुना कोणत्याही साहित्यप्रकाराचा संशोधनाच्या संदर्भात विचार करीत असताना प्रथमतः संशोधकाने संबंधित विषयाचे स्वरूप, त्याची व्याप्ती, त्याची परंपरा इत्यादी बाबी समजावून घेतल्या पाहिजेत. त्याचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. अन्यथा संशोधनात उथळपणा व एकांगीपणा प्राप्त होण्याची शक्यता अधिक असते. संशोधन चुकीच्या दिशेने भरकटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लोकसाहित्यातील 'लोक' या शब्दातून ह्या साहित्यप्रकाराची व्याप्ती लक्षात येते. लोकसाहित्य हे 'लोक' जीवनाची गाथा असल्यामुळे, त्याचा अवकाश व्यापक आहे. ह्या अवकाशात लोकवाङ्मय, लोककला, लोकसमजूती, लोकविधी, लोकपरंपरा, लोकभाषा, लोकनाट्य, लोकनृत्य इत्यादींच्या माध्यमातून 'लोकधन' हजारो वर्षांपासून समाजजीवनात वावरत आहेत. लोकसाहित्य लोकजीवनाला व्यापलेले असल्यामुळे या गाथेतून मानवी सुखदुःखांची, भावभावनांची रागद्वेषांची, अंतरीच्या उमाळ्यांची, निसर्गाशी असलेल्या नात्यांची, पशू-पक्षांशी असलेल्या संवादाची स्नेह स्पंदने पाहवयास मिळतात.

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचा परस्पर निकटचा संबंध असल्यामुळे, त्यातून हजारो वर्षांपासून चालत आलेल्या मौखिक परंपरेपासून ते वर्तमानपर्यंतचे दर्शन घडते. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांची एकमेकांपासून फारकत घेता येत नाही, इतके त्याचे नाते दृढ आहे. इतकेच काय, त्यांचे संबंध एकाच नाण्याच्या दोन बाजूंसारखे आहे. त्यातील अद्वैत्व समग्र मानवी जीवनाला व्यापरलेले असल्यामुळे लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ.प्रभाकर मांडे म्हणतात, त्याप्रमाणे 'जगा अशी एकही ज्ञात संस्कृती नाही जिज्यात लोकसाहित्याचा समावेश नाही.' म्हणजे लोकसाहित्य मानवी जीवनाला कवेत घेऊन प्रवास करणारे साहित्य आहे. हा प्रवास अखंडीत प्रवाही आहे. त्यामुळेच अलीकडे लोकसाहित्याच्या अभ्यासकाची दृष्टी संशोधनाच्या अंगाने या प्रवाहाकडे वळलेली दिसते. पाश्चात्त्य व इतर भाषिक लोकसाहित्याच्या अभ्यासकांप्रमाणे, महाराष्ट्रातील लोकसाहित्याचा विशेषतः श्रीमती दुर्गा भागवत, सरोजनी बाबर, डॉ.रामचंद्र चिंतामण ढेरे, डॉ.प्रभाकर

मांडे, डॉ.गंगाधर मोरजे, श्रीमती तारा भवाळकर इत्यादी मंडळींनी मोठ्या परिश्रमाने हे 'लोक' धन लोकांसमोर मांडले. यातून प्रेरणा घेऊन पुढे अनेक अभ्यासकांनी या क्षेत्रात संचार केला. बराच काळ दुर्लक्षित असणारे हे क्षेत्र व्यापक असल्याचे लक्षात येताच, महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांतून लोकसाहित्याचा अभ्यास होऊ लागला. संशोधनाच्या अनुषंगाने विचार होऊ लागला. तेव्हा विषयाचा अवकाश व्यापक आहे, ज्याला दीर्घ परंपरा लाभलेली आहे. अशा विषयाचा अभ्यास कसा करावा? त्यासाठी संशोधनाच्या कोणत्या पद्धती उपयुक्त ठरतील? याही बाजूने विचार होऊ लागला, नव्हे त्या दिशेने अंगुली निर्देश करणे हा ह्या लेखाचा मुख्य हेतू आहे. या क्षेत्रात नव्या जोमाने, नव्या दृष्टीने काम करणाऱ्या अभ्यासकांना नव्या दिशा सापडाव्यात हे प्रयोजन आहे. लोकसाहित्याचा अभ्यास कोणत्याही एकाच संशोधन पद्धतीने न करता एकाच वेळी अनेक पद्धतीचा अवलंब करावा. कारण साहित्यातून संचारणारे मन हे एकाच समान पातळीवर व समूहाने वावरणारे मन आहे, तर ते संचिताचे गाठोडे आपल्या अंगाखांद्यावर घेऊन वाटचाल करणारे असल्यामुळे त्याचा शोधासाठी कोणतीही एकच संशोधन-पद्धती वापरणे त्या विषयावर अन्याय करण्यासारखे होईल. मी तर म्हणेन प्रथमतः संशोधकाने संबंधित विषय आपल्या चिंतनाचा करावा. संशोधनाच्या प्रेरणा तपासून घ्याव्यात. मगच संशोधनाच्या क्षेत्रात प्रवेश करावा. संशोधनाच्या क्षेत्रात ढोबळमानाने क्षेत्रीय, समाजशास्त्रीय, संज्ञाप्रवाह, समाजभाषा विज्ञान, ऐतिहासिक, मानसशास्त्रीय व मानववंशशास्त्रीय, वर्णनात्मक इत्यादी पद्धतीच्या साह्याने अभ्यास केला जातो.

लोकसाहित्य हा समाजजीवनाचा परंपरेपासून चालत आलेला मौखिक इतिहास आहे. ह्या मौखिक इतिहासात अनेक आख्यायिका, दंतकथा, चमत्कार कथा, अद्भूत कथा, पुराणकथा, श्रद्धा, व्रत-वैकल्य, संकेत दडलेले असतात. ह्या मौखिक इतिहासाचा वर्तमानात अन्वयार्थ शोधणे मोठे उद्बोधक ठरणारे आहे. ह्या मौखिक इतिहासातील मुख्य आणि मध्यवर्ती पात्र 'समाज' असतो. त्यामुळे तो एकापरिने सामाजिक अभ्यासही ठरतो. म्हणून लोकसाहित्यातील समाजजीवन वगळून लोकसाहित्याचा अभ्यास करता येत नाही. समाजरचना, त्याची संस्कृती, मन, श्रद्धा, भाषा, व्यवहार, श्रम, आहार-विहार, सण-वार, रूढी-परंपरा या विविध अंगाचा अभ्यास समाजशास्त्रीय पद्धतीने करणे उचित ठरेल. म्हणूनच म्हटले जाते की, समाजजीवनाचा संदर्भ सोडून लोकसाहित्याचा

अभ्यास करणे म्हणजे भूसा भरलेल्या निर्जीव प्राण्यांच्या शरीराचे निरीक्षण करण्यासारखे आहे. लोकसाहित्याचा अभ्यास प्राचीन-आधुनिकाचा, भूत-वर्तमानाचा, त्यातील आदान-प्रदानाचा अभ्यास ठरतो. परंपरागत व आधुनिक जगात वावरणाऱ्या समाजाचा अभ्यास असतो. या अभ्यासातून दोन आचार-विचार विश्वातील अंतर अधोरेखीत करता येते. ह्या घडामोडीतून समाजात घडून आलेला बदल अभ्यासकाला न्याहाळता येतो. समाजजीवनाचा प्रवाह कोणत्या ना कोणत्या कारणाने मंदावतो, गतिशील होतो किंवा तात्पुरत्या स्वरूपात खंडित होत असतो, अशावेळी खंडित, प्रवाहित अवशेष लोकसाहित्याच्या रूपाने समाजजीवनात शिल्लक राहतात. ही मर्मस्थळे संशोधकांनी शोधणे आवश्यक आहे. ह्या उलाढालीतून समाजाच्या जीवनपद्धतीत, जीवनदृष्टीत बदल घडून येत असतात. तरीही ह्या परिवर्तन प्रक्रियेत भूतकालीन समाजवशेष लोकसाहित्यातून शिल्लक राहतात. ह्यालाच श्रीमती दुर्गाबाई भागवत 'सजीवावशेष' म्हणतात. पाऊलखुणाच्या रूपाने शिल्लक असलेल्या विचारविश्वाचा, समाजधारणेचा लोकसाहित्याच्या आधारे अभ्यास करता येतो. माणूस हा सांस्कृतिक, सामाजिक घटकांचा उत्तराधिकारी असतो. व्यक्तीच्या, समाजाच्या मनामध्ये आदिमकाळापासून काही मानसिक प्रवृत्ती सुप्तरूपात दडलेल्या असतात. ह्या प्रवृत्ती मानवी उक्ती-कृतीतून प्रकट होत असतात. ह्या सर्व मानसिक प्रक्रियेतून मानसशास्त्रीय व मानववंशशास्त्रीय पद्धतीने लोकसाहित्याचा अभ्यास करता येतो. मानसशास्त्र हे मानवी वर्तनाचे अभ्यास करणारे शास्त्र आहे. तेव्हा संशोधकांनी लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या कथाबीजांचा, त्यातील श्रद्धांचा, व्यक्त होणाऱ्या मनाचा शोध घेणे आवश्यक आहे.

लोकसाहित्य अभ्यास-संशोधकांनी संशोधानासाठी नव्या दिशा शोधल्या पाहिजेत. लोकसाहित्य आणि संतसाहित्य यातील अनुबंध अतिशय जवळचा आहे. हा अनुबंध लोकसाहित्यातून कसा व्यक्त होतो. त्या अनुषंगाने विचार होणे गरजेचे आहे. संतसाहित्य आणि लोकसाहित्य यांच्यातील अद्वैत नाते कशाप्रकारे व्यक्त झाले हे ही शोधणे गरजेचे आहे. धार्मिक विचार आणि लोकसाहित्य यांच्यातील नातेही तपासता येते. या क्षेत्रात क्षेत्रिय पद्धतीने अभ्यास करण्यास खूप मोठा वाव आहे. जगात अशी एक ज्ञानसंस्कृती नाही की, तेथे लोकसाहित्य नाही, याचा अर्थ मानवी जगताला, मानवी संस्कृतीला व्यापणारे हे साहित्य असल्यामुळे तौलनिक पद्धतीच्या अभ्यासातून दोन किंवा त्यापेक्षा अधिक

संस्कृतींचे समानपण व वेगळेपण शोधता येते. वेगवेगळ्या भाषिक, प्रांतिक, भौगोलिक पातळीवर वावरणाऱ्या समाजजीवनातील केलेली आदान-प्रदानता, भाषिक रचना, श्रद्धा, रूढी, सण-वार, विचारविश्व, भावविश्व, इत्यादी अनेक अंगाने शोध घेता येतो. तौलनिक व क्षेत्रीय अभ्यास ज्या पद्धतीने ज्या त्या समूहाचे वर्तन, विचारविश्व मानसशास्त्रीय व मानववंशशास्त्रीय पद्धतीने अभ्यासता येते. लोकसाहित्यातील प्रतिमा, प्रतीकं, संकेत इत्यादींचा अन्वयार्थ वर्तमानाशी पडताळून पाहता येईल का? लोकसाहित्यातून व्यक्त झालेला काल-आज शोधून काढता घडून आलेला बदल तो का? आणि कसा? हे पण सांगता येण्यासारखे आहे. सांस्कृतिक, सामाजिकदृष्ट्या जसा तौलनिक व क्षेत्रीय अभ्यास करता येईल तसाच तो भाषिक पण करता येईल. समकालीन समाजजीवनातील दोन किंवा अधिक घटकांतील भाषिक समान व वेगळेपण, तसेच भौगोलिक व अन्य भाषिक वेगळ्या असणाऱ्या समाजघटकातील भाषा, त्यांच्यातील आदान-प्रदानता, साम्य व वेगळेपण येण्याची मानववंशशास्त्रीय कारणे कोणती, इत्यादी अंगाने अभ्यास करता येईल. लोकसाहित्याचा सर्वात मोठा विशेष म्हणजे 'चित्रमयता' दृश्यमयता होय. ही चित्रमय शैली गद्यापेक्षा-पद्यातून अधिक येते. त्या-त्या प्रसंगाचे चित्र डोळ्यापुढे उभे करण्याचे सामर्थ्य ह्या शब्दांत दडलेले असते. चित्रशैलीला बळ देणाऱ्या बाबी म्हणजे त्या पद्यांतून येणाऱ्या लौकिक जीवनातील प्रतिमा, प्रतीकं, संकेत, चिन्ह ही होत. ही शैली भूतकाळाकडून वर्तमानाकडे प्रवाही असल्यामुळे त्यातील परस्पर नाते तपासता येतात. मराठी लोकसाहित्यातून वावरणारी चित्रशैली अन्य भाषिक लोकसाहित्यातून कोणत्या रूपाने प्रकट झाली आहे. किंवा अन्य भाषिक लोकसाहित्यातून येणारी चित्रशैली मराठी लोकसाहित्यात कशी अभिव्यक्त झाली आहे, याचाही शोध घेणे आवश्यक आहे.

आज आपण मुक्त अर्थव्यवस्थेत वावरत आहोत. त्यानिमित्ताने नवतंत्रज्ञान, नवमाध्यमं, नवभाषा, सर्वकाही नवं आणि गतिशील असल्यामुळे ह्याचा लोकसाहित्यावर काय परिणाम झाला किंवा होत आहे. लोकमनावर ह्या नवतंत्रज्ञानाला सामोरे जात असताना झालेला बदल हा बदल कोणकोणत्या अंगाने, विचार-कृतीने झाला. त्याचा भाषिक परिणाम, परंपरेला छेद देणाऱ्या बाबी कोणत्या? इत्यादींचा शोध घेता येण्यासारखे आहे. कारण समाज ज्या विचार विश्वातून व भावविश्वातून संचार करीत असतो त्याचे प्रतिबिंब लोकसाहित्यातून उमटत असते. जुन प्रतिमा, प्रतीकं मागे टाकून समाजमानाने

नवीन प्रतिमा, प्रतीकं, श्रद्धा, विचार स्वीकारला आहे काय? याचाही लोकसाहित्यातून शोध घेता येतो. यासंदर्भात विचार करण्यासाठी वाचनात आलेली लोककथा संक्षिप्त स्वरूपात विचारार्थ ठेवीत आहे. मी तमाशा लोकनाट्याचा अभ्यास करीत असताना, नारायणगाव, ता.जुन्नर येथील जुन्या काळातील तमासगीर कै.अवसरीकर यांच्या वंशजाकडून मिळालेल्या वग-संहितेतील गद्य-पद्यात्मक कथा आणि लोकसाहित्याच्या पुस्तकातून वाचनात आलेली बृहत कथा यांच्यात मला कमालीचे साम्य आढळून आले. तेव्हा माझ्या डोक्यात एक विचार डोकावून गेला की, ही लोककथा तमासगीरापर्यंत पोहोचली कशी? ह्या प्रवासात तिच्यात कोणकोणते आणि कोणत्या पातळीवर बदल घडून आले? हा प्रवाह शोधणे सुद्धा आवश्यक आहे. त्या कथेतून अभिव्यक्त झालेल्या संदर्भाचा काही अन्वयार्थ लावता येईल काय? ती कथा अशी-एका गावातील सुतार, शिंपी, कासार आणि ब्राह्मण प्रवासास मजल-दरमजल करीत निघतात. वाटेत अंधार पडल्यामुळे मुक्काम-चोरा-श्वापदापासून रक्षण मिळावे म्हणून प्रथमतः सुतार जागा राहतो व तिघे झोपतात. त्या कालावधीत सुतार एका लाकडातून 'स्त्री' ची मूर्ती तयार करतो, त्यानंतर शिंपी त्या नग्न मूर्तीस सुंदर वस्त्र शिवून परिधान करतो, तर कासार बांगड्या भरतो. शेवटी ब्राह्मण त्या लाकडी-निर्जीव, सुंदर मूर्तीत आपल्या विद्वत्तेच्या बळावर प्राण ओततो. वरील कथा आपणास काय सांगते? याचा शोध घेऊ जाता, एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे समाजात रूढ असलेली वर्णव्यवस्थेची उतरंड, त्या अनुषंगाने चालत आलेली गावपातळीवरची बलुतेदार-पद्धत ही होय. आपली संस्कृती उघड्याला झाकण्याची आहे, त्याचे प्रतीक म्हणून शिंपी येतो. भोंडा हात अपशकूनाचा संकेत म्हणून कासार बांगड्या भरतो. तर परंपरेने ब्राह्मणाघरी विद्या असल्याकारणाने ऋषीकेश (हृषीकेश) ब्राह्मण त्या निर्जीव बाहुलीत जीव ओततो. ही विद्या ब्राह्मणाकडेच गेली कशी? हा ब्राह्मण लोकसंस्तीत कोणत्या रूपाने-प्रतीकाने वावरतो? तर मला वाटते, तो 'वामन-बळी' संस्कृतीचे द्योतक म्हणून लोकजीवनात संचारतो. या कथेत अनेक पातळ्यावर शोध घेता येण्यासारखे आहे. विधी-नाट्यातून व लोकनाट्यातून वावरणाऱ्या विविध लोककथाच्या वर्तमानातून भूतकाळाकडे, त्यांच्या कुळीमुळीचा शोध घेत प्रवास करण्यासाठी संशोधकांना खूप मोठी संधी आहे. ह्या कथांचे मूळ कोणत्या विचार, भावविश्वात आहे, धर्मग्रंथात आहे, याचा शोध घेत घडलेल्या बदलाचा अन्वयार्थ शोधण्यास खूप संधी आहे. यासंदर्भात एक सुचवावेसे वाटते ते म्हणजे विधी

नाट्य व लोकनाट्यातून वावरणाऱ्या ह्या कथासंहिता पुस्तक रूपाने प्रकाशित होणे अगत्याचे आहे. कलावंताच्या दुराग्रहामुळे किंवा त्यांच्या व्यावसायिकतेमुळे हे क्षेत्र अद्यापही संहिता-पुस्तक रूपाने बाहेर आलेले नाही. जाणकार अभ्यासकांनी या अंगाने विचार करावा असे वाटते. तात्पर्य लोकसाहित्याच्या क्षेत्रात संशोधकांना भरीव काम करण्याची आणि अभ्यासअंती काही तरी भरीव आपल्या हाती लागल्याचे समाधान मिळवून देणारे क्षेत्र व्यापक आणि विशाल आहे.

★★★

# संशोधन : आधुनिकीकरण आणि परिवर्तनानी नांदी

डॉ. वेदश्री विजय थिगळे

जवाहरलाल नेहरू विद्यापीठांच्या संदर्भात म्हणत की, 'विद्यापीठे असतात उच्च मानवी मूल्ये. सहिष्णुता, कर्मसिद्धी, साहसी कल्पनांचा मागोवा आणि सत्याचा शोध घेण्यासाठी, मानवजातीचा प्रवास उच्च ध्येयाप्रती नेण्यासाठी विद्यापीठे असतात. त्यांची त्यांनी कर्तव्ये पार पाडली तर देश आणि देशवासियांसाठी त्या इतके मौल्यवान काही नाही.' हीच जबाबदारी सध्या विद्यापीठे पार पाडत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपले शिक्षक आणि विद्यार्थी कमी पडू येत म्हणून त्यांच्यासाठी त्यांनी संशोधनाचे एक अंगण खुले करून दिले आहे शिवाय काही प्रमाणात निधीही उपलब्ध करून दिला जात आहे. याचे आपण सर्वांनी स्वागतच करायला हवे. जागतिकीकरणात मराठी भाषा आणि साहित्य नेमके कुठे आहे हे जाणून घेण्यासाठी मराठी साहित्याचे संशोधन अधिक गतीने आणि वास्तवदर्शी दृष्टीने होणे आवश्यक आहे. पण अलीकडे साहित्यकेंद्री व व्यावहारिक मराठीच्या संशोधनाकडे अभ्यासकांचे दुर्लक्ष होते आहे अशी ओरड होते आहे ती थांबवायला हवी. आपण आज २१ व्या शतकात म्हणजे माहीती तंत्रज्ञानाच्या अद्ययावत अशा युगात वावरत आहोत. त्यामुळे मराठीच्या विस्ताराचे अनेक मार्ग आज आपल्यापुढे खुले झालेले आहेत. या नव्या तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर संशोधनात करून मराठीचा, साहित्याचा विस्तार आणि प्रचार करणे सहज सुलभ झाले आहे. अडचण आहे ती हे नवे तंत्रज्ञान शिकण्याची आणि त्याचे उपयोजन करण्याची किंवा त्यावरील मजकुराच्या संरक्षणाची. पण तरीही या माध्यमाचा अधिकाधिक उपयोजन करून मराठीच्या विस्तारासाठी संशोधनाचे विविध मार्ग शोधून या संदर्भातील विविध प्रकल्प कार्यान्वित करण्याची गरज आहे. आपल्या संशोधनाची समाजपयोगी मांडणी करण्याचीही आवश्यकता आहे. संशोधनातून त्या त्या विद्याशाखांचा विकास होतो. संशोधन हे आधुनिकीकरणाकडे आणि परिवर्तनाकडे घेऊन जाणारे महत्त्वाचे असे साधन आहे. जी ज्ञानशाखा संशोधनाला नाक मुरडत असतील तर ती ज्ञानशाखा आहे त्याच अवस्थेत राहिल. त्यात साचलेपणा येईल. त्याशाखेचा वर्तमानाशी आणि गतकाळाशी संबंध असल्याचे काही सांगता येणार नाही. संशोधनामुळे आपल्याला आपण आणि आपली

ज्ञानशाखा जगाबरोबर नेमकी कुठे आणि कशी आहे याचे भान येते. अस्तित्वाची जाणीव होते. संशोधनाशिवाय काळानुरूप होणारे बदल आपल्यापर्यंत पोहचत नाही. नव्या मूल्यांची, जाणिवांची, सिद्धांताची, प्रकारांची आणि नव्या वास्तवदर्शी दृष्टिकोनाची ओळख होत नाही. त्यामुळे संशोधनानी आवश्यकता आहे आणि राहणार आहे हे मात्र खरे संशोधनान जर करावयाचे असेल तर संशोधनासाठी आणि संशोधकासाठी कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत असा प्रथम विचार आपल्या मनात येतो. याबद्दल मला कुंग झियांग त्सुंग या चायनीज विचारवंताने मांडलेले विचार सांगावेसे वाटतात. या विचारवंताने कानेर्गी मिलान विद्यापीठात १९८७ साली या विषयावर व्याख्यान दिले होते. ते म्हणतात की, मोठया मानाच्या विद्यापीठात प्राध्यापक आम्ही एका अमुक विषयावर काम करतो असे जेव्हा सांगतात तेव्हा ते बहुदा त्यांच्या संशोधनार्थीवर किंवा त्यांच्या कामावर भिस्त ठेवून असतात. कोणीतरी अमुक काम करीत आहे म्हणजे तेथील समस्या नक्कीच सुटणार किंवा परिस्थितीत नक्की बदल होणार हा विश्वास त्यांना वाटतो आणि तो वाटायला हवा. इथेच त्या संशोधनाची आणि संशोधकांची जबाबदारी वाढते. कारण त्या विषयावर संशोधन होईल आणि काही उपाय योजना हाती लागेल आणि समस्येवर मात करता येईल. या त्यांच्या सांगण्यातच मला वाटतं संशोधनाचे उद्दिष्ट दडलेले आहे. हे उद्दिष्ट साध्य होणं म्हणजे संशोधनाचे काम त्या दर्जाचे व्हायला हवे. दर्जेदार संशोधन आणि संशोधक हे त्या विद्यापीठानी संपत्ती असते. हेच संशोधक पुढे मार्गदर्शक होणार असल्याने हा संशोधनाचा दर्जा उत्तरोत्तर वाढतच जाणार आणि त्या विद्यापीठाचा नावलौकिक वाढत राहणार यात शंका नाही.

गेल्या दोन ते तीन वर्षापासून पुणे विद्यापीठाने पीएच.डी पदवी साठी, काही क्रेडीटसाठी प्रत्येक अभ्यासमंडळाने 'कोर्सवर्क' नेमावा असा आग्रह धरला आणि तो अभ्यास मंडळांनी अस्तित्वात आणला आहे. तो पूर्ण करणे या पीएच.डी पदवीसाठी संशोधन करणाऱ्या अभ्यासकास बंधनकारक आहे. त्यामागचा अभ्यासमंडळाचा हेतू स्वच्छ आहे की संशोधनाकडे वळण्यापूवी अभ्यासकाचे काही वाचन होणे, संशोधन विषयाची खोली कळणे, व्याप्ती-मर्यादा लक्षात येणे, विषयाची आवडनिवडही लक्षात येणे, संशोधनानी दिशा ठरविणे, इथे विद्यार्थ्यांनी खरी कसोटी लागते. हे कोर्स वर्क म्हणजे बुद्धीची परीक्षा ठरते. संशोधनाची अभ्यासपद्धती आणि इतर पदव्यासाठी केल्या जाणारी अभ्यासपद्धती

यात मूळातच फरक आहे. संशोधनात खरं तर विद्यार्थ्यांनी विषयाची आवड, निवड आणि अभ्यास करण्याची मानसिकता, संदर्भ शोधण्याची तयारी, नव्यांचा शोध घेण्याची आणि आपल्या संशोधनातून मांडण्याची धडपड शिवाय त्याने निवडलेली संशोधन पद्धती यावर त्याच्या संशोधनाचे स्वरूप अवलंबून असते. संशोधन कसे करावे असे कितीही पुस्तके उपलब्ध असली तरी प्रत्येकाच्या संशोधनाचे स्वरूप सापेक्ष असते त्यामुळे पुस्तकातील सर्वच संशोधन पद्धती जशाच्या तशा आपापल्या संशोधनाला लावून चालत नाही. संशोधनातला प्रत्यक्ष अनुभव काही वेगळाच असतो. इथे 'भाष्यकाराते वाट पुसतु' जायचे असते पण प्रत्येकाचा भाष्यकार आणि त्यांना भेटण्याच्या वाटा ह्या वेगवेगळया असतात. संशोधनाच्या पायऱ्या ह्या सारख्याच असतात पण तरीही प्रत्येकानी पायरी चढण्यानी पद्धत, प्रोत्साहन पचविण्याची क्षमता, त्यात असलेली सर्जनशीलता ही सापेक्ष असते हे मात्र खरे. खरंतर संशोधन हे जसे शास्त्र आहे तशी ती कलासुद्धा आहे. कारण या संशोधनाच्या पायऱ्या यंत्रवत न चढता त्या सर्जनशीलतेच्या प्रोत्साहनाने चढायच्या असतात. कारण दिलेल्या पुस्तकांमधून आणि ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमांचा प्रत्यक्ष उपयोजनात नेमका कसा उपयोग होईल किंवा तो संशोधक कसा करेल हे मात्र निश्चित सांगता येत नाही. इथे त्यानी सर्जनशीलता त्याला उपयोगी ठरत असते. हीच

खरी त्याच्या कौशल्याची किंवा नैपुण्याची परीक्षा असते. संशोधनात या नैपुण्याची विविधता दिसते म्हणूनच संशोधनाचे आगळेवेगळे महत्त्व आहे. प्रत्येक संशोधकाची कुवत, आकलन, सर्जनशीलता, विचार, कल्पना करण्याची क्षमता व्यक्तीसापेक्ष असते. म्हणून संशोधनातही विविधता दिसते संशोधनात एखादी समस्या सोडविणे, नव्या गोष्टींचा किंवा प्रणालींचा शोध लावणे किंवा प्रस्थापित प्रणालींमधील, सिद्धांतामधील, उपयोजन पद्धतीतील कमकुवतता किंवा उणीवा जाणवून देणे; एखाद्या समस्येवर अफलातून उपाय शोधणे, भूतकाळातील ज्ञान हे वर्तमानकाळाशी प्रभावीपणे निगडित असल्याचे सांगणे असे काहीसे संशोधनाचे स्वरूप असते. सर्वच संशोधनासाठी त्या त्या क्षेत्रातील मातब्बर व्यक्ती तुम्हाला भेटतील आणि त्यांचे मार्गदर्शन मिळेलच यानी खात्री नसते. कधी कधी ज्ञानाचा झरा आपल्याजवळ नव्हे समोर असतो पण आपल्याला त्या झऱ्यातील ज्ञानाचे ओंजळभर पाणी मागण्याचे धाडस होत नाही किंवा ते कौशल्य आपल्याजवळ नसेल तर मग कसे होणार? प्रत्येक संशोधनासाठी पुस्तक उपलब्ध

असतीलच असे नाही. अशा वेळी अनुभवी, तज्ञ व्यक्तींच्या अनुभवांचा, त्यांच्या ज्ञानाचा उपयोगही होत असतो. त्यांचे अनुभव आणि आपल्याला आलेले अनुभव पडताळून पाहणे आणि त्यातील निष्कर्ष मांडणे ही सुद्धा संशोधनानी एक प्रक्रियाच आहे. उलट अशा प्रकिया अभ्यासकाचा आत्मविश्वासच वाढवतील. संशोधनाला गती देण्याचे काम करतील. संशोधनाची एखादी नवी प्रणाली अस्तित्वात येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. असे झाले तर त्या संशोधनाचा दर्जा उत्तमच राहील यात शंका नाही.

आपल्या संशोधनाचा हेतू जसा आपल्याला माहीत असतो तसा त्याचा उपयोग आणि संभाव्य परिणामही आपल्याला माहीत असावे. संशोधन प्रक्रियेत आपले संशोधन इतरांपेक्षा वेगळे कसे होईल ते पाहावे. ते करतांना इतरांच्या मतमतांतरांचा विचार करून, ग्रंथातील संदर्भाचा आधार घेत, आपल्या मताच्या स्पष्टीकरणासाठी दिलेले पुरावे, दाखले देत आपला शोध इतरांना पटवून द्यायचा असतो. हे सारं करतांना आपला संशोधनाचा प्रवास सहज सुलभ असा नसतो. यात अनेक अडचणी उभ्या राहतात. कधी ग्रंथांनी उपलब्धी होत नाही, कधी योग्य त्या तज्ञांनी मुलाखत घ्यावयाची असेल तर तो वेळेवर भेटत नाही. कधी मार्गदर्शकांनी भेटीनी वेळ मिळत नाही.

कधी काही मार्गदर्शक जाणीवपूर्वक तपासायला दिलेली प्रकरणे उशिरा तपासून देतात तर कधी ते इतके व्यस्त असतात की तपासलेल्या प्रकरणावर चर्चा करण्यासाठी त्यांनाकडे वेळ नसतो. त्यांनी व्यक्त केलेली सर्वच मते संशोधकाला पटतातच असे नाही. कधी महिला संशोधकाचे मार्गदर्शक असतील तर महिलांच्या अनेक सामाजिक, संसारिक, कौटुंबिक अशा अनेक अडचणी असतात. पण अभ्यासकाने या सर्वांवर पर्याय शोधून अडचणींवर मात करून आपले संशोधन महत्त्वाचे मानावे अन् अध्ययनावर लक्ष केंद्रित करावे. आपल्या संशोधनाचे नियोजन निश्चित असावे. अगदी आठवडयानुसार त्याचे नियोजन करावे. वेळ मिळेल, पुस्तके मिळतील तसे संदर्भ शोधून हे संदर्भ कार्डावर नोंदवून ठेवावेत. प्रकरण लेखनावेळी पुस्तके जवळ बाळगण्याऐवजी हे संदर्भकार्ड वापरणे सुलभ होते. सर्व संदर्भाचा विचार करून आपल्या संशोधन विषयाबद्दलची आपली मते स्पष्ट व्यक्त करायची असतात. कारण त्यावरच तुमचे निष्कर्ष अवलंबून असतात. योग्य निष्कर्ष काढता येणे ही संशोधनातील अत्यंत महत्त्वाची पायरी असते. निष्कर्ष निश्चित होत आले की आपले संशोधन अंतिम टप्प्याकडे वाटचाल करू

लागल्याच्या त्या पाऊलखुणा असतात.

भविष्यकाळात मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या संशोधनाच्या दृष्टीने दीर्घकालीन नियोजनासाठी एकत्र संशोधन माहीती असलेली सूची तयार होणे गरजेचे आहे. म्हणजे आपल्याला मराठी संशोधनाच्या वाटांचा मागोवा घेता येईल आणि जागतिकीकरणात मराठी साहित्याच्या संशोधनाची पावले कशी पडत आहेत याचा आलेख मांडता येईल.

★★★

# 'आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन'

प्रा. सुहास निर्मळे

**वाङ्मयीन संशोधनाची विविध अभ्यास क्षेत्रे :**

संशोधनाचे क्षेत्र विपुल आणि अमर्याद आहे. व्यासंग आणि बहुश्रुतता हे गुण ज्याच्या अध्ययनवृत्तीमध्ये आहेत तो संशोधक जीवनाला सर्वांगानी स्पर्श करणाऱ्या विविध क्षेत्रांना भिडतो आपल्या जिज्ञासू वृत्तीला पडलेल्या प्रश्नांची–समस्यांची उत्तरे तो सतत शोधत राहतो. संशोधनाची विविध अभ्यासक्षेत्रे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. तौलनिक साहित्याभ्यास क्षेत्र
२. वाङ्मयेतिहासाचे संशोधन अभ्यास क्षेत्र
३. वाङ्मयाचा इतिहास आणि पुनर्विचार अभ्यास क्षेत्र
४. साहित्य आणि तत्त्वज्ञान
५. साहित्य आणि संस्कृती
६. साहित्य आणि समाजदर्शन (सा. अनुबंध)
७. साहित्य आणि वाङ्मयीन पर्यावरण
८. वाङ्मय आणि इतर अभ्यासशाखा
उदा. (इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, संस्कृती, पर्यावरण, सामाजिक अनुबंध, आदिबंध, लोकसाहित्य इ.)

आंतरर्विद्या क्षेत्रीय संशोधन :

संशोधनाचा विविध अभ्यास क्षेत्रातील व्यापक क्षेत्र म्हणून आंतरर्विद्या क्षेत्रीय संशोधनाला अत्यंत महत्त्व आहे. या अभ्यासक्षेत्रामध्ये विशेषत: साहित्य आणि तत्त्वज्ञान, साहित्य आणि संस्कृती, साहित्य आणि समाज, साहित्य आणि इतर विद्याशाखा यांचा परस्पर संबंध इ. विषयांचा समावेश होतो.

**आंतरर्विद्या क्षेत्रीय संशोधक : महापंडित राहूल सांस्कृत्यायन :**

आंतरर्विद्या क्षेत्रीय संशोधक म्हणून महापंडित राहूल सांस्कृत्यायन या थोर संशोधकाच्या संशोधनाची विविध क्षेत्रे आणि त्यांची मानवी संस्कृती व तत्त्वज्ञान या क्षेत्रातील अभ्यास पद्धती सर्वांनाच दिग्मूढ, आश्चर्यचकीत करून

टाकणारी आहे. त्यांचा वैयक्तिक परिचय आणि संशोधकाची बहुश्रृत वृत्ती याचा दाखला म्हणजेच त्यांचे संशोधनपर लेखन आहे.

**राहूल सांस्कृत्यायन : परिचय :**

'जिल्हा आझमगड (उत्तरप्रदेश) येथील 'पन्दान्हा' नावाच्या खेड्यात ता. ९ एप्रिल १८९३ रोजी राहुलजींचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव केदारनाथ पांडे असे होते. बौद्धधर्म स्वीकारल्यापासून त्यांनी 'राहूल सांस्कृत्यायन' हे नाव धारण केले. पन्दान्हा गावी त्यांचे आजोळ होते. त्यांचे आजोबा ब्रिटीश लष्करातील सेवा निवृत्त अधिकारी होते. तर राहुलजींचे वडील एक खेडूत शेतकरी होते. त्यांचे अप्पर प्रायमरी शिक्षण पन्दान्हा येथेच झाले आणि 'व्हर्नाक्यूलर फायनल' चा अभ्यास त्यांनी निझामाबाद येथे केला.'

'आजोबांचा नोकरीचा बराच काळ जालना जि. औरंगाबाद या ठिकाणी गेला. निशाणबाजीतील त्यांच्या विशेष प्राविण्यामुळे ते अधिकाऱ्यांबरोबर 'ऑर्डर्लि' म्हणून अनेक ठिकाणी फिरत असत. त्यावेळी त्यांनी पाहिलेला अजिंठा, वेरूळ ह्या ठिकाणांचे रसभरीत वर्णन ते राहूलजीना सांगत. त्याचबरोबर ही सारी विश्वकार्याची कला आहे. राक्षसांनी मोडतोड करण्यास सुरूवात केली तेव्हा रामाने त्यांचा नि:पात केला, आता पुन्हा राक्षसांनी मोडतोड सुरू केली आहे वगैरे गोष्टी हा शिपाईगडी आपल्या नातवाला मोठ्या प्रेमाने सांगे. बालमनावर प्रभावित झालेल्या या संस्कारांना राहूलजींच्या आपल्या प्रवास प्रियतेचे व संशोधन कार्यातील दुर्दम्य उत्साहाचे श्रेय आजोबांच्या या कथन शैलीला दिले आहे.'

**संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांचा संगम : राहूलजींचे संशोधन**

प. राहूल सांस्कृत्यायन यांनी पुराणातील दृष्टांत देऊनच आपल्या संशोधन वृत्तीची बीजे तत्त्वज्ञान व संस्कृती यामध्ये कशी दडलेली होती ते खालीलप्रमाणे सांगितले आहे. ''पुराणात शुकाची गोष्ट आहे ना? पार्वतीच्या आग्रहावरून शंकराने अमरत्व प्राप्तीसाठी उपदेश करण्यास सुरूवात केली. मात्र त्याने अशी अट घातली की पार्वतीने सावधानपणे हा उपदेश ऐकला पाहिजे. सतत 'हुंकार' दिला पाहिजे. परंतु काही काळानंतर पार्वती कंटाळून झोपी गेली. हुंकार मात्र चालूच होता. जवळच पिंजऱ्यात पोपट होता व पार्वतीचा हुंकार बंद झाल्यावर त्याने हुंकार देण्यास सुरूवात केली. या शुकाने अबोधपणे ऐकलेला शंकराचा

उपदेश आणि मी अबोधपणे आजोबांच्या तोंडून ऐकलेल्या कथा यामध्ये बरेच साम्य आहे.''

प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राहूलजी कलकत्याला पळून गेले त्यांच्या खिशात फक्त आठ आणे होते. 'या अनुभवाने माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला' असे राहूलजी म्हणत.३ या काळात त्यांनी एका दुकानात गुमास्त्याची नोकरी केली व अनेक वेदांत्यांशी ओळख करून घेऊन त्यांच्या सोबत चर्चा केली व आठ महिन्यानंतर ते घरी परत गेले. १९१० साली ते पुन्हा घराबाहेर पडले ते कायमचेच!

**वैष्णव साधू म्हणून भ्रमंती व अध्ययन :**

आयोध्या, हरद्वार, गंगोत्री, जम्नोत्री असा दूरदूरचा प्रवास त्यांनी केला. 'बनारस' येथे संस्कृतचा अभ्यास करून व्याकरण व काव्य यांचा परिचय करून घेतला. १९१२ मध्ये ते वैष्णव साधू बनले. तेथे पट्टशिष्य व मठाधिपती झाले.

**सत्यशोधनाविषयी हपापलेपण आणि अध्यात्मातील संयम :**

मठ म्हणजे जमिनदारी, खंडकरी व कूळ यांच्यातील संघर्ष त्यांनी अनुभवला होता. पण ते नेहमी शेतकऱ्यांची बाजू घेत त्यांना न्याय मिळवून देत. अखिल भारतीय किसान सभेचे ते अध्यक्ष होते. त्यातूनच त्यांचे राजकीय शिक्षण आणि कार्य सुरू झाले.

मठाधिपती म्हणून मठाच्या वैभवाला शोभणारी चैनबाजी पण राहुलजींनी 'स्वदेशी'चे व्रत स्वीकारले होते. म्हणून त्यांनी मठाधिपतीची अनावश्यक कपडालत्यांचा साजश्रृंगारही नाकारला होता.

मठाचे कार्य करण्यासाठी त्यांनी दक्षिण भारताचा प्रवास केला. मद्रास, रामेश्वर, महाराष्ट्र, गुजरात, छापडा असा प्रवास करीत त्यांनी 'अयोध्या' येथे अभ्यासासाठी वास्तव्य केले व १९१५ मध्ये ते आग्रा येथे गेले. तेथे त्यांचा 'आर्य समाजाच्या पुढाऱ्यांशी संबंध आला व आयुष्याला नवी कलाटणी मिळाली.'

**आर्यसमाज प्रसारक / प्रचारक :**

''आर्य समाजाच्या शिकवणुकीमुळे त्यांचा तर्कनिष्ठ मनाला वैष्णवधर्मापासून खेचून घेतले. ईश्वराचे त्याबद्दलची श्रद्धा याबाबतीत सर्व

तर्कविरोधी समजुतीपासून माझी आर्यसमाजाने सोडवणूक केली'' असे ते म्हणत. १९१७ साली बुदेलखंडामध्ये असताना त्यांनी 'अरबी' भाषेचा सखोल अभ्यास केला. इस्लाम व ख्रिस्ती धर्माबद्दलचे त्यांचे लेखन उर्दू नियतकालिकात आणि मीरत येथील भास्कर मासिकातून प्रसिद्ध होत असत. त्याच काळात काँग्रेसमधील 'जहाल' गटाशी त्यांचा संबंध आला व मवाळ काँग्रेस सोडली.

**राहूलजींचे संशोधन :**

**१) 'बाईसवी सदी'**

१९१८ साली त्यांनी 'बाईसवी सदी' (२२ वे शतक) या ग्रंथाच्या आराखडा तयार केला. १९२४ पासून इ.स. २१२४ या कालखंडातील अस्तित्वात असलेल्या व बदल झालेल्या समाजाची दृश्ये त्यांनी या ग्रंथात उध्रृद केली आहेत. त्यामध्येच त्यांनी सोवियत समाजाचे चित्र रंगवले. ते जेव्हा प्रत्यक्ष सोवियत रशियाला गेले तेव्हा त्यांच्या प्रतिभाशाली कल्पकतेने रेखाटलेल्या आपल्या ग्रंथातील वस्तुस्थितीचे प्रत्यक्ष दर्शन घडले.

**बौद्ध तत्त्वज्ञानाचे अभ्यासक :**

१९१९ साली त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला. लुंबिनी, कुशिनारा, जेतवन, वैशाली इ. बौद्ध तीर्थांना त्यांनी भेट दिली. तेथून ते नदिया ला गेले व पुन्हा दक्षिणेत जाऊन त्यांनी 'मीमांसा' व 'वेदांत' यांचा नव्याने अभ्यास केला. त्यांनी बौद्धमतांचाच स्वीकार केला.

कूर्ग, खांडवा, छापडा या ठिकाणी असहकारीतेच्या चळवळीचा प्रसार व प्रचार केला. १९२२ मध्ये त्यांना अटक झाली ६ महिन्याची शिक्षा झाली. 'बक्सार' जेलमध्ये त्यांनी 'बाईसवी सदी' ह्या ग्रंथाचा संस्कृत भाषेत आराखडा तयार केला. या काळातच त्यांनी 'शैतानकी आँख', 'विस्मृतीके गर्भमे', 'जादूका मुल्क', 'सोने की ढाल' या अद्भूत कादंबऱ्या लिहिल्या तसेच याच काळात त्यांनी गणितशास्त्र व खगोलशास्त्राचा अभ्यास केला. 'शंकराचार्य भारती' यांचेकडून त्यांनी भास्कराचार्य व युरोपीयन गणिताचा परिचय करून घेतला.

**तिबेट यात्रा :**

१९२७ साली ते लंकेला गेले तेथे त्यांनी विद्यालंकार कॉलेजमध्ये

संस्कृतच्या प्रोफेसरची जागा मिळविली त्या दीडवर्षाच्या अवधीमध्ये 'पाली' बौद्ध ग्रंथाचे परिशीलन करून त्यांनी 'त्रिपीटकाचार्य' ही पदवी मिळविली आणि नंतर निर्दाम झालेले ग्रंथ 'पाली' भाषेत नसून ते तिबेटी भाषेत आहेत असे त्यांना आढळून आले ते ग्रंथ मिळविण्यासाठी ते १९२९ ला तिबेटला गेले.

१५ महिने तिबेटमध्ये राहिले. 'तिबेट मे सव्वा वर्ष' हा ग्रंथ लिहिला व २२ खेचरांवर लादून तिबेट मधील हस्ताक्षरातील ग्रंथ स्वदेशी आणले.

**युरोपचा प्रवास :**

१९३१ मध्ये ते लंकेला गेले तेथूनच ५ ते ६ महिने ते युरोपला राहिले. 'वसुबंधू - अभिधर्म कोश', 'बुद्धचर्चा' गौतम बुद्धाचे चरित्र, कार्लमार्क्सच्या 'एंगल्स'चे 'कम्युनिस्ट जाहिरनामा' या नावांनी हिंदी अनुवाद केला. 'मेरी युरप यात्रा' हे हिंदी प्रवास वर्णन लिहिले.

प्रमाणवार्तिक भाष्य : प्रज्ञाकर गुह- या ग्रंथावर धर्मकीर्तीने 'प्रमाण वार्तीक स्ववृत्ती' नावाचे भाष्य लिहिले असा त्यांनी शोध लावला. मूळ ग्रंथाचा शोध घेणाऱ्या या संशोधकाचे डॉ. क्ष्चेस्बास्की यांनी अभिनंदन केले. डॉ. सिलया लेवी यांनीही त्यांना स्तुतीपर पत्र लिहिले आहे.

''तुमच्या सुंदर, सुबोध व अस्सखलीत संस्कृत लेखन शैलीबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. अेशबोध, नागार्जून, वसुबंधु यांनी जिचा अत्यंत प्रभावीरीतीने उपयोग केला अशा या संस्कृत भाषेत तुमच्या इतक्या सुंदर रीतीने निदान गेल्या १०० वर्षात. नेपाळातील पंडित अमृतानंदानंतर दुसऱ्या कुणीही लेखन केले नाही. तुमच्या 'अभिधर्मकोश' ग्रंथावरून संस्कृत भाषेवरील तुमचे प्रभुत्व प्रचंड वाचन, व अनेक भाषांचे तुमचे ज्ञान यांचा पुरावा मिळतो अशा प्रकारे पंडित राहूल सांस्कृत्यायन यांच्या विविध प्रदेशांचा प्रवास, तेथील प्राचीन ग्रंथाचे संशोधन आणि जीवनाबद्दलची सत्यशोधक भूमिका प्रत्ययाला येते.''

'हजारी बाग' जेलमध्ये त्यांनी लिहिलेले ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत. १) वोल्गा ते गंगा २) सिंह सेनापती ३) मानवसमाज ४) दर्शन दिग्दर्शन ५) वैज्ञानिक भौतिकवाद ६) विश्व की रूपरेखा दहा वर्षाच्या काळात त्यांनी 'रूसमे पचीस मास', 'तिबेटी संस्कृत' डिक्शनरी मध्ये 'एशिया का इतिहास', मधूर स्वप्न, विस्मृत यात्री अकबर, ऋगवेदीक आर्य, सरळ दोहाकोश संग्रह, संस्कृत काव्यधारा, सप्तसिंधु (कादंबरी), दार्जिलींग परिचय, गढवाल, कुमायून जोसंर

डेहराडून, हिमाचल प्रदेश, मार्क्स आणि एंगेल्स चरित्र पाली साहित्य का इतिहास.
१४ एप्रिल १९६३ रोजी त्यांचा अंत झाला.

**लेखनातील विविधता :**

प्रवासवर्णने : १०
कथाकादंबरी / अनुवाद : २०
जीवनचरित्रे : १३
कोश-प्रदेशांची माहीती : ९
भोजपुरी भाषेत : ८ नाटके
बौद्ध धर्मावर : ६
राजकारण व समाजसत्तावाद : १३
तत्त्वज्ञान : ३
साहित्य व इतिहास : १३
संस्कृत : १३
तिबेटी भाषा व व्याकरण : ५ पुस्तके
संपादीत ग्रंथ : ८
एकूण १२५ ग्रंथ, पृष्ठसंख्या ४४ हजार
हिंदी भाषेचा तुलनात्मक अभ्यास
तमिळ व कानडी भाषांचा अभ्यास.
अद्वितीय भाषा ज्ञान :
इंग्लीश, फ्रेंच, जर्मन, चिनी, परशियन, अरबी, तिबेटी, बंगाली, गुजराती, मराठी.

★★★

# 'संशोधन तंत्रे व साधने'

डॉ.आशालता महाजन

संशोधन प्रक्रिया ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ह्या प्रक्रियेत वेगवेगळे टप्प महत्त्वाचे आहेत. सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे एक प्रकारचे सुव्यवस्थापन हा होय. संशोधन प्रक्रियेत तीन टप्पे विचारात घेतले जातात. पहिल्या टप्प्यात पूर्वतयारी, त्यादृष्टीने करावयाची कामे इ.दुसऱ्या टप्प्यात प्रकल्प सिद्धीस नेण्यासाठी करावयाच्या बौद्धिक व तत्सम कृतींशी संबंध अशा गोष्टी येतात. तिसरा टप्पा स्वाभाविकपणेच प्रकल्प वा प्रबंध आदींच्या सिद्धीच्या दृष्टीने शेवटच्या अवस्थेत करावयाच्या विविध गोष्टी.

## १) अभ्युपगम (हायपॉथेसिस):-

संशोधन प्रक्रियेत हायपॉयथेसिस उर्फ अभ्युपगमाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. सगळा ज्ञानविकास अभ्युपगमावर अवलंबून आहे. संशोधक-अभ्यासक जेव्हा अवलोकनातून काही घटक महिती, वास्तवदर्शक तथ्ये जमा करतो, तेव्हा त्यांची विविधता पाहून तो प्रथम स्तिमित होतो. नंतर तो त्यांचे आंतरसंबंध शोधावयास लागतो.

एका काल्पनिक साखळीच्या दुव्यात त्यांना त्यांचे स्वरूप न बदलता गोषवाऱ्यास सुरूवात करतो. अधिक बारकाईने पाहता या कल्पनेत वा ह्या गृहितकृत्यास सत्याचा आधार आहे. असे त्याला वाटू लागते. इतस्ततः असणाऱ्या वस्तूंतून नियमशून्य भासणाऱ्या घटना कृतीतून त्याला कोणत्या तरी नियमांचा, तत्त्वाचा, सूत्राचा बोध होतो, हे हायपॉथेसिस होय.

शोधप्रक्रियेत ग्रहित धरावी लागणारी हायपॉथेसिस ही एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. ती एकस्वरूपी नाही. विषयाप्रमाणे तिचे स्वरूप बदलते.

शोधप्रक्रियेस ज्या साधनभूत गोष्टी, अवलोकन इ. प्रयत्नपूर्वक जमा झालेल्या असतात. त्यांचे स्वरूप, परिस्थिती, कार्य इ.स्पष्ट होण्यासाठी व शोधकार्य पुढे चालू राहण्यासाठी चालचलाऊ स्वरूपाचा जो विलक्षण अंदाज किंवा निष्कर्ष आपण करू शकतो. तो हायपॉथेसिस होय.

२) संशोधन साधनेः-

१. ग्रंथालयः-

उत्कृष्ट ग्रंथालय हे विद्वत्तेचे संचयस्थान गणले जाते. ग्रंथालय सुविधांवर संशोधनाची यशस्वीता अवलंबून असते. शोधकार्यासाठी निरनिराळ्या ग्रंथालयांचा आश्रय घ्यावा लागतो. शोधक्रियेशी ग्रंथालयांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. ग्रंथालयांकडून खालील बाबींची सहाय्यता होतो.

१. अधिकृत स्वरूपाचे दस्तऐवजी साहित्यः सरकारी वा खाजगी अधिकृत दस्तऐवज

२. महत्त्वाच्या वा विशिष्ट विषयावरचे विद्वतपूर्ण ग्रंथ, नवा अभ्यास.

३. निरनिराळ्या विषयांतील प्रश्नांची चर्चा, चिकित्सा करणारे, माहीती देणारे ग्रंथ व कालिके.

४. इतर संकिर्ण स्वरूपाची माहीती देणारे, प्रश्नांची चर्चा करणारे ग्रंथ.

२. दैनंदिनीः-

दैनंदिनी (डायरी) हे एक महत्त्वाचे साधन आहे. शोध साधनात समकालीन साधने महत्त्वाची मानली जातात. कारण ती वास्तव स्वरूपात असतात. कालौघात होणारे संस्करण किंवा विकृती यापासून अलिप्त असतात. दैनंदिनी लिहिणारी व्यक्ती तोलामोलाची असावी लागते. त्याचप्रमाणे प्रसिद्धीसाठी, कोणास खुश करण्यासाठी ती लिहिलेली नसावी. डायरीतील घटना दुसऱ्या मार्गांनी सिद्ध होणे अगत्य असते. पण कित्येकदा इतर साधनांच्या अभावी डायरीतील वर्णने प्रमाण मानावी लागतात. मराठीतील विष्णुभट गोडसे भटजी यांनी लिहिलेले प्रवासवर्णन उल्लेखणीय आहे. त्यांच्या अनुभवांचा वृत्तांत त्यांनी स्वतःसाठी लिहून ठेवला. तो वृत्तांत एक अपूर्व, ऐतिहासिक व सामाजिक महत्त्वपूर्ण दस्ताऐवज झालेला आहे.

३. तज्ञांचे मतः

संशोधनात जे आधार पुरावे दिलेले असतात. त्यांची विश्वसनीयता संशयातील असेल तर त्यांना मतांचे महत्त्व येते. त्याचे अस्तित्व हे मताला पोषक असतें. वस्तुतः मत ही एक व्यक्तीगत बाब आहे. तिच्यात वस्तुनिष्ठता अल्प असते. तथापि हे मत जर सामान्य माणसाचे नसेल, ते अभ्यासकाचे, तज्ञाचे असेल तर तज्ञाचे मत म्हणून तो आधार प्रमाणभूत मानला जातो. कारण ते मत वा ती वस्तुस्थिती त्या व्यक्तीने स्वतःचे ज्ञान उपयोगात आणून स्पष्ट केलेले

असते. ते व्यक्त करण्यात त्याचा व्यक्तिगत स्वार्थ नसतो. त्याचप्रमाणे वस्तुस्थिती वास्तव स्वरूप लक्षात येण्याइतकी तज्ञता त्याच्या ठायी असते. म्हणून त्या मताला विशेष महत्त्व येते.

### ४. थोरांची वचने:-

शोधक्रियेत थोरांची वचने किंवा मते कित्येकदा अवधृत केली जातात. ती स्वीकारणीय असल्यासचा आग्रह धरला जातो. थोर मनुष्य ज्या क्षेत्रात थोर आहे त्या क्षेत्राशी संबंध विषयावर त्याने निःपक्षपातीपणे आपले मत उद्‌धृत केले असेल व त्याला तज्ञाचे मत म्हणून महत्त्व येत असेल तरच ते स्विकारणीय होय, अन्यपक्षी नाही.

### ५. तथ्यसंकलन (डाटा कलेक्शन):

संशोधनात साधनसामुग्री किंवा तथ्यसंकलनाला फारच महत्त्व आहे. संशोधनाची सगळी इमारत त्यावर उभारलेली असते. विषयाप्रमाणे, ज्ञानक्षेत्राप्रमाणे तथ्याचे स्वरूप बदलते. इतिहास, वाङ्मय, पुराण, वास्तुशास्त्र या ज्ञानक्षेत्रात तो ग्रंथ वा तत्सम रूपांनी उपलब्ध असतात. पण त्याची विश्वसनीयता ठरवावी लागते. त्यासाठी पाठचिकित्साशास्त्रासारखा पूरक शास्त्राची मदत घ्यावी लागते. सामाजिकशास्त्राच्या संशोधनात तथ्ये ही प्रश्नमालिका, मुलाखती, सर्वेक्षण इ. चा अवलंब करून मिळवावी लागतात. तसेच विज्ञानक्षेत्राच्या बाबतीत डाटा हा प्रयोगांच्या आयोजनातून जमवावा लागतो. कोणतेही ज्ञानक्षेत्र असो, संशोधनात साधनसामुग्री संचयन तथ्यसंकलन महत्त्वाचे असते.

### ६. दर्शिका:

ग्रंथालय शास्त्रातील विशिष्ट नोंद साधन व संकल्पना मराठीत सामान्यतः कोणत्याही व्यापक व सर्वसामान्य यादीस कॅटलॉग म्हणतात. ग्रंथालयांमध्ये असलेले ग्रंथ, वृत्तपत्रे, नकाशे इ.ची वर्णनयुक्त सूची असते. तिला कॅटलॉग म्हणतात. ही सूची गरजा लक्षात घेऊन केलेली असते. या सूचीत माहीती नोंदविण्यासाठी विशिष्ट काडीचा वापर केला जातो. कॅटलॉग ही एक ग्रंथालय शाखातील वैशिष्ट्यपूर्ण संज्ञा व साधन आहे. शोधविषयाच्या अनुषंगाने निवड करावी लागते. दर्शिका शोधकास शोधकार्यात उपयुक्त ठरतात.

७. दस्तऐवज:

दस्तऐवज (डाटा) शोधलेखनात अत्यंत महत्त्वाचे साधन असून त्याचे विशेष स्थान आहे. ज्ञानक्षेत्राप्रमाणे दस्तऐवजाचे स्वरूप बदलते. प्रत्येक विषयाचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यादृष्टीने दस्तऐवजाचे महत्त्व कमी जास्त होते. संशोधकास दस्तऐवजाच्या अंतरंग आणि बहिरंगाची पूर्णपणे माहीती आणि जाणीव असणे आवश्यक असते.

दस्तऐवज पुरावा जुना, पुरातन असल्यास त्याचे वाचन महत्त्वाचे ठरते. अभ्यासकास तो कोणत्या विषयासंबंधी आहे हे अगोदर जाणून घ्यावे लागते. त्यासाठी उत्खनन व तत्सम शास्त्रांचे ज्ञान महत्त्वाचे ठरते. दस्तऐवजाची भाषा, भाषेतील सांकेतिक शब्द, लेखनपद्धती, लेखनातील सांकेतिक उल्लेख इ. ची अभ्यासकास माहीती असावी लागते. मुा म्हणजे मुक्काम, रो म्हणे रोजी, प्रोा म्हणजे प्रमाणे असे अनेक संक्षेपदर्शके वापरली जात. आजही ह.भ.प.म्हणजे हरिभक्त परायण तसेच म.म.-महोपाध्याय असे संक्षेप आहेत.

## ३) संशोधन प्रक्रिया:

शोध-पद्धती-शास्त्र हे शोधप्रक्रियेतीत अत्यावश्यक उपांग आहे. म्हणजे विद्याक्षेत्रीय विशिष्ट पात्रता मिळविल्यानंतर पुढील प्रगतीचे ते साधन आहे. ते केवळ साधन नसून त्यात साध्य आणि साधन यांचा संगम झालेला आहे. संशोधन व्यवहारात शोध प्रक्रिया ही अत्यंत महत्त्वाची आहे. आजकाल संशोधनाने जीवनाची सर्व अंगे व्यापलेली आहेत.

### १) शोधविषयक निवड:

शोधक्षेत्रात प्रवेश विशिष्ट शोधकार्यानेच करावा लागतो. त्यामुळे नवप्रवेशकापुढे पहिला व महत्त्वाचा प्रश्न विषय निवड हा असतो. शोधक ज्या विषयात शोधकार्य करू इच्छितो त्या विषयाच्या ज्ञानक्षेत्राची त्यास चांगल्याप्रकारे जाण असावी. त्या क्षेत्रातील महत्त्वाच्या विचार संकल्पना कोणत्या, वस्तुस्थितीदर्शक कोणत्या बाबी उपलब्ध होणे शक्य आहे. आतापर्यंत कोणकोणत्या विषयांवर संशोधन झालेले आहे, त्यात कोणती दुर्लक्षित स्थळे आहेत, त्या क्षेत्रातील संशोधनाची दिशा कोणती आहे, शोधकाची महत्त्वकांक्षा काय आहे इ. प्रश्नांच्या विचारांती स्वतःचा व्यासंग, आवडनिवड, काम करण्याची प्रवृत्ती,

परिस्थितीचा विचार करून विषय निवड करावी. विषय शोधणे हा एक महत्त्वाचा शोधक्षेत्रीय अनुभव स्वनिर्णय असावा. शोधविषयाची निवड झाल्यानंतर त्याचे स्वरूप, पद्धती इ. निश्चित करण्यासाठी पूर्वतयारीची आवश्यकता असते. पूर्वतयारीसाठी एक छोटी योजना तयार करावी लागते. निवडलेल्या विषयावर पूर्वी कोणी कोणी कोणकोणते कार्य केलेले आहे. पुस्तके लिहिली आहेत, त्याचे स्वरूप काय आहे हे पाहणे आवश्यक आहे. ही पाहणी हा शोधकार्याच्या सुरूवातीचा पहिला भाग आहे. या समालोचनातून विषयाचे शोधकार्य व पद्धती ठरत असते.

विषय निवडीनंतर पूर्वसिद्धततेची दुसरी अथवा साधन ग्रंथमालिकेची होय. साधनग्रंथ यादीतील काही ग्रंथांचा काही भाग वाचल्यानंतर विषयासंबंधीचे विचार निश्चित होतात. वाचन आणि विचारानंतर प्रास्ताविक रूपरेषा तयार होते. विषयाच्या निवडीनंत प्राथमिक वाचनाच्या व संदर्भ ग्रंथांच्या यादीच्या आधारे प्राथमिक स्वरूपाची रूपरेषा तयार झाल्यानंतर साधनांची पाहणी करणे.

### २) वाचनपद्धती:

संशोधनासाठी करावयाच्या वाचनात मनोरंजनला वाव नसतो. वाचन विशिष्ट हेतूने करावयाचे असते. विशिष्ट हेतूमुळे वाचन सिमित झालेले असते. विविध प्रकारची माहीती, संदर्भ, उदाहरणे, उतारे इत्यादींच्या प्रतिपादनात उपयोग करावयाचा असतो. त्यामुळे वाचनाचे स्वरूप विविध प्रकारचे असते. ग्रंथवाचन काळजीपूर्वक, हेतूपूर्वक करावयाचे असते. वाचनाचे वेळी विशिष्ट खुणा करून ठेवणे शोधकाला उपयुक्त असते.

### ३) शोधप्रबंधाचे पहिले प्रकरण:

शोधप्रबंधासाठी विषय निश्चितीनंतर प्राथमिक स्वरूपाचे वाचन झाल्यावर प्रबंधाची रूपरेषा तयार होते. प्रकरणांचे विषय, शीर्षके इत्यादी स्थूलपणे ठरविले जातात. लेखन आणि संशोधन यांचे विषयानुसंगे वाचन झाल्यावर शोधकाची संशोधनाची दिशा स्पष्ट होते. काय वाचावे? काय करावे? याविषयी मार्ग दिसावयास लागतो. शोधकाची भूमिका निश्चित होते. त्याआधारे प्रबंधात येणारी प्रकरणे, पूरक माहीती, परिशिष्ट्ये इत्यादींचे स्वरूप स्पष्ट होते. प्रबंध सिद्धतेचा मार्ग सुकर होतो. सगळ्या प्रयत्नांचे शोधक्रियेचे विवरण म्हणजे प्रबंधाचे पहिले प्रकरण

होय. कोणत्याही प्रदीर्घ अभ्यासपूर्ण ·लेखनात प्रस्तावना महत्त्वाची असते. शोधलेखनात तिला विशेष महत्त्वाचे स्थान आहे.

**४) प्रबंधाचा मुख्य भागः**

प्रबंधाचे मुख्य प्रतिपाद्य हा त्याचा गाभा होय. विषयाप्रमाणे प्रबंधाच्या मध्यवर्ती भागाचे स्वरूप बदलते. प्रयोगप्रधान संशोधनास प्रबंधाचा गाभा वेगळा असतो. विवेचनाच्या भूमिकेप्रमाणे प्रबंध प्रकरणात विभागलेला असतो. प्रबंध साक्षेपी लेखन असते.

खालील बाबी प्रबंध लेखनात अवश्य लक्षात ठेवाव्यात.

१. प्रत्येक प्रकरण सामान्यतः स्वयंपूर्ण असावे.

२. शोधलेखनात नेमकेपणा असावा. प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभीच्या परिच्छेदात आतापर्यंतच्या विवेचनाची दिशा सांगून त्या प्रकरणात कोणत्या विषयाचे व कशा प्रकारे आपण प्रतिपादन करणार आहोत हे स्पष्ट करणे. त्याचप्रमाणे प्रकरणाच्या शेवटी काढलेले निष्कर्ष देणे.

३. विषयाचे मुद्देसुद प्रतिपादन करणे, ही एक कला आहे. पुनरुक्ती, फाफटपसारा, शिथिलता कटाक्षाने टाळावी. आधार अवतरणे आवश्यक तेवढीच द्यावी. पांडित्याचे प्रदर्शन टाळावे.

४. प्रबंधाचा मुख्य भाग शोधकाचा व्यासंग, परिश्रम, अवलोकन साक्षेप या गुणांचे बरोबर प्रतिबिंब पडेल असा असावा.

**५) प्रबंधाचे शेवटचे प्रकरणः**

शोधलेखनात प्रारंभाला जेवढे महत्त्व असते तेवढेच महत्त्व शेवटच्या प्रकरणाला असते. प्रारंभीच्या प्रकरणात जे काही साधावयाचे असते ते साधलेले आहे असे शेवटच्या प्रकरणात स्पष्ट करणे अवश्य असते. शोधलेखन भूमितीतील प्रमेयाप्रमाणे असते. प्रमेयात ज्याप्रमाणे दिलेल्या गोष्टी साध्य व सिद्धता व शेवटी फलश्रुतीचे स्पष्ट निवेदन असते. तसेच शोधलेखनाचे असते.

फलश्रुती एकाच स्वरूपाची नसते. विवेचनाप्रधान प्रबंध असेल तर निष्कर्ष स्वरूपाचे शेवटचे प्रकरण असते. ऐतिहासिक दृष्टीतून प्रबंधाचे लेखन झाले असेल तर शेवटी समालोचन येईल. तसेच पृथक्करणपद्धतीचा प्रबंध असेल तर शेवटी समारोप येईल. पहिले प्रकरण व शेवटचे प्रकरण, प्रारंभ व शेवट यात जी संगती असते ती कित्येकदा अंतिम महत्त्वाची असते. लोकमान्य टिळकांनी

गीतारहस्य च्या प्रस्तावनेत गीता ही निवृत्तीवादी नसून प्रवृत्तीवादी आहे हे स्पष्ट करताना गीतेचा प्रारंभ व शेवट यात जी संगती आहे. ती याबाबतचा निर्णय देण्यास पुरेशी आहे. असे स्पष्ट करताना उपक्रमोपसंहारी हा श्लोक उद्‌धृत केला व केवळ त्याच्या आधाराने गीतेचे प्रवृत्तीवादीपण सिद्ध केलेले आहे. उपक्रम म्हणजे प्रारंभ व उपसंहार म्हणजे शेवट. या तांत्रिक महत्त्वाच्या अंगांना शोधलेखनात अपूर्व महत्त्वाचे स्थान आहे.

**६) शोध अहवाल, अंतिम अहवाल तयार करणे:**

शोध अहवालाची पहिली प्रत तयार झाल्यानंतर अंतिम प्रत तयार करावी लागते. ह्या प्रक्रियेत प्रकरणे क्रमाने लावणे, क्रमवार लावतांना प्रत्येक विभागापूर्वी एक कोरे पान ठेवणे. त्याचेवर खंड वा विभाग क्रमांक लिहून त्या विभागातील प्रकरणांची यादी लिहावी. त्यानंतर प्रारंभीच्या पानांची व मजकुराची जुळवाजुळव करावी. प्रथम पहिले पान तयार करावे. त्यावर परीक्षेचे वा संस्थेचे नाव, विषयाचे संपूर्ण नाव, विषयाचे संक्षिप्त नाव, त्यावर------पदवीसाठीचा प्रबंध असा उल्लेख असावा. त्यानंतर उध्येत्याचे नाव, त्याच्या पदव्या, नोकरी करीत असलेली वा संबंधित संस्था, संघटना इ. सह द्यावे. त्यानंतर मार्गदर्शकाचे नाव, त्याच्या पदव्या, संबंध संस्थांचा उल्लेख करावा. अगदी खाली सादर करण्याची तारीख, महिना, वर्ष असावे. पहिल्या पानात एवढाच मजकूर असावा. थोडीफार कलात्मक सजावट असावी.

**७) शोधकार्य फलित: स्वरूप-दर्शन (सिनॉप्सिस) गोषवारा:**

शोधनिबंध सादर करण्यापूर्वी त्यांचा सारांश स्वरूपाचा आराखडा किंवा गोषवारा सादर करावा लागतो. गोषवारा स्वतंत्रपणे तयार करावा लागतो. गोषवारा हा परीक्षक किंवा औत्सुक्य असणाऱ्यांसाठी तयार करावयाचा असतो. गोषवाऱ्यात विषय, प्रश्नांची निवड, त्याची विशिष्ट बाजू, विवेचनाच्या वा प्रतिपादनाच्या पद्धती, विविध प्रकारची तथ्ये, त्यांचे स्वरूप, त्यांच्या उपलब्धतेसाठी उपयोगात आणलेली विविध स्वरूपी उपकरणे, त्यांचे उपयोजन व नंतर एकंदर प्रकल्पाचे फलित वा निष्कर्ष वा सूचना इ. या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. गोषवारा ही तांत्रिक व आवश्यक अशी तरतूद आहे. पण ती केवळ तांत्रिक नसून शोधप्रक्रियेशी दृढपणे संबंध आहे.

**८) शोधप्रबंध-मूल्यमापन:**

शोधप्रबंध पूर्ण झाल्यानंतर वरीष्ठ अधिकारी किंवा मार्गदर्शक त्यांच्याकडे

सादर केल्यावर त्याचे मूल्यमापन केले जाते. प्रबंध परीक्षण करताना पुढील विषयाधारे उत्तरे शोधावीत.

१. विषयांची निवड कशी आहे?

२. शोधकाने शोधक्षेत्र व स्वरूप योग्य प्रकारे मर्यादित केलेले आहे काय?

३. साधन, संचयिका सुयोग्य आहे काय?

४. साधनसामग्री वापर, विनियोग योग्य झालेला आहे काय?

५. प्रतिपादनात सुसंघटीतपणा आहे काय?

६. पुरावे साधार देण्यासाठी श्रम घेतले आहेत काय?

७. लेखन बिनचुकपणे केलेले आहे काय?

८. प्रबंधात सुव्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा आहे काय?

प्रबंध परीक्षणात मनावर काय परिणाम झाला, हेही स्पष्ट करावे.

**९) मौखिक परीक्षा (व्हायवा):**

विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) पदवीसाठी प्रबंध सादर केल्यानंतर शोधकाला, अध्येत्याला मौखिक च्या दिव्यातून जावे लागते. भारतातील सर्व विद्यापीठे युरोपीय राष्ट्रांप्रमाणेच मौखिक परीक्षा घेऊन पदवी देतात.

मौखिक परीक्षेकरीता अध्येत्याने खालील प्रश्नांची उत्तरे मनाशी तयार करावी.

१. तुम्हाला हा विषय कसा सुचला?

२. साधनसामग्री कशी मिळविली?

३. अव्वल स्वरूपाची साधने कोणती?

४. दुय्यम दर्जाची साधने कोणती?

५. महत्त्वाचे साधन कोणते?

६. निष्कर्ष कसे काढले?

७. पुढील संशोधनाचे विषय कोणते?

८. प्रबंधाचे ज्ञानक्षेत्रातील महत्त्व, वेगळेपण कोणते?

१०) संशोधानातील मौलिकता:

संशोधनाने उपलब्ध ज्ञानात नवीन भर पडावयास हवी, ही एक किमान अपेक्षा असते. संशोधनात शोधकाचे व्यक्तिविशिष्ट मौलिकत्त्व असावयास हवे. शोधकाचे व्यक्तिवैशिष्ट्य शोधप्रकल्पात असल्याविना त्या संशोधकास महत्त्व नाही. तेच शोधकाचे खरे समाधान असते. संशोधकाने एखाद्या प्रश्नाचा सांगोपांग व संपूर्ण अभ्यास केला आहे, एक जटील समस्या विचारात घेऊन तिची सोडवणुक

करण्याचा प्रयत्न केला आहे हे समाधान शोधकाला जन्मभर पुरण्यासारखे आहे. व्यासंगात जो शोधक रंगून गेला आहे, त्याच्याशी एकजीव झालेला आहे, त्याला हाती लागलेले शोधकार्य पुरे करणे, त्या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही समाधान आनंददायी नसते. संशोधनात तद्रूप झाल्याने शोधकाचे ठिकाणी एक प्रकारचे गुणवैशिष्ट्य संशोधनात येते. तीच संशोधनाची मौलिकता असते. संशोधन हे शोधकाचे जीवनसाफल्य असते. तो एक प्रकारचा आत्मानंद असतो, हे म्हणणे वावगे होणार नाही. शेवटी संशोधन ही सहेतुक, परिश्रमपूर्वक करावी लागणारी बौद्धिक क्रिया व ज्ञानक्रिया आहे. संशोधकाजवळ निराभिलाष चिकाटी असावयास पाहिजे.

★★★

# जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यातील तौलनिक साहित्याचे महत्त्व

**प्रा. विनोद कांबळे**

**प्रास्ताविक :-**

तुलनात्मक साहित्याच्या अभ्यास संशोधनाला गेल्या काही वर्षापासून विशेष महत्त्वाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तौलनिक साहित्याच्या अभ्यासाला एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात युरोप खंडात प्रारंभ झाला. भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये या स्वरूपाच्या अभ्यासाला विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुरुवात झाल्याचे दिसते. भाषा आणि साहित्याचा अभ्यास करत असताना संस्कृती, परंपरा, सामाजिक, सांस्कृतिक संबंध, विविध समस्या इ. स्वरूप तौलनिक साहित्य अभ्यासाच्या दृष्टीने स्पष्ट होऊ शकते.

साहित्याच्या अभ्यास क्षेत्रामध्ये एकाच भाषेतील साहित्याचा अभ्यास करताना ही क्षेत्रे विस्तारित आणि व्यापक असतात. देश, काल, संस्कृती, भाषा याचा तुलनात्मक अभ्यास साहित्याच्या अभ्यासातून दोन भाषिक समाजातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय यांच्या परिणामाबरोबर यांचा साहित्यातून कोण-कोणत्या प्रकारे परिणाम झालेला आहे त्याचबरोबर साहित्यातून त्याचे प्रतिबिंब कसे दिसते. याचा अभ्यास तौलनिक साहित्यात केला जातो. आज २१ व्या शतकात जागतिकीकरणाच्या काळात माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट होत आहे. विज्ञान - तंत्रज्ञानाने विविध साहित्य घरबसल्या वाचायला मिळते. अनुवाद, भाषांतर याचे महत्त्व वाढले आहे. या अनुषंगाने प्रस्तुत. शोधनिबंधात 'तौलनिक साहित्याचे स्वरूप आणि महत्त्व' यांचा अनुबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**'तुलना' शब्दार्थ :-**

'तुलना' या शब्दाची व्याख्या मराठीत अ) दोहोमधील साम्य व विरोध तपासून पाहणे. ब) मेळ पाहणे असा आहे. 'तुलना म्हणजे' बरोबरी, सादृश्य अशी व्याख्या आहे. तर हिंदीमध्ये तुलना म्हणजे, तौलाजाना, उघत होना, तुल्य होना, तौल मे बराबर होना, सादृश्य, उपमा, समता, तारतम्य, मिलान, बराबरी असा आहे. इंग्रजीमध्ये तुलना या शब्दाला 'Compare' असे म्हणतात. त्याचा

अर्थ examine inorder, to find out similarity or difference तुलना करणे, बरोबरी येणे लेरिंश म्हणजे to liken 'तुलना करणे' उपमा देणे with बरोबरीला येणे. तुलना beyond - without -past - अतुलनीय असा आहे. उपरोक्त तुलना या शब्दार्थाचा अर्थ पाहत असताना बरोबरी, मेळ, उपमा देणे, तौलणे या शब्दातून अर्थ होतो. त्यामुळे तुलना यातून एखाद्या माहिती अथवा गोष्टीद्वारे दोन बार्बीची माहिती घेणे किंवा ठरविणे म्हणजे तुलना असा अर्थ प्राप्त होऊ शकतो. साहित्य व्यवहारात तुलना ही केली जाते. दोन लेखक, कवी, नाटककार यांच्या साहित्यकृतीतील आस्वादाबाबत ही चर्चा अपेक्षित असते. त्यामुळे स्वाभाविकच अशी प्रक्रिया झालेली आहे.

**तौलनिक साहित्य व्याख्या :–**

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये भारताचा विचार करता भारत हा देश विविधांगी भाषा तसेच संस्कृतीचा देश आहे. येथील प्रादेशिक साहित्य आणि संस्कृती याची चिकित्सा या अभ्यासातून होऊ शकते. त्यामुळे तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे दोन भाषेच्या साहित्यातील भिन्न अणि वेगळ्या गोष्टीची केलेली चिकित्सा असे म्हणता येते. या अभ्यासाची संकल्पना पाश्चिमात्य अभ्यासक रेने वेलेक, वेनॅट फ्रेडरिच, ऑस्कर जे कॅम्पबेल, आर. जी. माऊलटन इ. नी सांगितले आहे. तौलनिक साहित्याभ्यासाची व्याख्या नेमकेपणाने करणे अस्पष्ट असले तरी आता यावरती बरेच साहित्य उपलब्ध झालेले आपणास दिसते. दोन साहित्यकृतीमधून केलेली तुलना यातून मानव आपली जीवनमूल्ये तसेच साहित्यमूल्ये शोधतो. यातच तौलनिक साहित्याभ्यास येतो. त्यानुसार ''दोन किंवा अधिक भिन्न भाषांतील, त्यातील राष्ट्रीयत्त्व विचारात घेऊन साहित्याचा केलेला अभ्यास म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय.'' यामध्ये दोन भिन्न भाषेतील प्रदेश, संस्कृती इ. अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. या दोन भिन्न भाषा राष्ट्रीय भाषा असाव्यात आणि त्यांच्यामध्ये विशिष्ट प्रकारचे भेद असावेत असे गृहीत धरले जाते. त्यामुळे तौलनिक साहित्याभ्यास हा दोन भिन्न भाषेच्या साहित्यामधील विशिष्ट पैलूंचा अभ्यास असेही म्हणता येईल. त्याचबरोबर दोन साहित्यकृतीचा तुलनात्मक अभ्यास यालाही तौलनिक अभ्यास असे म्हणता येईल. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये साहित्यातील विविध परंपरा, त्यांचे स्वरूप, विविध घटना, परंपरा, प्रवाह यांचा अभ्यास यामध्ये अपेक्षित असतो. डॉ. आंनद

पाटील यांनी भारतीय संदर्भ लक्षात घेऊन खालीलप्रमाणे व्याख्या तयार केली आहे, ''तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समकालीन संस्कृतीसापेक्ष स्वत्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून, सांस्कृतिक राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी वाङ्मय आणि इतर कला, साहित्य आणि शास्त्रे - विज्ञान, साहित्य आणि नवीजुनी ज्ञानक्षेत्रे तसेच मानवी अभिव्यक्तीच्या पद्धतींच्या परस्पर व्यामिश्र संबंधाची अनेक विद्याशाखीय दृष्टिकोन वापरुन विविध पातळ्यांवर तयार केलेली तुलनात्मक चिकित्सा होय.'' या व्याख्येनुसार तौलनिक साहित्याभ्यासामध्ये प्रारंभी प्रादेशिक आधाररेषा आखून यामधून आपल्या सांस्कृतिक तसेच राष्ट्रीय भाषा, साहित्य इ. पातळ्यावर विविधतेने अभ्यास करून याची संकल्पना मांडली जाते.

**तौलनिक साहित्याचे महत्त्व :-**

तौलनिक साहित्याभ्यासाने साहित्याच्या अभ्यासाच्या क्षेत्राचा विस्तार होतो. याबरोबर राष्ट्रीय भावना वाढीस मदतही होते. भारतासारख्या बहुभाषिक देशामध्ये या अभ्यासाची आवश्यकता विविध हेतूने जाणवते. भाषा, संस्कृती, राष्ट्रीय साहित्य, विश्वसाहित्य बंधुभाव या दृष्टिकोनातून तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व आहे. विविध भाषेतून आलेल्या साहित्यातील विशिष्ट तत्त्वप्रणालीमुळे त्याच्यातील समानता व एकता शोधण्यात तौलनिक साहित्य मदत करते. यामधून साहित्यातील आशय, अभिव्यक्ती, अनुवाद या अनुषंगाने सर्वस्पर्शी मांडणीही करता येते. मराठी आणि हिंदी यातील साहित्याचा अभ्यास करत असताना मराठी - कानडी, हिंदी-तेलुगु, कानडी - मल्याळम् इ. भाषेतील साहित्याचा तुलनात्मक दृष्टीने केलेला अभ्यास महत्त्वाचा असतो. या साहित्याचा सूत्रबद्ध रितने मांडणी करताना समकालीन साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती, प्रवाह या गोष्टीनाही गृहीत धरावे लागते. तसेच दोन भिन्न भाषिक लेखक, कवी यांच्या साहित्यातील चित्रणाचा समकाळात कोणता प्रभाव पडला आहे याचा अभ्यास करता येतो. या अभ्यासातून राष्ट्रीय एकात्मता, विश्व बंधुभाव यांना महत्त्व प्राप्त होऊ शकते. याबाबत डॉ. आनंद पाटील म्हणतात, ''सतत नव्या दिशा शोधल्याने अलीकडे संस्कृती अभ्यास याच्या केंद्रस्थानी आले आहेत.

साहित्याचे व सिद्धांताचे अध्यापन कालबाह्य ठरत आहे. एकविसाव्या शतकात 'तौलनिक संस्कृती अभ्यास' असे वेगळे नामाभिधान या आंतरविद्यावर्ती

शाखेला मिळेल, अशा शक्यता निर्माण झाल्या आहेत.'' तौलनिक साहित्याभ्यासाला आपल्या मातृभाषेची अस्मिता जोपासत असताना बहुभाषिक होणे ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे भिन्न भाषा एकत्रित तर येतीलच परंतू एकमेकांना आपल्या संस्कृतीची ओळख होईल हा मुळ मुद्दा आहे.

तौलनिक साहित्याचे क्षेत्र हे अमर्याद आहे असे अनेक तुलनाकारांचे मत आहे. या साहित्याचे उपयोजन दोन भिन्न भाषांतील परंपरा, स्वरूप, प्रवृत्ती, अभिव्यक्ती, वाङ्मयीन कृती यातून अनेकविध पैलूंचा अभ्यासही होऊ शकतो. भाषेमध्ये तर या साहित्याचे उपयोजन महत्त्वपूर्ण ठरते. प्रत्येक भाषेची स्वभाव वैशिष्टे त्या भाषेतून प्रकट होत असतात. यामधून त्या भाषेला विशिष्ट वैशिष्टे प्राप्त होत असते.

तौलनिक साहित्याभ्यासातून दोन भाषांची भिन्न स्वरूपाची सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्टे शोधता येतात. त्यातील भाषेचा वैज्ञानिक, वाङ्मयीन अंगाने अभ्यासही करता येतो. त्यामुळे तौलनिक साहित्यामधून भाषा, देश, वंश, परंपरा, प्रवाह, प्रवृत्ती यांच्या विशिष्ट सीमा ओलांडून विश्वव्यापक मांडणी करता येऊ शकते.

**जागतिकीकरणात तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व :-**

आता आपण २१ व्या शतकात पदार्पण केलेले आहे. १९९० नंतर भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे. यालाच जागतिकीकरण असेही म्हणतात. यामध्ये उद्योग, व्यापार, अर्थिक क्षेत्र यावरती याचा परिणाम झाला आहे. समाज, संस्कृती या परिणामाबरोबरच साहित्य ह्या क्षेत्रावरही जागतिकीकरणाचा थेट परिणाम झाल्याचे जाणवते. भाषा, साहित्य संदर्भात इष्ट - अनिष्ठ असे परिणाम जागतिकीकरणामुळे झाल्याचे दिसत आहे. यादृष्टीने तौलनिक साहित्यामध्ये जागतिकीकरणाचे भाषा व साहित्य यावर झालेल्या परिणामांचे स्वरूप पाहता येऊ शकते. इंग्रजी ही या काळातील सर्वमान्य भाषा झाल्याचे दिसते. संगणक, व्यापार, राजकारण, आंतरराष्ट्रीय संबंध यामध्ये इंग्रजी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. याचा प्रादेशिक भाषेवरही परिणाम होत आहे. पण या भाषा संपुष्टात येतील असे चित्र आज तरी दिसत नाही. मात्र याबाबतचे वातावरण जाणीवपूर्वक निर्माण केले जात आहे. तौलनिक साहित्याचा विचार करता जागतिकीकरणामुळे तौलनिक साहित्याभ्यासाला महत्त्व आलेले

आहे. तंत्रज्ञान या क्षेत्राभोवती सारे जाळे गुंफले गेल्याने जागतिकीकरणात तंत्रज्ञानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध देशातील लोकांचे आदान – प्रदान सुरु आहे. साहित्य या क्षेत्रात तर हे आदान प्रदान तौलनिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरणारे आहे. इंटरनेटवरती अनेक देशातील उपलब्ध

साहित्य पाश्चिमात्त्य लोकांना व आपणलाही त्याच्या साहित्याचा अभ्यास करता येऊ शकतो. हे साहित्य घरबसल्या उपलब्ध होऊ शकते. विविध देशातील मूळ साहित्य त्याचप्रमाणे अनुवादित, भिन्न भाषेतील अनुवादित, भाषांतरित असा साहित्याचा प्रवास होऊ शकतो. जागतिकीकरणामुळे भिन्न संस्कृतीचा परस्परांशी असणारा संबंध, संस्कृतीही स्पष्ट होऊ शकते. साहित्य, संस्कृती, भाषा यादृष्टीने विचार करताना पाश्चात्त्य देशामध्ये व्यवसाय, नोकरीच्या निमित्ताने अनेक लोक स्थायिक झाले आहेत. त्यांनी साहित्य, संस्कृती मंडळे स्थापन करून तिथे साहित्य संमेलन, सांस्कृतिक कार्यकम आदि संकल्पना मोठ्या प्रमाणात रुजविल्या आहेत. अशा प्रकारच्या उपक्रमामधून तौलनिक साहित्याचा अभ्यासही होऊ शकतो. जागतिकीकरणाच्या प्रकियेमुळे अनुवादित, भाषांतरित तसेच तौलनिक साहित्याला महत्त्वाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. अनुवादित साहित्य हे तौलनिक साहित्याभ्यासातील महत्त्वाचे साहित्य आहे. जागतिकीकरणाच्या या काळात तौलनिक साहित्याभ्यासाला अनुवादामुळे महत्त्वाची चालना मिळाली आहे. त्यादृष्टीने तौलनिक साहित्याचे महत्त्व आपोआप वाढले आहे.

**समारोप :–**

साहित्याच्या व्यवहारामध्ये तुलनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चांगला बदल, परिवर्तन यादृष्टीने तुलनेचा उद्देश चांगला असायला हवा. तौलनिक साहित्याभ्यासात दोन साहित्यकृतीच्या अभ्यासाला महत्त्व असते. त्याबरोबर इतिहास, संस्कृती, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र इ. विद्याशाखेतही त्याला महत्त्व आहे. तौलनिक साहित्याभ्यासातून साहित्य परंपरा, भाषा, प्रवृत्ती, स्वरूप, घटना, भावना यासारखे स्वरूप स्पष्ट होऊ शकते. एकाच भाषेमुळे साहित्यातील अभ्यासामध्ये काही मर्यादा येऊशकतात. तर तौलनिक साहित्याच्या अभ्यासामुळे हे क्षेत्र व्यापक आणि विस्तारित होऊ शकते. साहित्याच्या देवाण – घेवाण प्रक्रियेमध्ये या साहित्या प्रकाराला विशेष महत्त्व आहे. या अभ्यासामुळे व्यक्तिच्या ज्ञानात भर पडते.

त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मता, व्यक्ती जीवन, राष्ट्रीय भावना विकसित करण्यामध्ये महत्त्व आहे. जागतिकीकरणाच्या काळात तर संगणक, तंत्रज्ञान याद्वारे विविध प्रदेशातील साहित्य, संस्कृती, भाषा यांचा अभ्यास घरबसल्या होऊ शकतो. त्यामुळे अनुवादित, भाषांतरित इ. अनुषंगाने या साहित्याचे मोल वाढत असल्याचे दिसते.

★★★

# मराठी ग्रामीण, दलित कांदबरी: एक तौलनिक अभ्यास

डॉ.विजय केसकर

प्रस्तावना: –

१९६० नंतर मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात बदल होत गेले. त्यामध्ये ग्रामीण, स्त्रीवादी, दलित साहित्य प्रवाह महत्त्वपूर्ण आहेत. या कालखंडातील सामाजिक, राजकीय, आर्थिक अनास्थांचे चित्रण ग्रामीण तसेच दलित कांदबरीतून होताना दिसते. मूलभूत गरजांची अपूर्तता, जातीय धूव्रीकरण, स्पृश्यास्पृशांमधील दरी यांनी प्रभावित होऊन दलित कादंबरी येते. तर ग्रामीण कारागिरांची बेरोजगारी, विभक्त कुटुंब पद्धती, विफलता, स्थित्यंतर, ग्रामीण जीवन, अनिष्ट प्रवृत्ती, ग्रामीण राजकारण, जातीय धर्मीय विचार यांना केंद्रवर्ती ठेवून ग्रामीण कादंबरीची वाटचाल होताना दिसते. दलितांच्या यातना दलित कादंबरीने टिपल्या आहेत. तसेच या कादंबरीने प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची भूमिका घेतली आहे. हा संघर्ष चातुर्वर्ण्य व्यवस्थेने लादलेल्या गुलामगिरीच्या विरोधातील आहेत. हा संघर्ष मानव्यतेसाठी आहे. तर ग्रामीण कादंबरीतून ग्रामीण जीवनाची दाहकता स्पष्ट होते. ग्रामीण कादंबरीतून शेती, शेतकरी, तसेच त्या संबंधाने येणारे कारू–नारू यांचे चित्रण रेखाटले आहे. यामधून येणारा संघर्ष सावकार शेतकरी, शेतमालक, शेतमजूर असा आहे. तसेच गावावर वर्चस्व असावे या हेतूने कार्यरत असणारे सरपंच पाटील यांच्याही मनोवृत्तीचे रेखाटन ग्रामीण कादंबरी करते. निसर्गावर आधारित ग्रामजीवनशैली यातून येते, तशी निसर्गकोपातून जीवनाची होणारी होरपळही चित्रित होते.

दलितोद्धाराचे ध्येय बाळगणाऱ्या दलित कादंबरीने दलित अस्मिता जागृत करण्याचे काम केले आहे. दलित कादंबरी दलित जीवनाचे वास्तव चित्रण रेखाटते. सामाजिक बांधिलकी, मानव्यता, विधायक परिवर्तन यांना ही कादंबरी केंद्रवर्ती ठेवते. प्रस्थापित व्यवस्थेने दलित समाजाला गुलामगिरीच्या जोखडात बांधले होते. सर्वच क्षेत्रातील उपेक्षितेने हा समाज मुका झाला होता. या जोखड्याला झुगारून लावण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिली. या जोखडाच्या यातनांतून मुक्त होण्यासाठी दलित समाज विद्रोह करू लागला. हा विद्रोह मानव्यतेसाठी होता. याचे प्रत्ययकारी चित्रण दलित कादंबरीतून होताना दिसते.

मराठीतील दलित कादंबरीतून जगण्याची होरपळ येते. दलित जगणे आत्यंतिक वेदनेने भरलेले आहे. आजची तरी समाजमने बदलली आहेत का? असा अंतर्मुख करायला लावणारा प्रश्न ही कादंबरी विचारते.

दलितांच्या यातनामयतेचे, अपमानित जिण्याचे चित्रण अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल यांच्या कादंबऱ्या करतात. बाबुराव बागुलांच्या 'अघोरीतून' दलितांच्या शोषणाचे चित्रण येते, तर 'सूड' मधून पुरुषांच्या विकृत मानसिकतेने स्त्रीच्या जीवनाची होणारी अवहेलना चित्रित होते. ज.वि.पवारांच्या 'बलिदान' मधून सामाजिक वर्चस्वाच्या मानसिकतेने दलितांचे बळी कसे घेतले जातात याचे चित्रण येते. केशव मेश्राम यांच्या 'हकिकत आणि जटायू' मधील हकिकतमधून दलितांच्या वेदना चित्रित होतात. तर जटायूमधून अत्याचाराविरुद्ध लढणारा नायक (अभिमान) येतो. भीमसेन देठे यांची 'इस्कोट', नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा', सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र' या कादंबऱ्याही दलितांच्या आदिम व्यथा रेखाटतात. या यातनामय जीवनाचे चित्रण करण्याबरोबरच हे गुलामगिरीचे जोखड झुगारून देण्यासाठी या कादंबरीतील नायक विद्रोहाची भूमिका घेताना दिसतात. हा विद्रोह, सामाजिक विषमतेविरुद्ध आहे. अस्पृश्यता, अवहेलना या विरोधात आहे. हा विद्रोह विधायक परिवर्तनासाठी आहे. नवसमाजनिर्मितीसाठी आहे.

ग्रामसंस्कृतीचे चित्रण करणारी म्हणून ग्रामीण कादंबरीचे विशेष लक्षात घ्यावे लागतात. कृषिकेंद्रित, निसर्गसन्मुख, आदिमतेशी संवाद साधू पाहणारी स्वतंत्र अशी व्यवस्था म्हणून ग्रामव्यवस्थेकडे पहावे लागते.

ग्रामीण साहित्याची १९२५ पासून जाणीवपूर्वक निर्मिती होऊ लागली आहे. म.फुले, कृष्णराव भालेकर, धनुर्धारी यांचे लेखन ग्रामीण साहित्याच्या प्रारंभीचे आविष्कार आहेत. 'गांधीवाद' ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

ग्रामव्यवस्थेत शेतकरी, कारू, नारू हे महत्त्वाचे घटक आहेत. या घटकांना ग्रामीण कादंबरीने केंद्रवर्ती ठेवले आहे. कृष्णराव भालेकर यांच्या 'बळीबा पाटील' या कादंबरीतून १८७७ च्या सुमारास पडलेला दुष्काळ चित्रित झाला आहे. तसेच या कादंबरीतून समाजातील दांभिकता, पिळवणूक यावर प्रकाश पडतो. धनुर्धारी यांच्या 'पिराजी पाटील' मधून कुणब्याचे, बहुजन समाजाचे प्रत्ययकारी चित्रण येते.

शंकर पाटील यांच्या 'टारफुला' या कादंबरीतून ग्रामव्यवस्था चित्रित

करण्याचा प्रयत्न केला आहे. कृषिजीवनाशी निगडित समाजव्यवस्था विकसित झाल्याचे दिसून येते. तसेच निसर्गावर आधारित, बहुतांशी पावसावर आधारीत ग्रामजीवन ग्रामीण कादंबरीतून येते. आनंद यादवांची 'गोतावळा' ही कादंबरी नारबाची मनोवस्था चित्रित करते. एक-एक प्राणी सोडून जात असताना त्याच्या मनाला होणाऱ्या यातना या कादंबरीतून येतात. तसेच ग्रामीण समाजव्यवस्था चित्रित होते. त्याबरोबरच जातीव्यवस्थेचे ही चित्रण येते. व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' ग्रामीण जीवनातील दाहक वास्तवतेला स्पर्श करते. या कादंबरीतील ग्रामजीवन निसर्गाशी, मातीशी बांधलेले आहे असे दिसते. उद्धव शेळके यांच्या 'धग' या कादंबरीतून शिंपी कुटुंबातील ताणतणावाचे चित्रण येते.

ग्रामीण भागात बार्टर सिस्टिम (वस्तुविनिमय पद्धत) अस्तित्वात होती. त्यामुळे प्रत्येक घटक ऐकमेकांशी बांधला गेला होता. त्याचे व्यवहार सौहार्दपूर्ण होते. ग्रामीणतेची नाळ शेतीशी आहे. मात्र कालपरत्त्वे ग्रामीण जीवनामध्ये फारच बदल झाल्याचे जाणवते.

**समारोपः-**

ग्रामीण कादंबरी ग्रामीण जीवनाचे चित्रण रेखाटते. तर दलित कादंबरी दलित अवस्थेचे चित्रण करते. ग्रामीण कादंबरीने ग्रामजीवन (शेती, ग्रामव्यवस्था) व्यवस्था मांडली आहे. तर दलित कादंबरीने दलित अवस्था बदलविण्याचा प्रयत्न केला आहे. या निर्मितीमागे अन्यायकारी व्यवस्था झुगारून लावण्याची मानसिकता आहे. ग्रामीण कादंबरी शेती, शेतीशी संलग्नित कारू नारू यांचे चित्रण करते. दलित कादंबरी फक्त दलित जीवनाचे चित्रण करण्यासाठी नाही, तर विधायक परिवर्तनासाठी प्रयत्नशील आहे. ग्रामीणं कादंबरीत दलित जीवनाचे चित्रण येते, ते त्या व्यवस्थेचा भाग म्हणून. दलित कादंबरीत दलित जीवन येते तद्वतच शहरी जीवनही येते. ग्रामीण कादंबरीतून शेतकरी, शेतमजूर, यांचे यातनामय जीवन येते ते व्यवस्थेचा परिपाक म्हणून. दलित कादंबरीतून दलितांची यातना येते ती प्रस्थापितांनी लादलेल्या परिस्थितीची वास्तवता म्हणून. ग्रामीण कादंबरीची निर्मिती ही मर्यादित स्वरूपाच्या रूपबंधात येते. दलित कादंबरीचा परीज्ञ व्यांपक आहे. ग्रामीण कादंबरी ग्राम जीवनाचे तसेच बदलाचे चित्रण रेखाटते, मात्र परिवर्तनार्थ नवविचार मांडताना दिसत नाही. दलित कादंबरी मात्र विधायक परिवर्तनासाठी, मानव्यतेसाठी नवविचार मांडताना दिसते. ★★★

# दलित – ग्रामीण कांदबरीतील बदलत्या प्रवृत्ती

**प्रा.राजरत्न किशाराव दवणे**

मराठी साहित्याच्या प्रवाह महानुभाव साहित्याचे संस्कृत साहित्य परंपरेशी केलेल्या बंडखोरी पासून तो आजवर अखंडपणे प्रवाहित आहे. या मराठी साहित्य प्रवाहाचे काळानुरूप अनेक वळणे घेतली, त्यात स्वातंत्र्यानंतरच्या कालखंड अनेकदृष्टया महत्त्वपूर्ण ठरतो. या काळात साहित्याचे अनुभवक्षेत्र व्यापक झाले. वास्तवाची विविध रूपे साहित्यात अवतरू लागले. परंपारिक साहित्य चौकटीला नेद देण 'सामाजिकता चे सांस्कृतिक संबंधाशी बांधलेले आहे.' या सामाजिकतेला जागे कर. याचा प्रयत्न साहित्य करू लागले. यादृष्टीने १९६० हा कालखंड महत्त्वाचा ठरतो. येथे साहित्य (दलित, ग्रामीण, स्त्रीवादी) 'विशेषण' घेण अभिव्यत होताना दिसते. विशेषामुळे साहित्याची दृष्टी आणि सृष्टी बदलालची. साहित्यात दलित–ग्रामीण–स्त्रीवादी या विशेषणांनी स्वत:चे वेगळे अस्तित्त्व सिद्ध करत मराठी साहित्य अधिक व्यापक केले. खरे तर साहित्याला विशेषणांची गरज का भासते? या बाबत श्रीराम गुंदेकर यांचे मत महत्त्वाचे वाटते ते म्हणतात, 'साहित्याला जेव्हा विशेषणांची आवश्यकता निर्माण होते तेव्हा त्याला प्रस्थापित साहित्यातून फुटून निघायचे असते. व्यवस्थेने निर्माण केलेल्या कटिबद्ध कोंडीतून बाहेर पडायचे असते, मुक्त व्हायचे असते, त्याला स्वत:ची 'ओळख' शोधायची असते, त्यासाठी वारूला त्या प्रकारचा संघर्ष द्यायची त्याची तयारी असते. 'म्हणजेच जेव्हा जेव्हा समाज– संस्कृतीत एक सामाजिक – राजकीय – सांस्कृतिक – वैचाारिक साजालोपण प्रखरतेने जाणवते तेव्हा तेव्हा अशा विशेषणांची अनुभूती वाङ्मयेतिहासात मिळते. संतानी संस्कृत साहित्य परंपरेशी केलेला विद्रोह व लोकभाषेत केलेली रचाना याबाबात ओरड झाली, प्रस्थापितानी बोंब केली पज 'संत' ही वेगळी ओळख साहित्याला द्यावीच लागली. म.फुले, केशवसुत, मर्ढेकर यांच्या बंडखोरीला देखील वेगळी 'विशेषण' दिल्याशिवाय त्या त्या वाङ्मयीन प्रकृतीचा बोध व शोध घेता येत नाही. आज दलित–ग्रामीण साहित्याने स्वत:ची ओखळ सिद्ध करून प्रस्थापित साहित्याचा चेहरा–मोहराच बदलावून टाकला व साहित्यातील आभिछा, अनोखे अनुभव विश्व साहित्यात साकार स्वत:च्या मानवतावादी साहित्याचे मापदंड– आराखडे निश्चित केले. म्हणूनच

आजवर 'साहित्य हा समाजाचा आरसा असतो' असे म्हणताना येथे समाजाच्या प्रतिबिबांतून साहित्य व साहित्यातून समाज परिवर्तनाची अपेक्षा लक्षात घेता ही अपेक्षा पूर्ण होताना जाणवत नव्हती, ती जाणीव दलित-ग्रामीण साहित्यातून तीव्रतेने पहिल्यांदा जाणवते असे म्हटलेतर वावगे ठरू नये. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने दलित-ग्रामीण कादंबरीने महत्त्वाचे योगदान देत आहे.

कादंबरी वाङ्मयाचा पट मोठा आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी म्हणून काही ठळक बदलत्या वृत्ती-प्रवृत्तीच्या नोंदी नोंदविण्याचा प्रयत्न येथे केला आहे. तसा ग्रामीण जाणीव कांदबरीतून अभिव्यक्त होणारा कालखंड १८५७ पर्यंत मागे ठेपविता येतो असे असले तरी दलित-ग्रामीण कादंबरीच्या दृष्टीने १९६० ते २००५ पर्यंत आशय-अभिव्यतीच्या जाणिवतेत अनेक बदल होत गेली या बदलत्या वृत्ती-प्रवृत्तीची चर्चा व ग्रामीण-दलित कादंबरीतील प्रवाहाच्या अनुबंधात्मकतेच्या साधर्म्य-वैधर्म्याच्या नोंदी पुढील प्रमाणे नोंदविता येतील. साधारणत: १९६० नंतर भारतीय जीवनात अनेक बदल होऊ लागले महानगरांचा अतिशय वेगाने विकास होऊ लागला. नागर संस्कृतीचा ग्राम संस्कृतीवर प्रतिकूल परिणाम झाला. ग्रामव्यवस्थेकडून नागरसंस्कृतीचे अंधानुकरण सुरू झाले. यामुळे ग्रामव्यवस्था खिळखिळी होऊन अनेक विविध प्रकारचे ताणतणाव जन्माला येऊ लागले. यंत्रयुगाने खेड्यात प्रवेश केला, ग्रामविकासाची धोरणे आली आणि ग्रामीण भागात विस्थपितांचा प्रश्न समोर आला. शोषणाचे स्वरूप बदलले. राजकारणाने शिरकाव केल्यामुळे तुटत जाणारे मानवी संबंध, जातीय संघर्ष या साऱ्या आशय-विषयाचे वास्तवदर्शी चित्रण ग्रामीण कादंबरीत अवतरले. शंकर पाटील 'टारफुला'(१९६४), हमीद दलावाई 'इंधा' (१९६५), मनोहर तल्हार 'माणूस', (१९६४) रा.रं.बोराडे 'पाचोळा' (१९७१), आनंद यादव 'गोतावळा' (१९७१), ना.धो. महानोर, 'गांधारी' (१९७३), जयवंत दळवी, 'सारे प्रवासी घडीचे' आदी कादंबऱ्यातून वास्तव चित्रण होताना प्रकर्षाने जाणवते. बदलत्या ग्रामीण जीवनाचे, संरजामी व्यवस्थेचे चित्रण 'टारफुलात' व्यक्त होते. स्वातंत्र्योत्तर काळातील वास्तवाची आणि जातीय संघर्षाची, हिंदू-मुस्लीम संघर्षाची, कोकणातील ग्रामीण जीवनावर या संघर्षाच्या झालेल्या परिणामाची पार्श्वभूमी 'इधा' मध्ये प्रकटते. यंत्र युग, महानगराचा विकास, यातून रोजगाराच्या शोधात फिरत जाणारा ग्राम, हरवत जाणारी ग्राम संस्कृती, विसरलेले माणूसपण असा संघर्ष 'माणूस' मध्ये चित्रित होते, तर तंत्रज्ञानाने पारंपरिक गावगाड्यावर येणारे

अरिष्ट, फॅशनमुळे झालेले बदल 'पाचोळा', यंत्र युगाने ग्राम संस्कृतीतील तुटत जाणारा गोतावळा 'गोतावळा' कादंबरीत येते. संपूर्ण खेडे व त्याचे बदलाचे रूप, सामाजिक, राजकीय, मानसिक विधपैलून 'गांधारीत' अभिव्यक्त होते. याकाळातील ग्रामीण कादंबरी वास्तवाचे सूक्ष्म चित्रण करताना दिसते त्यामुळे वास्तवाभिमूख प्रवृत्तीचे दर्शन येथे दिसून येते. कांदबरीचे मनोरंजन, गुता, रूकणी बदल या जाणिवा झूजाला दिल्या. वास्तव व्यक्त करणे ही साहित्य जाणीव धारण केली व 'वास्तवाचे' चित्रण करणारी कादंबरी म्हणून नवे आयाम तिने स्वीकारले. ही कादंबरी केवळ आशय-विषयाचे नवे प्रयोग करीत नव्हती तर अभिव्यक्तीतही तिने अस्सल ग्रामीण बोली भाषा (निवेदनात) वापर ग्रामीण साहित्याला नवे परिमाण मिळवून दिले.

स्वातंत्र्यानंतरचे ग्रामीण जीवनात झालेले बदल १९८० नंतर अधिक तीव्रतेने जाणवू लागले. दलित साहित्याच्या एक तपानंतर १९७५ साली 'ग्रामीण साहित्याची चळवळ' उदयास आली. १९७२ चा दुष्काळ अस्वस्थ करणारा होता. सामान्य शेतकरी, शेतमजूर, गावगाड्यातील उद्योग, श्रमजीवी कष्टकरी माणसांची होणारी ससेहोलपट, सरकारी योजनांचे अमिष दाखवून ग्रामीण माणसाची होणारी फसवणूक हे सारे बहुजन समाजात, नि मस्तरात जमलेला संवेदनशील, सर्जनशील तरुण लेखक हे सर्व नुसतेच पाहात नव्हता तर कमी अधिक प्रमाणात टिपत होता. दलित साहित्यात अवतरणाऱ्या जाणिवा पाहत होता. या निरीक्षणातून ग्रामीण कादंबरीकारांनी शोषित, दु:खभोगी माणसाच्या जीवनाचे चित्रण करणेचा नाही तर त्यावर एक भूमिकेने घेणं अभिव्यक्त कर. याचे निश्चित केले या भूमिकेमुळे कादंबरी लेखनात महत्वाचा बदल झाला. चित्रणाची कादंबरी शोधकाची भूमिका घेऊ लागली. विशिष्ट वास्तव व्यक्त करतांना त्या वास्तवा मागे कोणती कारणे आहेत याचा विचार करू लागला. येथे शोधकाची प्रवृत्ती कादंबरीत दिसून येते.

धर्म आणि धर्मसंस्था यातून मानवी जीवनाचे शोषण या पार्श्वभूमीवर 'चौंडक', 'भंडारभोग' राजन गवस, 'झुलवा' उत्तम तुपे या कादंबऱ्या दिसून येतात. धर्माच्या नावे होणारे स्त्रियाचे शोषण विशेषत: खालच्या जमातीच्या स्तरांच्या मानल्या जाणाऱ्या लोकांवर होणाऱ्या परिणामांची चित्रणे येथे दिसतात. अशोक व्हटकर यांची 'बगाड' (१९८४) ही कांदबरी या दृष्टीने लक्षणीय ठरते. तसेच अशोकरावांची 'मेलेल पाणी' (१९८२) ही कादंबरी दलित बहुजन

समाजातील संघर्षाचे शोषितपणाचे, दुःख-दैन्याचे चित्रण करते. येथे ग्रामीण कादंबरी विषमतावादी भूमिका घेताना दिसते. स्वातंत्र्य मिळालो पण सावकारी फासातून शेतकरी मृत झालाच नाही. अशा समग्र ग्रामीण शेतमजुराचे प्रातिनिधिक जीवनाची कैफियत बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' (१९८५) 'पखाल' (१९९५) मध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लोकशाहीतील विकृतीने शोधलेल्या वाटा-पळवाटा, देखावा वा वास्तव यात सामान्य ग्रामीण माणसाची, शेतकऱ्याची-मजुराची होणारी कोंडी, नेत्यांकडून होणारे शोषण याचे प्रत्ययकारी शोधकदृष्टीने घेतलेला वेध 'मेड इन इंडिया' पुरुषोत्तम बोरकर, 'कळप', 'धिंगाणा', राजन गवस, 'आ.सौभाग्यवती' रा.रं.बोराडे, विश्वास पाटीला 'पांगिरा' आदी कादंबरीत दिसून येते. या कादंबरीत राजकीय शेतीकडे, लोकशाहीकडे एक मूल्यात्मकदृष्टीने पहाण्याचा प्रयत्न दिसून येतो. तसेच विकास योजनेत विस्थापित झालेले ग्रामीण जग विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडतीत' प्रशांति होते तर सहकार क्षेत्रातील वृत्ती प्रवृत्तीचा शोध वासुदेव मुलाटेंच्या 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९) या कादंबरीत दिसून येतो. नस तोड कामगारांच्या जाणिवा नव्याने सरदार जाधवांची 'कोयता', बा.ग.केसकर 'कुणाच्या खांद्यावर' या कादंबरीत अभिव्यत होतात. दलित-सवर्ण-गावगाडा असा संघर्ष राजन गवस यांच्या 'तणकट', विजय सिरसाट 'काळगर्भ' यात अभिव्यक्त होतात. कलावंताचे दुःख, ग्रामीण लोककलांचे घर असलेल्या तमाशा चे चित्रण आनंद यादवाच्या 'नटरंग' मध्ये व्यक्त होते. तसेच 'झोंबी, घरभिंती, नांगरणी आणि काचापाणी' या यादवाच्या आत्मचारित्रात्मक कादंबऱ्या तर 'सूर्य संत तुकाराम' विअला वाघ 'डेबू', मधुकर केजणे 'मोती ज्याच्या पोटी' आदी चारित्रात्मक कादंबऱ्या निर्माण झाल्या. येथे हेच सांगावयाचे आहे की, ग्रामीण कादंबरीने आपल्या संभ्रमित असलेल्या भूमिका या काळात अधिक स्पष्ट कर ग्रामीण जीवानातील समग्र आशय विषयाला शोधातून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या पिनीतील लेखकांची शोधकाची भूमिका घेतलेली दिसत असली तरीही सामाजिक परिवर्तनांसाठी स्वीकारलेली फुले-शाहू-आंबेडकर विचारधारा सक्षमपणे व ठाम भूमिका घेऊन व्यक्त करतांना दिसत नाहीत.

दलित साहित्याची परंपरा ही परिवर्तनवादाची मानवतावादाची आहे. दलित साहित्याने स्वीकारलेल्या गणराज्य मूल्यस्तंभाची अभिव्यक्ती तो साहित्यातून करतो. म्हणून दलित साहित्य हे केवळ साहित्य नव्हे तर ती एक चळवळ आहे.

दलित साहित्याने आपले वेगळेपण सिद्ध केले ते 'आत्मकथा' आणि 'कविता' या वाङ्मय प्रकारातून 'कथा' वाङ्मय प्रकाराला ही तो सक्षमतेने हाताळताना दिसतो. पण कादंबरी वाङ्मय प्रकाराला दलित साहित्याचे भरीव लेखन दिलेले दिसून येत नाही. आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भातील दलित कादंबरीचे वेगळेपण चटकन नजरेत भरणारे आहे. परंतु कथा-कविता व आत्मकथनाच्या मानाने दलित कादंबरीचीच वाटते. गुणात्मकदृष्टया हे खरे जरी वाटत असले तरी संख्यात्मकदृष्टीने पाहता जवळ जवळ ८०-९० कादंबऱ्या वेगवेगळ्या दलित जीवन जगणाऱ्या समाज स्तरातील जाणिवांवर अभिव्यक्त होताना दिसतात. येथे विवेचनाच्या दृष्टीने ग्रामीण कादंबरीसारख्या प्रवृत्तीचा सूक्ष्म आलेख देता येणार नाही; पण 'चित्रणाची दलित कादंबरी', 'सहानुभूतीतून निर्माण झालेली कादंबरी' व 'बदलत्या जगाचे सशक्त शोध-बोध व्यक्त करणारी कादंबरी' अशादृष्टीने विवेचन करता येईल.

दलित जाणीव व्यक्त होणाऱ्या कादंबऱ्यांचा विचार करता श्रीपाद कोल्हटकरांची 'शामसुंदर', वि.स. खांडेकरांची 'दोन ध्रुव', 'दोन मने', मांडखोलकर 'चंदनवाडी', विभावरी शिरूरकर 'बळी' आदी कादंबऱ्या दिसून येतात. हे सहजाणिवेतून, संवेदनशीलतेने चित्रण केले असावे. कादंबरीला दलित जाणिवांचा आशय देण कादंबरीला वेगळेपण देण्यासाठी भामटेपणातून केलेली चित्रणे दिसून येतात. १९६० नंतर आत्मभान आत्मशोध घेऊन सम्यक क्रांतीसाठी विद्रोहाची भूमिका घेऊन सनातनी परंपरेला नाकारणारी दलित कादंबरी अस्सलपणे अभिव्यक्त होवू लागली. सुरुवातीचा कालखंड ग्रामीण कादंबरी प्रमाणेच चित्रणाचा असल्याचे जाणवते. येथे एक लक्षात घेणे गरजेचे आहे की दलित कादंबरीत चित्रित होणारा समाज' ग्रामसंस्कृतीचे' दर्शन घडवते. ग्रामीणत्वाचे विश्लेषण करते मग ग्रामीण कांदबरीत त्याचा समावेश का नको? असा प्रश्न पडतो. ग्रामीण जीवन व्यवस्था चातुर्वर्ण आहे. त्यात असलेल्या गावगाड्याच्या संस्कृतीनेच माणसात भेद केला आहे. तेव्हा मानवीमूल्य जोपासणारी दलित कादंबरी हे नाकारते या भूमिकेमुळेच ती ग्रामीण कांदबरीपेक्षा वेगळी ठरते.

दलित साहित्याच्या दृष्टीने कादंबरी वाङ्मयप्रकार अण्णाभाऊ साठे यांनी प्रथम हाताळला. अण्णाभाऊ साठे यांच्या 'माकडीचा माळ', 'वैजयंता', 'वारणेचा वाघ', 'चित्रा', 'अलगुच', 'चांदा' आदी कादंबऱ्या अभिव्यक्त झाल्या. या कादंबऱ्या रंजनवादी स्वरूपाच्या तर वास्तवत व भूमिका घेणारी त्यांची

'फकिरा' ही कादंबरी दिसून येते. तसेच शंकरराव खरात यांनी 'हातभट्टी', 'गावचा पारधी', 'धोतरा', 'हाक' इ. कादंबऱ्यातून अठरापगड जातीचे आठराविश्व दारिद्र्य, भ्रष्टाचार, बेइमानी, जातीयता, विषमता यात भरडला जाणारा माणूस चित्रित केला आहे. या कादंबऱ्या चित्रणाच्या, रंजनाच्या बंधातून अभिव्यक्त होताना दिसतात.

दलित कादंबरीचे वेगळेपण सिद्ध करणारा घटक म्हणजे 'विद्रोह' गावगाड्यामध्ये जगत असताना दलितांच्या वाट्याला केवळ अपमान छळ, अत्याचार आणि पिळवणूकच आलेली आहे. सामाजिक अन्याय, जुलूम, भेदाभेद, सामाजिक आर्थिक शोषण, नाकारलेले माणूसपण या विरोधात तो नव्या समाजाची रचना करू पाहतो आहे. जगण्यात आलेले भोगणे विदारक आहे हे भीमसेन देठे 'इस्कोट', भि.शि. शिंदे यांची 'अमृतनाक', 'रायनाक', व्ही. गो. बनसोडे 'मुक्तिसंग्राम', माधव कोंडविलकराची 'अजून उजडायचे आहे' 'छेद', 'निर्मल', 'वेध', 'अनाथ', बा.स. हाटे यांची 'युगविधान', 'युगात', अशोक व्हटकर 'मेलेलं पाणी', नामदेव ढसाळांची 'हाडकी हाडवळा', मुरलीधर जाधव यांची 'कार्यकर्ता', बळवंत कांबळे 'शापित', योगेंद्र मेश्राम 'माझा गाव कुठंय', ज. वि. पवार 'बलिदान' या कादंबऱ्या विद्रोहाला विद्ध्वंसतेचे रूप न देता सर्जनशीलतेचे रूप देतात. एकूणच दलित कादंबरी शोधक-बोधक ते मानवी मूल्य पेरणाऱ्या कादंबरीची निर्मिती करते म्हणून सर्जन, सम्यक समाज निर्मितीच्या प्रवृत्तीला ही कादंबरी म्हणता येईल. या दलित कादंबऱ्यांनी 'कादंबरीचा रचनातंत्र' हाताळला आहे का? या प्रश्नाला ती झुगारते व स्वत:चे वेगळे सौंदर्यशास्त्र मांडतानाही ती दिसते. त्यामुळे मराठी कादंबरीला वेगळे आयाम मिळते.

दलित कादंबरीत आपल्या प्रेरणा स्थानावर प्रचंड निष्ठेतून चारित्रात्मक कादंबरी निर्माण झालेली दिसते. बंधुमाधव 'रमाई', ब.स.हाटे 'युगंधर', हरिभाऊ पगारे 'युगप्रवर्तक', 'झुंजार' यशवंत मनोहर यांच्या 'मी सावित्री', 'मी यशोधरा', 'यमाई' आदी चारित्रात्मक कादंबऱ्यांनी दलित साहित्य प्रेरणांना नव्यापिढी समोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

या कालखंडात कादंबरी लेखन करणारे ना.ब.जाधव 'डॉ.अजान', 'राजनभाऊ', 'सुटका', अ.श्री.लोखंडे 'निष्ठा', निशिकांत शेंडे 'काजळी रात्र', 'तांबडा दगड' आदी कादंबरीकार साठेंच्या रंजनवादी भूमिकेला आजही स्वीकारताना दिसतात. तर सुखदेव ढाणके यांची 'जोडा', नामदेव कांबळे - राघववेळ',

'सावली', बळवंत कांबळे यांची 'शापित', श्रीराम दुर्गे यांची 'घडई', 'चौथीक्रांती' या कांदबऱ्या नव्या जाणिवेने अभिव्यक्त होतात. जागतिकीकरणाचा प्रभाव दलित कविता-कथेत जसा व्यक्त झाला तो संख्येने कमी पण समर्थपणे सिद्धार्थ रामटेके 'भारत सैला होताना', जी.के.ऐनापुरे, 'अभिसरण' व एकनाथ साळवे यांच्या 'एनकांन्ट्य' या कादंबरीत व्यक्त होतो.

दलित साहित्याला मिळालेले वेगळे अस्तित्त्व, चर्चा, त्यातील मूल्यात्मकता लक्षात घेता या साहित्यात व्यक्त होणाऱ्या जीवन जाणिवा दलित्तेतर लेखकानी वेधकपणे मांडल्या आहेत. मधु मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फुल' सदा कुरूहाडे 'अस्पृश्याची डायरी', 'गावकुसाबाहेरची वस्ती' या कांदबऱ्या महत्त्वाच्या आहेत. परंतु लेखकाची वैचारीक भूमिका लेखनातून व्यक्त होत असते. तेव्हा कर्णिक, 'कुरूहाडे' यांच्या कादंबरीतून व्यक्त होणारा हा सह्यनुभव बेगड सहानुभूती व्यक्त करतो की स्वत:च्या व्यक्तिमहात्म्यतेचे प्रयोग करते; हे संभ्रमित आहे.

दलित- ग्रामीण कादंबरी अनुबंध शोधत असताना हे लक्षात घेतले पाहिजे की, 'विशिष्ट जीवन-जाणिवांची प्रवृत्त होण जेव्हा आशय-अभिव्यक्तीचे प्रयोग करणाऱ्या कलाकृतीची साखळी निर्माण होते तेव्हा प्रवाह निर्माण होतात. 'हे प्रवाह दलित-ग्रामीण साहित्याबाबत स्पष्टपणे दिसून येतात. या प्रवाहातील कादंबरीलेखन विशिष्ट जीवन जाणीव घेऊन व्यक्त होतात. या जाणिवा प्रवाहाच्या सशक्ततेबरोबर अधिक गडद होत जातात आणि आपले वेगळे अस्तित्व सिद्ध करतात. तेव्हा ग्रामीण-दलित प्रवाह एकाच वाङ्मयीन कालखंडात निर्माण झाले असले तरी त्यांच्या निर्मितीत अभिव्यक्तीत स्वतंत्रता आहे. ही स्वतंत्रता सामाजिकदृष्टया, स्वीकारलेल्या विचार तत्त्वांच्यादृष्टया, सांस्कृतिकदृष्टया आत्मसात केलेल्या मासिकतेतून अभिव्यक्त होतात आणि या सर्व घटकांची रुजवण दलित-ग्रामीण प्रवाहात दिसून येते. या दोन प्रवाहाच्या मुळाशी म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत. तरीही दोन वेगळेप्रवाह 'मानवतेचा' विचार स्वतंत्र दिशेने व्यक्त करतात? याचे उत्तरही कादंबरी वाङ्मय प्रकाराच्या सहाय्याने उलघडता येते. या उलघडयात काही साधर्म्य - वैधर्म्याचा विचार करता येतो. या नोंदी पुढीलप्रमाणे -

१९६० नंतर दलित साहित्य प्रवाह निर्माण झाला. दलित चळवळ, आंबेडकरांनी जीवनाचा मुक्तीमार्ग म्हणून दिलेला 'धम्म' व माणूस असल्याची

ओळख. यातून आजवर दाबला गेलेला दलित वर्ग आत्मभानाने उफाळून वर आला पण ही उफाळी अस्थाव्यस्त मानसिकतेतून, वैचारिकतेतून होती तर त्याची दिशा ठरलेली होती. त्यामुळे केवळ चित्रण करणे, दुःखाचे प्रदर्शन करणे हे दलित साहित्याला माय नव्हते. हा प्रवाह विचार पेरण्याचा प्रयत्न करताना दिसतो. तर ग्रामीण जीवन व्यक्त करणारी प्रवृत्ती १९२० पासून कादंबरीत दिसून येते. यात महात्मा गांधी यांच्या 'खेड्याकडे चला' या उपदेशाने शिक्षित अनुयायी व शह्री अनुयायी 'थुंकी सफाई सारखे' ग्रामीण जीवन कादंबरीत व्यक्त करू लागला. तसेच स्वातंत्र कालखंडात रूची पालाट, विनोद, प्रादेशिक रंजनता, गुता निर्माण करणारे कादंबरी लेखकही झाले. त्यामुळे ग्रामीण कादंबरी लेखक उद्रेकाने नव्हे तर सौम्य पद्धतीने लेखन करू लागलेला दिसतो. त्यामुळे १९६७ ते १९८० पर्यंत कादंबरी लेखनात चित्रणाची भूमिका लेखक घेताना दिसतो तर परंपरा नसलेले दलित कादंबरीकार दुःख वेदनेच्या मूळ गाभ्याला हात घालतो व वास्तवाचे चित्रण करीत विचार पेरतो.

ही अवस्था ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा संभ्रमात असल्याचे मत यशवंत मनोह्य व्यक्त करतात. महात्मा फुले यांची प्रेरणा ग्रामीण साहित्यिकांनी प्रारंभी काही ग्रंथातून आलेल्या विचारापूरतीच घेतली. उदा. 'शेतकऱ्याचा असूड' परंतु ग्रामीण कादंबरीच्या लेखकांनी समग्र फुल्यांच्या लेखनाचा संविधनात्मक विचार स्वीकारला असता तर ग्रामीण कादंबरी लेखनात विशिष्ट निष्ठा व जीवनाती वास्तव परिवर्तनासाठी अभिव्यक्त करता आले असते. दलित कादंबरी संख्यात्मकदृष्ट्या अलग असली तरी मूल्यात्मकता व तत्त्वाची, विचाराची सैद्धांतिक बैठक येथे अभिव्यक्त होते.

ग्रामीण-दलित कादंबरीत व्यक्त होणारे केंद्रस्थान 'खेडे' किंवा 'ग्राम' आहे. तसेच दलित ग्रामीण प्रवाहांचे दीनदुबळ्या, माणूसपण ह्यवलेल्या माणसांचे दुःख, दैन्य, शोषण थांबविण्यासाठी व मानवता रुजविण्यासाठीचा उद्देश दिसतो. असे असले तरीही या प्रवाहांची ग्रामसंस्कृतीचे वेगवेगळी चित्रणे मांडली. दलित कांदबरीने गावगाडा नाकारला कारण ग्रामीण संस्कृतीचे दलितांना गुलामांच्या चौकटीत बंदिस्त केले, अवहेलना, अपमान जातीच्या पोलादी साखळदंडाने जगणे असह्य केले, माणूसपण नाकरले म्हणून ग्रामसंस्कृतीला विरोध, बंड व्यक्त करणारे आशय विषय दलित कादंबरी हाताळते व आधुनिक विचारधारा स्वीकारते तर ग्रामीण कादंबरीने ढासळत जाणारी ग्रामसंस्कृती, आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे

उद्ध्वस्त होत जाणारे गाव व ग्रामीण संस्कृतीचे महत्त्व टिकविण्यासाठीचे चित्रण ग्रामीण कांदबरी समर्थपणे चित्रित करताना दिसून येते.

दलित कादंबरीत बंडखोर प्रवृत्ती, विद्रोही नायक दिसून येतो तर ग्रामीण कादंबरीतला नायक हतबल, परिस्थितीला शरण जाणारा दिसून येतो. त्याचे कारणही संस्कृतीत व विचारधारेत दिसते. गावाच्या बाहेर अस्पृश्य, पशुवत जगणारा समाज माणूसपणासाठी गावाच्या बाहेर गावसमूहात शिरण्यासाठी, मानवतेसाठी, माणसासारखे जगण्यासाठी संघर्ष करताना दिसतो. म्हणून तो अधिक बंडखोर वाटतो तर ग्रामीण कादंबरीतला नायक स्पृश्य आहे. गावगाडयात त्याला समान आहे. माणूस म्हणून सन्मानाने जगता येते. समाजपयोगी व्यवहार करता येतो. त्याचे दु:ख कधी निसर्गाने तर कधी उच्चवर्णीय प्रवृत्तीने केलेल्या शोषणात व आधुनिकीकरणामुळे येणाऱ्या ग्रामसंस्कृती वरच्या अरिष्टामुळे आहे. तेव्हा आपल्याच माणसाशी, गावगाडयाशी तो संघर्ष करीत नाही तर तो परिस्थितीला शरण जाताना दिसतो.

१९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरी जीवनवास्तव, त्या वास्तवमार्गाला कारणे सामाजिक, राजकीय, सहकार क्षेत्रातील वृत्ती, प्रवृत्तीचे चित्रण करताना दिसते. जातव्यवस्था, देव-देवस्की, संस्कृतीतील श्रद्धा, अंधश्रद्धा यांचे वास्तव रूप व त्यावर बंडखोर भूमिका घेताना दिसून येते. या काळात नव्या पिढीने स्वीकारलेली फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा कादंबरीत व्यापक वैचारिकतेने व्यक्त होताना दिसते. 'कळप', 'भंडारभोग', 'चौंडक, 'तणकट', 'विषवृक्षाच्या मुळ्या 'आदी कादंबऱ्या हे चित्रण स्पष्टपणे व्यक्त करतात. तर या कादंबरीतला नायक विचारप्रवण, बंडखोर होतानाही दिसतो. तेव्हा दलित कादंबरी ग्रामीण जीवनाचे चित्रण करीत होती ती याकाळात ग्रामीण कादंबरीच्या समांतर असलेली दिसून येते. तसेच दलित कादंबरीत दलितांच्या आंतरविरोधाचे व्यापक विश्लेषण 'कोंडीत' दिसते. तर धर्मांतरानंतरची फलाश्रृती कलात्मकतेने 'चौथी क्रांतीत' व्यक्त होताना दिसते व या कालखंडात नागनाथ कोतापल्ले, दत्ता भोसले, वासुदेव मुलाटे, प्रल्हाद लुलेकर यासारख्या विचारवंतानी ग्रामीण साहित्याची प्रेरणा व्यापक केल्याची फलश्रुती ग्रामीण चळवळीला दिसून येते असे म्हटले तर वावगे ठरू नये.

ग्रामीण-दलित साहित्यात येणाऱ्या वैचारिक भूमिकेमुळे समाजात परिवर्तन येणे अपेक्षित आहे. कोणताही प्रवाह-प्रवृत्ती सामूहिक कृत्यातूनच प्रेरक ठरते.

तेव्हा ग्रामीण दलित कादंबरीतील जाणिवांची सामाजिक परिवर्तनाच्या खुणा समाजात जाणवतात का? तर होय असे उत्तर देताना ते संथ व अस्पष्ट असल्याचेही नमूद करावे लागते. दलित कादंबरीत आलेले आशय विषय दलित चळवळींना गतिमान करताना दिसते. तशी ग्रामीण कादंबरीही चळवळीला पोषक ठरते. सहकार क्षेत्रातील वृत्ती, प्रवृत्तीचे चित्रण, जोगवा, मुरळीचे आयुष्य, देवदेवस्की, अंधश्रद्धेतून येणारे शोषण, एस.ई. झेडचे होणारे परिणाम अभिव्यक्त होताच या घटकांकडे समाज दक्षतेने पाहू लागला. तसेच त्याबाबत निर्बंध -निषेधही कल लागला. असे असले तरी बदलत्या परिस्थितीचे चित्रण करणे म्हणचे परिवर्तन नव्हे; त्यामुळे दलित ग्रामीण कादंबरी अशा सम्यक परिवर्तनास भरीवतेने परिणाम करताना दिसत नाही. जागतीकीकरणाचे अजूनही आकाल झालेले दिसत नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता दलित ग्रामीण साहित्यातील असलेल्या भूमिका आत्ता आत्ता समरस होताना दिसतात. ही नव्या वैचारिक, परिवर्तनवादी, मानवीमूल्य जोपासणाऱ्या साहित्यातील महत्त्वाची घटना होय हे मान्य केलेच पाहिजे.

एकंदरीत ग्रामीण कादंबरी-चित्रण-शोधक-वास्ववावर भूमिका व चळवळ निर्माण करणारी दिसून येते. तर दलित कादंबरी संख्येने क्षीण असली तरी भूमिका घेण ठामपणे चित्रण, वास्तवाचे शोध व चळवळीला पोषक ठरते. हे प्रवाह नव्या समाजाची निर्मिती करू पहात आहे. जुने युगाला नव्या मानवकेंद्री संस्कृतीची राष्ट्रवादी समाजरचना करताना दिसते. अशात कादंबरीला व्यापकता देणारे कोसलाकार 'हिंदू ...' लिहून पारंपरिक संस्कृती, व्यवस्था, गावगाडा, जातीय जीवन देशीवादाच्या गोंडस नावाखाली अभिव्यक्त करताना दिसतात. एकीकडे नव्या जीवनदृष्टीचे, जागतिक जीवन जाणिवांचे चित्रण नव्या मानवी मूल्यांसाठी व्यक्त करताना एकूणच मराठी साहित्य दिसते. तर दुसरीकडे प्राचीनतेचे महत्त्व विस्ताराने मांडले जाते. हे खेदजनक व चिंतनीय आहे.

★★★

# ग्रामीण-दलित कादबंरी: सामर्थ्य आणि मर्यादा

प्रा. डॉ. सुभाष पाटील

**प्रस्तावना –**

साहित्य आणि समाज यांचा परस्पर पूरक संबंध असतो. हे दोन्ही घटक नेहमी एकमेकांवर प्रभाव टाकतात. ही भूमिका घेऊन स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्याचा विचार करताना त्यामध्ये आपल्याला विविध प्रकारचे बदल झालेले दिसून येतील. स्वातंत्र्योत्तर काळात समाजाच्या विविध स्तरात शिक्षणाचा प्रसार झाला. याचा परिणाम म्हणून या विविध स्तरातल्या नवशिक्षित वर्गाने आपले प्रश्न, समस्या आणि जाणिवा याचे चित्रण साहित्याच्या विविध रूपांमधून करण्यास सुरुवात केली. या वाङ्मयाविष्काराला स्वातंत्र्योत्तर काळातील विविध चळवळीचे पाठबळ मिळाले. त्यातूनच दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदीवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य असे साहित्य प्रवाह आकार घेऊन प्रवाहीत झाले. यापैकी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दलित व ग्रामीण साहित्यातील कादंबरी वाङ्मयाच्या सामर्थ्य आणि मर्यादांचा विचार करावयाचा आहे. १९४७ साली राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले तरी सर्वसामान्य, बहुजन वर्गाला न्याय मिळाला नाही. आर्थिक शोषण, जातिभेद, सामान्यांचे विविध प्रश्न समस्या या सामाजिक विषमतेच्या बाबी संपुष्ठात न आल्याने अविरतपणे सामाजिक स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणे आवश्यक आहे, याची जाणीव समाजाच्या विविध स्तरातील नवशिक्षित वर्गाला झाली. यासाठी महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा कारणीभूत ठरली. याचे परिणामस्वरूप म्हणून दलित चळवळ, ग्रामीण चळवळ, आदीवासींची चळवळ, स्त्रीवादी चळवळ या चळवळींनी स्वातंत्र्योत्तर काळात व्यापक सामाजिक बदलांची भूमिका घेऊन आपले कार्य सुरू केले. या सर्व घडामोडींचा प्रभाव साहित्यावर पडणे अनिवार्य होते. त्यातूनच या चळवळींचे साहित्य, सामाजिक बांधिलकी प्रमाण मानणारे साहित्य म्हणून विविध वाङ्मयीन प्रवाह मराठी साहित्यात लढ झाले. एवढेच नाही तर स्वातंत्र्योत्तर काळात या विविध वाङ्मय प्रवाहांचे साहित्य हेच मराठी साहित्याचे मध्यवर्ती केंद्र बनले. यावरून या विविध साहित्यप्रवाहांच्या सामर्थ्याची, व्यापकतेची, प्रचिती येते. पण या व्यापकतेबरोबरच काही मर्यादाही जाणवतात, हे इथे नमूद

करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये वरील प्रवाहांपैकी दलित व ग्रामीण कादंबरीच्या सामर्थ्य आणि मर्यादांचा तुलनात्मक विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**ग्रामीण कादबंरीचे सामर्थ्य आणि मर्यादा**

मराठी कादंबरीच्या एकूण वाटचालीमध्ये ग्रामीण कादंबरीचे एक वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. स्वातंत्र्योत्तर काळातील खेडोपाड्यांमध्ये झालेला शिक्षणाचा प्रसार आणि त्यामुळे उदयास आलेल्या नव्या पिढीने आपल्या भोवतालचा परिसर, समाज आणि संस्कृती आपल्या लेखनाद्वारे आविष्कृत करायला सुरू केली. म. फुले यांच्यापासूनच्या बहुजन समाजातील विविध चळळी आणि समाज सुधारकांची प्रेरणा शिरोधार्य मानून साहित्याला जास्तीत जास्त समाजाभिमुख करण्याची प्रक्रिया सुरू झाली. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून ग्रामीण चळवळ आणि ग्रामीण साहित्य याकडे पहावयास लागते. संपूर्ण खेडे आणि खेड्यातील विविध प्रकारच्या लढी परंपरा, समजुती, लोकसंस्कृती याचबरोबर कृषिसंस्कृतीसंबंधीच्या सर्व घटकांचे वर्णन ग्रामीण साहित्यातून केले जाऊ लागले. त्यातून ग्रामीण कथा, कविता, कादंबरी आकाराला येऊ लागली.

**दलित कादबंरी**

मराठी साहित्यातील एक जीवनवादी, समाजाभिमुख तसेच अनुभवप्रामाण्यवादी साहित्य प्रवाह म्हणून दलित साहित्याचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे. १९ व्या शतकातील प्रबोधनकाळापासूनच म्हणजे म. फुले, लोकहितवादींच्या काळापासून अस्पृश्यता, सनातनी प्रवृत्तीच्याकडून होणारे सर्व प्रकारचे शोषण यांच्याविरुद्ध संघर्षाला सुरुवात झाली. या संघर्षाला, बहुजन समाजाच्या चळवळीला खऱ्या अर्थाने व्यापक विद्रोहाचा आविष्कार प्राप्त झाला तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात. सर्वंकष व्यवस्था परिवर्तनाचे उद्दिष्ट समोर ठेवून, बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्याच्या भूमिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे १९२० नंतर सामाजिक व राजकीय जीवनात सक्रीय झाले. त्यानंतर खऱ्या अर्थाने दलित चळवळीला सुरुवात झाली. अर्थात या चळवळीला म. फुले, शाहू महाराज, वि. रा. शिंदे यासारख्या समाजसुधारकांच्या विचारांची प्रेरणा होती आणि आहे. सार्वजनिक जीवनातल्या या घडामोडींचे,

संवेदना -जाणिवांचे प्रतिबिंब साहित्यामधून आविष्कृत होऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारप्रणालीनुसार, विद्रोहाची भूमिका घेऊन आमुलाग्र समाजपरिवर्तन करणे हेच दलित साहित्याचे मुख्य प्रयोजन राहिले आहे.

## ग्रामीण -दलित कादंबरीच्या सामर्थ्य-मर्यादांचा तुलनात्मक विचार

मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर काळात जे ठळक वाङ्‌मयप्रवाह उदयास आले त्यामध्ये ग्रामीण व दलित साहित्य प्रवाहांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. या दोन्ही साहित्य प्रवाहांच्या निर्मितीमागील प्रेरणांध्ये बहुतांशी साम्यता आहे. म. फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी, परिवर्तनावादी विचारांचा प्रभाव या वाङ्‌मय प्रवाहांवरती आहे. शोषित, वंचित, समस्याप्रधान, शेतीप्रधान समाज हा या साहित्याचा केंद्रवर्ती असलेला विषय आहे. ही साम्यता जरी असली तरी या दोन्ही प्रवाहांचे आपापले एक प्रकाराचे वेगळेपण आहे. त्यांच्यामधील सामर्थ्य-मर्यादांच्या बाबत वेगळेपण आहे. याचा यापूर्वीच्या विवेचनात स्वतंत्रपणे परामर्श घेतला आहे. या ठिकाणी या दोन्ही प्रवाहांच्या सामर्थ्य-मर्यादांचा थोडक्यात, सारांशरुपाने तुलनात्मक विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हा तुलनात्मक विचार विशद करण्यासाठी या दोन्ही प्रवाहातील काही वाङ्‌मयीन घटक आधाराला घेता येतील. त्यामध्ये सामाजिक जाणिवा, संवेदना, आविष्कार तंत्र, वेदना,-विद्रोह, आशय-अभिव्यक्ती, भाषा असे घटक आधाराला घेता येतील.

ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य यांच्यामध्ये जो मूलभूत फरक आहे तोच फरक या दोन्ही प्रवाहातील कादंबऱ्यांध्ये जाणवतो. ग्रामीण कादंबरी शेतीसंस्कृतीच्या, गावगाड्याच्या संबंधातील विषयांचा आविष्कार करते. तर दलित कादंबरी या ग्रामरचनेतीलच एक घटक असलेल्या अस्पृश्यवर्गाच्या शोषणाची व्यथा मांडते. संपूर्ण खेडे अथवा गाव, त्यातील परंपरा, संस्कृती यासंबंधीच्या जाणिवा ग्रामीण कादंबरीतून विशद होतात. पण याच खेड्यातील एका विशिष्ट वर्गाने पिढ्यानपिढ्या जो अन्याय, दुःख, सोसला त्याचे परखड स्वरूपातील चित्रण दलित कादंबरीने केले. त्यामुळे या दोन्ही प्रवाहातील कादंबरीच्या जाणिवांमध्ये मूलभूत फरक आहे. दलित साहित्यातून प्रत्ययास येणारा वेदना-विद्रोह-नकार हा क्वचितच ग्रामीण साहित्यात प्रकटतो. याचे कारण त्यांच्या जाणिवांधील असलेला फरक होय. त्यामुळे दलित कादंबरीत आत्मभान जागृत झालेला आणि आत्मशोध घेत असलेला नायक प्रस्तापित व्यवस्थेच्या विरुद्ध

विद्रोह कल पाहतो आहे. ही प्रस्थापित व्यवस्था त्याच ग्रामरचनेचा, समाजाचा भाग आहे. या विषमव्यवस्थेवर (वर्णव्यवस्था) मात्र ग्रामीण कादंबरीमध्ये अपवादात्मक आवाज उठविला गेलेला दिसतो. आर्थिक विषमतेचा, दारिद्र्याचा विषय ग्रामीण कादंबरीने मांडला पण त्यामध्ये स्पृश्य–अस्पृश्यतेचा विषय क्वचितच मांडला गेला. दोन्ही प्रवाहातील कादंबरीतील हा फरक त्याच्या साहित्यनिर्मितीच्या वेगवेगळ्या जाणिवांच्या मधील फरकाचेच दर्शक आहे. ग्रामीण संवेदना आणि दलित संवेदना या दोन्ही कादंबऱ्यातील वेगळेपणाला कारणीभूत आहे. पण या दोन्ही संवेदना या एकाच कादंबरीचा भागही बनू शकतात. उदा. अशोक व्हटकर यांच्या 'मेलेलं पाणी' या कादंबरीचा उल्लेख करता येईल. ग्रामीण जीवनानुभवाच्या पातळीवर वर्गीय संवेदना व्यक्त करणारी ही कादंबरी आहे. याच स्वरूपातील दलित ग्रामीण जाणिवेचे व्यामिश्र दर्शन घडविणाऱ्या कादंबऱ्या म्हणून उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा', 'इंजाळ', 'खाई', 'भस्म' या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. समकालीन ग्रामीण व दलित जीवनाचे वास्तव या कादंबऱ्यातून साकारले आहे. असे असले तरी ग्रामीण व दलित साहित्याच्या बाबतीत काही मूलभूत स्वरूपाचे वेगळेपण मान्य करावे लागते. याबाबत डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात की,...''दलित साहित्याला समांतर अशी ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली.

दलित साहित्यात ग्रामीणता असू शकते. परंतु ग्रामीण साहित्यात दलितपणा अथवा दालित्य असतेच असे नाही. प्रादेशिक साहित्य हे भौगोलिकतेशी निगडित असते. ग्रामीण साहित्य हे बहुधा अप्रगत अविकासित असंस्कृत अशा परंपरांशी निगडित असते. या अर्थाने की ग्रामीण संस्कृती आधुनिकता आणि नवता यांच्यापासून दूरस्थ असते. ग्रामीण संस्कृती ही एकाअर्थी अनागरी म्हणून भिन्न असते. आज खेड्यांचे शहरीकरण व औद्योगिकीकरण होऊन लागले आहे. त्यामुळेच खेड्यापाड्याच्या अनागरी संस्कृतीतही परिवर्तन होऊ लागले. दलितत्त्व हे प्रादेशिकतेपेक्षा आणि ग्रामीणतेपेक्षा वेगळे असते. खेड्यापाड्याचे शहरीकरण अथवा औद्योगिकीकरण झाले तरी शतकानुशतकाची वर्णव्यवस्था बदलत नाही, जातिभेदांचे निर्मूलन होत नाही. तोपर्यंत दलितत्त्व नाहीसे होणार नाही, यादृष्टीने पाहता उत्तम बंडू तुपे यांच्या कादंबऱ्या ग्रामीण साहित्याला अधिक जवळच्या आहेत.'' प्रस्तुत ठिकाणी ग्रामीण–दलित साहित्याचा तुलनात्मक विचार करताना ग्रामीण साहित्याच्या अनुषंगानेही काही एक विचार मांडावा लागेल. या संदर्भात

डॉ. आनंद यादव यांच्या मताचा इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. ते एकेठिकाणी म्हणतात की,... ''ग्रामीण साहित्याच्या चळवळीत ग्रामीण जाणीव ही दलित साहित्यातून प्रत्यक्षात दिसून येणाऱ्या जाणिवेपेक्षा मूलतःच व्यापक आहे. समग्र मराठी समाजाचा एकत्र विचार करणारी ती जाणीव आहे. महात्मा फुले यांचा मानवतावादी व शाहू छत्रपती, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दीन-दलितांविषयीची जाणीव ग्रामीण साहित्याची चळवळ मानतेच, पण ती आगरकरांचा बुद्धिप्रामाण्यवादही मानते. महात्मा गांधींची समग्र समाजाचा, येथील परिस्थितीच्या संदर्भात विचार करणारी, विज्ञान व अध्यात्म यांचा मेळ घालणारी खास भारतीय राष्ट्रीय दृष्टीही ती मानते. अर्थात विचार हा नेहमी प्रवाही असतो. त्यामुळे ही चळवळ कोणत्याही अट्टल विचारवंताला शंभर टक्के प्रमाण मानत नाही. तर काळाच्या ओघात ज्या गोष्टी कालबाह्य झाल्या असतील, त्यांना नाकारत, नवा समाजवादी, समतावादी विचार स्वीकारत, सतत पुढे जाऊ पाहते आहे. दलित साहित्याच्या विरोधात ही चळवळ मुळीच नाही, पण काळाच्या ओघात दलित साहित्य चळवळीला व प्रत्यक्ष साहित्याला पडलेल्या मर्यादांच्या पलीकडे जाण्याच्या प्रयत्नात ही चळवळ आहे.'' ग्रामीण साहित्याच्या या व्यापक जाणिवेचा प्रत्यय ग्रामीण कथा- कादंबऱ्यांमधून येतो, मात्र या संपूर्ण ग्रामरचनेतील वर्गीय संवेदना, जातीय तणाव मात्र क्वचितच विशद झाल्याचे दिसते. दलित व ग्रामीण साहित्याच्या स्वरूपात जे वेगळेपण आहे, त्यामागे या दोन्ही साहित्य प्रवाहांच्या भूमिकांध्ये असलेला फरक कारणीभूत आहे. असे असले तरी या दोन्ही प्रवाहांनी साहित्याच्या भाषेविषयीचे लढ संकेत धुडकावून लावले, त्यामुळेच जे आपल्या वाट्याला आलेले आहे, भोगलेले आहे ते मोकळेपणाने व्यक्त करण्याचा आत्मविश्वास या बहुजन समाजातील लेखकांना प्राप्त झाला. या दोन्ही प्रवाहातील बोलीलपांचा जिवंतपणा अनुभवांच्या अभिव्यक्तीला पूरक ठरला. ग्रामीण-दलित कादंबरीच्या सामर्थ्य मर्यादांवर प्रकाश टाकत असताना त्यांच्यातील साम्य-भेदांचे दर्शन घडते. एकूण मराठी साहित्यात या दोन्ही प्रवाहातील कादंबऱ्यांची व्याप्ती मोठी आहे. मराठी कादंबरीला एक वेगळ्या उंचीवर नेण्याचे कामही या दोन्ही प्रवाहानी केले आहे. हे मान्य करावेच लागेल.

★★★

# इ.स. २००० नंतरची दलित ग्रामीण कादंबरी

**प्राचार्य डॉ.भालचंद्र शिंदे**

२००० नंतरची ही ग्रामीण लेखकांची चौथी पिढी, ग्रामीण जीवनात खूप मोठे बदल झाले. बैलगाडी व मोटार, सर्व्हिस मोटार जाऊन त्याजागी जीप बस ट्रक ट्रॅक्टर ही वाहने आली. त्यांच्या वेगाला आता मर्यादाच उरली नाही. रस्ते सुधारले, वीज आली. नळयोजना आल्या. निवडणुकाही आल्या. दूरचित्र वाहिन्या, संगणक, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, इंटरनेट त्याचबरोबर पंचतारांकित हॉटेल्स, पान टपऱ्यासहित धाब्यांची चंगळ, वेगवान चित्रपट इ. अनेक कारणांनी ग्रामीण जीवन आमुलाग्र बदलले. तसेच शेती करण्याची पद्धत, अवजारे, बियाणे, यंत्रसामग्री, यातसुद्धा बदल झाले. ते बदल साहित्यातून दिसायला लागले. हा नवग्रामीण लेखक शोषणाच्या विरोधी सर्वच पातळयांवर प्रतिक्रिया व्यक्त करतो. त्याचा परिणाम आजच्या ग्रामीण साहित्यावर व कादंबरीवरही दिसून येतो. मुद्रण प्रकाशन स्वस्त झाले. आधुनिक, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला. वर्तमानपत्रे गावोगावी झाली तसेच गावोगावचे पुरस्कारसुद्धा मिळायला लागेले. संमेलने होऊ लागली. इत्यादी कारणांनी ग्रामीण कादंबरीकारांच्या निर्मितीत लक्षणीय वाढ झाली. त्याचबरोबर संवग लोकप्रियतेचा वापर होऊ लागला.

समकालीन ग्रामीण कादंबऱ्यांतून आता केवळ ग्रामीण जीवनातील दैन्य, दारिद्र्य, अज्ञान, परंपराप्रियता इ. सह वर्तमानाचे अर्थपूर्ण चित्रण करण्यावर भर दिला जात आहे. उदा. 'परवड' मधून द.श्री. जाधव यांनी शेतकरी संघटनेचे नेते, तत्त्वज्ञान व आंदोलने यांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'बिनपराचा कावळा' मधून अनिल सोनार यांनी ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या राजकारणग्रस्त दहशतीचे भेदक चित्रण केले आहे. 'ऐसे कुणबी भूपाळ' मधून भरत काळे भावा-भावातील, रक्तसंबंधाच्या संघर्षाचे चित्रण करतात. संपत जाधव यांच्या 'गुलाम' आणि 'राक्षस', 'वाघनखं' या कादंबऱ्यांतून शिक्षण, सहकार, राजकारण इ. क्षेत्रात निर्माण झालेल्या गुंडशाहीचे व शोषणप्रवृत्तीचे दर्शन घडते. दिलीप भावसार यांच्या 'गोबड' मधून धरणग्रस्त व आधुनिकीकरणामुळे दिशाहीन झालेल्या गावांचे व त्यांतील अनोख्या जीवनाचे दर्शन घडविले आहे. 'ताडतोड' या कादंबरीतून डॉ. सुभाष राजुळे ऊसतोड कामगारांचे जगणं व

अन्याय आणि शोषण विरोधी प्रत्यक्ष कृतिशीलतेचा कार्यक्रम मांडताना दिसतात. तानाजी राऊ पाटील यांच्या 'आभाळ' व 'रूपसावली' तून छोटा शेतकरी, स्त्रीची वेदना, मुखर होताना दिसते. मथू सावंतांच्या 'जिनगानी' मधून ग्रामीण स्त्रीजीवनाची व्यथा प्रगट होते. याच प्रकारच्या पुढील कादंबऱ्या– महेंद्र कदम 'धूळपावलं', 'आगळ', 'चेअरमन' अशोक कुलकर्णी, 'डेअरी' साईनाथ पाचरणे, 'पंचायत राज' शंकर नऱ्हे, 'पाणधुई', 'कापूसकाळ' कैलास दौंड, 'राणीवसा' अनुराधा वैद्य, 'गव्हाणी' शांता जोशी, 'तुरुंगवाडा' लक्ष्मी कमल गेदाम, 'गावठाण', 'रौंदाळा' कृष्णात खोत, आक्का पुष्पा देशमुख 'झळ' व 'बळ' सतिश जाधव, 'बारदान' प्रकाश देशपांडे, 'दरिद्री नारायण' व.न. इंगळे, 'दुसरी लढाई' प्रमोद हसबनीस, 'सातपुडयाची कला' विजय इंगळे, 'बळीराजा' श्याम झाडे, 'गांव पंढरीच्या वाटेवर' अप्पासाहेब खोत, 'जलपर्व' रेखा बैजल, 'टकराव' अभिजित हेगशेटये, 'लगीन' संजीव गिरासे, 'आरंबळ' रा.गो.चवरे, 'उद्रेक' विजय वळसे, 'पाडा' 'कुंदा' अशोक कौतिक कोळी या सर्व कादंबऱ्या दखलपात्र आहेत. ग्रामीण जीवनातील नवे प्रश्न, नव्या समस्या, नवी गुंतागुंत, वास्तव शोषण, विकृतीचे विदारक सत्य याचे रेखाटन हे नवग्रामीण कादंबरीकार करीत आहेत. ही संख्यात्मक वाढ आणि विषयांची विविधता मन थक्क करून सोडणारी आहे.

**ठळक वैशिष्टये –**

या कालखंडात कादंबऱ्याची संख्यात्मक व गुणात्मक वाढ झालेली दिसते. 'झोंबी', 'झाडाझडती' 'राघववेळ', 'बारोमास' इ. कादंबऱ्याना साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळालेले आहेत. स्त्री कादंबरीकारांची संख्या झपाट्याने वाढते आहे. उदा. प्रतिमा इंगोले, मथू सावंत, सुनंदा देशमुख, शांता जोशी, नलिनी महाडिक, संगीता पाटील, लक्ष्मीकमल गेडाम, अनुराधा वैद्य या कादंबऱ्यातून ग्रामीण स्त्रीजीवनाची शोकांतिका उग्र व भेदकपणे आलेली दिसते. (जिनगानी, सावट, रूप, सावली इत्यादी कादंबऱ्यांची या संदर्भात नोंद करता येईल.) १९८० पर्यंतच्या ग्रामीण जीवनाचे मानदंड ठरलेल्या कादंबऱ्या उदा. 'बनगरवाडी', 'टारफुला', 'धग', 'पाचोळा' 'गोतावळा', ग्रामीण जीवनातील शेतीबाह्य केंद्राभोवती निर्माण झाल्या आहेत.

१९८० नंतरच्या कादंबरीतून मात्र शेती व शेतकऱ्याच्या सनातन वेदनेचे रेखाटन येते. उदा. शेषराव मोहिते, सदानंद देशमुख, तानाजी पाटील, प्रकाश

देशपांडे, कैलास दौंड, कृष्णात खोत, प्राचार्य महेंद्र कदम यांच्या कादंबऱ्या, शेतीचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवूनच या काळातील कादंबरी लिहिली गेली. नव्या बंडखोर नायकाची देणगी या कादंबऱ्यांनी दिली. हा नायक आंदोलनाची भाषा बोलतो. ग्रामीण भाषेचा वापर अधिक सशक्तपणे व डोळसपणे होतो आहे. उदा. अस्सल वऱ्हाडी (प्रतिमा इंगोले), कोल्हापूरी (नानाजी पाटील), खानदेशी (संजीव गिरासे) मराठवाडी (नागनाथ पाटील, रा.रं.बोराडे) या कादंबरीकारांनी प्रादेशिक भाषांचा सरसकट निवेदन व संवादासाठी वापर केलेला दिसून येतो.
शेतकरी संघटना, आंदोलने, सहकार, राजकारण इ. कितीतरी समकालीन प्रश्नांना या काळातील कादंबरीने अधोरेखित केले आहे. 'हाल्या हाल्या दुधू दे', 'परवड', 'झोंबड', 'रानखळगी', 'चारापाणी', 'बारोमास' इत्यादी कादंबऱ्या त्यादृष्टीने लक्षात घेण्यासारख्या आहेत.

दलित व कष्टकरी जीवनाचाही तेवढ्याच अर्थपूर्णतेने ही कादंबरी वेध घेताना दिसते. 'कोयता', 'पाणधुई', 'प्रहार', 'ताडातोड', 'पाचट' या ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावरील किंवा माधव कोंडविलकर, विलास अंभोरे, जालंदर सोनुने, कचरू भालेराव, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, रवींद्र बागडे इ.लेखकांच्या कादंबऱ्या दलित ग्रामीण जीवनातील सीमारेषा पुसट करून समग्र जीवनाला सामोऱ्या जाणाऱ्या आहेत.

प्रयोगशीलता हे आणखी एक वेगळेपण नोंदविता येईल. ग्रामीण साहित्य हे आशय व अनुभवनिष्ठ असल्याचे आपण मानतो. रचना व भाषेच्या प्रयोगशील वापराकडे ग्रामीण लेखक अपवादानेच वळत असत. 'मेड इन इंडिया' 'बारोमास', 'आरंबळ', 'लगीन', 'ऐसे कुणबी भूपाळ' 'बेवड' इ. कादंबऱ्याचा यादृष्टीने विचार करता येण्यासारखा आहे.

ग्रामीण जीवनातील स्थित्यंतराकडे आजचे कादंबरीकार डोळसपणे पाहताना दिसतात. दुसरी लढाई, 'टकराव', 'ऐसे कुणबी भूपाळ', 'तणकट', 'बारोमास', 'आरंबळ', 'सेझ', 'कापूसकाळ', 'धुळपावलं', 'आगळ', 'पाडा', 'कुंदा' इ. अनेक कादंबऱ्यांतून या संघर्षाचे जाणीवपूर्वक व भेदकपणे आलेले चित्रण विशेष उल्लेखनीय आहे.

१९२० ते १९८० या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष नागरी वाचकांच्या अनुनय करणारी, त्यांना शरण जाणारी होती. परंतु १९८० नंतरच्या काळात मात्र ही नागरशरणता, अनुनयशीलता संपुष्टात आलेली

दिसते. रोमँटिकदृष्टीने सौंदर्य चित्रण करण्यापेक्षा ग्रामीण जीवनातील भेदक समस्या, वास्तव रोखठोकपणे मांडण्याची वृत्ती वाढलेली दिसते.

दोन दशकात दोनशे कादंबऱ्या निर्माण झाल्या. त्या कादंबऱ्या बरेच काही सांगून जात ओत. नागरशरणतेच्या ग्रहणातून सुटलेली १९८० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी ग्रामीण जीवनातील अनेक पैलूंना आता कुठे स्पर्श करू पाहते आहे. ग्रामीण मराठी लेखकांनी अंतर्मुख होऊन निष्ठेने लेखन केले तर उद्याची मराठी कादंबरी केवळ ग्रामीण कादंबरीच होऊ शकते. एवढी अनुभवसंपन्नता व आशयक्षमता ग्रामीण जीवनानुभवात व संस्कृतीचित्रणात आहे, असे प्रामाणिकपणे वाटते.

या निरीक्षणाच्या बाबतीत किंवा वैशिष्ट्यांच्या संदर्भात दलित कादंबरीशी तुलना करता अनेक ठिकाणी खूप साम्य दिसून येते. उदा. ग्रामीण कादंबऱ्यांतील स्त्रीची वेदना, दुःख दलित कादंबरीतूनही दिसून येते हे इथे नोंद करायला पाहिजे. ग्रामीण कादंबरीतील उग्र, भेदकता दलित कादंबरीत मोठया प्रमाणात दिसून येते. स्त्री लेखिकांच्या संदर्भात असे म्हणता येईल की, तुलनेने ग्रामीण लेखिकांची संख्या जास्त आहे. ग्रामीण लेखकांनी जसा बंडखोर नायक दिला तसाच दलित कादंबरीनेसुद्धा दिला. प्रादेशिकतेच्या संदर्भात ग्रामीण कादंबरीचा विस्तार जास्त वाटतो. आंदोलनाच्या संदर्भात असे म्हणता येईल की, आंदोलनाचा भाग अलीकडील ग्रामीण कादंबरीत आलेला आहे. दलित कादंबरीच नव्हे तर दलित साहित्यच मुळी आंदोलनातून निर्माण झालेले आहे. ग्रामीण कादंबरीतूनसुद्धा दलित व कष्टकरी जीवनाचा वेध घेतलेला दिसून येईल. नागरशरणतेचा मुद्दा पाहाता दलित लेखकांनी नारगरशरणता अगदी सुरुवातीपासूनच झुगारुन दिलेली दिसते. किंबहुना आक्रमकता सुरुवातीच्या काळापासूनच अवलंबिली गेली. आक्रमकता आली की रोखठोकपणा आलाच. दलित कादंबरीत तो भाग ही सुरुवातीच्या काळपासून दिसून येतो.

डॉ.र.बा. मंचरकर लिहितात, दलित साहित्याने आज आपला सवता सुभा मांडलेला असला तरी त्याचे आखात ग्रामीण साहित्यात माटे-माडगुळकरांपासून घुसलेले आहे. दलित जीवन त्याच्या कोंडमाऱ्यासह व खदखदणाऱ्या असंतोषासह ग्रामीण परिसरात अधिक स्वाभाविकतेने आढळते म्हणून आजचे दलित साहित्यही अपरिहार्यपणे ग्रामीण परिवेषात सामोरे येत आहे. इथे मंचरकरांनी दलित साहित्याने सवता सुभा मांडलेला आहे. असं म्हणून

दलित साहित्यही अपरिहार्यपणे ग्रामीण परिवेषात सामोरे येत आहे. असे म्हटले आहे ते तितकेसे पटत नाही. या लेखात दलित साहित्याच्या सुरुवातीच्या भागात म्हटल्याप्रमाणे दलित साहित्य स्वतंत्रपणे आलेले आहे. त्याला ग्रामीण साहित्याच्या परिवेषा ची गरज नाही. ते वेदना आणि विद्रोह घेऊन स्वतःच्या ताकतीवर आले आहे. त्याला इथल्या मातीचा वास आहे. शिवाय मुंबईतील जीवनानुभव जे दलित साहित्यात येतं ते ग्रामीण जीवनाशी कुठं जुळतं? मात्र मध्यमवर्गाचे रिंगण तोडून मराठी साहित्य विविध वर्गाच्या जीवन व्यवहाराचे प्रगटीकरण करू लागले. ग्रामीण कादंबरी प्रमाण भाषेकडून बोली भाषेकडे सरकू लागली हे म्हणणं मात्र बरोबर आहे असं वाटतं. ग्रामीण मराठी कादंबरीकारांची पहिली व दुसरी पिढी कथालेखनाकडून कादंबरीलेखनाकडे वळलेली आहे मात्र तिसऱ्या पिढीतील एकाही लेखकाने कथेकडून कादंबरीकडे प्रवास केला नाही. एकदम कादंबरीला हात घातला. हे प्राचार्य रा.रं. बोराडे यांचं विधान ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात एक विशेष म्हणून लक्षात घेण्यासारखं आहे.

**समारोप –**

दलित-ग्रामीण कादंबरीच्या स्वरूपाविषयी आत्तापर्यंत चर्चा केली. वेळोवेळी त्यातला फरक व साधर्म्य सांगितले आहे. या दोन प्रवाहाबद्दल लिहिताना काही वैशिष्ट्ये सूत्रबद्धरीतीने मांडाविशी वाटतात. दलित कादंबरी व ग्रामीण कादंबरी या दोन्ही कादंबऱ्यांकडे सुरुवातीच्या काळात हा काय वेगळा प्रकार? असं कुठं असतं काय? या भावनेनं पाहिलेलं जायचं. किंबहुना थोडासा हे टाळणीचाच प्रकार अनुभवास आला. परंतु या दोन्ही प्रकारांनी, प्रवाहांनी आपली सशक्ता दाखवून दिली. सिद्ध केली आणि त्याला सर्वमान्यता ही मिळाली.

प्रेरणांच्या संदर्भात पाहू गेल्यास असे दिसून येते की, दलित साहित्याची प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहे तर ग्रामीण साहित्याची प्रेरणा म.फुले आहे. दलित कादंबरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तत्त्वज्ञान म्हणून स्वीकारले तर ग्रामीण कादंबरीला म.फुले, त्यांचं साहित्य, त्यांचे विचार व सार्वजनिक सत्यधर्माचा आधार वाटतो. दुःख, कष्ट, दारिद्रय या प्रेरणा दोन्ही प्रवाहांना लागू होतात. दलित कादंबरीचा कालपट अवघ्या पन्नास वर्षाचा आहे

तर ग्रामीण कादंबरी इ.स. १८८८ पासूनची आहे. तिचा कालपट मोठा् आहे. सहाजिकच संख्यात्मकदृष्ट्याही फरक जाणवतो. भूप्रदेश, निसर्ग, प्रादेशिकता यादृष्टीने ग्रामीण कादंबरीचा परीक मोठा दिसतो. ग्रामीण साहित्याला केवळ ग्रामीण पार्श्वभूमी आहे तर दलित साहित्याला ग्रामीणतेबरोबरच शहरी पार्श्वभूमीसुद्धा लाभलेली दिसून येते. दलित साहित्यात कथा, आत्मकथा जास्ती प्रमाणात आहेत. ग्रामीण साहित्यात कादंबरीच्या तुलनेले नाटकं कमी प्रमाणात आहेत. भाषेच्या बाबतीत दोन्ही प्रवाहांनी इतिहास रचना आहे. आक्रमकता दोन्हीकडे आहे. बोलीभाषेचा वापर दोन्हीकडे आहे. प्रादेशिकता मात्र ग्रामीण कादंबरीत जास्त प्रमाणात दिसून येते. ग्रामीण कादंबरीत कृषीजीवन येणे स्वाभाविक आहे. दलित साहित्यात कृषीजीवन येते पण तुरळक प्रमाणात. तिथे दलितांच्या वेदनांना मुखर करण्याचा प्रयत्न आहे. दलित कादंबरीत मांग, महार, चांभार इत्यादींच्या जीवनाचं भेदक चित्रण येतं. ग्रामीण कादंबरीत सगळेच ग्रामीण आतासा कुठे बारा-बलुतेदारांचं जीवन वेगळया अंगाने येत असल्याचं दिसतं. ग्रामीण कादंबरीत नैसर्गिक चित्रण, निसर्ग वर्णन येणं स्वाभाविक आहे. तुलनेने दलित कादंबरीत त्याचं प्रमाण कमी आहे.

दलित साहित्याचा, कादंबरीचा प्रभाव भारतातील इतर भाषांवर पडलेला दिसून येतो. डॉ.बाबासाहेबांची आंदोलने महाराष्ट्रातच मोठया प्रमाणात झाल्याकारणाने त्याला मराठीच्या आधार घेणे स्वाभाविक होते. ती आंदोलने मराठी होती. नंतर वेगवेगळया प्रदेशात, भाषांत गेली. त्याला वेगळं परिमाण प्राप्त झाले. ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत असं झालेलं दिसत नाही. नाही म्हणायला फुले-शाहू-आंबेडकर हे दक्षिणेत कर्नाटक, तमिळनाडू, आंध्रप्रदेश इथंपासून उत्तर भारतात उत्तरप्रदेश, हरियाणा इथंपर्यंत पसरलेले दिसतात.

★★★

# समस्याप्रधान ग्रामीण दलित कादंबरी

डॉ.भास्कर शेळके

**प्रस्तावना :–**

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. नवे युग सुरू झाले. खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार सुरू झाला. शाळा निघाल्या. ज्ञानाची गंगा समाजाच्या खालच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोचली. ग्रामीण तरुण नवी माहिती घेऊ लागला. विद्येची चव त्याला कळायला लागली. विद्येमुळे, ज्ञानामुळे त्याच्यात जागृती झाली. त्याला आत्मभान आलं. त्यातून तो लिहू लागला. आपले विचार मांडू लागला. अनुभव कथन करू लागला. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी नुकतच दुसरं महायुद्ध होऊन गेलं होते. जागतिक संदर्भ बदलले होते. शिक्षणामुळे या जागतिक पातळीवरील घटनांकडे, खेड्यातला शेवटच्या स्तरावरचा तरुण विस्मयचकित नजरेने पाहू लागला. त्याचा अर्थ शोधू लागला.

अशा परिस्थितीतील महाराष्ट्रात काही वेगळ्या घटना घडत होत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा उदय झाला. त्यांनी दलित चळवळ उभारली. त्यांचं देश पातळीवर नेतृत्त्व सिद्ध झालं. विशेषतः महाराष्ट्रात अनेक आंदोलनं झाली. त्याचा परिपाक दलितांच्या जागृतीत झाला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा नारा खेड्यापाड्यात पोचला. स्वातंत्र्यामुळे वेगळं भान जवळजवळ सगळ्यांनाच आलं होतं. त्यात बाबासाहेबांची प्रेरणा होती. समाजातील दलित वर्ग शिकायला लागला. त्याचा अंतर्मन बोलू लागलं. तो लिहायलाही लागला. अनुभव कथन करून लागला. स्वाभाविकच दलित साहित्याची निर्मिती अशाप्रकारे झाली.

याचवेळी महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारख्या, ज्यांना फुले शाहूंच्या विचारांची प्रेरणा आहे, सत्यशोधक समाजाचा वारसा आहे आणि जे स्वतः तळागाळातीलच आहेत अशा व्यक्तीच्या हाती नेतृत्त्वाची धुरा आली. 'मोफत शिक्षण' हा नारा त्यांनी दिल्याचा परिणाम शिक्षणाच्या प्रसारात झाला. खेडूत तरुण शिकून आपलं अस्तित्व शोधू लागला. आपणही लिहू शकतो, बोलू शकतो, सांगू शकतो याची त्याला प्रकर्षाने जाणीव झाली. तो लिहायला लागला व त्यातूनच ग्रामीण साहित्य तयार झालं. अशारितीने दलित ग्रामीण कादंबरी

तयार झाली. महाराष्ट्रात ही एक चळवळ म्हणूनच उभी राहिली. विशेषतः दलित चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कुशल नेतृत्त्वाचा आधार मिळाला व ती भरभक्कम झाली.

तत्पूर्वी फुले शाहूंनी ही भूमी नांगरून कुळवून, मशागत करून ठेवली होती. चहुकडे या विचारांनी लोक भारलेले होते. बी पेरायचं काम नंतरच्या मंडळींचं होत. ते त्यांनी योग्यरितीने केलं. त्यातूनच मराठी साहित्यात अनेक प्रवाह निर्माण झाले. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी ते...आदीवासी, गुराखी साहित्य... इथंपर्यत.

१९७० ते ८० च्या दरम्यान मराठी साहित्यात खरेखुरे परिवर्तन घडले. या साहित्यानं प्रस्थापित जीवन बदलण्याचीच मागणी केली. केवळ साहित्यातील परिवर्तन त्यांना अभिप्रेत नव्हतं. सर्वकष जीवनविरुद्ध हा संघर्ष होता. क्र विद्रोह होता. विशेषतः दलित साहित्यातून हा विद्रोह प्रकर्षानं जाणवतो. किंबहुना विद्रोहासाठीच दलित साहित्याचा जन्म झाला.

या परिवर्तनाला जागतिकीकरणाचाही संदर्भ प्राप्त झाला आहे. प्रत्यक्षात १९९० नंतर जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झालेली असली तरी त्याची पूर्वतयार, मानसिकता १९७० व्या सुमारासच सुरू झालेली होती.

स्वाभाविकच या लेखनातील प्रतिमासृष्टी, शब्दरचना, वेगळी असून लेखनाला संदर्भसुद्धा वेगळे प्राप्त झालेले दिसून येतात. लिहित्या लेखकांची संख्या, व्यापक, भूप्रदेश, ऐरणीवर आलेले ग्रामीण जीवन दोहोत खूप फरक आहे. ग्रामीण कादंबरी ग्रामीण जीवनातील बदलते वास्तव, लोकबंध, भाषा, प्रयोगशीलता, संशोधनाच्या नव्या दिशा घेऊन येते या संदर्भात 'दलित कादंबरी आवर्तनात सापडली आहे' असे म्हटले जाते. महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाने जागृती आणली. सत्य शोधली विचार, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात मांडले जाऊ लागले. दलित ग्रामीण या दोन्ही प्रवाहांना या विचारांनी बळकटी आणली.

दलित साहित्याच्या चळवळीला विरोध करण्यासाठी ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली असंही बोलंलं जाऊ लागलं पण हा विचार तितकासा बरोबर नाही. दोन्ही प्रवाहांनी आपलं वेगळं वैशिष्टय जपलेलं दिसून येतं. ग्रामीण साहित्य विशेषतः बहुजन समजाकडून लिहिलं गेलं. दलित साहित्य दलित समाजाकडून दोन्हीच्या जाणिवा वेगळया, प्रश्न वेगळे, समस्या वेगळया, समाजवास्तवही वेगळे, भाषेच्या बाबतीतसुद्धा तेच म्हणता येईल. दलित साहित्यात

संघर्षाची भाषा असते. ती ग्रामीण साहित्याने घेतलेली दिसते. मात्र संघर्षाची भूमी दोघांची वेगळी आहे.

**तत्त्वज्ञान –**

मराठी ग्रामीण साहित्याला तत्त्वज्ञान नाही असा आक्षेप घेतला जातो. उलट दलित साहित्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा भक्कम आधार आहे. या संदर्भात ग्रमीण साहित्याच्या तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाविषयी चर्चा करू. ग्रामीण माणूस शतकानुशकते अस्मानी–सुलतानी संकटांशी सामना करीत आला आहे. १९ व्या शतकात हा संघर्ष अधिक तीव्र झाला. याचकाळात म.फुले, यांचा उदय झाला. गुलामगिरी व 'शेतकऱ्यांचा आसूड', ही पुस्तकं त्यांनी लिहिली. शेतकऱ्यांच्या दुःखाचा पहिला उद्रेक म्हणजे 'शेतकऱ्यांचा आसूड' होय.

भारतीय माणसाच्या गुलामगिरीचा इतिहास 'गुलामगिरी' या ग्रंथामधून अवतरला आहे. सुंदर आणि शोषणमुक्त जगाचे चित्र म्हणजे म.फुल्यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म'. महात्मा फुले यांचे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्यामागील तत्त्वज्ञान. पुढे चालून छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ग्रंथांतून ग्रामीणांच्या दुःखाचे आलेख मांडलेले दिसून येतात. त्यांच्या मुक्तीची वैचारिक भूमिकाही या महामानवांनी मांडली. कृतीकार्यक्रमही दिला. उदा. शेतीमालाच्या भावाबद्दल विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हटले आहे की, ज्याची चंदी असते त्याच्या हाती घोडा असला पाहिजे! तसेच शेतकऱ्यांनी आपल्या जातीचा विचार न करता 'शेतकरी' हीच एकमेव जात मानावी म्हणजे त्यांचे प्रश्न सुटतील असा सल्ला १९३५ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता. (आज जाती प्रबळ होत चालल्या आहेत आणि ग्रामीण जीवन अधिकाधिक दुःखात बुडत चालले आहे ही वस्तुस्थिती आहे. हा भाग वेगळा!)

हे ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान असून या तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात जे लेखक लिहितात, जीवनाच्या अर्थ शोधतात त्यांचे लेखन अधिक अर्थपूर्ण होते. सत्यशोधक समाजाची चळवळ म्हणजे म.फुले यांचे व इतरांचे जीवन बदलून टाकणारे जे विचार त्या विचारांचा कृतिशील आविष्कारच होय. या आविष्काराच्या प्रवाहात जे लिहिले गेले ते ग्रामीण साहित्याची चळवळीची पूर्वपीठिका म्हणून

लक्षात घ्यावे लागते.

**दलित साहित्याचे तत्त्वज्ञान –**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान हेच दलित साहित्याचे तत्त्वज्ञान असून त्यांचे व्यक्तिमत्त्व या चळवळींच्या प्रेरणास्थानी आहे. १९७० च्या आसपास जी साहित्य चळवळ मराठीत भक्कमपणे अवतरली ती म्हणजे दलित साहित्याची चळवळ. ही पहिली साहित्य चळवळ आहे. तिने काही आदर्शही इतर चळवळींपुढे ठेवले आहेत. अशा साहित्य चळवळीचा प्रारंभ मराठवाड्यात झाला. डॉ.म.ना.वानखेडे, प्राचार्य म.भि. चिटणीस, श्री.ल.मा.शयमाने यांच्या पुढाकाराने ही चळवळ सुरू झाली. नंतर त्याच चळवळीच्या पुढाकाराने 'अस्मितादर्श' ची सुरुवात झाली. तिथेच डॉ.भालचंद्र फडके, डॉ.जनार्दन वाघमारे, डॉ.गंगाधर पानतावणे होते. पानतावणे यांनी ही चळवळ अधिक सशक्त केली.

**दलित कांदबरी –**

दलित कादंबरीकडे वळण्यापूर्वी थोडेसे आपण दलित साहित्याविषयी, कोणत्याही भाषेतील जिवंत साहित्यात नित्य नवे प्रवाह उदयाला येत असतात. नवे प्रवाह साहित्य समृद्ध करीत असतात आणि साहित्यातले चैतन्य टिकवीत असतात. दलित साहित्याचा प्रवाह हा जिवंत, जीवनदायी प्रवाह आहे. तो आजच्या मरगळलेल्या, कोंडलेल्या मराठी साहित्याला जीवनरस देईल. असं डॉ.भालचंद्र फडक्यांनी अगदी दलित साहित्याच्या सुरुवातीच्या काळात म्हटलं ते मनोमन पटलं. ते पुढे म्हणतात 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर हीच दलित साहित्याची प्रेरणा आहे'. एकदा डॉ.आंबेडकर म्हणाले होते, 'माझ्या विद्यार्थ्यांनो नम्र व्हा पण अत्याचारासमोर कधीही झुकू नका' ही शिकवण दलितांनी कायम लक्षात ठेवून साहित्य निर्मिती केली. आपलं विराट दुःख आपल्या साहित्यातून व्यक्त केलं, मांडलं. हे साहित्य मानवी हक्क आणि मानवी प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य शिरोधार्य मानून लढणाऱ्या आंदोलनातून जन्मलेलं आहे, या देशाच्या मातीतून उदयास आलेले असून कोसळणारं दुःख, सतत चालणारे शोषण, याविरुद्धचा आक्रोश आहे. दलितांची वेदना व त्यातून निर्माण झालेला विद्रोह अधिक दाहक आहे! तुलनेने ग्रामीण साहित्यात ही दाहकता कमी प्रमाणात दिसते.

एकेकाळी 'दलित साहित्य' 'दलित प्रवाह' असे शब्द या साहित्यासाठी

वापरले जात असतं. परंतु आता त्यात बदल झाला आहे. त्याऐवजी आंबेडकरी साहित्य, फुले आंबेडकरी साहित्य, फुले-शाहू आंबेडकरी साहित्य बहुजन साहित्य परिवर्तनवादी साहित्य असा उल्लेख होऊ लागला असून एका अर्थी 'दलित' संज्ञेला हा नकार आहे. एका सर्वोच्च वर्णाव्यतिरिक्त उरलेल्या सर्वच वर्णाची माणसे म्हणजे दलित म्हणजेच आंबेडकरवादी. तेच परिवर्तनवादी असा काहीसा सूर या संदर्भात ऐकू येतो म्हणण्यापेक्षा अलीकडच्या काळात दलित ही संकल्पना मागे पडून 'आंबेडकरी साहित्य' ही संकल्पना पुढे आलेली आहे. सर्वच दलित लेखकांनी याचा जागोजागी आवर्जून उल्लेख केलेला आहे व ते आता सर्वमान्यही झालेले आहे. एके ठिकाणी डॉ.यशवंत मनोहर लिहितात, 'संपूर्ण जीवनाची नवनिर्मिती करण्यासाठी जुन्या समाजरचनेचा तात्त्विक पाया नाकारायची गरज आहे. या प्रक्रियेलाच क्रांती म्हणतात'. आंबेडकरवादी साहित्य या क्रांतीचा जयजयकार करीत निर्माण झाले. त्यात आक्रोश आहे. जयजयकार आहे. सुरुवातीपासून ग्रामीण कादंबरीत असा आक्रोश सुरुवातीच्या काळात नव्हता. अलीकडे आला असला तरी एवढी दाहकता त्यात नाही.

'दलित कादंबरी' असा शब्दप्रयोग करीत असताना प्रामुख्याने जन्माने दलित असलेल्या कादंबरीकारांच्या कादंबरीचाच विचार केलेला आहे.दलित कादंबरीचा कालपट अवघ्या पन्नास वर्षाचा आहे. संख्याही तुलनेने कमी. उलट ग्रामीण कादंबरीचे आहे. १८८८ पासून सुरू झालेल्या ग्रामीण कादंबऱ्या शेकड्याच्या घरात आहेत. १९९१ पर्यंत अंदाजे २२८ कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. (मराठी कादंबरी, रवींद्र ठाकूर, पृष्ठ १४९)

दलित साहित्याच्या पहिल्या पिढीचे प्रमुख लेखक दोनच. शिवराम जानबा कांबळे आणि किसन फागुजी बनसोड. दुसऱ्या पिढीत लेखन करणारे व कथा कादंबरीतून स्वतःचा परिचय घडवून देणारे असे ठळक कादंबरीकार चारः ना.रा.शेंडे, अण्णाभाऊ साठे, बंधुमाधव आणि शंकरराव खरात. आणखी काही कादंबरीकारांनी या पिढीत लेखन केले. त्यात शंकरराव सुरडकर, हि.गो. बनसोडे, हरिभाऊ पगारे, ना.बं.जाधव यांचा समावेश होतो. तिसऱ्या पिढीतले बाबुराव बागूल, केशव मेश्राम आदी कादंबरीकार आहेत. पहिल्या व दुसऱ्या पिढीतील कादंबरी लेखनाचे स्वरूप मराठी कादंबरीच्या प्रभमावस्थेतील स्वरूपाप्रमाणे कल्पनारम्य व सहस्यपूर्ण वाटते. ग्रामीण कादंबरीचे स्वरूपही, बरेचसे असेच असले तरी सुद्धा बळीवा पाटील ही कादंबरी एक विचार देऊन जाते एवढे मात्र

खरे!

१९८० नंतरच्या काळातील दलित कादंबरी मात्र आशय व अभिव्यक्तीमध्ये आम्रुलाग्र बदल झालेली दिसते. गौतम बुद्धांनी दिलेली शिकवण, म.फुले यांनी संघर्षाची दिलेली जाणीव आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्यक्ष संघर्ष करण्याचा दिलेला आत्मविश्वास, यातून मिळालेली एक आंतरिक प्रेरणा या नंतरच्या कादंबरीकारांच्या लेखनातून स्पष्टपणे दिसून येते. येथील म.फुले यांनी 'संघर्षाची दिलेली जाणीव'. ग्रामीण कादंबरीकारांनीसुद्धा घेतलेली दिसते. खरं तर ग्रामीणांनी गौतम बुद्ध का स्वीकारत नाही याचं मला तरी कोडंच वाटतं. नेहमीकरिता तिसऱ्या पिढीतील दलित कादंबरीकारांचे लेखन विविधांगी स्वरूपाचे दिसून येते. यामध्ये दलित-सवर्ण संघर्ष, दुःखाचे चटके, भीषण दारिद्र्य, जातीपोटजातीतील हेवेदावे, खेडयातील वातावरण, गावकुसाबाहेरचे जगणे, अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी परंपरा, ग्रामव्यवस्थेतील नियम, राजकाराणासाठी दलितांचा वापर, विद्रोह, सूड, परिवर्तन, सम्यक क्रांती, विज्ञाननिष्ठा, आंबेडकरी चळवळ, भाषेच्या बाबतीत रूढ संकेतांना धक्के, समाजातील नेते, समाजाची मुक्त अर्थव्यवस्थेत झालेली कोंडी, आरक्षणाचा वाद अशा वेगवेगळया विषयांवर कादंबरी लेखन झालेले दिसून येते.

ग्रामीण भागातील दलितांना जातिव्यवस्थेबरोबरच ग्रामव्यवस्थेशीही संघर्ष करावा लागतो. हक्काची मजुरीही त्यांना वेळप्रसंगी मिळत नाही. संपूर्ण भावात त्यांना वाळीत टाकले जाते. महारांना मिळालेली सामूहिक इनामी जमीन बळकावली जाते. या सर्व बाबींचे वास्तवदर्शी चित्रण १९८० नंतरच्या कादंबरीकारांनी केले आहे. यामध्ये बाबुराव बागुल यांची 'अघोरी' १९८३ 'कोंडी' २०००, केशव मेश्राम यांची 'पोखरण' १९७९, 'अजून उजाडायचं आहे'. १९८१, 'अनाथ' १९८१, 'वेध' १९८३, 'देशोधडी', १९९८, 'हाताची घडी, तोंडावर बोट' २००१, सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र' १९८० भीमसेन देठे यांची 'इस्फोट' १९८० नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' १९८१, 'निगेटिव्ह स्पेस' १९८७, अशोक व्हटकर यांची 'मेलंलं पाणी', १९८२, 'बगाड', १९८४, 'बहात्तर मैल' १९८९, प्रेमानंद गज्वी यांची 'जागर' १९८२, बा.स.हाटे यांची 'युगविधान', १९८३, 'युगंधर' १९८८, बळवंत कांबळे यांची 'नापात' १९८४, 'झुलवा' १९८६, मखाईफ १९८८, मचिपाडफ १९८९, मभस्मफ १९९१, उत्तम कांबळे यांची मश्राद्धफ१९८६, 'अस्वस्थ नायक' २०००, भि.शि. शिंदे यांची 'उद्ध्वस्त'

१९८९ नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' १९९२, यशवंत मनोहर यांची 'रमाई' १९९१, नामदेव कांबळे यांची 'ऊनसावली' १९९७, 'सांजरंग' १९८९, लक्ष्मण गायकवाड यांची 'वडारवेदना' २०००, 'वकिल्या पारधी', २००२, जी.के. ऐनापुरे यांची 'अभिसरण' २००२, 'रिबोट' २००८ यासारख्या अनेक कादंबऱ्यातून महार, मांग, चांभार, देवदासी, आदीवासी, पारधी, तमासगीर, ढोर, वेश्या, मुरळी, मसनजोगी, अनाथ उपेक्षित समाजजीवनाचे चित्रण येते.

ग्रामीण कादंबरीतून उपेक्षित समाजजीवन येत नाही. शिवाय ग्रामव्यवस्थेशी संघर्ष करावा लागत नाही. तुलनात्मक विचार करता एक बाब स्पष्ट होते की, दलित कादंबरीतील कथा, अनुभव व्यक्तीचे असले तरी ती समूहाची बनते. इथे व्यक्तीपेक्षा समूह महत्त्वाचा असतो.समूह आणि व्यक्ती यांच्यातील ताणतणाव हा दलित कादंबरीला आकार प्राप्त करून देणारा ऊर्जास्त्रोत आहे. चातुवर्ण्याधिष्ठित पारंपरिक समाजाने केलेला अन्याय झुगारुन द्यायचा असेल, तर शोषित समाजाने एकत्र यायला हवे. दलित कादंबरीतील जाणिवेच्या मागे असलेला समूह या प्रेरणेतून आकाराला आला आहे. कारण दलित कादंबरी ही परंपरेतून निर्माण झालेली नसून ती विशिष्ट प्रयोजनातून निर्माण झालेली आहे.

दलित चळवळीच्या संदर्भातील काही कादंबऱ्या अशा हरिभाऊ पगारे यांची मकालिंदीफ, विजय शिरसाट यांची काळगर्भ, मुरलीधर जाधव यांची कार्यकर्ता शरणकुमार लिंबाळे यांची भिन्नलिंगी, उपऱ्या इत्यादी.

परंपरागत कसोटीच्या आधारे दलित कादंबरीचे मूल्यमापन करता येणार नाही. दलित लेखकाची जातच वेगळी, त्याचा जातिधिष्ठित अनुभव वेगळा. त्या अनुभवामागची भाषा वेगळी, हया बांधीलकीतून व्यक्त झालेला विचार वेगळा. हया विचाराने प्रेरित झालेली जाणीव वेगळी हया सगळया वेगळेपणाचे मिश्रण दलित साहित्यात व्यक्त झाले आहे. अशा प्रकारच्या दलित साहित्याच्या मूल्यमापनासाठी रूढ निकष वापरता येणार नाही.

भाषेच्या बाबतीत तर दलित कादंबरीने भाषा वापरातील रूढ संकेताना नाकारलेले दिसते. दलित लेखकांनी समर्थपणे बोलीभाषेचा वापर करून तसेच आशयाच्या गरजेपोटी अपरिहार्यपणे अश्लील शब्द शिव्यांचा वापर करून रूढ संकेतांना धक्के दिलेले आहेत. ग्रामीण कादंबरीत सुद्धा बोलीभाषेचा वापर केलेला दिसून येतो. मात्र अश्लील शब्द, शिव्यांचा वापर दलित कादंबरीत जास्त प्रमाणात केलेला दिसून येईल.

**ग्रामीण कादंबरी –**

स्वातंत्र्यपूर्व काळात, म्हणजे इंग्रजी अंमलात इंग्रजांच्या सार्वभौम सत्तेमुळे एकुण भारतीय समाजजीवनात न्यूनगंडाची भावना निर्माण झाली होती. परभृततेच्या भावनेला प्राधान्य मिळाले होते. हा न्यूनगंड ही परभृत ता समाजाच्या सर्वच स्तरापर्यंत पसरलेली होती. याची जाणीव करून देणाऱ्या महात्मा फुले यांच्या प्रयत्नांना हीन ठरवून त्याकडे दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे उच्चवर्णियांचे समाजाशी असणारे घनिष्ठ नाते संपुष्टात आले व साहित्याची निर्मिती, प्रकाशन, मुद्रण,वाचन, इत्यादी सर्वच बाबी मुठभरांपुरत्या व पुण्या–मुंबई सारख्या मनागरफ भागापर्यंत मर्यादित झाल्या. त्यांचा बहुजन ग्रामीणांशी संबंध राहिला नाही. त्यामुळे मराठी साहित्याचे एकूण वर्तुळ छोटे व मर्यादित झाल्याने स्वातंत्र्योत्तर व विशेषतः १९७० पर्यंत निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्याला मध्यमवर्गीय नागर मराठी साहित्याचे सर्वच पातळयांवर अनुगामित्त्व स्वीकारावे लागले.

स्वातंत्र्योतर कालखंडात स्वातंत्र्य, शिक्षण, ज्ञानप्रसार वगैरे कारणांनी बहुजन समाजाला जाग आली. आपल्या उपेक्षेची व सांस्कृतिक अन्यायाची जाणीव होऊ लागली. त्याला नवे आत्मभान आले व त्याने ग्रामीण साहित्याची संकल्पना व प्रवाहाची मागणी केली. त्यातूनच आधुनिक ग्रामीण साहित्य चळवळीची निर्मित झाली. आज ग्रामीण साहित्याच्या स्वतंत्र प्रवाहाची संकल्पना सर्वमान्य झाली.असली तरी ती मूलतः अर्वाचीन मराठी साहित्याच्या संकुचित भूमिकेची फलश्रुती आहे. (अर्थात हे प्रा.डॉ.गणेश देशमुखाचं मत काही मर्यदिपर्यंतच स्वीकारावं लागेल) केवळ संकुचित भूमिकेची फलश्रुती म्हणूनच या घटनेकडे पाहता येणार नाही. महात्मा फुल्यांचं तत्त्वज्ञान येथील बहुजन समाजानं स्वीकारलं होतं. महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांनी भूमी नांगरून, कुळवून तयार केली होती. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, यशवंतराव चव्हाण यांचे सुसंस्कृत नेतृत्त्व लाभलं होतं. अत्यंत दूरदृष्टीने त्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय धोरण आखलं होतं. त्याचा परिपाक समाज जागृतीत झाला. नवजागृत समाजानं, फुले–शाहू–आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या व आधुनिक, पुरोगामी आणि परिवर्तनवादाची कास धरणाऱ्या महाराष्ट्रानं नव्या प्रवाहाची मागणी केली. ती महाराष्ट्रात ग्रामीण मराठी साहित्याच्यारूपाने अवतरली.

दलित साहित्याची प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहे. तर ग्रामीण मराठी साहित्याला वरील गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत. अन्याय, अत्याचार

याला विरोध करण्यासाठी चळवळी करण्यात आल्या व त्यातून या दोन्ही प्रवाहांची निर्मिती झाली. मात्र दलितांवरील अन्याय, अत्याचार वेगळे व बहुजनांवरील अन्याय, अत्याचार वेगळे. किंबहुना दलितांवर अन्याय,अत्याचार करण्यात बहुजन सुद्धा होतेच! नव्हे तेच जास्त होते!

मराठी ग्रामीण कादंबरीला, पिराजी पाटील या १९०३ ला प्रकाशित झालेल्या, रा.वि.टिकेकरांच्या कादंबरीपासून सुरुवात झाली असे मानले जाते. त्यापूर्वी १८८८ ला बळीबा पाटील ही कृष्णराव भालेकरांची अथवा दीनमित्र मधून रामजी पाटील या कादंबरीची काही प्रकरणे प्रकाशित झाली. अर्वाचीन मराठी साहित्याच्या आरंभ कालापासून वास्तववादी प्रेरणेने लिहिल्या गेलेल्या या तीन ही साहित्यकृतीकडे त्या व नंतरच्याही काळात मराठी साहित्याने विशेष लक्ष पुरविलेले दिसत नाही. हे प्रा.डॉ.गणेश देशमुख यांचे मत मनोमन पटते. इतकेच कशाला मराठी नाटकाची सुरुवात तंजावर नृपती शहाजी राजे भोसले यांच्यापासून होऊनही त्याचं श्रेय अद्याही त्यांना दिलं जात नाही याचं कारण या संकुचित वृत्तीतच दडलेलं दिसून येत. शिवराम जानबा कांबळे व किसन फागुजी बनसोड आणि रा.वि.टिकेकर व कृष्णराव भालेराव ही नावे आता व्हाया गुलबर्गा दूरपर्यंत जात आहेत.

१९२० नंतरच्या काळात गांधीवाद, साम्यवाद समाजवाद इत्यादी अनेक कारणांनी ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली.ना.वि. कुलकर्णी यांनी मजूर, शेतकरी जीवनाचे चित्रण विस्ताराने केले. रामतनय, मामा वरेरकर, मुकुंदराव पाटीलयांचे लेखनही महत्त्वाचे आहे. परंतु 'गांधीवाद, साम्यवाद, समाजवाद' ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा होऊ शकत नाही हे आता सिद्ध झालेलं आहे. विशेषतः १९९० नंतरच्या कुठल्याही ग्रामीण कादंबरीतून हा कुठलाही वाद औषधालासुद्धा दिसून येत नाही. कष्टकऱ्यांनी लिहिलेल्या, श्रमजीवींनी लिहिलेल्या कादंबऱ्यांनी या सर्व वादाशी फारकत घेतलेली दिसून येते.

१९४१ च्या नंतरच्या काळात वास्तववादाबरोबर प्रादेशिकतेचा प्रत्यय या प्रवाहातून ठळकपणे येतो. विभावरी शिरुरकरांची 'बळी' अथवा श्री.ना.पेंडसे व गो.नी.दांडेकरांच्या कादंबऱ्यांचा निर्देश या संदर्भात करता येईल. 'गारंबीचा बापू', 'माचीवराला बुधा', 'पडघवाली' या त्यांच्या कादंबऱ्यांनी एकूण मराठी कादंबरीला प्रादेशिकतेचे मूल्यप्राप्त करून दिले. धनगर, आदीवासी, हिंदु-मुस्लीम संघर्ष, खेडयाची पडझड व होऊ पाहणाऱ्या बदलचे स्वरूप रेखाटणाऱ्या या

काळातील कादंबऱ्या विषय वैचित्र्यानेही नटलेल्या आहेत.

भूप्रदेश, निसर्ग, भाषा विशेष, समाज जीवन, आर्थिक चित्रण, सांस्कृतिक जीवन, राजकीय पार्श्वभूती या प्रमुख घटकांच्या आधारे विश्लेषण करून प्रादेशिक कादंबरीचे स्वरूप समजावून घ्यावे लागेल. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व कोकण या भागातील प्रादेशिक कादंबरीचा स्वतंत्रपणे विचार आताशा होतआहे. इतकी व्यापकता या प्रवाहाने निर्माण केली आहे. दलित कादंबरीची तुलना करता दलित कादंबरीत केवळ दलितांवरील अन्याय येतो पण ग्रामीणतेत ओबीसीपण त्यात येतात.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण साहित्याला उधाण आले. श्री.व्यंकटेश माडगूळकरांनी बनगरवाडी च्या रूपाने वास्तवदर्शी ग्रामीण कादंबरीचा मानदंड निर्माण केला.त्यांच्या 'वावटळ', 'पुढचं पाऊल', 'सत्तांतर', 'करूणाष्टकं' इत्यादी अन्य कादंबऱ्याही महत्त्वाच्या आहेत. मवावटळफ मध्ये गांधीवधानंतर खेडयापाडयात उसळलेल्या रौद्र प्रक्षोभाची आणि निर्माण झालेल्या कारुण्याची कहाणी असून सामाजिक नेतृत्त्व करण्याची आकांक्षा करणारा ब्राम्हणवर्ग या घटनेने उखडला गेला. ब्राहमणवर्गाच्या निर्वासनाची आणि पुनर्वसनाची आंदोलने, वावटळ मध्ये पकडण्याचा प्रयत्न केला आहे. असं र.बा.मंचरकर म्हणतात. मराठी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रातला एक बारीकसा फरक मला जाणवला तो असा- दलित, ग्रामीण कादंबरीत हिंदू-मुस्लीम संघर्ष, दलित-सवर्ण संघर्ष किंवा उच्चवर्णियांकडून शूद्रातिशूद्रांवर होणारे अत्याचार या प्रवाहातून दाखविण्यात आले. परंतु 'वावटळ' मध्ये होरपळणारा ब्राह्मण वर्ग दाखविला गेला हे वेगळेपण. ही विशेषतःवध या आणखी एका शब्दाकडे मी लक्ष वेधू इच्छितो. यादेशात म. गांधींचा वध झालानाही. हत्या झाली. राजा किंवा अधिकारी व्यक्ती गुन्हेगाराचा वध करतात. हत्या कुणीही, कुणाचीही करू शकतो. अनवधानाने असेल पण कथा-कादंबऱ्यांतून अशा शब्दांचा सर्रास वापर होतो व चुकीचा संदेश जातो, एवढेच मला या निमित्ताने सुचवायचे आहे.

श्री व्यंकटेश माडगूळकरांच्या समकालीन शंकर पाटलांनी 'टारफुला' ही एकमेव कादंबरी लिहून सत्ता-संघर्ष व शोषणाचे भयावह वास्तव चित्रण रेखाटले आहे. त्यानंतर अण्णा भाऊ साठेंच्या कादंबऱ्यांनी उपेक्षितांचे जीवनचित्रण थेटपणे करून मराठी ग्रामीण साहित्याला 'फकिरा' च्या रूपाने बंडखोर नायक प्राप्त करून दिला. अर्थात, अण्णाभाऊ साठेंच्या कादंबऱ्यांचा दलित कादंबऱ्यांतसुद्धा

समावेश होतो. 'धग', 'पाचोळा', 'नटरंग', 'गोतावळा' या सर्व परिचित कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीला नवे परिमाण प्राप्त करून दिले. मपाचोळाफ संपूर्ण बोली भाषेतील पहिली कादंबरी होय.

बा.भ.बोरकर (भावीण), रणजित देसाई (माझा गाव), मधु मंगेश कर्णिक (देवकी), जयवंत दळवी (महानंदा), हमीद दलवाई (इंधन), महादेव मोरे (रैत) ना.धों. महानोर (गांधारी) इत्यादींनी हा प्रवाह समृद्ध केला. 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा' इ.काही कादंबऱ्यांचा अपवाद वगळल्यास संख्यात्मकदृष्ट्या विस्तारलेली ग्रामीण कादंबरी १९७० पर्यंत नागरी वाचकांना रुचिपालटाचे समाधान आले. खेडे समजून सांगांवे या भूमिकेतूनच लिहिली गेलेली दिसते.

१९६० ते १९८० हा ग्रामीण साहित्याच्या इतिहासातील 'बहरा' चा कालखंड, मात्र या कालखंडात आनंद यादव, रा.र.बोराडे यांच्यासारखे अपवाद वगळता सातत्यपूर्वक कादंबरी लेखन करणारे लेखन नाहीत. महादेव मोरे, बाबा कदम, उद्धव शेळके, ब.बा. बोधे, रंगराव बापू पाटील यांच्यासारखे अस्सल अनुभव दर्शनाची तिजोरी असणारे लेखक 'मनोरंजनवादी' झाल्याचे दिसतात. याबद्दल डॉ.आनंद यादव यांनी, 'ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि समस्या' या पुस्तकात पृष्ठ ७८ वर या मर्यादावर स्पष्ट प्रकाश टाकला आहे. वास्तविक पाहाता या काळातील प्रश्न, समस्या, वास्तव, भीषण असूनसुद्धा ग्रामीण लेखकांना ते शब्दांत पकडता आले नाही.

१९९० नंतरचा कालखंड हा आधुनिक ग्रामीण साहित्य चळवळीचा कालखंड मानावा लागतो. ग्रामीण समाजजीवनात झालेले बदल, बेकारी, महागाई, दुष्काळ, पाणीटंचाई इ. अनेक समस्या उद्‌भवल्या. राजकारण शोषणाचे नवे हत्यार बनले. जातीयतेने नवे रूप धारण केले. या पार्श्वभूमीवर ग्रामीण साहित्य चळवळींद्वारे झालेली संमेलने, शिबिरे, कार्यशाळा, स्वतंत्र ग्रामीण साहित्य विचारांची मांडणी याद्वारे नवलेखकांना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे नंतरचे ग्रामीण साहित्य आत्मभान व स्वाभिमानाच्या तेजाने उजळून निघाले. ग्रामीण कादंबरीचे क्षितिज विस्तारले. १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यांची संख्या जवळपास दोनशेच्या घरात पोचते. १९९१ पर्यंत अंदाजे २२८ कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. १९८० ते १९९० या दशकात जवळवास ७० कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत.

रंगनाथ पठारे, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, राजन गवस, विश्वास

पाटील, माधव कोंडविलकर, सदानंद देशमुख, रवींद्र शोभणे, तानाजी राऊ पाटील, व.बा.बोधे, रंगराव बापू पाटील इ. लेखक समस्याप्रधान कादंबऱ्या लिहिणारे लेखक आहेत.

हाल्या हाल्या दुधू दे, पखाल, वारुळ, या बाबाराव मुसळे यांच्या कादंबऱ्यातून शेती, गाव, गावकी, भावकी, जाती– संघर्ष, राजकारण, भ्रष्टाचार, दारिद्र्य इ. कितीतरी प्रश्नांना कवेत घेणारी त्यांची कादंबरी आहे.

आंबी, पांगिरा, झाडाझडती, चंद्रमुखी या विश्वास पाटलांच्या कादंबऱ्यातून समाजातील उच्चभ्रू, समजल्या जाणाऱ्या मराठा जातीतील घरंदाजपणाच्या खोट्या अभिमानाचे, परंपराप्रियेतेचे दर्शन घडते. झाडाझडती मधून धरणग्रस्तांच्या प्रश्नांचे वास्तवनिष्ठ चित्रण येते. चंद्रमुखी तून कलावांतिणीची शोकात्मिका दाखविली आहे. ग्रामीण जीवनाला विविधांगी पद्धतीने विश्वास पाटील कवेत घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. राजन गवस हे तिसऱ्या पिढीतील कादंबरीकरार, चौडक, भंडारभोग, धिंगाणा, कळप, तणकट मधून ग्रामीण जीवनाची व्यामिश्रता व वास्तव प्रकट होताना दिसते. देवदासींच्या जीवनाची परवड, जोगत्यांचे जीवघेणे जगणे, सांगत असतानाच ग्रामीण तरुणांमध्ये निर्माण झालेली निराशा, वैफल्यग्रस्तता, जातीय तणाव सांगताना ग्रामीण नवशोषणाचे वेगवेगळे प्रकार व शोषितांच्या वेदनेचे प्रभावी चित्रण त्यांच्या कादंबऱ्यातून येते.

रथ, हारण, ताम्रपट इत्यादी महत्त्वाच्या कादंबऱ्यांतून रंगनाथ पठारे चिंतनशीलतेबरोबरचा ग्रामीण स्त्रीजीवनाची व्यथाही प्रभावीपणे रेखाटली आहे. मात्र केवळ ग्रामीण म्हणून त्यांचे लेखन अवतरत नाही.

तहान व बारोमास या दोन कादंबऱ्यांची निर्मिती करून आपले सर्जनसामर्थ्य दाखविणाऱ्या सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या मराठी ग्रामीण साहित्याचे सामर्थ्यशाली रूप दर्शविणाऱ्या आहेत. पाणीप्रश्न व नवशिक्षित तरुणांचे बारेमास प्रश्न त्यांनी समर्थपणे हाताळलेले दिसतात.

असं जगणं तोलाचं व धुळपेरणी या कादंबऱ्यांतून शेषराव मोहित्यांनी शेतकरी जीवनाचे दर्शन घडविले आहे. लग्न, त्यासाठी काढावं लागणारं कर्ज, शेतीवर ते फेडण्याची इच्छा व उत्पन्न पत्करणारा हाणमू आजच्या शेतकऱ्याचे प्रातिनिधिक रूप आहे. शेषराव मोहिते केवळ समस्या मांडत नाहीत तर त्यावर प्रभावशाली उपायसुद्धा सुचवितात.

नामदेव कांबळे यांच्या राघववेळ, मोराचे पाय, सेलझाडा या कादंबऱ्यांतून

मातंग समाजातील दारिद्र्य, जातीयता याचबरोबर बलुतेदारांची झालेली होरपळ इथे समर्थपणे प्रगट होताना दिसते. पुरुषोत्तम बोरकरांच्या मेड इन इंडिया व आमदार निवास रूम नं. १७५६ या दोन्ही कादंबऱ्यांतून ग्रामीण राजकारण, स्वार्थी प्रवृत्ती, शोषणवृत्ती यांचा दंभस्फोट केलेला दिसून येतो.

१९७२ च्या दुष्काळाचे चित्रण करणारी भीमराव वाकचौरे यांची रानखळगी व शेतीची भीषण अवस्था चित्रित करणारी 'गराडा' तसेच मोहन पाटलांच्या 'लिंगाड व खांदेपालट', 'बस्तान', 'साखरपेरा', गणेश आवटे यांच्या 'गणगोत', 'चकार', 'पाणसळ', अण्णासाहेब देशमुखांच्या 'गोदडी', 'फरपट', 'डोंगराने कात टाकली', रवींद्र शोभणे यांच्या 'रक्तध्रुव' व 'कोंडी', बाबा भांड यांच्या 'काजोळ' व 'दशक्रिया' इ.सह उत्तम बंडू तुपे, माधव कोंडविलकर, सुरेश द्वादशीवार, विजय शिरसाठ अशा कितीतरी कादंबरीकार व कादंबऱ्यांचा निर्देश करता येईल.

ग्रामीण साहित्य चळवळीनंतरच्या म्हणजे १९८० नंतरच्या त्या कादंबऱ्या इथे केवळ उपेक्षित जीवन, त्याची वेदना. बहुतांशी गंभीरपणे व अंतर्मुख होऊन चित्रण करणारी ही कादंबरी. या कादंबरीने भाषेच्या बाबतीत अधिका जागरुकता दाखविलेली दिसते. विविध समस्यांचा मागोवा या दलित कादंबऱ्यांतून घेतला गेला.

★★★

# ग्रामीण, दलित साहित्य चळवळ व मराठी साहित्य

प्रा. सुनील निगडे

**प्रास्ताविक :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विशेषतः १९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, आदीवासी साहित्य असे विविध साहित्य प्रवाह उदयास आले. त्यापैकी दलित व ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा विशेष लक्षणीय असा आहे. महात्मा फुले यांनी या देशातील शूद्रादिशूद्र समाजाच्या उन्नतीसाठी, विकासासाठी जी विचारसरणी मांडली त्याचा प्रभाव ग्रामीण साहित्याशी पडलेला दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील खेडी वरवर बदलत गेली. परंतु या खेड्यात आर्थिक परावलंबी, जातीयता, कर्जबाजारीपणा, शोषण, विषमता इत्यादी प्रश्नांची मात्र अधिकच जुन्या प्रश्नात भर पडली. काही थोडे धनिक शेतकरी सोडले तर अल्पभूधारक, शेतमजूर, छोटे-मोठे कारागीर, स्त्रिया यांची जगण्याची झुंज चालूच होती. एकीकडे हरितक्रांती झाली परंतु सामान्य माणसाची दुःखे मात्र आहे तशीच राहिली. अशा ग्रामसंस्कृतीचे चित्र रंगविण्यासाठी १९६० नंतर अनेक लेखक पुढे आले. ते सामाजिक जाणिवेने लिहू लागले. कथा, कादंबरी, कविता, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारात बदलत्या जाणिवेचे स्वरूप प्रत्यक्षात येऊ लागले. ग्रामीण साहित्याची नवी वळणे चाक मात्र फिरत ठेवा असा आग्रह धरू लागली. ग्रामीण साहित्य व दलित साहित्याच्या रूपाने एकाच गावातील अभिव्यक्ती गाव व गावकुस या अंतराने जाणवू लागली. ग्रामीण साहित्यात जाती व्यवस्थेविरुद्ध बंडाची भाषा जरी व्यक्त होत नसली तरी ग्रामीण मध्यमवर्गीय जीवन मात्र व्यक्त होऊ लागले. बदलती खेडी, बदलते समाजजीवन, नवे विज्ञान-तंत्रज्ञान याकडे हे साहित्य डोळसपणे पाहू लागले.

**ग्रामीण या संज्ञेचा अर्थ :**

१९२० च्या आसपास ग्रामीणता या संज्ञेचे अर्थ मर्यादित होते. परंतु आज त्यात कितीतरी भर पडलेली दिसते. त्यासाठी ग्रामीणतेची पूर्वापीठिका समजावून घ्यावी लागेल. ग्रामीण हे विशेषण स्वातंत्र्योत्तर काळात घडलेल्या व

निर्माण झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन परिवर्तनातून जन्मलेले आहे. हे विशेषण वापरत असताना भौगोलिक तसेच भाषा विशिष्ट स्वरूपाची साहित्य परंपरा आणि जीवनपद्धती, जीवनशैली इत्यादी अनेक संदर्भाची अपेक्षा असते. या शब्द प्रयोगात प्रथमत: प्रदेशाचा संदर्भ येताना दिसून येतो. ग्रामीण म्हटल्यानंतर लगेच आपणासमोर विरोधाभासाने नागर हा शब्द येतो आणि या दोन्ही शब्दांना भौगोलिक संदर्भ प्राप्त झालेला आहे. ग्रामीण साहित्यातून ज्या स्वरूपाचा जीवनानुभव असतो तोही ग्रामीण भौगोलिक संदर्भाशी निगडीत असतो. त्याचप्रमाणे ग्रामीण माणसाची जीवनपद्धती भाषा या सर्व पद्धतीवर भौगोलिक परिस्थितीचा अंकुश असतो. त्याचप्रमाणे ग्रामीण हा शब्द प्रयोगातून वेगळी अशी वाङ्मयीन परंपरा सूचित करतो. ग्रामीण परिसरात जगणाऱ्या माणसाची बोलीभाषा ग्रामीणच असते. त्या भाषेचाही संदर्भ येथे अपेक्षित असतो. तसेच ग्रामीण भागात विभिन्न अशा जीवन पद्धतीशिवाय जीवनशैलीच्या मर्यादित चाकोरीत जगणाऱ्या या ग्रामीण माणसाचे जीवनानुभवसुद्धा वेगळे असताना दिसतात. या सर्वांचा निर्देश ग्रामीण या विशेषणात होत असतो. म्हणजेच थोडक्यात ग्रामीण साहित्य म्हणजे कृषीतील अथवा कृषी संस्कृतीचे प्रतिबिंब होय. त्यातून भौगोलिक भाषा वेगळी अशी जीवनपद्धती यांचा बोध होतो.

सर्वत्र अभ्यासक्रम एकच असला तरी ग्रामीण शिक्षकांच्या समस्या वेगळ्या आहेत. उद्योग म्हटला तरी ग्रामीण उद्योग व शहरी उद्योग यात भेद असलेला दिसून येईल. मानवी स्वभावाच्या बाबतीतही हेच दिसून येते. मानवी स्वभावालाही परिस्थितीप्रमाणे आणि प्रदेशाप्रमाणे वेगवेगळे कंगोरे प्राप्त होताना दिसतात. म्हणजेच जीवनाच्या सर्वच क्षेत्रात ग्रामीण व शहरी असा भेद दिसतो. ग्रामीण शिक्षण, ग्रामीण राजकारण, ग्रामीण अर्थकारण, ग्रामीण समस्या इत्यादी शब्द वापरताना त्यातून ध्वनित होणारा अर्थ एक विशिष्ट अशी जीवनपद्धती ध्वनित होत असतात.

असे असले तरी नागर आणि ग्रामीण या दोन्ही विभागामध्ये काही आदान-प्रदान चालते ते ही खरे. या आदान-प्रदानाचा परिणाम परस्परावर होतो. हे ही उघड आहे. तरीही ग्रामीण व नागर या संज्ञा ठसठशीतपणे जाणवू लागल्या या मात्र औद्योगिकरणानंतरच. एकोणिसाव्या शतकात मध्यावर इंग्रज भारतात आल्यानंतर औद्योगिकरणाला भारतात प्रारंभ झाला. साधारणत: १८८० च्या दरम्यान आपल्याकडे मोठ्या प्रमाणात कापड कारखाने उभे राहू लागले. इतरही

उद्योग शहरात स्थिर झाले. वाहतुकीचे साधन रेल्वे बनली. साहजिकच आपल्या देशातील खेड्यामध्ये एक प्रक्रिया सुरू झाली. लोक खेडे सोडून शहरात जाऊ लागले. महाराष्ट्रातही ही प्रक्रिया घडली. महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यातील माणूस हा मुंबईकडे जाऊ लागला व त्यामुळे शहराच्या आकारमानात वाढ झाली. महानगरांची संख्या वाढू लागली. या प्रक्रियेला प्रारंभ मात्र १९ व्या शतकाच्या मध्यावर झाला.

सार्वजनिक शिक्षण पद्धतीचाही परिणाम ग्राम व नागर या संज्ञाच्या सीमारेषा वाढविण्यावर झाला. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा दूरगामी परिणाम आपल्या देशावर झाला. या शिक्षणाचे स्वरूप इंग्रजी राजवटीला मदत करणारे होते. हे शिक्षण प्रारंभी शहरामधून केंद्रित झालेले होते. महाराष्ट्रात मुंबई आणि पुणे या दोन शहरात शिक्षण दिले जाऊ लागले. प्रारंभीच्या काळात ज्या शैक्षणिक व इतर काही चळवळी झाल्या त्या या दोन शहरापुरत्याच मर्यादित होत्या. परंतु कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या ध्येयाने पछाडलेल्या माणसाने ग्रामीण भागात शिक्षणाचा श्रीगणेशा केला. परंतु तेव्हा फार उशीर झाला होता. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार शहरात सुरू झाला हे मात्र चर्चेतून सिद्ध होते. परंतु या शिक्षणाच्या प्रसारामुळेही ग्रामीण व नागर या दोन संज्ञा अधिक ठळक झाल्या. या शिक्षणाच्या प्रक्रियेमुळे माणूस खेड्यापासून तुटत गेला. म्हणजेच औद्योगिकरणामुळे जशी माणसे आपले पोट भरण्यासाठी खेड्यातून शहराककडे जाऊ लागली तशी माणसे शहरात स्थिर झाली. त्यामुळे शहरे मोठी होऊ लागली. सर्व सोयी-सुविधा शहरामध्ये प्राप्त होऊ लागल्याने एक अर्थव्यस्थेचे केंद्र म्हणून शहराची ओळख वाढू लागली. परंतु खेड्यातून कर गोळा करून शहरावर तो खर्च होऊ लागला. हे मात्र फुले यांनी त्यावेळी ठणकावून सांगितले म्हणजेच औद्योगिकरण, नवे शिक्षण जस जसे वाढत गेले तसे शहर आणि खेडे यांच्यातील अंतर वाढत गेले व त्यातून ग्रामीण ही संज्ञा आकाराला आली.

ग्रामीण या विशेषणाची गरज स्वतांत्र्योत्तर कालखंडात अधिक भासली. कारण समाजात जे परिवर्तन झाले, जो जीवनानुभव आपण अनुभवतों, भासतो त्याचे प्रतिबिंब आपण अनुभवत असलेल्या साहित्यात आढळत नाही. केवळ शहरी माणसेच साहित्याचे प्रतिनिधित्व करतात. ही गोष्ट स्वातंत्र्योत्तर काळात मराठी माणूस जागृत झाल्याने व त्याच्या लक्षात आल्याने आपल्या आशा, आकांक्षा, सुख-दुःख यांचे चित्रण ग्रामीण साहित्यात होऊ लागले. तशा प्रकारची

निर्मिती साहित्यात होऊ लागल्याने तिचे रूपांतर पुढे प्रवाहात झाल्याने ग्रामीण साहित्य नावाची एक वेगळी चूल मराठी साहित्यात उदयास आली. खेडेगाव, खेड्यातील माणसांची जीवनपद्धती, शेती, माणूस, निसर्ग या घटकामुळे साहित्यातील ग्रामीणता ज्याप्रमाणे दिसून येते त्याप्रमाणे प्रादेशिकता, परिसर, सहजाविष्कार, बोलीभाषा, वृत्ती-प्रवत्ती इ. गोष्टींमुळे ग्रामीण साहित्याचे वेगळेपण लक्षात येऊ लागले.

सामाजिक परिवर्तनाला प्राधान्य देऊन सामाजिक बांधिलकी मानणारे साहित्य म्हणून ग्रामीण साहित्याचा जन्म झाला. ग्रामीण साहित्याच्या निर्मितीच्या पाठीमागे अनेक शतकापासून अस्तित्वात असलेली समाजस्थिती कारणीभूत आहे. भारतीय संस्कृतीची जडण-घडण ही खेड्यांच्या आजूबाजूला झालेली आहे. या खेड्यात चातुर्वर्ण व्यवस्था चालू होती. तिचे मुख्य केंद्र शेती आणि श्रमशक्तीचे विभाजन हे होते. दुर्दैवाने नंतरच्या काळात अपप्रवृत्ती निर्माण होऊन व्यवसायनिष्ठ घटना जातिवाचक संज्ञेने ओळखल्या जाऊ लागल्या. धर्म आणि ज्ञान या क्षेत्रामध्ये ब्राम्हण वर्गाने आपले श्रेष्ठत्त्व सिद्ध केले व समाजशोषण चालू ठेवले. त्यातून ग्रामीण व बहुजनांची संस्कृती उदयास आली. त्यातच इंग्रजांच्या आगमनाने कृषी संस्कृतीचा पराभव होऊन सामाजिक जागृती निर्माण होऊन राष्ट्रवादी संकल्पना विकसित झाली. टिळकांच्या मृत्यूनंतर स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे महात्मा गांधीकडे आली आणि ८०% असलेल्या ग्रामीण जनतेकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले. गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन समाजसुधारक खेड्याकडे वळले. लेखक, कलावंत खेड्याकडे वळले त्यातून ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली. उदा. रविकरण मंडळ.

ग्रामीण साहित्य हे महात्मा फुले यांच्या काळापासून लिहिले जात होते. परंतु १९२० नंतरच्या ग्रामीण साहित्याची मात्र दखल घेतली गेली. साहित्याच्या चळवळीची भाषा सुरू झाली. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या विरोधाला प्रतिकूल परिस्थितीत अभिप्रायांची नोंद होऊ लागली. त्याला कारण म्हणजे ग्रामीण व दलित साहित्याच्या प्रेरणा सारख्याच होत्या हे होते. त्यात फरक नव्हता. प्रस्थापित अभिरुची व लेखन संकेत यांची नाळ ग्रामीण साहित्याशी परस्परपूरक होती. ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाल्याबरोबर अशी प्रतिकूल भूमिका घेतली जाऊ लागली. कारण ग्रामीण साहित्याने अभिरुचीच्या संदर्भात संघर्षाची भूमिका घेतली गेली.

खरेतर त्यावेळी ग्रामीण भागातील नवपिढी आता लिहू लागली होती. कारण आपली माणसे, आपला गाव, त्यांचे वास्तव भोवतीच्या साहित्यात कुठेच नाही असे वाटू लागले होते. ग्रामीण जीवनात, कृषी संस्कृतीत जे जीवनानुभव घेतले त्याचे वास्तव स्वरूप वर्णन करावे असे वाटू लागले.

मानवी जीवनामध्ये काही असंतोष निर्माण झाला की, वाङ्मयीन जगतामध्ये चळवळी सुरू होतात, चळवळीची भाषा सुरू होते. याचा प्रत्यय आपल्याला अगदी मध्ययुगीन सांप्रदायिक चळवळीपासून ते वर्तमान चळवळीच्या इतिहासात येतो. अशा चळवळीची पाळेमुळे असंतोषाने ग्रासलेल्या समाजात खोलवर रुजलेली दिसतात. ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या संदर्भात सुरू झालेली भाषेला तत्कालीन सामाजिक कारणे तेथे दिसतात. महाराष्ट्रात १९७१ ते ७४ मध्ये दुष्काळ पडलेला होता. त्यावेळी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले. त्यामध्ये जमिनीचे छोटे-मोठे तुकडे, सुशिक्षित बेकारी, नवीन बी-बियाणे, नवीन खते असे प्रश्न मांडले. या प्रश्नांनी छळलेला हा शेतकरी हा त्या लेखकांचा मुख्य विषय बनला. त्यातच येऊ घातलेल्या औद्योगिकरणामुळे खेडी ओस पडू लागली हा विषयही लेखकांनी आपल्या चिंतनाचा बनविला. या सर्व कारणामुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये असतोष पसरला त्याची नोंद लेखकांनी घेतली.

खरे तर महात्मा फुले यांच्या काळापासूनच या असंतोषाला सुरुवात झाली होती. अनेक प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केले होते. शेतकऱ्यांनी अनेक उठाव आपल्या प्रश्नासंबंधी केले होते. त्यातूनच महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा असूड या कलाकृतीचा जन्म झाला. असे उठाव महाराष्ट्राबाहेरही होत होते. बंगालमध्ये शेतमजुरांचा उठाव झाला होता. महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली चंपारण्यातील सर्व परिचित झालेला लढाही हा त्यापैकी एक होता. त्यांनी असहकाराच्या माध्यमातून उठाव केला होता. म्हणजेच स्वातंत्र्य मिळेपर्यंत शेतकऱ्यांच्या चळवळी सुरू होत्या.

महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांचे लढे झाले. शरद जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरू झाले ते १९७२-७३ नंतर त्या काळात आपल्या शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. यासाठी ही शेतकरी संघटना लढा देऊ लागली. शरद जोशी यांच्यामुळे ग्रामीण भागात जागृती निर्माण झाली. यामुळे ग्रामीण साहित्य चळवळीला एक आधार प्राप्त

झाला. म्हणजेच ग्रामीण साहित्याची चळवळ उभी राहील्यानंतर अनेक लेखकांनी आपल्या भोवतीचे भीषण वास्तव चितारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी महात्मा फुले यांच्या वाङ्मयाशी नाते जोडण्याचा प्रयत्न करू लागले. म्हणजेच त्यांचे तत्त्व त्या लेखकांना पटू लागले. त्यामुळे ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदलले.

या ग्रामीण साहित्याच्या चळवळीला उभी करण्यामध्ये रा. र. बोराडे, आनंद यादव या लेखकांचा प्रमुख असा वाटा आहे. बोराडे यांनी ग्रामीण आत्मकथनांची शिबिरे भरविली तर आनंद यादव यांनी स्वतंत्र संमेलने भरवून ग्रामीण साहित्याचे वेगळेपण सिद्ध केले. ग्रामीण साहित्याच्या चळवळीनंतर मोठी लेखकांची पिढी आकाराला आलेली आहे. त्यामध्ये भास्कर चंदनशिवे, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, विठ्ठल वाघ, प्रतिभा इंगोले, बाबाराव मुसळे, तानाजी पाटील, आनंद पाटील असे कितीतरी ग्रामीण लेखक-कवी लिहू लागले. या सर्व लेखकांनी ग्रामीण जीवनाच्या उपेक्षेची, शेतकऱ्यांच्या उपेक्षेची पाळेमुळे भांडवलावादी अर्थव्यवस्थेत असल्याचे त्यांना जाणवले. अर्थ व्यवस्थेची आणि संस्कृतीची पुनर्मांडणी करावी लागणार आहे याची जाणीवही या लेखकांना होती. हा मोठा प्रश्न ग्रामीण साहित्य चळवळीने प्रस्थापित साहित्य व्यवस्थेपुढे निर्माण केला.

या ग्रामीण चळवळीचा मराठी ग्रामीण साहित्यावर एक चांगला परिणाम झाला. ग्रामीण साहित्याचे विश्व विस्तारले. आत्मकथन नावाचा आगळा-वेगळा वाङ्मयप्रकार निर्माण झाला. वाङ्मयाची आस्था थेट खेड्यापर्यंत गेली. त्यात ग्रामीण समाजाचे दर्शन घडू लागले. बोलींना अभिव्यक्तीत स्थान मिळाले.
मराठी साहित्यात दलित साहित्याने मोलाची भर घातली आहे. त्यामध्ये आशय आणि अभिव्यक्तीदृष्ट्या भाषेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. आजपर्यंत अपरिचित असलेली भाषेची अनेक रूपे दलित साहित्याने प्रकट केली. एवढेच नव्हे तर भारतीय जीवनविषयक, संस्कृतीविषयक, कलाविषयक चिंतनाला प्रेरणा मिळाली ती दलित साहित्याचे उदयाने. मराठी साहित्याला एक बंधिस्त चाकोरीतून बाहेर काढून सामाजिकतेचे एक प्रभावी अंग तर दिलेच परंतु त्याचबरोबर व्यापक जाणिवेचे, क्रिया प्रतिक्रियात्मक जागृतीचे प्रभावी चैतन्य निर्माण केले. एकंदरीत कलादृष्ट्या अनेक कथाकार, अनेक कवी, चरित्रकार जन्माला आले ते दलित साहित्यातून.

निखळ मानवता हे दलित साहित्याचे केंद्र असल्यामुळे प्रचलित मराठी

साहित्यातून वेगळे मूल्य, वेगळी आशयघनता, जाणिवेची वेगळी रूपे, अभिव्यक्तीची नवी तंत्रे निर्माण होतील. अशा प्रकारचा विश्वास दलित साहित्याने निर्माण केला आहे. दलित साहित्य चळवळीने अनेक दलित तरुण-तरुणींना लिहिते केले व त्यामुळे मराठी साहित्यामध्ये काही अव्वल दर्जाच्या साहित्यकृतींची भर घातली. त्यामुळेच दलित लेखकांमध्ये एक आक्रमक आत्मविश्वास निर्माण केला. हे दलित चळवळीचे मराठी साहित्याला दिलेले योगदान आहे. दलित साहित्याने महत्त्वपूर्ण असे अभिसरण सुरू केले. पूर्वासृश्य जातीजमातींच्या गतजीवनाविषयी अज्ञान होते ते दूर झाले. ही महाराष्ट्रीयन समाज जीवनाच्या व मराठी साहित्याच्या निकोप वाटचालीच्या दृष्टीने मोठी फलसिद्धी आहे.

मराठी साहित्याला दलित साहित्याने सामाजिक भान दिले. दलितांना व दलिततेतरांना आपण सामाजिकदृष्ट्या कोठे आहोत याची कल्पना या साहित्याने दिली. त्यामुळे मराठी साहित्याला एक गती प्राप्त झाली. साहित्य व समाज यांच्यादृष्टीने ही घटना महत्त्वाची आहे.

मराठी साहित्याला दलित साहित्याने एक मौलिक दृष्टी दिली. दलित साहित्यातील नायक खूप प्रभावीपणे व बेडरपणे उभा राहतो. असा नायक मराठी साहित्याने यापूर्वी पाहिलेला नाही आणि म्हणूनच मराठी साहित्यावर दलित साहित्यामुळे एकीकडे जसा सामाजिक परिणाम झाला तसा साहित्यिक परिणामही झाला. अज्ञात असलेल्या जीवनाची दालने दलित साहित्यामुळे उघडी झाली. या साहित्याने सामाजिक भान तीव्र केले. मराठी साहित्याच्या इंद्रिय संवेदनेचे अनुभवविश्व जे मर्यादित होते ते व्यापक बनविले. मराठी साहित्याला विविधता, विचित्रता दलित साहित्याने दिली.

आजच्या दडपलेल्या अनुभवविश्वाला दलित साहित्याने मुक्त केले. एवढेच नव्हे तर या नव्या अनुभवविश्वाला सामोरे जाण्याचे धाडस दलित चळवळीने दिले. आजपर्यंतच्या मराठी साहित्यात कल्पनेलाच अधिक महत्त्व होते. वास्तवता कमी होती. परंतु दलित साहित्याने कल्पनेला फाटा देऊन वास्तवतेला अधिक महत्त्व दिले आणि माणूस जोडऱ्याचे फार महत्त्वाचे कार्य या वास्त रूपाने दलित साहित्याने केले.

अभिव्यक्ती व आविष्काराच्या बाबतीत दलित साहित्याने मराठी साहित्याला फार मोठी देणगी दिली आहे. दलित साहित्याने नवा आशय, नवी शैली दिली. मराठी साहित्याला आत्म निवेदनाचा नवा फॉर्म दिला. उदा. बलुतं

(दया पवार), मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे (माधव कोंडविलकर) आठवणींचे पक्षी (प्र. ई. सोनकांबळे) इत्यादी.

दलित साहित्याने प्रस्थापित समीक्षेला देखील नवी परिमाणे दिली. साहित्याचे पारंपरिक निकष विषम समाज व्यवस्थेकडून निर्माण झालेले असल्याने ते दलित साहित्याला लावता येणार नाही अशी भूमिका दलित साहित्य समीक्षकांनी घेतली. यांच्या मते दलित साहित्य हे पेटत्या धगधगत्या जीवनातून निर्माण झालेले असून त्यात अनुभवातील संपन्नता, आशयातील उत्कटता, मायबोलीतील रसरशीतपणा वेगळाच आहे. दलित लेखक हा स्वत:शी, त्याच्या जीवन अनुभवाशी प्रामाणिक असतो. त्याच्या पेटत्या मनाची अस्मिता त्याच्या साहित्यातून व्यक्त होत असते. त्यामुळे दलित साहित्यीकांची साहित्यकृती स्वतंत्र रूप धारण करते. ती आपल्या मायबोलीशी, आपल्या मातीशी इमान राखते. दलित समीक्षेविषयी प्रा. म. भि. चिटणीस म्हणतात की, मराठी समीक्षा ही मराठी साहित्यावर वाढलेले बांडगुळ आहे. ही समीक्षा येथील जमिनीतून स्फुरली नाही. परंतु दलित साहित्य हे जीवनवेधी आहे. ते संस्कृतीचे एक अंग आहे. अशा प्रकारे मराठी साहित्याला सामाजिक आशय देणाऱ्या दलित साहित्याने मराठी समीक्षेला पुनर्विचार करण्यास प्रवृत्त केले आहे.

★★★

# ग्रामीण दलित तमाशा प्रधान कादंबरी

डॉ.दिलीप कसबे

तमाशा या कलेतून तमाशा कला-कलावंतांच्या व्यथा, वेदना अन्याय अत्याचार जीव घेणे जगणे मरण यातना अपमान अवहेलना त्यांच्या कुटुंबाची कुचंबना मानसिक, भावनिक, कोंडमारा, शारीरिक हाल त्यांचे सामाजिक स्थान याबद्दलच्या जाणिवा वैजंयता, नटरंग आणि चंद्रमुखी या कादंबऱ्यांतून ध्वनित होताना दिसते.

मराठी साहित्यात काही मोजक्याच लेखकांनी या विषयावर लेखन केले आहे. या विषयावर 'वैजयंता' नावाची पहिली कादंबरी अण्णाभाऊ साठे यांनी लिहिली. अण्णाभाऊ साठे हे तमाशा कलावंत होते. गजरा आणि चंद्रा यांच्या स्पर्धेच्या संघर्षातून या कादंबरीच्या कथानकाची निर्मिती होते. उतारवयात गजराला फड सांभाळणे कठीण जाते. त्यात चंद्राने केलेल्या अपमानामुळे ती तमाशा सोडते. नवती नृत्य आदाकारी या सर्व दृष्टीने चंद्रापुढे ती कमी पडते. कलाकारांच्यामध्ये तिचा अपमान होतो. कलेचा अपमान झाल्यामुळे सुडासाठी शाळा सोडून वैजयंताला फडात नाचविण्याचा निश्चय करते. गजराची जिद्द आणि परसूची चिंता यावर एकच उपाय म्हणजे फक्त वैजयंता. आपल्या वाट्याला आलेल्या व्यथा वेदना यातना मुलीला द्यायची तिची इच्छा नसते. तिचा संसार उभा करावा असे गजराला वाटत असते. फक्त सुडापोटी वैजयंताला फडात नाचविण्याचा निश्चय करते. वैजयंताही फडात नाच करायला तयार होते. उमा व वैजयंता या दोघांचे प्रेम असते. वैजयंताने शिकावे संसार करावा चांगले जीवन व्यतीत करावे. असे उमाला वाटते. उमाचे वडील ज्योती यांना बाप नसलेली सून नको असते. वैजयंता समोरच्या परिस्थितीत हतबल होऊन तमासात नाचन्यास तयार होते. आईचा ताल ठेका आणि लकबी तिने पाहिलेल्या अनुभवलेल्या असतात. शास्त्रीय रियाजही झालेला असतो. उमाचे मन मोडून ती स्टेजवर चढते आणि चंद्राला हरवते. तमाशा जगतात सर्वांना ती वेड लावते. चंदुलाल तिच्यावर फिदा होतो.तिला पळवून नेण्याचे कारस्थान करतो. त्याची कारस्थाने सफल होत नाहीत. त्याच्याकडून जंगी दादाचा खून होतो. तो तुरूगात जातो. खंदापूरला उमाचंद्रा आणि वैजू परसू फडाची जुगलबंदी आबा पाटील ठेवतो. त्यावेळी

चंदुलाल तुरुंगातून पळून वैजयंताचे नाक कापण्याचा आणि बलात्कार करण्याचा घाट रचतो. परंतु तिच्या उग्र रूपापुढे त्याला पश्चातापाची पाळी येते. वैजयंता जुगलबंदी जिंकते, दंगल होऊ नये म्हणून उमा वैजयंताच्या स्टेजवर येतो. दोघे मिळून वग करतात. दोघांची तटातूट गळून पडते आणि दोघांचे मिलन होते.

कलाकारांवर येणारी अनेक संकटे प्रसंग त्यांची हतबलता प्रसंगी करारी वृत्ती कलाकारांच्याकडे बघण्याची समाजाची दृष्टी कलाकारांची घुसमट आणि ठेकेदारांची चांदी या कादंबरीचा नायक गुणा मातंग समाजातील आहे. आपली गरिबी दूर होईल. पैसा मिळेल कलाही जगाला दाखवता येईल.या आशेने तमाशा उभा करतो. त्याला मांगवाड्यातील जोडीदार साथ देतात अनेक अडचणींना तोंड देत पांडबाच्या मदतीने तो तमाशा उभा करतो. त्यासाठीचे लेखनही तोच स्वतःच करतो. पण पोरींशिवाय तमाशा कोण बघणार असा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा पांडबाच्याच मदतीने यमुनाबाई कोल्हापूरकरणीच्या मुली शोभना नयनासह तमाशा उभा राहतो. पण यमुनाबाईच्या सर्व अटी मान्य कराव्या लागतात. तमाशात नाच्या असेल तरच तमाशा चालेल या नैनाच्या मागणीमुळे पुन्हा प्रश्न निर्माण होतो. प्रत्येक जण नाच्याच्या भूमिकेला नकार देतो. शेवटी कलेवर नितांत श्रद्धा आणि प्रेम असणारा गुणाच नाच्या होतो. त्याचा बाप त्याला शिव्या देतो. तमाशात काम करणे हे बिन लग्नाच्या माणसांच्या पोरांचे काम या भांडणात गुणा बापावर हात उचलतो. त्याची बायको दारकीमध्ये पडते. गुणा नाच्या होतो त्यांच्या भूमिकेची वाहवा होते. पण घरातील सर्वांनाच पदोपदी अपमान, अवहेलना सहन करावी लागते. शिर्पा दारकीला म्हणतो. गुणा फालूत आहे. पोर दुसऱ्याची आहेत. सर्व तिच्याकडे शंकेच्या नजरेने पाहतो.गुणाचा पोरगा राजा याला छक्क्याचा पोरगा म्हणून सर्वजण चिडवतात. एकेठिकाणी तमाशा चालू असताना नाच्याचे काम संपल्यानंतर गुणा अर्जुनाची भूमिका करतो. आनंदाच्या भरात काम करत असताना पब्लिक म्हणते अर्जुन नको नाच्या पाहिजे. छक्क्याचा नाच पाहिजे. नाहीतर आमचे पैसे परत द्या. दंगा होतो. तमाशाचे सामान जळून जाते. काही तरुण गुणाला पकडतात.त्याच्यावर अत्याचार करतात. तो विनवणी करतो. मला पोरं बाळ आहेत.तुम्हाला तुमच्या पोरांची शपथ. पण चार पाच पैलवान त्याला खाली पाडतात. अमानुषपणे त्याच्यावर अत्याचार करतात आणि त्याचे पुरुषत्त्व संपुष्टात येते.अशा मनस्थितीत तो जेव्हा घरी येतो.तेव्हा पेपरातून बातमी गावात कळलेली असते.त्याची बायको माहेरी जाते. तो सासरला जातो.तिथे त्याला

स्वतःच्या मुलाकडूनच अपमान सहन करायला लागतो. तो तसाच फिरतो गुणाकडे सर्वच जण याच नजरेने पाहतात. त्याच्याकडून शरीर सुखाची आशा करतात. पण तो कलेवर प्रेम करणारा एक कलंदर कलाकार आहे. त्याच्या भावना कोणालाच कळत नाहीत. कलेवर प्रेम करणाऱ्या माणसाची शोकांतिका होते.

तमाशात असणारी हुल्लडबाजी प्रेक्षकांची बेरकीपणा, गावगाड्यातील गावगुंड त्याची कलेकडे पाहण्याची वृत्ती आपला स्वार्थ साधणारे इतर कलाकार व तमाशातील सर्व मंडळी आणि सर्वांचा विरोध पत्करून कलेची सेवा करणाऱ्या गुणाची अस्वस्थता आनंद यादवांनी नटरंग या कादंबरीत मांडली आहे. तमाशाच्या भरभराटीचा काळ आणि नाच्याचा अनंताचा कालखंड हा या कादंबरीचा एक विशेष आहे. कारुण्य आणि विनोद ही भाषेची वैशिष्ट्ये लेखकांनी चांगल्याप्रकारे मांडली आहेत. अनुभवांना अनेक पदर आहेत. पांडबा नाना, गुणा दारकी, नैना इ. व्यक्तिरेखा कादंबरीत वेगळाच ठसा उमटून जातात. नटरंगाची मूर्ती अनेक गोष्टी सूचित करते. नटरंग ही कादंबरी गुणाच्या शोकांतिकतेची कहाणी आहे. दारकीच्या अगतिकतेची राजाच्या बालमनाची घुसमट आहे. यादवांची भाषा ही कोल्हापूरी थाटाची आहे.

चंद्रमुखी ही विश्वास पाटलांची वेगळी कलाकृती आहे. चंद्रमुखी ही हिरा आणि उमा याची पोरगी लग्नाच्या आणाभाका झाल्यानंतर दहा वर्षांनी जन्माला आलेली मुलगी उमा जातीन डोंबारी हिराने त्याच्यासाठी नोकरी सोडली आणि त्याच्यामागे आली. एकदा पौर्णिमेच्या दिवशी तमाशा चालू असताना अचानकपणे कनातीला आग लागते. संपूर्ण सामान जळून खाक होते. हिरा आणि चंद्रमुखी रस्त्यावर येतात. तमाशासाठी काढलेल्या कर्जाचा बोजा डोक्यावर असतो. मदत घेण्यासाठी त्या दोघी रामसिंग भाऊकडे जातात. परंतु त्याची नजर चंद्रमुखीवर असते. तो त्यांना मदत करीत नाही. गोडांबे चित्रपटात जाण्याचा सल्ला देतात. पण तिथेही वेगळाच अनुभव येतो आणि त्यांना माघारी फिरावे लागते. बांगडीवाले शेठ कडून १५ लाख कर्ज घेतलेले असते. त्याचे १७ लाख होतांत. तो त्यांना वेठीस धरतो. बांगडीवाला शेठ आणि त्याचा पोरगा कांतिमल दोघांचाही डोळा चंद्रमुखीवर असतो. बांगडीवाल्या शेठने पैशाचा तगादा लावलेला असतो. अशावेळी लालन त्यांना भेटते. ती बांगडीवाल्याशेठच्या तावडीतून त्यांना सोडविते चंद्रमुखीचा सौदा करते आणि चंद्रमुखी तमाशातून सारंगफाट्याच्या संगीतबारीत हजर होते. इथल्या सत्य गोष्टी हळू हळू चंद्रमुखीला कळायला

सुरुवात होते आणि तिची पूर्ण निराशा होते. एके दिवशी मैफिल चालू असताना तिचा चीरा पाडला जातो आणि राजकारणातील एक बडा माणूस नाना तिच्यावर अमानुष अत्याचार करतो आणि तिचे सर्वस्व संपते. ज्या गोष्टीबद्दल तिला राग असतो. तिच परिस्थिती तिच्या आयुष्यात येते. कर्जाच्या ओझ्याखाली बुडालेली चंद्रा तेथून सुटत नाही. सारंगफाट्यावर तिला दुसरा एक खासदार भेटतो दौलतराव ती त्याच्यावर प्रेम करू लागते. कारण इतर लोकांसारखा माणूस नाही असे चंद्राला वाटते. पण शेवटी तो सत्ता आणि राजकारणासाठी खूर्ची आणि अब्रू वाचविण्यासाठी पत्नीची सहानुभूती मिळविण्यासाठी चंद्रमुखी सोडतो. तिला सर्व गोष्टी देतो. पण तिचा स्वीकार करत नाही. चंद्रमुखी आणि दौलतच्या संबंधाची चर्चा वर्तमान पत्रातून होते. पत्रकार परिषदेत चंद्रमुखीला बोलवले जाते. ती दौलत काय पण सर्व मंत्री रात्री आमच्या बारीमध्ये येत असतात. ओल्या मैफिली होतात. पत्रकार परिषदेत सर्वांचे वाभाडे काढून ती पुन्हा आपल्या विश्वात येते. राघव जी गाणी लिहितो. ज्याला दिसत नाही. त्याला साथ देते. असा या कादंबरीचा आशाय.

या कादंबरीत विश्वास पाटलांनी राजकर्त्यांच्या अंधारातील कृत्यांची मांडणी केली आहे. राज्यकर्ते अधिकारी आणि समाजात उच्चभ्रू समजली जाणारी सर्व माणसे रात्री संगीत बारीला हजेरी लावतात. तिथे त्यांची अब्रू लुटतात आणि दिवसाढवळ्या उजळ माथ्याने फिरतात. तेथील स्त्री कलाकारांच्या आयुष्याशी खेळतात आणि शेवटी स्वार्थ साधून त्यांना सोडून देतात. केवळ उच्चभ्रू वर्गातील लोक कलाकारांची पिळवणूक करत नाहीत. तर त्याला साथ देणारे लालन आणि बुट्टे यांचे सारखे ठेकेदार, बांगडीवाला कांतिलाल रामसिंग यांच्यासारखे सावकार सुद्धा पैसे वसूल तर करतातच पण शारीरिक सुखाची सुद्धा अपेक्षा करतात. एकूण काय समाजातील प्रत्येक घटक हा 'स्त्री' चे लचके तोडण्यास टपलेलाच आहे. हे चंद्रमुखी काय? करारी बाण्याची चंद्रमुखी सुद्धा त्यातून सुटत नाही. त्यांना माणूसपणाने कोणी वागवत नाही. पण चंद्रमुखी मात्र माणुसकीच्या भावनेने डॉलीचा संसार वाचवते. दौलतची सत्ता वाचवते हा आगळा वेगळा स्वभाव चंद्रमुखीचा आहे. चंद्रमुखी डॉली संवाद चंद्रमुखी पत्रकार संवाद चंद्रमुखी दौलतचा संवाद यातून तिच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू डोळ्यासमोर उभे राहतात.

विश्वास पाटलांनी चंद्रमुखी या कादंबरीच्या निमित्ताने संगीतबारीच्या पार्टीत चालणाऱ्या सर्व बारीक सारीक गोष्टींचे अतिशय मार्मिक आणि सूक्ष्मपणे

वर्णन केले आहे.या कादंबरीत पठ्ठे बापूराव यांच्या कवनांची उदाहरणे भरपूर दिली आहेत.तसेच पठ्ठे बापूरावांच्या काळातील आणि त्यांच्या परंपरेतील अनेक कलाकारांची नावे दिली आहेत.तसेच वाद्याच्या काही लकबीही मांडल्या आहेत. काही ठिकाणी भाऊ फक्कडचीही कवने आहेत.वैजयंता नटरंग आणि चंद्रमुखी या तीनही कादंबऱ्यांचे स्वरूप विचारात घेता काही वैशिष्ट्ये आपल्याला लक्षात येतात.

१) तीनही कादंबऱ्यांच्यामध्ये तमाशा कला आणि कलावंत यांच्या व्यथा वेदना मांडल्या आहेत. २) तीनही कादंबऱ्यातील भाषा आणि अनुभव सकस आहेत. ३) समाजातील खोटेपण बेगडीपणा या कादंबऱ्यामधून दिसतो. ४) वैजयंता, चंद्रमुखी, गुणा हे कलेवर नितांत प्रेम करतात. कलेवर त्यांची श्रद्धा आहे. कलेसाठी ते आपल्या लोकांचासुद्धा त्याग करतात. वैजयंताचे उमावर प्रेम असते. पण ती त्याला सोडून तमाशात नाचते. तिने संसार करावा अशी उमाची इच्छा असते. त्यामुळे त्यांची दोघांची ताटातूट होते. चंद्रमुखी ही दौलतला सोडते. पण कलेला सोडत नाही. त्याच्या सर्व सुखांना झुगारून ती पुन्हा पार्टी सुरू करते. गुणा म्हणतो माझ्यातली कला ना दारकीला कळली ना नैनाला, दारकीला संसार प्रिय वाटला तर नैनाला ताल, ठेका. याच्यापलीकडची कला कधीच कळली नाही. मी कलेसाठी नाचत राहणार आई, बाप, बायको-मुले यांना कलेसाठी सोडून देतो. पुरुष काय किंवा स्त्री काय कोणताही कलाकार असेल तर त्याच्या वाट्याला भोग हा ठरलेलाच हे तीनही कादंबऱ्यामधून जाणवते.

या तीनही कादंबऱ्यामधून जे जीवन आणि अनुभव व्यक्त होतात. ते अतिशय जिवंत आहे. मुळात तीनही लेखक हे प्रतिभावान आणि अनुभव समृद्ध लेखक आहे. जीवनाकडे साहित्याकडे व्यापक दृष्टीने ते पाहतात. त्यामुळे अनुभवही व्यापक मांडले आहे. या कादंबऱ्याही वेगवेगळ्या कालखंडातील असल्यामुळे त्या कालखंडातील काही गोष्टी त्यांनी मांडल्या आहेत. आज तमाशा कलाकार आपला अनुभव लिहू लागला आहे. त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचे लेखन कादंबरीच्या रूपाने प्रकाशित झाले तर मराठी साहित्याला वेगळीच दिशा मिळेल असे वाटते.

शिक्षणाचा अभाव त्यामुळे त्यांच्यामध्ये हतबलता येते. कर्माचे भोग आहे. ते भोगलेच पाहिजे. प्रत्येक लेखकाने वेगळ्या पद्धतीने अनुभव मांडले आहेत. या कादंबऱ्यांच्या निमित्ताने वेगळ्या जीवन जगणाऱ्या माणसांची ओळख नव्या जगाची ओळख होते.

★★★

# 'राजकीय चित्रण करणारी ग्रामीण दलित कादंबरी'

**प्रा. डॉ. विकास प्रभाकर वीर**

## १. प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर कालखंडाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास राजकीय कादंबरीच्या संदर्भात निराशाच पदरी पडते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये सत्ताधारी परकीय असल्यामुळे त्यांच्या विरोधात लिहिणे सोपे होते. परंतु स्वातंत्र्यानंतर स्वकीय राज्यकर्तांच्या विरोधात लिहिणे अवघड बनले. पर्यायाने राजकीय कादंबऱ्यांची संख्या रोडावली. स्वातंत्र्यानंतर जसजशी वर्षे जाऊ लागली तसतशी सुराज्य, रामराज्य, ग्रामराज्य हे स्वप्नवत वाटू लागले. स्वकीय सत्ताधाऱ्यांकडून अन्याय, अत्याचार यांचे प्रमाण वाढले. व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होऊन अणीबाणी लादली जाऊ लागली. तेव्हा पुन्हा एकदा राजकीय कादंबरी लिहिली जाऊ लागली. राजकीय चित्रण करणाऱ्या ग्रामीण–दलित कादंबरीचा तुलनात्मक विचार करण्यापूर्वी राजकीय कादंबरी म्हणजे काय? हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

## २. राजकीय कादंबरी:–

राजकीय कादंबरी म्हणजे ज्या कादंबरीत राजकीय कल्पनांचा वा राजकीय वातावरणाचा वापर प्राबल्याने–ठळकपणे केलेला असतो ती कादंबरी. ज्या कादंबरीत राजेरजवाडे, दरबार, सरकारी कामकाज, मंत्रिमंडळ असे राजकारणाशी संबंधित विश्व आहे ती कादंबरी राजकीय असतेच असे नाही किंवा राजकारणाची चर्चा करणारी पात्रे ज्या कादंबरीत असतात तिलाही राजकीय कादंबरी असे म्हणता येणार नाही. राजकीय कादंबरीमागे अस्सल अनुभूतींचे प्रत्यंतर असणे आवश्यक असते. कारण राजकीय हालचाली, डावपेच तत्त्वविचारांचे आचरण वा उल्लंघन अशा बाबतींमध्ये केवळ कल्पनेवर विसंबून सत्याचा आभास देणारे चित्रण होऊ शकणार नाही. राजकीय कादंबरीत 'राजकीय कृती', 'राजकीय चौकट' ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. राजकीय कादंबरी ही 'राजकीय' असली तरी कादंबरी म्हणून तिचे मूल्यमापन करताना त्या कादंबरीने आपल्या जीवनावर कोणता प्रकाश टाकला आहे आणि आपल्याला कोणती नैतिकदृष्टी दिली आहे हेच महत्त्वाचे ठरते. राजकीय कादंबरीत अंतर्गत ताण असतात. ती कादंबरी

असते म्हणजेच मानवी वर्तणूक आणि भावना यांचे चित्रण तिच्यात असतेच. पण त्याचबरोबर पात्रांच्या गतविधींमधून आधुनिक विचारसरणीचा प्रत्यय तीत यायला पाहिजे. तत्त्वप्रणाली व नैतिक वर्तन यांचा भावनात्मक ताण निर्माण करणे हे राजकीय कादंबरीकाराचे कार्य असते.

### ३. राजकीय कादंबरीलेखन कमी का?–

"एखाद्या वाङ्मयीन कृतीत येणारे राजकारण म्हणजे जणू एखाद्या संगीताच्या मधूर मैफिलीत उडालेल्या पिस्तुलाच्या बारासारखी कर्कश आणि अभिरुचीहीन गोष्ट आहे. परंतु तरीही ती एकदम आपले लक्ष वेधून घेते ही गोष्ट नाकारता येणार नाही." असे स्तान्धाल या फ्रेंच कादंबरीकाराचे म्हणणे आहे. स्तान्धालच्या या विचाराचा विपरीत परिणाम मराठी कादंबरीकारावरती झालेला दिसून येतो. उदाह्यण म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'वावटळ' (१९६४) कादंबरीचे सांगता येईल. महात्मा गांधी यांच्या हत्येमुळे झालेल्या दंगलीचे चित्रण माडगूळकरांनी या कादंबरीमध्ये केलेले आहे. परंतु दंगलीमागील राजकीय कार्यकारणभाव शोधण्याचा लेखक प्रयत्न करत नाही. यासंदर्भात भा.ल.भोळे लिहितात, "गांधीहत्येनंतर उणापुऱ्या सोळा वर्षांनी त्यांनी ही कादंबरी लिहिली असूनही घटनाक्रमाच्या शब्दचित्रणापलीकडे तिच्यातील निवेदन जाऊ शकत नाही हे खटकल्यावाचून राहत नाही. लेखक कुठेही त्या दुर्दैवी घटनेचे राजकीय कार्यकारण कलात्मक चौकटीतून का होईना पाहण्याच्या फंदात पडत नाही. गांधीहत्या, दंगल–जाळपोळ आणि काँग्रेसी राजकारण यांच्यातील विचारप्रणालीत्मक संदर्भ तो शोधत नाही.... व्यक्तीव्यक्तींमधील संबंधापेक्षा अधिक खोलवरचा संदर्भ त्यासाठी तो देऊच शकत नाही, असेही म्हणण्याला अवसर सापडतो की इतर मध्यमवर्गीयांप्रमाणे लेखकाचाही आधुनिक बहुजनसत्ताक राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तुच्छतावादी असावा आणि त्याची वृत्ती राजकारण नामक 'गलिच्छ' खेळांपासून दूर राहण्याची असावी. आपले लेखन न– राजकीय असावे असा जाणीवपूर्वक वा अभावितपणे प्रयत्नही त्यांच्या हातून झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही." भा.ल. भोळे यांचे हे निरीक्षण 'राजकीय' लेखनाकडे मराठी लेखक कोणत्या दृष्टीने पाहतो हे दर्शविणारे आहे. असे असले तरी मराठीमध्ये राजकीय कादंबरीलेखन झालेले दिसून येते. प्रस्तुत लेखामध्ये मराठी साहित्यातील राजकीय चित्रण करणाऱ्या ग्रामीण दलित कादंबरीचा

तुलनात्मक विचार करावयाचा आहे.

### ४. राजकीय चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी:–

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदीवासी इ. प्रवाह जन्माला आले. साठोत्तरी कालखंडामध्ये ते अधिक बह्यले. कथा, कविता, कादंबरी, नाटक इ. वाङ्मयप्रकारांच्या माध्यमातून सकस साहित्यनिर्मिती सर्वच प्रवाहांमधून होऊ लागली. ग्रामीण साहित्यामध्येही सर्वच वाङ्मयप्रकारांच्या माध्यमातून लेखन झालेले दिसून येते. ग्रामीण कादंबरीचा विचार करता १९ व्या शतकाच्या प्रारंभी ही कादंबरी लिहिली जाऊ लागली. प्रारंभी रंजनपरतेमध्ये अडकलेली ही कादंबरी साठोत्तरी कालखंडात अनेक अंगाने विस्तारत गेली. समाजाच्या सर्व घटकांना, विषयांना, समस्यांना आपल्या कवेत घेऊन ग्रामीण कादंबरी समृद्ध बनली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर खऱ्या अर्थाने ही कादंबरी अधिक वास्तववादी बनली. समाजातील दु:ख, दैन्य, दारिद्रय, दुष्काळ यांचे चित्रण करतानाच ग्रामीण कादंबरी राजकीय घडामोडींवरती भाष्यही करू लागली. 'टारफुला' (१९६४), 'शिदोरी' (१९६८), 'गांधारी' (१९७३), 'मेड इन इंडिया' (१९८७), 'आमदार सौभाग्यवती' (१९८९), 'विषवृक्षाच्या मुळरा' (१९८९), 'झाडाझडती' (१९९०), 'धिंगाणा' (१९९२), 'कोंडी' (१९९२), 'ताम्रपट' (१९९४), 'आमदार निवास रूम नं. १७५६' (१९९९), 'बारोमास' (२००२), 'पाडा' (२००६), 'नामदार श्रीमती' (२००७), 'रौंदाळा' (२००८), 'धूळपावलं' (२००९) इ. कादंबऱ्यांमधून राजकीय चित्रण आलेले दिसून येते. सर्वच कादंबऱ्या ह्या निखळ राजकीय कादंबऱ्या आहेत असे म्हणता येणार नाही परंतु राजकीय आशय प्रभावीपणे त्यामधून प्रकट होतो हे आपणास नाकारता येणार नाही.

''राजकीय कादंबरीचा आत्मा म्हणजे राजकारण. कादंबरीतून राजकारण वजा केल्यास जर कादंबरीच्या आत्म्याला धोका पोहचत नसेल तर ती राजकीय कादंबरी होऊ शकणार नाही. राजकारणाशिवाय राजकीय कादंबरी सिद्ध होऊ शकत नाही.'' या विधानाचे प्रत्यंतर रा.र.बोराडे यांच्या 'आमदार सौभाग्यवती' (१९८९) या कादंबरीमधून घडते. ही राजकीय कादंबरी समकालीन महाराष्ट्रातील राजकारणावर बेतलेली आहे. ती राजकीय सत्तास्पर्धेतील वृत्तीप्रवृत्तीची निदर्शक आहे. राजकीय सत्तासंघर्ष हा या कादंबरीचा आत्मा आहे. राजकीय स्वार्थासाठी नात्यागोत्यांची बंधनेही न जुमानण्याची वृत्ती चिमणरावांच्या वर्तनातून दिसून

येते. राजकारणाचं अभद्र, घाणेरडं, गलिच्छ विधिनिषेध न बाळगणारं स्वरूप या कादंबरीमधून प्रकट होते. पक्षीय गटबाजी, शह–काटशह देण्याची प्रवृत्ती, राजकीय डावपेच, राजकारणातील स्त्री–पुरुष भेद, सत्तेची धुंदी, सूडसत्र यावरती ही कादंबरी झगझगीत प्रकाश टाकते. मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने पाहणाऱ्या चिमणराव यांचे विधानसभेचे तिकीट नाकारण्यात येते. त्याऐवजी त्यांच्या पत्नीला सुमित्राला तिकीट दिले जाते. 'तुमच्या भल्यासाठी मी अर्ध्या रात्री आमदारकीचा राजीनामा देईन' असे म्हणणारी सुमित्रा आमदार झाल्यानंतर बदलते. तिची राजकीय महत्त्वकांक्षा बळावते. काही कालावधीनंतर चिमणराव मुख्यमंत्र्यांच्या विरोधात वातावरण निर्माण करण्यात यशस्वी होतात. मुख्यमंत्री राजीनामा देतात. चिमणरावांचे स्वप्न सत्यात उतरण्याची चिन्हे दिसू लागतात.

विरोधी गट सुमित्राची राजकीय महत्त्वकांक्षा वाढवत असतो. चिमणरावांच्या मुख्यमंत्रीपदासाठी आपल्याला राजीनामा द्यावा लागणार म्हणून सुमित्रा हताश होते, पराभूत होते येथेच कादंबरी संपते. या कादंबरीचा पुढचा भाग 'नामदार श्रीमती' (२००७) या नावाने प्रसिद्ध झाला आहे. या कादंबरीतील संघर्षाचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की हा संघर्ष केवळ बेरकी, कारस्थानी, मुत्सद्दी चिमणराव विरुद्ध जिद्दी, स्वाभिमानी, आततायी सुमित्रा असा असला तरी तो पुरुषप्रधान प्रवृत्तीशी अधिक निगडित आहे. म्हणून तर 'पतीला आमदारकीचं तिकीट मिळावं म्हणून देव पाण्यात बुडवून जप करणाऱ्या सुमित्राला राजकारणातून संपविणाच्या, तिचं मंत्रीपद धोक्यात आणण्याच्या इराद्यानं तिच्या विरुद्धची निवडणूक लढविताना 'करा किंवा मरा' असा क्रूर सूचक संकेत हा पुरुषी अहंकार देतो. एवढंच नव्हे तर 'कळपातील जनावर कळपाबाहेर जाऊ नये म्हणून त्याला जखमी करायचं असतं' या न्यायानंच हा पुरुषी अहंकार स्वतःच्या पत्नीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवतो. म्हणून या कादंबरीतील राजकीय सत्तासंघर्षाला अव्याहत, विश्वात्मक स्वरूप लाभते.

स्वातंत्र्यानंतर पंचायत राजच्या माध्यमातून गावपातळीपर्यंत सत्ताकेंद्र विखुरले गेले. व्यक्तिगत स्वार्थ आणि सत्ताकांक्षा यासाठी राजकीय नेते अत्यंत छुप्या मार्गाने लोकांची फसवणूक करतात याचे प्रातिनिधिक चित्रण राजण गवस यांच्या 'धिंगाणा' (१९९२) व 'तणकट' (१९९९) या कादंबऱ्यांतून येताना दिसते. 'धिंगाणा' कादंबरीतील आबा पाटील, गणपत पाटील, ह्यबा झील हे नेते ग्रामपंचायत, दुध डेअरी, सोसायटीची सत्ता स्वतःकडे ठेवतात व गावचे शोषण

करतात. 'तणकट' कादंबरीमध्ये बाळासाहेब शेडबाळे, सत्यपाल धर्मरक्षी, अवचित भालेराव, जालिंदर बनसोडे, फणींद्र कांबळे या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून गवस यांनी समाजपरिवर्तनाच्या चळवळीमध्ये निर्माण झालेली विकृती दाखविली आहे. समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट डोळरासमोर ठेवून शोषित समाजाच्या शोषण मुक्ततेसाठी सुरू झालेल्या चळवळीमधील कार्यकर्त्यांची प्रसिद्धीलोलुपता, नेतृत्त्वाचा हव्यास, भ्रष्टाचारी वृत्ती यामुळे पोखरल्या जातात या बाबींवरही गवस यांनी प्रकाशझोत टाकला आहे.

निसर्ग, जागतिकीकरण व सरकारी धोरण हे घटक खेड्यांची दुरावस्था करण्यास कारणीभूत आहेतच परंतु त्याचबरोबर राजकारणही यासाठी जबाबदार आहे या गोष्टीकडे कृष्णात खोत यांची 'रौंदाळा' (२००८) ही कादंबरी निर्देश करते. राजकारण कसे करू नये, असू नये याचा वस्तुपाठ म्हणजे ही कादंबरी. राजकारणातून आज तत्त्वनिठा नट होऊ लागली आहे. थोडीबहुत जी शिल्लक असेल त्याच्यावरच घाव घालण्याचा प्रयत्न या व्यवस्थेमध्ये होतो आहे. पांडू पाटील हा या व्यवस्थेचा प्रतिनिधी आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये गावातील सत्तास्थाने आपल्याच हातामध्ये राहिली पाहिजेत. यासाठी वाट्टेल ते करणारा, लोकांची फसवणूक करणारा, सोसायटीमध्ये भ्रष्टाचार करणारा, लोकांची भांडणे लावून तोडी करून पैसे लुबाडणारा, जातीय-धार्मिक सलोखा बिघडवून अराजक निर्माण करणारा एवढेच नव्हे तर सरपंचपद आपल्या गटाला मिळावे म्हणून बाळू डवंगाचे घर उद्ध्वस्त करणारा हा पांडू पाटील आहे. परंतु तरीही या पांडूचे राजकारण गावामध्ये जोरात चालू आहे. सोसायटीच्या निवडणुकीमध्ये पराभूत झाल्यानंतर तो दुसरी सोसायटी काढतो. त्या सोसायटीचे शेअर्स निम्मे गाव घेते. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये ९ पैकी ४ सदस्य त्याचे निवडून येतात ही धोक्याची घंटा आहे. खेड्यातील राजकारण आज कोणते रूप धारण करते आहे याचा हा वस्तुपाठ आहे 'राजकारण' हा मुख्य विषय कवेत घेऊन महेंद्र कदम यांच्या 'धूळपावलं' (२००९) या कादंबरीचे कथानक पुढे सरकत राहते. राजकारणाच्या गुंतागुंतीमुळे निर्माण झालेल्या समस्या व त्या समस्यांचा सर्वसामान्य लोकांच्या जीवनावर होणारा परिणाम, त्यातून निर्माण होणारी हतबलता, अगतिकता, अस्वस्थता अंतर्मुख करणारी आहे. साम, दाम, दंड, भेद या सर्व तंत्रांचा वापर करून राजकारणात घराणेशाही अगदी देशपातळीपासून ते गावपातळीपर्यंत असते. पंतप्रधानपदापासून ते सरपंचपदापर्यंत चालत असते.

गावातील सरपंचपद मिळविण्यासाठी आबासाहेब देशमुख, रामभाऊ देशमुख व पंडितराव देशमुख कोणकोणते डावपेच लढवतात त्याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीमध्ये येते. एकूणच राजकीय चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी गावपातळीवरील सरपंचपदापासून ते राज्यपातळीवरील मुख्यमंत्री पदापर्यंतच्या राजकारणातील डावपेचांचे चित्रण करते. त्याबरोबरच समाजसुधारणेच्या चळवळीतील विकृती, सहकार क्षेत्रामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्ती, धरणग्रस्तांच्या लढ्याचे चित्र व शेतकरी संघटनेच्या लढ्याचे चित्रही रेखाटते. ग्रामीण भागातील राजकारण, समाजकारण ढवळून काढणाऱ्या चळवळी, शासनाचे नियम व त्याचे ग्रामीण समाजजीवनावर झालेले परिणाम व त्यातून उद्भवलेले राजकीय संघर्ष याचे चित्रण ग्रामीण कादंबरी करते.

### ५. राजकीय चित्रण करणारी दलित कादंबरी:-

साठोत्तरी कालखंडानंतर दलित साहित्याचा प्रवाह जोमाने सुरू झाला असला तरी त्यापूर्वीही अपवादात्मक स्वरूपामध्ये दलित साहित्य लिहिलेले दिसून येते. ना. रा. शेंडे यांची 'शृंगारलेले प्रेम' ही पहिली दलित कादंबरी म्हणून ओळखली जाते. 'बलिदान' (१९६९), 'दंगल' (१९८१), 'निगेटिव्ह स्पेस' (१९८७), 'गांधारीचे डोळे' (१९८५), 'उलट चालिला प्रवाहो' (१९८५), 'काळगर्भ' (१९९०), 'एका नक्षवाद्याचा जन्म' (१९९२), 'उपऱ्या' (१९९८), 'एन्काऊंट्य' (१९९८), 'कोंडी' (२०००), 'श्राद्ध' (२०००), 'अभिसरण' (२००२) या कादंबऱ्यांमध्ये राजकीय चित्रण केलेले दिसून येते. यापैकी 'श्राद्ध' व 'सभापती' या कादंबऱ्या निखळ राजकीय कादंबऱ्या आहेत तर उर्वरीत कादंबऱ्या ह्या दलित चळवळीतील राजकारणावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. मुळातच दलित साहित्यामध्ये कादंबरी हा वाङ्मयप्रकार खूपच थोड्या लेखकांनी हाताळलेला आहे. त्यामुळे दलित कादंबरी पुरेशा प्रमाणात लिहिली गेली नाही. यासंदर्भात बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, ''कादंबरीसारख्या व्यापक वाङ्मयप्रकाराच्या निर्मितीसाठी बहुपरिमाणात्मक, बहुपेडी अनेकार्थग्राहक, स्वेतरमतसमावेशक अशा चिंतनाची गरज असते. दलित साहित्यिकांमध्ये आजच्या घडीला ही दृष्टी नसल्यामुळे कादंबरीसारख्या वाङ्मय प्रकाराची निर्मिती त्यांच्या हातून होऊ शकत नाही. या दृष्टिकोनाची आजचा अपेक्षा करणे अकाली ठरणारे आहे.''

राजकीय पक्षातील दुहीचे दाहक चित्रण ज. वि. पवार यांच्या 'बलिदान'

(१९६९) या कादंबरीमधून येते. जगन आणि बापू या दोन मित्रांवरती आधारित असलेली ही कादंबरी आंबेडकरी विचारधारा आणि कम्युनिस्ट विचारधारा यावरती प्रकाशझोत टाकते. दोन्ही मित्रांमध्ये वैचारिक मतभेद निर्माण होतात. त्याचे पर्यवसन कटुतेमध्ये होते. त्यातूनच जगनचा खून होतो. या कादंबरीमधून वर्तमानकालीन सत्य लेखकाने आपल्यापुढे मांडले आहे. राजकीय पक्षामध्ये चाललेली गटबाजी भयानक आहे. सत्य इथून केव्हाच पळाले आहे. अशातही प्रामाणिकपणे काम करणाऱ्या नि:स्वार्थी समाजकार्यकर्त्यांची मुस्कटदाबीच होते. अनेकांची जीवने, आयुष्ये त्यामुळे बरबाद होतात. जगन हा त्याचा बळी आहे. याउलट राजकीय जीवनात मिळालेल्या अधिकाराने मदान्ध झालेल्या, स्वार्थी असलेल्या व्यक्ती मात्र उजळमाथ्याने वावरताना दिसतात. बापू हा त्याचा प्रतिनिधी आहे. कादंबरीतील संघर्ष हा दोन व्यक्ती, दोन विचारसरणी व दोन प्रवृत्तींचा आहे.

'दंगल' (१९८१) व 'परपुरुष' (१९८८) या शरणकुमार लिंबाळे यांच्या दोन स्वतंत्र कादंबऱ्या 'भिन्नलिंगी' या नावाने एकाच कादंबरीत प्रसिद्ध केल्या आहेत. यापैकी 'दंगल' ही कादंबरी राजकीय व्यवस्थेवर भाष्य करते. 'राम' ही कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा दलित चळवळीतील कार्यकर्ता आहे. प्रस्थापितांच्या व्यवस्थेविरुद्ध लढताना तो पराभूत होतो असे चित्रण कादंबरीमध्ये येते. क्षुल्लक कारणांवरून दलितांना छळायचे, त्यांच्या झोपड्या जाळायच्या, मारहाण करायची ही नित्याची बाब आहे. बाबासाहेबांचा पुतळा बांधण्यास सरकारने संमती द्यावी म्हणून दलित तरुण उपोषण करतात. आत्मदहनाचा इशारा देतात. त्यातूनच दंगल निर्माण होते, संघर्ष वाढतो, दलितांची घरे उद्ध्वस्त होतात, दलित तरुणींची अब्रू लुटली जाते. तरीही अटक वॉरंट मात्र दलित कार्यकर्त्यांच्यांच नावे निघते ही शोकांतिका लिंबाळे यांनी मांडली आहे.

'उपऱ्या' ही शरणकुमार लिंबाळे यांची एक राजकीय कादंबरी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर गेल्या चार दशकांमध्ये दलित चळवळीची भंगलेली अवस्था त्यांनी समर्थपणे शब्दबद्ध केली आहे. चळवळीची निष्क्रियता, स्वार्थ, अंतर्गत वाद, चळवळीतील स्पर्धा याचे चित्रण कादंबरीमधून येते. चळवळीच्या नावाखाली नव्या चळवळी सुरू झाल्या. बाबासाहेबांच्या जयंतीच्या नावाखाली पैसे गोळा केले जातात. त्यातून कार्यकर्ते स्वत:चाच स्वार्थ साधतात. यामुळे चळवळ पोखरली जाते, विभागली जाते. या चळवळीतील

बदलांचे सूक्ष्म चित्रण कादंबरीमध्ये येते. कार्यकर्त्याचा नेता बनला की त्यामधील कार्यकर्ता संपुष्टात येतो. तो फक्त आश्वासन देणारा मंत्री बनतो. त्यातूनच स्वार्थ, संधीसाधूपणा येतो. सत्तेत त्याला वाटेकरी नको असतो म्हणून अडचण करणाऱ्याला तो चिरडून टाकतो, दडपून टाकतो. याअर्थाने 'उपऱ्या' हे शीर्षक समर्पक आहे.

'गांधारीचे डोळे' ही नागनाथ कोतापल्ले यांची कादंबरी स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याकडे आलेली लोकशाही व त्यातून सामान्यजनांची होणारी ससेहोलपट असे विदारक वास्त चित्रित करते. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला नारायण कल्लोळीसारखा एक सामान्य कार्यकर्ता गावातील काही पारे, कार्यकर्ते हाताशी घेऊन गावातील भ्रष्ट राजकारण मोडून काढण्याचा प्रयत्न करतो. गावातील आबासाहेब देशमुख ह्या बड्या प्रस्थाच्या विरोधात तृतीयपंथी चमेलीला निवडणुकीत उभं करतो. गोविंदराव बोराडे, इनामदार व मालिनीबाई पैठणकर हक निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले इतर उमेदवार असतात. साम, दाम, दंड, भेद या सूत्राचा उपयोग करून आबासाहेब हे आव्हान मोडन काढतात. एकूणच निवडणुकीतील ढोंगीपणा, भ्रष्टाचार, सत्तेसाठी वाट्टेल ते करण्याची उमेदवाराची तयारी, कुण्या बड्या प्रस्थाचे बोट धरून निवडणुकीत चालणारे गैरकारभार, साधला जाणारा स्वार्थ याचे लेखकाने केलेले वर्णन अतिशय वास्तवपूर्ण आहे.

कोतापल्ले यांच्या 'उल्ट चालिला प्रवाहो' (१९८५) या कादंबरीमध्ये सत्ता आणि राजकारण यापुढे पुरोगामी विचारांचे कार्य फोल ठरते याचा वेध घेतला आहे. नारायण कल्लोळी हा कार्यकर्ता कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. रावसाहेब माने व शिरढोणकर यांच्या स्वार्थी, संधिसाधू, बोलघेवडेपणाच्या प्रवृत्तीला गावातील लोक भूलतात. त्यामुळे माने, शिरढोणकर यशाचे मानकरी ठरतात तर नारायण हा अपयशाचा धनी ठरतो. महात्मा गांधींच्या तत्त्वाचा आग्रह धरून समाजात शांतता आणि सलोखा राखण्यात नारायण कल्लोळी अपयशी ठरतो. चळवळीतील कार्यकर्ता समाजापासून, समतेपासून दूर ढकलला जाऊन राजकीय पक्ष आणि पक्षाचा नेता वरचढ ठरतो याचे सूतोवाच ही कादंबरी करते 'निगेटिव्ह स्पेस' (१९८७) ही नामदेव ढसाळ यांची कादंबरी परंपराप्रिय मने आणि स्वप्ने पाहणारे, चळवळी करणारे भरकटलेले लोक यांच्या संघर्षाची कहाणी आहे. नाईलाजाने गुन्हेगारी विश्वाकडे वळलेल्या आणि तेथेच रूतून

राहणाऱ्या नायकाची (राजाची) ही कहाणी आहे. आंबेडकरी विचारधारा आणि मार्क्सवादी विचारधारा आणि त्यातून उद्भवणारा संघर्ष यावरही ढसाळांनी प्रकाशझोत टाकला आहे.

'काळगर्भ' (१९९०) ही विजय सिरसट यांची ग्रामीण राजकीय जीवनदर्शन घडविणारी कादंबरी आहे. ग्रामीण भागातील पुढारी, प्रस्थापित लोक गावात आपले वर्चस्व कायम राहावे म्हणून सवर्ण आणि दलित यामध्ये सतत संघर्ष कसा पेटत राहील याची काळजी घेतात. या ग्रामीण राजकीय जीवनाचे आणि तद्भुंगाने समाजजीवनाचे, भावजीवनाचे, भावसंबंधांचे चित्रण वास्तववादीपणे या कादंबरीत येते. बीड जिल्ह्यातील चांदणी गावातील भिवा आणि जीवा या दोन भावांच्याभोवती ही कादंबरी फिरते. ग्रामीण भागातील दलित समाजातील एक कार्यकर्ता नवा बदल घडवू पाहता आहे. कथानकातील काळ १९५६ च्या दरम्यानचा आहे. बौद्धधर्मानंतरचा कालखंड या कादंबरीत चितारला आहे. दलित समाजातील भिवा गावचा पोलीस पाटील होतो. परंतु परिस्थितीच्या वेटोळ्यात किंवा गर्भातच तो एवढा गुरफटला जातो की पुढे तो पोलीस पाटील पदाचा राजीनामा देऊन जुने खळं मागण्याचे काम करू लागतो.

एकनाथ साळवे यांची 'एन्काऊंट्य' (१९९८) ही कादंबरी प्रस्थापित राजकीय व्यवस्थेचा संताप व त्यातून नक्षलवादाकडे होणारी सहज वाटचाल चित्रित करते. शासन आणि नक्षलवादी यांच्या राजकीय संघर्षात पिचला जाणारा आदीवासी समाज हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. पोलीस यंत्रणा आणि नक्षलवादी यांच्यातील हिंसक संघर्षाचे चित्रण कादंबरीमध्ये येते. विलास मनोह्यांची 'एका नक्षलवाद्याचा जन्म' (१९९२) ही कादंबरी याच प्रश्नावर, समस्येवर प्रकाश टाकते. बाबुराव बागूल यांची 'कोंडी' (२०००) ही कादंबरी आंबेडकरवादी विचारधारा व कम्युनिस्टवादी विचारधारा यांच्या कोंडीत अडकलेल्या पावन पगारेचे जीवनचित्र रेखाटते. पावन हा आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेला नवयुवक तर त्याचे मामा कॉम्रेड सयाजी थोरात हे कट्टर कम्युनिस्टवादी. कम्युनिस्ट व आंबेडकरवादी कार्यकर्ते लेबर कॅम्पमध्ये सुधारणा करण्यासाठी खूप प्रयत्न करतात. परंतु कॅम्पमध्ये काहीच फरक पडत नाही. छोट्या कार्यकर्त्यांमध्ये काटाकाटाचे राजकारण चालते, नव्याने काम करणाऱ्या कार्यकर्त्याला ते काम करू देत नाहीत. पावन पगारेला त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी लेबर कॅम्पमधील लोक सहकार्य करत नाहीत. उलट त्याचाच जीव घेण्यास उठतात. अशा विचित्र

कोंडीत सापडलेल्या पावनचे प्रभावी चित्र बागूल रेखाटतात. जी.के. ऐनापुरे यांची 'अभिसरण' (२००२) ही कादंबरी आंबेडकरी चळवळीतील तिसऱ्या पिढीचे राजकारण आणि समाजकारण प्रभावीपणे चित्रित करते. या कादंबरीने वास्तवाशी आत्यंतिक जवळीकतेने नाते सांगत निर्भीडपणे संपूर्ण चळवळीचे राजकारण नेमकेपणाने चित्रित केले आहे. त्यामुळे 'अभिसरण' ही एक सशक्त राजकीय कादंबरी आहे. दलित पँथर ते बहुजनवादी पक्ष/रिपब्लिकन पक्ष इथपर्यंतचा अंतर्बाह्य राजकीय प्रवास या कादंबरीत आला आहे. चांगदेव, रामचंद्र, जयप्रकाश, राजाराम आणि नितू या पाच पात्रांच्या स्वकथनातून चळवळीचा इतिहास, वर्तमान व भविय यांचे कथन केले जाते. पात्रांची ही नावे तिसऱ्या पिढीतील चळवळीच्या नेत्यांच्या नावाशी साम्य सांगतच वास्तवाशी आपले नाते अधिक पक्के करीत जातात. असे असले तरी कादंबरीच्या केंद्रस्थानी 'चळवळ' आहे. चळवळीच्या नेत्यांनी आपल्या व्यक्तिगत फायद्यासाठी तिचा कसा वापर केला व ती कशी मोडीत काढली याचे राजकीय विदारक चित्र अत्यंत तपशिलाने 'अभिसरण' मध्ये येते.

या कादंबरीसंदर्भात प्रा. डॉ. महेंद्र कदम म्हणतात, ''एकूणच प्रत्येकाला बाबासाहेबांचे आणि चळवळीचे महत्त्व पटलेले आहे. प्रत्येकजण चळवळीने मोठा झाला, तसतशी चळवळ छोटी आणि दिशाहीन होत गेली. चळवळीचे म्हणजे एकूणच दलित समाजाचे अर्थकारण, समाजकारण, राजकारण, जातकारण, प्रत्येक नेत्याला नीट कळले आहे; परंतु त्याला नेमकी दिशा देण्यात ते अपयशी ठरले आहेत. याचे कारण प्रत्येकाचा स्वार्थ आणि अहंकार हेच आहे.''

एकूणच राजकीय चित्रण करणाऱ्या दलित कादंबरीचा एकत्रित विचार करता असे दिसते की, ही कादंबरी गावपातळीवरील किंवा देशपातळीवरील राजकारणात जास्त रस घेत नाही. याउलट आंबेडकरी विचारधारा व कम्युनिस्ट विचारधारा यावरती ती अधिक प्रकाशझोत टाकते. त्याचप्रमाणे दलित प्रवाहातील आदीवासी समाजाचे दुःख ही कादंबरी प्रखरतेने मांडते. आदीवासींना नक्षलवादी बनायला भाग पाडले जाते हे विदारक सत्य ही कादंबरी मांडते. आर्थिक परिस्थितीमुळे गांजलेला दलित कार्यकर्ता गावपातळीवर काम करत असताना मिळालेले प्रतिष्ठेचे पोलीस पाटील पदही सन्मानाने मिरवू शकत नाही हे वास्तवही दलित कादंबरी नोंदवते.

६. निकर्ष:–

१. ग्रामीण कादंबरीच्या तुलनेत निखळ राजकीय चित्रण करणाऱ्या दलित कादंबरीचे प्रमाण नगण्य आहे.

२. गावगाड्याचे राजकारण, मुख्यमंत्री पदाचे राजकारण, सहकारक्षेत्रातील राजकारण, शेतकरी संघटनेतील राजकारण, धरणग्रस्तांच्या चळवळीतील राजकारण यावर ग्रामीण कादंबरी प्रकाशझोत टाकते. याउलट दलित कादंबरी (सभापती, काळगर्भ अपवाद वगळता) गावगाड्यातील राजकारणात गुंतून पडत नाही.

३. दलित कादंबरी आंबेडकरी विचारधारा व कम्युनिस्टवादी विचारधारा यांची मांडणी करून आंबेडकरांच्या विचारधारेचे उपयोगित्त्व सिद्ध करते.

४. सरपंचपद, मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी जे डावपेच लढवले जातात त्याचे चित्रण ग्रामीण कादंबरी करते. तर आंबेडकरांच्या नंतर दलित चळवळ आपल्याच हाती यावी यासाठी चळवळीतील कार्यकर्ते, नेते, पुढारी जे डावपेच करतात त्याचे चित्रण दलित कादंबरी करते.

५. आदीवासींना नक्षलवादी बनायला भाग पाडले जाते. हे विदारक वास्तव दलित कादंबरी मांडते. त्यातून नक्षलवाद्यांची भूमिका स्पट होते.

६. ग्रामीण आणि दलित कादंबरीचा तुलनात्मक विचार करताना 'गांधारीचे डोळे' व 'तणकट' यासारख्या कादंबऱ्या ग्रामीण–दलित मधील सीमारेषा पुसून टाकताना दिसतात.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आविष्कार व बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव दलित कादंबरीमधून प्रकट होतो.

★★★

# मराठी दलित ह्लग्रामीण कादंबरी

**प्रा.रविराज दादू शिंदे**

१९६० नंतरच्या मराठी साहित्यात अभूतपूर्व बदल झाला.शैक्षणिक क्रांती हे त्यापाठीमागचे मोठे कारण होते. समाजामधील विविध वर्ग साहित्याच्या प्रांतामध्ये दाखल झाले. अगदी तळागाळातील वर्गही लिहू लागला. ग्रामीण भागातील दलित शोषीत वर्गाच्या हातात लेखणी आली.

१९४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. लोकशाही आली.स्वातंत्र्यानंतर परिवर्तनाचे वारे वाहू लागले. त्याला गती आली. स्वातंत्रपूर्वीही परिवर्तनाचे वारे वाहू लागले होते. परंतु आता खऱ्या अर्थाने परिवर्तन, परिवर्तन म्हणजे काय? या संदर्भात ऊहापोह सुरू झाला. शैक्षणिक जागृतीमूळे समाजाला एक नवीन दिशा मिळाली.

ग्रामीण लेखक देव, धर्म, रूढी, परंपरा, वर्गव्यवस्था, जातीव्यवस्था या संदर्भात विचार मांडू लागले. ग्रामीण भागातील या लेखकांनी शेतकरी, त्याचे कष्ट, मातीशी असणारे त्यांचे नाते, त्यांची कुटुंबव्यवस्था, धर्मव्यवस्था याबाबतचे विचार त्यांच्या साहित्यातून येऊ लागले. दलित समाजही त्याला अपवाद नाही. पण दलितांची परिस्थिती वेगळी होती. त्यांचे प्रश्न वेगळे होते. त्यांचे म्हणणे वेगळे होते. याचा विचार आपण नंतर करणारच आहोत. सुरुवातीला आपण १९६० नंतर प्रकाशित झालेल्या काही ग्रामीण कांदबऱ्यांचा विचार करू. अर्थात् या कांदबऱ्या प्रतिनिधिक स्वरूपाच्या आहेत.

१) बनगरवाडी वास्तविक पाहता १९६० पूर्वी म्हणजे १९५५ साली ही आटोपशीर कादंबरी प्रकाशित झालेली आहे. त्याच्याही अगोदर पिराजी पाटील, पाणकळा, आई शेतात आहे. गावगुंड यासरख्या कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या होत्या. पण खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनाचे जिवंत आणि वास्तववादी चित्र 'बनगरवाडी' याच कादंबरीमध्ये दिसते. व्यंकटेश माडगूळकरांची ही कादंबरी आजही मराठी साहित्यात एक मैलाचा टप्पा मानला जातो. त्या कादंबरीचे कथानक व वेगळेपण साधारणपणे पुढील प्रमाणे सांगता येईल.

राजाराम सौदणीकर या नावाचा पोरसवदा वयाचा मास्तर धनगरांच्या या वस्तीतील 'बनगरवाडीत' येतो. शह्री जीवनापासून दूर असणाऱ्या या वाडीतील

मुलांना शिक्षणाची गोडी लावतो. परंतु दादू बेलट्याच्या भाषेत 'शाळा म्हणजे फुकटचा टाईसपास' ही त्याची मनोवृत्ती आहे. परंतु गावच्या कारभाऱ्याच्या मदतीने शिक्षणाचा श्रीगणेशा सुरू करतो. त्यानिमित्ताने वाडीतील अनेक माणसे त्यांच्या ह्रत्यांच्या व्यक्तिविशेषासंह या कादंबरीत जिवंत झालेल्या दिसतात. कारभारी त्यांची पोरगी अंजू, दादू बेलटया, जगण्या रामोशी, आयबू इत्यादी. निसर्गाधीन असणारी ही माणसे शेवटी दुष्काळामुळे त्यांना गाव सोडावे लागते. परिणामी मास्तरची सुद्धा बदली होते.

बनगरवाडीत प्रामुख्याने निसर्ग, पशू-पक्षी, ग्रामीण लोकांचे रीतीरिवाज, सण उत्सव माउली आईवरील श्रद्धा इत्यादी. अनेक घटक या कादंबरीत गोचर होतात.

२) गोतवळा -१९७१ साली प्रकाशित झालेली आनंद यादवांची एक महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणता येईल. यंत्र संस्कृतीचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम हा या कादंबरीचा मुख्य विषय. नारबासारखा सालगडी त्याचे दुःख शेतमजुरांची आणि बलुतेदारांची वाताहत, कोल्हापूर जिल्ह्यातील जीवनचित्रण तेथील निसर्ग बोलीभाषा संस्कृती याचे सुरेख चित्रण या कादंबरीत दिसते. केवळ ग्रामीण म्हणून नव्हे तर मराठी कादंबरी विश्वात एक नवा प्रवाह 'गोतावळा' या कादंबरीने निर्माण केला.

३) पाचोळा- १९७१ साली प्रकाशित झालेली रा.रं. बोराडे यांची हीही एक महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणता येईल. गावगाडा उद्ध्वस्त होत असल्याची वेदना या कादंबरीत दिसते. शिंपी कुटुंबाची ही शोकांतिका आहे. गंगाराम हा अर्धकुशल कामगार, त्याची समजदार बायको पार्वती, मुलगा भाना, मुलगी तान्ही यांच्या जीवनातील ताण तणाव हा या कादंबरीचा मुख्य विषय.

गंगाराम हा शिंपी जातीचा असला तरी गरडाचं पोरगं त्यांचा अंगावर ज्या पद्धतीने धोतर टाकते ते काही त्याला रूचत नाही. तालेवाराचं हे पोरगं असूनही त्याच्या धोतराला तो गोट मारीत नाही. पोरगं रागारागाने माघारी जाते. आता काही तरी आक्रीत घडणारच याची पार्वतीला जाणीव होते. एकाचे दोन करून तो बापाला सांगणारच. याबाबत ती आपल्या नवऱ्याला खेडते गंगाराम तिच्यावरच ऊसळतो 'एखाद्या म्हारामांगाच्या अंगावर टाकावं तसं त्यानं धोतार टाकलं.' पार्वती नवयाला जरा सबुरीने वागण्याचा सल्ला देते. परंतु तो तिचे ऐकत नाही. परिणामी तिथूनच पुढे त्याच्या कुटुंबीयांवर संकटाची मालिका सुरू होते ती त्याच्या मृत्यूतच संपते.

असो संपूर्ण बोलीरूपातील लिहिलेली ही महत्त्वपूर्ण कांदबरी म्हणता येईल निवेदन, संवाद, घटनाप्रसंगातील चित्रमयता, हे या कांदबरीचे वैशिष्ट्ये सांगता येईल.

शापीत–१९८२ साली प्रकाशित झालेली अरूण साधू यांची ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी अर्थात अनेक समीक्षकांनी या कादंबरीचा समावेश ग्रामीण कादंबरीमध्ये केलेला नाही. परंतु ही एक चांगली ग्रामीण कादंबरी म्हणता येईल.

निसर्ग हा या कादंबरीचा महत्त्वाचा घटक. मराठवाड्यातील दुष्काळी भाग या कादंबरीमध्ये शब्दबद्ध झालेला आहे. एकेकाळी सधनता असणारे मराठा समाजातील एक कुटुंब निर्सग कोपल्यामुळे गाव सोडून जगण्यासाठी त्यांना बाहेर पडाव लागते. शेजारचेही एक कुटुंब त्यांच्या जोडीला आहे. कादंबरीचा नायक वामन आणि त्याचे कुटुंब त्यांच्या जोडीला आहे. कादंबरीचा नायक वामन आणि त्याचे कुटुंबीय यांचा मुंबईच्या दिशेने प्रवास सुरू आहे वाटेत तहान लागते म्हणून वामन एकाच्या विहिरीत उतरतो. तळाशी थोडेसे पाणी असते तेवढ्यात विहिरीचा मालक धावतपळत येतो. याबाबत वामनला छेडतो. कोन रं तू म्हारकी मांग कुणाच्या परवानगीनं विहिरीत उतरलास् वामन त्याला खुलाशेवार सांगतो. आपण मराठा आहोत, त्यातही शहाण्णवकुळी, जगण्यासाठी आपण गाव सोडलं आहे. वामनच्या खुलाशामुळे तो वरमतो असो, पुढे ही कादंबरी थोडीफार रंजनवादी झालेली आहे. तरीही मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, निसर्गाधीन माणसे यांचे सुरेख चित्रण या कादंबरीत दिसते.

५) दूर गेलेले घर १९७२ झाली प्रकाशित झालेली लक्ष्मीकांत तांबोळी यांची ही कादंबरी. ही कादंबरी चांगलीवाईट या बद्दल मी काही बोलणार नाही. परंतु ग्रामीण पार्श्वभूमी असलेली ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणता येईल.

आताची नवीन पिढी आपल्या घरापासून, गावापासून, देव, धर्म, रूढी, परंपरा, सण, उत्सव या पासून कुठेतरी तुटत चालली आहे. याबद्दल लेखक हळहळताना दिसतो. आता काही दलित कादंबऱ्यांचा विचार करू.

१) पारधी –१९७० नंतर मराठी साहित्यात आलेली शंकरराव खरातांची एक महत्त्वपूर्ण कादंबरी. ज्यांना घर नाही, गाव नाही, अन्न नाही पाणी नाही अशा समाजाची ही कथा आहे. जो जन्माने पारधी तो चोरगुन्हेगारच. अशी गावची मानसिकता आहे. परंतु एक ना एक दिवस आपणही माणूस् आहोत हे तुम्हांला निश्चितच कळेल असा आशावादही त्यांच्यात आहे. आमच्यातला माणूस जागा

झाला की मग मात्र आमी तुमाला जगु देणार नाय! आशा प्रकारचा थोडफार विद्रोह या कादंबरीत दिसतो.

२) सूड –१९७० नंतर प्रकाशित झालेली ही बाबुराव बागूल यांची महत्त्वपूर्ण दीर्घकथा. जानकी ही एक वेश्येची मुलगी दलित समाजातील. आपल्या पोरीने धंदा करावा असा तिच्या आईचा आग्रह. केवळ मटनाच्या उदारीपोटी रसूलने तिला ठेवून घेतले. बारा- तेरा वर्षाच्या या छोट्याशा जानकीवर पाशवी लैंगिक अत्याचार सुरू करतो आणि दुखावलेली जानकी पुरुष जातीवर सूड उगविण्यासाठी पुरुषी वेश धारण करते, गुरूच्या शोधात फिरते. तिला गुरू भेटतोही शेवटी आपला खराखुरा आनंद ती गुरूलाच अर्पण करते.

जानकीची सुडाची भावना मावळते हे खरे असले तरी या समाजव्यवस्थेत दलित स्त्रीची अब्रू किती स्वस्त आहे. आई, भाऊ, सासरा अशा प्रकारची पवित्र नातीही उपयोगाची नाहीत हे वाचून मन सुन्न होते.

३) मेलेलं पाणी –अशोक व्हटकर यांची ढोर जमातीवर आधारित एक चांगली कादंबरी. उपेक्षित जमातीतील ढोर चांभार महार या जातीतील लोकांच्या वेदनांचे चिमण या कादंबरीत दिसते. या खालच्या जातीतील लोकातही एकोपा नाही. जातीव्यवस्थेची मुळं त्यांच्यातही घट्ट रूजलेली आहेत. ढोरांनासुद्धा महारांच्या विहिरीचे पाणी भरणे कमीपणाचे वाटते बांबुराव हा नानामेहतराचा मुलगा ढोर जातीत जन्माला आलेला कातडी कमवण्याचा आपला पारंपरिक व्यवसाय न करता. त्याचा बाप त्याला शिक्षणासाठी कोल्हापूरला ठेवतो. शिक्षणामुळे नवीन जाणीव निर्माण झालेला बाबुराव गावच्या सुधारणेसाठी पुरोगामी विचारसरणी स्वीकारतो. परंतु अडाणी जमातीच्या लोकांपुढे त्याचा टिकाव लागत नाही.

या कादंबरीमध्ये गावचे राजकारण, त्यात उपेक्षितांची होणारी होरपळ, मते दिली तरी त्यांची होरपळ, नाही दिली तरी होरपळच दोन्हीकडून कुचंबणा, दोन्हीकडून धमक्या आणि निवडणुकीपुरतं आंबेडकरांचे नाव. त्यामुळे निवडणूक म्हणजे त्यांच्या अंगावर काटा यायचा. सत्ताहीन गरीब लोकांना जणू जगण्याचा अधिकारच नाही हे मेलेलं पाणी मधून व्हटकर सांगतात. महाराचं जिणे म्हणजे आरं माणूस हाय काय या जगात? सगळी येत्याती अन् आमच्या अंगावर काट्या टाकत्याती नळ्या फोडत्याती.

मागासलेल्या लोकांत एकजूट नाही सगळ्या उपेक्षितांनी एकत्र यावे असेही त्यांना वाटत नाही असो, यात जेवढे उच्चवर्गीय दोषी आहेत. तितकेच हे

मागासलेले लोकही दोषी आहेत. हे सुद्धा लेखक सांगताना दिसतो.

दलित आणि ग्रामीण कादंबरी एक तौलनिक विचार, दलित कादंबरी व ग्रामीण कादंबऱ्यांचा विचार केला तर फुले, आंबेडकर यांच्या विचारसरणीमुळे आम्ही बोलू लागलो आहोत. त्यांच्या विचारानुसार आम्हांला नवीन समताधिष्टित समाज निर्माण करायचा आहे. आम्हांलाही या समाजव्यवस्थेत सन्मानाने जगायचे आहे. अशा प्रकारचा आशय आपल्या मनोगतातून, प्रस्तावनेमधून व कादंबऱ्यामधून दलित लेखक मांडताना दिसतात. फुले, आंबेडकर यांच्या विचारसरणीचा स्पष्टपणे उल्लेख करतात. तर ग्रामीण सवर्ण कादंबरीकार फुले, आंबेडकर यांच्या विचारसरणीबद्दल फारसे काही बोलत नाहीत. वेदना, विद्रोह आणि नकार ही दलित कादंबरीची त्रिसूत्री सांगता येईल. तर नवीन यंत्रसंस्कृती, शेतकरी, त्याचे दैन्य, दु:ख, दारिद्र्य, शेतकऱ्यांचे कष्ट हा विषय त्यांच्या कांदबरीमध्ये दिसते. जातीव्यवस्थेचे दु:ख दलित कादंबरीमध्ये दिसते. तर ग्रामीण कादंबरीमध्ये याचे चित्रण अभावानेच आढळते. वर्गव्यवस्था, जातीव्यवस्था विषमतावादी समाजरचना याबाबतचा विद्रोह दलित कादंबरीमध्ये दिसतो तर ग्रामीण कादंबरीमध्ये हा विषय केंद्रवर्ती घटक मानून कोणीही लिहिताना दिसत नाहीत.

**सारांश–** स्वातंत्र, समता, बंधुत्त्व, समताधिष्टित नवीन समाजनिर्मितीचे स्वप्न दलित कांदबरीमध्ये दिसते. तर ग्रामीण कादंबरीत वैयक्तिक प्रश्न, गावचे राजकारण, बलुतेदारांची ससेहोलपट हे इत्यादी प्रश्न दिसतात. अर्थात दलित कांदबरीमध्ये सार्वकालीन श्रेष्ठ समाजनिर्मितेचे चित्र दिसते. असा काही माझा दावा नाही.

जाता जाता व्यंकटेश माडगूळकरांनी दलितांच्या जीवनावर जवळपास २९ कथा लिहिल्या. त्यांच्या व्यथा, वेदना मराठी साहित्यात मांडल्या एक नवीन विश्व मराठी साहित्यात आणले. ही निश्चितच स्वागतार्ह गोष्ट आहे.

★★★

# दलित ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन

**डॉ. संभाजी आण्णू शिंदे**

**प्रास्ताविक :-**

कादंबरी हा वाङ्मय प्रकार आंग्ल संपर्कातून आपल्या मराठी भाषेमध्ये अवतरला असला तरीही तो फक्त इंग्रजी भाषेतूनच आला असे ठामपणे म्हणता येणार नाही. कारण ज्या ज्या वाङ्मयप्रकाराला आपण कादंबरी असे संबोधतो त्याची सुरुवात जरी आंग्ल संपर्कातून झाली असली तरी, त्याही आधिपासून आपणाकडे कांदबरी सदृश्य साहित्याची निर्मिती होत होती. मात्र एक गोष्ट आपणास प्रामाणिकपणे स्वीकारावी लागेल ती म्हणजे आंग्ल संपर्काने आपल्या लेखकांना कादंबरी निर्मितीचे भान आले. फार पूर्वीपासून मराठी भाषेमध्ये 'लीळाचरित्र' यासारख्या ग्रंथांची निर्मिती केली गेली की ज्याकडे कादंबरी म्हणून पाहिले जाऊ शकते. हे जरी वास्तव असले तरी कादंबरी ही साहित्य संकल्पना आधुनिक युगातील सामाजिक संदर्भ घेऊन उदयास आलेली आहे. थोडक्यात मुद्रणपूर्व काळात ती अस्तित्वात नव्हती. मुद्रणोत्तर काळात ती जन्मली आणि हळूहळू तिचा विकास होत गेला. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय दलित, ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन हा असल्याने कादंबरीची नेमकी संकल्पना व तद्नंतर दोन्ही प्रवाहातील कादंबरीच्या माध्यमातून प्रतिबिंबित समाजदर्शन मांडणे हा आहे.

**कादंबरी संकल्पना व स्वरूप :-**

कादंबरी हा वाङ्मयप्रकार तसा अवघड आहे. याविषयी बऱ्याच अभ्यासकानी आपापली मते नोंदविली आहेत. मुळात कादंबरी हा आधुनिक युगातील एक महत्त्वपूर्ण वाङ्मयप्रकार आहे. कांदबरीच्या बाबतीत असे संबोधले जाते की, एकेकाळी महाकाव्याला मानवी संस्कृतीमध्ये असलेले स्थान आधुनिक काळात कादंबरी प्राप्त करू पाहते आहे. या माध्यमातून प्रदीर्घ भाषिक अवकाश, गद्य भाषा आणि कल्पित कथेचे निवेदन प्रकट होताना दिसते. कादंबरीची संकल्पना व स्वरूप पहात असताना तिची व्याख्या पाहणे अगत्याचे ठरते. मराठी वाङ्मयकोश (समीक्षा संज्ञा) खंड-चौथा यामध्ये केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे, ''कादंबरी

म्हणजे प्रसंगवशात व दैववशात एकमेकाजवळ आलेल्या व्यक्तीच्या भावसंबंधातून आणि हितसंबंधातून जीवन जी विविध अर्थपूर्ण रूपे घेत असते. त्याचे कलात्मक दर्शन व्यक्तीचे भावविश्व, सामाजिक वास्तव आणि जीवनाचे अंतिम स्वरूप ही तिन्ही अंगे या दर्शनात असतात.'' यामुळेच कदाचित कादंबरी हा वाङ्मयप्रकारात व्यक्तिचित्रणाला महत्त्वपूर्ण स्थान दिले गेले असावे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार तसा अवघड आहे. याविषयी असंख्य अभ्यासकांनी आपापली मते नोदंविली आहेत. वास्तविक पाहता कादंबरी ही प्राकारिक वस्तू आधुनिक साहित्यातील असली तरी, तिच्यातून जीवनदर्शन घडविण्याची किंवा जीवन दर्शनाचे निवेदन करण्याची उर्मी ही सनातन, कादंबरी वाङ्मयाची प्रत्यक्ष निर्मिती होण्याच्याही पूर्वीपासून स्वाभाविकपणे चालत आलेली आहे. भारतीय संस्कृतीतील नाटके, महाकाव्ये, पुराणे, प्रवचने, कीर्तने इत्यादी रूपातून आपण कादंबरीचे स्वरूप अनुभवत असतो.

महाराष्ट्रीय विशेष करून मराठी वाङ्मयप्रकारांचा प्रारंभ ब्रिटिश अमदानीपासून झाला. ब्रिटिशांची राजकीय, सामाजिक दृष्टी, त्यांच्या जीवन विकासाच्या कल्पना, त्यांची सांस्कृतिक बैठक जर आपण बघितली तर ती भारतीय समाजव्यवस्थेपेक्षा, सर्वाथाने भिन्न स्वरूपाची होती. पर्यायाने या सर्व परंपरांचा परिणाम भारतीय समाज, संस्कृती, साहित्य आणि जीवनदृष्टी यांच्यावर झाला. यामधूनच आधुनिकतेचे युग, मराठी समाज व साहित्य यामध्ये अवतरू लागले. यालाच मराठी साहित्याचा प्रबोधनकाळ म्हणून संबोधले जाऊ लागले व यातूनच 'कादंबरी' या लोकप्रिय वाङ्मयप्रकाराचा जन्म झाल्याचे दिसून येते. कादंबरी हा वाङ्मयप्रकार तसा अवघड आहे. कारण त्याच्या संकल्पनेच्या संदर्भात वैविधता खूप मोठ्या प्रमाणात जाणवते हीच वैविधता आनंद वास्कर यांनी त्यांच्या 'वाङ्मयप्रकार संकल्पना व स्वरूप' या ग्रंथामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे,

''१) कादंबरीचे स्वरूप संकल्पना आणि समाजस्थिती यात संबंध असतो.

२) कादंबरीची संकल्पना कादंबरीच बदलते.

३) कादंबरीच्या समीक्षापद्धती मुलतः कादंबरीतूनच जन्म घेतात.

४) एकाच काळात कादंबरीच्या अनेक संकल्पना कार्यरत असतात. त्यांना त्या त्या काळात मिळणारे कमी अधिक महत्त्वाची क्रमवारी खालीवर होत असते आणि यातली प्रत्येक संकल्पना बदलती असते. याची कारणे त्या त्या वर्तमानाच्या

गरजात असतात.'' उपरोक्त विवेचनावरून कोणतीही कादंबरी तत्कालीन सामाजिक वास्तव स्थिती प्रमाण मानून निर्माण होत असते हे स्पष्ट होते. कादंबरी हा वाङ्मयप्रकार आकाराने मोठा असल्याने समाजाचा व्यापक पट कवेत सामावून घेण्याची क्षमता यामध्ये असते. समाज जीवनातील असंख्य प्रश्न कलात्मक पातळीवरती मांडल्याने कादंबरीतूनच समीक्षा जन्म घेते. आणि ही समीक्षा मानवी जीवनाशी संबंध राहून तिच्यातील आशयद्रव्यांचा शोध घेते. मानवी जीवनातून कादंबरीला आशय उपलब्ध होऊन सशक्त कादंबरी निर्मितीसाठी कादंबरीकाराला प्रेरणा मिळते. कादंबरीच्या वर्तमान गरजा लक्षात घेता कादंबरीला मिळणारे कमीअधिक महत्त्व व त्याची क्रमवारी यामध्येसुद्धा सातत्याने प्रसंगानुरूप बदल होत असतो. मराठीतील ग्रामीण व दलित कादंबरी आणि त्या माध्यमातून झालेले समाजदर्शन याचा आढावा पुढीलप्रमाणे.

**ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन :-**

मराठी कादंबरी वाङ्मयाच्या वाटचालीमध्ये असंख्य स्थित्यंतरे झालेली पहावयास मिळतात. याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून मराठी साहित्यविश्वामध्ये 'ग्रामीण' हा साहित्यप्रवाह उदयास आला. १९६० नंतर उदयास आलेल्या अनेक साहित्य प्रवाहाचा जरी उदय झालेला असला तरी त्याही पूर्वीपासून म्हणजे साधारणत १९२५ पासूनच ग्रामीण कादंबरी लेखनामध्ये शेतकरी जीवनाचे चित्रण केले जात होते. याविषयीचे विवेचन 'मराठी ग्रामीण कादंबरी' या ग्रंथामध्ये रवींद्र ठाकूर यांनी केलेले आहे ते पुढीलप्रमाणे, ''१९२५ पासून मराठी कादंबरी विषय वैविध्याने व संख्यावैपुल्याने समृद्ध होऊ लागली. परंतु या समृद्धीस मध्यमवर्गीय जीवनचित्रणाची मर्यादा होती.

ना. वि. कुलकर्णी, वरेरकर यांच्या कादंबऱ्यातून थोड्याफार प्रमाणात ग्रामजीवनचित्रणाचे प्रयत्न झाले होते. परंतु मराठी कादंबरी वाङ्मयामध्ये १९३९ साली रा.वा. दिघे यांनी लिहिलेल्या 'पाणकळा' या कादंबरीने वाचकांचे लक्ष वेधून घेतले. जीवनानुभवाचे वेगळेपण हा या कादंबरीचा लक्षणीय विशेष होता. याबरोबरच जीवनानुभवाचे वेगळेपण चित्रण करण्याचे कौशल्य या कादंबरीच्या ठिकाणी होते.'' परंतु याचा अर्थ असाही नव्हे की यापूर्वी मराठी साहित्यामध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण झालेलेच नव्हते. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथामध्ये शेतकरी जीवनाचे चित्रण आले होते. महात्मा फुले यांचे

अनुयायी कृष्णराव भालेकर यांनी 'बळीबा पाटील' (१९०८) या कादंबरीत ग्रामजीवनाचे थोडेबहूत चित्रण केले होते. हरिभाऊंनी 'काळ तर मोठा कठिण आला' (१८९७) या कथेत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती वर्णन केली होती. धुनर्धारी (रा. वि. टिकेकर) यांच्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीत पिराजी पाटलांच्या तोंडून खेड्यांची व शेतकरी जीवनाची वाताहत अभिव्यत झाली होती. रविकिरण मंडळातील कवींनी इंग्रजीतील पॅस्टोरल पोएट्रीच्या धर्तीवर जी गोपगीते व जानपद गीते लिहिली होती. त्यातूनही थोड्याफार प्रमाणात ग्रामजीवन रोमँटिक पातळीवरून का होईना चित्रित झाले होते.

'खेडूत सृष्टीचे कादंबरीकार' म्हणून ज्यांचा गौरव केला जातो. त्या ना. वि. कुलकर्ण्यांनी 'शिपाई' (१९२५), 'दिवस कसे जातील' (१९२५) 'पैसा' (१९२६) इत्यादी कादंबऱ्यातून ग्रामजीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला होता. वि. स. सुखठणकरांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी (१९३१) या कथासंग्रहाद्वारे गोमंतकीय प्रादेशिक जीवनाचा परिचय घडवला होता.

ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रामध्ये १९२० नंतरचा काळ हा अनेकार्थाने महत्त्वाचा ठरतो. कारण याच कालखंडामध्ये महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात उलथापालथ सुरू झाली होती. परिणामी मराठी साहित्यातून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडले पाहिजे. याबरोबरच शहरी वाचकांच्या कुतूहल जागृतीसाठी ग्रामीण कादंबरीचे लेखन याच जाणिवेतून मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते. यापैकी प्र. ह. खाडिलकर यांची 'स्वाधीन संसार' (१९२७) भा. वि. वरेरकर यांची 'सात लाखातील एक' (१९३०) रा. शा. पाटील यांची 'सीमा' (१९३१) ग. रा. वाळींबे तथा रामतनय यांची 'मोहित्याची मंजुळा (१९३१) या कादंबऱ्या ग्रामीण जीवनाची व तेथील जीवनवास्तवाची तोंडओळख करून देण्याच्या उद्देशाने लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्या आहेत. साधारणत: १९५० च्या दशकामध्ये वाचकांचे लक्ष एका वेगळ्या अनुभवविश्वाकडे वळविण्यामध्ये 'बळी' १९५० या विभावरी शिरूरकर यांच्या कादंबरीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. याबरोबरच त्यांनी 'हिंदोळ्यावर' (१९३४), 'विरलेले स्वप्न' (१९३५), या कादंबऱ्या लिहून स्त्रियांच्या वेदना शब्द रूपात मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ग्रामीण कादंबरीच्या प्रांतात साधारणत: १९५० पासूनच नव्या जाणिवा अभिव्यक्त होण्यास प्रारंभ झाला.

१९५० ते १९७० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचा विचार करता

१९२० पासून कादंबरी लेखन करणारे काही जुनेच कादंबरीकार व नवे कादंबरीकार यांनी मिळून कादंबरी लेखन केल्याचे दिसून येते. या कालखंडामध्ये ग्रामीण कादंबरी एका विशिष्ट टप्प्यावर येऊन स्थिरावते. ग्रामीण वास्तवाची चांगली जाण असलेल्या माडगुळकरांनी 'बनगरवाडी' (१९५५) ही कादंबरी लिहून 'ग्रामीण कादंबरी' या वाङ्मयप्रकाराला एका विशिष्ट उंचीवरती नेऊन ठेवल्याचे दिसते. १९६० नंतर मात्र ग्रामीण कादंबरीचा प्रवाह अधिकाधिक सशक्त होत गेलेला दिसतो. माडगूळकर, शेळके आणि साठे यांनी पुढील काळात अनेक महत्त्वाच्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्याप्रमाणेच मनोहर तल्हार, रणजित देसाई, शंकर पाटील, हमीद दलवाई, रा. रं. बोराडे, आनंद यादव, ना. धों. महानोर हे काही महत्त्वाचे कादंबरीकार १९६० ते १९८० या कालखंडामध्ये उदयाला आले आणि विकसीत झाले. अर्थात यादव, बोराडे यांचे कादंबरी लेखन आजही चालूच आहे. 'वावटळ', 'झोंबी', 'आमदार सौभाग्यवती' यासारख्या कादंबऱ्या यानंतरच्या काळातील आहेत. तरीही सगळ्याच लेखकांचा विचार १९८० पूर्वीचे कादंबरीकार म्हणून करावा लागतो. त्याचे कारण असे की, १९८० नंतर कादंबरीकारांची एक नवी पिढी उदयाला आली की ज्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सर्वस्वी वेगळा असल्याचा दिसतो. १९६० ते १९७५ या कालखंडामध्ये कादंबरी लेखन करणाऱ्या कादंबरीकारांमध्ये अण्णा भाऊ साठे, उद्धव शेळके, रणजित देसाई, दि. बा. मोकाशी, शंकर पाटील, हमीद दलवाई, जयवंत दळवी, चिं. त्र्यं. खानोलकर, मधु मंगेश कर्णिक, रा. रं. बोराडे, आनंद यादव, ना. धों. महानोर, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, शंकर खंडू पाटील, श्रीपाद काळे, द. ता. भोसले, लक्ष्मीकांत तांबोळी, सुभाष भेंडे यांचा समावेश होतो. या कालखंडातील कादंबरी ही संमिश्र स्वरूपाची आहे. याबरोबरच असंख्य कारणांनी मराठी कादंबरीची प्रभावक्षेत्रे विस्तीर्ण झालेली या कालखंडात पहावयास मिळतात.

ग्रामीण भागातील अशिक्षित शेतकऱ्यांच्या शेतीशी निगडीत प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा' (१९७१) या कादंबरीद्वारे केल्याचे दिसून येते. या कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी शहरीकरणामुळे उजाड होत चाललेले पारंपरिक व्यवसाय व त्यावर उपजीविका करणाऱ्या कुटुंबाची होत असलेली वाताहत याचे चित्रण केल्याचे दिसून येते. त्यानंतर आनंद यादव यांची याच दरम्यानची 'गोतावळा' (१९७१) ही कादंबरी येते. या कादंबरीच्या माध्यमातून नारबा व त्याचा गोतावळा यामध्ये नारबाची जनावरे, बैल, घोडा, रेडे, कोंबडा,

कुत्रा, शेरडे, एवढेच नव्हे तर विहिरीमधील कासव इत्यादींशी त्याचे असणारे प्रेम, मैत्रीपूर्ण संबंध दर्शविले आहेत. या प्रमुख लेखकांबरोबरच इतर अनेक नव्या दमाच्या लेखकांनी आधुनिक खेड्याचे बदलते स्वरूप चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये आनंद पाटील, पुरुषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, अशोक व्हटकर, नागनाथ कोतापल्ले, राजन गवस, वासुदेव मुलाटे, रंगनाथ पठारे व अगदी अलिकडच्या कालखंडामध्ये ग्रामीण साहित्यासंबंधी लेखन करणारे विश्वास पाटील, ह. मो. मराठे, बा. ग. केसकर, रवींद्र सावरकर, गणेश आवटे, बाबा भांड, पांडुरंग कुंभार, सुरेश शिंगटे, मोहन पाटील या नव्या दमाच्या ग्रामीण लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांची चिकित्सा रवींद्र ठाकूर यांनी त्यांच्या 'मराठी ग्रामीण कादंबरी' या समीक्षा ग्रंथामधून केली आहे. ग्रामीण कादंबरी या वाङ्मयप्रवाहाच्या एकूणच प्रवासामध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे ग्रामीण स्त्री कादंबरीकारांची वानवा. कादंबरीच्या क्षेत्रामध्ये विपूल साहित्यानिर्मिती करणाऱ्या लेखकांपैकी स्त्री लेखिकांचे प्रमाण मात्र नगण्य असल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे भारतीय समाज जीवनामध्ये पूर्वीपासूनच पुरुषसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात होती. त्यामुळे स्त्रियांची प्रमुख भूमिका ही केवळ चूल आणि मूल एवढ्यापूरतीच मर्यादित राहिली. त्यामुळे कदाचित ग्रामीण भागातील स्त्रिया साहित्य लेखनाकडे वळल्या नसाव्यात. परंतु १९५० नंतर भारतीय संविधान अंगीकृत झाल्याने स्त्रियांना लेखनाचे अधिकार मिळाले व त्यानंतर ग्रामीण भागातील स्त्रियादेखील कादंबरी लेखनाकडे वळलेल्या दिसतात.

दलित कादंबरीतील समाजदर्शन :

दलित समाजातील 'स्व'च्या वाट्याला येणारे भोग, हिंसा, क्रौर्य, दारिद्र्य, भूक, शोषण, परिस्थिती, शरणता, अगतिकता, लाचारी, संघर्ष, जगण्याची जिद्द, पिढ्यानपिढ्या चालत आलेला प्रस्थापित समाजाबरोबरचा संघर्ष, हिंदू संस्कृतीला नकार, प्रस्थापित संस्कृतिविरुद्ध, अस्पृश्यतेविरुद्ध, अन्याय, अत्याचाराविरुद्धचा विद्रोह दलित कादंबरीच्या माध्यमातून तीव्रतेने व्यक्त झाला आहे. दलित वस्तीच्या दारिद्र्याचे, बकालतेचे, भीषण भूकेचे, भयावह दुःखाचे, ताणलेल्या वातावरणाचे आणि इतरही पैलू व्यक्त करण्याची संधी कादंबरी वाङ्मयाच्या माध्यमातून दलित लेखकांना उपलब्ध झाली. दलित कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यातून आंतर्मनाच्या संवेदना आविष्कारांना प्रमुख प्राधान्य दिल्याचे दिसते. दलित कादंबरीकारांची संवेदना, त्यांची प्रमुख प्रेरणा आणि त्यातून निर्माण

होणारे कादंबरीतील अनुभवविश्व याविषयी भाष्य करताना नंदा मेश्राम यांनी त्यांच्या 'दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा' या ग्रंथामध्ये पुढील विवेचन केले आहे. ''दलित कादंबरीतून प्रामुख्याने समाजनिष्ठ अनुभव व्यक्त होतात. हजारो वर्षे, धर्माच्या नावाखाली खितपत पडलेल्या दलित बांधवांना, बाबासाहेबांचा बौद्ध धर्म आणि बौद्ध धर्माची तत्त्वे सांगून नवीन समाज निर्माण करण्याची जिद्द, या कादंबरीकारांच्या कथानकांमधून आढळते; म्हणूनच अण्णा भाऊ साठे यांचा फकिरा, सत्तू भोसले, हिंदुराव हे नायक प्रस्थापित सत्तेविरुद्ध संगर करताना दिसतात.

सामाजिक बांधिलकीचा स्वीकार करताना शंकरराव खरातांचा 'आनंदा' हा नायक त्याच्या 'गावाच्या शोधात' आहे. आपले कुटुंब आणि माणुसकी यांच्या शोधार्थ तो प्रयत्नशील आहे. तो माघार घेत नाही. आपल्या कुटुंबाच्या शोधात, तो दलित समाजातील, विस्कळीत मानवतेलाच शोधण्याचा प्रयत्न करतो.'' एकूणच दलित कादंबरीचा विचार करता त्यामध्ये मानवता हा घटक महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते. याबरोबरच दलित कादंबरीतील कथानायक हे वास्तवतेचे दर्शन घडविण्याबरोबरच मानवतावादाची रुजवण करताना आढळतात.

ना. रा. शेंडे यांनी तर दलित समाजातील, असंख्य तरुण-तरुणी आणि प्रस्थापित समाजातील लोकही एकत्र व्यासपीठावर यावेत, सर्वांच्या मनातील जातीयता नष्ट व्हावी; यासाठी अवघ्यांच्याच मनात, मानवतावादाची रुजवन करताना आढळतात. तर बाबुराव बागुल यांनी प्रस्थापित हिंदू संस्कृतीला ठाशीवपणे नाकारून विद्रोह केला आहे. 'सूड', 'कोंडी', 'पावश्या', 'पाषाण' आणि 'सरदार' यासारख्या त्यांच्या कादंबऱ्यातून, मानवी अस्तित्वाचा शोध घेतला आहे. अध:स्तरीतांचे विलक्षण जगणे, ललित लेखनाच्या फलकावर त्यांनी सर्वप्रथम अधोरेखित केले आहे. भूतकाळाचा दाखला देऊन, वर्तमान आणि भविष्य काळातील नवा समाज स्थापन करण्याची इच्छा व्यक्त करणारे केशव मेश्राम एक आदर्श जनजीवन समाजासमोर ठेवतात. आदीम विश्वच कथावस्तू म्हणून त्यांच्या 'पोखरण' मध्ये वावरते. तर 'शूद्र' या कादंबरीमध्ये सुधाकर गायकवाड यांनी हाच प्रयत्न केला आहे. दलित समाजाविषयीची आत्मिक जाणीव प्रमाणभूत मानून कादंबरीलेखन करणाऱ्या असंख्य दलित लेखकांपैकी काही प्रमुख लेखकांचा उल्लेख नंदा मेश्राम यांनी केला आहे व तो पुढीलप्रमाणे, ''सामाजिक बांधिलकी स्वीकारून दलित कादंबरी लिहिणारे आणखी दलित कादंबरीकार आहेत. त्यात

प्रामुख्याने भीमसेन देठे, माधव कोंडविलकर, उत्तम बंडू तुपे, अशोक व्हटकर, डॉ. योगेंद्र मेश्राम, विजय सिरसाट, प्रेमानंद गज्वी, ना. ब. जाधव, जयप्रकाश गवळे, भाई तांबे, प्रज्ञावंत गौतम, अशोक लोखंडे, रमेश इंगळे, पांडुरंग कदम, एकनाथ साळवे, कचरू भालेराव, जी. के. ऐनापुरे, रवींद्र बागडे असे कितीतरी दलित कादंबरीकार आपल्या समाजाची बांधिलकी मानून, समाजपरिवर्तन घडवू इच्छितो.'' यावरून सामाजिक बांधिलकी प्रमाणभूत मानून कादंबरी लेखन करणाऱ्या दलित लेखकांची एक परंपरा आपल्या लक्षात येते. या संपूर्ण लेखकांचा कालखंड, हा स्वातंत्र्योत्तर आहे. त्यामुळे सांविधानिक जागृतीतून निर्माण झालेल्या सामाजिक जाणिवेचे प्रतिबिंब यांच्या कादंबऱ्यातून प्रभावीपणे प्रकटताना दिसते. या सर्व लेखकांच्या कादंबरी लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य स्त्री आणि तिच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, स्त्रीबद्दल असणारा अभिमान, तिचे दुहेरी शोषण या सगळ्यांवर, आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारे असे हे सर्व कादंबरीकार आपणास पहावयास मिळतात.

दलित समाजातील स्त्री, तिच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, स्त्रीबद्दल असणारा अभिमान, तिचे दुहेरी शोषण या सगळ्यांवर आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारी अशीच दलित कादंबरीकारांची पिढी आपणास दिसते.

यापैकी बाबुराव बागुल यांची 'सूड' ही कादंबरी उल्लेखनीय आहे. पस्तुत कादंबरीमध्ये स्त्रीजीवन आणि सौंदर्याबद्दल मनात निर्माण झालेली घृणा दूर करण्यासाठी, स्त्रीजन्म झुगारून, पुरुषजीवन जगण्याची आणि इहवादी जीवनाचा आनंद उपभोगावा अशी ही इच्छा ही कादंबरी व्यक्त करते. तर हिंदू परंपरेला, धर्माला आणि देवताला नाकारणारी उत्तम बंडू तुपे यांची 'जगन' ही कादंबरी आत्मभान निर्माण करते. कुटुंबासाठी स्त्रीनेच झिजावे, कष्ट उपसावे याचा धडा देणारी नामदेव कांबळे यांची वालंबी, राघववेळ, उनसावली मनावर ठसा उमटवून जातात. याबरोबरच दारिद्र्य, स्त्रीचे भोग, याविषयीचे सूचक भाष्य करणारी '७२ मैल' मधील अशोक व्हटकरांची राधाक्का मानवी जगण्याचे नवे तत्त्वज्ञान सांगून जाते. तर आपल्या समाजातील स्त्रियांना प्रसंगी वेश्यांनाही स्वावलंबी बनवून स्वसंरक्षणार्थ सबला बनविणारी कल्पना जाधवांची सरला वाचकांना निशब्द बनविते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या दलित चळवळीने समाज मनात एक प्रकारचा आत्मविश्वास स्थापित केला. हाच

आत्मविश्वास बा. स. हाटे यांनी त्यांच्या 'युगविधान', 'युगंधर', 'ते बेचाळीस दिवस' यासारख्या कादंबऱ्यांच्या माध्यमातून जिवंत ठेवला आहे. दलित चळवळीतील कार्यकर्त्यांची तगमग बाबुराव बागुल यांच्या 'कोंडी' या कादंबरीतून दिसते. तर मुरलीधर जाधव यांच्या 'कार्यकर्ता' मधून ती सुस्पष्ट होते.

दलित चळवळीचा आक्रमकपणा, तिचे भन्नाट रूप नामदेव ढसाळ यांनी 'निगेटिव्ह स्पेश' मधून शब्दबद्ध केले आहे. तर शरणकुमार लिंबाळे यांनी 'भिन्नलिंगी' मधून आपणच आपल्या टोळीचा म्होरक्या या समजुतीतून निर्माण झालेल्या कलहपूर्ण वादाचे चित्रण केले आहे. मुरलीधर जाधव यांची 'कार्यकर्ता' कार्यकर्त्याच्या वास्तव जगण्याचे इत्यंभूत वर्णन करते. दलित कादंबरीला आपल्या सभोवतालचे भान आहे. ज्यामुळे आपला समाज, सर्वांगदृष्ट्या अविकसित राहिला. त्या शिक्षणातील भ्रष्टाचाराचे, राजकारणाचे आणि जातीयतेचे दाहक राजकारण शंकरराव खरातांनी अत्यंत मनोरंजकतेने 'गावचा टिनोपाल गुरुजी' या कादंबरीतून चित्रित केले आहे. वैजनाथ कळसे यांनी 'तीन भिंती' या कादंबरीतून शैक्षणिक क्षेत्रातील जातियतेचे दर्शन घडविले आहे. तर 'हाताची घडी तोंडावर बोट' या कादंबरीतून माधव कोंडविलकरांनी शिक्षण क्षेत्रातील लाचारी व एकूणच गोंधळाच्या स्थितीचे वर्णन केले आहे.

**समारोप :** कादंबरी हा आधुनिक युगातील एक महत्त्वपूर्ण वाङ्मय प्रकार आहे. आधुनिक युगाचा प्रभाव मराठी समाज व साहित्य यामध्ये अवतरू लागले की ज्याला 'प्रबोधनकाळ' म्हणून संबोधले जाते. यातूनच 'कादंबरी' या लोकप्रिय वाङ्मयप्रकाराचा जन्म झाल्याचे दिसून येते. साधारणतः १९२५ पासून मराठी कादंबरी लेखनामध्ये शेतकरी जीवनाचे चित्रण केले जात होते. १९५० पासून कादंबरी लेखन करणारे काही जुनेच कादंबरीकार व नवे कादंबरीकार यांनी मिळून कादंबरी लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळेच कदाचित आधुनिक कालखंडातील बदलांचा स्वीकार न करता केवळ पारंपरिक मांडणीने तिच्यभोवती विशिष्ट प्रकारचे आवर्त निर्माण झाल्याचे दिसते. दलित कादंबरी व्यक्त होत असताना ती दलित साहित्याचे म्हणून असलेले वेगळे वैशिष्ट्य जोपासत अभिव्यक्त होते. ती वाचकांचे मनोरंजन करते. परंतु तिची असणारी सामाजिक बांधिलकी ही प्रमुख तात्त्विक बैठक आहे. या वैशिष्ठ्यपूर्ण गुणांमुळे महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध तत्त्वज्ञानाच्या परिशीलनातून साकार झालेली दलित कादंबरी 'कादंबरी' या वाङ्मय प्रकारात आपले वेगळेपण सिद्ध करण्यात यशस्वी झाली

आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे,

१) समाज जीवनातील असंख्य प्रश्न कलात्मक पातळीवरती मांडल्याने कादंबरीतूनच समीक्षा जन्म घेते. मानवी जीवनातूनच कादंबरीला आशयद्रव्य उपलब्ध होऊन सशक्त कादंबरी निर्मितीसाठी कादंबरीकाराला प्रेरणा मिळते.

२) १९२० नंतरच्या कालखंडामध्ये कादंबरी वाङ्मयाच्या क्षेत्रात खूप मोठी उलथापालथ झाली. परिणामी मराठी साहित्यातून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडले पाहिजे. याबरोबरच शहरी वाचकांच्या कुतूहल जागृतीसाठी ग्रामीण कादंबरीचे लेखन याच जाणिवेतून मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

३) ग्रामीण कादंबरीने पारंपरिकतेच्या आवर्तात न सापडता वर्तमान वास्तवाचा स्वीकार करून मांडणी केल्यास ग्रामीण कादंबरीचे स्वत:चे वेगळे अस्तित्व सिद्ध होऊ शकते.

४) सामाजिक बांधिलकी ही प्रमुख तात्त्विक बैठक मानून अवतीर्ण होणारी दलित कादंबरी, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध तत्त्वज्ञानाच्या परिशीलनातून साकार झाल्याने कादंबरी या वाङ्मय प्रकारात आपले वेगळेपण सिद्ध करण्यात यशस्वी झाली आहे.

★★★

# १९९० नंतरचे समाजवास्तव आणि मराठी दलित–ग्रामीण कादंबरीः काही निरीक्षणे

प्रा.अजय देशपांडे

मराठी कादंबरीचा इतिहास सुमारे दीडशे वर्षाचा आहे. या प्रदीर्घ कालावधीत मराठी कादंबरीमध्ये अनेक प्रवाह निर्माण झाले. आशय आणि रूपबंधदृष्ट्या मराठी कादंबरीत अनेक प्रयोगही झाले. गेल्या दीडशे वर्षांच्या काळात भारताच्या सामाजिक–सांस्कृतिक जीवनात फार मोठी स्थित्यंतरे झाली. या स्थित्यंतरांचा परिणाम जसा भारतीय समाजजीवनावर झाला, तसा कला, साहित्य आणि अभिरूचीवरही झाला. या स्थित्यंतरांमुळे एक नवे विचारविश्व भारतात निर्माण झाले, त्याचाही परिणाम साहित्यकृतींवर झाला. कादंबरी हा वाङ्मय प्रकारही त्या परिणामांपासून अलिप्त राहिला नाही. खरे तर कादंबरी हा समाजजीवनाशी नाळसंबंध ठेवणारा वाङ्मयप्रकार आहे. कादंबरीत आपल्या सभोवतालच्या जगाचा अर्थ लावण्याचे काम चाललेले असते. प्रारंभापासूनच प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे समाजाशी नाते ठेवणाऱ्या या वाङ्मयप्रकाराने जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेत समाजवास्तवाचा सर्जनशील अनुवाद करतानाच त्याचे अन्वयार्थ देखील विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत निबंधात १९९० नंतरच्या दलित आणि ग्रामीण कादंबरीचे समाजवास्तवाशी असणारे अनुबंध शोधावयाचे आहे.

१९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेचा परिणाम दलित आणि ग्रामीण कादंबरीचा आशय, निवेदन आणि भाषा या तीनही घटकांवर झालेला आहे. १९९० नंतरच्या समाजवास्तवाचे आशयाशी असणारे अनुबंध काही उदाहरणांवरून शोधण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

सदानंद देशमुख यांच्या बारोमास या कादंबरीत जागतिकीकरणाचे परिणाम ग्रामीण जनजीवनावर कसे आणि किती खोलवर झाले आहेत याचे गंभीर चित्रण केले आहे. शिकूनही दारिद्रय आणि बेकारी यामुळे अगतिक झालेल्या तरुण पिढीची दिशाहिनता, शहरीकरणाच्या संपर्कामुळे निर्माण झालेला वाढता चंगळवाद, जागतिकीकरणाचे शेतीवर झालेले दुष्परिणाम, बेभरवशाच्या शेतीमुळे सतत भेडसावणारी उद्याची चिंता आणि कर्जबाजारीपणा यामुळे गांजलेल्या

शेतकऱ्यांना कराव्या लागत असलेल्या आत्महत्या, सरकारी उदासीनता, त्यातही शिरलेले संधिसाधू राजकारण आणि भ्रष्टाचार असे कितीतरी विषय आपल्या आशय कक्षेत सामावून घेणारी ही कादंबरी म्हणजे आजच्या विषमता पोसणाऱ्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजव्यवस्थेचा जाहीर पंचनामाच आहे. सदानंद देशमुख यांनी बारोमास या कादंबरीत जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेमुळे बदलणाऱ्या ग्रामीण वास्तवाचे विश्लेषण केले आहे. अन्वयार्थ शोधले आहेत.

१९७५ नंतर महाराष्ट्रातील सर्वच सामाजिक चळवळीचे रूपस्वरूप बदलले. विचार आणि कार्य या दोन्ही पातळ्यांवर बदलाच्या मानसिकतेतील सामाजिक चळवळींवर १९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा गंभीर परिणाम झाला. राजकारणाची ढासळलेली प्रतवारी आणि भ्रष्टाचाराने चळवळींनाही केलेला दंश यामुळे चळवळी आणि राजकारण दोहोंविषयीची साशंकता समाजमनात निर्माण झाली. दलित चळवळी आणि दलितांचे राजकारण यांनाही या वातावरणाचा काही प्रमाणात संसर्ग झाला. जी.के. ऐनापुरे यांनी अभिसरण या कादंबरीतून १९९० नंतरचे दलित चळवळी आणि दलितांचे राजकारण यामधले वास्तव चित्रित केले आहे. दलित चळवळीतील तिसऱ्या पिढीतील नेतृत्त्वाचे यशापयश आणि विचारांवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वसामान्य दलितांची होणारी उपेक्षा, विचार आणि कृती यांच्यामध्ये तफावत करणारे राजकारणी असे आजचे समाजवास्तव या कादंबरीतून व्यक्त झाले आहे.

समकालीन वास्तवाचा वेध घेणारी गणेश आवटे यांची भिरुड ही क़ादंबरी लक्षणीय आहे. तळपातळीवरच्या माणसांचे जगणे स्वार्थी राजकारण्यांमुळे कसे उद्ध्वस्त होते, याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत केले आहे. चिमणीचे घर मेणाचे, कावळ्याचे घर शेणाचे, या गोष्टीपासून कादंबरी सुरू होते, या गोष्टीतील पात्रांची कधीच कुठेच अदलाबदल का होत नसावी असा प्रश्न लेखकाच्या मनात उपस्थित होतो, पण त्याचे उत्तर मात्र त्याला मिळत नाही. काड्याकुड्या जमवून महार मांग दलितांनी स्वतः उभी केलेली घरकुले आणि सद्वर्तनी हितकर्त्यांच्या प्रयत्नांमधून त्यांच्या वाट्याला आलेली पक्की घरेही सुडाच्या राजकारणापायी उद्ध्वस्त व बेचिराख होतात, तिथे ही कादंबरी संपते. कादंबरीमधल्या अवकाशात वाचकाला शहरी व ग्रामीण, दलित व उच्चवर्णीय, पुरोगामी व प्रतिगामी अशा विविध प्रवाहातील समाजधुरिणांच्या कार्याबद्दल, त्यांच्या गटागटांच्या राजकारणाबद्दल आणि शहकाटशहांबद्दल विस्ताराने वाचायला मिळते. या कादंबरीचे

शीर्षक विलक्षण अन्वर्थक आहे. बैलाच्या शिंगांना लागणारी भिरुड जर मेंदूपर्यंत पोहोचली तर बैल पिसाळतो, म्हणून जेवढ्या भागाला भिरुड लागली, तेवढा भाग कापून काढला तर बैल पिसाळत नाही. सद्यस्थितीत सत्ता, संपत्ती, स्वार्थ, अनीती आदीची भिरुड राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या मेंदूपर्यंत पोहोचली आहे, परिणामी ते संवेदनशून्य व मस्तवाल झाले आहेत. भिरुड कादंबरीत हे क्रूर आणि स्वार्थी वास्तव प्रखरपणे आले आहे.

शेषराम मोहिते यांच्या धूळपेरणी ही कादंबरीत कृषिशिक्षण घेऊन शेती करणाऱ्या पदवीधर तरुणाच्या वाट्याला आलेली निराशा आणि एकूणच सामाजिक राजकीय व्यवस्थेबाबत त्याचा झालेला भ्रमनिरास अतिशय प्रभावीपणे चित्रित झाला आहे. १९९० नंतर शेतकरी जीवन आमुलाग्र बदलले. कृषिक्षेत्राशी संबंधित प्रशासनही पूर्वीपेक्षा अधिक निगरगट्ट झाले, तळपातळीवरच्या समाजाचे अश्रू पुसू न शकणारे अयशस्वी राजकारण, बदलणारा निसर्ग, बदलणारी धोरणे या साऱ्यांच्या धुमश्चक्रीत फक्त गरगरत राहणारा कृषिपदवीधारक जो शेतकरी धूळपेरणी त आहे तो आपल्या अवतीभवतीही असू शकतो.

आनंद विंगकर यांच्या अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट या कादंबरीत भारतीय कृषिअर्थव्यवस्था कोलमडल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीवर आणि संपूर्ण गावगाड्यावर कोसळलेल्या न संपणाऱ्या अनिष्टाची जीवघेणी धग आहे.

रवींद्र शोभणे यांच्या पांढर या कादंबरीत दुष्काळाचे चित्रण करीत समकालीन सामाजिक पर्यावरणाची अन्वर्थक चिकित्सा केली आहे. पांढर कादंबरी जितकी खरसोलीच्या गावाची आहे तितकीच ती एकविसाव्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्था, प्रशासन आणि राजकीय इच्छाशक्तीतील अंतर्विरोधांची देखील आहे. या कादंबरीत एका गावातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एकूणच या देशातील कृषिव्यवस्थेवर आलेल्या आरिष्टांची आणि समाजकारण राजकारणाच्या मूल्यहीनतेचीही चर्चा केली आहे.

महेंद्र कदम यांच्या आगळ या कादंबरीत १९९० नंतरच्या बदलत्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणात ग्रामजीवनातील हरवत चाललेल्या नात्यांचा अन्वर्थक शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

राजन खान यांची सत ना गत ही वेगळ्या विषयावरची लक्षणीय कादंबरी आहे. पतीच्या संमतीने उदरनिर्वाहासाठी दोन माणसांशी आठवड्यातून प्रत्येकी एक दिवस शरीरसंबध ठेवणाऱ्या नामी नावाच्या एका स्त्रीवर पोलीस कोठडीत

असोले नावाचा फौजदार बलात्कार करतो. पहाटे तिला घरी आणूनही सोडतो. ती तक्रारही करत नाही, पण ह्या बलात्काराची बातमी एका स्थानिक वृत्तपत्रात येते आणि नामी च्या आयुष्याची फरफट सुरू होते. मुख्यमंत्र्यांच्या गावात पोलीस कोठडीत बलात्कार झाल्याने स्थानिक वृत्तपत्रांपासून ती घटना देशपातळीवरच्या वृत्तपत्रांपर्यंत पोहोचते. राजकीय स्वार्थापोटी प्रत्येक जण नामीवरच्या बलात्काराच्या प्रकरणाचा वापर करतो. नामीला सहकार्य करण्याच्या नावाखाली प्रत्येक जण तिचा उपभोग घेतो. या राजकारणात सर्वांनाच काही ना काही फायदा होतो, नामीचे आयुष्य मात्र उद्ध्वस्त होते. समकालीन समाजाच्या अधःपतनाचे अलक्षित असे पण सूत्र करून टाकणारे रूप सत ना गत मध्ये अभिव्यक्त झाले आहे.

१९९० नंतरच्या दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांनी बदलत्या समाजवास्तवाचा अन्वर्थकतेने वेध घेतला आहे. सामाजिक वास्तवाचे कलापूर्ण विश्लेषण करीत असताना काही कादंबऱ्या दलित आणि ग्रामीण अशा साहित्यप्रवाहाच्या सीमारेषा पुसून टाकणाऱ्या ठरल्या. आशयद्रव्य ग्रामीण वास्तवाच्या पार्श्वभूमीवर घडत असतानाही काही कादंबऱ्या साहित्य प्रवाहांच्या वर्गीकरणाच्या चौकटीही मोडून टाकतात. राघववेळ, तणकट, निशाणी डावा अंगठा या कादंबऱ्या म्हणजे वरील दोन प्रकारांची उदाहरणे होते.

भालचंद्र नेमाडे एका ठिकाणी म्हणतात, समाजजीवनाची नोंद करणारा वाङ्मय प्रकार म्हणून जन्माला आलेल्या कादंबरीत सामाजिक वास्तव हे द्रव्य असते. सामाजिक वास्तव व व्यक्तिनिष्ठ वास्तव असे वास्तवाचे विभाजन होऊ शकत नाही. व्यक्ती आणि समाज यांच्यातले हे विभाजन सर्जन प्रक्रियेला परवडणारे नाही. समाजाला आधारभूत अशा प्रेरणांवरच आजच्या सर्व सौंदर्यकृती निर्माण होतात. सौंदर्याचे निकषही प्रायः समूहनिष्ठ असतात. संपूर्ण मानवी व्यक्तिमत्त्व मांडणे म्हणजेच माणूस आणि समाज यांच्यामध्ये असलेले एकजिनसी संबंध मांडणे होय. १९९० नंतरच्या दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांनी माणूस आणि समाज यांच्यातले एकजिनसी संबंध उत्कटपणे विशद केले आहेत. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचे कलात्मक विश्लेषण करताना अनेकदा दलित आणि ग्रामीण जीवन जाणिवांचे साहचर्य दिसते, अनेकदा या दोन्ही जाणिवा परस्पर समांतर असल्याचेही दिसते, अनेकदा परस्परांना त्या छेदूनही जातात असे असले तरी वैचारिक, सांस्कृतिकदृष्ट्या या जाणिवांचे परस्पर भिन्नत्वही नजरेत

भरल्याशिवाय रहात नाही.

१९९० नंतरच्या दलित आणि ग्रामीण कादंबऱ्यांनी सभोवतीचे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण कवेत घेत असतानाच समूहाच्या जगण्यातील अनेक नवे विषय शब्दबद्ध केले आहेत, काही अलक्षित पण महत्त्वाचे विषयही या कादंबऱ्यांनी मुखर केले आहेत. वसंत आबाजी डहाके एका ठिकाणी म्हणतात, माणसांच्या वाट्याला जेव्हा वाईट दिवस येतात तेव्हा कादंबऱ्यांना चांगले दिवस येत असतात. असे मागच काही काळावरून दिसून आले आहे. सध्याचा काळ कादंबरीला बराच अनुकूल आहे. हे अगदी खरे आहे. दलितांचे आणि ग्रामीण माणसांचे जगणे अजूनही सुखावह झालेले नाही. या माणसांच्या डोळ्यातले अश्रू अजूनही कायम आहेत. या अश्रूंच्या लिपीतून कादंबऱ्या साकार होत आहेत. कारण दलितांचे आणि ग्रामीण माणसांचे जग बदलविण्याचे प्रश्न सध्या सर्जनशील कादंबरीकारांनी ऐरणीवर घेतले आहेत.

★★★

# दलित–ग्रामीण कादंबरीतील नवी वाट
# ‘धूळपेरणी’–‘पडझड’

डॉ.भारत विठ्ठलराव शिंदे
प्रा.संजय बालाघाटे

**प्रस्तावना:**

१९२० ते १९९० च्या कालखंडात मराठी वाङ्मयात विविध प्रवाहान आपले स्थान निश्चित करून लेखकांनी वेगवेगळ्या नावानी आपली ओळख जगासमोर साहित्यातून मांडली गेली. महात्मा गांधी, छ.शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रात शिक्षणानी मशाल पेटवल्याने महाराष्ट्रात नवी पिढी उदयाला आली. शिक्षण रूपी ज्ञान पिल्याने त्यांनी आपले अनुभव साहित्यातून गिरवायला सुरूवात केली. आपल्या समाजातील दु:ख आणि वेदनाला वाचा फोडण्याचे कार्य सर्जनशील लेखकांनी केले.

ग्रामीण/दलित साहित्य प्रवाहातून अनुभव वेदना भोगलेल्या वर्गाकडून संवेदनशील मनाच्या यातना शब्दरूपाने साकारण्यास सुरूवात केली. दलित/ग्रामीण कादंबरीकाराने आपापल्या प्रवाहात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या जीवनातील झालेली पडझड/वैभवाचे चित्रण मांडून दु:खी जीवनावर प्रकाश टाकला आहे.

**ग्रामीण कादंबरी :**

‘धूळ पेरणी’ – डॉ.शेषराव मोहिते (२००१)

महात्मा फुले यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ग्रामीण समाजातील व्यथा व्यक्त करणाऱ्या साहित्यापासून प्रेरणा घेत कृष्णराव भालेकर, आनंद पाटील, गणेश आवटे, सदानंद देशमुख, राजन गवस, बाबाराव मुसळे, शेषराव मोहिते आदी कादंबरीकारांनी वास्तववादी वर्तमान प्रश्न जगासमोर मांडले आहेत. याच परंपरेतील शेषराव मोहितेंनी ‘धूळ पेरणी’ ही कादंबरी आहे.

वास्तववादी चित्रण :

‘धूळ पेरणी’ कादंबरीत ग्रामीण भागातील गावगाड्याचे चित्र उभे केले आहे. ग्रामीण संस्कृती शिकलेला तरुण नवे बदल आत्मसात करून शकल्याने

आपल्या मातीपासून कुटुंबापासून कसा दूर चालला आहे हे श्रीराम या नायकाच्या माध्यमातून लेखकाने साकारले आहे. श्रीराम नावाच्या मुलानी व्यथा माडंताना नामू-धूरपताची चाललेली धडपड रेखाटताना घरासाठी रात्रंदिवस कष्ट उपसत आपला जीव झिजवीत जीवन जगताना निसर्गाच्या कालचक्रात ग्रामीण संस्कृती कशी भरडली जात आहे याचे चित्रण म्हणजे 'धूळपेरणी' ही कादंबरी आहे.

'धूळपेरणी' या कादंबरीतून ग्रामसंस्कृतीचे वर्णन करताना ही एका कुटुंबाची कथा नसून ती महाराष्ट्रातील उद्ध्वस्त होऊ पाहणाऱ्या खेड्यांचे ज्वलंत चित्रण आहे. ग्रामसंस्कृतीत अठराविश्व दारिद्र्य असल्याने या दुष्ट चक्रातून बाहेर पडण्याचा व मार्ग शोधण्याचा तेथील माणसांचा चाललेला प्रयत्न प्रस्तुत कादंबरीतून मांडला आहे. ग्रामीण समाज आपल्या कष्टातून वर येण्यासाठी श्रमाची पेरणी करून सुखाच्या पिकाची वाट पाहताना वेळोवेळी पाऊसाने दगा देऊन त्याच्या वाटेवर काटे टाकून जीव घेण्याचा प्रयत्न निसर्ग करताना दिसतो.

शिक्षण क्षेत्राचा परिणाम :

श्रीराम या नायकाचा शिक्षणाचा कालखंड हा आठवी ते एम.एस्सी. असा दहा वर्षाच्या कालखंडाच्या चढ-उतारानी मांडणी कादंबरीतून आली आहे. आठवीचे शिक्षण घेण्यासाठी तो बलसूरला असला तरी शिक्षणापेक्षा शेती हा विषय श्रीरामला जवळचा वाटतो. दहावी पास झाल्याने
आपला मुलगा डॉक्टर व्हावा ही अपेक्षा त्याचे माय-बाप करतात. परंतु शिक्षणात मन लागत नसल्याने परिणामी तो पी.यू.सी. ला नापास होऊन आपल्या कुटुंबाच्या स्वप्नाची राखरांगोळी करतो. पुढे आप्पा (काका) विरोध पत्करून कृषीपदवी घेण्यासाठी परभणीला कृषी विद्यापीठात जातो.

आपल्या मित्राच्या सहवासात श्रीरामच्या वाट्याला भावनिक , बौद्धिक अनुभवातून प्रवास करताना त्याचे जीवन घालमेलीचे झाले आहे. शेती सुधारण्यासाठी विद्यापीठीय ज्ञान कुचकामी ठरत आहे. यातून विद्यापीठाचे अनेक राजकारण व मोर्चामध्ये सहभाग नोंदवतो. अनेक सामाजिक, राजकीय लोकांच्या भाषणातून परिस्थितीचे आकलन होऊन त्यानी बौद्धिक पायाभरणी सुरू झालेली दिसते.

श्रीरामाच्या वाट्याला जीवनाच्या वाटेवर शिक्षणाची झालेली फारकत दिसते. श्रीराम प्रातिनिधिक स्वरूपात असून आज ग्रामीण भागातील प्रत्येक तरुण आपले कष्टावर हिरवीगार शेती करण्याचे स्वप्न उराशी बाळगतो. सावकारी

पाशात अडकलेल्या ग्रामीण समुदाय दारिद्र्याच्या खोल दरीत लोटल्याच्या प्रश्नाला ही कादंबरी भिडते.

**आत्मभान:**

'धूळपेरणी' या कांदबरीत नायक श्रीरामाला आत्मभान आहे. तो शेतीनी दुरावस्था दूर करण्यासाठी आत्मसंवाद साधताना दिसतो. आपल्या समोर पडलेले प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी व्याख्याने भाषणातून उत्तरे शोधण्याची चाललेली धडपड दिसते. आलेल्या परिस्थितीवर संताप व्यक्त करताना विधायक मार्गाचा वापर करताना रागावर तो संयमाने नियंत्रण करण्याचा प्रयत्न करतो.

श्रीराम बंडखोर आहे कारण काकाचे विचार त्याला पटत नसतानाही वाद-विवाद त्यांनी मांडला नाही. शासकीय नोकरीला जाणे म्हणजे सासऱ्याकडून हुंडा लुबाडणे असे मत व्यक्त करताना तो दिसतो. शेती हा विषय शेतकऱ्याच्या फायद्याचा नाही तर ''शेतीतल्या हिरवेपणाच्या भरवशावर सारे आयुष्य आलटून-पालटून गहाण ठेवावे आणि हे सर्व माहीत असूनही आम्ही शेती करावी; अशी तुमनी अपेक्षा? तुम्ही आम्हाला काय येडझवे समजता की काय?'' अशा कितीतरी प्रश्नातून आपली बंडखोरी तो व्यक्त करतो. ग्रामीण जीवनाच्या पडझडीच्या कालखंडात नायक हा आपल्या बडंखोर वृत्तीने ही पडझड माडंतो.

**स्त्री चित्रण :**

श्रीरामनी आई धूरपा ही मराठवाड्यातील ग्रामीण संस्कृतीतील कष्ट करणारे प्रातिनिधिक पात्र आहे. आपल्या पती आणि मुलाच्या सुखात आपले सुख मानून संसाराच्या धबडग्यात ती चंदनाप्रमाणे झिजणाऱ्या ग्रामीण स्त्रीचे प्रतीक आहे. हे पात्र निसर्ग चक्राशी झगडून आपल्या कुटुंबाला उभे करण्याचा प्रयत्न करते. ती आपल्या आत्मविश्वासाने व कर्तृत्वाने आलेल्या प्रत्येक संकटावर मात करते. तिच्यातील धाडस हे लेखकाने अत्यंत जिवंतपणे साक्षात केले आहे. तर रेणु देशमुख, विजयालक्ष्मी ही स्त्री पात्रे कथानकाला आकार देताना दिसतात.

एकूणच ग्रामीण भागातील कष्टकरी स्त्री आणि पुरुष यांच्या वेदनांना साकार करताना कृषि संस्कृतीतील विपन्नावस्थेत जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या दु:खाला कादंबरीकार मोहिते यांनी शब्दबद्ध केले आहे. १९९० नंतर ग्रामीण जीवनात आलेले वेगवेगळे स्थित्यंतर आणि त्यातून निर्माण झालेल्या जगण्याच्या विविध

प्रश्नांना 'धूळपेरणी' ही कादंबरी थेटपणे भिडते.

**'पडझड' मधील वास्तववादी चित्रण :**

'पडझड' या कादंबरीतून वडार, बहुरूपी, कैकाडी, कुडमुडे जोशी या भटक्या विमुक्त जमातींचे चित्रण केले आहे. वडार समाज गावाबाहेर झोपड्या बांधून राहताना गावगुंड आणि पोलिसांकडून त्यांना होणारा त्रास आपणास अस्वस्थ करतो. या जमातीला कामासाठी सतत भटकंती करावी लागले. पोटासाठी वाटेल ते कष्ट उपसावे लागते. रात्रंदिवस दगड फोडून कष्ट उपसत जीवनाशी लढावे लागते. तर काम नसेल तर त्यांना उपाशी झोपावे लागते. या जमातींचे शोषण प्रस्थापितच करतात असे नाही तर जमातीतील मुकादमही आपल्याच माणसांचे शोषण करतो ही माणसे मात्र नशिबाचा दोष म्हणून हा अन्याय त्यांना सहन करावा लागतो. यापाठीमागे या जमातीचे अज्ञान, दारिद्र्य आणि व्यसनाधीनता ही कारणे असल्याचे लेखक पवार चित्रित करतात.

भटक्या विमुक्तांना स्वत:चे गाव नाही आणि कुठे बसायला हक्काची जागा नाही. त्यामुळे आपले बिऱ्हाड पाठीवर घेऊन कामासाठी त्यांनी भटकंती अटळ ठरली आहे. पोटात भुकेचा पेटलेला वणवा विझवण्यासाठी कधी कधी छोटी-मोठी चोरीही करावी लागते. त्यातच अज्ञान, परंपरा, रूढी आणि गावकऱ्यांकडून मिळणारी तुच्छतेनी वागणूक अशा प्रश्नांवर पवार यांनी प्रकाशझोत टाकला आहे. पवार यांनी आपल्या रोजच्या जगण्याच्या भाषेतून या लोकात परिवर्तन व्हावे यासाठी निर्भीडपणे या जमातींच्या उन्नयनाच्या दिशा स्पष्ट करतात.

**शिक्षणाचा परिणाम :**

या कादंबरीतील नायक तुक्या वडार नवव्या वर्गात शिक्षण घेताना तो आपले बिऱ्हाड शोधण्यासाठी गावोगाव फिरतो तर दहावी पास झाल्यावर परभणीला शिक्षण घेण्यासाठी जातो. त्यावेळी त्याच्या तोंडातील वाक्य महत्त्वाचे आहे तो म्हणतो- ''शिक्षण तर मह्या आयुष्याची कमाई आहे. खूप मान-अपमान पचवून मी यश मिळविलं. बिराडातून दहावी पास होणं कठीणच नाही तर महाकठीण आहे.''

या कादंबरीतून अभिमान या बहूरूपी जमातीतील मुलगा एम.ए., बी.एड. पर्यंतचे शिक्षण घेऊन नोकरी लागत नाही म्हणून हिजड्याचे रूप घेऊन पोट भरतो

ही आपल्या व्यवस्थेने मुठभर लोकांच्या सुखासाठी नव्याने मुख्य प्रवाहात येण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणांचा घेतलेला बळी आहे. जिवंतपणीच माणसाला माणूस न ठेवता त्याचे स्वत्त्वच हिरावून घेते. याला हजारो वर्षांनी परंपरा कारणीभूत आहे. पदवीधर तुकारामला नोकरी लागत नाही ही एकट्या तुकारामानी समस्या नाही तर भटक्या विमुक्त जमातीतून नव्याने शिक्षण घेऊन जीवनाची नवनवी स्वप्ने पाहणाऱ्या तरुणांची खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाने कशी निराशा केली आहे हेच या कादंबरीतून मांडताना लेखक बेकारी, भ्रष्टाचार व भाकरीचा प्रश्न उभा करून आपल्याला अंतर्मुख करायला लावतो.

**शिक्षणातून आलेले आत्मभान:**

तुक्याला गोरोबाकाका वसतिगृहात मोठ्या मुश्किलीने प्रवेश मिळतो. हॉस्टेलचा कारभार पाहून तुक्याला मुकाट्याने सर्व सहन करावे लागते. याच वेळी त्याच्या आत्मसन्मानाला ठेच पोहचते. लेखकाने तुक्याच्या जीवनातील संघर्ष हा अत्यंत संवेदनशीलपणे रेखाटला आहे. चोरीचे आरोप आणि विविध अपमानाच्या प्रसंगातून तुक्या धडा घेत आपला उद्धार हा शिक्षणानेच होणार आहे. यासाठी तो सत्य आणि स्वाभिमानाच्या मार्गाचा अवलंब करतो. प्रत्येक जीवनातील प्रसंगाला तो आत्मविश्वासाने लढा देतो. वसतिगृहात जागा नाही, पायाला चप्पल नाही, खिशात पैसा नाही, अंगावरची कापडे त्याच्या जीवनाप्रमाणे विरलेली अशा कठीण अवस्थेतही संघर्ष करून प्रसंगी हॉटेलात काम तर कधी मजूरी करून शिक्षण घेतो. तर लहानपणी शाळेत जाण्यापूर्वी भीक मागणे, चोरून लग्नाच्या पंक्तीत जेवण करताना मार खावा लागणे या साऱ्या प्रसंगानी शाळेत गेल्यापासून तुकारामला लाज वाटते. त्यालाही चांगले जीवनमान जगावे वाटते. स्वाभिमानाची वाट ही शाळेतूनच जाते असा आत्मविश्वास त्याला प्राप्त झाला आहे.

**स्त्री पात्रे :**

भटक्या विमुक्त जमातीतील स्त्री ही परंपरेसोबतच इथल्या व्यवस्थेच्या शोषणाला बळी पडली आहे. जेव्हा कादंबरीत कैकाडी जातीतील मुलीवर ती दारू देत नाही म्हणून तिला बलात्कार केला जातो. तेव्हा पोलीसच समेट घडवतात. मग न्याय मागायचा कुठे? गावात कुठे चोरी झाली की बायका

पोरांसहित त्यांना पोलीस स्टेशनला जावे लागते. या कादंबरीतील सिंधू हे पात्र आपले लक्ष वेधून घेते. तिला स्वैराचारी वर्तनातून गर्भ राहिल्यानंतर ती तुक्याला त्यात अडकविण्याचा प्रयत्न करते. पण तुक्या त्यातून सुटतो. लंगड्या रमेशनी पती मिस्त्रीबरोबर पळून जाते. तर तुकाराम आपल्या जातीमधीलच वंदनाशी लग्न करतो त्यांनाही पुढे जगण्याच्या लढाईत संघर्ष करावा लागतो. याचे चित्रण लेखकाने मोठ्या खुबीने केले आहे.

**'पडझड' मधील जात पंचायत:**

जात पंचायत हे भटक्या विमुक्त जमातींचे व्यवच्छेदक लक्षण मानल्या गेले आहे. वडार समाजातील जात पंचायत या कादंबरीतून लेखकाने चित्रित केले आहे. या पंचायतीत अनेक खटले येत. यात परपुरुषाचा स्पर्श, जातीत घेण्यासाठी नवरा सोडणे, फारकत घेणे असे प्रश्न उभे राहतात. ही जातपंचायत पूर्णपणे पारंपरीक असून तिचे कायदे रूढीने ठरविल्यामुळे तिथे लोकशाहीला कुठेच थारा नाही. दारू, मटन आणि पैशाचा दंड ठोकून तो बळजबरीने आरोपीकडून वसूल करणे हे जात पंचायतीचे चित्रण उभे करताना लेखक भटक्यातील प्राचीनताच दिग्दर्शीत करतो. या जात पंचायतीला विरोध झाल्यावर बहिष्कृत करण्याची शिक्षाही विरोध करणाऱ्याला ठोठावली जाते. एकूणच एखाद्या कुशल चित्रकाराने आपल्या कुंचल्यातील विविध रंग आणि रेषांच्या माध्यमातून एखादे चित्र जिवंत साकारावे त्याचप्रमाणे अशोक पवार यांनी आपल्या अकृत्रिम शैलीतून भटक्या विमुक्तांचे जीवन या कादंबरीतून उभे केले आहे. अनेक स्वभाव वैशिष्ट्यातून व कथा-उपकथनकातून ही कादंबरी फुलते. शिक्षणाच्या माध्यमातून आत्मभान आले तरी इथल्या भटक्यांच्या जगण्याचा प्रश्न सुटला का? असा प्रश्न आपल्याला विचारप्रवण केल्याशिवाय राहत नाही.

**निष्कर्ष:**

१. 'धूळपेरणी' या कादंबरीतून ग्रामीण जीवनातील वर्तमान प्रश्नांची वास्तववादी मांडणी केली आहे.

२. 'धूळपेरणी' ही कादंबरी ग्रामीण संस्कृती व कृषिवलाच्या जीवनाचे चित्रण करते.

३. श्रीरामच्या शैक्षणिक प्रवासासोबतच ग्रामीण तरुण हा आपल्या भागापासून

कसा दूर जात आहे. याचेही चित्रण ही कादंबरी करते.

४. एकूणच उपरोक्त दोन्ही कादंबऱ्यामधून पुस्तकी ज्ञान व वास्तववादी ज्ञानात असलेला परिणाम लेखकाने मांडला आहे.

५. 'पडझड' ही कादंबरी भटक्या विमुक्तांच्या जगण्याची परीवर्तनशील दिशा सूचित करते.

६. शिक्षणामुळे तुकाराम म्हणजे भटक्या विमुक्तात निर्माण झालेला स्वाभिमान रेखाटते.

७. भटक्या विमुक्तांचे अज्ञान, जातपंचायती, भुकेचा प्रश्न, रूढी, परंपरा यांच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी शिक्षण हाच उपाय लेखकाने सांगितला आहे.

८. २००० नंतर ग्रामीण व दलित कादंबरीमध्ये शिक्षणातून आलेले नैराश्य, वाढती बेकारी व्यवस्थेतील वाढलेला भ्रष्टाचार आणि सामान्य माणसांच्या जगण्यात आलेली उदासीनता टिपल्या गेली आहे.

★★★

# ''मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना''
## ('राघववेळ' व 'झोंबी')

प्रा. गावडे. व्ही. वाय.

**प्रस्तावना :**

'राघववेळ' व 'झोंबी' या दोन्ही साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबऱ्या आहेत. 'राघववेळ' ही वालंबीच्या व्यथेची कथा आहे आणि म्हणूनच तिच्या पुत्राच्या रघूच्या व्यथेची आणि धडपडीची ती गाथा आहे. गावगाडातील अस्पृश्य जातींचे दुःख, अन्याय, अत्याचार यांचे दर्शन या कादंबरीत घडत असून त्याची झळ ग्रामीणतेत असल्याचे स्पष्ट होते. या कादंबरीतून दलित जीवनाचा उत्कट आविष्कार घडून आलेला दिसते. कादंबरीतील पार्श्वभूमी ही दलित जीवनाला व्यापून आहे. 'राघववेळ' मध्ये नामदेव कांबळे यांचा दहावी पास होई पर्यंतचा भाग आला आहे.

'झोंबी' ही आनंदाच्या व्यथेची आणि धडपडीची गाथा आहे. एका शेतकरी कुटुंबाच्या बरोबरच गावगाडाचीही स्थितीगती त्यातून सांगितली आहे. गावजीवन मातीचं आणि मातीत जगणाऱ्या लोकजीवनाचं प्रतिबिंब असतं आणि हे लोकजीवन ऋतुमानांशी, ऋतुमानातील सामाजिक धार्मिक उत्सवांशी अभिन्न जुळलेलं असते. हे या दोन्ही कादंबऱ्यांधून दिसून येते.

नामदेव कांबळे यांनी मांग समाजात जन्मलेल्या 'रघुनाथ कळणू जाधव' याची ही कथा, 'राघववेळ', 'ऊनसावली' आणि 'सांजरंग' या तीन कादंबऱ्यामधून मांडली आहे. आनंद यादव यांनी एका शेतकरी कुणबी समाजात जन्मलेल्या 'आनंदा रत्नाप्पा जकाते' (आनंद रतन यादव) यांची ही कथा, 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती', 'काचवेल' यातून मांडली आहे.

'राघववेळ' व 'झोंबी' वाचल्यानंतर त्याच्यापुढे काय? अशी वाचकांना उत्कंठा लागून राहते. हे या लेखकांचे फार मोठे यश असल्याचे दिसते. प्रस्तुत निबंधात 'राघववेळ' व 'झोंबी' याचा विचार केला आहे.

'राघववेळ' ही नामदेव कांबळे यांची कादंबरी १९९३ साली प्रसिद्ध झाली. या कांदबरीत १९६० नंतरच्या घटना चित्रित करण्यात आल्या आहेत. १९९५ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार 'राघववेळ' ला मिळाला.

'राघववेळ' मध्ये नामदेव कांबळे मांग समाजातील एका मनस्वी स्त्रीच्या भोवतालच्या वास्तवाचे चित्र रेखाटतात. मांग जातीची जीवन रहाटी, गावगाडा आणि श्रमजीवींच्या शोषणाची चित्रकथा या कादंबरीत आहे.

लेखकाच्या घराण्यात शिक्षणाची परंपरा नव्हती. परंपरेने चालत आलेल्या अज्ञानामुळे त्यांच्या घरात कायम दारिद्र्य भरलेले होते. ग्रामीण जीवनाचा पर्यायाने दलित जीवनाचा एक व्यापक पट 'राघववेळ' या कादंबरीत मांडला आहे.

'राघववेळ' ही कादंबरी विधवा वालंबी या मातंग स्त्रीच्या जीवनावर आधारलेली आहे. सीताराम, वालंबी, कौशी, रघू या पात्रांभोवती ही कादंबरी फिरताना दिसते. कादंबरीचा पूर्वाध हा विधवा वालंबीच्या फाटक्या संसाराचा आहे.

मध्यभाग हा गजरी आणि कौशी यांच्या लैंगिक संबंधावर आधारित आहे. उत्तरार्ध रघूच्या शिक्षणावर आधारित आहे. 'राघववेळ' या कादंबरीच्या मनोगतात लेखक नामदेव कांबळे म्हणतात. "वालंबी मला दिसली भेटली. भावली. मुलांचे जीवन घडविताना पाहिली तिला मी. त्यांच्यासाठी जीव ओतताना मला ती दिसली. ती आणि तिची मुलं मिळेल ते खायची. उद्याच्या आशेवर आला दिवस लोटायची, एका दुर्दम्य आत्मविश्वासाने !"

या कादंबरीतील नायिका वालंबी ही स्वतः निरक्षर असून देखील तिला शिक्षणाचे महत्त्व कळले आहे. ती स्वतः जरी निरक्षर असली तरी मनाने सुसंस्कृत आहे, म्हणून ती आपल्या रघू आणि सीतारामला चांगले शिक्षण देण्याचे स्वप्न उराशी बाळगते.

या कादंबरीत काही ठळक जातीची माणसे दिसतात. जगदीश सरपंच, पांडुरंग पाटील, गोपाळराव देशमुख जाधव आणि वाणी, मारवाडी, धनगर, लिंगायत, माळी, कलाल, न्हावी, सुतार, फकीर, महार, मांग, चांभार इत्यादी जातींची माणसे कादंबरीतून दिसतात.

ग्रामीण जीवनाचा व्यापक पट कादंबरीतून लेखकाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'वसारी' आणि 'डोंगरकिन्ही' या दोन गावांच्या सभोवती मुख्यत्वे कथानकाची मांडणी करताना विधवा वालंबी ही व्यक्तिरेखा समोर ठेवली आहे. राघववेळ ही कादंबरी मांग कुटुंबाचे दारिद्र्य, उपासमार आणि परावलंबित्व यांच्यात लढणारं असे कुटुंब. ही कुटुंबे पारतंत्र्यातही झगडत होती आणि स्वातंत्र्यातही झगडत आहे. अगदी तळहातावर पोट भरणाऱ्या मांगांच्या वाट्याला तीच भूक,

तेच शोषण, तीच मुस्कटदाबी, तिच मारहाण कधीतरी त्यांच्या वाट्याला एखादा आनंदाचा क्षण येतो.

या कादंबरीत रघू मॅट्रिक परीक्षेत पास होतो तेव्हा वालंबीच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहतात. किंबहुना सारे कुटुंब आनंदात बुडून जाते या कादंबरीच्या अखेरीस वालंबी म्हणते, ''झालं माह्या कष्टाचं चीज. पाह्य् न, पास झाला रघू आपला. तुचं ऐकलं. कंबर बांधली, चीजच झालं त्यांच तुम्ही आस्ते आता तर नव्हतं व्हतं ! खर ह्ये तुचं ! तुचीच साया ह्ये लेकरावर, म्हूनच तर मॅट्री झाला रघू. पण लय सोसल बरं लेकरानं माह्या.'' तसे पाहिलं तर वालंबी म्हणते त्या प्रमाणे ''आजचा दिस माह्या जिनगीतला लय आक्रीताचा लय दीस पण यासाठी वालंबीने आपल्या नवऱ्या पाठोपाठ खूप सोसलं आहे. 'रघू लय मोठा शिकन. मोठा सायेब व्हईन हे स्वप्न वालंबीने जपले आहे. दलित चळवळीतल सर्व स्त्रियांचे हे विशेष आहे की आपल्या मुलाबाळांनी शिकले पाहिजे असा त्या आग्रह धरीत. त्यासाठी वाटेल ते कष्ट उपसायला तयार असत.''

आपल्या मुलांना 'जगवणं' ही वालंबीच्या जगण्याची प्रेरणा होती. त्यासाठी हत्तीचे बळ घेऊन गावकुसाबाहेरच्या मांग वेताळातील वालंबी झुंजत होती. 'राघववेळ' या कादंबरीचा आरंभ भुकेच्या ऋचेने झालेला आहे. ''मांगाच्या घरातील पीठ संपले. घरातील दाणागोटा तर केव्हाच संपला होता'' या वाक्याने भुकेच्या ऋचेचा आरंभ होतो.

खांदे मळणीच्या दिवसापासून पोळ्या च्या दिवसापर्यंत मांग राबराबले तेव्हा त्यांना पोळ्या, कालवण, भात, वरण भेटते. त्या दिवशी रघूच्या मनात आले. ''पण हे तर निरूहा भीक मांघणं झालं. काही बी न करता भेटते ती आन् जरासं काय तरी करून त्या परीस लय मोठी भेटते ती बी भीकच. आपून ही भीक मांगत फिरलो तीन दिवस ती भीक ह्यो, हे माहीत आसून बी ! काहून मांगली आपून !''

रघूला यातून जीवनाचे वेगळे दर्शन घडत होते. विचार करून अनेक प्रश्न उभे राहत होते. 'गिरूहाण मांगण चांगलं नाही'हे मनाला पटत होते. पण या प्रश्नांची उत्तरे मिळत नव्हती. या उत्तरांचे मूळ इथल्या समाजव्यवस्थेत होते.

''जांबऋषींचा अभिमान सांगावा, किसन देवाचा गुरू सांदिपनी ऋषिचा अभिमान बाळगावा आणि अन्न पुरवायला हायत माझा इष्नू गादीला'' असे म्हणत मागे त्याचे लाचार जिणे जगावे! 'शस्त्राशिवाय महा अतंग माजविणारा'

अशी मांग शब्दाची, व्युत्पती दिली असली, तरी या महा शक्तीमान मांगाला ब्राह्मणी वर्गमुळं फार दुबळे करून टाकले असावे म्हणून गावकीची कामे, घरकीची कामे त्याच्या वाट्याला आली असावी. येथील समाज व्यवस्थेने या जातीवर अन्याय तर केलाच; पण धर्म व्यवस्थेने देखील त्यांना गुलामीचे जिणे दिले. मांगांचे प्रमुख दैवत मरी आई किंवा लक्ष्मीबाई असून बहिरोबा, खंडोबा, म्हसोबा, अंबाबाई, जानाई, मांसाई, ईनाई या त्यांच्या कुलदेवता आहेत. 'राघववेळ' या कादंबरीत महालक्ष्मीच्या मुखवट्याची नवरात्रात मांगांची इनाई होते. तिची आणि शंकर देवाची लोककथा लेखकाने या कादंबरीत कथन केली आहे. या लोककथेत 'इनाईच्या जीवनाची वाताहत होते' या वाक्याला वेगळा अर्थ प्राप्त होतो.

मांग कुटुंबाला 'सोशीकतेचा आणि समजूतदारपणाचे जणू वरदान नव्हे शाप मिळाला आहे. बायका दुःख सोसत सतत जगत राहतात; पण पुरुषांचा शेतात काम मिळाले तरच निभाव लागतो. अन्यथा आपल्या कुटुंबावरचा अन्याय सोसत राहावा लागतो किंवा बाह्या बनून, पोतराजाची दीक्षा (वढण) घेऊन गावागाड्यात जगावे लागते.'

महार, मांग, चांभार आदी जातींच्या कुटुंबातील स्त्रियांचे 'चूल आणि मूल' सांभाळणे हेच आपले जीवित ध्येय आहे. अशी समजूत करून दिली होती. पण फुले आंबेडकरांच्या चळवळीतून ती जागी झाली. तिच्या विचारांना दिशा मिळाली. या स्त्रियांना जे जाणवत होते ते बोलून दाखवत, पण गावगाड्यात जगायचे तर विरोध करता येत नव्हता, गावगाड्याने सतत आपल्यावर अन्याय केला आहे. याची जाणीव वालंबीला तर होतीच, ''निऱ्हा आपी मानाचं जीणं ह्ये जीव जात नाही. म्हणून आरुळ्या देणं ह्ये! पण आम्हाले नाही न टाकता येत'' ही तडजोड करीत मांग कुटुंबे अन्याय सोसत गावगाड्यात एकेक दिवस घालवीत होती. ही कादंबरी म्हणजे कुटुंब कथा आहे पण यातून दडपल्या गेलेल्या; दबलेल्या कुटुंबाचे दुःख साकार होते. माणसाचे मोठेपण हे त्याच्या अर्थपूर्ण जगण्यावर अवलंबून आहे. हे 'अर्थपूर्ण जगणे' रघू आणि त्याचा समाज यांच्या वाट्याला कधीच आलेले नाही. 'रघू' हा शोषित वर्गाचा प्रतिनिधी आहे. पण आजच्या समाजव्यवस्थेत शोषितांचा लढा शोषण मुक्तीसाठी आहे. शोषणालाही अंत नाही आणि शोषण मुक्त होण्यासाठी चाललेल्या संघर्षालाही अंत नाही. या संघर्षाचे चित्रण हा दलित कादंबरीचा आत्मा आहे.

'राघववेळ ही कादंबरी वाचल्यानंतर लक्षात राहाते ती नामदेव कांबळे

ह्यांची भाषाशैली विदर्भातल्या बोली भाषेचा सफाईने उपयोग करून ही कादंबरी लिहिली आहे. ही बोली लोकांची आहे. लेखकाने आपल्या लेखनासाठी ती बोली भाषेतील ठसका, छोटी वाक्ये, लोक म्हणी यांचा वापर कादंबरीत आहे. सहज आणि खुबीने बोली भाषा वापरलेली आहे. संपूर्ण कादंबरी बोलीभाषेत व्यक्त झाली असली तरी प्रमाण भाषेचा वापरही अधूनमधून केलेला आहे. अगदी ते पुस्तकाच्या शीर्षकातही दिसून येते.' दलित साहित्याची भावनात्मक, संवेदनात्मक भाषिक आणि दृष्टिकोनात्मक कोंडी फोडून ही कादंबरी मराठी साहित्याची क्षितीज लंदावती. म्हणूनच ही कादंबरी एक तोला मोलाची कलाकृती वाटते. 'राघववेळ' म्हणजे रघूच्या आयुष्याच्या विकासाच्या दृष्टीने रामप्रह्य आहे. आनंद यादव यांची 'झोंबी' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी १९८७ मध्ये प्रसिद्ध झाली. ही कादंबरीतून ग्रामीण भागातल्या शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या मुलाची कहाणी आहे.

'झोंबी' ह्या आत्मचरित्रात्मक कादंबरीसाठी आनंद यादवांना १९९० चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. वयाच्या पन्नाशीत यादवांनी झोंबीचे लेखन केले. यादवांनी झोंबीचे लेखन लालित्याच्या अंगाने केले आहे. त्यामुळे ही आत्मचरित्रात्मक कादंबरी वाचताना वाचक एकरूप होऊन जातो. त्यातला प्रत्येक अनुभव जिवंत वाटतो. असा अनुभव वाचक घेत राहतो व हेच त्या कादंबरीचे वेगळेपण आहे.

आयुष्यात बालपणात घडलेल्या प्रत्येक घटना, आलेला प्रत्येक अनुभव त्यांना त्या क्षणी जसा जाणवला होता, भावला होता, लक्षात राहिला होता तसाच त्याच भावनेसह रेखाटला आणि म्हणून तो जास्त प्रत्ययकारी झाला.

'झोंबी' ही यादवांच्या बालपणातल्या संघर्षाची कलण कथा आहे. त्यांच्या बालपणापासून ते दहावीपर्यंतच्या जीवन प्रवासाची कहाणी या कादंबरीत मांडली आहे. ग्रामीण जीवनात येणारे व परिस्थितीने दिलेले दाहक अनुभव या कादंबरीत यादवांनी मांडले आहेत. प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या एका संवेदनशील मुलाची कथा या आत्मचरित्रात आहे. आनंद यादवांच्या कुटुंबात आई, वडील, भावंडे व ते स्वतः ह्यांचे परस्परांशी असलेले सहसंबंध एक वेगळाच अनुभव देऊन जातो. वडिलांकडून आईवर झालेला अत्याचार, आईची असहायता, वयाची पस्तीशी ओलांडण्याच्या आत आठ मुलांना जन्म देवून तिची झालेली दैन्यावस्था व त्यातूनच जुळ्या मुलींच्या जन्मानंतर ह्या मुलींना

कायमचं गार कसं करता येईल ह्याचा विचार करणारी एक असहाय माता हे सारं वर्णन वाचताना वाचक सुन्न होतो.

आनंद यादवांना शिक्षण घेण्यासाठी आपल्या वडिलांशी करावे लागणारं वैचारिक युद्ध हे शिक्षणासाठी असुसलेल्या जीवाची कहाणी सांगत जाते. त्याचा परिस्थितीशी चाललेला लढा सांगत जाते. ह्मिण्यकश्यपू व प्रल्हाद यांच्यात असणारे द्वंद्व व आनंदा व रतून यांच्यातील द्वंद्व सारखेच होते. याचा उल्लेखही झोंबीत झालेला आहे. ह्याचा प्रत्यय वाचकाला पदोपदी येत राहतो. शाळेत जाण्यासाठी बापाचा तीव्र विरोध आपल्या मुलाने शिकावे ही आईची इच्छा व आनंदाची शाळेत जाण्याची प्रचंड इच्छा शक्ती अभ्यासाची तळमळ विचार करायला भाग पाडणारी आहे.

आनंदाचा जीवनप्रवास तर वाचक अनुभवतच राहतो; पण त्यासोबतच आनंदाच्या आईचे दुःख आणि भयानक भावविश्व आनंदाच्या बहीणभावंडाचं वैराण आयुष्य हे सारं एका ग्रामीण विश्वाशी वाचकाची नाळ जोडत जाते तेव्हा नागरी जीवन व ग्रामीण जीवन यात असणारा विलक्षण भेद वाचकाला जाणवत राहतो.

दहावीपर्यंतच्या शिक्षणाच्या लढाईचा हा प्रवास मांडताना यात कोठेही आत्मप्रौढी मिरविलेली नाही. प्रचंड हाल सोसताना कोणती प्रौढी असणार? जे वाट्याला आलं ते मांडले. किती मार खाल्ला, बापाने गुराढोरा सारखा लाथेखाली तुडवला तरी आनंदाने शाळेत जाण्याचा ध्यास सोडला नाही. तो शाळेशी जोडला जाणारा धागा तुटता तुटता बांधून ठेवत होता व तेच आनंदच्या जिद्दीचे खरे कौतूक आहे.

'झोंबी' कादंबरी वाचल्यानंतर वाचकाला उत्कंठा लागते ती आनंदाच्या पुढच्या आयुष्यात काय घडले असेल याची 'झोंबी' आणि त्यानंतर त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचे तीन भाग 'नांगरणी', 'घरभिंती', 'काचवेल' या प्रत्येक कादंबरीतून आनंद यादव उलगडत जातात व वाचक स्तंभित होत राहतो. लेखकाचे हे लेखन बहुजन समाजातील बहुजन मनाचं प्रतिनिधित्त्व करणारं लेखन आहे. आजही ग्रामीण भागातून येणारा युवक झोंबीकडून प्रेरणा घेतो. बिकट परिस्थितीशी झगडायला ही कादंबरी शिकविते.. ग्रामीण युवकाला ध्येयप्राप्तीच्या वाटेत रस्ता दाखवणारा एक मार्गदर्शक असेच स्थान झोंबीचे आहे. वाचकाला अस्वस्थ करणारे हे पुस्तक आनंदाच्या जिद्दीने त्याला स्वस्थपणे जगण्याचे बळ देते.

ग्रामीण जीवनातल्या वेदना, दुःख, अडचणी लेखकाने झोंबीतून मांडल्या आहेत. झोंबी ही ग्रामीण जीवनाचे वास्तव रूप साकारणारी कादंबरी आहे. या कादंबरीत लेखकाने आपला जीवनपट कलात्मकतेने मांडलेला आहे. म्हणूनच झोंबीला. आत्मचरित्रात्मक कादंबरी म्हटले जाते. कागल, कोल्हापूर परिसरातील शेती व्यवसाय, शेतात राबणारा आनंदा, शाळेविषयी असलेली लेखकाची गोडी, शिक्षण मिळण्यासाठी केलेला संघर्ष अशी लेखकाची व्यथा झोंबीत दिसते. शाळेतल्या गंमतीजमती, अंगलट आलेल्या खोड्या, मास्तरांचे विविध प्रकारचे स्वभाव, चोरून विडया ओढण्याचा नाद, खोटे बोलून कातडी बचावण्याची अंगवळणी पडलेली सवय, याचं मोठ चित्ताकर्षक शब्दचित्रण यादव करतात. मात्र या सुखाला कालण्याची दयनीय कडाही असते. कवितेच्या प्रेरणनं यादवांना प्रचंड बळ दिलं त्याला आपल्या हुशारीचा आत्मविश्वास तर या झोंबीत सारखा साथ देत होता. आनंदाची 'झोंबी' दारिद्र्या बरोबर होती बापाबरोबर होती आणि एक सूक्ष्म स्तरावर शाळेतील पोरांबरोबरही होती. या जगात अक्कोळकर मास्तर असतो; तसाच एखादा फॉंच्या फीचा अजस्त्र प्रश्न सोडवणारा व्यवहार्य पण सहानुभूतीशील धर्माधिकारी मास्तरही असतो.

'झोंबी' मध्ये स्त्री जीवनाचा अनेक पदरी जीवन संघर्ष आपणास पहावयास मिळतो. आई म्हणून ताराची जीवनकथा भेदक आहे. दारिद्र्याच्या आगीत तिचे आयुष्य भाजून निघाले. पोरांची परवड पाहून ती हंबरडा फोडण्यापलीकडे काही करू शकली नाही. कन्या, बहीण, सून, पत्नी, आई अशा अनेक नात्यातून ताराची व्यकितरेखा वाचकांसमोर उभी राहते, प्रत्येक भूमिका तिचे कारुण्यपूर्ण जीवन वाचकांना हलवून सोडते, वाचक अंतर्मुख होतो.

वयात आलेल्या बहिणींची स्वतःच्याच मनाची समजूत घालून फसवणूक करीत केलेली लग्न आणि त्यातलं अनेक पदरी दारिद्र्याचं परंपरेच्या झिरझिरीत वस्त्रातून होणारे दयनीय प्रदर्शन, यातलं कारुण्य फार प्रभावीपणे हा कलावंत प्रकट करतो. सासू सासऱ्यांचे छत्र गेल्यावर ताराला (यादवांच्या आईला) नणंदेचा कडक सासू सारखा छळ सहन करावा लागतो.

आनंद यादवांच्या संवेदनशील मनाने ग्रामीण स्त्री व्यथेचा ठाव घेतलेला आहे. 'झोंबी' या कादंबरीत आई, बहीण, आत्या, आजी अशा नात्यातून ग्रामीण स्त्रीचे अंतर्मन तिच्या मनाची लढी परंपरेनुसार झालेली जडण घडण, तिचे कष्ट तिची शारीरिक व मानसिक अवस्था, तिचे कौतुक व सामाजिक स्थान

दिसून येते.

आनंद यादवांना 'झोंबी' मधील स्त्री व्यक्तिरेखेकडे पाहण्याचा उदारपणा जाणवतो. आईची (तारा) व्यक्तिरेखा मांडताना ते आपल्या आईचे दुःख फार जवळून पाहतात व ते मांडतात एकंदरीत सामाजिकदृष्ट्या या कादंबरीत स्त्रियांचे स्थान व जीवन परावलंबी आहे. लढी परंपरेत अडकल्याने अंधश्रद्धा, व्रतवैकल्याकडे, नवसाकडे त्या वळताना दिसतात. लग्नानंतर सासरच आश्रयस्थान, मुलगा वंशाचा दिवा, मुलगा-मुलगी भेद, बहुपत्नीत्वाची प्रथा, स्त्री उपभोग्य वस्तू (नायकीन व जोगतीन यांच्या लपाने) अशा सामाजिक चालीरीती या व्यक्तिरेखा दर्शवितात.

बालविवाह, परित्यक्ता, घटस्फोटित, बहुपत्नीत्त्व, दारिद्र्य, सोशिकता तिचे शारीरिक कष्ट मानसिकता, दुर्बलता, लाचारी, मानहानी तिचे होणारे दमण, त्याचबरोबर तिची चिकाटी, तिचा व्यवहारी दृष्टिकोन, तिची मानमर्यादा, संकटांना तोंड देण्याची तिची ताकद अशा विविधांगाने, यादवांनी 'झोंबी' या कादंबरीमध्ये ग्रामीण स्त्री जीवनाचे पैलू दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीतील स्त्री जरी सोशीक असली तरी कधीतरी तिचा उद्रेक होताना दिसतो, 'झोंबी'तील ग्रामीण स्त्रीचे स्थान 'चूल आणि मूल' आहे.

आनंदाच्या आईने प्रचंड यातना, रतन जकातेचा प्रचंड जुलूम सहन करून आनंदाच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. आनंदाला पाटीने वळण लावलं पण त्याच्या हातात पाटी रहावी म्हणून आई ठाम होती. या कलाकृतीतील कुटुंबकथा आईच्या भव्य व्यक्तिरेखेुळे खूप उंचीवर जाते एका अर्थाने ती भारतीय स्त्रीच्या यातनांची कर्मकथा झोंबीत आहे. आई हे लेखकाचे खऱ्या अर्थाने दैवत आहे हे स्पष्ट होते.

'झोंबी' चे निवेदन जरी प्रमाणभाषेतले असले तरी संवाद मात्र कागल-कोल्हापुरी बोलीचे आहेत. त्यामुळे अनुभवांचा अस्सलपणाचा प्रत्यय तर येतोच परंतु आत्मचरित्राची गुणात्मकताही वाढते. निवेदन जरी प्रमाणभाषेत असले तरी जागोजागी बोलीतील रूपांचा वापर केल्यामुळे निवेदनाची भाषा प्रभावी बनत जाते एका अर्थाने बोलीतील अरिष्ठ लपांचाही अभ्यास करण्याच्या दृष्टीने संवादातील मुक्तपणा उपयोगी पडणारा आहे. या आत्मचरित्रातील तृतीयपुरुषी निवेदन आनंदाच्या दृष्टीबिंदूबाहेरचे असले तरी जे निवेदनातील तपशील येतात ते आनंदाच्या अनुभवांशी जोडले गेलेले आहे. उदा. आनंदा रानात गेला की तेथील तपशील

येतात. शाळेत गेला की शाळेचे वर्णन येते तो लसून कोल्हापूरला जातो तेव्हा कोल्हापूरचे तपशील येतात. म्हणजे एखादे निवेदनात्मक (तृतीय पुरुष) वर्णन आनंदा करीत नसला तरी ते निवेदन आनंद मधीलच निवेदक अदृश्य रूपांत वावरून करीत आहे असे भासते.

निवेदनाच्या तंत्रामुळे 'झोंबी' ची परिणामकारता वाढली आहे. आत्मचरित्रची पाहिली वीस पाने सरळ सरळ तृतीय पुरुषी निवेदनाची आहेत आणि पुणे पान पंचवीस पासून तृतीयपुरुषी आणि प्रथमपुरुष निवेदनाची मिश्रण होत जाते. तृतीयपुरुषी निवेदनातून प्रथमपुरुषी निवेदन सुरु होते. निवेदनाचे हे तंत्र जे बदलले आहे ते अर्थपूर्ण आहे.

'राघववेळ' आणि 'झोंबी' या कादंबऱ्यांमधून ग्राम जीवन, ग्रामीण परिसर, निसर्ग, गावगाडा, चालीरीती, रूढी, परंपरा, शेतकरी वर्ग, दलित वर्ग, देशमुख, पाटील तसेच तेथील माणसांच्या विविध वृत्ती-प्रवृत्ती यांना पार्श्वभूमी लाभलेली दिसते. 'झोंबी' कादंबरीत ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलाचा, आईचा एकूणच कुटुंबाचा परिस्थितीशी संघर्ष दिसतो. तर 'राघववेळ' मध्ये दलित कुटुंबातील मुलाचा आईचा एकूणच कुटुंबाचा संघर्षमय प्रवास दिसतो. दोन्ही कादंबऱ्या खेडवळ जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. मराठी साहित्य विश्वात मैलाचे दगड म्हणून त्यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

★★★

# 'तहान' व 'कोंडी' या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास

भुसारे मधुचंद्र लक्ष्मण

दलित आणि ग्रामीण हे स्वतंत्र साहित्य प्रकार मानले जातात. या दोन्ही साहित्य प्रकाराच्या जाणिवा यात खूपच फरक असल्याचे जाणवते. १९६० च्या आसपास दलित साहित्याची सुरुवात झाली व त्यानंतर ग्रामीण साहित्य लेखनास हळूहळू सुरुवात झाली. ग्रामीण साहित्यातील माणूस आपल्या न्याय, हक्क, समता, बंधुता, समाजपरिवर्तनासाठी झगडताना दिसतो. जग सुधारलं, देश सुधारला, परंतु तसतशा अनेक समस्या आजच्या समाजापुढे उभ्या आहेत. याचे वास्तवचित्रण दलित व ग्रामीण साहित्यातून रेखाटलेले दिसते.

'तहान' ही सदानंद देशमुख लिखित ग्रामीण कादंबरी असून 'कोंडी' ही दलित कादंबरी बाबुराव बागूल यांनी लिहिली आहे. दलित व ग्रामीण या दोन्ही साहित्य प्रकारांच्या आविष्करणात खूप फरक असल्याचे जाणवते.

बुद्ध, फुले, आंबेडकर या विचारधारेचे नेटके आविष्करण कोंडीमध्ये झाले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांचे दर्शनही या कादंबरीतून होते. सम्यक परिवर्तनासाठी चळवळ हे आंबेडकरी चळवळीचे मुख्य सूत्र आहे. हेच सूत्र या कादंबरीचा केंद्रबिंदूही आहे. तर 'तहान' या सदानंद देशमुख लिखित कादंबरीत मूल्यहीन समाजव्यवस्थेत आपली ग्रामीण जीवनमूल्ये जोपासणारांना एक अटळ संघर्ष सध्याच्या विघटनकालात करावा लागत आहे. त्यांचा हा संघर्ष जसा भाळी आलेल्या भयावह परिस्थितीशी आहे तसाचा तो भौतिक सुखाच्या मायावी मृगजळामागे धावून महाकाय शून्य हाती येणाऱ्या सैरभैर मनोवृत्तीच्या तरुण पिढीशी सुद्धा आहे. त्यातून त्यांच्या वाट्याला येणारा ताण यांची घुसमट करून गुदमरून टाकणारी समस्या हा कादंबरीचा आशय असून पाणी टंचाईच्या भयानक दिवसात केवळ मानवी जीवनच होरपळून निघत नाही तर या ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक असणारे शिवार-शेते, गुरे-ढोरे, पशुपक्षी व प्राणी यांनाही या अभावग्रस्त परिस्थितीची फार मोठ्या प्रमाणात झळ पोहोचते. त्यामुळे त्यांच्या चित्रणालाही महत्त्वाचे स्थान प्राप्त होणे अपरिहार्य होते हे या दलित व ग्रामीण कादंबरीमधील वास्तव आहे.

'कोंडी' वर्तमान वास्तवाचा अंतर्भेद करून युग समांतर परिवर्तन आणि

परिवर्तनाची निकड व्यक्त करणारी, परिवर्तनाची निर्देश करते, याउलट तहान बदलत्या वास्तव ग्रामीण समाजजीवनाला अर्थार्जनाच्या अपुऱ्या संधीमुळे मानसिकदृष्ट्या सैरावैरा झालेल्या माणसांच्या व्यथा, वेदनांना, शब्दरूप देत उलगडत जाते. कोंडी या दलित कादंबरीत नाना स्वभावाची, प्रवृत्तीची पात्रे भेटतात. यात ध्येयवेडा परिवर्तनाचा ध्यास घेतलेला आंबेडकरी विचारांना भारलेला सुशिक्षित तरुण पावन आहे. त्याच्या प्रतिभेवर भाळलेली त्याच्या विचारांशी एकरूप झालेली पावनची सुविद्य पत्नी सुशिला आहे. आपल्या मुलाच्या प्रतिभेनं दिपून गेलेले आई-वडील वामनराव व गोणाई आहेत. एकेकाळी कम्युनिस्ट चळवळीत राबलेला व नंतर बाहेर पडलेला पावनचा सासरा व मामा कॉ.सयाजी थोरात आहे. दारूत बुडालेला हताश कॉ.गांगुर्डे आहे. बाबासाहेबांना विरोध करणारा सदाशिव निकम हा हरिजन पुढारी आहे. पोटासाठी दारू गाळणारी सुशिलाची बालमैत्रीण मार्था आहे. पावनच्या नेतृत्त्वाला व त्याने उभारलेल्या चळवळीला विरोध करणारे त्याचा द्वेष करणारे कांबळे, शिंदे, अहिरे आहेत. दगडू गिरीजा हे कजाग जोडपं आहे. समज, वासू व लाला ही झोपडपट्टीत दहशत पसरविणारी, वाईट धंदे करणारी दादा मंडळी या कादंबरीतून भेटतात. उपरोध/उपहासाने तुंबलेल्या झोपडपट्टीतील बीभत्स ओंगळ जीवनात परिवर्तन यावे या ध्यासाने झपाटलेला नायक आणि शेवटी त्याच्या वाट्याला आलेला पराभव, हताश, दुभंगलेला हे या कादंबरीचे आशयसूत्र आहे. याउलट तहान कादंबरीत कादंबरीचा नायक बबनराव शेवाळे जो मुक्या प्राण्याच्या बळावर पैशांच्या हव्यासापायी पाणी विकून बेजबाबदारपणे वागतो, रत्नासारख्या फुलाची स्वप्ने रंगवितो, तिच्यावर प्रेम करतो, कधी शासनावर चिडतो, बैलाच्या हाडाच्या काड्या झालेल्या बघून पश्चात्तापदंग्ध होणारा, तर त्याने आपणास फुकट रोज पाणी देण्यामुळे बबनरावच्या प्रेमात पडणारी रत्ना, बबनने कमावलेल्या पैशांवर मज्जा मारणारी, राघोजी (नवऱ्याचा) तिरस्कार करणारी बबनची आई राजकोर, बबनची बहीण वर्षा, हताशपणे, लाचारपणे काहीही न करू शकणारा, बायको व मुलाचे बोलणे ऐकणारा बबनचा बाप, राघोजी शेवाळे, कष्टाळू गॅरेजवाला सतीश मंगळे,. रागीट शहाणा, बबनचा शत्रू, रत्नीचा बाप तोताराम, त्याचा सहकारी सोमनाथ, काव्याची नजर असलेला वासनी व जनतेचे पाणी स्वतःच विकत घेऊन हॉटेल चालविणारा जगन तुपेकर, दूषित पाणी पिल्यान आजार होत असतील तर बियर प्या असे म्हणणारा दारुडा संपत दैवकुळे आहे, पाण्यासाठी झगडणारी,

पाण्यासाठी जीव गमावलेली, पाणी टंचाईनं त्रस्त झालेली अनेक माणसे या कादंबरीत आहेत.

कोंडी कादंबरीचा नायक पावला सुशिक्षित, पदवीधर, शूर, ज्ञानासक आहे. तर्कशुद्ध विचाराचा दुसरा आंबेडकरच आहे. साहित्य व्यासंगी, पुस्तकी किडा, विचारवंत, खूप शिकून डॉ.बाबासाहेबांच्या पश्चात समाजात माजलेल्या दुहीचे, गटबाजीचे पावनला दुःख वाटते. त्यांचे क्रांतिकारी मन त्याला स्वस्थ बसू देत नाही. समाजात एक्र संघ भरण्यासाठी दलितांमध्ये एकजूट निर्माण करण्यासाठी तो स्वप्नांना मूठमाती देऊन समाजकार्याला, परिवर्तन चळवळीत स्वतःला झोकून देतो, तर तहान कादंबरीतील नायक बबन शेवाळे हा पाणी टंचाईची समस्या हेरून स्वतःची परिस्थिती सुधारण्यासाठी, पैसा कमविण्यासाठी रात्रंदिवस आख्या गावाला पाणी पुरवितो. मुक्या जनावरांच्या अंगात बख असते, तोपर्यंत ते गावाला पाणी पुरवून पैसा कमवितो. पण बैलाच्या अंगातील बख नष्ट झाल्यावर स्वतःच्या कृत्याची लाज वाटून तो पश्चात्तापदंग्ध होतो. पाण्याचे निमित्तच त्याला प्रेमाकडेही घेऊन जाते, रत्नाला पाणी देऊन खूप करतो, तीही त्याच्याकडून फुकटपाणी मिळते म्हणून आकर्षित होते, त्याच्या प्रेमात पडते, बबन व रत्नाला तिच्या वडिलांनी पकडल्यावर बबन घाबरतो, स्वतःचे घराचे नाव बदनाम होईल या भीतीने ते पश्चात्तापदंग्ध होतो, आपण पाणी विकलं नसतं, तर एवढं प्रकरण झालं नसतं, ते प्रकरण मिटविण्यासाठी पुढाऱ्यांच्या पायापुढं नाक घासणारा, लाचार असा नायक बबन आहे. कोंडी कादंबरीतील नायिका सुशीला ही सुशिक्षित, सुविद्य, मुंबईतील बकाल वस्तीपासून, दूर जाऊन आनंदात जगू इच्छिणारी, ज्ञानी, विचारवंत, पतीवर प्रेम करणारी नायिका आहे तर 'तहान' कादंबरीतील रत्ना फुकट पाणी मिळते म्हणून प्रेमात पडणारी नायिका आहे. ती समाजास घाबरते, स्वतःला इतरांच्या नजरेपासून बचावर एकांतवासात भेटणारी, एकनिष्ठ अशी नायिका आहे.

'कोंडी' मधील पावनचे ध्येय काळोखाचे कैदी असलेल्या महानगरीच झोपडपट्टीतील लोकांच्या बकाल जीवनात प्रकाश पसरविणे हे आहे. तर तहानमधील बबनचे ध्येय कोणत्याही अवस्थेत गावची तहान भागवावी, खूप पैसा मिळवावा, मौजमज्जा करावी, ऐशआरामी जगावे हे आहे. कोंडीतील पावनच्या मते, यंत्रयुगाच्या मंगल पायाखाली अस्पृश्यता चिरडू लागली आहे. सर्व क्रांत्या आणि उत्क्रांत्याचा जन्म शहरातच होतो. अशी पावनची निष्ठा आहे. त्यासाठी

शहरे माणसांनी भरून काढली पाहिजे असे त्यास वाटते. तर तहान मधील बबनला वाटते की, गावातील तलाठी साहेब कारकून लोकांना लुबाडतात म्हणून पाण्याचे रेट वाढवून त्यांच्याकडून जास्त पैसा गोळा करणे पाप नाही. गावात आपल्या शिवाय कुणीही पाणी पुरवठा करू शकणार नाही, तशी व्यवस्था होऊ नये असे त्याला मनातून वाटते. कारण त्यावरच आपला धंदा वाढणे अवलंबून आहे असा स्वार्थी विचार करणारा, पाणीटंचाई सारखी भयावह समस्या त्यास स्वार्थाची पोळी वाटते अशा मताचा बबन आहे.

कोंडीमध्ये माणसाला पशुतूल्य ठरविणाऱ्या समाजव्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी अस्पृश्यामध्येही ॲबीलिटी, एफिशियन्सी आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्म आणि संस्कृतीकडून माणसांचा सूर्य आणि पृथ्वीच्या पुत्रावर होणारा अन्याय, अत्याचार निपटून काढण्यासाठी, त्यांच्यातील अस्मिता जागविण्यासाठी पावन कृतिशील कार्यकर्ता म्हणून पावले उचलतो. तसेच तहान कादंबरीतील माणसेही पाणी टंचाईची समस्या तीव्र झाल्यावर पाणी मिळावे म्हणून उपोषण करणारे, उठाव करणारे दिनकर दयाडे, जनाबाई, भिमराव शेवडे सारखी माणसे आहेत. तसेच आपल्या गावात पाणी आले तर आपल्या बैलांना पाणी आणण्याचा त्रास होणार नाही असा विचार करून मोर्चात सहभागी होऊन एक पाय गमावून बसलेला राघोजी शेवाळे या सारखीही माणसे या कादंबरीत मन अस्वस्थ करून जातात. कोंडीतील पावनचा पुढाऱ्यांवर आरोप आहे. पावनला आपआपसांतील मतभेतद, हेवेदावे, वैर यामुळे पुढारी चळवळीला पुढे देत नाही तसेच तहान मधलही पाणी टंचाईला स्वार्थी लोकांचे ग्रहण लागल्याने गावच्या लोकांचे नरडे ओले करण्यास मदत होत नाही. येथील लोकांना खोटी आश्वासने देऊन भुलविणारे ढोंगी पुढारीही या कादंबरीत दिसतात. समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी चळवळ हे एकच हत्यार उपयोगाचे आहे असे कोंडीतील पावनला वाटते. तर तहानमधील बबनला गावात पाणी येऊ नये असे वाटणारा तो असून दिनकर दचाडे सारख्या व्यक्तींनाही वाटते की पाणी टंचाईसारखी समस्या दूर करण्यासाठी मोर्चा, उपोषण हे महत्त्वाची हत्यारे आहेत असे त्यास वाटते.

भाषणे, मोर्चे याद्वारे लोकांमध्ये जागृती घडविता येऊ शकते, परिवर्तन घडविता येते तसे तहानमधील लोकांनाही उपोषण मोर्चा यामुळे पाणीटंचाई दूर करू शकतो. असा विश्वास वाटतो. पावनला प्रसंगी मारण्याचे, नामोहरम करण्याचे प्रयत्न लोकांकडून होतो, तो विचित्र कोंडीत सापडतो. निराश, पराभूत, हतप्रभ

होतो. तहानमधील बबनला रत्नासोबत पकडल्यावर तोताराम आपल्यावर केस करेल, आपली बदनामी होईल म्हणून तो पाया पडतो, बदनामी होणार नाही ना? याची त्यास भीती वाटते तो अडकतो, पराभूत होतो, लाचार होतो, कोंडी म्हणजे एका प्रखर कार्यकर्त्यांची, परिवर्तनवादी, आंबेडकरवादी विचारसरणीच्या धडाडीच्या क्रांती प्रवण तरुणाची दारुण शोकांतिका बागुलांनी या कादंबरीत चित्रित केली आहे. तर तहानमध्ये पाण्यासाठी झगडणारे गाव माणसांना जाळणारी, तोडणारी, मारणारी, पशू बनविणारी पाण्याची भीषण समस्या या कादंबरीत दिसते.

कोंडी कादंबरीतील नायिका सुशिलाला वाटते की, आपला पती मुंबईला राहून बिघडेल, तो या मुंबईच्या वातावरणात कसा टिकेल, त्याचे तत्त्वज्ञान मुंबईत कुजून जाईल याची मनी भिती बाळगणारी सुशिला आहे. तर तहानमधील रामकोरला वाटते की, मुलाने पाणी पुरविण्याचे बंद केले तर आपलं पोट कसे भरेल म्हणून ती पाणीबंद करायला लावणाऱ्या नवऱ्यास मांडते व मुलाला जवळ करते. आपला मुलगा पाणी देऊन पैसे कमविणे बदं तर करणार नाही ना? याची भिती रामकोरच्या मनात आहे.

नायक नायिकेतील आंतरद्वंद परस्परांविषयी असणारे अपार प्रेम, लोकांप्रती असलेली असीम करुणा, त्याग, संघर्ष यांचे जिवंत चित्रण बागुलांनी कोंडी मध्ये केले आहे. तर समाजाविषयी असणारी भीती, बदनामी विषयीची अनामिक काळजीने ग्रस्त असलेली तरीही लपून छपून प्रेमस्वप्ने रंगवू पाहणारी नायक-नायिक तहानमध्ये सदानंद देशमुखांनी रंगविली आहेत. कादंबरीतील भेटणारी माणसे, त्यांचे जगणे, वृत्ती-प्रवृत्ती, झोपडपट्टीतील नरकप्राय जीणे, किड्या-मुंग्याप्रमाणे वसलेली आयुष्ये, घाण, अंधार, दारिद्रय, लाचारी, व्यसनाधीनता, कौर्य स्वार्थासाठी कुणाचीही जीवे घेण्याची तयारी असणारे दादा लोक, खन मार वस्त्री म्हणजे लेबरकॅम्पचे वस्तीचे वास्तव चित्र बागुलांनी रंगविले आहे. याउलट तहान कादंबरीत सदानंद देशमुखांनी पाण्यासाठी रानोमाळ भटकणारी, अस्वच्छ पाण्याचा एक थेंबही अमृत मानणारी माणसें, रात्रंदिवस पाण्याचा थेंब शोधणारी, पाण्याच्या शोधार्थ प्राण गमावणारा, पाय गमावणारी, मोर्चे, उपोषण करणारी पाण्याच्या थेंबासाठी मारामाऱ्या करणारी, पाणीटंचाईने कितीतरी दिवस आंघोळ न करता जगणारी, पाणी मिळत नाही म्हणून बियर पिऊन जगणारी अनेक स्वभावाची माणसे तसेच स्वार्थी, ढोंगी, मतलबी राजकीय पुढारीही या कादंबरीत चित्रित केले आहेत.

'कोंडी' कादंबरीत जशी समाज परिवर्तनासाठी संघर्ष कहाणी आहे. तशीच तहान कादंबरीही पाण्यासाठी केलेली संघर्ष कहाणीच ठरते.

यातील विविध प्रश्नचर्या, संभाषणे, संवाद-विसंवादातून कादंबरी खुलत जाते. साधी भाषा, ओघवती, लयदार, शैली, काव्यात्मक वर्णन उदा.आनंदाच्या रथात बसून एक वर्षे भरकन निघून गेले. तिच्या मनात मात्र वासनेची कारंजी उडत होती. अशी असंख्य काव्यात्मक अवतरणे कोंडीच्या पानोपानी रेखाटले आहेत, यामुळे या कादंबरीत उठावदारपणा आला असून बाबुराव बागुलांचा कविमनाचा आविष्कार यात झाला आहे. याउलट अलंकारिक भाषा, विदर्भातील बोलीभाषेचा योग्य वापर, म्हणी, वाक्प्रचारांचा सर्रास वापर, ओघवती निवेदन शैली यामुळे ती सरस ठरली आहे. म्हणींचा योग्य वापर उदा.घरची करती देवा देवा.... अन् बाहेरचीला चोळी शिवा, निऱ्हा होटल मे खाना अन् मजीद मे सोना, इ. असंख्य ठिकाणी यांचा वापर केल्याने भाषेला जिवंतपणा निर्माण झाला आहे.

थोडक्यात एका प्रखर कार्यकर्त्यांची, परिवर्तनवादी, आंबेडकरवादी विचारसरणीच्या धडाडीच्या क्रांतीप्रवण तरुणाची दारुण शोकांतिका बाबुराव बागुलांनी कोंडी कादंबरीतून चित्रित केली आहे, तर ग्रामीण भागातील पाणी टंचाईच्या आणि लोण्या लागलेल्या बुरूजासारख्या ढासळणाऱ्या, चुलीपुढे करपून जाणाऱ्या भाकरी सारख्या ग्रामीण समाज व्यवस्थेचे चित्र तहान या कादंबरीत सदानंद देशमुखांनी रंगविले आहे.

एकूणच दलित कादंबरी स्वत्त्वाचा, परिवर्तनाचा, माणूसपणाचा शोध घेते तर ग्रामीण कादंबरी जगण्यासाठीचा करावा लागणारा आटापिटा, संघर्ष प्रतीत करते.

★★★

# 'मराठीतील नवकादंबरी व दलित कादंबरी'

प्रा.जगदीश दिनकर शेवते

**प्रस्तावना:-**

स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीने आशय व विषयामध्ये नजरेत भरण्या इतका फरक अनुभवलेला आहे. अनेक प्रकारची वळणे घेऊन १९६० नंतर अधिक बहरली त्यामध्ये नवकादंबरी व दलित कादंबरी यांनी वास्तव वादाचा अव्हेर करून वस्तुनिष्ठवादाचा पुरस्कार केलेला आहे. त्याचा हा आढावा.

**नवकादंबरीची संकल्पना व स्वरूप:-**

समाजचित्रण हा पारंपरिक कादंबरीचा गाभा, तर समाजचित्रणाचा म्हणजे रूढ वास्तववादाचा अव्हेर करून वस्तुनिष्ठवादाचा पुरस्कार करणारी कादंबरी म्हणजे नवकादंबरी.

**स्वरूप:-**

नवकादंबरीमध्ये वास्तववादाबरोबर समाजचित्रण येते. कादंबरीतील मुख्य पात्र 'मी' किंवा नायक कादंबरीवर वर्चस्व गाजवतो. वेधकता व आकर्षकता ही वैशिष्ट्ये नवकादंबरीत असतात. 'कलरफुल' पार्श्वभूमीचा ही कादंबरी अंगीकार करते. 'कोसला' भालचंद्र नेमाडे यांच्या नवकादंबरीतून समाजचित्रणाचा उत्कृष्ट तपशील येतो. परंतु हमखास येणाऱ्या वास्तववादाच्यामुळे सामाजिक जीवनाच्या पलीकडे नवकादंबरी जाते व तिच्यातील अंतर्मनाचा आविष्कार अस्तित्ववादाच्या जवळ येतो व अस्तित्वलक्षीदृष्टी अंगीकारतो.

नवकादंबरीतील त्यामागील प्रयोजन अस्तित्ववादी म्हणायला हवे. तणावपूर्ण समरप्रसंगी त्यांची गुंफण तीव्रता यामुळे नवकादंबरीचे पारंपरिक कादंबरीपेक्षा वेगळेपण जाणवते. अनुभवांची मांडणीतील वेगळेपण कौशल्य जाणवते. नवकादंबरीतील पात्रांची मनोवस्था त्यांच्या मनातील मानसिक अवस्थेची आंदोलने आंतरिक उद्रेक हृदयस्पर्शी असतो.

**निवेदनः-**

नवकादंबरीतील निवेदनाला तपशीलाची गुंफण असते. निवेदनामध्ये विस्तृत समाजपट मांडून समाजाचे सर्वांगीण चित्रण करण्याची महत्त्वाकांक्षा दिसून येते. निवेदनातील विक्षिप्तपणा पात्रांच्या विचारात व वर्तनात दिसून येतो. उदा. चि.त्र्य.खानोलकरांची अजगर, वेडसरपणा व बालिशता 'मेंटॅफिझिकल' अर्थांचे निवेदन नवकादंबरीत असते.

**रचना विशेषः-**

पारंपरिक कांदबरीमधील 'सुरूवात-मध्य-शेवट' या रचनेला नवकादंबरीने छेद दिला आहे. मानवी एकटेपणाचे आधुनिक सूत्रेही त्यामध्ये आढळते. काही अंशी विरूपता, बीभस्तता, लैंगिकतला या वेगवेगळ्या सूत्रांचे एकीकरण होते. उदा. हॅट घालणारी बाईकमल देसाई, सात सक्क त्रेचाळीस-किरण नगरकर

**समारोपः-**

मध्यमवर्गीय वृत्तीपासून सुटका करून घेणे हे नवकादंबरीचे प्रमुख लक्षण आहे. सामाजिक परिणाम वेगळ्या स्वरूपात विकसित केल्यास व नवीनतेची सांगड योग्य घातल्यास नवकादंबरी एका वेगळ्या उच्चतर पातळीवर पोहचेल.

दलित कादंबरी रचना वैशिष्ट्येः-

दलित कादंबरीची रचना बहुस्तरीत असते. जीवन जाणिवेच्या, व्यवहाराच्या, मानवी, क्रिया प्रतिक्रियांच्या अनेक धाग्यांदोऱ्यांची गुंफण दलित कादंबरीत असते. तीत अनेक ताण असतात. या सर्व गोष्टींचे प्रत्ययकारी चित्रण करण्याची प्रतिभा लेखकाकडे असावी लागते. लेखकाला प्राप्त होणारी ही क्षमता हा त्या त्या समाजाच्या वैचारिक व तात्विक क्षमतेशी वारशांशी कलात्मक अभिरुचीशी काही प्रमाणात संबंधित असते. समाजातील विविध थरातील विविध सर्जनशीलक्रिया या विचारप्रणाली यांच्या घटनेशी सावयावी संबंध येतो. आजच्या साऱ्या समाजात याचा अभाव असल्यामुळे परिणामतः केवळ दलित कादंबरीच नव्हे तर आजची एकंदर मराठी कादंबरी रिक्त झालेली आहे. गावकुसाबाहेरील गरीब दलित समाजाचा जिवंत जिव्हाळा त्यातील वास्तवता जिवंतपणा आवतरणे व चिंतनशीलतेने लेखन करणे दलित कादंबरीत अभिप्रेत आहे.

**दलित कादंबरी स्वरूपः–**

दलित साहित्यातील इतर प्रकारांच्या तुलनेत दलित कादंबऱ्यांची संख्या कमी आहे. विद्रोह व नकार आल्याखेरीज दलित कादंबरी सिद्ध होत नाही. दलित जीवनाचे दर्शन हे वेगळे वैशिष्ट्य दलित कादंबरीचे आहे. दलित कादंबरी केवळ वास्तवदर्शनाच्या ढोबळतेवर येऊन थांबते. उदा.नामदेव ढसाळ 'हाडकी हाडवळा' बाबुराव बागुल 'अघोरी'

**कादंबरीतील दलितत्त्वः–**

जीवन जाणिवेच्या, व्यवहाराच्या मानवी क्रिया–प्रतिक्रियांच्या अनेक धाग्यादोऱ्यांनी कादंबरीची गुंफण झालेली आहे. तीत अनेक ताण–तणावर असतात. या साऱ्यांचे प्रत्ययकारी चित्रण करण्याची क्षमता दलित कादंबरी लेखकाकडे असावी लागते.

★★★

# आंबेडकरवादी कादंबरीतील ग्रामीण जीवनसंघर्षाचा शोध

प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या आंबेडकरवादी साहित्याची भूमिका माणसाएवढे जगात दुसरे काहीच मोठे नाही अशी आहे. अशा स्वच्छ स्पष्ट व ठामपणे भूमिकेमुळे आंबेडकरवादी साहित्य माणसाच्या कल्याणाचे गीत गाते आंबेडकरवादी साहित्याच्या कथा, कविता, नाटक, स्वकथने, निबंध आणि कादंबरी या महत्त्वाच्या प्रकारांतूनही माणसाच्या मोठेपणाची हीच ध्यासप्रेरितता दिसून येते. आपल्या देशामध्ये माणसाच्या मोठेपणाचे सुंदर गाणे मानसाचा अवमान करणाऱ्या विकृत प्रवृत्तींना सहन होत नाही, मग ती आपला बेसूर राग आळवायला सुरुवात करतात. त्यातून संघर्षाची ठिणगी पेटते. संघर्ष हा आंबेडकरवादी साहित्याचा प्राण आहे. आंबेडकरवादी साहित्य हे केवळ साहित्य नाही तर ते एक सामाजिक, सांस्कृतिक असे वैचारिक आंदोलन आहे. आंबेडकरवादी साहित्य हे विचारप्रधान साहित्य असल्यामुळे या साहित्यातून आलेला संघर्षही विचार प्रधान स्वरूपाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्व विचारांवर या साहित्याची पायाभरणे असल्यामुळे त्यातून आलेला संघर्ष मूल्यनिष्ठ आहे. संघर्ष या शब्दाचा मुळार्थ युद्ध असा असला तरी हे युद्ध महासत्तेच्या महत्त्वाकांक्षेचे नाही तर ते व्यवस्था परिवर्तनाचे आहे. या निकषाने आंबेडकरवादी कादंबरीमधून आलेला संघर्ष हा केवळ संघर्षासाठी संघर्ष नसून तो नवमूल्यनिर्मिती, नवसमाजनिर्मिती आणि नवराष्ट्रनिर्मितीचा आहे. समता, स्वातंत्र, बंधुता, न्याय, बांधिलकी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या संविधान मूल्यांचे शिल्प उभारण्यासाठी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील सामाजिक लोकशाहीची भव्य इमारत उभारण्यासाठी आहे. आंबेडकरवादी कादंबरीतील संघर्ष या वाङ्मयीन मूल्याचे महानत्त्व हे असे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अपेक्षित आदर्श समाज निर्माणासाठी आंबेडकरवादी कादंबरीकारानी लेखणी उचलली आहे. स्त्री शूद्र, अतिशूद्र, आदीवासी, भटके यांसारखे सर्व उपेक्षित घटक आंबेडकरवादी कादंबरीमधून बोलू लागले आहेत. ज्यांचे अंधुकसेही चित्रण साहित्यात येत नव्हते, तेच आता कादंबरीचे नायक बनून समता केंद्रित व्यवस्था उभारणीसाठी विषमता वाद्यांसोबत निकराचा संघर्ष देत आहेत. आंबेडकरी विचारांच्या बळामुळे

या युद्धात आपलाच विजय होणार याचा त्यांना ठाम विश्वास आहे. या युद्धातील विजया नंतरचे समाजमन संस्कारशील असे सदाचारी, व्यापक व सखोल बनविण्याचे काम आंबेडकरवादी साहित्याने हाती घेतेतले आहे. कादंबरीतील संघर्षाचे स्वरूप मांडताना डॉ.नंदा मेश्राम लिहितात, संघर्ष हा कथानकाचा महत्त्वाचा घटक आहे. कादंबरीमध्ये जीवनातील विविध विषयांचे चित्र रंगविले जाते. जीवन एक संघर्ष आहे जीवनात अनेक चढउतार असतात. अनेक संघर्षमय प्रसंग येतात हा संघर्ष कधी कधी व्यक्तिगत असतो तर कधी सामाजिक असतो.

कादंबरीतील संघर्षाच्या उपरोक्त स्वरूपातून मानवी जीवन आणि संघर्ष यातील नाते स्पष्ट होते. आंबेडकरवादी कादंबरीचा विषयच मानवी जीवन असल्यामुळे तिच्यात संघर्ष येणे अगदी स्वाभाविक आहे. मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक अशा संघर्षाच्या अनेक पातळ्या सांगता येतात आंबेडकरवादी कादंबरीमध्ये जातीव्यवस्था, शोषण, भूक, दारिद्र्य आदी कारणांमधून निर्माण होणारा संघर्ष येते. तसेच या कादंबरीमध्ये याशिवाय अंतर्गत संघर्ष, दोन पिढ्यांमधील संघर्ष, पाण्यासाठीचा संघर्ष अशा विविध पातळ्यांवरील संघर्षही चित्रित होताना दिसतो. संघर्ष आणि मानवी मूल्य यांच्यात जवळचे नाते असल्यामुळे हा संघर्ष व्यवस्था परिवर्तनाच्या भूमिकेतेतून विस्तारत जातो. अन्यायाविरुद्धात संघर्ष करण्याची मानसिकता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे निर्माण झाली, एवढेच नाही तर शोषणाचे आणि गुलामीचे अणे असणारा सर्व घटकांना ठोकरण्याची क्षमता अस्पृश्यांमध्ये निर्माण झाली. अस्पृश्यांना आलेल्या नव्या स्वभानामुळे तो शोषणाच्या विरुद्धात प्रत्येक पातळ्यांवर संघर्ष करू लागला आंबेडकरवादी कादंबरीमधून आलेला ग्रामीण जीवन संघर्ष अत्यंत तीव्र आणि प्रखर असा दिसतो याचे कारण डॉ.नंदा मेश्राम पुढीलप्रमाणे देतात.

ग्रामीण भागातील कुठल्याही संघर्षाचे एक टोक जातीय संघर्षाला येऊन भिडलेले असते. उदा.शेतीच्या संदर्भात असतो की, निवडणुकीच्या संदर्भात असो अनेक कारणे जी आढळून येतात ही कारणे हळूहळू जातीय संघर्षाकडे जाऊ लागतात तेव्हा काहीही झाले तरी खेड्यात राहणारा दलितांना ग्रामीण व्यवस्था इच्छा असो वा नसो स्वीकारावी लागते. परंतु नव्या जाणिवांमुळे ते नकार देण्याचा प्रयत्न करतात अशा वेळी वर्ण संघर्ष निर्माण होतो. ग्रामीण भागातील कोणताही संघर्ष जाती संघर्ष असतो. वरच्या पातळीवर तो सोज्वळ वाटत असला तरी हळू हळू तो जातीकडेच येतो. ही नंदा मेश्रामांची मांडणी

वस्तुनिष्ठ आहे. ग्रामीण भागातील सर्व पातळ्यांवरील संघर्षाच्या मुळाशी जात हे केंद्र असते. जातीच्या मानसशास्त्राने आणि विषम आचरणशास्त्राने ग्रामीण भाग धगधगत असतो. ही धग ग्रामजीवनाला हजारो वर्षापासून पोळवत सुटली आहे. आंबेडकरवादी कादंबरीमध्ये ग्रामीण जीवन चित्रण हे येतच त्याचे कारण अस्पृश्य समाज खेड्यापाड्यातून मोठ्या प्रमाणात राहतो.

ज्या खेड्यात राहतो तिथे जातीयतेची, विषमतेची, शोषणाची तीव्रता ही शह्री भागापेक्षा भयानक असते. आंबेडकरी जाणीवेतून येणारा स्वाभिमानामुळे हा नायक या भयानकतेला आपली छाती देतो तिच्या विरुद्धात निकराचा लढा उभारतो ही व्यवस्था गाढण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रसंगात वर्णन व्यवस्थेच्या सिद्धांतानुसार उच्च वर्णीय दलितांच्या विरोधात संघर्ष होणार, दलितही नव्या तेजाने सवर्णांवर उसळणार हे ओघानेच आले. आंबेडकरवादी कादंबरीमध्ये या स्वरूपाचा संघर्ष मोठ्या प्रमाणात येतो. आंबेडकरवादी कादंबरीतील आंबेडकरवादी कादंबरीतील ग्रामीण जीवन संघर्षाच्या मुळाशी जुलमी व्यवस्था हे एक महत्त्वाचे कारण आहे. या जुलमी व्यवस्थेचे दुष्परिणाम समाजाला खूप काळ भोगावे लागत आहेत. समाजाच्या मानगुटीवर बसत त्याला मरणाचा तळ दाखवणारा जुलमी विषमव्यवस्थेची मुळं महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या व्यासंगपूर्ण संशोधनाने शोधली, तिच्या कायमच्या विसर्जनासाठी लढाई उभारली. अशा प्रयत्नातुन या व्यवस्थेवर थोडा परिणाम झाला असला तरी ती समूळ नष्ट झाली असे म्हणता येणार नाही. जुलमी व्यवस्थेतून निर्माण झालेल्या संघर्षाची अनेक रूपं आंबेडकरवादी कादंबरीमधून आलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महार जातीचे असल्यामुळे त्यांच्या महान कार्याबद्दल, त्यांनी लिहिलेल्या संविधानाबद्दल ज़ातीय वाद्यांच्या मनात आस्था व आदरभाव असल्याचे दिसत नाही याचे वस्तू चित्र शरणकुमार लिंबाळे यांच्या हिंदू या कादंबरीतून येते. कसबे गुरुजी अभ्यासक्रमाला असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पाठ वर्गात उत्साहाने शिकवतात. कसबे गुरुजींनी वर्गात आंबेडकर शिकविल्याची बातमी मधल्या सुट्टीत गावभर पसरते. त्यामुळे नरेंद्र पाटील, सदाशिव मोरे, बाजीराव चव्हाण या सनातन्यांचे डोके भडकते व ते वर्गात घुसून कसबे गुरुजीला जाब विचारतात काय हो गुरुजी तुम्ही आमच्या पोरांना आंबेडकर शिकवला की नाही. पोरांनो मी आंबेडकरांच्या धड्याची पानं फाडतो. तुम्ही पण फाडा भारताच्या सर्वंकष स्वातंत्र्याची जोरदार मागणी करणारा, सामाजिक लोकशाहीचा आग्रही पुरस्कार

करणारा मी पहिल्यांदा भारतीय आहे आणि शेवटीही भारतीयच आहे असे म्हणून स्वतः पेक्षाही भारत देशावर जास्त प्रेम करणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धड्याची पानं फाडताना या नराधमांना काहीही वाटत नाही. आमच्या देशातील जातीचा न्यायच एवढा विचित्र आहे की, इथे आजही माणसाच्या गुणवत्तेची किंमत त्याच्या जातीवरून ठरते कर्म नैपुन्न्यता तपासली जात नाही. विजय सिरसठ यांच्या काळगर्भ यांच्या कादंबरीमध्ये आपल्या पारंपरिक वहिवाटीप्रमाणे, गायरान जमिनीवरील दलितांचे पिक उद्ध्वस्त करण्यासाठी सवर्ण बाजीराव पाटलांची माणसं एका रात्री जनावरे सोडून देतात तेव्हा दलितांतील मोठ्या धाडसाचा नाथा व त्याचे सहकारी त्यांचा प्रतिकार करून सवर्णांना पिटाळतात. बाजीराव पाटलाला तर त्याचीच बंदूक घेऊन तिच्या दस्त्याने बदडून काढतात. दरम्यान गावातील दंगलीची बातमी सगळीकडे पसरते. दलित नेते प्रा.रूमणे गावात येतात व गावात जाहीर सभा घेऊन दलितांना धीर देतात आणि सवर्णांना धमकावताना म्हणतात, याद राखा, यापुढे विटकरीला दगडाने उत्तर दिले जाईल. एका दलिता मागे चार सवर्ण घेतले जातील कुत्र्या मांजरासारखे दलितांचे मरायचे दिवस आता विसरा. मी अभिनंदन करतो. येथील बहादूर दलितांचे ज्यांनी सवर्णांचा मुकाबला केला. तुम्ही कोणाला भिऊ नका आणि सांगून ठेवतो यापुढे जर या गावात एकाही दलिताला मारहाण झाली तर आम्ही ही चांदणी घासलेट ढणा ढणा पेटवून देवू. जुलमी व्यवस्थेच्या जातीय मानसिकतेत ग्रामीण भाग कसा उभा आडवा जळत आहे याचा प्रत्यय इथे येतो दलित अस्पृश्य म्हणजे पाळा पाचोळा ही जातीय वाद्यांची विखारी दृष्टी अशा संघर्षाला जन्म देते. प्राप्त परिस्थितीवरील प्रा.रुमणेंचे हे जहाल भाषण दलितांना प्रभावित करते. सवर्ण गावकरांवर जरब बसविते एवढ्या चिघळलेल्या वातावरणात प्रत्यक्ष गावात येऊन भाषण देण्यासाठी जे आंबेडकरी काळीज लागते ते प्रा. रुमणेंकडे आहे. नाथा हा सुद्धा खंबीरपणे या सर्व प्रसंगाला तोंड देतो आपला आंबेडकरी बाणा संबंध गावाला दाखवून देतो अन्याय सहन करत जगणे हा गुन्हा आहे हे समजल्यामुळे अन्याय खोरांवर तुटून पडतो. दि.रा. वाघमारे यांच्या कल्लोळ या कादंबरीतून ग्रामीण पार्श्वभूमीवरील जुलमी व्यवस्थेतून आलेला संघर्ष उभा राहतो एका जुलमी युगाचा अंत स्वाभिमानी दलित कसा करतात याचे शब्द चित्रण वाघमारे असे उभे करतात.

शोडा खिंडीच्या शेडा षंडीच्या तोंडाला लागला. पाटीलच आहेत याची पूर्ण खात्री नाग्या मांगानी करून घेतली तसे सगळे सावरले. नाग्या मांगानी

गपकन लगाम पकडला. धापकन जमिनीवर पाटलाला आपटलं. एवढ्यात नाग्या मांग व इतरानी सपा सप जिथं मिळेल तिथं वारं केलेली. तिघा चौघांनी मिळून भाले कुऱ्हाडीने मान कापली शिर पोत्यात गुंडाळलं. प्रस्तुत कादंबरीतील या पाटलांनी पाटिलकीच्या बळावर गावातील गोर गरिबांच्या तरुण मुली बाटवल्या होत्या. मिजास खोरीने आणि धाक दडपशाहीने कित्ये क गरीबांना लुटले होते या गावात हा पाटील जणू सैतान बनून वावरत होता गावपातळीवर अशा अनेक सैतांनानी दुबळ्यांना दिवसा लुटले आहे. व्यवस्थेनेने कोरलेला विषमतेचा संस्कार त्यांच्या मनात घट बिंबल्यामुळे त्यांच्या हातुन असे बेछूट वर्तन घडते. त्यामुळे हा पाटलांचा दोष नसून विषम व्यवस्थेचा दोष वाटतो. व्यवस्थेतील हे विष उतरविल्याशिवाय व्यवस्था परिवर्तन शक्य नाही. पाटलाचा खून हा त्यावरील तात्कालिक इलाज आहे कायमचा नाही. दि.रा. वाघमारे यांच्या कादंबरीतून आलेले हे चित्रण तात्कालिक आहे व्यवस्था परिवर्तनासाठी नाही.

याप्रमाणेच आंबेडकरवादी कादंबरीत ग्रामीण जीवन संघर्ष पहावयास मिळतो. भूत वर्तमान ग्रामीण जीवनाचे आंबेडकरवादी कादंबरीकारांनी काढलेले शब्द चित्र, वस्तू चित्र बनूनच समोर येते. ग्रामीण जीवनाच्या पुराणप्रिय अशा प्रतिगामी नाड्या तपासण्यासाठी या कादंबरीतील ग्रामजीवन अभ्यासणे आवश्यक ठरते. या कादंबरीतील हा संघर्ष मानवतेच्या प्रस्थापनेसाठी आणि विषम व्यवस्थेच्या विसर्जनासाठी दिलेला दिसतो. जुन्या जीर्ण मूल्यांचा उध्वंस या विश्व मागणीचा कलात्मक शब्दाविकार म्हणजे आंबेडकरवादी कादंबरीतील ग्रामीण जीवन संघर्ष होय.

★★★

# दलित चरित्रात्मक कादंबरी लेखन : स्वरूप व प्रेरणा

प्रा. विजय प्र. वाघमारे

स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा वाङ्मय आविष्कार म्हणजे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचे आगमन होय. यातील दलित साहित्यप्रवाहाचे मराठी साहित्याला एक जबरदस्त आव्हान दिले आहे. नवी मूल्ये, नवी भाषा, नव्या प्रतिमा, सकस जीवनानुभवातून आशय समृद्ध मराठी दलित साहित्य आकाराला आले. सुरूवातीच्या काळात (१९६०) कविता, आत्मकथन या वाङ्मय प्रकाराची दलित साहित्यात जोरकस अभिव्यक्ती झाली. या तुलनेत कादंबरी वाङ्मय प्रकाराची तेवढ्या मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली नाही. याविषयी नागनाथ कोतापल्ले (साहित्याचा अन्वयार्थ स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद) म्हणतात, "दलित जीवन चित्रण करणारे अगर दलित लेखकांनी लिहिलेले कादंबरी लेखन फारसे नाही ही वस्तुस्थिती आहे. दलित प्रतिभा प्रथमत: काव्यातून प्रकट झाली (तसे होणे स्वाभाविक होते) आणि काव्याचा निकट आत्मकथनामध्ये ती जास्त रमली किंबहुना सगळ्या अनुभवाचा निचरा आत्मकथनामध्ये होऊन गेल्यामुळे कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न दलित कादंबरीकारांनी केला नसावा."

दलितांना लाभलेले जीवन हे महाकादंबरीसारखे आहे, पण ते जीवन रेखाटण्यासाठी पुरेशी व्यवस्था त्यांच्याकडे नव्हती. स्पर्धेच्या युगात दलित फक्त जिवंत राहण्याची, जगण्याची कसोटी पूर्ण करू पाहाता त्यातसुद्धा त्याच्या वाटेला नैराश्य मिळत होते. लिखाणाकरीता लागणारा भरपूर वेळ या स्पर्धेच्या युगात त्याच्याजवळ नसतो व त्यांनी लिहिलेले छापण्याकरीता त्याच्याकडे महागाईच्या काळात साधनही नसते. उदा. बाबुराव बागुल यांनी भरपूर लेखन केले आहे. पण पैशा अभावी अप्रकाशित बाकीचे साहित्य त्यांना प्रकाशित करता आले नाही.

वरील सर्व वस्तुस्थिती लक्षात घेऊन दलित साहित्यातील कादंबरी लेखनाकडे दृष्टी टाकली असता काही कादंबरीकारांची नावे आपल्या समोर येता. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात व ना.रा.शेंडे हे दलित साहित्यातील सुरूवातीच्या काळाचे कादंबरीकार असून यांच्या प्रेरणा दलित या संकल्पनेशी जुळत नाही. कारण धम्मक्रांतीच्या पूर्वी पासूनच यांचा लेखन प्रवास सुरू आहे.व त्यांच्यासमोर

कादंबरीकार म्हणून फडके, खांडेकर आहे. अण्णाभाऊंनी एकूण ३० कादंबऱ्याचे लेखन केले आहे. त्या कादंबऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे- वारणेच्या खोऱ्यात, चित्रा, फकिरा, वैजयंता, अलगुज, माकडीचा माळ, चंदन, वैर, गुलाम, डोळे मोडित राधा चाले, चिखलातले कमख, रत्ना अहंकार तारा, वारणेचा वाघ, रानगंगा आघात, मास्तर, पाझर, संघर्ष, रूपा, आग, कुरूप, फुलपाखरु, मधुरा, आवडी, मूर्ती, केवड्याचे कणीस, रानबोका, अग्निदिव्य असे विपुल कादंबरी लेखन अण्णाभाऊंनी केले आहे. दलित कादंबरीकार म्हणून त्यांचा उल्लेख करताना हे सारखे जाणवते की अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांतील 'फकिरा' या कादंबरीचा अपवाद सोडल्यास त्यांच्या इतर कादंबऱ्यांना पारंपरिक रंजनकलेचे गालबोट लागलेले दिसते. इंग्रज सरकारने मांग, गारुडी या लोकांना कधीच माणसासारखे वागविले नाही. प्राप्त सांस्कृतिक संदर्भात दलितांचे धाडस सिद्ध होते. दलितांना अलित अस्पृश्य करणाऱ्या व्यवस्थेचा तेवढाच पराभव होतो. हे फकिरा दाखवून देतो. मात्र तो परंपरा जोपासून राहतो. साठ्यांनी चित्रित केलेला 'फकिरा' आंबेडकरी नायक नव्हे. कारण फकिरा व्यवस्था फोडीत नाही. जोगीण नाकारीत नाही. त्याचे धाडस मान्य करून ही तो परंपराचा पायिक झाल्याचे जाणवते. त्याचे धाउस जाती-अंतासाठी नाही. सरकारचा बहिष्कार करण्याकरीता नाही, संस्कृती आणि पारंपरिक विश्वासाचा खेळ खेळवून घेण्यात तो स्वतःच आयुष्य घालवितो. त्या वेळची सावकारशाही, सरंजामशाही त्याला झुगारता आली नाही. स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याची हिम्मत असूनही, त्याला ते दाखविता आले नाही. नायकाला शरण आणण्याची किमया केली नसती तर 'फकिरा' दलित कादंबरीचे नेतृत्त्व करू शकला असता आणि म्हणूनच फकिरा आंबेडकरी नायक नाही.

शंकरराव खरात यांची हातभट्टी, गावचा टिनोपाल गुरुजी, मी मुक्त मी मुक्त, झोपडपट्टी, मसालेदार गेस्ट हाऊस, पारधी, फुटपाथ, टाऊट, मी माझ्या गावाच्या शोधात, पोतराज माणुसकीची हाक इत्यादी कांदबऱ्या लिहिल्या आहे. शंकरराव खराताच्या बाबत नलगे व गंगाधरराव पानतावणे सर म्हणतात की, 'दलित साहित्य आंबेडकरी प्रेरणेला महान मानते. दलित कादंबरीत केवळ सामाजिक अन्यायाचे चित्रण यायला नको. तर तो अन्याय नाहीसा करण्याची शक्ती दलित कादंबरीच्या नायकाच्या अंगी यावी हा दलित कादंबरीचा मुख्य हेतू आहे. मात्र खरातांची माणसे भोग वाट्याला येऊनही सोस सोसणारी, निमूटपणे गिळता येईल

तेवढे दुःख गिळणारी, या साऱ्या जीवघेण्या चक्रफेऱ्यातून सुटका व्हावी या अपेक्षेने कशीच तरी वाट पाहणारी आहेत व अंती निराशा पदरात पाडून घेणे हा त्यांच्या माणसाचा स्वभावधर्म झाला आहे. त्यांची पात्रे बंड करू उठत नाही.' त्यामुळे ती विद्रोही वाटत नाही. तरी ही दलित कादंबरी समृद्ध करण्यात खरातांचा सिहांचा वाटा आहे.

ना.रा.शेंडे यांच्या काजळी राम, तांबडा दगड, विलासिनी, अन्शुजा या त्यांच्या चार कादंबऱ्या! 'काजळी राम' या कादंबरीच्या आत्मकथनात ते सांगतात, ''विषमता नष्ट व्हावी व समता राखली जाती, जातिभेद झुगारला जाऊन दारिद्र्यात होरपळत असलेला खालचा थर उन्नत व्हावा. पर्यायाने ग्रामविकास साधला जावा या कल्पनेने मी माझ्या कादंबरीचा देह निर्माण केला आहे. ब्राह्मण, ब्राह्मणेत्तर व दलित यांच्या युतीने तिचा आत्मा घडविला आहे.'' दलित पुत्र मोहन व ब्राह्मण कन्या चित्रा यांच्या ध्येयवादाने 'काजळी रात्र' ही कादंबरी संपते. 'मुक्तामालेशी' असलेले तिचे नाते दृष्टीआड करता येत नाही.

कादंबरी लेखकाच्या लेखनातून विविध जाणिवा आविष्कृत झाल्या आहे. दलित जीवनाचे विविध अंगी चित्रण करून समाजातील विविध घटकावर प्रकाश टाकला आहे. भूक, गरिबी, शोषण, अगतिकता, लाचारी, गुलामी, वेठबिगारी या समस्यांचे दलित जीवनाशी जवळचे नाते आहे. पण ज्यांनी दलितांच्या जीवनाला प्रकाशाची वाट दाखविली व त्यांच्या जीवनात आत्मविश्वास जागविला त्या भ.गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिराव फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाबाई आंबेडकर व यशोधरा यांच्या चरित्राचा मागोवा दलित कादंबरीने घेतला आहे ते कादंबरी लेखक व त्यांच्या कादंबऱ्या पुढीलप्रमाणे-

बंधूमाधव-रमाई, हरिभाऊ पगारे- युगप्रवर्तक, झुंजारा, कालिंदी, हि.गो.बनसोडे-आभाळा एवढी, सुशिला मूल-सम्बुद्ध, नाना ढाकुलकर-भीमाई रमाई, डॉ.द.स.गजहटे-जोतिकांता सावित्री, यशवंत मनोहर-रमाई, मी सावित्री-सावित्री ज्योतीराव फुले, मी यशोधरा, रमाकांत जाधव-सोनबा, करूणा जमदाडे-रमा, मुरलीधर भोसेकर-सिद्धार्थाची यशोधरा, नीला पांढरे-ज्योती सावित्री.

दलित साहित्यात ''चरित्रात्मक कादंबरीचे लिखाण केले आहे. चरित्रात्मक कादंबरी लिहणे हे लेखकाला एक 'आव्हान असते. एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यात केलेला असतो. व्यक्तीच्या जीवनातील

घटनांची जंत्री व त्यावरचे अभिप्राय नोंदविले म्हणजे चरित्रात्मक कादंबरी आकाराला येत नाही तर त्या चरित्रविषयाच्या 'घटितां' तून (ऋलीी) माणूस शोधावयाचा असतो.'' हे चरित्रात्मक कादंबरी विषयीचे भालचंद्र फडके यांचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे.

हरिभाऊ पगारे हे चरित्रात्मक कादंबरी लिहिणारे लेखक आहेत. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात राहिलेले असून बाबासाहेबांबद्दल त्यांच्या मनात अफाट सादर आहे. ''समुद्राच्या पाण्याला म्हणे चंद्राची ओढ असते मला ही अशीच बाबासाहेबाची ओढ होती.'' (हरिभाऊ पगारे) 'युगप्रवर्तक' या कादंबरीत हरिभाऊ पगारे यांनी दलितांच्या मुक्तिसंग्रामाचे नेते आणि दलित साहित्याचे प्रेरणा स्थान म्हणजे डॉ.आंबेडकर! यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. एका महार कुटुंबात जन्म घेतलेला, शिक्षण व मान-सन्मान मिळविलेला, नोकरीचा मोह न धरता सर्व आयुष्य मुक्तिलढ्यात झोकून दिलेला, सवर्णाच्या छळाने पीडलेला, आपल्या वाणी व लेखणीने दलितांची अस्मिता जागी करणाा हा महापुरुष केवढ्या प्रचंड वादळातून गेला असेल आणि त्यांच्या संघर्षशील व्यक्तिमत्त्वाचे आकलन झाले नाही. असे ही कादंबरी वाचतांना वाटते. मनस्मृतीचे दहन ही केवढी ज्वलंत घटना! माणुसकीचे हक्क मागणारा एक समूह प्रतिगामी शक्तीला आव्हान देत उभा! पण ही घटना कादंबरीत केवळ वर्णनपर पातळीवर राहते. डॉ.आंबेडकराच्या जीवितातील विविध घडना, व्यक्ती यांचा असा व्यूह रचावा लागतो की, त्यातून आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडावे. पण ही कादंबरी तशी अपुरी पडते. हरिभाऊ पगारे यांचा आंबेडकरांविषयीच भक्तिभाव जाणवतो. हे भालचंद्र फडके यांचे 'युगप्रवर्तक' कादंबरी विषयीचे निरीक्षण विचार करायला भाग पाडते.

त्याचप्रमाणे बंधुमाधव यांची चरित्रात्मक कादंबरी 'रमाई' होय. या कादंबरीविषयी डॉ.सुशिला ढगे आपल्या ग्रंथाल म्हणतात, 'लेखकांनी रमाईच्या श्रद्धेपोटी ती लिहिली असावी असे वाटते. त्याचप्रमाणे लेखकांनी पाल्हाळीक आणि कल्पनारम्य वातावरणाकडे विशेष लक्ष दिले आहे. रमाई जन्मताच भाग्यवान होती. तिला मिळालेला पती भीमराव आंबेडकर हे दैवाची देण असल्याचे ते मानतात.' मात्र कादंबरीमध्ये दाखविलेली सामाजिक विषमता त्या काळातील वास्तवाशी जुळती असल्यामुळे कादंबरी काराने त्या काळातील दलितांची सामाजिक स्थिती कळण्यास मदत होते.

ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारीत 'झुंझार' ही कादंबरी हरिभाऊ पगारे यांनी लिहिली. या कादंबरीतून ज्योतिबांच्या आजोबापासूनचा परिचय होतो. ज्योतिबांचे बालपण, शिक्षण, त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा, त्यांचे लग्न, त्यांचा मानसिक-आर्थिक छळ, सावित्रीबाई फुलेंची विटंबना, ज्योतिरावांना मदत करण्याची तिची धारणा, त्याग आणि सहनशीलता या गोष्टीचा आटोपशीर परामर्श 'झुंझार' घडविते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर किंवा महात्मा फुले यांच्या जीवनावर कादंबरी हरिभाऊ पगारेंनी लिहिल्या याचे कारण लेखकाला या थोरांचे कार्य व चरित्र लोकांपर्यंत पोचविणे ही ओढ. त्यांची 'कालिंदी' सुद्धा आंबेडकरांच्या कार्याची ओळख करून देणारी कादंबरी आहे. हि.गो.बनसोड यांनी 'आभाळाएवढी' या कादंबरीमध्ये सावित्री व ज्योतिराव यांचे सहजीवन रेखाटले आहे. 'सम्बुद्ध' सारखी भ.गौत्तम बुद्धाच्या जीवनावर कादंबरी लिहून आपली सामाजिक बांधिलकी सुशिला मूल यांनी व्यक्त केली आहे. तर नाना ढाकूलकर यांनी 'भीमाई-रमाई' या कादंबरीतून बाबासाहेब आंबेडकर व पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे जीवन चरित्र रेखाटले आहे. नाना ढाकूलकर यांनी रमाईच्या, सावित्रीच्या व यशोधरेच्या जीवन प्रवासाविषयी 'रमाई', 'मी सावित्री ज्योतिराव फुले' व 'मी यशोधरा' या कादंबऱ्या डॉ.यशवंत मनोहर यांनी लिहिल्या आहे. डॉ.यशवंत मनोहराविषयी डॉ.सुशिल ढगे म्हणतात. 'रमाई' या कादंबरीत डॉ.आंबेडकरांची पत्नी म्हणून तिच्यातील बालवयात दिसून येणाऱ्या गुणाचे अमाप कौतुक लेखक करतात. सावित्रीबाई फुले सारखे कर्तबगार जीवन रमाईच्या वाट्याला आले नाही. उलट कष्टकरी स्त्रीचे शोषणात्मक जीवन येथे चित्रित होते. रमाईच्या रूपात कर्तबगार पात्राला उभे करण्याचे धाडस ते दाखवित नाहीत. कारण डॉ.आंबेडकरांबरोबर त्यांची रमाबाई व वरची अपार श्रद्धा त्यांना तसे करू देत नाही. दलित कादंबरीला स्त्री ही आई किंवा देवी म्हणून ज्ञान देणारी किंवा पूजनीय नको आहे, तर नव्या युगाच्या वाटचालीचे नेतृत्त्व करणारी धूरंधर, स्वकर्तृत्त्ववान, स्वतःच्या कर्तबगारीने समोर येणारी स्त्री अपेक्षित आहे. कादंबरी लेखन भावनिक आधाराने श्रेष्ठ होत असले तरी ते दलित कादंबरीला बाधा आणते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जसे म्हणत की, विभूतीपूजा राजकारणातील विवेकवादाला बाधक आहे तसेच असे म्हणता येईल की, विभूतीपूजा चरित्रात्मक कादंबरीच्या कलात्मकतेला बाधक ठरते हे भालचंद्र फडके यांचे विधान चरित्रात्मक कादंबरी लेखकाच्या बाबतीत

अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण चरित्रात्मक कादंबरीमध्ये लेखकांनी फक्त श्रद्धा सुमने वाहिली आहे. रमाकांत जाधव यांनी 'सोनबा' या कादंबरीतून एका सामान्य दलित व्यक्तीची डॉ.बाबासाहे आंबेडकर यांच्या प्रति असणारी श्रद्धा मांडली आहे. भा.द.खेर यांची 'प्रबुद्ध' ही आंबेडकरांच्या जीवनावर दोन भागात लिहिलेली कादंबरी आहे. ह्या सर्व चरित्रात्मक कादंबऱ्या दलित कादंबरीचे दालन समृद्ध करण्यात भर टाकतात हे निश्चित.

'फ्लोबेर' हा 'मादाम बोव्हारी' ही प्रसिद्ध अभिजात कादंबरी लिहिणारा लेखक या लेखकाच्या संदर्भात रंगनाथ पठारे 'कादंबरीची संकल्पना' या लेखात म्हणतात. ''फ्लोबेरने त्याच्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'अदृश्य तरीही शक्तिशाली ईश्वर जसा त्याच्या निर्मितीत सारीकडे असतो' तसे कादंबरीकाराला करता आले पाहिजे. कलावंतांचे असणे सारीकडे जाणवले पाहिजे व तरीही तो कुठेही दिसता कामा नये.'' या प्रकारची लक्षणे प्रकट करण्यासाठीची उमेद कादंबरीकाराने बाळगली पाहिजे तरच बरे तेव्हाच काही त्याच्याकडून घडू शकते. दुरुन काही पाहून कादंबरी लिहिता येत नाही. माहीती घेऊन नुसते काही नोंदवता येत नाही. अर्थपूर्ण रचना करण्यासाठी आपल्या आस्थेच्या व्यूहात घुसळून निघून हालचाल करून घेता आले पाहिजेत. ते हालचाल करून घेण्याचे गारूड कादंबरीकार सोबत घेऊन आलेलाच असतो. फक्त त्याचे त्यालाच ते ओळखता आले पाहिजे. ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक अशा साऱ्या कादंबरीची मुळे लेखकाच्या वर्तमानात असतील तरच त्यांच्यात अर्थपूर्णता येण्याची शक्यता असते. एरवी लिहिण्याचा सराव व ऐकीव/लिखित घटनांची यादी यातून फक्त कारागिरीच करता येते आणि त्यातून काहीही साधत नाही.

★★★

# बाबुराव बागूल याचंया 'दशं' मधील नागप्रतिमा

प्रा.अशोक राणा

**प्रास्ताविक :–**

ग्रामीण व दलित साहित्य या एकाच पर्यावरणाच्या दोन बाजू व्यक्त करणाऱ्या अभिव्यक्ती होत. ग्रामीण साहित्याचा प्रारंभ १९२० पासून झाला तर दलित साहित्य १९६० नंतर फुलले. ग्रामीण साहित्याची प्रेरणा महात्मा फुले यांच्या विचारांमधून "महाराष्ट्रात जी सामाजिक परिवर्तनाची व शैक्षणिक उत्थानाची चळवळ उभी राहिली त्या चळवळीतील विचारवंत व कार्यकर्त्यांच्या कार्याची परंपरा" आहे असे डॉ. कैलाश सार्वेकर म्हणतात. अर्थात कोणा एका विचारवंताच्या विचारांनीच प्रेरणा ग्रामीण साहित्यामागे आहे असे त्यामुळे म्हणता येत नाही. दलित साहित्यामागे मात्र स्पष्टपणे डॉ.बाबासाहेब आंबडेकरांचे विचार तसेच कार्य ही प्रमुख प्रेरणा आहे.

विशेष म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा प्रारंभ १९२० पासून झालेला आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याचे प्रारंभवर्ष हेच त्यांच्या कार्याचेही प्रारंभवर्ष मानावे लागेल. त्याचबरोबर महात्मा फुले यांचे विचार व कार्य ही त्यांच्या कार्यांनी प्रेरणा होती या वास्तवाचाही स्वीकार करणे क्रमप्राप्त आहे. असे असेल तर ग्रामीण व दलित अशा दोन प्रकारच्या साहित्य प्रवाहानी आवश्यकता काय हा प्रश्न निर्माण होऊ शकतो, आणि ते स्वाभविकही आहे. ज्या अर्थी एकाच प्रेरणेतून या दोन साहित्यप्रवाहांनी निर्मिती झाली आहे, त्या अर्थी त्यामध्ये काही बाबतीत साम्य असू शकते. त्याचबरोबर ज्या अर्थी हे स्वतंत्र प्रवाह आहेत त्याअर्थी त्यांच्यात स्पष्टपणे जाणवणारा भेद असण्याची शक्यता आहे. या साम्य–भेदावर थोडा प्रकाश टाकूया.

ग्रामीण साहित्याविषयी ज्या अभ्यासकांनी गांभीर्याने चिंतन केले त्यात आनंद यादव हे एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांनी "ग्रामीण साहित्य म्हणजे खेडेगावातील कृषीवर निर्वाह असलेल्या स्पृश्य शेतकऱ्यांच्या आणि स्पृश्य शेतमजुरांच्या जीवनावर आधारलेले साहित्य होय," असे म्हटलेले आहे. ग्रामीण साहित्याच्या या भाष्यकाराने त्यामधील स्पृश्यास्पृश्य भेद स्पष्ट केलेला आहे. हे जर ग्रामीण साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण मानले तर दलित साहित्यानी अनिवार्यता

आपणास जाणवल्याशिवाय राहणार नाही. या अनिवार्यतेसोबतच या साहित्यानी वैचारिक बैठकही अधोरेखित करणे आवश्यक ठरते. दलित साहित्याचा हेतू कथन करताना केशव मेश्राम त्याचे. दहा ठळक विशेष सांगतात. त्यात शेवटी समाज परिवर्तन घडवून समता प्रस्थापित करणे या विशेषाचा समावेश त्यांनी केला आहे. ग्रामीण साहित्याच्या काही भाष्यकारांनी या विशेषाचा स्वीकार आजच्या ग्रामीण साहित्यात असल्यानी भूमिका मांडलेली आहे. त्यामुळे ग्रामीण व दलित या दोन्ही साहित्यप्रवाहामधील काही समान सूत्रे शोधण्याचे प्रयत्न अभ्यासकांनी केलेले आहेत. अशी समान सूत्रे आढळण्याची शक्यता निर्माण होण्यामागे या साहित्यात चित्रित झालेले पर्यावरण कारणीभूत आहे. खेड्यांनी अर्थव्यवस्था शेतीशी निगडित असल्यामुळे या दोन्ही साहित्यप्रवाहात कोणत्या ना कोणत्या अंगाने खेडे प्रतिबिंबित होत असते. त्याचे स्वरूप कसे आहे ते पाहूया.

**ग्रामीण जीवनातील लोकधारणा व नाग :-**

खेड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे राहणीमान सामान्य स्वरूपाचे असते. नागरी जीवनातील सोयीसुविधा त्यांच्या वाट्याला आलेल्या नसतात. निसर्गाशी तादात्म्य पावलेला तसेच त्याचाशी संघर्षात असा हा मानवीसमूह 'लोक' या संज्ञेने ओळखला जातो. बाह्यसंस्कारापासून अलिप्त राहिल्यामुळे लोकांच्या संस्कृतीमध्ये पुरातनत्व निर्भेळ स्वरूपात आढळते. या पुरातनत्वाला आपण लोकधारणा या नावाने संबोधतो. लोकधारणांनी भारलेले ग्रामीण जीवन साहित्याच्या विविध प्रवाहांमध्ये आपणास पाहावयाला मिळते. त्यात प्रामुख्याने नागविषयक धारणांचा प्रभाव अधिक आढळतो, नाग हे पौरुषाचे प्रतीक आहे. तो आदिपुरुषाचा प्रतिनिधी आहे, असे डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात. कदाचित याचकारणाने नागविषयक लोकधारणा अधिक प्रचलित असाव्यात. एक विषारी साप म्हणून नाग ओळखला जातो. त्यामुळेच त्याला विषधर या नावाने संबोधले गेले आहे. आपल्या बरगड्या पसरवून फणा उगारण्याच्या त्याच्या वैशिष्ठ्यामुळे नागाला फणीधर किंवा फणीन्द्र ही उपाधी प्राप्त झाली. नागाच्या डोक्यावर मणी असतो आणि त्यातून निघणाऱ्या प्रकाशामुळे अंधारातही तो आपले भक्ष्य शोधू शकतो अशीही एक समजूत आहे. तीमधून नागाला मणी किंवा मणीधर म्हटले जाते. मणीपूर हे नाव नागवाचक आहे. नाग हा विषारी प्राणी असल्यामुळे त्याचा दंश हा प्राणघातक ठरतो.

त्यामुळे निर्माण झालेल्या काही धारणा लोकमानसात दृढ झालेल्या आहेत. अशा लोकधारणा व भ्रामक समजुती पुढीलप्रमाणे आहेत. १)-साप डूख धरतो. २) मंत्रामुळे सापाचे विष उतरते. ३) नाग गाईच्या आचळांना तोंड लावून दूध पितो. ४) सर्पाच्या अंगावर केस किंवा मिशा असतात. ५) मासिक पाळी आलेल्या स्त्रीने सापास पाहिल्यास साप आंधळा होतो. ६) नागांना पाच फण्या असतात. ७) नाग धनाची राखण करतो ८) नाग स्वप्नात आल्यास मृत्यू होतो.

या सर्व समजुती भ्रामक असून वैज्ञानिक संशोधनांनी त्यामागील वास्तव पुढे आणलेले आहे. सर्पतज्ञ निलीमकुमार खैरे यांनी अशा काही समजुती तसेच अंधश्रद्धा या विषयी तपशीलवार स्पष्टीकरणे दिली आहेत.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोककथा व गीतांमधून व्यक्त झालेल्या नागविषयक रूढ धारणा नोंदविल्या आहेत. ग्रामीण साहित्यात या लोकधारणांनी मोठ्या प्रमाणात आपले बस्तान बसविले आहे. परंतु दलित साहित्यात त्यांचा प्रभाव फारसा जाणवत नाही. कारण की हे साहित्य आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य मानले जाते. हे जरी खरे असले तरी नागविषयक भ्रामक समजुतींनी दलित साहित्यातही आपली उपस्थिती नोंदविल्याचे दिसून येते. दलित साहित्यातील एक ज्येष्ठ व श्रेष्ठ लेखक बाबुराव बागूल यांच्या 'दंश' या कादंबरीत तर त्या केन्द्रस्थानी आढळतात.

**बाबुराव बागूल यांची 'दंश' कादंबरी:-**

''प्रस्तुत कादंबरी बाबुराव बागुलांनी लेखक म्हणून ऐन भरात असताना लिहून प्रसिद्धीसाठी दिली. त्यांच्या लेखन संकल्पनात अनेकदा अपूर्ण लेखन झाले. जे त्यांना काही अपरिहार्य कारणास्तव तडीस नेता आले नाही. परंतु 'दंश' कादंबरी संपूर्ण स्वरूपात मुखपृष्ठाच्या संकल्पनेसह १९७२ ला दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. परंतु या कादंबरीवर कोणीही लिहिले वा बोलले नाही. दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेले परंतु पुस्तक स्वरूपात न आलेले लेखन चर्चा विषय का होऊ नये? शंकरराव खरात यांनी 'माणुसकीची हाक' ही कादंबरीसुद्धा अशीच उपेक्षित राहिली. सुधाकर गायकवाड यांनी 'शूद्र' अशीच अपेक्षित राहिली. अशा दर्जेदार पण उपेक्षित लेखनाची दखल घेऊन यानी चर्चा अपरिहार्य आहे असे वाटते. बाबुरावाच्या निधनानंतर 'दंश' या कादंबरीवर चर्चा व्हावी किंवा ग्रंथस्वरूपात प्रस्तुत कादंबरीवर चर्चा व्हावी किंवा ग्रंथस्वरूपात प्रस्तुत कादंबरी प्रसिद्ध व्हावी

म्हणून प्रस्तुत लेखकाने या कादंबरीचा परिचय या लेखाद्वारे करण्याचा हा प्रयत्न आहे.'' अशारीतीने एका दुर्लक्षित कादंबरीवर प्रकाश टाकला येथे आहे. परंतु हे करताना दंश कादंबरी कोणत्या दिवाळी अंकात प्रथम प्रकाशित झाली होती त्याचा उल्लेख मात्र केला नाही. त्यामुळे ती मुळातून वाचण्यानी उत्कंठा कायम राहते.

प्रा. पुंडलीक गायकवाड यांनी या कादंबरीला आपल्या विवेचनात दीर्घकथा म्हणूनही संबोधलेले आहे. परंतु या कथेचा वाचकांच्या मनावर होणारा परिणाम मात्र कादंबरीचा असतो, असेही ते म्हणतात.

या कादंबरीवर काही समकालीन कादंबरीकारांचा प्रभाव असल्यानी नोंद करून विशेषतः चि. त्र्यं. खानोलकर आणि जी. ए. कुलकर्णी यांच्या लेखनाचा या काळातील लेखकांवर तसेच वाचकांवर विशेष प्रभाव जाणवतो असे ते म्हणतात. या दोन लेखकांनी माणसांच्या विकृतीचे दर्शन घडविताना बटबटीतपणा न आणता आपल्या लेखनातून काव्यात्मकता समर्थ शब्दकळांद्वारे माणसांच्या अंतर्मनाचा शोध घेतला. त्यामुळे कामवासना, विकार यांचे चित्रण या कालखंडातील लेखनाची कथा-कादंबरीची मुख्य प्रवृत्ती झाली. अगोचराचे चित्रण हा मुख्य विषय झाला असे त्यांनी म्हटले आहे. हे करताना लेखकांनी लोकजीवनातील श्रद्धा, संकेत प्रतीकांचा आधार घेतला हे सांगून पुढे गायकवाड म्हणतात, ''समूह जीवनातील व्यक्ती स्वतंत्र नसून सामर्थ्यशाली निसर्गाची व नियतीची गुलाम असते. कळसूत्री बाहुल्याप्रमाणे व्यक्तीला नियतीच्या तालावर नर्तन करावे लागते. व्यक्तीच्या मानसिक गुलामीचे व प्रबळ तथाकथित नियतीचे सामर्थ्य या कादंबरी लेखनातून प्रगट झाले.

परिणामतः या लेखनात भयपटाचे, रहस्य कथांचे किंचित स्वरूप आल्यासारखे वाटते. कदाचित प्रादेशिक व ग्रामीण लेखनातून रोमँटिक, टाकावू लेखनाविरुद्ध चिं. त्र्यं किंवा जी. ए. यांनी ही प्रतिक्रिया असावी. विशेष म्हणजे विशिष्ट नियतीवाद सूचित केला आहे. शहरी जीवनात माणसांच्या जगण्याला आलेली अवकळा, शोषण याविरुद्धची ही प्रतिक्रिया असावी. जी. ए., चि. त्र्यं. हे लेखक हे पराभूत मानसिकतेचे बळी आहेत.'' ज्या पार्श्वभूमीवर बाबुराव बागुलांनी दंश कादंबरी लिहिली तो काळ असा नैराश्याकडे नेणारा होता. त्यातही ते जे जीवन व्यक्त करतात ते कसे होते ते पाहू.

**'दंश' मधील ग्रामीण जीवन व नाग प्रतिमा :–**

दलित कादंबरीत समावेश नसलेली 'दंश' ही ग्रामीण पार्श्वभूमी असलेली कादंबरी ग्रामीण कादंबरीत समाविष्ट व्हायला हरकत नव्हती. पण तेही तिच्या वाट्याला आले नाही. साम्यवादी विचारसरणीशी समरस झालेले बागूल या कादंबरीत वर्गीय जाणिवा व्यक्त करीत नाहीत तर समकालीन नियतीवादी लेखन विशेषांना बळी पडलेली अशी त्यांनी दंश ही कादंबरी आहे, असे प्रा. गायकवाड म्हणतात. या कादंबरीत लोकजीवनात श्रद्धेचे स्वरूप प्राप्त झालेल्या नागप्रतिमेला मध्यवर्ती स्थान आहे. आंबेडकरी विचारात नाग हे अस्मितेचे प्रतीक मानले जाते. नागांनी म्हणजे भारतातील मूलनिवासी लोकांनी बाहेरून आलेल्या आर्यांशी निकराचा संघर्ष केला यावर मोठ्या प्रमाणात चिंतन व चर्चा आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आणि वक्ते करीत असतात. परंतु आंबेडकरी साहित्यात ती अभावानेच आढळते. ग्रामीण साहित्यातील चारूता सागर यांनी 'नागीण', शंकर पाटील आणि मधु मंगेश कर्णिक यांनी 'भुजंग' तसेच जी.एं. च्या कथावाङ्मयात येणाऱ्या नागप्रतिमा या ग्रामीण लोकधारणांशी निगडित आहेत. याच परंपरेत समाविष्ट होणारी बाबुराव बागूल यांनी 'दंश' ही कादंबरी आहे.

**नाग व लैंगिकता –**

नाग हा शब्द भाषावैज्ञानिक व्युत्पत्तीनुसार लिंग म्हणजेच पुरुषशिश्नाशी निगडित आहे, संस्कृत भाषेत 'नाग' या शब्दाचा अर्थ शिश्न असा होतो. नांगर या शब्दापासून तो बनला असवा. लांगल या शब्दापासून नांगर हा शब्द सिद्ध झाला आहे व त्याचाही अर्थ शिश्न असा होतो.१६ नांगर या शब्दाचे मूळ असलेला 'लांगल' हा शब्द ऑस्ट्रोएशियाटिक आहे असे प्रिझुलस्की म्हणतो. या शब्दाचे मूळ प्राचीन लक (= Sex) या शब्दात असून लग, लंग, लिंग अशी त्यानी रूपे होतात. माळरान पेरण्यासाठी वापरात येणारी वस्तू (Digging Stick) या अर्थाचा 'नांगर' हा शब्द त्यातून तयार झाला. नांगर व लिंग या शब्दांचा व्युत्पत्तीशास्त्रीयदृष्ट्या असा परस्पर संबंध आहे. ऑस्ट्रिक भाषीय लोक ज्या काठीच्या साह्याने पेरणी करीत तिला 'लक' या नावाने संबोधित असत. त्यापासून लग, लंग, लिंग अशी रूपे सिद्ध झाली असल्याचे सुनीतीकुमार चटोपाध्याय म्हणतात. लांगल हा शब्द त्यापासून व्युत्पन्न झाला असून नांगर हे त्याचे आजचे रूप होय. लांगुल या शब्दाचा अर्थ शेपूट असा होतो. वैदिकपूर्व भारतीय लोकांच्या

या शब्दाचा स्वीकार आर्यांनी आपल्या भाषेत केला. महाभारतात लांगूल हा नांगर या अर्थाचा शब्द लिंग आणि शेपूट अशा दोन्ही अर्थांनी येतो. नांगरणे व संभोग या शब्दांचे परस्पर साहचर्य प्राचीन भारतीय लोकांनी शोधले तसेच इतर देशातील लोकांनाही जाणवले होते. डॉ. रा.चिं. ढेरे यांनी यानी नोंद केलेली आहे.

सिग्मंड फ्रॉईड यांनी नांगर तसेच पालीचे शेपूट या प्रतिमांमधून लिंग भावना व्यक्त होत असल्याचे आपले मत मांडले आहे. स्वप्नमीमांसा (The Interpretation of Dreams) या ग्रंथात

त्यांनी आपल्या अतृप्त इच्छा वा वासना या स्वप्नांमधील विविध प्रतीकांच्या द्वारा व्यक्त होतात असे आपले निरीक्षण नोंदविले आहे. शिडी व पायऱ्या तसेच त्यावरून वर जाणे व खाली उतरणे हे लैगिक क्रियेशी संबंधित आहे असे तो म्हणतो. सर्प व लिंग यासंबंधी त्याने विस्तृत विवेचन केले आहे. त्यात नांगर या लिंगवाचक प्रतीकाचा ही उल्लेख येतो. फ्रॉईडचा निकटचा सहकारी कार्ल गुस्ताव युंग याने आपल्या सामूहिक अबोधाच्या सिद्धांतामध्ये आदिप्रतिमा म्हणून नागप्रतिमेनी नोंद केलेली आहे. नाग हा सर्वात प्राचीन आदिबंध असून ते एक हुशारीचे प्रतीक आहे असे तो म्हणतो. नागमंडल या प्रतीकाचा 'मंडल' सिद्धांत भारतातील योगशास्त्रावर आधारित आहे. पूर्णत्वाचे तसेच स्वत्वाचे प्रतीक म्हणून नागमंडल हे प्रतीक जगातील सर्वच संस्कृतींमध्ये आढळते. स्वत्व म्हणजेच अस्मिता. म्हणूनच अस्मितेचे प्रतीक म्हणूनही जगातील बहुतांश संस्कृतींमध्ये नागप्रतिमा प्रचलित आहे.

**नाग व अस्मिता–**

भारतातील सर्वात प्राचीन अशा सिंधू संस्कृतीमध्ये नाग प्रतिमा मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळे नागसंस्कृती म्हणूनही या संस्कृतीचा उल्लेख अभ्यासक करतात. सिंधुसंस्कृतीचे शासक नाग कुलाचिन्हपूजक होते. या नागसंस्कृतीतूनच बौद्ध संस्कृतीनी उभारणी झालेली आहे. त्यामुळे बौद्धांनी नाग हे अस्मितेचे प्रतीक मानले. डॉ. आंबेडकरांनी त्यामुळे स्वतःला नागवंशी मानले होते. त्यांच्या विचारांना प्रमाण मानणारांनी नागांभोवती आपल्या अस्मितांचे रिंगण घातले. परंतु नागसंस्कृती विषयीची संशोधने तसेच कुलचिन्हवादाची जाणीव मात्र हवी त्या प्रमाणात रुजविण्याचे प्रयत्न झाले नाहीत. या दोन्ही बाबी समाजशास्त्राच्या

अभ्यासाचे विषय आहेत. समाजशास्त्राच्या अभ्यास क्षेत्रात मानववंशशास्त्र ही विद्याशाखा येते. आज ती पुरेशी विकसित झालेली आहे. परंतु तिचाही परामर्श स्वतःला नागवंशीय म्हणविणारे घेत नाहीत. जर अभ्यासकांनी ही स्थिती असेल तर सर्वसामान्य जनतेकडून आपण कोणती अपेक्षा करणार?

आपल्या अस्मिता ज्या 'नाग' या शब्दाशी निगडित आहेत ते एक कुलचिन्ह आहे. कुल हा शब्द शेती करणाऱ्या लोकाशी संबंधित आहे. कु म्हणजे जमीन आणि तिला कसणारा तो 'कुल' होय. अर्थात कुळ म्हणजे शेतकरी होय. शेती करणाऱ्यांच्या समुदायाला कुळवाडी असे म्हणतात.

त्यातून कुणबी हा शब्द तयार झाला. शेतकरी असाच मुळात त्याचा अर्थ होतो. आज तो एका जातिसमूहापुरता सीमित झाला आहे. अर्थ संकोचाचे हे एक उदाहरण होय. शेतकऱ्याला शेतीसाठी जमीन नांगरताना तिच्यावरील वारूळही नष्ट करावे लागते. त्यामुळे त्यातून येणारा साप वा नाग संतापाने त्याचा चावा घेणे स्वाभाविक असते. परंतु त्याने चावून आपला मृत्यू होऊ नये या करिता साप व नागानी पूजा-अर्चना करणे सुरू झाले. सापानी सळसळ, त्यानी सतेज क्रांती, फण्याचा डौलदारपणा आणि शत्रूवर तुटून पडण्याच्या वृत्तीमुळे शेतकऱ्यांना त्याच्याविषयी आकर्षण निर्माण झाले. शेतीत पीक आल्यावर ते फस्त करणाऱ्या उंदराना साप खातो. त्यामुळे तो आपला रक्षक आहे अशी भावना शेतकऱ्यांमध्ये रुजली. त्यातूनच पुढे तो आपला पूर्वज असावा ही धारणा दृढ झाली. त्यामुळे नाग हे शेतकऱ्यांनी आपल्या कुळाचे म्हणजे समूहाचे चिन्ह ठरविले. कुलचिन्हाविषयीच्या श्रद्धा त्यातूनच निर्माण झाल्यात. त्यालाच कुलचिन्हवाद (Totemism) या नावाने संबोधले जाते. सर जे. जी. फ्रेझर यांनी यावर अधिक प्रकाश टाकला आहे. तसेच सिग्मंड फ्रॉईड यांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून या संकल्पनेची चिकित्सा केली. फ्रेझर, फ्रॉईड आणि युंग या तीन शास्त्रज्ञांनी कुलचिन्हवादाच्या संकल्पनेला आपापल्या दृष्टिकोनातून विकसित केले. तर नागकुलचिन्हवादावर जेम्स फर्ग्युसन यांनी विशेष अभ्यास केला.२८ या सर्व अभ्यासकांच्या विचारांचा परामर्श घेऊन आपण नागविषयक अस्मितांचा उलगडा करू शकतो, परंतु या दृष्टीने मराठी भाषेत फारसे गांभीर्याने लिखाण झाले नाही. या दृष्टीने प्रा. गायकवाड यांनी दंश कादंबरीचा विचार करण्याची साधी सूचनाही आपल्या शोधलेखात दिली नाही. नाग या लैंगिक प्रतिमेचाही विचार त्यांनी केला नाही. त्यामुळे बाबुराव बागुलांच्या या आगळ्या वेगळ्या कादंबरीवर

अन्याय झाला आहे.

**समारोप व निष्कर्ष :–**

दलित साहित्यात मोलानी भर टाकणारे बाबुराव बागुल यांनी दंश ही कादंबरी त्यांच्या इतर कादंबऱ्यांपेक्षा वेगळी आहे. तिचे हे वेगळेपणच तिच्या उपेक्षेचे कारण ठरले आहे. या उपेक्षेमागे दलित व मार्क्सवादी साहित्याचे निकष तिला लावण्याचा आग्रह हे एक प्रमुख कारण असावे. त्याचबरोबर ती पुस्तकरूपात प्रसिद्ध न होणे हेही महत्त्वाचे कारण आहे. बाबुराव बागुलांच्या मृत्यूनंतर त्यांना आदरांजली व्यक्त करण्याच्या निमित्ताने अस्मितादर्श मासिकाचा जो विशेषांक प्रकाशित करण्यात आला, त्यात या कादंबरीवर समीक्षा करणारा लेख प्रा. पुंडलिक गायकवाड यांनी लिहिला. त्याच्या आधारे प्रस्तुत शोधनिबंध सिद्ध केला आहे. मूळ कादंबरी वाचनात न आल्यामुळे दंश नी समीक्षा व चिकित्सा असे या निबंधाचे स्वरूप नाही. प्रा. गायकवाड यांनी आपला शोधलेख वा समीक्षा लिहिल्यामुळे प्रस्तुत शोधनिबंध लिहिणे शक्य झाले. त्यांचे ऋण मानून त्यांच्या आक्षेपांना उत्तर देण्याचा प्रयत्न यात केला आहे. तो यासाठी की, कादंबरीच्या अभ्यासात आवश्यक अशा अभ्यासपद्धतीचा परामर्श यात घेतला गेला नाही.

गेल्या पन्नास वर्षामध्ये मराठी समीक्षेत अनेक प्रवाह रूजलेत. त्यात मानसशास्त्रीय समीक्षा बरीच प्रतिष्ठित झाली. मनोविश्लेषणाच्या सिद्धांतांच्या आधारे ही समीक्षा लिहिली गेली. तीत लैंगिक प्रेरणांवर पुरेशी चर्चा झाली परंतु नागप्रतिमा हा अजूनही या समीक्षेने महत्त्वाचा विषय मानला नाही. कारण की या प्रतिमा ज्या मिथक अथवा पुराकथांमधून येतात त्यांच्या अभ्यासाचे तंत्र पुरेसे प्रचलित झाले नाही. आदिबंधात्मक समीक्षा या नावाने ते ओळखले जाते. मानववंशशास्त्र, इतिहास, भाषाविज्ञान, तत्त्वज्ञान इ. विद्याशाखांचा परिचय असणारेच या समीक्षेचा आश्रय घेतात. ती आस्वादात्मक स्वरूपाची आज दिसते. आज समीक्षकांमध्ये अपेक्षेप्रमाणे ही समीक्षापद्धती रूजली नाही. त्यामुळे ज्या अनेक कादंबऱ्या दुर्लक्षित रहिल्या तशी दंश ही दुर्लक्षित राहिली. परंतु त्यामुळे मराठी समीक्षेचे दालन आजही अपुरे आहे. या दृष्टीने दंश या कादंबरीकडे पहावे आणि तिची वरील नव्या दृष्टिकोनातून समीक्षा व्हावी हीच अपेक्षा.

★★★

# ‘ग्रामीण साहित्यातील स्त्री जीवन’

प्रा. अनुराधा वसंत गुजर

आजच्या मराठी साहित्याला अनुभवाचा कसदारपणा बहाल करणारे जे विविध वाङ्मयीन प्रवाह पुष्ट झालेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण साहित्य हा प्रवाह मानला जातो. १९६० नंतर ग्रामीण साहित्य व दलित साहित्याचा प्रवाह जोर धरू लागला. ग्रामीण भागातील उपेक्षित समाजाला साहित्यात स्थान मिळू लागले. १९६० नंतर लेखकांना जीवनानुभवातही मनोरंजनाची जबरदस्त ताकद सामावलेली असल्याची जाणीव झाली. त्यामुळे लेखकांनी स्वतः अनुभवलेले जीवनवास्तव साहित्यात येऊ लागले. साहित्यात स्त्री उपेक्षितांचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. आजच्या पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत ती स्वतःचे स्वत्त्व टिकवण्यासाठी धडपड करताना दिसून येते. तसेच सभोवतालच्या समाजाचे तिच्यावर असणारे दडपण जाणवू लागले. या दडपणातून तिची एक मानसिकता तयार होते. ग्रामीण साहित्यातून व्यक्तिरेखा म्हणून आलेल्या स्त्रीचे भावविश्व तिची मानसिकता पती, कुटुंब, नातेसंबंध, आपली कर्तव्य, मुले याभोवती फिरताना दिसते. या सर्वांमधून आपण बाहेर पडू नाही अशी तिची धारणा होते. तिची घडणच पारंपरिक चौकटीत झालेली आहे. स्त्रीसुद्धा एक माणूस आहे. तिलाही स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. या गोष्टी समाजाकडून सोयीस्करपणे विसरल्या जातात. ग्रामीणजीवनात सण समारंभ उत्सव रूढी परंपरा समजुती प्रथा रीती रिवाज खेळ, श्रद्धा आणि अंधश्रद्धा इत्यादी अधिक महत्त्व असते. त्यांच्या संस्कारातून लोकजीवन घडते. फोटो काढल्याने आयुष्य कमी होते. नवसाने मुले होतात. भूतबाधा होऊ नये म्हणून मुलांना काजळ घालणे या समजुती आहेत. ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याने अंधश्रद्धा जोर धरू लागते आणि त्यातही स्त्रियांच्या बाबतीत हे प्रमाण अधिक जाणवते. ‘मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, नवरा म्हणजे परमेश्वर,’ स्त्रीजन्म म्हणजे मागच्या जन्माचे पाप असे समज ग्रामीण स्त्रीमध्ये बळावलेले दिसतात. सतत ती आधार शोधताना दिसते. ‘रथचक्र’ सारख्या कादंबरी नायिकेला आपला नवरा आधारवड वाटतो. तर ‘एल्गार’ कादंबरीतील नायिका पतीची सेवा परमेश्वर मानून करताना दिसते. या बरोबरच ती संकटांना न घाबरता धीराने परिस्थितीशी झुंज द्यायला तयार असलेली दिसते. ‘राघववेळ’ कादंबरीतील ‘आई’ आपल्याला भावते. अडचणींवर मात करताना अनेक संकटे

येतात पण ती हार मानत नाही. ना.वि.कुलकर्णी यांच्या 'शिपाई' मधील यशवंत व मंजुळाची आई निराबाई ही बाणेदार स्त्री आहे. ग्रामसंस्कृतीतील स्त्रीयांची मर्यादाशीलवृत्ती दिसते. प्रतिष्ठितांसमोर न बसता आदर म्हणून डोक्यावर पदर घेऊन नम्रपणे उभे राहण्याची परंपरा दिसते. ना.धो.महानोर यांच्या 'गांधारी' कादंबरीमध्ये एक वास्तव स्त्रीजीवन येते. यातील नायिकेचा पती नपुंसक आहे. त्यामुळे तो परपुरुषाशी तिला संबंध ठेवण्यास संमती देतो. परंतु तिला ते मान्य होत नाही. यामधून स्त्रिचा स्वाभिमान चित्रित होतो.

र.वा.दिघे यांच्या 'सराई' मधील लाडी तिच्या निस्सिम प्रीतीमुळे अवखळ साहसामुळे अगाध सामंजस्यामुळे वाचकाच्या लक्षात राहते. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' तूनही असेच स्त्रीजीवन चित्रित झालेले आहे. उद्धव शेळके यांच्या 'धग' कादंबरीतील कौतिक असो किंवा रा.रं.बोऱ्हाडे यांच्या 'पाचोळा' तील पारबती असो या दोघीही जीवनातील संकटांशी संघर्ष करताना दिसतात. त्यांच्यामते हा संघर्ष नियतीने आणला आहे. परंतु पुरुषाच्या नाकर्तेपणामुळे हा संघर्ष आला आहे. चि.त्र्यं.खानोलकर यांच्या 'कोंडुरा' कादंबरीतील स्त्री नियती, रूढी, परंपरा, धार्मिकता यामध्ये अडकलेली दिसून येते. विश्वास पाटील यांची 'पांगिरा' यातील राधाई, प्रेमख, सोशीक, कष्टाळू व इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करणारी उपजत शहाणपण लाभलेली तिच्या गोड स्वभावामुळे वाचकांच्या लक्षात राहते. तर बाबाराव मुसळे यांच्या 'हल्या हल्या दुधू दे' कादंबरीतील अनसा आपल्या संसाराची जपणूक करण्याचा अयशस्वी प्रयत्न करताना दिसते. आजारी नवरा मुलीचा मृत्यू खलप्रवृत्ती खुनशी भाऊ सावकार ही सर्व दुःख संकटे एकटी पचविण्याचा प्रयत्न करताना दिसते व शेवटी ती खचलेली दिसते.

आशा बगे यांची 'भूमी' कादंबरीतील मैथिलीच्या माध्यमातून आधुनिक स्त्रीच्या वर्तमान वास्तवाचे चित्रण केले आहे. कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' कादंबरीमध्ये आनंदी ही व्यक्तिरेखा केंद्रस्थानी असून तिचे संघर्षमय जीवन चित्रित केले आहे. रणजीत देसाई यांच्या 'माझा गाव' मधील स्त्री उमा ही घरंदाज खानदानी कन्या आहे. त्यामुळे पतीचे अनैतिक संबंध असतानासुद्धा त्याच्या सुटकेसाठी देवासमोर हात जोडून बसते. अभिषेक करते. यातून तिची पतीनिष्ठा दिसून येते. स्त्रीनागर असो वा ग्रामीण दोन्हीकडे तिचे दुःख एकच आहे. कारण तिची घडणच या पुरुषसत्ताक व्यवस्थेकडे झालेली आहे. याचे चित्रण ग्रामीण साहित्यातून येते.

★★★

# 'दलित आत्मकथनातील स्त्रीजीवन'

उमेश मारुती शिरसट

मराठी साहित्यक्षेत्रात इ.स.१९६० नंतर वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह उदयाला आले. त्यातील दलित आणि ग्रामीण साहित्या प्रवाहाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा आणि ऊर्जा घेऊन दलित साहित्याप्रवाहाने मराठी साहित्यात मोलाची भर घातली. दलित कविता, कथा, कादंबरी ह्यांप्रमाणेच दलित आत्मकथनांनी स्वतःचा ठसा साहित्यक्षेत्रावर उमटविला. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकी व मानसिक दृष्टीने वर्षानुवर्षे ज्या दलित वर्गाचे शोषण झाले, त्या दलित वर्गातील लेखकांच्या आत्मकथनांमुळे मराठी आत्मकथनाचा चेहरामोहरा बदलून गेला. समाजातील शोषणाखाली भरडलेल्या व्यक्तींनी स्वतःचे जगणे, स्वतःचे अनुभव अतिशय मोकळेपणाने आत्मकथनातून मांडले.

इ.स. १९८७ रोजी प्रसिद्ध झालेल्या दया पवार ह्यांच्या 'बलुतं' मुळे हजारो वर्षे कोंडलेला आवाज मोकळा झाला. वेदनेचा हुंकार तळागाळातून वर येऊ लागला आणि एकापाठोपाठ एक धगधगती आत्मकथने साहित्य क्षेत्रात दाखल झाली. त्यात 'आठवणींचे पक्षी' प्र.ई.सोनकांबळे, 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' माधव कोंडविलकर, 'माज्या जल्माची चित्तरकथा' शांताबाई कांबळे, 'जिणं आमुचं' बेबी कांबळे, 'मिटलेली कवाडे' मुक्ता सर्वगोड, 'आदोर' नजुबाई गावीत, 'अक्करमाशी' शरणकुमार लिंबाळे, 'उपरा' लक्ष्मण माने, 'उचल्या' लक्ष्मण गायकवाड, 'बेरड' भीमराव गस्ती, 'कोल्हाट्याचं पोर' किशोर शांताबाई काळे, 'रात्रंदिन आम्हा..' शांताबाई दाणी, 'मरणकळा' जनाबाई गिऱ्हे, 'काट्यावरची पोटं' उत्तम बंडू तुपे, 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' मल्लिका अमर शेख, 'अंतःस्फोट' कुमुद पावडे, 'आमचा बाप अन आम्ही' नरेंद्र जाधव, 'बिराड' अशोक पवार, 'आयदान' उर्मिला पवार इत्यादी आत्मकथने दलित साहित्यात दाखल झाली आणि त्यांनी एक नवे अनुभवविश्व मराठी साहित्याला दिले. त्यामुळे एका उपेक्षित मराठी माणसाचे विशाल जग प्रकट झाले. दलितांना प्रस्थापित समाजव्यवस्थेने शूद्र लेखून त्यांच्यावर पिढ्यान्‌पिढ्या अन्याय-अत्याचार केले. दलितांना सोसाव्या लागणाऱ्या व्यथा, वेदना ह्यांचे चित्रण दलित

आत्मकथनात येते. त्यातही स्त्रीजीवनाचा विचार केला तर असे दिसते की, दलित म्हणून होणारी उपेक्षा आणि स्त्री म्हणून असणारे दुय्यमत्त्व ह्यामुळे तिचे दुहेरी शोषण ह्या आत्मकथनामधून पहायला मिळते.

दलित स्त्री ही समाजव्यवस्थेत भरडली जाणारी, पिळली जाणारी आहे. तरीही ती सतत राबणारी, नवऱ्याच्या सुखात सुख मानणारी, मुलाबाळांची, संसाराची काळजी करणारी, वेळप्रसंगी हिंमतीने उभी राहणारी, दुःख, वेदना सहन करून स्वत्त्व जपण्यासाठी धडपणारी सोशीक मनाची स्त्री आहे. दलित आत्मकथनातील स्त्री अशा वेगवेगळ्या स्वरूपात वाचकांसमोर प्रकट होते. नवरा दारूबाज व बाहेरख्याली असूनही दया पवारांच्या आईने त्याला साथ दिली. नवरा मेल्यावर तिने हिंमतीने आणि कष्टाने आपल्या मुलांना वाढवले. बानू, गऊ वडारीण, सलमा, जमना मावशी ह्या दया पवारांवर प्रेम करणाऱ्या स्त्रिया; परंतु सामाजिक बंधनामुळे त्या मूक राहतात व प्राप्त झालेल्या आयुष्याला सामोरे जातात.

'बलुतं' मधील साऱ्या स्त्रिया विविध स्तरावरच्या व्यथा, वेदना भोगत जगणाऱ्या आहेत. उपराकार लक्ष्मण मानेंची आई भटकणाऱ्या कैकाडी जमातीची आहे. ती मुलांसाठी शिळेपाके मागून आणते, नवऱ्याच्या कामात मदत करते. मुलगा शिकावा म्हणून धडपडते. ह्यातून दलित स्त्रीचे मातृप्रेम प्रकट झाले आहे. त्याचप्रमाणे देखणेपणामुळे झालेली तिची उपेक्षा आणि ओढावलेले संकट पारूमामी व्यक्त करते, ''लई कळा सोसल्या... लांडग्यांनी सोडली न्हाय. देह्याच फुटाणं झाल!'' ह्यामधून दलित स्त्रीवर होणारे अन्याय-अत्याचार चित्रित होतात. 'उपरा' मधील जातपंचायतीतील स्त्री म्हणजे जणू एक गहाण ठेवायची, आर्थिक व्यवहारातील वस्तू अशी मानलेली दिसते. गहाण ठेवणारा म्हणतो, 'माझी बायको धर्म्याकडं चार वर्षे झाली गहाण ठेवलीया. त्यानं पन्नास रूपये पाच वेळा दिले. मी चार वर्षात मागारी देतू म्हणाला. आता मी पैसं देतूया. पर ह्यो माझी बायको माघारी दीना झालाय.' ह्यामधून स्त्रीचं मन, शरीर, शरीरातील वासना, तिचं मातृत्त्व ह्यांना कवडीइतकीही किंमत नसलेली दिसते. परजातीची म्हणून दुःख भोगणारी, अव्हेरली जाणारी लक्ष्मण मानेंची पत्नी शशी स्वतःच्या जीवनातल हलाहल पचवून मानेंना खंबीरपणे आधार देते.

'अक्करमाशी' मध्ये वेश्यागत जीवन जगणारी, दारू विकून पोट भरणारी आणि डझणावारी मुलांना जन्म देणारी मसामाय भेटते. त्याचप्रमाणे चंदामाय,

संतामाय अशा समाजव्यवस्थेच्या बळी ठरलेल्या दुर्दैवी स्त्रिया भेटतात. 'उचल्या' मधील लक्ष्मण गायकवाडांची माय गरिबी आणि अंधश्रद्धेमुळे मरते. त्याचप्रमाणे भावजयीच्या सांगण्यावरून व संशयामुळे स्वतः लेखक पत्नीला बोरीच्या फोकाने मारतो. त्यामुळे दलित स्त्रीला समाजात आणि कुटुंबातही असुरक्षितता वाटते. 'कोल्ह्याट्याचं पोर' मध्ये किशोर काळे ह्यांची कलावंत आई सोनपेठच्या कृष्णराव वडकर यांची रखेल म्हणून राहते. या आत्मकथनातील चिरा उतरवणे ह्यासारख्या प्रथेमधून समाजाच्या ढोंगी आणि कातडीबचाव धोरणाचे दर्शन घडते. दलितांचे जीवन आधीच कष्टमय, दुःखमय, यातनामय, यातही दलित स्त्रीचं दुःख अधिक तीव्रपणे या आत्मकथनात मांडले आहे. त्याचप्रमाणे 'बिराड', 'काट्यावरची पोटं', 'आमचा बाप अन् आम्ही' या आत्मकथनांमधून दलित स्त्रीची कथा आणि व्यथा रेखाटली आहे.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्रीजीवन वेदनेने आणि करूणेने ओथंबलेले आहे. हे स्त्रीजीवन अस्पृश्य समाजातील आहे. दारिद्र्य, भूक, अज्ञान ह्याने वेढलेले आहे. नरकयातना भोगणारी स्त्री ही दलितांहून दलित आहे. कारणा ती उच्चवर्णीय समाजाकडून धिक्कारली गेली आहे आणि स्वसमाजातील पुरुषवर्गाकडून पिळली गेली आहे. तिचे शोषण शारीरिक आणि मानसिक स्वरूपाचे आहे. 'माज्या जल्माची चित्तरकथा' मध्ये बांगड्या भरताना विटाळ होतो म्हणून कासारीन घोंगडी नेसते. विहीर विटाळेल म्हणून गोसावीण दलित स्त्रियांना पाणी भरायला नकार देते. यामधून दलित स्त्रीचे सामाजिक खच्चीकरण केलेले आढळते. शांताबाई कृष्णाजी कांबळे यांचे पती शिक्षक असूनही त्यांना न कळवता दुसरी बायको करतात; परंतु शांताबाई न डगमगता स्वावलंबनाने ताठ उभे राहणाऱ्या स्त्रीचे प्रतिनिधित्व करतात. 'जिणं आमुचं' मध्ये स्त्रीच स्त्रीची शत्रू असल्याचा प्रत्यय येतो. सासू सुनेचा छळ करताना म्हणते, ''आग, तुझी आय गरतीन हाय का गाढवं वळती कुंबाराची? लिकीला काम शिकवल का? व्हायच तुजा लाड केला तर नुसती डोक्यावर मिऱ्या वाटाव लागलीयास तरी दुसऱ्याच्या सासूगत मी नव्ह, आगं माजी सासू तर नुसती आग व्हती. हातावर इंगळू धरवल पण तिला धरवत नव्हत.'' दलित स्त्रीचे, स्त्रीत्त्व आणि दलितत्त्व हे दोन घटक शोषणास कारणीभूत ठरतात.

स्त्रीत्त्वामुळे ती पुरुषप्रधानतेची बळी ठरते, तर दलितत्त्वामुळे ती जातिव्यवस्थेची शिकार होते. तिचे कुटुंबातील स्थान देखील दुय्यम प्रतीचे आहे.

ह्याचा प्रत्यय दलित आत्मकथनामधून ठायीठायी येताना दिसतो. 'मरणकळा' मध्ये जनाबाईच्या आईला मुलगा होत नाही म्हणून तिची काळजी घेतली जात नाही. जनाबाई लिहितात, ''मायला आता कोणीच घरात बरं बघत नव्हतं आनं मलाबी मनायचे, 'सपाट पाठीची, हिच्या पाठीवर लेकरू बाळ काय हुत न्हाय' आनं आमच्या दोघानलाबी कोणी बरं बघत नव्हतं'' जनाबाई ह्या 'मरणकळा' मधून गोपाळ समाजाचे प्रतिनिधित्व करतात. गोपाळ समाजात स्त्रियांनी शिक्षण संपादन करणे हे परंपराविरोधी मानले जाते.

ह्या संकेताचा फटका जनाबाई आणि तिच्या कुटुंबियांना बसला. सामाजिक बहिष्काराच्या होरपळीत हे कुटुंब भाजून निघाले; तरीही जनाबाईने जिद्द सोडली नाही आणि शिक्षण पूर्ण केले. महत्त्वाकांक्षी, ध्येयवादी जनाबाई रूढिग्रस्त समाजाशी संघर्ष करते. गोपाळ समाजातील अंधाऱ्या जीवनात पिचत पडलेल्या स्त्रियांचा संघर्षशील हुंकार म्हणूनच जनाबाईची प्रतिमा समोर येते. शांताबाई दाणींच्या 'रात्रंदिन आम्हा' ह्या आत्मकथनातून दिसणारे दलित स्त्रीजीवन दारिद्र्याने ग्रासलेले आहे. 'अंतःस्फोट' मधील आयुष्यभर माहेरी राहिलेल्या मायबाई पुढच्या जन्मी तरी नवऱ्याला अक्कल येईल म्हणून सावित्रीव्रतासारखी व्रतवैकल्ये करते. यामधून दलित स्त्रीची अंधश्रद्धा अधोरेखित होते. 'आयदान' मधून दलित स्त्रीच्या व्यथा, वेदना, संवेदना यांचे अनेक पदर उलगडत जातात. लेखिकेच्या बालसुलभ मनाला मिळालेली अस्पृश्यतेची वागणूक हृदय पिळवटून टाकते. लेखिकेची आई जेव्हा तिला काम सांगते, तेव्हा उर्मिला पवार लिहितात. '' कुणा गिऱ्हाईकानं सांगितलेलं आयदान त्याच्या घरी पाठवायचं असेल तेव्हा 'धकट्या...?' अशी मला लाडकी हाक मारायची. ती हाक ऐकली की, मी समजायची. मला ते काम करायला मुळीच आवडत नसे. कारण काही जणांच्या घरातली माणसं मला दाराबाहेर उभं करायची. मी नेलेलं आयदान खाली ठेवायला लावून त्यावर वरून पाणी शिंपडायची आणि मगच, ती उचलून माझ्या हातावर वरून पैसे टाकायची. माझ्या हाताला हात लागून त्यांचा हात जळणार होता की काय कुणास ठाऊक?'' लेखिकेला पडलेला हा प्रश्न समाजव्यवस्थेवर अचूक बोट ठेवतो. बेबी आणि सईदा या मुस्लीम मैत्रिणी लेखिका अस्पृश्य असल्याचे कळल्यावर तिच्याशी परक्यासारखं वागू लागतात, ही गोष्ट लेखिकेच्या जिव्हारी लागते. आत्मकथनातील या प्रसंगामुळे लेखिकेची घुसमट, गुदमरलेपण प्रकट होते. एकूणच 'दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून जे दलित जीवन अधोरेखित

झाले आहे, त्यातील स्त्रीचे जीवन अधिकच शोषित, पीडित स्वरूपाचे आहे.' हे डॉ.मनोहर जाधव यांचे मूल्यमापन व्यवस्थेवर कोरडे ओढणारे आहे.

**सारांश,** दलित आत्मकथनातील स्त्री एका बाजूला समाजव्यवस्थेची बळी ठरलेली आहे, तर दुसऱ्या बाजूला स्त्रीत्त्वाचे दुय्यमत्त्व स्वीकारूनही ती खंबीरपणे उभी राहताना दिसते. उपेक्षा, वेदना, छळ वाट्याला येऊनही ती आपल्या कुटुंबाचा आधारस्तंभ म्हणून उभी राहते. वेळप्रसंगी स्वतः आयुष्य झिजवून मुलांना शिक्षणाचा नवा क्रांतिमार्ग दाखवते, तर कधी नवऱ्याच्या कामात मदत करून त्याचा आधार बनते. डॉ.आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन दलित स्त्री आपल्या जीवनात परिवर्तन घडवू पाहते आहे. परिस्थितीला शरण न जाता त्याच्याशी दोन हात करण्याचे तत्त्वज्ञान ती आपल्या आयुष्यात रुजवू पाहत आहे. एकूणच दलित आत्मकथनातील स्त्रीजीवनातून समाजव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे करून दलित आणि स्त्रीत्त्व या दुहेरी शोषणाचे सर्वंकष चित्रण केल्यामुळे मराठी साहित्यातील स्त्रीजीवन चित्रणाचे क्षितीज विस्तारित झाले आहे.

★★★

# स्त्री लेखिकांच्या कादंबरी लेखनाचा अभाव

**डॉ.गुंफा कोकाटे**

सुमारे अडिच हजार वर्षांपूर्वी ज्यांनी स्त्री पुरुष समतेचा विचार मांडणारे भगवान बुद्ध. 'स्त्रीजातीच्या मुक्तीसाठी आले महात्मा फुले गं, आले महात्मा फुले मुलींचे शिक्षण केलेले खुले गं' असे क्रांतिसूर्य महात्मा फुले, क्रांतिशीला सावित्रीबाई फुले, शारदा कोड बील ॲक्ट देऊन स्त्रियांचा उद्धार करणारे घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाने स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचे हक्क प्राप्त झाले स्त्रियांचा उपेक्षित समूह जागृत झाला.

बदलत्या काळाची नोंद घेत स्त्रिया विविध प्रकारचे वाङ्मय लेखन करू लागल्या त्यात कादंबरी लेखनात स्त्रियांचा उदंड उत्साह दिसतो. इ.स. १८५७ ते १९५० या कालखंडातील लेखिकांनी अद्भूतरम्य, ऐतिहासिक, सामाजिक, भाषांतरीत अशा अनेक प्रकारच्या कादंबऱ्या लिहिल्या. एकत्र कुटुंब पद्धती, स्त्रियांची अगतिकता या लेखनातून व्यक्त झाल्या. अन्याय सहन करणारी, विविध रूढी परंपरा जपणारी स्त्री या कादंबऱ्यांतून व्यक्त होते. केवळ वाचकांचे मनोरंजन व्हावे या दृष्टिकोनातूनही त्या काळातील लेखिकांनी फडके खांडेकरप्रणीत कादंबरी लेखन केले हे ही नाकारून चालणार नाही. या कालखंडात ३ अद्भूत रम्य, ९ ऐतिहासिक व १२ भाषांतरित आणि ७६ समाजिक अशा १०० कादंबऱ्या लेखिकांनी लिहिल्या आहेत. साळुबाई तांबवेकर यांनी १८७६ मध्ये चंद्रप्रभाविरहवर्णन ही कादंबरी लिहून स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा पाया भक्कम केला. मिसेस गुलेन्स यांची फुलमुन आणि करूणा ही कादंबरी १८५९ मध्ये प्रसिद्ध झाली. सरस्वतीबाई भिडे यांनी १९०९ मध्ये सरोजिनी कादंबरी लिहून पहिली भाषांतरीत कादंबरी लिहिली. वसईचा वेढा १९१२– अनुसया देशपांडे, दैवलीला १९११– इंदिराबाई हरिपूरकर, सुशिला– जोशी दुर्गाबाई, शांता शेळके– कोजागिरी १९१७ विभावरी शिरूरकर– विरलेले स्वप्न १९३५ असे कादंबरी लेखन झाले. काशिबाई कानिटकर– रंगराव, १९०३ ही स्त्री लेखिकांची पहिली सामाजिक कादंबरी मानली गेली.

माझं बाळ ते!– पिरोजबाई आनंदकर, मुकनायिका, जानकीबाई देसाई केवळ ध्येयासाठी–इंदिरा सहस्त्रबुद्धे अशा अनेक कादंबऱ्या आल्या. जवळजवळ या सर्व कादंबऱ्या बोधप्रधान होत्या. मुळात स्त्री लेखिकांच्या लेखनाची सुरूवात

अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांनी झाली हे मान्य करावे लागते. १८५९ ते १८९४ या काळात लेखिकांनी वसईचा वेढा, १९१२, ताजमहाल १९३१, शकुनी मोहर १९३२, चितोडचा चंद्र १९३६ अशा नऊ ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. १८५७ ते १९४७ या काळात १२ भाषांतरीत कादंबऱ्या स्त्री लेखिकांनी लिहिल्या. मिसेस मुलेन्स यांनी फुलमुनी आणि करूणा १८५९, सरस्वती भिडे- सरोजिनी १९०९, कमलाबाई किवे-राजकुमारी १९१२, गजरा भोसले राजे-दुर्दैवी इंदिरा १९१९, जानकीबाई देसाई यांची चारूगात्री, इंदिरा सहस्त्रबुद्धे- केवळ ध्येयासाठी १९२४, कमल दिक्षित-निष्कलंक १९३९, रत्नप्रभा रणदिवे-दिव्यचक्षू १९३६, पूर्णिमा, छायानट, मालती चोळकर-चित्रलेखा १९४६, विलासिनी-अविवाहित पतिव्रता १९४७ या कादंबऱ्या लिहून स्त्री लेखिकांनी आपले परप्रांतीय परक्या भाषेविषयीची जिज्ञासा व्यक्त केली. तर २० सामाजिक कादंबऱ्या लिहून स्त्री लेखिकांनी स्त्री शिक्षण, कुटुंबजीवन, आचार विचार, रूढी परंपरा, हुंडा पद्धती, बालविवाह, जरठविवाह, पूनर्विवाह, अशा अनेक सामाजिक समस्येवर लेखन केलेले आहे. १९३६ ते १९४७ या काळात ४७ सामाजिक कादंबऱ्या लिहून स्त्री लेखिकांनी कादंबरी दालन समृद्ध केलेले दिसते.

१९२० ते १९३५ या कालखंडता जानकीबाई देसाई, काशीबाई कानिटकर, यशोदाबाई भट, कमला सोहोनी, शांता नाशिककर, पिरोजबाई आनंदकर, कमला बम्बेवाले, अन्नपूर्णा सुगवेकर, इंदिराबाई आंबेगावकर, आनंदीबाई जयवंत, विभावरी शिरूरकर या लेखिकांनी कादंबरी लेखन करून मराठी कादंबरी वाङ्‌मयात मोलाची भर घातली. त्यात जानकीबाई देसाई यांच्या पत्नीव्रताची कसोटी आणि अघोपातक, यशोदाबाई भट-मुलांचे बंड, राजमाता जिजाबाई, पद्मावती लोहगावकर-संधीप्रकाश, पिरोजबाई आनंदकर-माझं बळ ते, काशीबाई कानिटकर-पालखीचा गोंडा, शांता नाशिककर-लग्नाचा बाजार, हाच का धर्म, कमला बम्बेवाले-बंधमुक्ता, इंदिराबाई आंबेगावकर-उजळलेला हिरा, विभावरील शिरूरकर-हिंदोळ्यावर, कुमुदिनी प्रभावळकर-अनियमित जग, निर्माल्यातील कळी अशा अनेक कादंबऱ्यांमधून स्त्रियांच्या भावनिक आंदोलनाचे प्रतिबिंब दिसते.

१९३६ ते १९४७ या कालखंडात स्त्रियांचे कादंबरी दालन समृद्ध दिसते. आनंदीबाई जयवंत-उर्मिला, उषादेवी-गोड स्वप्न, गीता साने-निखळलेली हिरकणी, वाळलेला वृक्ष, लतिका फेरीवाला- धुके आणि दहिरव, दीपस्तंभ या कादंबऱ्यांतून स्त्री प्रश्न मांडले. कुमुदिनी प्रभावळकर-एकेरी गाठ, कुस्करलेलं

हृदय, रस्सीखेच, कल्पना, विरलेलं वस्त्र या कादंबऱ्यांमधून स्त्री जीवन सूक्ष्म निरीक्षण मांडले. इंदिरा पेंडसे-ललिता, वादळापूर्वी, चिखलातले कमळ, किर्ती, माझी कोरीव लेणी या कादंबरी स्त्रीजीवन व वैयक्तिक स्वातंत्र्य हे प्रश्न हाताळले. मालतीबाई दांडेकर-मातृमंदिर, तेजस्विनी, कृष्णरजनी यातून परितक्त्यांचे जीवन व्यक्त केले. १९५० नंतर विभावरी शिरूरकरांची बळी ही कादंबरी प्रसिद्ध आहे. नयना आचार्य, शैलजा राजे, ज्योत्स्ना देवधर, कुसुम अभ्यंकर, शंकुतला गोगरे, लीला श्रीवास्तव यांनी मध्यमवर्गीय स्त्रीचे चित्रण केले. १९७० नंतर स्त्रियांच्या कार्दबरी लेखनाला उधाण आले. नयना आचार्य, कुसुम अभ्यंकर यांनी १० वर्षात २५ कादंबऱ्या लिहिण्याचे विक्रम केले आहेत व त्यातून स्त्री अनुभव व्यक्त केलेले आहेत. हे लेखन निर्मितीची घाई, उपदेशप्रियता, भावविवशतेतून झालेले दिसते. याच काळात योगिनी जोगळेकर, गिरीजा किर लेखन करताना दिसतात. बहुसंख्य स्त्रिया प्रेमकथा रचण्यातच गुंतून गेलेल्या दिसतात. हिंदोळा-मंदाकिनी भारद्वाज, हरवले ते गवसले, जळला नंदादिप-सुमन भडभडे यासारख्या अनेक लेखिकांनी फडके खांडेकरप्रणीत लेखन केले. सुमती क्षेत्रमाडे यांची आधार, महाश्वेता, यमुना शेवडे पूर्णाहुती-शांता निसळ यांची वेगळेजग, सुलोचना देशमुख-काचापाणी १९७० अशा अनेक कादंबऱ्यांनी स्त्री मनाचा शोध घेतला.

१९७० ते २०१० या कालखंडात कमल देसाई-रात्रंदिन, आम्हा युद्धाचा प्रसंग, काळा सूर्य, हॅट घालणारी बाई या कादंबऱ्यांतून जीवनाच्या उद्ध्वस्तपणाचा अनुभव दिला. सानिया-स्थलांतर, अवकाश आवर्तन या कादंबऱ्यांनी स्त्री पुरुष संबंधाचे चित्रण केले. त्यांच्या समकालीन आशा बगे, गौरी देशपांडे, रेखा बैजल, प्रिया तेंडूलकर यांनी स्त्री स्वातंत्र्य स्त्रीसमता, स्त्री पुरुष मानसिकतेचे अचूक दर्शन घडविले. वीणा पाटील, लीलावती साठे, नजुबाई गावित-भिवा फरारी. कविता महाजन- ब्र नंतर, भिन्न, शांता गोखले- रिटा वेलीनकर.

१९५७ ते २०१० या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा विचार महत्त्वाचा वाटतो. मध्यमवर्गीय कुटुंब, स्त्रीमन, स्त्री दुःख स्त्रीसुलभ भावनांची आंदोलने या स्त्री लेखिकांनी टिपली. स्त्रियांच्या वाट्याला आलेली उपेक्षा, अवहेलना त्यांनी लेखनात मांडली. या स्त्री लेखिकांनी कादंबरी लेखनाच्या तंत्रात अनेक प्रयोग केले. कधी सरळ निवेदन कधी आत्मनिवेदन कधी पात्रमुक्त निवेदन आपल्याला दिसते. कधी वर्णने पाल्हाळीक होतात. तरी कधी उपमा दृष्टांताची रेलचेल केल्याचे दिसते.

अभाव– या स्त्री लेखिकांचे अनुभव विश्व मर्यादित होते. जीवन संकुचित परिप्रेक्ष्यातले होते. त्यांच्या जीवनात बंदिस्तपणा, अगतिकता व पराधीनता होती. पण तरीही त्यांनी जे अनुभवलं ते मोठ्या अनुभूतीने मांडले. तरीही कादंबरी लेखनात त्रुटी आहेतच. कारण या लेखिकांनी ग्रामीण दलित प्रादेशिक किंवा निखळ राजकीय कादंबरी लेखन केलेले नाही. कदाचित मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रीजीवन स्त्रीजीवनातल्या समस्या, प्रश्न, ती प्रश्न निर्माण होण्याची कारणे. यावरच लेखिकांनी आपले लक्ष दिले असल्याने त्यांचे ग्रामीण दलित कांदबरी लेखनाकडे लक्ष गेले नाही. त्यांच्या संकुचित परिघाच्या कक्षेत हा ग्रामीण, दलितचा परिसर आलाच नाही.

**समारोप,** या स्त्री लेखिकांनी सामाजिक जाचक रूढी मांडल्या. हिंदू कायद्याचा कठोरपणा नजरेस आणून दिला. स्त्रीमनाचा सूक्ष्मपणे विचार मांडला. स्त्रीच्या दुःखाचा शोध घेतला. स्त्री पुरुष संबंध, त्यांची मानसिकता टिपण्याचे धाडस दाखविले त्यामुळे स्त्री लेखिकेच्या या योगदानाचे स्मरण राहो म्हणजे आहे. हे ही नसे थोडके या उक्तीप्रमाणे स्त्री लेखिकांचे कादंबरीलेखन आहे. निर्मितीची घाई, चिंतनचा अभाव व्यक्त करतो. स्त्रियांनी आपला अनुभवविश्वाच्या परिप्रेक्ष्य व्यापक केला पाहिजे. आपले कादंबरी लेखनाचे लेखनादर्श बदलेले पाहिजेत. आपल्या अवतीभोवती जे घडते आहे. ज्या गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतात त्यांचे भान ठेवणे आवश्यक आहे. चूल, मूल अर्थाजन या जबाबदाऱ्यांनी तिची घुसमट वाढली आहे. जगण्याची मूल्य बदलली आहे. ग्रामीण दलित साहित्याचा परिघ व्यापक होतो आहे. याची जाणीव ठेवून स्त्री लेखिकांनी आपल्या कादंबरी लेखनाची दिशा ठरवली पाहिजे. आपल्या जगण्यातला अर्थ शोधताना स्वत्त्वाचे भान ठेवून स्त्री लेखिका ग्रामीण दलित स्त्रीवादी आदिवासी अशा विविध वाङ्मय प्रवाहात येऊन लेखन करतील असा आशावाद वाटतो. अनुकरणाऱ्या बोधप्रियतेच्या व मनोरंजनाच्या पठडीतून बाहे पडून कादंबरी लेखनाच्या मुक्त प्रांगणी येऊन आत्मशोधाचा लेखन करतील अशी खात्री आहे.

★★★

# 'ग्रामीण दलित कादंबरीतील स्त्री चित्रण'

डॉ.सुनिता देशमुख

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान आहे. पुरुष हा कुटुंबाचा प्रधान घटक मांडला जातो. कुटुंबातील सदस्य एकमेकांसाठी झटत असतात. आधार देत असतात. त्यामध्ये स्त्री ही कुटुंबातील महत्त्वाची व्यक्ती असते. ग्रामीण स्त्री असो किंवा दलित स्त्री असो ती आपल्या कुटुबांसाठी सतत काबाड कष्ट करते. ती कन्या, बहिण, सुन, पत्नी, आई, सासू, आजी अशा अनेक नात्यांनी कुटुंबाशी बांधलेली असते. ग्रामीण भागात या नात्यांना, भूमिकांना आजही महत्त्वपूर्ण स्थान आहे. याचे भान ठेवून ग्रामीण कादंबऱ्यांतून स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. या कादंबऱ्या पुढीलप्रमाणे यशोदा, गारंबीची राधा, एक होती आजी, रथचक्र, शितू, पडघवली, बनगरवाडी, गोतावळा, माऊली, धम, अगतिकता, पाचोळा, आमदार सौभाग्यवती इ.

प्रत्येक ग्रामीण कादंबरीत स्त्रीचित्रण येत असतेच परंतु प्रामुख्याने स्त्रीपात्रांवर अधिक भर दिलेल्या काही कादंबऱ्यांचा अभ्यास येथे केला आहे. सर्व कादंबऱ्यांचा अभ्यास येथे शक्य नाही. वरील सर्व कादंबऱ्यांमधून आलेली स्त्री ही माता-पिता, पती-पत्नी, लेकी-सुना, मुले, आश्रीत इ. नातेसंबंध सांभाळणारी आहे. त्याचबरोबर धर्म, संस्कृती, रूढी, परंपरा, वारसा, सामाजिक गरजा इत्यादींबरोबरच धार्मिक, सामाजिक व आर्थिक हितसंबंध जपणारी आहे.

ग्रामीण कादंबरीतील स्त्रियांच्या समस्या, स्त्रीचे असणारे दुय्यम स्थान, तिला करावे लागणारे कष्ट, जीवन जगत असताना तिचे होणार हाल, जीवनातील संघर्ष, शिक्षणासाठीचा संघर्ष, व्रतवैकल्य, पुजाविधी, राजकारण, तिचा भाबडेपणा, जिद्द, भूक, दारिद्र्य, दुष्काळ, कुटुंबात, समाजात तिची होणारी घुसमट, शारीरिक व मानसिक त्रास, कुटुंबाकडून दुखावल्या तिच्या भावभावना, तिच्या व्यथा, तिच्या वेदना, पुरुषी अहंकार, या सर्वांचा तिला होणारा त्रास आणि त्यातून दिसणारे ग्रामीण स्त्रीचे चित्रण कादंबऱ्यांतून दिसून येते.

## ग्रामीण कादंबरीबरोबरच दलित कादंबरीमधील स्त्रीचित्रण:-

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असते. सुशिक्षित, सुसंस्कृत

घरात आजही स्त्रीचे शोषण होते. मग ती स्त्री ग्रामीण साहित्यातील असो किंवा दलित साहित्यातील असो. दलित स्त्रीचे मात्र दुहेरी शोषण होते. एक तिच्या समाजातील लोकांकडून आणि दुसरे प्रस्थापित समाजाकडूनही शोषण होते. तरीही ती आपल्या कुटुंबासाठी कष्ट उपसत असते. सगळ्या परिस्थितीमध्ये पिचून गेलेली दलित स्त्री अनेक भूमिका पार पाडत असते. केव्हा कुटुंबवत्सल असते तर केव्हा आक्रमक भूमिका पार पाडत असते. केव्हा परंपरेला छेद देऊन स्त्री जन्म नाकारते तर केव्हा परिस्थितीला शरण जाते. काही वेळा कुटुंबासाठी कुटुंबप्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडते. काही वेळा प्रस्थापित परंपरा आणि संस्कृती लाथडताना दिसते. या सर्व भूमिका पार पाडणारी सामर्थ्यशाली स्त्री कुटुंबाचा उद्धार करते.

दलित कादंबरीमध्ये स्त्री एक उपभोग्य वस्तू आहे. ती गुलाग आहे. तिला स्वतःचे अस्तित्व नाही. कारण ती अडाणी, अशिक्षित आहे. दारिद्र्य, भूक याला बळी पडलेल्या मुली दिसायला सुंदर असतात. अशा गरजु मुलींची फसवणुक करून, मुंबईला रवानगी होते. ही फसवणुक कधी नात्यातली माणसे करता तर कधी ओळखीची माणसे करतात. पैशाच्या पाठीमागे लागलेला लाचार माणूस स्वतःच्याच नात्यातल्या नाडलेल्या, अगतिक स्त्रियांची, मुंबईच्या बाजारात विक्री करत होता. त्यातून नराधम दलाल पैसे कमवित होते. जीवाच्या मोलाने अब्रू जपणाऱ्या महाराष्ट्रातील गरीब स्त्रीची अब्रू कवडीमोलाने मुंबईशहरात लुटली, लुटवली जात होती. वासना, मोह, साथ, लाचारी, भूक, असहाय्यतेचा भपकेबाजपणा, मुंबापुरीच्या क्रूर कराल मागणीस गरीब, बिचाऱ्या स्त्रिला नाडवले जात हातो. तिचे पावित्र्य, स्वप्ने, अपेक्षा, कौमार्या, चारित्र्य, भग्न केले जात होते. अशा प्रकारे दलित स्त्रीचे चित्रण कादंबरीतून दिसून येते.

दलित कादंबरीत स्त्रियांना त्रास देणारा, स्त्रिला रस्त्यार आणणारा, त्यांना वाईट मार्गावर आणणारा, स्त्रिला उद्ध्वस्त करणारा, आयुष्यातून उठवणारा, जमीनदार, इनामदार, पाटील, सरपंच आदी सवर्णीय बलाढ्य शक्ती वर्ग होता. हे लोक दलित समाजातील स्त्री, गरीब घरातील सुंदर स्त्री यांना आपली स्वतःची मालमत्ता समजत असे. बापाची जागीर्द समजत असे. अजूनही बऱ्याच ठिकाणी हे चित्रण पहावयास मिळते.

दलित कादंबरीत प्रामुख्याने देवदासी, जोगतीण, मुरळी, नोकरी करणाऱ्या स्त्रीया, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीया, हरिजन, चर्मकार, मातंग समाजातील

स्त्रियांच्या दुःखाचे दारिद्र्याचे कारुण्यपूर्ण चित्रण आले आहे.

कष्टाच्या ढिगाऱ्याखाली पिचलेले स्त्री दलित स्त्री, तिला सतत कष्टच उपसावे लागतात. दारिद्र्य, लाचारी, गुलामी आणि परिश्रम, अवहेलना त्याच्या पाचवीलाच पुजलेल्या असतात. अशा दलित स्त्रिया, आत्मिक बल, कमालीची जिद्द, चिवटपणा आणि जगण्याची उमेद यातूनच जीनातील दुर्दैव, भोग दूर करण्याचे प्रयत्न करतात. दलित स्त्रीया त्चिया संसाराची आणि कुटुंबाची भ्रांत असते. ही स्त्री आपल्या संसाराभोवती केंद्रीय असलेली दिसते. हे चित्रण चित्रा, चंदन, चिखलातले कमळ, सूड, झुलवा, खाई, खुळी, ७२ मैल, नापत, गिधाडं, कसरत, फिपुली, चक्री, जंगल, उपेक्षिता, या कादंबऱ्यांमधून दिसून येते.

★★★

# ‘स्त्री’ गीतातील पंढरपूरचा विठ्ठल

प्रा.डॉ.लता महाजन

**प्रस्तावना**

स्त्री गीते हा आपल्या साहित्यातील एक अनमोल ठेवा आहे. कष्टाची काम करता करता स्त्री चा दिवस जायचा आणि तरीही कामे उरायचीच. परंतु देवाचं नाव घेत घेत ती शेवटपर्यंत उत्साह टिकवून ठेवायची.

स्त्री मध्ये सहनशक्ती, नवनिर्मिती आहे. स्त्री या शब्दाची उत्पत्ती स्त्रोत, स्त्राव, सतरी–एतरी–स्त्री अशी दर्शविलेली आहे. स्त्रावाने निर्मिती करायची क्षमताच नव्हे तर अशी निर्मिती करण्यासाठी शरीररचना असलेली व्यक्ती म्हणजे स्त्री होय. ऋग्वेदातील स्त्रीचा अर्थ सूत्री म्हणजे जन्मदायी असा दिलेला आहे. वंशाचे सूत्र जुळवून जन्म देणारी ती जन्मदात्री. व्युत्पत्तिकोशातील स्त्रयैविस्तार याचा अर्थ जन्माचा विस्तार करणारी ‘विस्तरी’म्हणजे स्त्री. तिच्यासाठी ‘आकमसा’ असाही शब्द योजलेला आहे. तिच्या इंद्रियाकडून मिळणारी संवेदना काम पूर्ती पेक्षाही स्वाभाविक पतिसुख व अपत्यसुख मिळविण्याच्या संबंधी असते. या दृष्टीने तिच्यासाठी ‘अकामसा’ असा शब्द योजला असावा.

अशीही स्त्री आपल्या कुटुंबात रमते,श्रमते मुलाबाळांना मोठे करते स्वतः झिजते, इतरांना सुख देते. आणि या रामरगाडयातला तिचा विसावा म्हणजे देव. त्यातही विठ्ठल. विठ्ठलाच्या वारीला जाण्यानी इच्छा असते पण घरच्या मंडळींचा विरोध असतो तेव्हा ती म्हणते ....

‘पंढरपूरला जायचं आवंदा नव्हतं माझं मन ।
माझ्या विठ्ठलानी चिठ्ठया पनीवल्या दोन ।

म्हणजे मलाही काही जायचं नव्हतं पण आता विठ्ठलाने चिठ्ठी पाठविल्यामुळे मला जावचं लागणार आहे असं सुचवते आणि आपल्या वारीचा मार्ग मोकळा करते. विठ्ठलाचं नाव घेत घेत पंढरीनी पाऊलवाट सोपी होते मनमोकळं होतं. व्यथांना विराम मिळतो आणि खऱ्या अर्थाने ती प्रसन्न होते.
श्री क्षेत्र पंढरीच्या वारीतील ‘स्त्री ’गीतांना

परंपरेने खूप जुना वारसा लाभला आहे. हा वारसा टिकविण्यात वारी सारख्या परंपरेने ही मोठाच हातभार लावला. वारीच्या वाटेवर वारकऱ्यांच्या

माध्यमातून 'स्त्री' गीतांचा प्रवास पिढयान् पिढया जतन करण्यात येतो. त्यात भरही पडते. वारीमध्ये ठिकठिकाणी महिला वारकऱ्यांच्या गटांध्ये पारंपरिक अभंग भजनासह भारुड आणि लोकगीतेही सादर केली जातात. वारकरी स्त्रिया डोक्यावर तुळशीवृंदावन, पाण्याची घागर, विठ्ठलाची मूर्ती, ज्ञानेश्वर-तुकाराम व इतर संतांच्या मूर्ती, प्रतिमा घेऊन पायी वाटचाल करतात व

माउली, माउली..........तू संतांनी साउली

दारी तुळस लावावी, पुण्य संपादनी करावी....

असे म्हणतात.

पंढरपूरचा पांडुरंग-विठ्ठल आणि त्यांच्याबरोबर असणारी जनाबाई, नामदेव, कान्होपात्रा या सर्वाबद्दल आदरभाव या ओव्यामंध्ये दिसून येतो. स्वतःनी सुखदुःखे ती विठ्ठल रखुमाईत पाहतो. तिच्या मनात येणाऱ्या प्रश्नांना तीच उत्तरेही देते. अठ्ठावीस युगे उभा राहणारा हा पांडुरंग किती दमला असेल ? उभे राहून त्याचे पाय दुखत नसतील कां ? असा विचारही तिच्या मनाला शिवून जातो.

विटेवरी विठ्ठल युग झाले अठ्ठावीस ।

पांडुरंगाला ग माझ्या कुणी म्हणंना खाली बस ।।

या माझ्या विठ्ठलाला अठ्ठावीस युगे उभे राहून झाली आहे. त्याला कोणीही 'खाली बस' असे सांगत नाही याचेही तिला वाईट वाटते यातून तिचे विठ्ठलावरचे प्रेम दिसून येते.

विठ्ठल विठ्ठल गजर करीत पालखी पुढे सरकते तिची प्रतिभा शक्तीही फुलत असते.

'इथून दिसतीच पंढरी लाल लाल

सोन्याच्या सुपात रखमा पाखडी गुलाल '

पंढरपूरचं चित्रं मनात ठसवलेलं असतं. पंढरी लाल लाल का दिसते आहे ? कारण सुपात गुलाल पाखडणारी ही रुक्मिणी आहे. दळण,कांडण,पाखडणं ही कामे स्त्रीलाच करावी लागतात. आणि म्हणूनच ती रुक्मिणीतही स्त्रीला पाहजे फक्त ती विठ्ठलानी राणी आहे म्हणून गुलाल पाखडते आहे.

पंढरीच्या विठ्ठलाला तुळस आवडते. त्यामुळे प्रत्येकाच्या दारात तुळस असतेच. रोज देवपूजा तसेच तुळशीनी पुजा करून तुळशीवृंदावनाला प्रदक्षिणा घालून आपल्या घरादारासाठी ती सुख मागते. या मंजुळा देखील साध्या नसतात.

आपल्या प्रतिभाशक्तीने त्या सोन्याच्या झालेल्या असतात.

'सोन्याच्या मंजुळा माझी तुळस सजली।
पांडुरंग, पांडुरंग जी का अमृतात न्हाली।।'

ळस छान बहरून येते. कोवळया उन्हाच्या प्रकाशात तिच्या मंजुळा चमकतात, जणू काही त्या सोन्याच्या होतात.तुळशीनी पूजा करताना किंवा तुळशीच्या मंजुळा पांडुरंगाला वाहताना आपोआपच पांडुरंगऽऽ पांडुरंगऽऽ असा उच्चार होत असतो आणि आपली जीभ जणू काही अमृतात न्हात असते. पांडुरंगाचे देवाचे स्मरण जणू अमृतमय असते आणि ही अनुभूती आपल्याला या तुळशीमातेने मिळते असे या स्त्रीला वाटते.

एकादशी

पंढरपूरचा विठ्ठल आणि भक्तांनी एकादशी यांचे अगदी अतूट नाते आहे. एकादशीचा उपवास करणाऱ्या असंख्य स्त्रिया आहेत. एकादशीला महत्त्व आहे. कारण शेवटी जीवाला त्रास न होता आपला जीव लवकर मुक्त होतो असा संकेत आहे. शिवाय आयुष्यात जो कधीही एकादशी करीत नाही त्याचे आयुष्य वाया गेल्यासारखे आहे असे मानतात. म्हणून एकादशी ही केलीच पाहिजे. संशोधिकेला ओव्या गोळा करीत असताना या एकादशीचे महत्त्व सांगणाऱ्या ओव्या मिळाल्या शिवाय अत्यंत जिव्हाळयाने तसेच विठ्ठलाच्या आंतरिक ओढीने एकादशी करणाऱ्या भगिनी भेटल्या.

'एकादशी केल्या नाही माझ्या वाया गेल्या।
अंतीकाळीच्या वेळा जिवा सोडवान झाल्या ।। '

एकादशी केलेल्या कधीच वाया जात नाहीत. शेवटी त्याच सोडवायला येतात. जीवनाचे साधे-सरळ गणित एका निरक्षर स्त्रीने आपल्या या ओवीमधून मांडलेले आपल्याला दिसून येते.

'पंधरवाडी एकादशी विठ्ठल लालालाल।
रुक्मिणी लावी शिडी झेंडाही लाल।। '

एकादशीला विठ्ठल लाल होतो अशी कल्पना केली आहे, म्हणजेच तो भक्तांनी टाकलेल्या गुलालाने लाल होतो. आनंदी होतो. रुक्मिणीही शिडी लावते व झेंडाही आपोआप लाल होतो, अशी कल्पना केलेली आहे.

'एकादशी बाई नाव तुझं चांगलं।
भजनी कीर्तनी मन रंगवलं ।। '

एकादशीला उपवास, त्यातून आपोआप विठ्ठल दर्शन आणि मन भजन–कीर्तनात रंगलेले. अतिशय सात्त्विक असा दिवस जातो. नुसत्या एकादशी या नावातच सर्व काही आलेले असते, असेच या ठिकाणी म्हटले आहे.

'एकादशीबाई नाव तुझं सरस।
विठ्ठलाच्या दरबारी सोडवी बारस।। '

एकादशीबाई, खरोखरच तुझे नांव अतिशय सरस आहे. चांगले आहे. एकादशी दुसऱ्या दिवशी सोडतात. त्या दिवशी बारस असते आणि विठ्ठलराजाच्या दरबारात जाऊन बारस सोडण्याचा योग येतो ही अतिशय चांगलीच अशी गोष्ट आहे, असे या ठिकाणी म्हटलेले आहे.

**चंद्रभागा नदी :**

पंढरपूरची चंद्रभागा नदी म्हणजे सर्वांनी आवडती. अर्ध्या चंद्रासारखा हिचा आकार असल्याने हिचे नांव चंद्रभागा पडले. पंढपूरला आल्यानंतर चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घ्यायचे हीच रीत आहे आणि म्हणूनच चंद्रभागेचे आणि वारकऱ्यांचे अतूट नाते आहे. स्त्री मनातही अतिशय आदराचे स्थान चंद्रभागा नदीला आहे. ओवीगीतातसुद्धा आपल्याला अतिशय सुंदर आणि डोळयांसमोर प्रसंग उभ्या करणाऱ्या ओव्या सापडतात.

'भरली चंद्रभागा नदी पल्याड कसं जावं ।
देव विठ्ठलानी बेलफुलानी केली नांव ।। '

चंद्रभागा भरून वाहते आहे. नदीपलीकडे कसे जावे या विचारात भक्तमंडळी असतात पण विठ्ठल त्यांनी सोय करतो. तो बेलफुलांनी नाव करून देतो, म्हणजे आपण अलगद बसून त्या नावेतून पलीकडे जाऊ शकतो. माझीही तशीच सोय माझ्या विठ्ठलाने केलेली आहे.

चंद्रभागेच्या काठी बेलांची तीन झाडं
तिथं माझी पिंड पाड ।। '

स्त्रीची इच्छाशक्ती किती प्रबळ असते याचा प्रत्यय या ओवीतून आपल्याला येतो. मरणानंतर देखील पिंड कोठे पाडायची आहे तर पंढरपूरला आणि ती सुद्धा चंद्रभागेच्या काठी बेलाची तीन झाडे आहेत. त्या ठिंकाणी. स्त्री किती दूरचा विचार करते आणि परमेश्वराशी किती आणि कशी जवळीक साधते हेच या ओवीमधून दिसून येते.

'उगवला नारायण चंद्रभागेच्या कडेला।
देवा इठ्ठलाला जरी पोशाख चढला।। '

सूर्यदेव उगवले आहेत. ते चंद्रभागेच्या कडेला दिसतायत आणि त्याच वेळेला विठ्ठलाची साग्रसंगीत पूजा होऊन त्याला जरीचा पोशाख चढविला आहे.

'भरली चंद्रभागा पाणी लागलं हाराळीला।
विठोबाला माझ्या खडीसाखर फराळाला।। '

चंद्रभागा अगदी तुडूंब भरलेली आहे. पाणी अगदी हाराळीला लागलेले आहे. आज एकादशी आहे. उपवास आहे म्हणून माझ्या विठोबाला फराळाला खडीसाखर हवी आहे. तनामनात असणारी भक्तीची ज्योत ओवीगीतांध्ये आपल्याला दिसून येते.

★★★

# स्त्री भ्रूण हत्या : चिंता आणि चिंतन

प्रा.डॉ.गुंफा पाटीलबा कोकाटे

स्वामी विवेकानंद म्हणतात, तुम्ही मला शंभर तरुण द्या मी जग बदलून दाखवतो. खरच एवढी ताकद आजच्या तरुणांमध्ये नक्कीच आहे फक्त गरज आहे ती मानसिक परिवर्तनाची. अडीच हजार वर्षांपूर्वी भगवान बुद्धांनी स्त्रीपुरुष समतेचा विचार मांडून इतिहास घडविला तर छत्रपती शिवरायांनी स्त्रियांकडे निकोपपणे बघण्याची दृष्टी दिली. त्यांचा आदर्श घेऊन आजच्या युवापिढीने स्त्री पुरुष समानतेचा घडा गिरविला पाहिजे कारण गेल्या काही वर्षात गर्भजललिंग परीक्षा व त्यातून निर्माण झालेल्या स्त्रीभ्रूण हत्येचा प्रश्न दिवसेनदिवस गंभीर बनत चालला आहे. याचा घोर परिणाम म्हणून लोकसंख्येतील स्त्रीपुरुष समतोल ढळू लागल्याचे दिसून आले. या स्त्रीभ्रूणहत्येची समस्या सर्व प्रसारमाध्यमांनी प्रखरपणे जनतेसमोर आणली.

स्त्रीभ्रूणहत्येचे पहिले कारण म्हणजे अजूनही पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यमत्त्व दिले जाते. स्त्रियांना बाईपणामुळे अन्याय सहन करावा लागतो. स्त्रीचे दुय्यमत्त्व हे व्यवस्थात्मक आहे आणि असे दुय्यमत्त्व सर्व समाजात असते हे गृहीतक आहे. हा विषमतेचा सर्वसाधारण ढाचा, रूढी–परंपरा, समज गैरसमज, लिंगभेदातून निर्माण होणारी विषमता या स्त्रीभ्रूण हत्येला कारणीभूत होत आहे. या विषमतेमुळेच स्त्री गर्भाला जन्म घेऊनच द्यायचा नाही ही मानसिकता तयार झाली. जर मुलीचा जन्म झालाच तर छुपे किंवा उघडपणे दु:ख साजरे करणारे अनेकजण असतात. स्त्रीच्या जन्मापासूनच पुरुषाशाहीला सुरुवात होते. पुरुषशाही म्हणजे स्त्रियांची श्रमशक्ती, लैंगिकता आणि पुनरुत्पादनक्षमता यावर प्रथमपासूनच पुरुषी नियंत्रण असणे. यातूनच परात्मभावाची संकल्पना ॲलिसन यागर यांनी मांडली आहे. त्यांच्या मते आधुनिक समाजात स्त्रिया भिन्न प्रकारे परात्म होत जातात. १) स्वत:च्या शरीरापासून येणारी परात्मा भांडवली समाजात स्त्रियांची शरीरे ही स्वत:साठी आणि पुरुषांसाठी लक्ष्य बनतात. २) पुनरुत्पादक (वंशसातत्य) श्रमापासून येणारी परात्मता स्त्रियांसाठी मातृत्त्व हा परात्मता देणारा अनुभव असतो तिला स्वत:ला किती अपत्ये असावीत  हे अन्य कोणीतरी ठरवितो तेव्हा ही परात्मता येते. बऱ्याचवेळा स्त्रियांना इच्छेविरुद्ध गर्भपात आणि गर्भधारणाविरोधी

शस्त्रक्रिया, गर्भनलिकाबंदी करावी लागते. एकूण आयुष्यातल्या प्रत्येक वळणावर स्त्रीपुरुष विषमतेमुळे स्त्रीने कायम मागे रहायचे अशीच दुहेरी व्यवस्था तिच्याभोवती निर्माण केली गेली. या विषमव्यवस्थेतच कायम स्त्रीचे दमण व शोषण होत गेले. तिच्या शरीरावर विविध प्रयोग करून विज्ञानही पुढे गेले.

आजही अशी अनेक आदीवासी, मागासलेली गावे आहेत जिथे आरोग्यसुविधा अजूनही पोहचल्या नाहीत पण स्त्रीभ्रूणहत्या करण्याची मोठी यंत्रणा निर्माण झाली आहे. अनेक मोठे मोठे डॉक्टर लोक यात सक्रिय सहभागी झाले आहेत. त्यातही स्त्री डॉक्टरांचे प्रमाण जास्त आहे. त्यांना पैशाचा मोह तर आहेच पण त्याबरोबरच स्त्री भ्रूण हत्येला सर्व समाजामध्ये एक छुपी किंवा उघड मान्यता दिली जाते. आणि त्यातूनच स्त्रीभ्रूणहत्येचा घृणास्पद प्रकार वाढीला लागला. समाजामध्ये मुलगा जन्माला आला की आनंदोत्सव साजरा केला जातो. एवढेच नाही तर प्रसारमाध्यमातील सर्वात प्रभावी असणाऱ्या दूरदर्शनवरील मालिका व चित्रपटांमधूनही मुलगा होणे या गोष्टीला उत्सवाचे स्वरूप दिले गेले. पण मुलगी होणे म्हणजे जबाबदारी तिची कौटुंबिक, सामाजिक असुरक्षितता आणि वयात आल्यावर लग्नाचा खर्च, हुंडा या अनिष्ट प्रथांमुळे मुलगी होणे या घटनेवर विषादाची छाया पसरली जाते. बरेतर डॉक्टरर्स सुद्धा या व्यवस्थेच्या मुशीतच घडलेले असतात. त्यांनाही स्त्रीभ्रूणहत्या करावयास काहीच वाटत नाही. शिवाय गर्भजल परीक्षा करून घ्यायला राजकीय नेतेमंडळी, उद्योग व्यवसाय करणारे व्यावसायिक, पोलीस, अधिकारीवर्ग, सरकारी कर्मचारी, पदाधिकारी अशी लोक येतात. त्यामुळे कितीही स्त्रीभ्रूणहत्या कायदा केला तरी स्त्रीभ्रूणहत्येला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष समाजाची परवानगी मिळते. मुलगा होणे ही सामाजिक व कौटुंबिक प्रतिष्ठेचे लक्ष्मण मानले जाते म्हणून स्त्रीचा जन्म नाकारला जातो. कारण सर्वांना सो कॉल्ड वंशाचा दिवटा पाहिजे असतो. वास्तविक पाहता मुलगी ही माहेर सासर अशा दोन्ही कुळांचा उद्धार करते. नका करू नाश स्त्री जन्माचा, घात होईल उद्याचा पिढ्यांचा नव्या पिढ्यांचे सर्जन करणाऱ्या स्त्रीला भारत देशाच्या थोर संस्कृतीत नाकारले जाते. तिला जन्माला येण्यापूर्वीच खुडले जाते. ही मानवतेला काळीमा फासणारी बाब आहे. मुलाला पाहिजे बहीण, बाळाला पाहिजे आई मग मुलीला का बर जगण्याचा अधिकार नाही अशा घोषणा सगळीकडे दुमदुमत आहेत. खऱ्या अर्थाने २१ व्या शतकात तरी स्त्री अस्तित्वाचा विचार केला जातोय. सावित्रीबाई फुले, डॉ.आनंदीबाई जोशी, डॉ.रखमाबाई, सरोजिनी

नायडू, फातिमा शेख, सईदा हमिदा, इंदिरा गांधी, मदर तेरेसा, सिंधुताई सपकाळ, मेधा पाटकर, कल्पना चावला, तेजस्विनी बोरकर, प्रतिभाताई पाटील अशी उज्वल यशाची सर्व उदाहरणे असूनही समाजातील स्त्री-पुरुषांची रूढीग्रस्त मानसिकता का बदलत नाही हे खरे चिंतन आहे. याला कारण समाजाचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोण आहे. तोच मुळातून बदलला पाहिजे.

रुडयार्ड किपलिंग म्हणतात, आपल्याला देवाचं आस्तित्त्व कधीच जाणवल नसतं म्हणूनच कदाचित आपलं आस्तित्त्व दाखविण्यासाठी देवाने आईला घडवलय, आई हा मातृत्त्वाचा अनोखा आविष्कार आहे. आई हातांचा झुला व डोळ्यांचा दिवा करून बाळाचे पालनपोषण करते आणि हिच आई आपल्या उदरात वाढणाऱ्या मुलीचा अंकुर खुडतेय. त्या कोवळ्या जीवाला जन्मालाच येउ न देण्याचा निर्णय केवळ पतीच्या इच्छेमुळे घेते. अर्थात तिच्या इच्छेचा अनिच्छेचा प्रश्नच येत नाही. अशी ही कोमल ह्दयाची आई असं कसं करू शकते. आपल्याच शरीरात रक्तामांसाचा वाढणारा गोळा नष्ट करते. स्त्रीभ्रूणाच्या नाजूक अवयवांवर घाव घालते. स्त्रीभ्रूण जगात येऊ नये म्हणून ती नानाप्रकारचे औषध घेते. त्या भ्रूणाचा जीव काय म्हणत असेल? त्याला किती वेदना होत असतील? किती तडफडत असेल तो लहान जीव? क़िती निर्दयपणे राक्षसी प्रवृत्तीने त्या भ्रूणाला मारले जाते. डॉक्टरांकडे शस्त्रक्रिया करण्यासाठी तीक्ष्ण हत्यारे असतात ते त्या भ्रूणाच्या डोक्यावर, हाता-पायावर घाव घालून तुकडे तुकडे करतात. काळीज पिळवटून टाकणारा हा प्रसंग त्या आईच्या मनावर किती परिणाम करतो याची पुरुषप्रधान व्यवस्थेतील कर्त्या पित्याला काय कल्पना? याचा कधी कोणी विचार करणार आहे की नाही?

स्त्रीभ्रूणहत्या पूर्णपणे बंद होणे ही सामाजिक समतोलाची गरज आहे. नाहीतर दिल्लीतील सामूहिक बलात्काराच्या घटना वारंवार घडत राहतील. शतकानुशतके पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीचे याना त्या कारणांने दमण, शोषण होत राहिले. कौटुंबिक हिंसाचाराबरोबरच सामाजिक हिंसाचार होत राहिले. पितृसत्तेच्या व्यवस्थेत स्त्रीचा बळी दिला गेला. मुलगी जन्माला आली की भले भले प्रचंड दुःखी होतात. बायकोला व मुलीला पहायला देखील जात नाही. यातच त्यांचा पुरुषार्थ दिसतो. या पुरुषसत्तेच्या मानसिक प्रवृत्तीचे विच्छेदन केल्याशिवाय या स्त्रीभ्रूणहत्या थांबणार नाहीत. यात स्त्री पुरुष दोघांचाही तितकाच सहभाग असणार आहे. मुलीला जन्म दिला म्हणून स्त्रीलाच दोषी मानले जाते. वास्तविक पाहाता

हा गुणसूत्रांचा परिणाम असतो. हे विज्ञानाने नि:संदिग्धपणे सिद्ध केले आहे. गर्भाच्या लिंगासाठी मुलीचा किंवा मुलाचा पिताच संपूर्णत: जबाबदार असतो. सलग मुलीच होतात याचे खापर स्त्रियांच्याच माथी फोडले जाते. त्यांना घरात व समाजात खूप नरकयातना भोगाव्या लागतात. मुलीच्या जन्माच्या वेळेपासूनच तिच्या आयुष्याचे सार्थक म्हणजे लग्न असे मानले जाते. त्यामुळे मुलींचे शिक्षण, करिअर दुय्यम बनून जाते. मुलींच्या वर्तनावर शाळा कॉलेजच्या पासूनच लगाम घातले जातात. मोठ्याने हसू नये, मोकळेपणाने बोलू नये. वेळेवर घरात यावे, स्वत:च्या भावनांवर संयम ठेवावा. शालीन कपडे घालावेत असे या व्यवस्थेतील आलिखित नियम तिच्यावर लादले जातात. त्यात सामाजिक असुरक्षिततेचा प्रश्न पुन्हापुन्हा ऐरणीवर येतोच आहे. एकूणच काय, 'आधीच हौस त्यात पडला पाऊस' यामुळे वाढत्या स्त्रीभ्रूणहत्या आपल्या जीवन चिंतनाचा विषय होतो. नुकत्याच जन्मलेल्या मुलीला बादलीभर दुधात बुडवून मारणे, तंबाखूचे पाणी करून त्यात बुडवून मारणे, तिच्या गळ्याला जन्मत:च नख लावणे, स्त्रीभ्रूणाला उकिरड्यावर कुत्र्यांनी लचके तोडण्यासाठी फेकून देणे, दगडावर आपटून मारणे एवढेच नाही प्रथितयश डॉक्टरांनी स्त्रीभ्रूण खाण्यासाठी शिकारी कुत्रे पाळणे किती लांछनास्पद वर्तन माणूस करतोय याची लाज वाटते.

वास्तविक पाहता मुलगी ही आरोग्यदायी असते. ती जन्मत:च अतिशय चिवट असते. तिची प्रतिकारशक्ती चांगली असते. मुलींचा नैसर्गिक बालमृत्यू दर मुलांच्या बालमृत्यूदरापेक्षा कमी आहे. स्त्रियांचे आयुर्मान पुरुषांच्या आयुर्मानापेक्षा जास्त आहे. पुरुषांमध्ये ह्रदयविकाराचे प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त असल्याचे दिसते. त्यामुळे स्त्रियांना दुर्बल, कमकुवत म्हणण्यात काहीच तथ्य नाही. समाजातील बरेच कुटुंब स्त्रिया चालवतात. नवरा दारुसारख्या व्यसनाने बरबाद होतो. उलट त्यांचा मार व शिव्या खात तिला संपूर्ण घराची, मुलांची जबाबदारी घ्यावी लागते. या रिकामटेकड्या व्यसनी पुरुषांना शरम वाटली पाहिजे. कधी ना कधी तरी हा त्यांच्या पापाचा घडा नक्की भरेल आणि त्यांनी केलेल्या अन्याय अत्याचाराचे हिशोब त्यांना इथेच चुकता करावा लागेल. ते दिवस आता दूर नाहीत आणि वर पुरुषसत्ता गाजवून मुलांना जन्म द्यायचा. जबाबदारी मात्र उचलायची नाही असे किती दिवस स्त्रियांनी सहन करावे. स्वत:चे शरीर पणाला लावावे ? बरं विज्ञानाने सर्व उपचार स्त्री शरीरावरच जास्त केले. स्त्रीभ्रूण मारण्यासाठी कधी गोळ्या खाणे, कधी जननेद्रियांवर लूप बसविणे, कधी स्त्रीभ्रूण काढण्यासाठी शस्त्रक्रिया करणे,

बाळंतपणात सिझरिंग करावे लागते. कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन पुरुषांचे करणे जास्त सोपी प्रक्रिया आहे उलट तेही स्त्रियांना करून घ्यावे लागते. स्त्रियांच्या सोसण्याला, भोगण्याला, अन्याय, अत्याचारांना खरच अंत नाही. तरीही संस्कृतीच्या नावाखाली सर्व स्त्रियां तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करीत आहेत. तिच्या  या दमणामुळे मुलगी नकोच अशी भावना समाजात दिसते ही चित्र बदलायचा एकच मार्ग म्हणजे पुरुषसत्ता व्यवस्थेतील रूढीग्रस्त मानसिकता बदलणं, स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कायद्याचा बडगा उचलणे, महिलांचे सक्षमीकरण करणे होय. तरच स्त्रीभ्रूणहत्या थांबू शकतील. आता मुलांना लग्नासाठी मुली मिळत नाहीत. सामाजिक तोल ढासळत चाललाय. लग्नाचा घातला घाट, मुलीशिवाय आंतरपाट ? अशा घोषणा देऊन जाणीवजागृती केली जाते आहे. जुनी पिढी जुन्या बुरसटलेल्या विचारांची होती पण आता स्त्रीभ्रूणहत्या थांबविण्याची जबाबदारी आजच्या आधुनिक युवकऱ्युवतींवरचं आहे. त्यांनी ही खबरदारी घ्यायला हवी आहे. मुलगी चालेल असे न म्हणता आम्हाला मुलगीच हवी असे प्रत्येकाने म्हणायला पाहिजे. अशी कृतिशील पाऊले जर आपण उचलली नाहीत तर संपूर्ण जगात मुलगी ही जात दुर्मीळ होऊन जाईन. मुलींच्या गर्भातच हत्या करून आपण आपल्या हातानेच पायावर कुऱ्हाड मारतो आहोत याची जाणीव प्रत्येक माणसाला होणे गरजेचे आहे. त्यासाठी कायद्याचा बडगा उचलणे आवश्यक आहे. डॉ.सुधा कांकरिया म्हणतात, पणती विझू नये म्हणून आपण दोन्ही हाताने पणती झाकतो वंशाची पणती विझू नये यासाठी एक हात कायद्याचा आणि दुसरा हात सजमाप्रबोधनाचा असणे आवश्यक आहे. मुलांनाच वंशाचा दिवा का म्हणायचे? मुली देखील वंशाचा दिवा आहेत. स्त्रीभ्रूणहत्येने फक्त स्त्रीचीच हत्या होत नाही तर मातृभावनेची हत्या होते ही गंभीर बाब आहे.

देशात मुलींच्या घटत्या जन्मदरात महाराष्ट्राचा नववा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात २००१ च्या जनगणनेनूसार ३४ जिल्ह्यांमध्ये मुलींचा जन्मदर प्रचंड घटलेला आहे. एकट्या अहमदनगर जिल्ह्यात १९९१ च्या जनगणनेत मुलींचे प्रमाण १००० मुलांमागे ९४९ मुली असे होते. आता तेच प्रमाण २००१ च्या जनगणनेत १००० मुलांमागे ८९० एवढेच मुलींचे प्रमाण आहे. ग्रामीण भागात ८९० तर शहरी भागात ८७८ एवढेच मुलींचे प्रमाण आहे. त्यामुळेच कन्याजन्माचे स्वागत असे उपक्रम पुढे आले. स्त्री शक्तीची थोरवी पुन्हापुन्हा स्मरु, म्हणूनच मुलींच्या जन्माचे प्रेमभरे स्वागत करू, नव्या युगाचा मंत्र नवा, मुलगीचा आहे

वंशाचा दिवा, मुलगी झाली म्हणून नका आणू कपाळावार आठी, तीच बनू शकते तुमच्या म्हातारपणाची काठी, मुलगी जन्मली म्हणून वाटू पेढे आनंदाचे, करूया स्वागत स्त्री जन्माचे अशा आशयाची अनेक शुभेच्छापत्र अहमदनगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात वाचावयास मिळतात. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी प्राजक्ता लवंगारे यांनी या उपक्रमाला चांगलीच चालना दिली अंगणवाडीसेविका, ग्रामसेवक, विविध संस्था, संघटना, शाळा महाविद्यालये यांच्या माध्यमातून गावोगावी जाणीव जागृती करण्यात येते. शासनाच्या बरोबर आता जिल्हा शासकीय रुग्णालये, महिला गौरव प्रतिष्ठान, रोटरी क्लब, कन्हैयामान ट्रस्ट, इब्तानी बिरादरी आदी संघटना आल्या आहेत. डॉ.सुधा कांकरिया यांनी स्त्रीभ्रूणहत्येबाबत पुढील शपथ लिहिली आहे.

भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत
माझ्या देशात स्त्रीपुरुष समानता नांदावी, यासाठी मी सदैव प्रयत्न करेन,
स्त्री ही एक महान शक्ती आहे, ती अनंत काळाची माता आहे.
मुलगा वंशाचा दिवा असेल तर मुलगी वंशाची पणती आहे
तिचा आदर, सन्मान मनापासून करणे माझे आद्य कर्तव्य आहे
स्त्रीभ्रूणहत्या मी करणार नाही, करू देणार नाही
मी स्त्रीजन्माचे स्वागत करेन त्याविषयी जागृती करेन
अशी शपथ मी आज सर्वांच्या साक्षीने घेत आहे त्या पुढे म्हणतात ,
आता तरी विचार करा

वंशाचा दिवा खरा कोण तुम्ही ओळखा
पणती नेच दिवा पुन्हा प्रज्वलित होतो
स्त्री असो वा पुरुष
जन्मतर स्त्रीच्या पोटी घ्यावा लागतो
आईची महती कशाला हवी सांगायला?
चला सज्ज होऊया भ्रूणहत्या थांबवायला

स्त्री जन्माचे स्वागत करा या कार्यक्रमाला १) ज्या कुटुंबात मुलीचा जन्म होतो त्या कुटुंबातील सदस्यांचा सत्कार केला जातो. २) मुलीच्या आईची खणा-नारळाने ओटी भरली जाते, ३) आकर्षक भेटकार्ड दिले जाते

स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी कायद्यातील काही ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे केल्या आहेत, १) गर्भधारणेपूर्वी लिंग निश्चिती आणि गर्भधारणेनंतर गर्भाचे

लिंग तपासणे यावर बंदी, २) गरोदरपणातील तपासण्यांवर नियंत्रण (उदा. गर्भजल चिकित्सा व सोनोग्राफी) गर्भधारणेपूर्वी व गरोदरपणातील तपासण्या फक्त गर्भामध्ये अनुवंशिक व्यंग असण्याची शक्यता तपासण्यासाठी कायदा परवानगी देतो, ३) या तंत्रज्ञानाची गर्भलिंग निवडीसाठी जाहिरात करण्यावर कायदेशीर बंदी, ४) या कायद्याअंतर्गत नोंदणी न झालेल्या  व्यक्तींना सोनोग्राफी मशीन विकण्यास बंदी ५) या कायद्याचे तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी शिक्षेची तरतूद, ६) अत्यावश्यक कारणासाठी प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करण्यापूर्वी संबंधित गरोदर महिलेची लेखी संमती घेणे व या तपासणीनंतर गर्भस्थ शिशूचे लिंग कळविले जाणार नाही असे लेखी कळविणे केंद्रचालकांना बंधनकारक, ७) गर्भस्थ शिशूच्या तपासणीनंतर गर्भाचे लिंग निदान शब्द, खुणा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे उघड करण्यास प्रतिबंध

शिक्षा व दंड : १) गर्भलिंग निदानाची सुविधा उपलब्ध असल्याची जाहिरात कोणत्याही प्रकारे करण्यास प्रतिबंध या तरतुदीचा भंग केल्यास तीन वर्षांपर्यत तुरुंगवासाची शिक्षा व १० हजार रु. पर्यंत दंड, पुनरावृत्ती झाल्यास पाच वर्षापर्यंत तुरुंगवास ५० हजार रुपयापर्यंत दंड २) गुन्हा सिद्ध झाल्यास संबंधित वैद्यकीय व्यावसायिकाची नोंदणी दोन वर्षांसाठी आणि पुनरावृत्ती झाल्यास कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद ३) गरोदर महिलेला जबरदस्तीने गर्भलिंग चिकित्सा तपासणी करण्यास भाग पाडणारा नवरा, नातेवाईक यांना उचित कायद्यानुसार शिक्षेची तरतूद आहे.

अशा प्रकारे स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ साली अस्तित्वात आला. गर्भलिंग तपासणी आणि गर्भलिंग निश्चित दोन्हीही प्रथांवर बंदी आणणे हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. २००१ साली दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेमार्फत या कायद्यात काही सुधारणा सुचविण्यात आल्या. परिणामी गर्भधारणेपूर्वी गर्भलिंगनिदान करणाऱ्या तंत्रावरही बंदी आणण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आली. या कायद्याचा असा मोठा परिणाम झाला की स्त्रीभ्रूणहत्येच्या विरोधात राज्यभर चळवळी सुरू झाल्या. त्यात साताऱ्याच्या ॲड. वर्षा देशपांडे यांचे नाव अग्रगण्य आहे. त्यांनी स्त्रीभ्रूणहत्येचे गांभीर्य ओळखले. गर्भलिंग निदान करणाऱ्या व्यवस्थेवर घणाघाती प्रहार करून दुष्टकर्म करणारांचे पितळ उघडे पाडले. लेक लाडकी अभियान यशस्वीपणे राबवून त्यांनी या दुष्टकृत्या विरुद्धच्या चळवळीला नवे परिमाण दिले. गोखले अर्थशास्त्र संस्थेने या

स्त्रीभ्रूणहत्येचा अहवाल देऊन मोलाचे योगदान दिले. त्यामुळे अनेक स्टिंग ऑपरेशन यशस्वी झाली. सोनोग्राफी यंत्रे सीलबंद झाली. अनेक डॉक्टरांवर कडक कारवाई झाली. डॉक्टरांमध्ये सकारात्मक दहशत निर्माण झाली. या प्रयत्नांतूनच अभियान लाडक्या लेकींसाठी यशस्वी होत आहे. शेवटी माझ्या कवितेने या मुक्त चिंतनाचा समारोप करते.

मी सूर्याच्या कुळाची, माझे उजेडाचे गाणे
तुझ्या कुशीत राहून, फक्त अंधार पाहणे
नऊ महिने पोटात, भारी गरभीचा वास
अनुभतेय आई फक्त सुवास सुवास
कळी फुलून येईल, तुझ्या अंगणी डोलेल
तुझ्या मायेची पाखर, मी हासेल नाचेल
बाग फुलून येईल, तुला देईन मी फुले
छान जुळतील सूर, मायेतून गाणे खुले
अंधाराच्या युगाशीही, मी लढेल जिंकेल
सारा उजेड देईन, तुझ्या अंगणी फुलेल
खडतर काळामधी, आई देईन मी साथ
सदा संकट झेलीत, करीन मी दोन हात
तुझ्या ह्दयाचे बोल, मी जाणून घेईन
सार आयुष्य पेलीन, आई तुझ्या संगतीन
मला खुडू नको आई, माझ्या नाजूक पाकळ्या
मला हौस आहे भारी, पायी घालीन साखळ्या
तू आभाळा एवढी, थोडे माझ्यासाठी वाक
माझे चिमुकले हात, माझी हाक जरा ऐक
मी पहाट होईन, राती होईन काजवा
माझ्या जलमाच्या वेळी, छान पाळणा सजवा
मी उद्धार करीन, ऋण मातेचे फेडीन
जाण ठेवून कष्टाची, नाव कुळाचं करिन
फक्त जन्म दे गं आई, सारं जग मी पाहीन
या दुनियेची शाळा, सारी शिकून घेईन
मला घडायाचं आई, मला शिकायचं आई
सूर्य कुळाचचं गाणं, मला जगायच आई

★★★

# तुकोबांच्या कवितेतील शब्दालंकार

प्रा.सौ. मंगल ए. डोंगरे

तुकोबांची प्रतिमासृष्टी बहुआयामी असल्यामुळे त्यांच्या काव्यरचेत अनेक अलंकार स्वाभाविकपणे आले आहेत. काव्याची भाषा असूनही ती कधी बोलण्याचा स्वर सोडीत नाही. तसेच नव्या नव्या अर्थाचे पदर या काव्यातूनं उलगडत जाताना दिसतात. तुकोबांच्या काव्यात शब्दालंकार व अर्थालंकारात यमक, अनुप्रास, श्लेष आणि उपमा, रूपक, दृष्टांत हे अलंकार प्राधान्यक्रमाने दिसतात. दृष्टांत हा अलंकार स्वाभाविक आणि नैसर्गिकरीत्याच कवितेत समाविष्ट झाला आहे. या अलंकारसृष्टीतील शब्दशक्ती आणि रस या काव्यगुणांनी कविता अधिक आशयघन झाली आहे.

## शब्दालंकार

गद्यातील किंवा पद्यातील विशिष्ट शब्दरचनेमुळे वाचकाला आनंद होतो, अशा शब्दरचनेला शब्दालंकार म्हणतात. एकच अर्थ वेगवेगळ्या शब्दांनी आणि शब्दांच्या वेगवेगळ्या रचनांनी व्यक्त करता येतो. परंतु या अनेक शब्दांपैकी काही विशिष्ट शब्दच आणि अनेक रचनांपैकी काही विशिष्ट रचनाच काव्यातील रसास पोषक असतात. या शब्दांच्या योजनेवर आणि रचनेवर आधारलेले जे अलंकार ते अर्थाच्या अभिव्यक्तीचे अलंकार होत. मनातील भाव व्यक्त करताना, त्या भावास अनुकूल असा नाद असलेल्या व त्या भावातील छटान्‌छटा, समर्पकपणे व्यक्त करू शकणाऱ्या आणि साभिप्राय अशा शब्दांची निवड करून, अर्थ कळण्यास सोपे जाईल अशी प्रसन्न आणि सुश्लिष्ट शब्दरचना शब्दालंकारात असते. शब्दाला ज्याप्रमाणे अर्थ असतो, त्याप्रमाणे नादही असतो. कोणताही भाव व्यक्त करताना कवी ज्या शब्दांची योजना करतो, त्याचा नादही त्या भावास अनुकूल असा असेल तर त्या शब्दयोजनेमुळे काव्य जास्तच आस्वादक्षम होते. अनुकूल शब्दयोजनेमुळे, रसाचा आविष्कार जास्त परिणामकारक होतो आणि समर्पक शब्दामुळे, अर्थाची अभिव्यक्ती सरस होते.

## अर्थालंकार

ज्यामुळे रचनेतील अर्थाला शोभा येते, त्या गुणधर्माला अर्थालंकार असे म्हणतात. शब्दाच्या अर्थाच्या शक्तीत बदल झाला म्हणजे, अर्थालंकार निर्माण होतात. अर्थालंकारामुळे काव्यातील अर्थ खुलतो व अर्थाला सौंदर्य प्राप्त होते. तुकारामांच्या काव्यात असे अनेक शब्दालंकार व अर्थालंकार आलेले आहेत.

## शब्दालंकार

### अनुप्रास

**व्याख्या :** एक किंवा अनेक व्यंजने फिरून लगेच योजने, पुनरावृत्ती करणे म्हणजे अनुप्रास होय. तुकोबांच्या कवितेतील रचनेचा प्रभाव हा शब्दालंकाराच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे अधिक प्रभावी ठरतो. त्यांच्या काव्यातील प्रासयुक्त रचना ही केवळ शब्दनिष्ठच नाही तर त्यातून लय, ताल, ठेका, नाद अशा अनुभूतीचा प्रत्यय होतो.४

उदा. वाटुली पाहतां सिणले डोळुले। दाविसी पाउले कइं वो डोळा ।।
तूं माय माउली कृपेची साउली। विठ्ठले पाहिली वास तुझी ।।८०१ ।।

'वाटुली', 'डोळुले', 'माउली', 'साउली', यात 'उ' काराची व 'ली' या वर्णाची पुनरावृत्ती झाली आहे. नादमय शब्दामुळे ही काव्यरचना प्रासादिक झाली आहे.

परिमळ म्हूण चोळूं नये फूल। खाऊ नये मूल आवडते ।।
मोतियाचे पाणी चोखूं नये स्वाद। यंत्र भेदुनि नाद पाहूं नये ।।६४ ।।

परिमळ, चोळू, फूल, खाऊ, चाखू, भेदू, पाहू'ख' या व्यंजनांची आणि 'ऊ' या स्वराची पुनरावृत्ती इतक्या कुशलतेने केली आहे की, या नादमय शब्दात आपण गुंतून पडतो आणि त्या काव्यातील आशयाकडे आपले नकळतपणे लक्ष वेधले जाते. अत्यंत चपखळपणे तुकोबांनी ही रचना केली आहे. शब्द व अर्थ या उभयंताची अत्यंत खुबीदार मांडणी पाहून, हे स्फुरण होण्यासाठी किती कुशाग्रता तुकोबांजवळ होती, याचाही प्रत्यय येतो.

लटिकें हासें लटिकें रडें। लटिकें उडें लटिक्याचे ।।
लटिकें माझें लटिकें तुझे। लटिकें ओझें लटिक्याचे ।।
लटिकें गाये लटिकें ध्याये। लटिके जाये लटिक्याचे ।।२८६५ ।।

'लटिके' या शब्दांची पुनरावृत्ती असून, लटका भाव या काव्यातून व्यक्त केला आहे. शब्दातील अक्षररचनेमुळे नाद निर्माण झाला आहे, त्यातही सौंदर्य आहे.

जीवाचे जीवन अमृताची तनु। ब्रह्मांड भुषणु नारायण।।
सुखाचा सांगात अंतकासी अंत। निजांचा निवांत नारायण।।
गोडाचे ही गोड हर्षाचे ही कोड। प्रीतीची ही लाड नारायण।।
भावाचा निज भाव नांवांचा ही नाव। अवघा पंढरिराव अवतरलासे।।१६८५।।

या काव्यातून प्रत्येक चरणात तुकोबांचे नवेनवे उन्मेष प्रकट झाले आहेत. 'जीवाचे जीवन', 'ब्रह्मांड भुषणू', 'सुखाचा सांगात', 'निजाचा निवांत', 'गोडाचे ही गोड', 'हर्षाचे कोड', 'प्रीतीचा लाड', 'भावाचा निजभाव' या सर्व शब्दांना केवळ नादमयता नाही तर लय आहे, गोडवा, माधुर्य, रसाळपणाही आहे. परमेश्वराला दिलेल्या या उपमा अत्यंत समर्पक आणि भावनाशीलतेचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. केवळ शब्दांना ओज आणि माधुर्यच नाही तर, शब्दांच्या चमत्कृतीतून अर्थाची माधुरी वाढली आहे.

सदा माझे डोळे। जडो तुझी मूर्ती। रखुमाईच्या पती सोयरिया।।
गोड तुझे रूप गोड तुझे नाम। देई मज प्रेम सर्व काळ।।०३।।

पहिल्या चरणात 'ती' अक्षराची पुनरावृत्ती आहे. दुसऱ्या चरणात 'गोड', 'शब्दांची', पुनरावृत्ती आहे, त्यामुळे शब्दांबरोबरच तुकोबांच्या भावनांचे सौंदर्यही प्रकट झाले आहे. रचनेच्या दृष्टीने हा अभंग अत्यंत सरस आहे.

निरंजनी आम्ही बांधियले घर। निराकारी निरंत राहिलो आम्ही।।
निराभासी पूर्ण जालो समरस। अखंड ऐक्यास पावलो आम्ही।।४३०३।।

निरंजनी, निराकारी, निराभासी, निरंत या शब्दातील 'निर' या साधित प्रत्ययामुळे परमेश्वराशी असलेला तुकोबांचा ऐक्यभाव दृढ झाला आहे. अनुप्रास अलंकाराने नादमयता आणि अर्थपूर्णत्त्व आले आहे.

असोनि उपाय म्हणे हा अपाय। म्हणे हाय हाय काय करू।।४३३८।।

उपाय आणि अपाय हे परस्पर विरुद्ध अर्थाचे शब्द वापरून, त्याचा योग्य ठिकाणी वापर न करणाऱ्या मूर्ख माणसाला हायहाय करण्याची वेळ येते. हे अत्यंत अल्प शब्दात तुकोबा या काव्यात सांगतात.

गोविंद गोविंद। मना लागलिया छंद।। मग गोविंद ते काया।।
भेद नाही देवा तया। आनंदले मन।। प्रेमे पाझरती लोचन।।२३१७।।

तुकोबांच्या मनातील गोड संवेदना आणि परमेश्वराशी एकरूप झाल्याची भावना, 'गोविंद' या शब्दाच्या पुनरावृत्तीमुळे आपल्याही चित्तात तोच भाव प्रकट होतो.

जग जोगी जग जोगी। जागजागे बोलती।।

जागजा जगदेव। राखा काही भाव।।४३६।।

'ज' हे व्यंजन या चरणात सहा वेळा आले आहे. शब्दांची चमत्कृती अत्यंत सरस आणि नेटकी झाली आहे. त्यामुळे नादमाधुर्यही निर्माण झाले आहे.

नामसंकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरे।।

न लगे सायास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण।।२४४८।।

'न', 'स' या व्यंजनामुळे लय, ताल, ठेका आणि नाद निर्माण झाला आहे. तुकोबांनी जणू काही आपली सिद्धावस्था व्यक्त केली आहे आणि नामसंकीर्तनाचे माहात्म्य 'जन्मांतर' आणि 'वनांतर' शब्दांतून सामर्थ्याने प्रकट केले आहे.

जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे।।

बुका लावूं नये भाळां। माळ घालू नये गळां।।३०७४।।

कीर्तनमहात्म्य आणि त्याचे माहात्म्य सांगताना 'ऊ' हा स्वर आणि ए हा स्वराबरोबर 'ख' या व्यंजनाच्या पुनरावृत्तीमुळे गोडवा निर्माण झाला आहे. उदा. लावू, घालू, भाळा-गळा अशा शब्दांच्या जोड्या अत्यंत मनोहर आहेत.

जन धन तन। वाटे लेखावे वमन।।१८८५।।

जन, धन, तन, वमन हे अधिकारी शब्दांनी आशयाचा व्याप मोठा व्यापला आहे. तुकोबांची विरक्त वृत्ती या शब्दातून प्रकट होते. कमी शब्दात आशयाचा व्याप, विस्तार साधला आहे.

जाणे भक्तीचा जिव्हाळा। तोचि देवाचा पुतळा।।७३०।।

'ए' 'ई' हे स्वर आणि 'ळ' या व्यंजनांची पुनरावृत्ती करून भक्तिरस प्रकट झाला आहे. काव्याचे अंतर्गत व बाह्य सौंदर्यही खुलले आहे.

आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे।।३२४१।।

तुकोबांची आनंदाची भावमय अवस्था 'आनंद' या शब्दाच्या चार वेळा उच्चारामुळे झाली आहे. ते शब्द अत्यंत खुबीदार पद्धतीने तुकोबांनी वापरले आहेत.

मऊ मेनाहून आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदूं ऐसे।।९८१।।

तुकोबांनी आपला भावनिक अंश शब्दांमध्ये ओतल्यामुळे वेगवेगळ्या काव्यातून

त्यांच्या भावलहरी त्यांच्या छटा आणि त्यांचे रंग वेगवेगळे निर्माण झाले आहेत.

निंदी कोणी मारी। वंदी कोणी पूजा करी।।४८।।

निदी व वंदी, मारी व करी या शब्दांच्या जोड्यांनी शब्दांना विचारांबरोबर सौंदर्य प्राप्त झाले आहे. तुकोबांचे शब्दांच्या निवडीचे चातुर्य प्रतिभासंपन्न आहे.

आसन शयन भोजन गोविंद। भरले आनंदे त्रिभुवन।।३१९६

सुखसागर परमानंदू। गोपीगोपाळागोधना छंदू।।

चंचळी चंचळ निश्चळी निश्चळ। वाजवी खळाळ उदकासी।।३२६५।।

या काव्यातील पहिल्या चरणात 'च' आणि 'ख' व्यंजनामुळे या काव्यात गोडवा निर्माण होऊन ते हृदयाच्या तारा छेडतात.

**यमक**

दोन किंवा अधिक चरणांच्या शेवटी काही अक्षरांची पुनरावृत्ती होणे याला यमक अलंकार म्हणतात. हे यमक कधी चरणाच्या शेवटी येते, कधी मध्यभागी येते, चरणांच्या प्रारंभी तर चरणाच्या शेवटीही येते. प्रासाप्रमाणेच यमक हे नादतत्त्वाचे एक प्रमुख अंग आहे. अंत्य यमकाचा वापर हा तर अभंगाच्या बंदिशीतील प्रमुख भाग दिसतो. तुकोबांच्या काव्यात आंतरयमक व अंत्य यमक ठळकपणे आहे.

बरे जाले देवा निघाले दिवाळे। बरी या दुष्काळे पिडा केली।।१३००।।

बरे-बरी, दिवाळे-दुष्काळ, ले-ली या यमकयुक्त शब्द अत्यंत चपलखपणे आले असून तुकोबांची आर्थिक स्थितीही ठळकपणे समोर येते.

बरा कुणबी केलो। नाही तर दंभे असतो मेलो।।३२०।।

केलो-मेलो या शब्दांत गोडवा असून, त्यातून तुकोबांची मानसिकता प्रकर्षाने प्रकट झाली आहे.

पंढरीची वारी। आहे माझे घरी। आणीक न करी तिर्थव्रत।।१३।।

व्रत एकादशी करीन उपवासी। गाइन अहर्निशी मुखी नाम।।२३४१।।

'वारी', 'घरी', 'करी', या चरणांच्या शेवटी अक्षरांची पुनरावृत्ती झाल्यामुळे आशय अत्यंत नादमय झाला आहे. सामान्य भाषेच्या रचनेतही मोहमय लय सातत्याने उमलत जाते. स्वरांची संख्या जास्त असल्याने त्यात लय, ताल, ठेका यामुळे गोडवा निर्माण झाला आहे.

वंदिले वंदावे। जीवाचिये साठी।।२८७६।।

शब्दांची पुनरावृत्ती इतकी कौशल्याने केली आहे की, अल्पाक्षरातूनही

फार मोठा आशय, तत्त्व, मूल्य या चरणातून तुकोबा सांगतात.

याती हीन मति हीन। कर्म हीन माझे ।।२७४३।।

स्वत:चे हीनत्त्व तीन शब्दातून सांगितले आहे. पण ते तीनही शब्द अर्थवाही आहेत. त्यांचा दर्जाही अर्थघन असा आहे.

नको नको मना गुंतू मायाजळी। काळ आला जवळी ग्रासावया।।२७९८।।

'नको नको', 'मायाजाळी', 'जवळी' हे शब्द नादमय आहेत. तसेच त्यातून प्रतित होणारा अर्थही मनवर परिणाम करणारा आहे.

भंगलिया चित्ता। न ये काशाने सांदितां ।।९५।।

अनुस्वारांची पुनरावृत्ती साधून भंगणारे चित्त कशानेही सांधता येत नाही, हा अत्यंत महत्त्वपूर्ण आशय अत्यंत नेमक्या शब्दात तुकोबा सांगतात.

सुख पाहतां जवापाडे। दु:ख पर्वता एवढे ।।८८।।

अभंगाची लय संवादलयीशी सुसंगत अशी आहे. अल्पाक्षररमणीयत्त्व हे तत्त्व या सुविचारात अत्यंत चपलखपणे आले आहे.

दया तिचे नाव भूतांचे पालन। अणीक निर्दलन कंटकांचे ।।२६४।।

तुकोबांची यमके केवळ नादवाहीच नाही तर अर्थवाहीही आहे. दयेचे दोन विरोधी विशेष अत्यंत कौशल्याने तुकोबा सांगतात.१५

गडी गेले रे रडी। कान्हो नेदीस तूं चढी।।

आम्ही न खेळो न खेळो। आला भाव तुझा कळो ।।१६८।।

गडी-रडी-चढी, खेळो-कळो या शब्दांच्या जोड्यातून तुकोबांची क्रीडावृत्ती व्यक्त होते, तसेच सहजतेने हे खेळावरील रूपकही तयार होते.

छळी विष्णूदासा कोणी। त्याची अमंगळ वाणी ।।

येऊ न द्यावा समोर। अभागी तो दुराचर।।३०३।।

'यमक' हे नादतत्त्वाचे गमक असून कोणी-वाणी, समोर-दुराचर या जोड्यांमध्ये यमक आले असून तुकोबांची परखड वृत्ती यातून प्रकट झाली आहे.

संत मारगी चालती। त्यांची लागो मज माती।।३०५०।।

'ग' आणि 'त', 'ई' या स्वरांना पुनरावृत्तीतून तुकोबांच्या मनातील इतर संताविषयी आदरभाव विशेषत्त्वाने प्रकट झाला आहे.

उरा लावी उर आळंगिता कांता। संतासी भेटता अंग चोरी।।३०५३।।

विरोधी भाव तीव्र शब्दात व्यक्त करण्यासाठी तुकोबांच्या भाषेत आवेग निर्माण झाला आहे. दुष्टांचा विशेषही येथे स्पष्ट होतो.

माता कापी गळा। तेथे कोण राखी बाळा ।।२८४२।।

माता, बाळ यांच्यातील प्रेमभाव न सांगता माता दुष्ट झाली तर बाळाने काय करावे? असा उद्‌गार या यमकातून साधला आहे.

**पुनरुक्तवदाभास**

**व्याख्या :** भिन्नाकार शब्द भिन्नार्थक असूनही, अर्थाची पुनरुक्ती होत आहे की काय, असा भास होतो. तेथे पुनरुक्तवदाभास अलंकार होतो.

आम्हा घरी धन शब्दाचिच रत्ने। शब्दाचिच शस्त्रे यत्न करू ।।
शब्दचि आमुच्या जीवांचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोका।।
तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव। शब्देचि गौरव पूजा करू ।।३३८५ ।।

तुकोबाच्या या काव्यात 'शब्द' हा शब्दप्रयोग सहा वेळा आला आहे. पण प्रत्येक वेळी तो भिन्न अर्थाने वापरला असून त्यातून वेगवेगळा अर्थ प्रतित झाला आहे.

**सारांश**,मनातील भाव व्यक्त करताना त्या भावात अनुकूल असा नाद असलेल्या व त्या भावातील छटान्‌छटा समर्पकणे व्यक्त करू शकणाऱ्या योग्य शब्दांची निवड करून, अर्थ कळण्यास सोपे जाईल अशी, सुश्लिष्ट शब्दरचना शब्दालंकारात असते. यमक आणि अनुप्रास या अलंकारांनी तुकोबांची काव्यसृष्टी खचोखच भरली आहे. तुकोबांनी शब्दालंकारांची वैशिष्ट्यपूर्ण रचना केली आहे. त्यांच्या काव्यातील प्रासयुक्तरचना शब्दनिष्ठच नाही तर, त्यातून लय, ताल, ठेका, नाद अशा अनुभूतींचा प्रत्यय येतो. व्यंजनांच्या पुनरावृत्तीमुळे काव्य प्रासादिक झाले आहे. शब्द व अर्थ याची खुबीदार मांडणी अत्यंत कौशल्याने केली आहे. त्यामुळे माधुर्य–गोडवा आणि रसाळपणामुळे काव्य अवीट झाले आहे. शब्दांची निवड सार्थ आणि समर्पक असून तुकोबांच्या भावनांचे सौंदर्य त्यातून प्रकट होते. त्यामुळे काव्य सौंदर्याची खुलावट परिणामकारकपणे साधली आहे. यमक हे नादतत्त्वाचे प्रमुख अंग असून अंतरयमक आणि अत्यंयमक ठळकपणे आले आहे. पुनरुक्तवदाभास या अलंकाराचे एकच उदाहरण आहे.

★★★

# साहित्य आणि इतिहास : परस्पर संबंध

डॉ.महेश खरात

साहित्य ही एक सामाजिक कृती असते. साहित्य आणि समाज यांच्या संबंधावर ही कृती निर्धारित असते. परंतु ज्या समाजातून साहित्यकृती निर्माण होत असते तो समाज एकाकी घडलेला नसतो. त्याच्या जडणघडणीची एक खूप मोठी परंपरा असते. या परंपरेत सांस्कृतिक घटकांबरोबरच तत्त्वज्ञान, प्रादेशिक भूगोल, अर्थकारण, राजकारण, धर्मकारण अशा अनेक घटकांचा समावेश होत असतो. ऐतिहासिक परंपरेवरच कुठल्याही समाजाचे भविष्य अवलंबून असते. ही परंपरा सशक्त असेल, इतिहास सशक्त असेल तरचं सर्वार्थांनी समृद्ध समाजाची जडणघडण होईल. मग इतिहास सशक्त असणे म्हणजे काय? इतिहासाला कालिक संदर्भ असतात. काळ जसजसा पुढे सरकत जातो तसा इतिहासाचा पट विस्तारत जातो. अगदी मानवी उत्क्रांतीपासून आजपावेतो एक विशाल पट आपल्यासमोर उभा आहे. हा इतिहास कधीही एकसमान,एकसंध राहिलेला नाही. मानवी विकासाच्या अनेक टप्प्यांनी त्याला तुकडया तुकडयां मध्ये विभागलेले आहे. हे सगळे तुकडे जोडून वर्तमानापर्यंत येता येते. म्हणून आजचे वर्तमान इतिहास नियत आहे, असे म्हणता येईल. हे इतिहास नियत सामाजिक वर्तमान साहित्य, कला, संस्कृतीचे नवे-नवे आविष्करण करत असते.

साहित्यात सतत कुठल्या ना कुठल्या काळाचा निर्देश असतो. काळाची परिणामकारकता साहित्याला प्रभावित करते. ही परिणामकारकता भूतकाळासंदर्भातील असेल. मात्र त्याची मूळं कुठल्या ना कुठल्या रूपात इतिहासात घट्ट रोवलेली असतात.आपल्या परंपरेचं सांस्कृतिक संचित घेऊनच साहित्य काळाच्या पुढे जावून नवी मूल्यसंकल्पना मांडत असते. हे सांस्कृतिक संचित त्या समाजाचा इतिहास असतो. म्हणजे इतिहास आणि समाज, समाज आणि साहित्यिक, साहित्य आणि साहित्यकृती असा संबंध इतिहास आणि साहित्याचा असतो. आजचे साहित्य उद्याचा इतिहास असला तरी एखादा विशिष्ट कालखंड निवडून त्यावर लिहिलेली साहित्यकृती ऐतिहासिक ठरत असते. ही साहित्यकृती तत्कालीन समाजातील घडामोडी, परंपरा, सामाजिक संरचना, जीवन जगण्याच्या पद्धती, चालीरीती यांचा संपूर्ण पट उभा करते. कारण त्यात वर्तमानाला प्रभावित करणारी उदात्त जीवनमूल्ये असतात. सामूहिक नेणिवेची आणि संस्काराची बीजं दडलेली असतात. या अर्थाने आजच्या साहित्याचे वर्तामानही इतिहास नियत

आहे, असे म्हणता येईल.

साहित्य आणि ऐतिहासिक घटना: साहित्य आणि समाज यांचा अन्योन संबंध असतो. साहित्य हे समाजजीवनाचा आरसा आहे, असं म्हटलं जातं. पण ते पूर्ण सत्य नाही. तर ते अर्धसत्यचं आहे. साहित्याला फक्त समाजाचा आरसा आहे, असं म्हणता येणार नाही. कारण साहित्य हे मानवी भावभावनांचं, मानवी मनाचं जिवंत आविष्कारण असतं. साहित्य हे समाजजीवनाचं, समाजिक घडामोडीचे केवळ चित्रण करीत नाही तर ते चित्र सजीव करीत असते. साहित्यिक त्या समाजाचा घटक असतो. त्या समाजाचे संस्कार वाङ्मयीन परंपरा पचवून त्याची वाङ्मयीन दृष्टी अभिवृद्ध होत असते. ही वाङ्मयीन दृष्टी त्याची साहित्यसृष्टी घडवित असते.

कोणताही वाङ्मयप्रकार हा आशय आणि तो व्यक्त करणारी संकेतव्यवस्था यांच्यातील संबंधाचा, विशिष्ट ऐतिहासिक अक्षावर निर्माण झालेला खुला असा संच असतो. ऐतिहासिकतेच्या विविध अक्षावर या शक्यतांमध्ये बदल होतो, भर पडते (जहागिरदार चंद्रशेखर : २००८ : ११) इतिहास आणि साहित्य यांच्यातील संबंधाचा विचार करताना डॉ.चंद्रशेखर जहागिरदारांचे प्रस्तुत मत महत्त्वाचे ठरते. कारण ऐतिहासिकतेची परिसीमा शोधायची झाली तर शक्यता गृहीत धरावी लागते. त्या आधारे ऐतिहासिक सत्याचा शोध घेतला जातो.

साहित्य म्हणजे काय? :

साहित्य म्हणजे काय? या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न भारतीय साहित्यविर्मशकांनीच नव्हे तर पाश्चात्य साहित्यविर्मशकांनीही केला आहे. भामह, कुंतक, विश्वनाथ, जगनाथ, दण्डी या संस्कृतमिमांसकाबरोबरचं स.रा.गाडगीळ, वसंत पाटणकर, दिगंबर पाध्ये, यशवंत मनोहर यांनीही साहित्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोलरिज, अर्नोल्ड, वर्डस्वर्थ, प्रो.कोर्टहोप, कार्लाईल, रस्किन, हॅजलिट या पाश्चात्य साहित्यविर्मशकांनीही साहित्य म्हणजे काय? या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र साहित्य हा शब्द कानावर पडताच आपल्या समोर कसलीतरी सामग्री उभी राहते. उदा.क्रिकेटचे साहित्य. पण वाङ्मयाच्या अभ्यासकाच्या कानावर साहित्य शब्द पडला की, त्याच्या नजरेसमोर कथा, कादंबरी, नाटक, कविता आदी. वाङ्मयप्रकार उभे राहतात. पूर्वी साहित्य या शब्दासाठी काव्य हा शब्द वापरला जात होता. वाणीमय ते वाङ्मय अशी ही साहित्याची व्याख्या केली जाते. परंतु वाङ्मय आणि साहित्य यातील भेद स्पष्ट करण्यासाठी ललित साहित्य आणि ललितेत्तर साहित्य असे वर्गीकरण केले जाते.

पहिला वर्ग ललित साहित्याचा आणि दुसरा वर्ग ललितेत्तर साहित्याचा.पहिल्या वर्गातील साहित्य हे भावनिक, प्रतिभानिर्मित, सौंदर्यानुभव करणारे असते. म्हणून प्रामुख्याने ललित साहित्यासाठीचं हा शब्द वापरला जातो. ललितेत्तर साहित्य हे वस्तुनिष्ठ वैचारिक किंवा शास्त्रीय चौकटीतले असते. यात कल्पकतेला थारा नसतो.

भाषा आणि इतिहास यांचा प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष संबंध असतो. प्रत्येक भाषेला स्वत:चा इतिहास असतो आणि हिच भाषा साहित्याचं माध्यम असते. भाषा काळाबरोबर बदलत जाते. राजकीय आणि सांस्कृतिक आक्रमणांमुळे तिच्यात भाषिक परिवर्तने होत असतात. परंतु ज्या भाषेला खूप मोठा इतिहास आहे. ती भाषा अशी अनेक आक्रमणे पचवूनही आपल आत्मतत्तव जपताना दिसते. या भाषेतूनचं अभिजात साहित्याची निर्मिती शक्य असते. हे साहित्य त्या भाषेला चिरंतन, जिवंत ठेवत असते. संस्कृत ही कधीकाळी बोलीभाषा होती. काळाच्या ओघात ती मागे पडली. आज संस्कृत भाषा बोलली जात नाही. मात्र त्या भाषेत मोठया प्रमाणावर साहित्य निर्मिती झाली आहे. त्या साहित्याने संस्कृत भाषेला जिवंत ठेवले आहे. म्हणून म्हणता येईल की, भाषा आणि इतिहास साहित्याचे अभिन्न अंगे आहेत.

इतिहास म्हणजे काय? आजचं वर्तमान हे उद्याचा इतिहास असतो. तसाच प्रत्येक क्षण इतिहास जमा होत असतो. इतिहासाने काळाचा एक प्रचंड मोठा अवकाश व्यापलेला आहे. इतिहास तशी स्थिर संकल्पना नाही. तिची लांबी-रूंदी सतत वाढत असते. तरीही आपले वर्तमान इतिहासाच्या गूढ अंधाऱ्या गुहेच्या तोंडाजवळच असते. तिथून गुहेच्या अंतापर्यंत काय काय सामावलेले असेल, त्या अनंत काळोखात संबंध भूतकाळ कुशीत घेऊन काळ निपचित पडलेला असतो आणि दूरवर एखादं-दुसरे प्रकाशाचे कवडसे दिसतील. त्यालाच आपण इतिहास म्हणतो. इतिहास ही एक व्यापक संकल्पना आहे. तिची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक इतिहासकारांनी केलेला आहे. ही कालाईलची व्याख्या व्यक्तीच्या चरित्रला महत्त्व देते. याशिवाय इ. एच. कार, कार्ल मार्क्स, धर्मानंद कोसंबी, वि.का.राजवाडे यांनी केलेल्या व्याख्याही ध्यानात घेण्यासारख्या आहे.

साहित्य आणि इतिहास : परस्पर संबंध

इतिहासकार हा सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी हाती लागलेल्या पुराव्याच्या किंवा सामग्रीच्या सत्य शोधण्याचा प्रयत्न करतो. सत्यापर्यंत पोहोचणे हे इतिहासकाराचे अतिंम ध्येय असतो. पण सत्या पर्यंत पोहोचण्यासाठी इतिहासकार काही मनामध्ये शक्यता गृहीत धरतो. त्या शक्यतेच्या

आधारे इतिहासकार सत्यपर्यंत जाण्याचा प्रयत्न करीत असतो. अधिक तटस्थ राहून नोंदी, पुराव्याच्या आधारे तो लेखन करीत असतो. म्हणजेच इतिहासकार सत्याचे वर्तूळ आणि संभाव्य शक्यतेचे वर्तूळ यामध्ये राहून लेखन करीत असतो. ही बाब खऱ्या इतिहासकाराबाबतची आहे. मात्र इतिहासकार जर पूर्वग्राह दूषित असेल, किंवा स्वामी निष्ठ असेल, किंवा आपल्या कुळाचा अभिमान असेल तर इतिहास विकृत स्वरूपात समाजा समोर येतो. म्हणून इतिहासकारांनी तटस्थ राहिले पाहिजे.

ऐतिहासिक कादंबरीकारांची भूमिका वस्तुनिष्ठ लेखनाची नसली तरी त्यांना ऐतिहासिक सत्याचे भान ठेवावे लागते. मात्र बव्हंशी कादंबरीकार ऐतिहासिक वास्तवाचे भान ठेवत नाहीत.त्यामुळे साहित्यातील इतिहास हा कपोलकल्पित स्वरूपाचा असतो. परंतु कथा-कादंबरी-नाटकातला इतिहास हाच खरा इतिहास आहे. असं समजण्याचा मराठी मनाचा कल असतो. त्यामुळे ऐतिहासिक लेखन करणाऱ्या लेखकांनी अधिक अवधान राखणे गरजेचे आहे. नेहमीचं ऐतिहासिक लेखन करणारे लेखक साहित्यकृतीचाच विचार करीत आले आहेत. त्यामुळे मूळ इतिहासापासून दूर गेलेले ऐतिहासिक लेखन झाले आहे. याची असंख्य उदाहरणे देता येतील. उदा.विश्वास पाटील यांच्या संभाजी कादंबरी मध्ये हंस व गोदावरीचे कपोलकल्पित प्रसंग वाचावयास मिळतात. साहित्यिकांने संभाव्य शक्यता व कल्पिताचे वर्तूळ यात राहून लेखन करायला हवे. पण ते कल्पिताच्या अंगानेच अधिक झुकतात.त्यामुळे सत्याचा विपर्यास होतो.

साहित्य आणि ऐतिहासिक बीज : साहित्यनिर्मिती नेमकी कशातून होते. साहित्यनिर्मितीचे बीज कुठे असते?

ऐतिहासिक साहित्याबद्दल बोलावयाचे झाल्यास साहित्यनिर्मितीचे बीज इतिहासात दडलेले असते. इतिहासातील एखादी घटना, प्रसंग, कालखंड निवडून साहित्यकृतीची योजना केलेली असते. कल्पित आणि वास्तव यांचा समन्वय साधलेला असेल तर कुठलीही साहित्यकृती ऐतिहासिक दस्तऐवज ठरू शकते.. ऐतिहासिक बीज अस्थिर असतात. डॉ.आनंद यादव लिहितात, बीज सूचण्याची किंवा बीज धारणेची प्रक्रिया समानच असते. कथेची बीजधारणा लेखकाच्या मनात कशी होते, हे शोधून काढणे मानसशास्त्राचे काम आहे. केशवसुतांच्या भाषते ती धारणा म्हणजे चितघनचपला असते. ती बघता बघता चमकते आणि ठिणगीसारखी नाहीशी होते. (यादव आनंदः १९८९: ११९) ऐतिहासिक बीज मात्र ठिणगीसारखे नाहीसे होत नाही. ते सामग्रीच्या स्वरूपात कायम स्वरूपी उपलब्ध असते. शिवाय इथे लेखकाच्या कल्पक शक्तीचा कस लागत नाही. तर

इतिहास आणि साहित्य याचा समतोल राखण्यासाठी लेखकाला कसरत करावी लागते. म्हणून ऐतिहासिक साहित्याची निर्मिती प्रक्रिया काही प्रमाणत वेगळी ठरते. इतिहास ज्या मानवी समाजाची कालानुक्रमे मांडणी करतो. त्याचं समाजातून साहित्याची निर्मिती होते. समाज आणि साहित्य यांचा अन्योन संबंध असतो. साहित्यिक हा कुठल्या ना कुठल्या तरी समाजाचा घटक असतो. त्या समाजात घडणाऱ्या घटनांचा, घडामोडींचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव लेखकावर पडतो. त्यातून जी साहित्यकृती निर्माण होते. त्यात त्या घडामोडीचा संक्षेप आलेख उतरलेला असतो. ठमाणसाचे सगळे अस्तित्व हे समाजसापेक्ष असते. साहित्य हे समाजात, समाजासाठी व समाजातील व्यक्तीद्वारे निर्माण होते. त्याचे स्वरूप व अर्थपूर्णता समाजातील भाषिक-वाङ्मयीन परंपरेनुसार निश्चित होत असते. समाज निरपेक्ष माणूस जसा अशक्यप्राय आहे. तसा समाजनिरपेक्ष साहित्यही असंभवनीय आहे. (पुंडे दत्तात्रय : १९९६ : ९८) यातून हे स्पष्ट होते की, साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते.

**निष्कर्ष :** साहित्यिकांने इतिहासाने नेहमीचं खुणावले आहे. ऐतिहासिक युगपुरुष तर बव्हंशी साहित्यिकांच्या आस्थेचे आणि आस्मितेचे विषय झाले आहेत. छत्रपती संभाजीराज हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. वा.वा.खरे यांचे १८८५ साली गुणोत्कर्ष हे संभाजी राजांवरचे पहिले नाटक प्रसिद्ध झाले. तेव्हा पासून १९९६ साली शिवाजी सावंत यांचे छावा नाटक प्रसिद्ध झाले. सुमारे १०० वर्षामध्ये फक्त संभाजी राजावर ११५ नाटके प्रसिद्ध झाली आहेत. ही एकच गोष्ट साहित्यिकांना इतिहासबद्दल किती आकर्षण होते हे समजण्यास पुरेशे आहे. मात्र साहित्यिक नेहमीचं कल्पनेचे पंख लावूनचं लेखन करीत असल्यामुळे खरा इतिहास समोर आला नाही. कपोलकल्पित इतिहासाचे रंजक रूप मराठी माणसाच्या समोर उभे आहे. त्यातून युगपुरुषाची खरी प्रतिमा समाजासमोर आणणे हे अभ्यासकांच्या पुढचे मोठे आव्हान आहे. काही अभ्यासक या अंगाने विचार करीत आहेत, ही जमेची बाजू आहे. इतिहास आणि साहित्य यांच्यातील संबंधाचा अधिक खोलात जाऊन विचार करण्याची वेळ आली आहे. मूलगामी विचार करणाऱ्या इतिहासकारांनी व सारस्वतांनी अधिक गांर्भीयाने संशोधन करून निष्कर्षापर्यंत आले पाहिजे व साहित्य व इतिहास यांच्यामध्ये कमीत कमी अंतर कसे राहिलं याचा विचार केला पाहिजे.

★★★

# मिरासदारांच्या कथांची रचनासुत्रे

डॉ. लता केशव देशमुख

## प्रस्तावना

कोणत्याही ललितकृती किंवा साहित्यकृती म्हणजे जीवनांगावर टाकलेला अर्थपूर्ण आणि कलापूर्ण प्रकाश असतो. हा प्रकाश कोणत्या जीवनांगावर आणि कसा टाकायचा यावर त्या त्या कलाकृतीची मांडणी अवलंबून असते. प्रत्येक साहित्यकृतीची प्रकृती वेगळी असते. अंतर्गत ताण वेगळे असतात, म्हणूनच तिची मांडणी व शब्दवातावरण वेगळे असते. श्रेष्ठ वाङ्मयकृतीच्या रुपाने प्रकट होऊ पाहणारा प्रत्येक जिवंत अनुभव आणि संघटना आपणच निश्चित करीत असतो. त्या अनुभवाइतकीच त्याची मांडणीही अनन्यसाधारण असते. बा. सी. मर्ढेकरांच्या मते, ही सुसंघटना, हा घाट, कलाकृतीतील व्यक्त अशा आशयात भावानुभूतीत असतो. त्या आशयातील घटकांच्या लयबद्ध रचनेत ती आढळतो.

कथेचा विचार करताना कथेची मांडणी, तिची निवेदनपद्धती व तिचा साराच अविष्कार हे त्या कथानुभवाच्या प्रकृतीचे सहज स्वाभाविक शब्दरुप असते. आशयाप्रमाणे कथेचा रचनाबंधही आपले स्वरूप सिद्ध करीत जातो. या संदर्भात सुधा जोशी म्हणतात की, कथानक अनुभव हा अनेकविध प्रवृत्तीचा असू शकतो. अनुभव रुपातील वैविध्यातूचन कथा या साहित्यप्रकाराला रुपबंधाचे वैविध्य लाभलेले दिसते.

## रचनासूत्राचा परामर्श

मिरासदारांच्या कथेचा घाट स्वतंत्र व रेखीव आहे. मिरासदारांच्या कथेत घटना, प्रसंगापेक्षा वृत्तीला प्राधान्य मिळते. त्यांच्या कथेत कथेइतकेच कथानकालाही महत्त्व प्राप्त होते. त्यांच्या निवेदनशैलीतून हे सहजपणे लक्षात येते. त्यांची ही शैली सहज आणि निर्हेतूक वाटत असली तरी तिची घडण सौंदर्यपूर्णतेने झालेली आहे हे लक्षात येते. ही सौंदर्यपूर्णता त्यांच्या कथांतील रचनासूत्रातून दिसून येते. मिरासदारांच्या कथांचा अभ्यास करताना काही रचनासूत्रे लक्षात येतात. विरोधबंध, वास्तव व भास यांचा न्यास, इत्यादींच्या

कलात्मक रचनेतून त्यांच्या कथांची मांडणी झालेली दिसून येते.

### विरोधबंध

मिरासदारांच्या कथातील सौंदर्यपूर्णता ही त्यातील विरोधलयाच्या वापरातून प्रतीत होते. मिरासदारांनी आपल्या कथांमध्ये प्रामुख्याने विरोधलयाचा वापर केला आहे. 'कोणे एके काळी', 'विरंगुळा', 'व्यंकूची शिकवणी', 'फोटो', 'वाटणी', 'ताजवा', 'प्रगती', 'भुतांचा जन्म', 'ड्रॉईंग मास्तरांचा तास' अशा अनेक कथा विरोधलयीतून फुलत जातात.

जुन्या कहाणीसारखी भूतकालीन कथा सांगण्यास या कथेत प्रारंभ होतो. 'कोणे एके काळी' माण नामे देशात एक खेडेगाव होते. तिथे नाना घोडके नावाचा अप्रतिम इसम राहत असे. पहिल्या वाक्यात निवेदक 'अप्रतिम' हे विशेष योजून नाना घोडकेची ओळख देऊ लागतो. असे असले तरी पुढच्याच वाक्यात 'हा इसम अगदीच बोंबलभिक्या असून दिसावयासही बेंगरळ असे.' अशीही ओळख निवेदक करून देतो. अशा दोन वाक्यापासून सुरु झालेला हा विरोध केवळ शाब्दिक, वर्णनात्मक पातळीवर राहत नाही तर तो आशयातून आलेला आहे, हे हळू हळू लक्षात येऊ लागते. नाना हा अप्रतिम इसम होता. नाना थोर पुरुष होता, अशी विधाने नानाचे सामान्यपण प्रकट करण्यासाठीच कथेच्या प्रारंभी उपरोधिकपणे योजिली आहेत. असाही एक विरोध येथे जाणवतो. पण कथा शेवटाकडे जाते त्यावेळी या विशेषणातील अर्थपूर्णता लक्षात येते.

नाना हा थापाड्या होता. त्याने सांगितलेल्या शंभर गोष्टींपैकी एखादीच गोष्ट खरी असायची. बाकीच्या नव्याण्णव गोष्टी धादांत थापा असत. त्या थापा असल्या तरी त्याच्या गप्पागोष्टींमध्ये लोकांना नेहमीच मौज वाटायची. कथानकाच्या शेवटीही आपल्या अशा पायथ्याला बसलेल्या मंडळींना नाना कथा सांगत असतो, थापा मारत असतो. कथेच्या प्रारंभीचे थापा मारणे व कथेच्या शेवटच्या टप्प्यात थापा मारणे यांच्या परिस्थितीतील विरोध वाचकाला जाणवतो. किंबहुना सुखात आणि शेवट यामध्ये विरोध असला तरी एक सुसंगती, लयबद्धता असल्याचेही लक्षात येते.

सुरुवातीपासून शेवटपर्यंत ही कथा विरोधलयीत सरकत राहते. खप्पड, बसक्या गालांचा कुठलाही व्यवसाय व कामधंदा धडपणे करू न शकणारा नाना थापां धून मात्र आपल्या शौर्याच्या, पराक्रमाच्या गप्पा मारतो. म्हणजे रोजच्या

त्याच त्या रुक्ष, कंटाळवाण्या जीवनाला ताजेपणा येण्यासाठी मनुष्य खोट्या, काल्पनिकतेचा आधार घेत असतो. वास्तविक सृष्टीत वावरणाऱ्या माणसांना असे अद्‌भूत काल्पनिक जगाचे आकर्षण वाटणे हे विरोधी सत्यही यातून उलगडते. अजून एकही स्त्री त्याच्या जीवनात आली नव्हती. तरीही स्त्रियांच्या आणि संसाराच्या गप्पा मारणे यातून फार मोठा विरोधाभास प्रतीत होतो. लग्न होत नाही म्हणून मनातून दु:खी कष्टी असलेला नाना अशा गप्पां धून, स्वप्नरंजनातून आपल्या इच्छेला वाट करून देत असतो. या विरोधामुळे कथा करून होत जाते.

मधेच ब्राह्मणाच्या ज्योतिष्यामुळे नानाच्या इच्छेला अकुंर फुटतात. येत्या मार्गशीर्षात आपल्या लग्नाचा भलाभक्कम योग आहे. आपली इच्छा पूर्ण होणारच. ब्राह्मणाच्या या भविष्यवाणीने नाना आनंदून जातो. खोटे न बोलण्याची, थापा न मारण्याची अटही त्यासाठी तो कबूल करतो. संसार–सुखाच्या स्वप्नात तो दंग होतो. दिवस न् दिवस त्या धुंदीत तो गुदमरून जातो. मुलीचे वडील एक ना एक दिवस आपल्याकडे चालत येतील या आशोने तो वाटेकडे डोळे लावून बसतो. अखेरीस ज्योतिषाने सांगितलेला मुहूर्त टळून जातो आणि नाना आशोच्या जगातून एकदम निराशेच्या गर्तेत फेकला जातो. येथे नानाची व्यथा अधिकच गडद होते. पण यातूनही आपली व्यथा पुन्हा गप्पागोष्टींच्या विश्वात दडवून स्वत:ला सावरतो. अशा प्रकारे प्रथमपासून शेवटपर्यंत कथा विरोधलयातून आकार घेत जाते.

'गवत' ही कथाही अशी विरोधलयातून आकाराला येते. 'भूक' या मूलभूत मानवी संवेदनेचे प्रत्ययकारी दर्शन या कथेतून घडते. बाजूचे मजुरी मागणे व बापूचे ताणून धरणे असा ताण कथाभर चालू राहतो. या विरोधी ताणातूनही कथा आकार घेते.

'पाऊस' या कथेतही दुष्काळाचे सावट आणि विठोबाचे कर्ज मागणे ही परिस्थिती पाऊस पडल्यानंतर लगेच बदलते. तसेच पाऊस पडण्यापूर्वीचे आबा सावकाराचे वागणे आणि पाऊस पडल्यानंतर त्याचे बदलणे अशा विरोधात्म प्रसंगातून मिरासदार ग्रामीण जीवनाचे वास्तव रेखाटतात. दुष्काळाचे सावट व पावसाचे पडणे या दोन विरोधात्म घटना तसेच त्या प्रसंगातील दोन व्यक्तींची विरोधात्म परिस्थिती यातून ग्राम वास्तवातील नाट्य मिरासदार कथेतून फुलवितात. विरोधाबंध हेच मिरासदारांच्या कथांचे मुख्य सूत्र असल्याचे लक्षात येते. मिरासदारांच्या कथांची आणखी काही रचनासूत्रे येथे नोंदविता येतील.

वास्तव व भास यांच्या बंधाचे रचनासूत्र

वास्तव व भास यांच्या स्थानांतरातून आणि न्यासातून मिरासदारांच्या काही कथांची घडण झालेली दिसते.

'घाम', 'विरंगुळा', 'व्यंकूची शिकवणी', 'नकटे भूत', 'पंचाक्षरी', 'नव्याण्णवबादची एक सफर', 'प्रगती', 'मृगया', 'एका कुग्रामातील विजयस्तंभ', 'मी आणि भुतेखेते', 'हेळातील भीषण प्रकार', 'रस्त्यावरील भुताटकी', 'अभ्यास', 'तास कवितेचा', 'शायडी', 'कुत्र्याचे शेपूट', 'साहेब', 'तैलबुद्धी देवदत्त', 'बापू आणि बनी' 'भारतीय चांद्रयानाचे भ्रमण' या व अशा अनेक कथांमधून या सूत्राचा प्रत्यय येतो. मुळात वास्तवात काही घडलेलेच नसते पण घडल्याचा केवळ भास या कथेतून निर्माण होत असतो आणि या भासातून पूर्ण कथा आकार घेते. अशी कथा आकारत असताना एकीकडे वास्तवाचीही सतत जाणीव होत असते. 'भुताचा जन्म' ही एक सुंदर कथा अशीच एका भासातून जन्म घेते.

अमावस्येच्या रात्री सशाचे काळीज असणारा तुकाराम लांडगे हा पहिलवान खालच्या वस्तीवर चाललेला असतो. तुकारामाला रस्त्यात एका पाहुण्याची सोबत मिळते. दोघेही बोलत बोलत म्हणण्यापेक्षा भुताच्या गप्पा मारत मारत माळावरच्या एकमेव पिंपरणीपाशी येऊन पोहोचतात. पाहुण्याला विडी ओढायची लहर येते म्हणून ते त्या पिंपरणीखाली येतात. वाऱ्याने काडी पेटत नाही म्हणून पाहुणा झाडाच्या आडोशाला जाऊन विडी ओढत बसतो. इकडे तुकारामाला पाहुणा दिसत नाही. पाहुणा अचानक गायब झालेला पाहून आधीच भुताच्या कल्पनेने पछाडलेला तुकाराम पाहुण्याला भूत समजतो. तो जीवाच्या आकांताने तसाच गावाच्या दिशेने पळत सुटतो. विडीचे चार दोन झुरके मारल्यावर पाहुणा तुकारामकडे येतो. पण त्यालाही तुकाराम दिसत नाही. भुताच्या भयानक कल्पनेने हादरून तोही वाट फुटेल तिकडे पळत सुटतो. 'प्रगती' या कथेत ग्रामसुधार सप्ताहानिमित्त श्रमदानासाठी विद्यार्थ्यांचा एक गट न जाताच मुख्याध्यापकांच्या नोंदवहीत एक संपूर्ण वर्ग ग्रामसुधार सप्ताहानिमित्त श्रमदानासाठी जाऊन आला व मोलाचे कार्य केले अशी नोंद होते. काय आहे हे कथेत प्रत्यक्ष दाखवून काय असावे याचे सचन मिरासदारांच्या कथातून होते. त्यामुळे कथांना सूचकतेचे परिमाण लाभते.

### घटिताच्या सादपडसादाचे रचनासूत्र

मिरासदारांची कथा घटनेपेक्षा माणसांना प्राधान्य देणारी असते. त्यांच्या बहुतांश कथात घटना घडून गेलेली असते. त्या घटनेच्या निमित्ताने मनुष्यसमूह तेथे जमा झालेला दिसतो. प्रस्तुत रचनासूत्रासाठी 'जिवंत आणि मेलेले' ही कथा उदाहरणादाखल घेता येईल.

एका सकाळी नाना चेंगटाला एक मेलेले अर्भक उकिरड्यावर पडलेले दिसते. नानाने पाहिलेल्या घटनेचा वृत्तांत लवकरच सगळ्या गावात पसरतो आणि मृत अर्भकाजवळ हा हा म्हणता माणसांचा मोठा समुदाय जमा होतो.

असंख्य प्रश्न त्या समुदायात चर्चेला येतात. त्यावर प्रत्येकजण आपल्या कुवतीनुसार उत्तरही शोधण्याचा प्रयत्न करतो. या चर्चेतून मानवी स्वभावाच्या विविध पैलूंचे स्वाभविक दर्शन घडते. याच रचनाबंधातून 'नदीकाठचा प्रकार', 'हळहळ', 'वारस', 'बाबू शेलाराचे धाडस', 'एका गारुड्याचे मरण', 'चुकामूक', 'घाम' अशा एक ना अनेक कथा घडत जातात. समूहातील विविध व्यक्तींचे चित्र जंत्रीवजा होत नाही. उलट विविध प्रकारच्या बऱ्यावाईट व्यक्तींनी गजबजलेल्या विश्वाचे वास्तवरूपच तेथे एकवटलेले दिसते.

### ढोबळ अनुकरणाचे रचनासूत्र

ढोबळ अनुकरणातून अवतरणाऱ्या हास्यास्पद अनुभूतीचे एक रचनासूत्र मिरासदारांच्या कथेतून दिसते. शहरी जीवनातील दारुबंदी, श्रमदान, मदत उपोषण, बंद अशा घटनांच्या अपुऱ्या, धूसर व ढोबळ माहितीचा ग्रामपरिसरातील काही व्यक्ती किंवा काही गट यांच्यावर परिणाम होतो. अशा वेळी त्या घटनांचे अनुकरण करताना त्या व्यक्तीची वा गटांची फजितीच होते. भोकरवाडीतील श्रमदान ही कथा उदाहरणादाखल देता येईल.

अशा प्रकारे शहरी जीवनातील विविध योजनांची खेड्यात अनुकरणातून आखणी होते आणि अं लबजावणीत मात्र या योजनांचे तीन तेरा वाजतात. योजना अं लात न येताच बरखास्त होतात. याच सूत्रावर 'भोकरवाडी बंद', 'मदत', 'बाबू पैलवानाचे उपोषण', कंपनीची ट्रीप', 'भोकरवाडीतील दारुबंदी', 'भोकरवाडीतील रस्ता रोको' या कथांची निर्मिती झाली आहे. अर्थात या सुत्रामुळे या कथा सवंग विनोदी होतात हे लक्षात येते.

**गैरसमजातून निर्माण होणाऱ्या गोंधळाचे रचनासूत्र**

दोन व्यक्तींची प्रत्यक्ष भेट न होता त्यांच्या निरोपात किंवा विचारात गफलत होऊन हस्ते परहस्ते गोंधळ निर्माण होतो व तो वाढत जातो. निरोपाचे स्वरूप पुरते बदलून गैरसमज निर्माण होतात. 'शिवाजीचे हस्ताक्षर' या कथेत इतिहासाचे शिक्षक व पालक या दोघां ध्ये विद्यार्थी निरोप्याची भूमिका बजावतो. शिवाजी महाराजांना लिहिता वाचता येत होते असे देशपांडे मास्तरांचे म्हणणे होते. तर शिवाजी महाराजांना मूळीच लिहिता वाचता येत नव्हते असे वसईकर या विद्यार्थ्याच्या पालकांचे म्हणणे होते. आपापले समर्थन करणारे विचार रोज वसईकरला पोहोचवावे लागतात. इतिहासाच्या दोन विद्वान पंडितांच्या विद्वतजड भाषेतला निरोप सहावी सातवीच्या विद्यार्थ्याला पेलवत नाही. मग तो पैठणचे पैठणी करतो, कच्च्या गुरुचा चेला ऐवजी पेरू करतो. मुद्द्यावर या चे गुद्यावर या. असे होत. महादेव ऐवजी बजरंग होतो. लहान मुलांचे आकलन आणि प्रौढांचे आकलन या दोन पातळ्यावरील आकलनांच्या विरोध न्यासातून ही कथा मजेशीर गं तीचे स्वरूप धरण करते.

**कथा उजळणारे शेवट**

मिरासदारांच्या कथांना कलात्मक घाट प्राप्त होण्यात त्यांच्या कथांच्या शेवटाचाही सिंहाचा वाटा आहे. आकर्षक प्रारंभ, निरगाठ, उकल अशा साऱ्यातून मिरासदारांची कथा जात नाही. तसेच आकर्षक कलाटणीतंत्र
म्हणूनही त्यांच्या कथांचे शेवट येत नाहीत तर संपूर्ण कथात्म आशयाला खोली प्राप्त करून देणारा शेवट मिरासदारांच्या कितीतरी कथांमध्ये येतो. शेवटामुळे मनात पुन्हा एकदा प्रथमपासून कथेची नकळत उजळणी होते.

कथेच्या आशयाचे नव्याने आकलन होते आणि कथेची वीण अधिकच घट्ट होते. या शेवटाच्या प्रकाशात कथेत सहज म्हणून वाटणारे प्रसंग, संवाद विलक्षण अर्थपूर्ण होतात.

**परंपरागत सूत्रांचा नवा वापर**

कथेची सूत्रे परंपरागत ठेवून नव्या आशयाची कथा सांगणे हे मिरासदारांच्या कथेचे एक कलात्मक वैशिष्ट्य ठरते. पशुसृष्टीचे मानवीकरण व दूरस्थ काळाचा उपयोग ही या प्रकारची दोन रचनासूत्रे आहेत. पशुसृष्टीचे मानवीकरण करण्याची

पंचतंत्र, हितोपदेश, इसापनीती या पुस्तकातील पद्धती नव्या कल्पकतेने आणि कलात्मकतेने मांडण्याचा प्रयत्न मिरासदारांनी केला आहे. राजकारणातील भ्रष्ट अपप्रवृत्तीचे भेदक व परिणामकारक प्रकटीकरण करण्यासाठी मिरासदारांनी मुख्यत: प्राणीसृष्टीचा आधार घेतला आहे. अर्थात या कथा केवळ साचा बनून येत नाहीत तर मिरासदारांच्या प्रतिभेची ती एक कलात्मक झेप आहे असे लक्षात येते.

**घाटदार कथावस्तू**

मिरासदार यांची कथावस्तू फार घाटदारपणे येते. कथावस्तू तपशीलात विस्तारताना जो संयम व औचित्यदृष्टी दर्शविली जाते ती उल्लेखनीय आहे. 'हरवल्याचा शोध' या कथेत जावईबापूंचे प्रत्येक माणसांशी होणारे भाषण ही एक कथाच आहे. परंतु या कथा मूळ गात्र्याशी आा एकजीव गुंफल्या गेल्या आहेत की, मूळ कथेचे सौष्ठव अधिक खुलून दिसावे. क्रमवारीने घडणारे अनेक प्रसंग सांगताना अनेकदा कथेला जंत्रीचे स्वरूप प्राप्त होण्याचे भय असते. परंतु मिरासदारांची कलादृष्टीने जागरूकपणे हे अवधान सांभाळते.

**वैशिष्ट्ये**

एकूणच मिरासदारांच्या कथांची रचनासूत्रे अभ्यासली असता लक्षात येते की, त्यांची कथा आशयाला अपरिहार्यपणे लाभलेल्या रुपाचा प्रत्यय देणारी कथा आहे. विरोधाबंध, वास्तव व भास, घाटताचे साद पडसाद ही रचनासूत्रे ते कलात्मक पद्धतीने वापरतात.

नव्या आशयांची मांडणी जुन्या आशयाची मांडणी जुन्या परंपरागत कथनपद्धतीने करणे, संस्कृतप्रचुर जुन्या वातावरणातून नवा आशय अभिव्यक्त करणे, दूरस्थ काल्पनिक पार्श्वभूमी घेऊन वास्तवाचे सूचन करणे अशा कथासूत्रामुळे मिरासदारांची कथा आशयानुगामी होते. जुन्या कथेशी ती आपले नाते टिकवून ठेवते. शं. वि. वैद्य यांचे या संदर्भातील विवेचन येथे बोलके ठरावे. नवकथेने मराठी वाङ्मयात एक नवा जो दार प्रवाह आणून सोडला आणि कथेच्या पारंपारिक कल्पनांना एक जोरात हादरा दिला हे खरे परंतु परंपरेने कथेला जो आकार प्राप्त झाला होता त्यात काही कलेची, काही कलावंतांची आणि काही वाचकांची सोय आपोआपच साधत होती.

**समारोप**

रुपवादी साहित्यमीमांसकांनी कलाकृतीच्या रचनासंबंधाविषयी केलेल्या विचारांच्या प्रकाशात मिरासदारांच्या कथाविश्वाच्या घडणीचा, त्यांच्या रचनाबंधाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मिरासदारांच्या कथातील सौंदर्यपूर्णता ही त्यातील विरोधलयाच्या वापरातून प्रतीत होते. प्रारंभापासून शेवटाकडे अपरिहार्यपणे जाणारा हा विरोधबंध कथेची आशयात्मक वीण घट्ट करीत जातो. विरोधबंध या रचनासूत्रामुळे कथानकाचे प्रारंभ-मध्य-शेवट एकमेकांशी अपरिहार्यपणे जुळले आहेत. कथा उजळणारे शेवट हे मिरासदारांच्या कथांचे एक प्रभावी एक प्रभावी रचनासूत्र आहे. संपूर्ण कथात्म आशयाला खोली प्राप्त करून देणारे मिरासदारांच्या कथांना सूचकतेचे परिणाम प्राप्त करून देणारे आहेत. कथेची सूत्रे परंपरागत ठेवून नव्या आशयाची कथा सांगणे हे मिरासदारांच्या कथेचे एक कलात्मक वैशिष्ट्ये आहे. पशुसृष्टीचे मानवीकरण व दूरस्थ काळाचा उपयोग ही या प्रकारची दोन रचनासूत्रे आहेत. या जुन्या पारंपरिक कथासाच्यातून नव्या आशयाचा तिरकस वेध घेण्यात मिरासदारांची कथा परिणामकारक ठरते. कथावस्तूचा घाटदारपणा हे रचनासूत्र मिरासदारांच्या संयमी व औचित्यदृष्टीचा परिपाक ठरते.

विरोधाबंध, वास्तव व भास यांच्या बंधाचे रचनासूत्र, घटिताच्या साद-पडसादाचे रचनासूत्र, ढोबळ अनुकरणाचे रचनासूत्र तसेच कथा उजळविणारे शेवट, परंपरागत सूत्रांचा नवा वापर, घाटदार कथावस्तू अशा विविध रचनावैशिष्ट्यांनी मिरासदारांच्या कथेचा सौंदर्यपूर्ण घाट उलगडत जातो.

★★★

# चरित्र या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास

**सौ.सुनिता विनोद पारे**

**प्रस्तावना:**

एकोणिसव्या शतकात इंग्रजी वाङ्मय व भाषेच्या संस्कारातून मराठीमध्ये विविध वाङ्मयप्रकार उदयास आले. कथा, कादंबरी, कविता, नाटक या साहित्य प्रकारात विपुल लेखन झाले याच काळात चरित्र–आत्मचरित्र यांची सुरूवात झाली. स्वातंत्र्योत्तर काळात मात्रा या साहित्य प्रकारात लेखन संख्येने कमी झालेले दिसते. असे असले तरी चरित्र व आत्मचरित्र यांचे महत्त्व कमी होत नाही चरित्र व आत्मचरित्र यांचा एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून अभ्यास करण्यासाठी त्यांचे स्वरूप आणि वैशिष्टये जाणून घेणे आवश्यक आहे.

**चरित्र व्याख्या:**

मराठीमध्ये इतर साहित्य प्रकारांच्या तुलनेने चरित्र वाङ्मयाची निर्मिती अल्प प्रमाणात झाली आहे. दुसऱ्या व्यक्तीबद्दल लिहणे यास चरित्र म्हणतात .म्हणजेच एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनाचा शोध घेत असते कोणत्याही व्यक्तीचा अथपासून इतिपर्यंतचा वृत्तांत म्हणजे चरित्र होय अशी चरित्रची सर्वसाधारण व्याख्या केली जाते.

एका व्यक्तीचे जीवन अशी चरित्रची कार्लाईलने सर्वात सोपी व संक्षिप्त व्याख्या केली आहे एका व्यक्तीच्या जीवनातील घटनांची नोंद करून त्यांच्या व्यक्तित्वाचे कालात्मकतेने आणि हेतुपुरस्सर पुनर्दर्शन घडविणारे साहित्य म्हणजे चरित्र आशी एन्सायकलो पीडीया ब्रिटानिकामध्ये चरित्रची व्याख्या आहे. तर वेबस्टर डिक्शनरीत एका व्यक्तीच्या जीवनातील कथन केलेला वृत्तांत म्हणजे चरित्र होय.

चरित्र म्हणजे मनुष्याच्या क्रियाशील जीवनाचा म्हणजे त्याच्या आचाराचा विचारांचा.विचारांचा आणि मनाचा एक आराखडाच असतो. त्या आराखडयाचे रेखाटन करताना इतिहास आणि कला यांचा मनोहर मेळ साधावा लागतो. (प्रस्तावना सावरकर चरित्र) वरील व्याख्यांवरून कोणत्याही व्यक्तीचा जन्मापासून मृत्यू पर्यंतचा इतिहास म्हणजे चरित्र असे म्हणता येईल. आपल्या पेक्षा कर्तृत्वाने

गुणाने व कार्याने महान बनलेल्या व्यक्तींचे जीवन दर्शन करावे. या आपुलकीच्या भावनेतून चरित्रसारख्या साहित्याचा जन्म् झाला. चरित्रग्रंथ हे राष्ट्राच्या समाजाच्या विकासासठी आणि उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरत असतात. अशा चरित्रंविषयी एस् समाइल्स हा लेखक म्हणतो, चरित्रलेखनातून अप्रत्यक्ष लोककल्याणाचे लोकसंस्काराचे व पर्यायाने संस्कृती संवर्धनाचे कार्य चरित्रकार करीत असतो. थोरांचे जीवन, विचार, कर्तृत्व, ध्येये यांचे आलेख चरित्ररूपाने समाजासमोर ठेवून त्याला कार्यप्रवृत्त आणि संस्कार संपन्न करणे ही सुद्धा एक प्रकारची राष्ट्रसेवाच झाली आहे. थोर पुरुषांची चरित्रे ही राष्ट्राची संपत्ती आहे. या थोर व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातून सामान्य माणसांना प्रेरणा मिळते. त्यांच्या मार्गदर्शनाने आत्मविश्वास वाढतो. जीवनातील प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड देण्याचे बळ मिळते. थोरांच्या विचाराने प्रभावित होऊन कार्यकर्ते गेले. तर समाज मनावर होणारे परिणाम फार विशाल व चिरस्थायी असतात. तसेच समाजाची प्रगती ही झपाट्याने होते. म्हणजेच चरित्रग्रंथ हे राष्ट्राच्या समाजाच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरत असतात चरित्र स्वरूप व्याप्ती आणि वैशिष्ट्ये :

'चरित्र' ला इंग्रजी प्रतिशब्द हा आहे. ह्या शब्दाची व्युत्पत्ती ग्रीक शब्दांच्या एकत्रीकरणातून झाली आहे. त्याचा अर्थ जीवन (चरित्र) लिहिणे असा आहे.

डायडनने प्रथमतः ह्या शब्दाचा उपयोग केला. त्याच्या मते चरित्र म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनाचा विकास किंवा इतिहास होय. या व्याख्येमुळे चरित्राचे इतिहासाशी बरेच साम्य असल्यासारखे वाटते कार्लाईलच्या मते चरित्र म्हणजे एका व्यक्तीचा इतिहास आणि चरित्रे म्हणजे राष्ट्राचा इतिहास. परंतु राष्ट्राचा इतिहास आणि व्यक्तीचा इतिहास यात फरक आहे. राष्ट्राच्या इतिहास हा व्यक्तींच्या कृतींमुळे घडत असला तरी त्याला केवळ व्यक्तीच जबाबदार नसतात. तर त्याचबरोबर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक इत्यादी घटनाही जबाबदार असतात. 'इतिहासात राष्ट्र, समाज व मानव यांच्या जीवनात घडलेल्या घटनांची संगतवार नोंद असते, तर चरित्रात एका व्यक्तीच्या जीवनात घडलेल्या घटनांची संगतवार नोंद असते.' यावरून मानवी जीवनातील घटनांची संगतवार हकीगत हा दोहोंत असते एवढेच साम्य आहे.

'जीवन घटनांचा वृत्तांत' म्हणजे चरित्र होय. अशी चरित्राची सरळ व्याख्या करून ऑक्सफर्ड कोशकार म्हणतो, 'चरित्र' हा एका व्यक्तीच्या जीवनाचा

इतिहास होय. त्याने चरित्रात एक व्यक्ती 'इतिहास' आणि 'साहित्य' या तीन गोष्टींचा समावेश केला आहे. या महत्त्वाच्या तीन घटकांवरच चरित्राची इमारत उभी राहते. इतिहासामुळे त्यात सत्य घटना सापडतात. व्यक्तीमुळे मानवी स्वभावाचे व जीवनाचे दर्शन घडते आणि साहित्यामुळे त्यास आपोआपच कलामूल्य प्राप्त होते. इतिहास हे शास्त्र आहे, तर चरित्र हे कला आहे. थोडक्यात व्यक्ती जीवनाचे कलात्मक दर्शन म्हणजे चरित्र असे म्हणता येते.

ऐतिहासिक सत्य हा चरित्र लेखानाचा मूलाधार आहे. चरित्र नायकाचे चित्रण करताना चरित्र लेखकाला ऐतिहासिक सत्याचा आधार घेणे आवश्यक असते. चरित्रनायक हा चरित्र लेखनाचा महत्त्वाचा घटक आहे. चरित्र नायक हा कर्तबगार, थोर, असामान्य गुण असलेला पाहिजे. असामान्य गुणांबरोबरच सामान्य माणसांप्रमाणेच दोष ही त्यात असणार आहेत. माणूस हा गुणदोषांचे विचित्र मिश्रण आहे. असे गुणदोषयुक्त माणसाचे चित्र चरित्र असते. सामान्य माणसातील असामान्य गुणदर्शनाने चरित्रनायक हा आपल्यातीलच आहे, असा भाव वाचकांच्या ठायी निर्माण होतो. गुण-दोषयुक्त असे मानवी व्यक्तितत्त्व हा चरित्राचा केंद्रबिंदू असतो. त्याचे यथार्थ दर्शन चरित्रकाराने चरित्रातून घडवावे. चरित्र नायकाविषयी लेखकाच्या मनात जिव्हाळा, आपुलकी असावी, तसेच चरित्र नायकाच्या जीवनाकडे तटस्थपणे पाहण्याची वृत्तीही त्याच्या अंगी असावी. चरित्र नायकाच्या जीवनातील विविध प्रसंग निर्भीडपणे, निःपक्षपाती बुद्धीने, प्रामाणिकपणे वाचकांसमोर मांडण्यासाठी तटस्थवृत्ती असावी लागते. तटस्थ वृत्तीमुळे गुणागुणांचे योग्य मूल्यमापन करता येत. तटस्थ वृत्तीबरोबरच समरसता किंवा सहानुभूती चरित्र नायकाकडे असावी. जीवनातील विसंगतीची मीमांसा सहानुभूतीमुळे करता येते.

चरित्र लेखनात चरित्र नायकाचे जीवन दर्शन घडविताना चरित्र नायकाच्या सभोवतीच्या समाजाचे, परिस्थितीचे आणि चरित्र नायक ज्या कालखंडातील आहे त्या कालखंडाचे संदर्भ चरित्र लेखनात येणे हे महत्त्वाचे असते. चरित्रनायकाच्या आयुष्यात ज्या ज्या चळवळींशी त्याचा संबंध आला असेल त्या त्या चळवळींमुळे त्यांच्या व्यक्तित्वाला कितपत उठाव मिळतो. हे पाहून त्याप्रमाणे त्या चळवळींना चरित्रात स्थान मिळाले पाहिजे. तसे करताना त्या चळवळींनाच जास्त महत्त्व मिळून चरित्रनायक त्या ढिगाऱ्याखाली दडला जात नाही ना याची लेखकाने काळजी घेतली पाहिजे. त्या चळवळी पार्श्वभूमीसारख्या मागे राहिल्या पाहिजेत

व चरित्रनायक वाचकांसमोर प्रामुख्याने वावरला पाहिजे. म्हणजे चरित्रात घटनांपेक्षा व्यक्तीला महत्त्व असते. व्यक्तीच्या सभोवतालच्या परिस्थितीचा आढावा त्याचे व्यक्तिमत्त्व साकारताना घेतला जातो.

एका व्यक्तीच्या जीवनातील घटनांचे प्रांजल आणि तितकेच कलात्मक निवेदन म्हणजे चरित्र, अशी हॅरॉल्ड निकोल्सन यांची कल्पना आहे. यात निकोल्सन याने कलात्मकतेला महत्त्व दिले आहे तर सिडने ली चरित्राला म्हणजे मानवी व्यक्तितत्त्वाचे सत्यपूर्ण व कलात्मकदर्शन असे म्हटले आहे. एन्सायक्लीपीडीया ब्रिटान्निकामध्ये चरित्रचे स्वरूप मानवी स्वभावाशी, व्यक्तित्वशी अधिक निगडीत असल्याचे स्पष्ट केले आहे. वरील तीनही लेखकांच्या वर्णनावरून सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तिदर्शन हेच चरित्रचे स्वरूप असल्याचे स्पष्ट केले आहे.

चरित्रकाराने चरित्रनायकाच्या जीवनातील सत्य घटना, प्रसंग हे सत्याच्या कसोटीवर तपासले पाहिजेत तसेच त्याने जिज्ञासू व चिकित्सक असावे. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू लेखकाने कलात्मकतेने चित्रित करणे, उलगडून दाखविणे महत्त्वाचे असते त्याच्या स्वभावाचे विशेष, त्यासाठी त्याच्या जीवनातील घटना, प्रसंग त्याला सामोरे जावे लागणारी परिस्थिती याचे प्रांजळ वर्णन व्यक्तिदर्शनात घडले. व्यक्तिदर्शन करताना आनुवंशिक संस्कार, प्ररिस्थिती, कौटुंबिक जीवन, विशेषतः कामजीवनातील साफल्य अथवा वैफल्य यांचा विचार टाकू नये. कारण व्यक्तिदर्शनाबरोबरच चरित्रनायकाच्या कतृत्त्वाचे मूल्यमापनही होत असते.

चरित्र या साहित्यप्रकार लेखनात चरित्रलेखनाच्या सामग्रीला विशेष महत्त्व असते. या सामग्रीच्या आधारे लेखक चरित्र लेखन करू शकतो. चरित्रनायकाने लिहिलेली तसेच इतरांना पाठवलेली पत्रे, चरित्रनायकाची दैनंदिनी, त्याच्या विषयीच्या आठवणी असे या सामग्रीचे स्वरूप आहे. या सामग्रीचा चरित्रलेखनात उपयोग केल्याने चरित्र लेखनाला सत्याचे अधिष्ठान प्राप्त होते. चरित्रस एक विश्वसनीयताही प्राप्त होते. त्याचबरोबर चरित्रकाराच्या संशोधक वृत्तीला चालना मिळते. चरित्राच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी देखील या साधन सामग्रीचा उपयोग होतो. ललित साहित्यातील भाषेप्रमाणेच चरित्र वाङ्मयामध्ये भाषाशैली यांना खूप महत्त्व असते. चरित्रामध्ये माहिती देणे याला महत्त्व नसून कलात्मक वर्णनास महत्त्व आहे. चरित्रनायकाची भाषाशैली व वर्णनशैली चरित्रत महत्त्वाची असते. सहज खेळकर भाषापद्धती असावी. सहजसोपी शैली असावी,

यामुळे चरित्रे मनोवेधक होतात. काव्यमयतेलाही आवश्यक तेथे स्थान असावे. थोडक्यात खेळकर प्रसन्नभाव, ललितरम्य भाषाशैली व वर्णनशैलीला चरित्रात महत्त्व आहे.

चरित्र म्हणजे केवळ कालानुक्रमाने दिलेली घटनांची जंत्री नव्हेः तर निश्चित उद्दिष्ट, निखळ संशोधन, निवडीचे तारतम्य, कल्पक संरचना, जिवंत व्यक्तिदर्शन, आकर्षक शैली यांनी मंडीत अशी ती एक एकसंघ कलाकृती असते. अशी विश्वकोशात चरित्रची व्याख्या स.गं.मालशे यांनी केली. यावरून चरित्राचे स्वरूप व वैशिष्टये यांची कल्पना येते.

**चरित्रचा हेतू –**

चरित्रचा विषय मानव आणि मानवी जीवन आहे. चरित्रचा समावेश वाङ्मय प्रकारात केला जातो. चरित्र हा वाङ्मयकलेचा भाग असल्याने चरित्रनायकाचा गौरव करणे, त्याच्या जीवनापासून बोध घेणे, या हेतूत बदल करता येणार नाही.

कोणत्याही प्रकारे आपले अस्तित्व टिकून रहावे, ही प्रत्येकी मनुष्याची इच्छा असते. आपल्या प्रिय व्यक्तीची स्मृती कायम राहावी, ही पण अशीच एक इच्छा असते. यातून चरित्रग्रंथाला चालना मिळते. मृत व्यक्तीची स्मृती कायम टिकवण्याच्या हेतूने चरित्र ग्रंथ लिहिले जातात.

स्मृती टिकवणे या हेतूक्येवरच जीवनापासून काही चांगल्या गोष्टी शिकणे म्हणजे बोध घेणे हा चरित्र लेखनामागील हेतू आहे. जगातील असामान्य थोर पुरुषांच्या कर्तृत्वाची कालक्रमानुसार गौरवगाथा गाणारा ग्रंथ म्हणजे चरित्रग्रंथ होय. थोर व्यक्तींच्या व्यक्तित्वातून सामान्य माणसांना काही बोध मिळवा हा चरित्र लेखनामागील प्रमुख उद्देश आहे. चरित्रापासून बोध किंवा उपदेश मिळतो. एका व्यक्ती माहिती मिळते. चरित्राचा हेतू नुसती माहिती पुरविण्याचा नसून मनुष्याच्या व्यक्तित्त्वावर प्रकाश पाडण्याचा आहे! असे स्ट्रचीचे म्हणजे असे. कित्येकवेळा भरपूर माहितीने भरलेल्या चरित्रापेक्षा चरित्र नायकाच्या आयुष्यातील एका विशिष्ट भागाचेच कलात्मक वर्णन केले असता त्याचे व्यक्तित्त्व जास्त स्पष्टपणे उमटू शकते.

आपल्या प्रिय आणि आदरणीय व्यक्तींचा गुणगौरव करण्याच्या हेतूने ही चरित्र्ये लिहिली जातात. गुणवर्णन हा हेतू असल्याने दोषदिग्दर्शनाला स्थान

नसते. त्यामुळे या चरित्रातील व्यक्तींचे चित्रा अतिमानवी असे रेखाटले जाऊ लागले. तर चरित्रात अवास्तवता येऊ शकते. विशिष्ट मूल्यांच्या जपणुकीसाठी, पूजेसाठी आणि श्रेष्ठ व्यक्तीबद्दल वाटणा-या आदरापोटीही काही चरित्रे लिहिली जातात. चरित्र लिहिण्याचा खरा उद्देश नीतीबोधाचा किंवा गौरवाचा नसून व्यक्तीचे हुबेहुब चित्र रंगविण्याचा आहे. मानवी स्वभवाचे, मानवी व्यक्तित्वाचे दर्शन घडविणे हा आहे.

सिडने ली या प्रसिद्ध ग्रंथकाराने चरित्रचा हेतू व्यक्तित्त्वाचे सत्यपूर्ण चित्रण असा सांगितला आहे. या त्याच्या व्याख्येतील सत्यपूर्ण व प्एस्नेलतिय- व्यक्तित्व- या दोन शब्दांमध्ये आधुनिक चरित्र वाङ्मयाची मुख्य तत्त्वे साठविला आहेत. व्यक्तिदर्शन- या शब्द- प्रयोगावरून चरित्रचा हेतू गौरवाचा किंवा नीतिबोधाचा नसून व्यक्तित्वाचे यधार्थ दर्शन होय हे स्पष्ट होते, व सत्यपूर्ण -या शब्दाने चरित्रलेखनात सत्याचे किंवा वास्तविकतेचे महत्त्व किती आहे हे सिद्ध होते. यावरून 'सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तिदर्शन' हा चरित्र लिहिण्यामागचा हेतू आहे हे लक्षात येते. चरित्रात व्यक्तिदर्शनाला महत्त्व असते. चरित्र ही एक कलाकृतीच आहे. त्यामुळे तीत घटनांची प्रमाण बद्धता व कलात्मक पुनर्रचना यांची अधिक आवश्यकता असते. मानवी स्वभावाचे दर्शन, त्याचा विकास, त्यामागील कार्यकारणमीमांसा, वैयक्तिक आवडनिवड यांना चरित्रात प्राधान्य असते. इतिहासाप्रमाणे दप्तरे, पत्रे, रोजनिशी इ. उपलब्ध सामग्रीच्या आधारे चरित्र लेखन केल्याने त्यात वास्तवता येते म्हणूनच मनोरंजक, चित्ताकर्षक व वाचनीय साहित्य म्हणून चरित्राकडे पाहिले जाते.

**निष्कर्ष** : १९ व्या शतकात मराठीमध्ये अनेक वाङ्मय प्रकार उदयास आले. चरित्र हा याच कालखंडातील एक वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मय प्रकारच्या स्वरूप, वैशिष्टये व हेतू याच्या अभ्यासाअंती खालील निष्कर्ष हाती आले.

१. कोणत्याही व्यक्तीचा जन्मापासून मृत्यूपर्यंतचा इतिहास म्हणजे चरित्र होय.
२. चरित्र ग्रंथ हे राष्ट्राच्या, समाजाच्या विकासासाठी मार्गदर्शक ठरतात.
३. चरित्रात व्यक्ती, इतिहास आणि साहित्य या तीन गोष्टींचा समावेश असतो.
४. ऐतिहासिक सत्य हा चरित्र लेखनाचा मूलाधार आहे.
५. चरित्र नायक हा चरित्र लेखनाचा महत्त्वाचा घटक आहे.
६. गुण दोष युक्त मानवी व्यक्तित्व हा चरित्राचा केंद्रबिंदू असतो.

७. तटस्थवृत्ती, सहानुभूती किंवा समरसता हे गुण चरित्र नायकाकडे असणे आवश्यक आहे.

८. चरित्रात घटनांपेक्षा व्यक्तीला महत्त्व असते.

९. सत्यपूर्ण आणि कलात्मक व्यक्तिदर्शन हेच चरित्रचे स्वरूप आहे.

१०. चरित्र लेखनात साधन सामग्रीला विशेष महत्त्व आहे. या सामग्रीच्या उपयोगाने चरित्र लेखनाला विश्वसनीयता प्राप्त होते. चरित्राच्या सौंदर्यात भर पडते.

११. चरित्र लेखनात साधन सामग्रीच्या उपयोगाने चरित्राकाराच्या संशोधनवृत्तीला चालना मिळते.

१२. चरित्रामध्ये माहिती देण्यास महत्त्व नाही, तर कलात्मक वर्णनास महत्त्व आहे.

१३. चरित्र नायकाची भाषाशैली व वर्णनशैली महत्त्वाची असते.

१४. चरित्राचा विषय मानव आणि मानवी जीवन आहे.

१५. स्मृती टिकवणे या हेतूने चरित्रग्रंथ लिहिले जातात.

१६. गुणगौरव करणे हा देखील चरित्रग्रंथ लिहिण्याचा हेतू आहे.

१७. थोर व्यक्तिच्या व्यक्तीतत्त्वावर प्रकाश टाकणे किंवा सत्यपूर्ण चित्रण करणे हा चरित्र लेखनाचा एक उद्देश आहे.

१८. चरित्राची मांडणी करताना कालक्रमांचे ही भान चरित्रकाराने ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे चरित्राची उत्कंठा व गोडी वाढते.

★★★

# ग्रामीण साहित्यामधील लोककल्पनाबंध

डॉ.राजशेखर शिंदे

**प्रास्ताविकः**

मानवी समाज अनेक अवस्थांतरातून बनला आहे. अशा मानवी इतिहासामधून परंपरा सिद्ध होते. पूर्वपार परंपरा मानवी समाजाला मूल्यवर्धक ठरल्या आहे. मानवी जीवनरीतीचे संचित म्हणजे पूर्वापार जीवन व्यवहार, परंपरेच्या संचिताचे वर्तमानाशी घट्ट नाते असते. परंपरा जीवन व्यवहाराची विशिष्ट संकल्पना बनते. प्रत्येक राष्ट्रांची, धर्माची, समूहाची, प्रदेशाची विशिष्ट परंपरा बनते. त्या परंपराच्या संचिताच्या संक्रमणामुळे समूहाचा संवेदनस्वभाव तयार होतो. समूह आपली परंपरा टिकविण्यासाठी धडपड करत असतो. पूर्वी मौखिकतेने कथन परंपरेन/परंपरा टिकविण्यासाठी प्रयत्न होत. आज हे प्रयत्न अनेक माध्यमांद्वारे होत आहेत. त्यातील ग्रामीण साहित्य हे विश्वाई साधन आहे. कारण दूरगामी परिणाम साधणारे, पुनःसर्जन करणारे असे साहित्य असते. लोकजीवनातील अनेक रूढी, समजूती, राहाटी, रीती, वाङ्मयामधून प्रकट झाल्या आहेत. त्यामुळे साहित्यातील लोककल्पनाबंधाचा शोध एक सुंदर प्रत्यय आहे. विशेषतः ग्रामीण साहित्यातील लोकतत्त्वीय अनुबंधाचा अभ्यास अभ्यासनीय ठरेल. 'भूजंग' शंकर पाटील, 'दवणा' चि.त्र्य.खानोलकर, 'उंबरफुल' भास्कर चंदनशिव, 'एक होता कावळा' राजन गवस, 'कावळ्यांची सुगी' अर्जून व्हटकर या कलाकृतीचा लोकल्पनाबंधांच्या अनुषंगाने प्रस्तुतच्या लेखात उकल करण्याचा प्रयत्न केला आहे.

'भुजंग' ही शंकर पाटलांची जुनी व लोकप्रिय, कसदार अशी कथा आहे. तीवर मराठीमध्ये चित्रपटसुद्धा निघालेला आहे. शेतकऱ्यांना अनेक प्रसंगांना, अडीअडचणींना सामोरे जावे लागते. कुटुंबकर्ती स्त्री असेल तर हे प्रसंग आणखी बिकट होतात. याची अनुभूती 'भूजंग' कथेच्या नायिकेच्याद्वारे येते. नायिका जनाईची पुरती पखड होते. घरात वयात आलेली लेख आणि तीन लहान मुले असा तिचा परिवार. या मुलांसकट ती नवऱ्यालाही पोसते तिच्या नवऱ्याला भस्म्या रोग झाला आहे. खाल्ले की भस्म होते. पुन्हा भूक आहेच आणि भूक भागविण्यासाठी तो काहीही खातो. नवऱ्याच्या या भुकेने बेजार झालेली असहाय्य

जनाई शेतात काम करून जगते. ऊसा-जोंधळ्याला स्वतः पाणी देते. तिची थोरली लेक बापाकरीता भाकरी करून करून वैतागलेली आहे. तिच्या तोंडून बापाविषयी तिरस्कार व्यक्त होतो. ''आणि आएऽऽ तू ऊसाला पाणी पाजायला गेल्यावर एक मापटभर तुरीच वट्यात घेऊन खाल्या; नुसत्या तुरी काडकाड फोडून खाल्या.'' ''मी तरी काय करू? चपात्या कराव्यात म्हणून कणिक भिजवून ठेवली तर सगळा गोळाच उचलून नेला आणि बसून सारी कणिकच खाऊन टाकली!'' यावरून जनाईच्या नवऱ्याच्या भुकेची आणि लेक सुशा हिच्या मनामधील वडिलांविषयी तिरस्काराची कल्पना करता येईल.

'भुजंग' या कथेत साप ही एक प्रतिमा आहे, त्याला काही प्रतिमानके आहेत. लोककल्पनाबंधांचे उपयोजन शंकर पाटील यांनी सुंदररीत्या केले आहे. साप पुल्लिंगाकार. तो कामवासनेचा प्रतीक समजला जातो. म्हणून घरातील वयस्कर लोक सायंकाळी साप हा शब्द उच्चारू देत नाहीत. याचे कारण तो वासनारूप व त्याचे पुल्लिंगाकार होय. वयात आलेल्या लेकीबाळींना तो शब्द झोपताना उच्चारू न देण्याचे हे कारण, त्यामागे अशी लोकधारणा आहे. त्याऐवजी वा, दावं, लांबड, जनावर, अशा पर्यायी शब्दाने त्याचा उल्लेख केला जातो. तो वासनाप्रतीक आहे म्हणून प्रियकर किंवा पती म्हणून ओळखला जातो. लोक जीवनात भुजंगाविषयी आणखी एक समज रूढ आहे. ती समज अशी की नाग आपला पूर्वज आहे. त्याचे आपल्या जमीनजुमल्यावर बारीक लक्ष असते. तो जायदातीचा रक्षक म्हणून काम पाहतो. रात्री अपरात्री सळसळतो. शेतामध्ये कोणी नसताना फिरून पहारा करतो.

''आपल्या रानात एक भुजंग आहे- पंधरा-वीस एकर रान फिरतोय, अस आपल्या वाडवडिलांकडून भाऊबंदांनी ऐकलं होतं. ऐकून सगळ्यांना माहीत होतं. पण गेल्या काही वर्षांत त्याचं नाव कधी निघालं नव्हतं. कधी कुणाशी गाठभेट नव्हती. एकदा-दोनदा त्याची कात तेवढी रानात आढळली होती. त्यावर त्याचा कधी दूम नव्हता. कैक वर्ष त्याचा विसर पडल्यागत झाला होता.'' हे कथेतील निवेदन सापाच्या रक्षणकर्त्या लोकसमजाचे प्रतीक आहे. भुजंग वस्तीवर जाऊन जनाईला विश्वास देण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या अशा वागण्याने ती वैतागलेली होती. म्हणूनच ती त्याला म्हणते, ''तुझ्या भयानं कापनी केली नाही तर हे पीक ऱ्हाईल? कुणाचं कुणी येऊन रातोरात लुटून नेतील बाबा! टाचा घासत मरायची पाळी येईल माझ्या पोरास्नी! माझ्या मालकाला

अडिशिरीच्या भाकरी एका येळला फुरं पडत न्हाईत. कसं दिसतकंडू मग? काय भरून घालू त्याला? हे बघ, कापनी केल्याशिवाय का हितनं माघार जानार न्हाई! खुळ्या, गड्यास्नी द्यायला माझ्याजवळ पैसे न्हाईत म्हणून सगळं घरनं कराय लागलो आणि त्यास्नी भ्या दावून हुसकावून लावलंस! मग काय म्हनायंच तुला? काय लई शानपना दाखवलास व्हय यात!'' म्हणून खंबीरपणे कापणीला सुरूवात करते.

प्राण्यांच्याप्रमाणे पक्ष्यांनाही लोकजीवनात आधार आहे. पशुपक्ष्यांच्या आधारामुळे मानवाचे जगणे सुसाहाय्य झाले आहे. कावळा हा पक्षी मराठी वाङ्मयात फार जुना आहे. महानुभावीय वाङ्मयात 'कावळा-चिमणीची' गोष्ट आहे तर ज्ञानेश्वरांच्या 'पैल तोगे काऊ कोकताहे.....' या अभंगात कावळा येतो. आज समकालीन जीवनात 'एक होता कावळा' ही राजन गवसांची तर 'कावळ्यांची सुगी' ही अर्जून व्हटकरांची कथा कल्पनाबंधामधील गूढपणा वाढवतात. कावळ्याला हिंदू धर्म संस्कृतीमध्ये महत्त्व आहे. कावळा सायंकाळच्या सुमारास घरासमोर बसून ओरडू लागला म्हणजे पाहुणा येणार एक संकेत रूढ आहे.

बाराव्याला-तेराव्याला घास शिवण्याकरीता, श्राद्धाचा घास शिवण्याकरीता कावळा हाच पक्षी लागतो. तो घास शिवला म्हणजे मृतांच्या जीवाला मुक्ती मिळाली असे समजले जाते. घास शिवला नाही तर मृतकाचे जीव अजून कशामध्ये तरी आडकला आहे, त्याची इच्छा अपूर्ण राहिली, म्हणून कावळा घास शिवत नाही, घास शिवला नाही म्हणजे मुक्ती मिळाली नाही.

याउलट कावळ्यांच्या जगात वेगळी समज आहे. कावळे माणूस प्राण्याला महापापी समजतात. माणसाच्या मृत्यूनंतर आपण माणसाला मुक्ती देतो, अशी त्याच्या समज आहे. कावळे जिवंत माणसांना शिवत नसतात. एखादा कावळा शिवलाच तर त्याला इतर कावळे मिळून मारून टाकतात. या कल्पनाबंधावर राजन गवस यांनी 'एक होता कावळा' ही मोठी सुंदर, कसदार अशी कथा लिहिली आहे.

माणसाला शिवणाऱ्या कावळ्याला इतर कावळे मारून टाकतात. हे लोकदर्शनात आहे. परंतु जिवंत कावळा माणसाला शिवला की, कावळा लागला असे म्हटले जाते आणि कावळा लागणाऱ्या त्या व्यक्तीचे मरण साजरे केले जाते. कावळा लागला म्हणून सांगावा धाडला जातो 'एक होता कावळा' या

कथेमधल्या पंडित मास्तरांच्या पत्नीने असा सांगावा धाडून पतीचे मरण साजरे केले. म्हणजे मरण पुढे जाते अशी समज या मागे असते. पंडित मास्तरांच्या बायकोने पाहिलेले असते, की मास्तर शाळेला जाताना कावळ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला होता. म्हणून तिने 'कावळा लागल्याचा सांगावा' धाडला बांबूकिकर मास्तर लोकांनी लगेच आपल्या संकेतानं सगळ्या गोतावळ्याला निरोप पाठवला तो मरण पावला म्हणून. 'एक होता कावळा' मध्ये मृत्यूची भीती व्यक्त झाली आहे. मृत्यू कोणाला चुकलेला नाही. कावळा शिवणे ही मृत्यूची भयंकर भीती आहे.

आनंद, शुभाशकून, ईश्वरी संकेत, निसर्गावर मात, मृत्यूची भीती, कामवासना अशा किती तरी गोष्टी लोकसमजामधून दिसून येतात. आत्मप्रौढी, संतती रक्षण, संतती प्राप्ती सारख्या गोष्टीही लोककल्पनाबंधातून स्पष्ट होतात. 'वासना' प्राप्ती झाल्याचे भास्कर चंदनशिव यांच्या 'उंबरफुल' या प्रतीकमधून स्पष्ट होते. विधव मंजक्का वयात आलेल्या लेकीस-आवडीस मोलमजुरी करून पोसत आहे. गावात दामोदर नावाचा एक नपुंसक आहे. मंजक्कासोबत खुरपणीच्या कामाला जातो. बायकात रमतो बायकांच्या साऱ्या गोष्टी त्याला माहितीच्या आहेत. संपूर्ण गाव त्याला दामैल्ये (दाम्या+आत्या) म्हणते. एक दिवस मध्यरात्रीला मंजक्का उटते तर आवडी राखेत ठेवलेली पपई खाताना दृष्टीस पडते. ती आवडीला खोदून खोदून कोणाचं गं? कोणाचं गं? म्हणून विचारते, तर आवडी 'दाम्याचं की' म्हणते, मंजक्का चक्रावून जाते. कारण दाम्या तर नपुंसक!

सारांश, मानवी समाज अत्यंत प्रगत आणि तरीही विकसनशीलचं असतो. तरीही परपुष्टच आहे. त्याला जगण्याकरीता अनेक काल्पनिक गोष्टींचा आधार घ्यावा लागतो. कधी ताण कमी करण्यासाठी, कधी मैथूनादी गोष्टीसाठी लोककल्पनाबंध-रूढी, समज, चालीरीती या अशा आभासातून निर्माण झाल्या. नैसर्गिक आपत्ती, शरीर प्रतिकूलता, निसर्गातील बदल या सर्वांपुढे माणूस हतबल असतो. हे सारे बदल समजून घेणचे शास्त्र अतिप्राचीन काळात अस्तित्वात होते का? त्या साऱ्या गोष्टी समजून घेण्यातून, त्याचा अर्थ लावण्यातून जीवनाशी त्यांचा अन्वय लावण्यातून असे वर्तनविज्ञान, नीतीविज्ञान या कल्पनाबंधामधून उदयास आले असावे. हे ग्रामीण कथात्म साहित्यातून आज कल्पनाबंधातून आविष्कृत होत आहे. त्यामधून आपल्या परंपराचे आणि संस्कृतीचे संवर्धन होते, संस्कृतीची जोपासना होते.

★★★

# 'आंतरविद्याशाखीय अभ्यासाचे स्वरूप व साहित्य आणि समाज यांचा संबंध'

प्रा.सौ.प्रज्ञा लामपुरे

इंग्रजीत Interdisciplinary हा शब्द आहे. त्यासाठी मराठी आंतरविद्याशाखीय, आंतरविद्याक्षेत्रीय इत्यादी प्रतिशब्द वापरले जातात. या पद्धतीत साहित्याच्या कोणत्यातरी एका अंगाची ललितेतर साहित्याची तुलना केली जाते किंवा त्यांचा एकमेकांवर कोणता प्रभाव आहे हे दाखविण्याचा प्रयत्न असतो. खरे तर तौलनिक साहित्यभ्यास किंवा साहित्य व इतर विद्याशाखांचा अभ्यास हा पाश्चात्त्याकडून आपल्याकडे आलेला आहे. १९ व्या शतकात या विचाराला सुरूवात झाली. विशेषतः १९४५ नंतर या विषयावर विचार होऊ लागला. हे जरी खरे असले तरी आपल्या प्राचीन साहित्यापासून ते आजपर्यंतच्या साहित्यात इतर ज्ञानशाखांच्या पाऊलखुणा सापडतात. पाश्चात्त्य दृष्टिकोनाचा परिणाम म्हणून साहित्याचे समाजशास्त्र, साहित्याचे तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्रीय समीक्षा अशा अध्ययन आणि समीक्षा अकरण्याच्या दिशा धुंडाळल्या जाऊ लागल्या. आधुनिक काळात ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि मानसशास्त्रीय विषयांचा आधार घेऊन बरीच साहित्यनिर्मिती झाली आहे व या साहित्यातून काही सामाजिक, विज्ञानातील सिद्धांताचा संकल्पनांचा आणि निष्कर्षाचा उल्लेख येत असतो. थोडक्यात विविध ज्ञानक्षेत्रे, शास्त्रे ही आंतरविद्याशाखीय अनुशासने यादृष्टीने अभ्यासली जात आहे. ज्ञानशाखांचा परिणाम साहित्यावरही होतो.

आंतरविद्याशाखीय अभ्यास कसा महत्त्वपूर्ण आहे हे सांगताना डॉ.दु.का.संत यांनी एक उदाहरण दिले आहे. ते म्हणतात. ''अमेरिकेला टेनेसी व्हॅली प्रकल्प खूप गाजला. टेनेसी ही १२५ मैल लांबीची एक नदी आहे. तिला महापूर यायचे आणि त्यामुळे नुकसान खूप व्हायचे. तिला नियंत्रणात आणण्यासाठी अमेरिकन सरकारने विविध क्षेत्रातील तज्ञांच्या समित्या नेमल्या, जलप्रवाहतज्ञ, अर्थतज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ, प्राणिशास्त्रज्ञ, आरोग्यशास्त्रज्ञ, उद्योग अशा कितीतरी क्षेत्रातील तज्ञ लोकांच्या समित्यांनी स्वतंत्ररीतीने पाहणी करून आपले निष्कर्ष सादर केले. गंमत अशी की, अनेक निष्कर्ष परस्पर विरोधी ठरले. त्यामुळे काय करायचे असा प्रश्न निर्माण झाला. त्या भागात मलेरियाचे निर्मूलन करण्यासाठी

झाडे उपटून टाकावी अशी एक समितीने शिफारस केली. तर पुराचा प्रतिबंध करण्यासाठी त्या भागात झाडांची लागवड करावी अशी सूचना दुसऱ्या समितीने केली. म्हणजे समित्यांनी वेगवेगळे निष्कर्ष नोंदविले. सर्व समित्यांनी एकत्र येऊन विचार करणे आवश्यक आहे. याची गरज सर्वांना भासली'' कोणत्याही क्षेत्रातील ज्ञानाला काही मर्यादा असतात. ज्ञानाच्या परस्पर संबंधाची गरज असते. एका क्षेत्रातील ज्ञान दुसऱ्या क्षेत्राला उपयुक्त ठरू शकते. ज्ञानक्षेत्रामध्ये त्यामुळे आंतरविद्याशाखीय संशोधनाला महत्त्व प्राप्त झाले. ही जी विविध शास्त्रे आहेत त्यांचा साहित्याशी असलेला संबंध शोधण्याची दृष्टी निर्माण झाली. दोन विद्याशाखांचा समन्वय साधने महत्त्वाचे ठरले. वेगवेगळ्या विद्याशाखा एकमेकीत मिसळलेल्या असतात. त्यांच्या सीमा जेव्हा एकमेकींना स्पर्शून जातात तेव्हा, त्या सीमा प्रदेशात दोन्हीही ज्ञानक्षेत्रांचा प्रभाव असतो. सर्वच विद्याशाखा, सामाजिक शास्त्र ही मानवाभोवती फिरतात. त्यांच्या सीमारेषा एकमेकांत गुंतलेल्या असतात. म्हणून आंतरविद्याशाखीय अभ्यास गरजेचा वाटू लागला.

सामाजिक शास्त्रे आणि साहित्य दोन्हींचे लक्ष मनुष्यच असावे. या संदर्भात डॉ.सदा कऱ्हाडांचे मत समर्पक वाटते. ते म्हणतात, ''साहित्याला मानवतावादाचे अधिष्ठान असते. साहित्य हे मानव्यसापेक्ष असल्यामुळेच मानवतावादाच्या दृष्टिकोनातून साहित्याचा अभ्यास झाला पाहिजे आणि मानवतावाद ही मानव आणि सामाजिक जीवन या विषयाची विचार प्रणाली असल्यामुळे साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे.'' तर संत साहित्याच्या संदर्भात गो.म.कुलकर्णी म्हणतात, ''संत साहित्याचा परामर्श, समाजनिरपेक्ष अशा केवळ कलामूल्यांनी करणे शक्य असले तरी इष्ट ठरत नाही. कारण असे केल्यास या साहित्याचे सारे रहस्य हाती लागणे अशक्य आहे.'' यातून सामाजिक अंगाचे महत्त्व विशद होते. श्रेष्ठ साहित्य हे परिणामकारक असते. देशकाल परिस्थितीच्या सीमा ओलांडून उभे राहते. कोणत्याही काळात किंवा कोणत्याही परिस्थितीत ते आपल्या गुणवत्तेने आपले लक्ष नेहमीच वेधून घेते. हे सारे खरे असले तरी साहित्याचा सारा अभिप्राय पूर्णतया हाती येण्याच्या दृष्टीने अशा साहित्याची वाङ्मयाप्रमाणे वाङ्मयेत्तर अंगानीही पाहणी करणे आवश्यक आहे. या विवेचनातूनही साहित्यातील सामाजिक अंगाचे महत्त्व समजते. साहित्य व समाज यांची एकमेकांपासूनची नाळ कशी अविभाज्य आहे हे सांगताना एक जाणते अभ्यासक म्हणतात. ''साहित्याची निर्मिती हस्तिदंती मनोऱ्यात किंवा समाज

व्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत अनाही. वाङ्मयनिर्मितीची पाळेमुळे समाज व्यवस्थेत रुजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडवण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्या काळात प्रभावी असणाऱ्या विचारप्रणाली आणि त्या विशिष्ट भाषेतील वाङ्मयीन व शैलीविषयक परंपरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत असतात. साहित्यकृती ही परिस्थितीत ती निर्माण होते. त्या परिस्थितीचा प्रभाव व मर्यादा ती पूर्णपणे ओलांडू शकत नाही.'' पण लक्षात कोण घेतो, 'ब्राह्मणकन्या', दलित साहित्य व भाषांतर युगातील साहित्य व आजच्या साहित्याच्या विविध प्रवाहातूनही याची प्रचिती येते.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात साहित्य सामाजिक बांधिलकीकडे अधिकाधिक झुकत चाललेले दिसते. या बांधिलकीचा पुरस्कार सार्त्र किंवा ब्रेख्तसारखे अव्वल दर्जाचे कलावंत करू लागल्याने साहित्यातील सामाजिक संदर्भाला नव्याने प्राधान्य येऊ लागले आहे. आजच्या दलित व ग्रामीण साहित्यनिर्मितीत याचे प्रत्यंतर येते.

साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध अत्यंत दृढ व अतूट असा आहे. ज्याप्रमाणे फूल व सुगंध, सूर्य व त्यांचा प्रकाश, झाड व जमीन, मोती व शिंपला यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. त्याचप्रमाणे साहित्य आणि समाज यांना एकमेकांपासून वेगळे करणे कठीणच नव्हे तर असंभवही आहे. जेव्हापासून मानवाने एकटेपणाने राहणे सोडून दिले व तो समाज करून राहू लागला तेव्हापासून संस्कृती, सभ्यता आणि साहित्याचा जन्म व विकास ही झाला! ज्या समाजाचे, स्वतःचे साहित्य नाही, त्या समाजाला असंस्कृत व मागासलेले मानले जाते. त्याचप्रमाणे ज्या साहित्यामध्ये सामाजिकता नाही. त्या साहित्याची विश्वासार्हता संपुष्टात येऊ शकते. कारण कवी किंवा लेखक साहित्याची निर्मिती करतो. साहित्य निर्मिती ही ज्या व्यक्तिमत्त्वातून होते. त्या व्यक्तिमनाचे स्वरूप तसे समाजनिर्मितच असते. म्हणजे व्यक्तीचे म्हटले जाणार पिंडधर्मीय वेगळेपण तुलनेने फार कमी असते. त्या व्यक्तीची व्यक्ती म्हणून होणारी जी घडण असते. त्यात सभोवतालचे संस्कार बलवत्तर व मोठ्या प्रमाणात असतात. तेव्हा अनुभवाचा स्वीकार व संगतीपूर्वक आविष्कार करणारे मनच जर प्रामुख्याने समाजाची निर्मिती असेल तर त मनाच्या साहित्यरूपी निर्मितीत ती संस्कारित सामाजिकता उतरणारच असे म्हणता येईल. कलावंत हा एक सर्जनशील घटक

असल्यामुळे त्याची संवेदनशीलता कितीही अनन्यसाधारण आणि अलौकिक असली आणि तो स्वतः कितीही व्यक्तिनिष्ठ आणि आत्मकेंद्री असला तरी त्याचे भरणपोषण परंपरेतच झालेले असते. त्याचबरोबर निर्मितीच्या वेळी कुठेतरी परंपरेशी अनुसंधान त्याला साधावेच लागते. एलियटने 'ट्रॅडिशन ॲन्ड इंडिव्हिज्युअल टॅलॅन्ट' या निबंधात हा विचार अतिशय चांगला मांडला आहे. एलियट हा आधुनिक कवींतील एक मोठा कवी आहे. तो इंडिव्हिज्युअल हा घटक मान्य करतो. कलावंताचे कलावंतपण आणि वेगळेपण मान्य करतो.... पण याचवेळी प्रत्येकाच्या इंडिव्हिज्युअल टॅलॅन्ट वर, प्रतिभेवर आणि प्रतिभा शक्तीवर ट्रॅडिशन चा परिणाम होत असतो हेही स्पषट करतो. थोडक्यात, लेखकाची व्यक्तिविशिष्टता आणि त्याच्या काळातील सामाजिक व वाङ्मयीन परिस्थिती व परंपरा यांच्या संयोगातून लेखकाची जीवनजाणीव घडत असते आणि त्याच्या लेखनाला ती विशिष्ट रूप देत असते. उर्दूचे प्रसिद्ध शायर साहिर लुधियानवींचा हा शेर

''दुनियाने तजुर्बातो हवादिस की शक्ल मे
जो कुछ मुझे दिया, वो लौटा रहा हूँ मैं।''

अर्थात या जगाने जे जे अनुभव दिले त्यांना मी माझ्या कवितेद्वारा त्याच जगाला पर करत आहे. वरील कथनाची अत्यंत बोलकी प्रतिक्रिया आहे.

साहित्य हे समाजाच्या इतिहासाच्या अभ्यासाचे साधन म्हणूनही साहित्याला महत्त्व दिले जाते. उदा. ह.ना.आपटेंच्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीवर वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने आक्षेप घेतले गेले असतील, परंतु त्यांच्या कादंबरीतून व्यक्त झालेले मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवन आणि सामाजिक वास्तव, त्यातून उघड होणारे मानवी संबंध व सामाजिक संबंध, कुटुंबातील विधवा स्त्री अणि कुटुंबांतील इतर माणसे यांच्यातील मानवी संबंधाचे जे चित्रण हरिभाऊंनी केले आहे. त्याचा अभ्यास केला तर सामाजिक ज्ञानही मिळू शकते.

साहित्याचे सांस्कृतिकदृष्ट्याही महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. त्याशिवाय साहित्यकलेचा अर्थ समजत नाही. जातिभेदांचे निर्मूलन व्हावे, वर्णव्यवस्था नष्ट होऊन समतेवर आधारलेली समाजव्यवस्था अस्तित्वात यावी आणि शतकानुशतके वंचित जीवन जगणाऱ्या दलितांना सामाजिक न्याय मिळावा, यासाठी प्राप्त परिस्थितीत कोणतीही राजकीय कृती शक्य व संभाव्य नाही. म्हणून बदल घडवू आणण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य दलित साहित्याद्वारे होत आहे. वर्गलढ्याचा एक प्रश्न सोडवताना नवे वर्ग, नवे संघर्ष निर्माण होतात.

कामगार वर्गाचे आर्थिक प्रश्न सोडविताना त्यांना शोषण मुक्त करण्यासाठी वर्गलढ सुरू असतानाचे विद्रोहाची भूमिका घेऊन दलित समाज सामाजिक न्याय मिळविण्यासाठी संघर्ष करू लागला. त्या विद्रोहाच्या भूमिकेतून आणि संघर्षाच्या प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती सुरू झाली. त्यामुळे साहित्य आणि समाज यांचा अतूट संबंध असल्याचे निदर्शनास येते.

साहित्य हा समाजाचा आरसा आहे असं म्हटलं जातं कारण समाजात जे काही आहे, चांगलं वा वाईट त्याचं दर्शन त्या त्या युगाच्या साहित्यातून होत असते. संस्कृत कवी कालीदास, दण्डी, भास, शूद्रक आदींच्या काव्यातून त्या काळच्या समाजाचे दर्शन आपल्याला होते. त्या काळातील चाली-रीती, रूढी, परंपरा, वस्त्रालंकाराच्या विविध तऱ्हा, सण-उत्सव, विवाह सोहळे इत्यादीचे अत्यंत सचित्र वर्णन आपणांस वाचावयास मिळते. व्यासांच्या महाभारतातून मनुष्य स्वभावाच्या विविधतेचे दर्शन होते.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या साहित्यावर नजर टाकली तर साहित्यामध्ये विविध ज्ञानशाखा लपल्याचे दिसून येते. म्हणजे आंतरविद्याशाखीय अभ्यासाच्या या एका अर्थी पाऊलखुणाच वा मुळं म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही. उदा.वात्सायनाच्या कामसूत्राचा प्रभाव पंडिती कवींच्या काव्यावर पडलेला दिसून येतो. महाभारतातील संपूर्ण 'युद्धपर्व' हे युद्धशास्त्रावर आधारित आहे. व्यासांना युद्धशास्त्राची चांगली जाण असल्याची त्यातून दिसून येते. ज्ञानेश्वरीत 'काव्य व तत्त्वज्ञान' यांच्या सीमारेषा गुंतलेल्या दिसून येतात. तुकारामांच्या अभंगामध्येही तत्त्वज्ञान, काव्य व अध्यात्म यांचा संगम आढळतो. पंचतंत्र, इसापनीती, अरेबियन नाईटस ची निर्मिती यातून नैतिक बोध मिळतो. १९ व्या शतकातील ज्ञानमासिके ज्ञानोदय, ज्ञानप्रसारक, विविधज्ञान विस्तार, निबंधमाला, मराठीज्ञान प्रसारक, यात साहित्य व इतर विविध ज्ञानशाखा जसे तत्त्वज्ञान, काव्य, साहित्य व इतर विविध ज्ञानशाखा वैचारिकता, सामाजिकता यांचा मिलाफ झालेला दिसून येतो. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सत्तांतर' कादंबरीत माकड-माकडीणीच्या जीवनाचे चित्रण येते. ही साहित्यकृती पुस्तक म्हणून उपयोगी पडते. शिवाय प्राणी जीवनावरचेही चांगले पुस्तक आहे. जे सत्तांतर माकडांच्या टोळीत घडते तेच मानवाच्या टोळीत, समाजात घडते. या कादंबरीत साहित्य व प्राणीशास्त्र यांचा घनिष्ठ संबंध दिसून येतो. अरुण साधूंच्या 'मुखवटा' व 'सिंहासन' या कांदबरीत 'साहित्य व राजकारण' यांच्या सीमारेषा गुंतलेल्या

दिसतात. ग.प्र.प्रधान यांच्या 'साता उत्तराची कहाणी' या साहित्यकृतीत भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा कालपट तटस्थपणे चित्रित झाला आहे. या साहित्यकृतीतून राष्ट्रीय जाणीव प्रबळपणे व्यक्त झालेली दिसते. इरावती कर्वे यांच्या 'युगांतर' या साहित्यकृतीत महाभारतातील पात्रांचे मानसिक विश्लेषण आले आहे. एकमानववंशशास्त्रज्ञ व एक समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांची भूमिका यातून उठून दिसते. साहित्य आणि इतर शास्त्रे मानवाभोवतीच फिरतात त्याचे हे काही ऐतिहासिक पुरावे म्हणून सांगता येतील.

साहित्यकृती समजण्यासाठी बऱ्याचवेळा ज्या प्रदेशातील साहित्यकृती आहे. त्या प्रदेशातील चालीरीती, संस्कृती माहीत असणे अत्यावश्यक ठरते. त्याशिवाय त्या कलाकृतीचे आकलन यथार्थपणे होणार नाही.

पंजाबी कादंबरीकार राजेंद्रसिंह बेदी यांची 'एक चद्दर मैली सी' या कादंबरीत नवऱ्याच्या मृत्यूनंतर स्त्री उघडी पडू नये म्हणून दिराबरोबरच विवाह करण्याच्या सामाजिक प्रथेमुळे स्त्रीच्या भावनिक उद्ध्वस्तपणाचे चित्रण आहे. ही कादंबरी समजून घेण्यासाठी पंजाबी प्रथा-रीती-परंपरा यांचे ज्ञान असणे गरजेचे आहे. वरील उदाहरणावरून साहित्य आणि रूढी, परंपरा, चालीरीती पर्यायाने संस्कृती, समाज यांचा निकटचा संबंध असल्याचे दिसून येते.

बहुजन समाजाला सुशिक्षित करण्याचे एक समर्थ साधन म्हणजे साहित्य असे मार्क्सला वाटते. समाजाला सुशिक्षित करणे याचा अर्थ असा सांगता येईल की, समाजाला वास्तविकतेचे यथार्थ ज्ञान देणे. याचा मोठा वारसा आपल्या मराठी साहित्य कृतीत पहावयास मिळतो. आगरकरांच्या इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार या वैचारिक निबंधातून समाजातील चालीरीतींची स्थिती दाखविली. केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेतून समाजजीवनाच्या अंतरंगातील स्थितीगतीचे ज्ञान होते. देवलांच्या 'शारदा' या नाटकातून अनिष्ठ रूढींचा भयानक परिणाम दिसून येतो.

वरील सर्व कलाकृतीतून सामाजिक प्रगतीसाठी भौतिक क्षेत्राबरोबरच अभौतिक क्षेत्रातही बदल घडून यावा लागतो. हे सूचित होते. समाजाचे मनोरंजन करीत आईच्या ममतेने समाजातील दोषदिग्दर्शन करणे अशी कादंबरी लेखनामागची भूमिका स्पष्ट करताना हरिभाऊ एका अर्थी समाजशिक्षकाची भूमिका घेतात असे जाणवते. महात्मा जोतिबा फुले यांनी विद्येचे महत्त्व सांगितले. समाजव्यवस्थेने शूद्रातिशूद्रांना शतकानुशतके सामाजिक व धार्मिक शोषण होत राहिले असे

सामाजिक दुरावस्थेचे रोगनिदान जोतिबा फुल्यांनी केले.

साहित्य आणि समाज यांच्या संदर्भात समीक्षा करण्याचा प्रयत्न तेन या फ्रेंच समीक्षकाने केला. त्याने भोवतालच्या परिस्थितीचा आणि साहित्याचा अन्योन्य संबंध असतो हे स्पष्ट केले. साहित्य आणि समाज यांचे संबंध गुंतागुंतीचे असतात. कलानिर्मिती एक वेळ व्यक्तिगत मानता येईल, पण तिच्यातून जन्माला येणारी कलावस्तू ही मात्र सामाजिक असते. तिचे आकलन, आस्वाद, मूल्यमापन हे समाजाच्या अखत्यारितला भाग असतो. भिन्न भिन्न स्थलकाळातील अभिरुची, निर्मितीप्रेरणा, प्रकाशन, ग्रंथप्रसार इत्यादीं साहित्यावर उमटलेल्या प्रतिक्रियांचा शोध घेण्याचा प्रयत्न तेनने केला. साहित्य हे पूर्णपणे व्यक्तिनिष्ठ असते. या भ्रामक कल्पनेला तेनने धक्का दिला. साहित्य आणि समाजाचा अन्योन्य संबंध आहे हे त्याने स्पष्ट केले. त्यांच्या मते साहित्यामागे वंश, परिस्थिती व युगधर्म हे तीन घटक कार्यकारी झालेले असतात.

पण तेनने साहित्यिक व साहित्य पूर्णपणे ऐतिहासिक, भौगोलिक व तत्कालीन परिस्थितीचे अपत्य असते असे मानले. पण कलाकार व कला यांचे व्यक्तिसापेक्ष अन्योन्य संबंध विचारात घेतले नाहीत. साहित्यनिर्मिती प्रक्रियेत समाजजीवनाचा प्रभावी भाग जरूर असतो, पण त्याचबरोबर तीत साहित्याची अशी एक खास परंपराही असते. तिचाही नवीन साहित्यनिर्मितीवर फार मोठा परिणाम होतो हे विसरून चालणार नाही. बरेचसे साहित्य प्रचलित साहित्य परंपरा, संकेत, रूढी यांच्या प्रभावातून निर्माण होते. ह्या सत्याकडे त्यांचे दुर्लक्षच झाले. एवढे मात्र खरे की, साहित्य हे दैवी स्वरूपाचे असते. या भ्रामक कल्पनेला तेनने धक्का देऊन त्याचा समाजव्यापारांशी निकट संबंध असतो, हे प्रथमच प्रभावीपणे सांगितले.

म्हणूनच साहित्य आणि समाज यांच्यातील अन्योन्य संबंध स्वभावतःच अतूट असतो. दृश्य आणि द्रष्टा, ज्ञेय आणि ज्ञाता, निर्माता आणि आस्वादक हे द्वैत सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणातच निर्माण होत असते. पण त्यांच्यातही पारस्परिक नाते असते. या संदर्भात एका प्रख्यात विद्वानाचे कथन इथे द्यावेसे वाटते, ''इतिहासात नावे व सनावळी याशिवाय काही नसते तर साहित्यात नावे व सनावळी सोडून सर्व काही सत्य असते.''

★★★

# 'स्त्री नाटकाकारांचे योगदान– एक अभ्यास'

डॉ.शीला गाढे

**प्रस्तावनाः–**

मराठी नाट्यवाङ्मयाचा इतिहास पाहिल्यास असे लक्षात येते की, मराठी नाटककारांनी नाटकामधून स्त्री–समस्या या विषयावर नाटके लिहिली. मात्र नाटककार म्हणून स्त्री नाटककारांची संख्या कमी दिसते. नाटकाच्या तुलनेत कथा, काव्य, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारात लेखन करणाऱ्या स्त्री लेखिकांचे प्रमाण चांगले आहे. त्यामुळे ज्या स्त्रियांनी नाट्यलेखन केले आहे. त्यांच्या नाट्यलेखन कर्तृत्त्वाचा शोध घेणे हा माझ्या सदर शोधनिबंधाचा विषय आहे. तसेच स्त्री म्हणून त्या तत्कालीन परिस्थितीत सामाजिक प्रश्नांकडे कोणत्या दृष्टीने बघता, याचा वेध घेणे महत्त्वाचे आहे. सदर शोधनिबंधात स्त्री नाटककारांच्या १८५० ते १९५० या कालखंडातील नाटकांचा आढावा घेतला आहे.

**संशोधन विषयः–**

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात पुरुषांनी काव्य, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णने इत्यादी साहित्य प्रकारातून मुबलक लेखन केलेल दिसून येते. मात्र स्त्री लेखिकांनी कथा, कादंबरी, काव्य, चरित्र, प्रवासवर्णने इत्यादी साहित्यकृती लिहिण्याचा प्रयत्न चांगल्या प्रमाणात केलेला दिसून येतो. मात्र नाटके हा वाङ्मय प्रकार त्या तुलनेत कमी दिसतो? म्हणूनच स्त्री नाटककारांनी स्त्रियांच्या प्रश्नांचा शोध नाटकातून घेतला का? घेतला असेल तर त्यांच्या कोणत्या प्रश्नांकडे स्त्री लेखिका कशा बघतात? उदा.बालविवाह, सती जाणे, केशवपन, हुंडाबळी इ. अनिष्ट रुढी–प्रथा परंपरा–नाट्यलेखनाच्या माध्यमातून स्त्रियांचे सामाजिक प्रश्न, आर्थिक प्रश्न, कोटुंबिक प्रश्न कशा प्रकारे स्त्री नाटककारांनी मांडले? त्यांचा धावता आढावा घेतला आहे. इतर वाङ्मय प्रकारापेक्षा आणि नाटक हे दृश्यश्राव्य असल्याने समाजावर अधिक प्रभाव टाकते. म्हणून स्त्री नाटककारांनी त्या त्या परिस्थितीत कोणकोणंते प्रश्न हाताळले ते ब॑णे महत्त्वाचे वाटते.

**संशोधनाची गृहितके:**

१. संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी यांचे दृष्टीने स्त्री समस्यांचा शोध घेणे, तसेच विचारमंथन होणे गरजेचे वाटते.

२. भारतीय नाट्य निर्मिती क्षेत्रात स्त्रीकडून नाटके मोठ्या प्रमाणात का हाताळली गेली नाहीत? मराठी नाटक यांचा मराठी नाटक रंगभूमीच्या पहिल्या शतकात स्त्री-नाटककार अपवादात्मक आढळतात.

३. स्त्री-नाटककारांच्या नाट्यनिर्मितीतून स्त्रियांची सक्षमता वाढणे ही काळाची गरज आहे.

४. इतर वाङ्मय प्रकार हाताळणारी पुरुष लेखक मंडळी एकत्र येऊन चर्चा करतात. उदा.चार-पाच कथाकार एकत्र येऊन चर्चा घडवून आणतात. मात्र स्त्री नाटककारांकडून अशी एकत्र येऊन वैचारिक बैठक घडवून आणणे गरजेचे आहे.

**संशोधनाची आवश्यकता व उद्दिष्ट्ये:-**

शंभर सव्वाशे वर्षापूर्वी भारतीय स्त्रिया बालविधवा, सती जाणे, केशवपन करणे या सारख्या अनिष्ट रूढी, प्रथा-परंपरांच्या बंधनात जखडलेल्या होत्या. या बंधनांची स्त्रियांना जाणीव नव्हती असे नाही. मात्र त्याविरुद्ध आवाज उठविण्याची हिंमत त्यांच्यात नव्हती. याचे कारण स्त्रिया शिक्षणापासून दूर होत्या. म्हणूनच स्त्रियांचा उद्धार करणे, त्यांना शिक्षण देणे समाजधुरीणांना नंतरच्या काळात गरजेचे वाटले. यातूनच स्त्री स्वातंत्र्याची कल्पना पुढे आली. स्त्रियांच्या भोवतालचे काही प्रश्न कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र इ. वाङ्मय प्रकारातून व्यक्त झाले तसे ते नाटकातूनही व्यक्त झाले. परंतु नाटक या वाङ्मय प्रकाराला स्त्रियांनी कमी प्रमाणात लेखनासाठी वाट मोकळी केली असे का? इतर वाङ्मय प्रकार समर्थपणे लिहिणाऱ्या लेखिका नाट्यलेखनाकडे कमी प्रमाणात का वळाल्या? या संदर्भात कारण परंपरांचा शोध घेणे महत्त्वाचे वाटते. त्यानिमित्ताने काही प्रश्न उपस्थित झाले. नाटकातून स्त्रियांनी कोणकोणते विषय मांडले? तत्कालीन सामाजिक प्रश्नांना स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडली का? स्त्री म्हणून त्यांनी स्त्री समस्येकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले का? बदलत्या कौटुंबिक प्रश्नांचा, स्त्री-पुरुष नाते संबंधाचा, समस्यांचा वेध कसा घेतला? हा माझ्या संशोधनाचा विषय आहे. या निमित्ताने नाट्य वाङ्मयाच्या इतिहासात स्त्री नाटककारांचे योगदान किती आणि कोणत्या स्वरूपाचे आहे हे मांडणे मला या शोध निबंधाच्या

निमित्ताने महत्त्वाचे वाटले.

नाटकाचा इतिहास बघण्यापूर्वी मराठी रंगभूमीच्या संदर्भात दोन प्रवाहांचा विचार महत्त्वाचा ठरतो. एक लोकरंगभूमीचा प्रवाह आणि दोन तंजावरील नाटकांचा प्रवाह. तंजावरला १७ व्या शतकात मराठी राजांनी मराठी नाटक निर्माण केल्याचे उल्लेख सापडतात. मात्र मराठी नाटकांची सुरूवात इ.स.१८४३ मध्ये विष्णुदास भावे यांच्या सीता-स्वयंवर या नाटकाने झाली. मराठी नाटक-रंगभूमीवर पहिल्या शतकांमध्ये स्त्री-नाटककार अपवादाने आढळतात. मात्र विसाव्या शतकांची पहिली दोन दशके उलटल्यानंतर म्हणजे १९२० नंतर नाट्यलेखनात स्त्रियांची संख्या थोडी वाढलेली दिसते.

मराठीतील आद्य स्त्री नाटककार म्हणून सोनाबाई केरकरांचा उल्लेख करावा लागेल. इ.स.१८९४ ला संगीत छत्रपती संभाजी नाटक लिहिले हे नाटक पाच अंकी आहे. पहिल्या अंकामध्ये नटी आणि सूत्रधाराचा संवाद आहे. संपूर्ण ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून हे नाटक लिहिले गेले. त्यादृष्टीने या नाटकामूधन त्या काळाचा संभाजीच्या चरित्राचा अभ्यास दिसून येतो. या नाटकात संभाजीची पत्नी येसूबाई विषयी लेखिका म्हणते, संभाजीने तुळशीवर एवढे प्रेम केले पण तसंच प्रेम आपल्या पत्नीवर केले असते तर तिला किती आनंद झाला असता? यातूनही स्त्री प्रश्नाविषयी लेखिका बरच काही बोलून जाते.

सौ.काशीबाई फडके यांनी लिहिलेले पौराणिक नाटक म्हणजे संगित-सीताशुद्धी होय. पौराणिक संगित नाटकांची परंपरा या नाटकाने चालविली असे म्हणता येईल. या नाटकाचा विषय रामायणातील आहे. राम-सीता वनवासाला निघतात इथून नाटकाला सुरूवात होते. कांचनमृगाचा मोह, रामचे कांचनमृगाकडे धावणे, लक्ष्मणाचे जाणे, दरम्यान रावणाने सीतेचे हरण करणे, सुग्रीवाची मदत, वालीचा वध, मारुती लंकेत जाणे, सीतेचा शोध घेणे, वानरसेना, सेतुबंध इत्यादी प्रसंग आणि सीतेच्या शुद्धतेविषयी अग्निप्रवेश, अयोध्येत येणे, रामाचा राज्याभिषेक इत्यादी प्रसंगाने नाटकाचे कथानक भरलेले आहे. पौराणिक विषय घेऊन काशिबाईंनी नाट्यलेखन केले हे फार महत्त्वाचे वाटते. याचे कारण नाटक लिहिणे किंवा नाटकात काम करणे या दोन्ही गोष्टींकडे समाज विकृतीने बघत होता. अशा काळात वडिलांच्या प्रेरणेने त्यांनी नाटक लिहिले हे महत्त्वाचे आहे.

हिराबाई पेडणेकरांनी एकूण तीन नाटके लिहिली. त्यात संगीत जयद्रथ विडंबन, संगीत मीराबाई ही पौराणिक कथानकावर आधारित व संगीत दामिनी

हे नाटक (१९१२) सामाजिक विषयावर आधारित होते. १९ व्या शतक़ात स्त्रीसुधारणा, स्त्रीशिक्षण या विषयावर एकाही स्त्री नाटककाराने नाटक लिहिले नव्हते. म्हणूनच हिराबाई पेडणेकरांचे संगीत दामिनी हे नाटक वैशिष्ट्यपूर्ण ठरते. स्त्रिया अडाणी असल्याने साधुबुवांच्या मागे लागतात. त्यांच्या ढोंगाला फसतात. म्हणून स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे, हा विचार या निमित्ताने लेखिका सुचविते. ज्या काळात स्त्री शिक्षणाला विरोध होता, त्या काळात स्त्री शिक्षणाविषयी अनुकूल मते मांडणे हे धाडसाचे काम हिराबाईंनी केले. मात्र नाट्य वाङ्मयाच्या इतिहासात हिराबाईची फारशी सन्मानाने दखल घेतली गेली नाही. असे खेदाने म्हणावे वाटते.

इंग्रजी अंमलात स्त्रीशिक्षणाला सुरूवात झाली आणि स्त्रियांच्या जीवनात अमुलाग्र बदल दिसू लागला. त्यादृष्टीने १९२० ते १९५० हा कालखंड महत्त्वाचा ठरतो. शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये वैचारिक प्रगल्भता, स्वत्त्वाची जाणीव झाली. याचकाळात समाजजीवनही झपाट्याने बदलत होते. औद्योगिकीकरण, शहरांची वाढ, दोन महायुद्धे यामुळे समाजजीवन गुंतागुंतीचे होऊ लागले. स्त्रियांनी शिक्षण घेणे, गरजेपोटी नोकरी करणे, पुरुषप्रधान व्यवस्थेला एक आव्हान होते. शतकानुशतकाचे परंपरांचे ओझे आणि शिक्षणाने बदलणारे स्त्रीचे नवे रूप लक्ष वेधण्यासारखे आहे. शिक्षण, आत्मविश्वास, आर्थिक स्वातंत्र्य, स्वत्त्वाची जाणीव तिच्या ठायी निर्माण झाली. स्त्रीतील हा बदल समाजाला आणि घरातील पुरुषालाही विचार प्रवृत्त करणारा ठरला. आपल्या प्रधान स्थानाला त्यामुळे धक्का पोहोचेल काय? याविषयी शंका निर्माण झाली. त्यामुळे स्त्रियांच्या व्यक्ति स्वातंत्र्याच्या कल्पनेवर पुरुषांची प्रतिक्रिया तीव्र स्वरूपाची होती. त्यामुळे पुरुषी वर्चस्व, अहंकाराला जपायचे की, स्वतःचे व्यक्तिमत्त्व जोपासायच असा संघर्ष स्त्रीच्या मनात सुरू झाला. या संघर्षातून हळूहळू नवीन जीवनमूल्ये स्वीकारू लागलेल्या स्त्रीला स्वतःकडे डोळसपणे पाहण्याची नवी दृष्टी लाभली, नवे आत्मभान आपले समाज–कुटुंबातील स्थानाविषयी जागृती निर्माण झाली आणि या सर्वांची छाप स्त्री नाटककारांच्या नाटकातून दिसू लागली. त्याचा धावता वेध प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.

पती–पत्नीच्या वैवाहिक जीवनात पतीच्या बेताल आणि बदफैली वागणुकीमुळे त्याच्या बरोबर सहजीवन जगणे असह्य होत असेल तर विवाहबंधनातून सुटका व्हावी असे बंडखोर विचार स्त्रीच्या मनात येऊ लागले. परंतु त्या काळात

घटस्फोटाचा कायदा नसल्याने ते शक्य नव्हते. त्याचे प्रतिबिंब मालती तेंडुलकरांच्या नाटकात दिसू लागले. त्यांच्या अर्धांगी (१९३३) या नाटकाचा विषय घटस्फोटापर्यंत जातो. परंतु कायदा नसल्याने तसे करता येत नव्हते. नाटकाततील पद्माकर परदेशी एका घटस्फोटीत स्त्रीशी लग्न करतो. परंतु त्याची पत्नी नलिनी मात्र हिंदू कायद्यानुसार दुसरे लग्न करू शकत नाही. या नाटकातील अण्णा आणि कमला यांचे सहजीवनही असेच व्यसनी आणि व्यभिचारी असलेल्या अण्णांशी कमल जुळवून घेते. त्या काळात पतिनिष्ठा, पती ईश्वर, पतीचा धर्म, पतीचा शब्द प्रमाण मानला जात होता. तत्कालीन समाजातील स्त्रियांचे गुदमरलेपण यातून व्यक्त होते. मात्र या नाटकातील नलिनी धर्मांतर करून पतीच्या अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठविण्याचे धाडस दाखविते. असे लेखिकेने मांडले आहे. यात लेखिकेचे धैर्य दिसते. याचे कारण जेव्हा नाटक लिहिले तेव्हा घटस्फोटाचा कायदा नव्हता.

घटस्फोटासंबंधी असाच धाडसी विचार आनंदीबाई किर्लोस्कर यांनी नव्या वाटा (१९४३) या नाटकातून मांडला आहे. स्त्रीजीवनातील हुंडा, वधूपरीक्षा हे प्रश्न मांडले आहेत. तसेच एखाद्या स्त्रीला विवाहानंतर समस्या निर्माण झाल्या तर घटस्फोटाचा कायदा नसला तरी ती समस्या कशी सोडवावी याचा मार्ग सुचविला आहे (यमूचा नवरा गुन्हेगार-तुरुंगवास-यमूचे दुसऱ्या तरुणाकडे आकर्षिले जाणे इ.) या नाटकातील रेखा म्हणते, आपल्या सारख्या शिकल्या सवरलेल्या मुलींनी जर स्वाभिमान विसरून या ओंगळ रूढीला मान तुकविली तर मग सुधारणा व्हायची कशी? विकायला काढलेल्या एखाद्या जनावराप्रमाणे जो येईल त्याच्यापुढे आपल प्रदर्शन करायचं! यावरुन वधूपरीक्षा ही किती जाचक रूढी आहे हे लक्षात येते. आजही मुलगी दाखविणे या पद्धतीत फारसा बदल झालेला दिसून येत नाही.

आजही समाजात हुंडा घेणे व वधूपरीक्षा या समस्यांना स्त्री तोंड देत आहे. सुधा साठे यांच्या संगीत एकच गाठ या नाटकात स्त्रीला आपल्या आयुष्यात केव्हा तरी लग्नचक्रातून एकदा जावेच लागते. विवाह त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्या लेखिकेने मांडल्या आहेत. स्त्री जीवनाचे स्वरूप स्वातंत्र्यपूर्व कालखंडापेक्षा पुढील कालखंडात पुष्कळ बदललेले दिसते. पुरुषांच्या बरोबरीने समाजात स्त्रिया वावरू लागल्याने स्त्री जीवनाच्या कक्षा विस्तृत, व्यापक झाल्या. कर्तृत्त्वाची अनेक नवीन क्षितीजे तिच्यापुढे आली. त्यातूनच अनेक प्रकारचे ताण-तणाव निर्माण

झाले. याचा परिणाम तिच्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर झाला. पारंपरिक स्त्रीपेक्षा वेगळी असणाऱ्या, आपल्या हक्कांची जाणीव झालेल्या नव्या स्त्रीचे दर्शन निरनिराळ्या नाटकांमधून घडते. त्यादृष्टीने कमला प्रभू यांचे संगीत घराकडे (१९४८) हे नाटक महत्त्वाचे आहे. या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे एका स्त्रीने स्त्रीच्या मनाचा विचार करून तिच्या भावनांना किंमत देऊन लिहिलेले हे नाटक आहे. साहजिकच नायिका सुरेखा हिचे चित्रण स्वाभिमानी स्त्री या दृष्टिकोनातून रंगविले आहे. शेवटी नवऱ्याला पश्चाताप होऊन ती यशस्वी होते असे दाखविले आहे. सुरेखा पती-पत्नीच्या नात्यात समानता हवी असे तिला वाटते. म्हणून ती म्हणते. कसल्याही नवऱ्याला देव मानून आपण निर्बुद्ध दगड बनण्यापेक्षा दोघांनीही माणसाप्रमाणे वागणं चांगलं. असा तिचा दृष्टिकोन आहे.

थोडक्यात या काळातील नाटकांमधून पुरुषप्रधानता आणि पुरुष मनोवृत्ती यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. मात्र स्त्री नाटककार असल्याने त्यांनी स्त्रियांच्या मनोभूमिकेतून विचार केल्याचे जाणवते. या स्त्री नाटककारांमध्ये तत्कालीन सामाजिक प्रश्नांबाबत जागरुकता असल्याचे जाणवते, स्त्रियांनी लिहिलेल्या नाटकांमधून स्त्रियांना प्रयोगक्षमतेची जाणीव असल्याचे दिसते. मात्र नाट्यतंत्राचा अभ्यास, त्या तंत्राची समज, त्या तंत्रावरची पकड यामध्ये स्त्री नाटककारांनी फार मोठा पल्ला गाठला आहे, असे आढळत नाही.

इ.स.१८५० ते १९५० पर्यंत अभ्यासिलेल्या स्त्री नाटककारांच्या नाटकांच्या संदर्भात काही निष्कर्ष नोंदविता येतील.

**निष्कर्ष**, सुरूवातीच्या काळात पौराणिक, ऐतिहासिक नाटके लिहिण्याकडे स्त्री नाटककारांचा कल दिसतो. नंतर सामाजिक नाटके लिहिण्याचे प्रमाण वाढले. नाटक या साहित्य प्रकाराकडे स्त्रियांनी उशिरा आपले लक्ष केंद्रीभूत केल्याचे दिसते. स्त्री नाटककारांचे प्रमाण संख्यात्मकदृष्ट्या कमी आहे. स्त्री नाटककारांचे अनुभवविश्व मर्यादित होते. नाटकातून, स्त्री नाटककारांनी पहिल्या शतकात हुंडा, बालविवाह, पुर्नविवाह, वधूपरोक्षा, घटस्फोट, स्त्रीशिक्षण, स्त्री-पुरुष समानता इत्यादी सामाजिक प्रश्न हाताळले आहेत. संख्यात्मकदृष्ट्या स्त्रियांची नाटके कमी असली तरी त्यांचे नाट्य साहित्यातील योगदान नाकारता येत नाही. त्यांची नाटके ही स्त्री नाट्यलेखनाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

★★★

# 'ललित गद्य-सदरलेखन-एक अभ्यास'

प्रा.निर्मला कुलकर्णी

**प्रस्तावना:-**

ललितगद्यांचा ऐतिहासिक आढावा घेताना लक्षात येते की, निबंध लघुनिबंधापासून या लेखन प्रकाराला प्रारंभ झाला. निबंध, लघुनिबंध व ललिगद्य लेखनही स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात विपुल प्रमाणात झाले. त्यात वृत्तपत्रे व नियतकालिकांची गरज म्हणून ललित गद्यात्मक सदरे लिहिली जाऊ लागली. नामवंत व प्रसिद्ध लेखक-लेखिकांनी त्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे ललितगद्यात एक नवा प्रवाह निर्माण झाला. त्यासाठी निबंध ते ललितगद्य सदरे यांचा संशोधनात्मक अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यादृष्टीने ललितगद्य ते सदर लेखन एक अभ्यास हा विषय निश्चित केला आहे.

**संशोधनाची गृहितके:-**

१. सदर लेखनाची परंपरा शोधणे.

२. सदर लेखनाची सुरूवात ज्या निबंध लेखनापासून झाली. निबंध साहित्याचा आढावा घेणे.

३. निबंध, लघुनिबंध व ललितगद्य यांची वैशिष्ट्ये तपासणे. निबंध, लघुनिबंध आणि ललितगद्य या साहित्य प्रकारातील 'मी त्व आणि आत्मनिष्ठा' तपासणे, वैविध्य शोधणे.

४. वृत्तपत्र व मासिकातून ललितगद्य सदरे लिहिणाऱ्या लेखकांचा आढावा व त्यांचे योगदान शोधणे.

५. संशोधन दृष्ट्या थोडे दुर्लक्षित असलेल्या सदरलेखनाचे साहित्यूल्ये लक्षात घेणे.

**संशोधनाची आवश्यकता:-**

पारंपरिक कथा, कविता, नाटक, कादंबरी इ.साहित्य प्रकारांमध्ये विपुल साहित्यनिर्मिती, समीक्षालेखन, व संशोधन झालेले दिसते. मात्र ललितगद्य या स्फुट लेखन प्रकारात विपुल लेखन झालेले असूनही त्यावर अपवादात्मक संशोधन

झालेले दिसते. ललितगद्याचा वृत्तपत्र व मासिकातील सदर लेखन या लेखन प्रकारावर फारसे संशोधन झालेले दिसत नाही. त्यासाठी हा विषय निवडण्याची आवश्यकता वाटली. मराठी साहित्यात १६ व्या १७ व्या शतकापर्यंत महानुभवीय वाङ्मयाचा अपवाद सोडल्यास पद्यात्मक साहित्य निर्मितीच विपुल प्रमाणात झालेली आढळते. शिवकालामध्ये लिहिला गेलेला 'आज्ञापत्र' हा रामचंद्र अमात्यांचा ग्रंथ मराठीतील 'निबंध' या स्फुट प्रकाराच्या जवळचा वाटतो. पुढील काळात बखरकारांनी तत्कालीन इतिहास वेगळ्या गद्य शैलीत मांडला. त्यातून काही विचार प्रवर्तक मजकूर आलेला आहे. मात्र विचार हे सूत्र लेखनासाठी घेण्याचा प्रारंभ निबंध लेखनामुळे झाला. अर्थातच इंग्रजांचे या देशात आगमन, इंग्रजी साहित्याचा आणि संस्कृतीचा प्रभाव, त्यांच्या समाजसुधारणांचा भारतीय समाजावर झालेला परिणाम इ.मुळे इंग्रजी निबंध साहित्याची तोंड ओळख झाली. इंग्रजी 'एसे' ची परंपरा सोळाव्या शतकापासून सुरू झाली होती. भारतात सोळाव्या शतकात मुद्रण कलेचा प्रवेश झाला. वृत्तपत्रे नियतकालिके यांच्या माध्यमातून समाजातील अशिक्षितपणा, अंधश्रद्धा, कर्मकांड, अनिष्ट रूढी व परंपरा इ. संदर्भातील समाजप्रबोधनाच्या हेतूने लिहिले जाऊ लागले. मराठी 'दर्पण' (६ जानेवारी १८३२) या बाळशास्त्री जांभेकरांच्या पत्रामधून मराठी निबंधाचा जन्म झाला. अर्थातच तो विकसित स्वरूपात नसला तरी वृत्तपत्रीय लेखन यादृष्टीने त्यांचे महत्त्व कमी होत नाही. पुढील काळात 'अरूणोदय', 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानचांद्रिका', 'ज्ञानोदय', 'ज्ञानचंद्रोदय', 'विविध ज्ञानविस्तार', 'धुमकेतू', 'प्रभाकर', 'किरण', 'परशु', 'वर्तमानरिपीका', 'विचारलहरी', 'पूर्णवैभव' इत्यादी नियतकालिकातून विविध विचारवंतांनी आपले विचार मांडले त्या काळात वृत्तपत्रे व नियतकालिकांनी मराठी निबंधाचे चांगले संगोपन केले असे म्हणता येईल. स्वजनहितासाठी विचारवंतांनी उचललेली लेखणी ही मराठी निबंधाची सुरूवात होय.

**मराठी निबंध, प्रारंभ व विकासकाळ:-**

(अव्वल इंग्रजी काळातील पहिल्या टप्प्यात(१८१८ ते १८४९) स.का.छत्रे, परशुराम पंत गोडबोले, नाना शंकरशेठ, दादा पांडुरंग, गो.ना.माडगावकर, मिसेस फरार, भाऊ महाजन, लोकहितवादी इत्यादीच्या लेखनामुळे निबंधाला वाङ्मयीन दर्जा प्राप्त झाला. तर मराठी निबंधाच्या अव्वल

काळात (१८५० ते १८७४) या वाङ्मय प्रकारास 'निबंध' हे नाव मिळाले. म.फुले, मुक्ता, ताराबाई शिंदे, विष्णुशास्त्री पंडित, बाबा पदमनजी, डॉ.भाऊ दाजी लाड, वामन अबाजी मोडक, डॉ.रा.गो. भांडारकर, मामा परमानंद, न्या.रानडे का.बा.मराठे, रा.भि.गुंजीकर इत्यादींनी वैविध्यपूर्ण निबंधलेखन केलेले दिसते. या काळात या निबंधकारांना आपण निबंध लिहित आहोत याची जाणीव होती. समाज व धर्मसुधारणा या उद्दिष्टांनी लिहिलेले निबंध हे परिपक्व व स्वतंत्र विचारसरणीतून लिहिले गेले. त्यात लालित्य पूर्णता व 'मी' त्वा चे प्रकटीकरण ही आजच्या ललितगद्याची वैशिष्ट्ये मात्र फारशी आढळत नाहीत.

१८७४ ते १९२० हा मराठी निबंधाचा विकासकाळ म्हणून ओळखला जातो. १८७४ साली विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमाला मासिक सुरू केले. त्यातून भाषाविषयक वाङ्मय विषयक, इतिहास, समाजशास्त्र, ग्रंथपरीक्षण, मतखंडणपर असे वैविध्यपूर्ण विषय आले. मराठी निबंधाची वाढ झपाट्याने झाली. लो.टिळक, शि.म.परांजपे, कृ.प.खाडीलकर, अ.ब.कोल्हटकर, श्री.व्यं.केतकर, ल.रा.पांगारकर, वि.का.राजवाडे, गो.ग.आगरकर इत्यादींनी लिहिलेला निबंध वैविध्यपूर्ण होता. पण आशयाच्या अंगाने व्यापक जाणीवा त्यात नव्हत्या असे दिसते. मात्र ललितनिबंध कुठेतरी डोकावू लागला होता असे म्हणता येईल.

मराठी निबंधाच्या तिसऱ्या कालखंडात, १९२० नंतर मराठी ललित निबंधाचा उदय झाला. १९२६ मध्ये 'रत्नाकर' मासिकात ना.सी. फडके यांनी गुजगोष्टी लिहिल्या व ललितगद्य चा प्रारंभ झाला. पुढे गुजगोष्टीचे 'आत्मनिबंध' वि.स.खांडेकर, लघुलेख–अनंत काणेकर, चित्रबंध–रघुवीर सामंत, नवलघुनिबंध–विंदा करंदीकर असे नामकरण होत गेले. लघु निबंध हा ललित निबंध, ललित लेख, ललित गद्य अशा लवचिक नावाने आज ओळखला जात आहे. मा.ना.आचार्य यांच्या मते, अशा कुठल्यातरी लवचिक नावाने ओळखला जात आहे. शाब्दिक रचनेतील वदतोव्याघात मान्य करूनही मुक्तनिबंध असे म्हटले तर अनुचित ठरू नये. गद्य ललित साहित्यातील तो मुक्तछंदच आहे.

एकंदरीत निबंध, लघुनिबंध, ललितनिबंध अशी नावे धारण करीत आशय आणि अभिव्यक्तीतले बदल स्वीकारीत लघुनिबंधाची वाटचाल ललितगद्या पर्यंत झालेली दिसते. इथे नमूद करावेच वाटते की, स्वातंत्र्योत्तर काळात व विशेषतः १९६० नंतरच्या काळात मुळातला 'लघुनिबंध' बराच मागे पडला

आणि ललितगद्याची नवी धाटणी निर्माण झाली. लघुनिबंधाची तंत्रबद्धता ओलांडून नवे नवे प्रयोग ललितगद्यात केले जाऊ लागले. इलितगद्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये निश्चित होत गेली मी हा ललितगद्याचा गाभा असतो. लेखक सौंदर्यानुभरवाच्या पातळीवर मी त्वाचा शोध घेत असतो. त्यामुळे ललितगद्यात आत्मनिष्ठेला महत्त्व प्राप्त झाले. या मी चे विचाराबरोबर भावनेशी अधिक जवळचे नाते असते.

मी हे व्यवच्छेदक लक्षण निश्चित करून ललितगद्याची स्वातंत्र्योत्तर काळात वाटचाल सुरू झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंड हा नव संवेदना व्यक्त करणारा होता. नवसंवेदनाच्या लाटेल ललितगद्य लेखकाची आत्मनिष्ठ विविध अंगानी प्रतिष्ठा पावत होती. लेखकाच्या आत्मनिष्ठ प्रकटीकरणातून अनुभव मी ला धारण करू लागला. या काळात कथा, कादंबरी, कविता, नाटक इत्यादी साहित्यप्रकारांत नवसंवेदनाची लाट आली होती. त्या साहित्य प्रकारांची मांडणी नव्याने होऊ लागली होती.

**सदरलेखन–मुक्तगद्याचा वैविध्यपूर्ण अविष्कारः–**

इंग्रजी कालखंडापासून स्फुट गद्यलेखनाचे प्रबोधनपर, गंभीर विचारप्रधान निबंध, गुजगोष्ट लघुनिबंध, ललितनिबंध, ललितगद्य असे रूपवैशिष्ट्यानुसार नामकरण होत गेले. अलिकडच्या काळात या स्फुटलेखनात आलेली लवचिकता, प्रसरणशीलता, सर्वसमावेशकता, ललित्यपूर्णता यामुळे मुक्तलेखन किंवा मुक्तगद्य या स्वरूपाचे लेखन विपुल प्रमाणात होत गेले. त्यामुळे वृत्तपेत्रे किंवा नियतकालिकांमधून प्रासंगिक टिपणीतून कला, समाजजीवन, धर्मजीवन, सांस्कृतिक जीवन, राजकारण, वैद्यक, आरोग्य, विज्ञान, मानसशास्त्र कायदा अशा अनेकविदध विषयांवर त्या त्या क्षेत्रातील जाणकार व्यक्ती भाष्य करू लागल्या. प्रतिक्रिया व्यक्त करणारे लेखन करू लागल्या. या लेखनाचा हेतू अर्थातच मनोरंजन आणि त्याचबरोबर उद्‌बोधन हा होता.

वृत्तपत्रे किंवा नियतकालिकांच्या संपादकांचा आणि सदर लेखकांचा उल्लेख करायचा झाला तर प्र.के. अत्रे, ह.रा.महाजनी, ना.भि.परूळेकर, विद्याधर गोखले, गोविंद तळवळकर, ग.वा.बेहरे, माधव गडकरी, अरुण टिकेकर, प्रमोद नवलकर, लता राजे, ह.मो. मराठे, विजय कुवळेकर इ.नावे सहज लक्षात येतात. वाङ्‌मयेत्तर विषयांवर सदर लेखन करणाऱ्या लेखकांच्या लेखनात प्रसंगानुसार ललित्यही येत गेले.

**सदरलेखन संकल्पनाः-**

सदरलेखनाची संकल्पना लक्षात घेण्यासाठी आनंद यादव यांची ललितगद्या विषयीची भूमिका बघावी लागते ते म्हणतात, ललितगद्य विकसनशील रहावयाचे असेल तर मी चे व्यक्तिमत्त्व हे अनेक अंगानी प्रत्यक्ष समाजजीवनाशी प्रत्यक्षाचय पातळीवर भिडणे आवश्यक असते, तरच ते विकसनशील राहू शकेल आणि तरच त्याच्या व्यक्तिमत्त्वाला नवेनवे कंगोरे फुटून जातील व नवनव्या विषयवस्तूही त्याला प्राप्त होत जातील. हे जसे खरे, तसे ललितगद्याकडे समाजातील सर्व स्तरांतील व्यक्तिमत्त्वे वळली पाहिजे... आनंद यादव यांनी हे विचार स्फुट ललितलेखनाच्या संदर्भात व्यक्त केलेले आहेत. मात्र त्यातून मराठीतील सदरलेखनाचा अप्रत्यक्षपण निर्देश झाला आहे. असे म्हणता येईल.

**सदरलेखनातील मुक्त ललितगद्यः-**

नियतकालिकातील सदरलेखनाला साधारण दीडशे वर्षांची परंपरा असल्याचे दिसत. मराठी ज्ञानप्रसारकांत फिरस्ता या टोपणनावाने (१८५० ते ६७) कांही पत्रे प्रसिद्ध झाली. सुदाम्याचे पोहे या लेखांवर प्रतिक्रियात्मक लेखन होत होते. साधारणपणे वाङ्मयीन प्रश्न व वाङ्मय व्यवहारांशी हे लेखन निगडित होते. १९२५ नंतर प्रतिभा नावाच्या मासिकात वाङ्मयीन चर्चा ऱ्हास परिहास, उपहास या सदरातून वि.ह.कुलकर्णी यांनी केलेली दिसते. पारिजात (१९३४-३५) या मासिकातून वाङ्मयभक्ताशी रोजनिशी या सदरात अनेक प्रसिद्ध लेखक लिहू लागले. नवयुग या नियतकालिकात सख्याहरी हे सदर दत्तू बांदेकर यांनी लोकप्रिय केलेले दिसते. ललित मासिकात ठणठणपाळ या टोपणनावाने जयवंत दळवी यांनी पंचवीस वर्षे सदरलेखन केले. वाङ्मयीन प्रश्न, साहित्यक्षेत्रातील घटना, साहित्यिकांचे स्वभावविशेष, मतभेद, त्यांची गटबाजी, ग्रंथव्यवहार याविषयी उपहासपूर्ण व खेळकर शैलीतले हे सदर अतिशय लोकप्रिय ठरले.

रातराणी (१९७१) कोवळी उन्हे (१९८५) हे त्यांचे संग्रह पुढे प्रसिद्ध झालेले दिसतात. माधव गडकरी यांनी चौफेर या सदरातून चौफेर लेखन केलेले दिसते. देश-परदेशाच्या भ्रमंतीतून असा हा महाराष्ट्र भाग १ व २, असा हा गोमंतक इ. लेखन केले आहे. माधव गडकरींचे लेखन वृत्तपत्रीय आहे. प्रासंगिक गरजेतून निर्माण झाले असले तरी ललित्यपूर्ण व आस्वाद्य ठरते.

अरूण टिकेकर यांनी एकोणिसाव्या शतकातील व सध्या एकविसाव्या

शतकातील महाराष्ट आणि स्थानिक इतिहास या विषयांवर लालित्यपूर्ण लेखन केले आहे. तारतम्य भाग १ व २ (१९७३ ते ९७) जनमत (१९९५) कालमीमांसा (२००४) इ. अनेक सदर शीर्षके व पुढे त्यांचे लेखसंग्रह प्रसिद्ध झालेले दिसतात.

वृत्तपत्रीय वातावरणाशी संबंधित असलेल्या लेखकांनी ठळक असे सदरलेखन केलेले दिसते. ल.ना.गोखले (वाट्टेल ते) सदा डुंबरे आरसपानी, प्रकाश कुलकर्णी-माध्यम, विजय कुवळेकर- पैलू, ह.मो.मराठे-दिनमान, उलट आरसा, अरुण साधू- अक्षांश रेखांश, महेश केळुस्कर-साष-टांग नमस्कार इ. सदरलेखनातून पुढे पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

शांता शेळके यांनी तर म्हटले आहे की, माझं बरचस ललितगद्य हे वृत्तपत्रीय सदरलेखनातून निर्माण झालं. त्यात कमीपणा आहे, असे मला वाटत नाही.. या भूमिकेतून शांता शेळके यांनी नियमितपणे सदर लेखन केले. (शब्दांच्या दुनियेपासून) व त्यातील बरेच संग्रह रूपाने प्रसिद्ध झाले आहे.

रविंद्र पिंगे हे देखील शांता शेळके यांच्याप्रमाणे विपुल व भरीव ललितलेखन व सदरलेखन करणारे लेखक होत. विजया राजाध्यक्ष यांनी अनेक वर्षे सदरलेखन केले आहे. नित्य नवा दिस जागृतीचा हे सदर मानिनी मासिकांसाठी लिहून त्यांनी आपल्या सदरलेखनाची सुरूवात १९७४ ला केली. अवतीभवती आणि तळ्यात-मळ्यात ही सदरे अनुक्रमे केसरी आणि लोकसत्ता साठी लिहिली. त्यांचे लेखन एकाचवेळी वाचकाशी संवाद व स्वतःशी स्वगत या स्वरूपाचे आहे.

इंदिरा संत या कवयित्रीने सदरलेखनातून ललित लेखनाशी अतुट नाते जोडले आहे. सकाळ या दैनिकासाठी त्यांनी मृदगंध हे ललित सदर लिहिले व ते १९९६ ला पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आहे.

अनिल अवचट यांनी वृत्तान्तकथन (रिपोर्ताज) पद्धतीचे व सामाजिक विषयांवरील वैविध्यपूर्ण सदरलेखन केले आहे. दया पवार, लक्ष्मण माने, प्र.ई.सोनकांबळे, शरणकुमार लिंबाळे, नामदेव कांबळे इ. लेखकांनी सदरांतून समाजचिंतनपर ललित लेखन केलेले दिसते.

अरूणा ढेरे यांनी वृत्तपत्र व नियतकालीकातून कवितेप्रमाणे सातत्याने सदरलेखन केले आहे. त्यांच्या ललित लेखनात विविधता आहे. ललितलेखन मुक्तगद्य लेखन परंपरेत त्यांच्या लेखनाचा टप्पा लक्षणीय ठरतो. फ्रान्सिस दिब्रेटो, रत्नाकर मतकरी, बाळ कोंडके (विज्ञानललितगद्य) इ. अनेक लेखकांनी सदरामधून

ललितगद्य लेखनाची परंपरा वृद्धिंगत केले आहे.

अशारितीने ललितगद्याची सदरलेखन परंपरा समृद्ध करण्यात अनेक लेखक लेखिकांनी हातभार लावला व ललितगद्याला एक मुक्तगद्य लेखनाचा धुमारा संपन्न केला आहे. असे म्हणता येईल.

निष्कर्ष, आजच्या वृत्तपत्रीय व नियतकालिकातील ललितगद्य लेखनाची बीजे मराठी निबंधाच्या जन्मकाळात शोधता येतात. वैचारिक लेखनातील मी च्या अभिव्यक्तिला पुढे ललित्य पूर्णता लाभत गेली. विषयांचे वैविध्य लाभत गेले. निबंध, लघुनिबंध, ललितनिबंध हा ललितगद्यापर्यंत वाटचाल करत मुक्तगद्यापर्यंत येऊन पोहोचला. सदरलेखन ही वृत्तपत्रे व नियतकालिकांची गरज ललितगद्य लेखनाच्या माध्यमातून भागविली जाऊ लागली. साठोत्तरी काळात मराठी सदरलेखन ठळकपणे लिहिले जाऊ लागले. त्यातून मी ची आत्मनिष्ठ अनुभव मांडणी होऊ लागली. वाचकांची देखील सदरे ही गरज बनली.

★★★

# मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ
# प्रेरणा आणि परिणती

डॉ. कीर्ती मुळीक

'मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ : प्रेरणा आणि परिणती' हा माझ्या प्रबंधाचा अभ्यासविषय होता. या प्रबंधात चळवळीच्या उदयापासून ते तिचा अस्त आणि अस्तानंतरच्या पुढील पंधरा वर्षांच्या कालावधीत निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्यावर या चळवळीचा दिसून येणारा प्रभाव; याची मांडणी केली आहे. ही मांडणी करताना चळवळीच्या उदयापासून ते अस्तापर्यंतचा विकास यातील विविध अवस्था लक्षात घेतल्या.

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात १९५० ते १९६० या चळवळीच्या पूर्वकालाची नोंद घेतली. या प्रकारणाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत. पूर्वार्धात चळवळ, तिच्या विविध अवस्था, तिचे प्रकार यांची सैद्धांतिक मांडणी केली. भारतातील सामाजिक चळवळी व साहित्यावर त्यांचा दिसून येणारा प्रभाव यांचा आढावा घेतला. कोणतीही चळवळ किंवा क्रांती एकाएकी निर्माण होत नाही. चौकट मोडायची तर मुळात तिथे चौकट असावी लागते हे लक्षात घेऊन उत्तरार्धात पूर्वकाळातील (१९५० ते १९६०) प्रस्थापित ग्रामीण साहित्य, प्रस्थापित ग्रामीण साहित्यिक यांची पोर्शभूी, प्रेरणा व स्वरूप यांचा शास्त्रशुद्ध आढावा घेतला.

चळवळीचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले. चळवळ हे समाजजीवनाचे अभिन्न अंग आहे. ते एका अर्थाने सामूहिक वर्तन आहे. चळवळीच्या वर्तनक्रिया या विशिष्ट उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी असतात. त्यामुळे चळवळीमध्ये सहभागी असणाऱ्या व्यक्तींमध्ये ऐक्यभावना असते. चळवळीला नवविचारांची एक तात्त्विक बैठक असते. प्रस्थापित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी हे विचार मांडले जातात.

त्याचप्रमाणे समाजाच्या प्रचलीत व्यवहारपद्धतीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक व सातत्याने सामूहिक स्तरावर प्रयत्न केले जातात. चळवळीमध्ये सामान्यपणे शांततामय मार्गाचा अवलंब केला जातो. चळवळीचा कालखंड निश्चितपणे सांगणे कठीण असते. ग्रामीण साहित्याची पार्श्वभूमी

पुढीलप्रमाणे स्पष्ट केली.

ग्रामीण समाज हा मुख्यत्वेकरून शेतीशी निगडीत असल्याने तिथे कृषिनिष्ठ संस्कृती दिसून येते. या अंगभूत वैशिष्ट्यामुळे तो नागरी समाजापासून अलग, वेगळा दिसून येतो. ग्रामीण साहित्यात या ग्रामीण समाजाचे दर्शन घडविले जाते. महात्मा ज्योतिराव फुले यांच्यापासून आधुनिक मराठी ग्रामीण साहित्याला प्रारंभ झाला. त्यांनी खेड्यातील सर्वसामान्य माणूस, त्याचे जीवन व त्याचा सामाजिक स्तरावरील विकास हा आपल्या लेखनाचा केंद्रबिंदू मानला. याला जागे करण्यासाठी त्यांनी 'ब्राह्मणांचे कसब', 'शेतकऱ्याचा आसूड', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'गुलामगिरी' इत्यादी पुस्तके लिहिली. यातून ग्रामीण मराठी माणसाचे चित्रण सर्वप्रथम मराठी साहित्यात आले.

१९५० ते १९६० या कालखंडात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, उद्धव शेळके, रणजित देसाई हे प्रतिष्ठित ग्रामीण साहित्यिक आढळतात. व्यंकटेश माडगूळकर यांच्याकडून अस्सल ग्रामीण साहित्याची मुहूर्तेढ रोवली गेली. ग्रामजीवनाचा शुद्ध कलात्मक अंगाने वेध घेणारे ते पहिले ग्रामीण मराठी साहित्यिक होत. द.मा. मिरासदार यांनी ग्रामीण विनोदी कथालेखनास प्रारंभ करून दिला. शंकर पाटील हे घटनाप्रसंगात फारसे न रमता मानवी मनातील आंदोलने टिपताना दिसतात.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या दृष्टिकोनातून या पहिल्या पिढीच्या ग्रामीण साहित्याचे मूल्यमापन 'ग्रामीणता' या निकषावर केले जाते. पहिल्या पिढीतील ग्रामीण साहित्यिक हे पुण्यामुंबईत राहणारे होते.

मध्यमवर्गीय, सुखवस्तू व पांढरपेशे जीवन जगणारे होते. त्यांच्या साहित्याचा वाचकवर्गही नागरवस्तीत राहणारा होता. या वाचकवर्गाला खेड्याचे दर्शन घडविणे आणि त्याचे मनोरंजन करणे या दृष्टीनेच पहिल्या पिढीकडून ग्रामीण साहित्याचे लेखन झाल्याचे जाणवते. वरवरच्या, साधारण, साम्यविरोधी अनुभवांच्या पलीकडे जाण्याचे, त्यातील भावानुभावाला, अर्थपूर्णतेला स्पर्श करण्याचे आव्हान या पिढीने फारसे स्वीकारलेले दिसत नाही.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात १९६० ते १९७० या साठोत्तरी संक्रमण काळाचा आढावा घेतला. याचे कारण साहित्य हे देश, काल, परिस्थितीशी समांतर जात असल्याने होणाऱ्या परिवर्तनांचे साहित्यात चित्रण येणे अपेक्षित असते. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य सरकारने पंचवार्षिक योजना आखून

खेड्यांच्या विकासास प्राधान्य दिले. त्यातून खेडी बदलू लागली. महाराष्ट्राचा विचार करता १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. बहुजन समाजातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले आणि खेड्यांच्या विकासाचा झपाटा त्यांनी सुरू केला. यातून खेड्यांध्ये आमूलाग्र परिवर्तन होत गेले.

या प्रकरणात पारंपरिक खेड्याचे स्वरूप, साठोत्तरी कालखंडातील स्थित्यंतरे व स्थित्यंतरांुळे बदललेल्या खेड्याचे स्वरूप अशी मांडणी केली आहे. पारंपरिक खेडी शेतकरी व बलुतेदार यांच्या आपापसातील सहकार्याुळे स्वयंपूर्ण दिसतात. या परंपरागत ग्रामीण समाजात बारा बलुतेदार व अठरा आलुतेदार होते. शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने व त्यासाठी मनुष्यबळ भरपूर लागत असल्याने खेड्यात संयुक्त कुटुंबसंस्था दिसून येते. व्यक्तिजीवनापेक्षाही समूहजीवन महत्त्वाचे ठरते.

साठोत्तरी कालखंडात खेड्यात राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक, धार्मिक, शेतीविषयक, सांस्कृतिक, सामाजिक स्थित्यंतरे झाली. या स्थित्यंतरामुळे साठोत्तरी कालखंडातील खेडी अमूलाग्र बदलली. शिक्षणामुळे खेड्यातील व्यक्तीच्या जीवनविषयक दृष्टिकोनात महत्त्वपूर्ण बदल घडून आला. खेड्यात आधुनिकतेचे वारे वाहू लागले. शिक्षणामुळे तेथील तरुण पिढीची अस्मिता जागी झाली. ग्रामीण समाजाच्या अधःस्तरातील तरुणाला आपल्या शोषणाची जाणीव होऊ लागली. त्याबद्दल तो विचार करू लागला. आपले हे अनुभव साहित्यातून मांडावेत असे त्याला वाटू लागले. खेड्यातील स्थित्यंतराची ही चांगली बाजू आहे. वाईट बाजू अशी की, औद्योगिकीकरणामुळे खेड्यातील बलुतेदारी पद्धत नष्ट झाली.

चांभार, शिंपी, लोहार, सुतार यांचे उद्योग बंद पडले. या व्यक्ती अडाणी व अशिक्षित असल्याने नव्या उद्योगांसाठी आवश्यक असणारी कौशल्ये त्यांच्याजवळ नव्हती. त्यामुळे या सामान्य माणसाच्या आधीच्या दारिद्र्यात आणखी भर पडली. साखर कारखान्यांुळे खेड्यात स्थानिक सत्ताकेंद्रे निर्माण झाली व कुटील राजकारण खेळले जाऊ लागले. पैसा महत्त्वाचा वाटू लागल्याने शोषणाचे प्रमाण वाढले. यात तरुण पिढी ओढली जाऊ लागली. मूल्यव्यवस्था नष्ट होऊ लागली. परिणामी पूर्वी स्वयंपूर्ण असणारी खेडी या स्थित्यंतरामुळे अंतिमतः कंगालच झाली.

प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात या स्थित्यंतरांचा ग्रामीण साहित्यावर झालेला परिणाम नोंदवला आहे. स्थित्यंतरांचा ग्रामीण साहित्यावर विविध प्रकारे परिणाम झाला. खेड्यातील नवी तरुण पिढी शिक्षणामुळे विचारी बनली. तिची अस्मिता, सामाजिक जाणीवा वाढीस लागल्या. त्यामुळे मध्यमवर्गीय शहरस्थित लेखकांनी लिहिलेल्या ग्रामीण साहित्यामध्ये तिला उणीवा जाणवू लागल्या. हे खऱ्या अर्थाने 'ग्रामीणते'चे चित्रण नाही; हे या तरुणांच्या लक्षात येऊ लागले. आपले अनुभव आपणच चित्रीत करावेत, या अस्मितेतून त्यांनी लेखणी हाती घेतली. अशा नवोदित तरुण लेखकांची संख्या मोठी होती. त्यामुळे या कालखंडात मोठ्या संख्येने ग्रामीण साहित्य निर्माण झाले. अशा रीतीने साहित्याकडे गांभीर्याने बघणारी ग्रामीण साहित्यिकांची दुसरी पिढी निर्माण झाली.

ग्रामीण साहित्यिकांच्या या दुसऱ्या पिढीत मधु मंगेश कर्णिक, रा.रं. बोराडे, आनंद यादव, द.ता. भोसले, चंद्रकुमार नलगे, सखा कलाल, महादेव मोरे इत्यादी साहित्यिक येतात. पहिल्या पिढीच्या तुलनेत या पिढीजवळ फार मोठी वाङ्मयीन जाण नव्हती. स्वतःची अंतःस्फूर्ती प्रमाण मानून या पिढीने लेखन केले. स्वानुभवातून त्यांचे लेखन झाले असल्याने ते रसरशीत, जिवंत व प्रत्ययकारी झाले आहे. त्यामुळे साठोत्तरी कालखंडात ग्रामीण साहित्याचा प्रभाव ठसठशीतपणे दिसू लागला. वरील ग्रामीण लेखक मराठी साहित्यविश्वात प्रतिष्ठित पावले. त्यांच्या ग्रामीण साहित्याची नोंद मराठी साहित्यविशालादेखील चांगल्या अर्थाने घ्यावी लागली.

१९६० नंतर पहिल्या पिढीच्या ग्रामीण साहित्याचा बहर ओसरत गेला. स्थित्यंतरांच्या या काळातही त्यांचे लेखन 'बालपणी अनुभवलेले खेडे'च चित्रीत करीत होते. त्यामुळे आशय-विषयात तोचतोपणा येऊ लागल्याने त्यांच्या साहित्याला मर्यादा प्राप्त झाल्या. कथाकथनाच्या कार्यक्रमातूनही उथळपणाला ग्रामीण साहित्यातून वाव मिळू लागला. या मर्यादातून ग्रामीण साहित्याला जाणीवपूर्वक बाहेर काढण्याचे कार्य सर्वप्रथम आनंद यादव यांनी केले.

साठोत्तरी कालखंडाचे वाङ्मयीन नेतृत्त्व प्रेरणादृष्ट्या आनंद यादव यांच्याकडे जाते. यादव यांचा पिंड जसा लेखक, कवी व विचारवंत आहे, तसाच प्रयोगशील व बंडखोरही आहे. त्यांची प्रतिभा सतत निर्मितीचे नवनवीन प्रदेश शोधते. पूर्वसुरींच्या मर्यादा टाळून ते सकस व समृद्ध साहित्यनिर्मिती करतात. अनुभवाच्या मागणीप्रमाणे त्यांनी वेगवेगळ्या साहित्यप्रकारांध्ये लेखन केले आहे.

त्यांच्या या प्रयोगनिष्ठ लेखनामुळे ग्रामीण साहित्याला प्रतिष्ठेबरोबर आधुनिकतेचा संदर्भ प्राप्त झाला. त्यामुळे त्यांच्या साहित्याला 'ग्रामीण साहित्याचा महत्त्वाचा टप्पा' मानला जातो.

आनंद यादव आपल्या लेखन निर्मितीबरोबरच ग्रामीण समाज, तेथील आर्थिक, मानसिक, सामाजिक समस्या, विवंचना, तेथील ग्रामीण लेखक, त्याचे प्रकाशित व अप्रकाशित साहित्य यांविषयी सतत चिंतन करताना, निरीक्षण मांडताना दिसतात. ग्रामीण लेखकाचे लेखन वाङ्मयीन दृष्ट्या दर्जेदार नसते; पण त्यातील अनुभव मात्र सच्चे असतात. ग्रामीण समाजातील करुण वास्तव स्पष्ट करणारे असतात. मात्र हे लेखन वाङ्मयीन दर्जा नसल्यामुळे नि इतरही काही कारणांळे नाकारले जात आहे; हे यादवांनी पाहिले.

ग्रामीण समाजातील हे वास्तव प्रसिद्ध व्हायला पाहिजे, त्याला साहित्याचा दर्जा प्राप्त झाला पाहिजे, या लेखनाकडे मराठी साहित्यविशाने सहानुभूतीने पाहिले पाहिजे, या ग्रामीण लेखकांच्या अडचणी, समस्या नागर समाजाने जाणून घेतल्या पाहिजेत, त्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे; ही तळमळ यादवांना लागली. सामाजिक आस्थेतून त्यांनी प्रयत्न सुरू केले. प्राचार्य रा.रं. बोराडे यांनीदेखील नवोदित तरुण ग्रामीण लेखकांची ही वस्तुस्थिती अनुभवली होती. या लेखकांची उपेक्षा संपविण्यासाठी तेही पुढे सरसावले. डॉ. आनंद यादव व प्राचार्य रा.रं. बोराडे यांच्या या प्रयत्नातून ग्रामीण साहित्याची चळवळ उभी राहिली.

१९७३ ते १९७७ हा कालखंड 'ग्रामीण साहित्याची चळवळपूर्व स्पंदने' म्हणून नोंदविता येतो. नवोदित ग्रामीण लेखकाच्या समस्यांना 'ग्रामीण साहित्याची चळवळपूर्व स्पंदने' असे म्हणता येईल.

चौथ्या प्रकरणात या स्पंदनांचा सविस्तर आढावा घेतला आहे. साठोत्तरी कालखंडातील विविध स्थित्यंतरांळे ग्रामीण समाजाला जाग येत गेली. त्याला स्वतःच्या स्थितीचे ज्ञान होऊ लागले. आपले जीवनानुभव हे प्रातिनिधिक मराठी असूनही साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी दुय्यम स्थान मिळणार, आपण त्यांचा लावलेला स्वतंत्र अन्वयार्थ अमान्य होणार, याची त्याला जाणीव होऊ लागली. त्याला होत चाललेली स्वतःच्या अस्तित्त्वाची जाणीव बेचैन करू लागली.

महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात साठोत्तरी कालखंड हा कमालीच्या संघर्षाचा कालखंड दिसतो. बदलत जाणारे समाजजीवन याला कारणीभूत होते. नागर

साहित्यात 'महानगरीय' संवेदनांचा बोलबाला होऊ लागला होता. दलित साहित्याने जीवनवाद आणि सामाजिक बांधिलकी महत्त्वाची मानून प्रस्थापित साहित्याला नकार व विरोध जाहीरपणे केला होता. महाराष्ट्राची सामाजिक परिस्थितीही याला कारणीभूत ठरली. १९७१ ते ७५ या काळात महाराष्ट्रभर भीषण दुष्काळ पडला. शेतकऱ्यांना आपली शेती सोडून द्यावी लागली आणि मजूर म्हणून उदरभरणासाठी कामे करावी लागली. यातून शेतीसंबंधीचे, ग्रामीण भागासंबंधीचे प्रश्न अधिक तीव्रतेने जाणवू लागले. अशा परिस्थितीतही नागरी समाज या गरीब शेतकऱ्याला नजरेआड करीत आहे; हे लक्षात येऊ लागले.

साठोत्तरी कालखंडात ग्रामीण साहित्य आवर्तात सापडले. आनंद यादव, रा.रं. बोराडे यांसारखे अपवादात्मक साहित्यिक सोडले तर इतर ग्रामीण साहित्याबद्दल पुढीलप्रमाणे निरीक्षणे मांडता येतील.

साठोत्तरी ग्रामीण कादंबरी अभिरुचीने प्रगल्भ नसलेल्या वाचकांवर डोळा ठेवून लिहिली गेली. भडक संघर्ष, गुलाबी प्रणय व ग्रामीण जीवनाची नवलाईपूर्ण पोर्शभूी असे या कादंबरीचे स्वरूप झाले.व्यावसायिकतेच्या आहारी जाऊन रंजनमूल्य प्रमाण मानून ही कादंबरी लिहिली गेली. १९६० ते ६५ हा कालखंड ग्रामीण कथेच्या बहराचा कालखंड आहे; पण पुढे मात्र तीदेखील आवर्तात सापडलेली दिसते.

संक्रमणशील खेड्यांची फारशी दखल ही ग्रामीण कथा घेत नाही. खेड्यातील दुःखं आणि दारिद्र्य यांचे वरवरचे चित्रण ती करते; पण या वास्तवाच्या तळाशी जाऊन वेध घेणे, ती करीत नाही. तिच्यात वैचारिक व सामाजिक धग फारशी दिसत नाही; अशी अनेकांनी कथेबद्दलची निरीक्षणे नोंदविली आहेत. १९७० ते ८० या कालखंडातील तिसऱ्या पिढीच्या नवोदित ग्रामीण लेखकाचा विचार केल्यास हा लेखकवर्ग ग्रामीण समाजाच्या खालच्या स्तरातील आहे. केवळ सरकारच्या मोफत शिक्षण योजनेुळे हे लेखक शिकू शकले. अन्यथा यांचे जीवन खडतर, कष्टय नि त्यामुळे संस्कृती आणि परंपरा यांचे संस्कार न झालेले असेच दिसते. या लेखकाला साहित्यविषयक भान आणणाऱ्या, त्याची अभिरुची उन्नत करणाऱ्या कोणत्याही सुविधा खेड्यात आणि तालुक्यातही उपलब्ध नव्हत्या. याशिवाय या लेखकामध्ये एक न्यूनगंड होता. जे भोगले आहे ते मांडताना त्याला कुठेतरी या अनुभवाची लाज वाटत होती. आपली ग्राम्य भाषा म्हणजे अडाणी, असंस्कृत भाषा असा त्याच्यात न्यूनगंड दिसतो. ही भाषा साहित्यात वापरायची

का ? असा प्रश्नही त्याच्यापुढे उभा राहिलेला होता.

प्रस्थापित मराठी साहित्य संमेलनातील सर्व चर्चा मध्यमवर्गीय वर्तुळातच होत होत्या. साहित्यात येणाऱ्या ग्रामीण, दलित या नव्या साहित्यप्रवाहांची दखलही तिथे घेतली जात नव्हती. त्यामुळे नव्याने जागृत झालेल्या ग्रामीण लेखकाला आपले विचार व्यक्त करायला, प्रश्न मांडायला, ललित लेखन प्रसिद्ध करावयाला महाराष्ट्रात मुक्त व्यासपीठ मिळत नव्हते.

मराठी साहित्य विश्वात ग्रामीण साहित्याची समीक्षा हा उदासनितेचाच भाग होता. खरे पाहता श्री.म. माटे, श्री.ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, उद्धव शेळके, वामनराव चोरघडे, आनंद यादव, रा.रं. बोराडे, ग.ल. ठोकळ, र.वा. दिघे, रणजित देसाई, भास्कर चंदनशिव, द.ता. भोसले यांचे वाङ्मयीन दृष्ट्या दर्जेदार आणि कलात्मक ग्रामीण साहित्य मराठी समीक्षकांपुढे उपलब्ध होते. ग्रामीण साहित्यक्षेत्रात पूर्वी समीक्षा झालेली नसल्यामुळे समीक्षेचे नवे मानदंड ते उभे करू शकत होते. परंतु हे आव्हान त्यांनी पेलले नाही. ग्रामीण साहित्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे नवोदित तरुण ग्रामीण लेखकाला समीक्षकांकडून मार्गदर्शन मिळू शकत नव्हते. खेड्यातील बहुजन समाजाने लिहिलेल्या ग्रामीण साहित्यात फारशा वाङ्मयीन व कलात्मक जाणिवा दिसत नसल्याने व्यावसायिक हेतूने पुस्तके व नियतकालिके प्रसिद्ध करणाऱ्या नागर संपादकांनी व प्रकाशकांनीही या साहित्याकडे दुर्लक्ष केले. एकूणच ग्रामीण साहित्याविषयी नागरवासियांचा एक हेटाळणीचा सूर दिसत होता.

अशा प्रतिकूल परिस्थितीत नवोदित ग्रामीण लेखकाला आनंद यादव व रा.रं. बोराडे यांचे मार्गदर्शन मोलाचे वाटू लागले. त्यांच्या विचारातून आपल्याला एक निश्चित दिशा मिळत आहे; हे त्याला जाणवले नि त्यामुळेच पुढील काळात आनंद यादव यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यांना तो आवर्जून उपस्थित राहिला. प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात १९७७ ते १९७८ या काळातील पहिल्या दोन मेळाव्यांच्या स्वरूपाची चर्चा केली आहे. डॉ. आनंद यादव यांनी नवोदित ग्रामीण लेखकांच्या मेळाव्याचे आयोजन करून चळवळी संदर्भातील पहिले कृतिशील पाऊल उचलले. नोव्हेंबर १९७७ रोजी पुण्याच्या भारती विद्यापीठाच्या मोरे विद्यालयात पहिला मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यासाठी भारती विद्यापीठाचे संस्थापक पतंगराव कदम यांनी मदत केली. या मेळाव्याचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांच्या हस्ते झाले.

ग्रामीण लेखकांचा दुसरा मेळावा मे १९७९ रोजी संपन्न झाला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी श्री. पतंगराव कदम होते तर उद्घाटक प्रतिष्ठित ग्रामीण साहित्यिक ग.ल. ठोकळ होते.

या दोन्ही मेळाव्यातून चळवळीला, ग्रामीण साहित्याला व लेखकांना एक निश्चित दिशा प्राप्त झाली. 'आपल्या अडचणी आपणच सोडविल्या पाहिजेत. त्यासाठी आपण व साहित्य रसिक एकत्र यायला पाहिजे व एकत्रितरित्या अडचणींचा, भविष्यकालीन परिस्थितीचा विचार केला पाहिजे'; याची जाणीव लेखकांना झाली. या मेळाव्यांपासून प्रेरणा घेऊन हे लेखक व कार्यकर्ते आपापल्या गावी, जिल्हा व तालुका पातळीवर ग्रामीण साहित्य सेंलने, चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित करू लागले. स्वतःचे ग्रामीण जीवनानुभव, बोलीभाषा यांविषयीचा त्यांचा न्यूनगंड कमी झाला. 'ग्रामीणता' या साहित्याच्या विशेषणाचे निश्चित स्वरूप त्यांना माहीत झाले नि त्यामुळे त्यांचा लेखनाचा आत्मविशास दुणावला. मेळाव्यात विविध खेड्यापाड्यातून आलेल्या आणि साहित्याच्या पातळीवर एकाकी असणाऱ्या तरुण ग्रामीण लेखकांचा एकमेकांशी परिचय झाला. एकमेकांचे पत्ते घेऊन संपर्कात राहता येईल, हे त्यांच्या लक्षात आले. अशा रीतीने मेळाव्यांळे ग्रामीण लेखकांची झालेली कोंडी फुटण्यास मदत झाली.

प्रबंधाच्या सहाव्या प्रकरणात चळवळीचे वैचारिक साहित्य येते. डॉ. आनंद यादव यांनी घेतलेल्या नवोदित ग्रामीण लेखकांच्या दोन्ही मेळाव्यांळे, चळवळीला चालना मिळाली. ग्रामीण भागातील लेखक व क्रियाशील तरुण उत्स्फूर्तपणे आपापल्या भागात ग्रामीण साहित्य सेंलने, चर्चासत्रे, परिसंवाद यांचे आयोजन करू लागले. १९८० ते १९९० च्या दशकात महाराष्ट्रात राज्य, जिल्हा, तालुका, गाव अशा विविध पातळ्यांवर मोठ्या प्रमाणात ग्रामीण साहित्य सेंलने आयोजित केली गेली.

पुणे, मंगळवेढा, जयसिंगपूर, कोल्हापूर, औदुंबर, सातारा, कुंभारगाव, चंदगड, कोवाड, पंढरपूर, विटा, चरण, जळगाव, कोपरगाव, येवला, दहिवडी, सांगोला, सांगली, मिरज, अमरावती अशा अनेक ठिकाणी संलने झाली. कोटा, जुन्नर, जळगाव जिल्ह्यातील असोदा, कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा, सांगली, जिल्ह्यातील विटा, साताऱ्याजवळील वाई, वैजापूर, परळी वैजनाथ, बहिरगाव, साक्री या ठिकाणची सेंलने गाजली. याशिवाय आष्टी, पोहेगाव, जामखेड, लातूर, मराठवाडा येथे ग्रामीण साहित्य परिषदेची विभागीय संमेलने झाली. याशिवाय

महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालये, स्थानिक संस्था यामुळे ग्रामीण साहित्य चळवळीचा विचार ग्रामीण भागात फैलावण्यास मदत झाली. चळवळीत सामील बहुतेक लेखक हे शिक्षकी पेशातील असल्यामुळे त्यांनी आपल्या महाविद्यालयातदेखील ग्रामीण साहित्यविषयक विविध उपक्रम राबविले. या रीतीने १९८० ते ९० चे दशक म्हणजे ग्रामीण साहित्य चळवळीच्या उत्कर्षाचा कालखंड होय.

डॉ. आनंद यादव, प्राचार्य रा.रं. बोराडे यांच्या प्रयत्नातून चळवळीला सुरुवात झाली. पुढे चंद्रकुमार नलगे, डॉ. द.ता. भोसले, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. वासुदेव मुलाटे, प्रा. मा.रा. लामखडे, प्रा. भास्कर चंदनशिव, डॉ. अरविंद वामन कुलकर्णी, प्रा. वसंत केशव पाटील, प्रा. सतीश पिंपळगावकर, डॉ. श्रीराम गुंदेकर, प्रा. रामप्रसाद तौर, प्रा. अविनाश डोळस, सोपान हाळमकर, डॉ. अनुराधा गुरव, डॉ. गणेश देशमुख या कृतिशील कार्यकर्त्यांळे चळवळीचा उत्कर्ष झाला. पुढे अनेक तरुण लेखक, कार्यकर्ते या चळवळीत सामील झाले. ८ मार्च १९८६ रोजी औरंगाबाद येथे ग्रामीण साहित्य परिषदेची स्थापना करण्यात आली. या स्थापनेगे चळवळीला अधिकृत स्वरूप देण्याचा उद्देश होता.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भूमिका समन्वयाची आहे. ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्याचाच एक भाग असल्याने चळवळीचा मराठी साहित्याशी सवता सुभा नाही. उलट आधुनिक ग्रामीण साहित्यामुळे मराठी साहित्यप्रवाह समृद्ध होणार आहे; अशी चळवळीची भूमिका आहे. नवोदित ग्रामीण लेखकांना आपले विचार, अडचणी, प्रश्न मांडावयाला व त्यांचे ललितलेखन प्रसिद्ध करावयाला व्यासपीठ मिळवून देणे, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांवर उपाय शोधणे, त्यांना योग्य दिशा देणे ही चळवळीची भूमिका आहे. राजकारण्यांची बटीक न होण्याचा चळवळीचा निर्धार होता.

खेडी कितीही सुधारली तरी आधुनिक खेड्यांच्या स्वरूपात ती आधुनिक काळातदेखील असणार. त्यामुळे आधुनिक ग्रामीण साहित्य टिकून राहणार, कालौघात ते नष्ट होणार नाही, फक्त त्याचे स्वरूप बदलेल. सामाजिक, ग्रामीण विकास, लोकशाही सुदृढता यांचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडले पाहिजे. मराठी साहित्याची कलामूल्ये हीच ग्रामीण साहित्याचीही कलामूल्ये आहेत. वाङ्मयेतिहासात ग्रामीण साहित्याचा स्वतंत्र भाग असावा म्हणजे या साहित्यामागे असणाऱ्या जीवनप्रेरणांचा, त्याने घडविलेल्या जीवनदर्शनाचा, त्याच्या होणाऱ्या

स्वतंत्र विकासाचा एकसंध व सलग विचार करता येईल, असे विचार चळवळीचे प्रवर्तक डॉ. आनंद यादव विविध लेखांधून मांडतात. यातून ग्रामीण साहित्य चळवळीची वैचारिक व कृतिशील भूमिका स्पष्ट होते.

मराठी साहित्य विशाने पहिल्या काळात चळवळीचे फारसे स्वागत केले नाही. चळवळीवर विविध प्रकारचे आक्षेप घेतले गेले. ग्रामीण साहित्य परिषदेच्या स्थापनेनंतरही महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात वादळ उठले. या सर्व आक्षेपांचे डॉ. आनंद यादव, प्राचार्य रा.रं. बोराडे, डॉ. द.ता. भोसले, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव यांनी वेळोवेळी वैचारिक पातळीवरून निराकरण केले. प्रा. गं.बा. सरदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर, डॉ. बाबा आढाव, प्रभाकर पाध्ये अशा विचारवंतांनी या चळवळीचे स्वागत केले आणि चळवळीच्या संेलनात, मेळाव्यात सहभागी होऊन चळवळीला मार्गदर्शन केले. विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तीही संेलनात सहभागी होताना दिसतात. गावातील स्थानिक जनताही संेलनासाठी विविध पातळ्यांवरून उल्हासाने मदत करताना दिसते. एकूणच ग्रामभागातून ग्रामीण साहित्य संेलनांचे उत्साहाने स्वागत केले गेले.

सातव्या प्रकरणात चळवळीची परिणती (१९८५ ते २००५) नोंदवली आहे तर आठवे प्रकरण समारोपाचे केले आहे. ग्रामीण साहित्य चळवळीच्या परिणती बाबत पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविता येतात.

१. ग्रामीण साहित्याच्या चळवळीमुळे मराठी साहित्य विशात ग्रामीण साहित्य प्रवाह स्वतंत्रपणे अस्तित्त्वात आला. या अस्तित्त्वासाठी चळवळीने जाणीवपूर्वक प्रयत्न केले. साहित्य क्षेत्रातील ग्रामीण लेखकांच्या अडचणी लक्षात घेऊन, या लेखकांची होऊ लागलेली कोंडी फोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

२. डॉ. आनंद यादव यांनी आपल्या विविध वैचारिक लेखांधून ग्रामीण साहित्याचे वाङ्मयीन स्वरूप स्पष्ट केले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी ग्रामीण साहित्याची वेळोवेळी समीक्षा केली. नंतरच्या काळात ग्रामीण साहित्यावर अनेकांनी समीक्षात्मक पुस्तके लिहिली. या सर्वातून ग्रामीण साहित्याचे स्वरूप, त्याचा आशय, आविष्कार, साहित्याचे माध्यम म्हणून वापरण्यात येणारी भाषा, त्या दृष्टीने बोलीभाषेचे असलेले सामर्थ्य, साहित्याची कलामूल्ये यांविषयी ग्रामीण लेखकाची जाण वाढली. संेलनातील ग्रामीण साहित्यावरील विविध परिसंवादांळे ग्रामीण लेखकाला ग्रामीण साहित्यनिर्मितीच्या बाबतीत एक निश्चित दिशा स्पष्ट झाली. चळवळीच्या संेलनातून

या लेखकाच्या स्वतंत्र आविष्कार पद्धती जोपासण्याच्या दृष्टीने त्याला मार्गदर्शन करण्यात आले. त्याच्यासाठी अनेक कृतिशील उपक्रम घेण्यात आले.

३. भास्कर चंदनशिव, व.बा. बोधे, बाबाराव मुसळे, प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख, राजन गवस, मोहन पाटील, आनंद पाटील, तानाजी राऊ पाटील, शेषराव मोहिते, रवींद्र ठाकूर, बा.ग. केसकर, उत्तम बावस्कर, श्रीराम गुंदेकर, फ.म. शहाजिंदे, इंद्रजित भालेराव, सोपान हाळमकर, आप्पासाहेब खोत, गणेश देशमुख, भास्कर बढे इत्यादी आजचे ग्रामीण लेखक ग्रामीण साहित्य चळवळीतून पुढे आलेले आहेत.

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लिखाणासाठी, वैविध्यपूर्ण आशय आविष्कारासाठी हे लेखक प्रसिद्ध आहेत. त्यांच्या साहित्यकृतींची महाराष्ट्र शासन, साहित्य अकादमी व विविध पुरस्कार समित्या यांनी दखल घेतली आहे आणि सकस वाङ्मयासाठीचे पुरस्कार त्यांना देऊ केले आहेत. वरील लेखक ही केवळ ग्रामीण साहित्य चळवळीतून पुढे आलेली काही प्रातिनिधिक नावे आहेत.

४. चळवळीच्या विविध उपक्रमांुळे १९७७ नंतरच्या कालखंडात कथा, कादंबरी, कविता या प्रमुख ग्रामीण साहित्यप्रकारांची विस्तृत परंपरा आढळते. या साहित्य प्रकारांचे सातत्याने लेखन झालेले दिसते.

या टप्प्यावर 'ग्रामीणांनी ग्रामीणांसाठी लिहिलेले ग्रामीण साहित्य' अस्तित्त्वात आलेले दिसते. या ग्रामीण साहित्यावर चळवळीच्या ध्येयधोरणांचा प्रभाव जाणवतो.

५. चळवळीच्या प्रथमावस्थेत डॉ. आनंद यादव यांनी 'आधुनिक ग्रामीण साहित्य' ही संज्ञा स्पष्ट केली. या साहित्यात आधुनिक काळातील खेडी रेखाटली जावीत, अशी अपेक्षा डॉ. यादव व्यक्त करतात.

चळवळीनंतरच्या ग्रामीण साहित्यातून त्यांची ही अपेक्षा पूर्ण झाल्याचे जाणवते. पूर्वपरंपरेपेक्षा या काळातील ग्रामीण साहित्य हे अधिक उत्कट व समकालीन जीवनदर्शन घडविणारे वाटते. प्रखर वास्तववादी प्रेरणेतून ते निर्माण झालेले दिसते. पूर्वीच्या ग्रामीण साहित्यात दिसून येणारी रोंटिक, विनोदी, प्रणयरम्य किस्से वर्णन करण्याची दृष्टी या साहित्यातून पूर्ण लयाला गेलेली आहे. आजचे ग्रामीण साहित्य हे ग्रामीण जीवनाकडे चिंतनशील व गंभीर भूमिकेने बघते. आजच्या काळातील कंगाल, मूल्यहीन खेडी या आधुनिक ग्रामीण साहित्याने रेखाटलेली दिसतात. केवळ रेखाटन किंवा वर्णन न करता हे ग्रामीण साहित्य या

वास्तवाची विविध पातळ्यांवरून अंतर्भेदी चिकित्सा करते.

६. ग्रामीण साहित्य चळवळीने नवतरुण ग्रामीण लेखकांचे आत्मभान जागे केले आहे. हा लेखक खेड्याच्या अधः स्तरातील आहे. त्यामुळे भोवतालच्या परिवर्तनाकडे तो जाणीवपूर्वक पाहात आहे. त्याला आपले शोषण व शोषक यांविषयीचे ज्ञान आहे. हे सर्व तो लेखनातून व्यक्त करीत आहे. व्यक्त करीत असताना त्याच्या वृत्ती आत्मनिष्ठ न राहता व्यापक होताना व सामाजिक आशयाकडे झुकताना दिसतात.

७. १९८० नंतरचे ग्रामीण साहित्य एका अभिनिवेशाने वाटचाल करू लागलेले दिसते. हे साहित्य ग्रामपरिसर, कृषिसंस्कृती, निसर्ग यांच्या वर्णनात फारसे न रमता तेथील संक्रमणकारी शक्तींचे दर्शन घडविते. ग्रामजीवनाच्या वर्णनापेक्षाही त्यातील मूल्यांची ते चिकित्सा करते.

८. ग्रामीण साहित्याच्या चळवळींमुळे 'ग्रामीण वाचक' ही संकल्पना रुजलेली दिसते. चळवळीपासून प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्याला वाहून घेतलेली 'गावरान', 'रानमळा', 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका' यांसारखी नियतकालिके जन्माला आली. 'साहित्यशिवार', 'विशाखा', 'रसिक', 'जनसाहित्य' यांसारखी वार्षिके ग्रामीण साहित्याला व तद्विषयक नवविचारांना आवर्जून आपल्या दिवाळी अंकात स्थान देऊ लागली. खेड्यापाड्यातून व पुण्यामुंबईसारख्या शहरातील वर्तानपत्रातून ग्रामसंस्कृतीचे दर्शन घडविणारी सदरे येऊ लागली. यातून खेड्यापाड्यातील नवशिक्षित तरुण वाचन करू लागलेले दिसतात. साहित्यातून त्याला स्वानुभवच वाचावयास मिळू लागल्याने ग्रामीण भागातही 'वाचकवर्ग' निर्माण होऊ लागलेला दिसतो.

९. आज विद्यापीठीय पातळीवरून ग्रामीण साहित्याचे संशोधन मोठ्या प्रमाणात होत आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमातही या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. आज हे संशोधन, ग्रंथरूपाने प्रकाशित झालेले आहे, होत आहे. 'मराठी ग्रामीण कादंबरी', 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास', 'मराठी कादंबरीतील प्रादेशिकता', 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' इत्यादी ग्रामीण साहित्याची चिकित्सा करणारे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. या रीतीने ग्रामीण साहित्याची चिकित्सा, समीक्षा आता मोठ्या प्रमाणात होताना दिसते. पूर्वी जी ग्रामीण साहित्य समीक्षकाची उणीव जाणवत होती, ती आता पूर्णपणे नाहीशी झालेली दिसते. आज ग्रामीण साहित्याचे अनेक जाणकार, विचारवंत, समीक्षक उपलब्ध

झालेले दिसून येतात.

१०. ग्रामीण बोलीभाषेचा साहित्यातील अभिव्यक्तीसाठी माध्यम म्हणून वापर हे आजच्या ग्रामीण साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याचे श्रेय साहजिकच ग्रामीण साहित्य चळवळीला जाते. प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे अस्सल वऱ्हाडी बोलीतून कथा लिहितात. वऱ्हाडी बोलीतील म्हणी, वाक्प्रचार यांच्या वापराने त्यांची कथा परिणामकारक व प्रत्ययकारी झालेली आहे. भास्कर चंदनशिव, सदानंद देशमुख यांसारखे लेखक आपल्या कथा-कादंबरीमधून ग्रामीण भाषेचे जाणीवपूर्वक नवे व विविध प्रयोग करताना दिसतात. ग्रामीण भाषेतील नव्या उपमा, प्रतिमा-प्रतीके, भाषेचा उच्चारानुसारी केलेला वापर यामुळे त्यांच्या साहित्याला एक नवे परिमाण प्राप्त झाले आहे.

११. चळवळीनंतरच्या ग्रामीण साहित्याची प्रमुख प्रेरणा 'प्रखर वास्तववाद' असल्याचे दिसून येते. ग्रामीण लेखक आपल्या साहित्यकृतीतून धीटपणे जीवनानुभवाला भिडलेले दिसतात. ग्रामीण कवितेतून हे विशेषत्वाने जाणवते. ग्रामीण साहित्य चळवळ गतिमान झाल्यानंतर ग्रामीण कविता मोठ्या प्रमाणात लिहिली जाऊ लागली. या कवितेचे आरंभीचे रोँटिक रूप, ग्रामजीवनाविषयी आंधळ्या कौतुकाची भावना आज दिसत नाही. फ.म. शहाजिंदे, इंद्रजित भालेराव, सोपान हाळमकर, नारायण सुंत हे कवी भाषा किंवा साहित्यकलेविषयीचे कोणतेही दडपण न घेता आपले अनुभवविश्व शब्दरूप करताना दिसतात. आत्मभान आलेल्या ग्रामीण तरुण पिढीची ही कविता आहे; हे सहजपणे लक्षात येते.

१२. आजचे ग्रामीण साहित्य भोवतालच्या वास्तवाच्या विविध संदर्भांचे आकलन करते. हे संदर्भ जसे कौटुंबिक, मानसिक, भावनिक असे वैयक्तिक पातळीवरील आहेत, तसेच ते आर्थिक, सामाजिक व सामूहिकही आहेत. खेड्यातील जीवनसंघर्षाबरोबरच मूल्यसंघर्षाचेही त्यात चित्रण आहे. आज खेडी बकाल होण्यामागे विषमतेवर आधारलेली अर्थव्यवस्था कारणीभूत आहे. अर्थव्यवस्थेचे मार्मिक विश्लेषणही आजच्या आधुनिक ग्रामीण साहित्यात दिसून येते.

या रीतीने चळवळीची परिणती नोंदवून प्रबंधाचा समारोप केला आहे.

★★★

MS1010






# प्रा. डॉ. भास्कर शेळके

जन्म दिनांक ०१/०६/१९६१

**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख**
**श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे**
**मोबा. ९८९०६८६५२१, ९८२२४४८१८१**
**निवास : २३, श्रीदुर्गा बारव, जुन्नर, जि. पुणे**
**दूरभाष : (०२१३२) २२२०९४**
**ई मेल** shelke_bhaskar@yahoo.com


संपादन –

१) प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा
२) चळवळ आणि साहित्य
३) कथा गौरव
४) काव्यकस्तुरी
५) अधिष्ठान अभ्यासक्रम
६)वाङ्मय प्रकार : कविता
७) विज्ञान वेध
८) ग्रंथवेध
९) मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना
१०) संशोधन : स्वरुप आणि पद्धती

**प्रकाशित ग्रंथ :**

१) मराठी कादंबरीतील प्रादेशिकता
२) समीक्षा, संकल्पना आणि स्वरुप
३) ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि चित्किकत्सा
४) मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरुप आणि विश्लेषण
५) लोकसाहित्य संशोधन





